TEXT FLY
WITHIN THE
BOOK ONLY

THE BOOK WAS
DRENCHED

UNIVERSAL
LIBRARY

OU_192714

UNIVERSAL
LIBRARY

Author बेन्द्रे, वासुदेव सीताराम.
Title साधन-चिकित्सा १९२९
This book should be returned on or before the date last marked below

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, पुणें
— पुरस्कृत-ग्रंथमाला—क्रमांक ७ वा —

# शिक्षणाहीचा चर्चात्मक इतिहास

[ प्रस्तावना-खंड ]


# साधन-चिकित्सा

लेखक
वासुदेव सीताराम बेंद्रे

पुणें शहर
१९२८

किंमत साडेतीन रुपये

प्रकाशक
**वासुदेव सीताराम बेद्रे,**
१८० कसबा पेठ, पुणें.



[ सर्व हक्क ग्रंथकर्त्याचे स्वाधीन ]



मुद्रक
**अनंत सखाराम गोखले,**
'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें.

# पुरस्कार

इ०सन १९०५सालीं 'ग्रंथमालें'तून रा०के.मो. पंडित यांनीं 'ऐतिहासिक शोध करण्याची पद्धति' या नांवाचा जो एक ४८ पानी छोटा निबंध प्रसिद्ध केला त्यानंतर शास्त्रीय दृष्टीनें या विषयाची चर्चा करणारा **रा० बेंद्रे** यांचा आज पुरस्कृत होत असलेला हा **'साधन-चिकित्सा'** नांवाचा ग्रंथच मराठींत प्रसिद्ध होत आहे. रा०पंडित यांचा ग्रंथ म्हणजे सुप्रसिद्ध फ्रेंच इतिहासाचार्य लँगलॉ आणि साथनेबो यांच्या 'इन्ट्रोडक्शन् टु दि स्टडी ऑफ् हिस्टरी' या ग्रंथाचें सार होय. रा०बेंद्रे यांचा ग्रंथ त्या प्रकारचा नाहीं. तर स्वतः केलेल्या व्यासंगावरून मिळालेली माहिती, सुचवलेले नियम व पटलेलीं अनुमानें या ग्रंथांत त्यांनीं स्वतः ग्रथित करून स्वतःच आपल्या हिंमतीवर प्रकाशित केलीं आहेत. एवढा मोठा आणि इतका बारीक चिकित्सेनें युक्त असा हा पहिलाच ग्रंथ मराठींत प्रसिद्ध होत आहे.

या शके १८५० च्या चैत्रांत राजवाड्यांच्या 'ऐतिहासिक प्रस्तावना-खंडा'चा पुरस्कार केला, तों त्याच्या मागोमाग वैशाखांतच 'ऐतिहासिक पोवाडे' या रा० य. न. केळकरकृत ग्रंथाचा पुरस्कार करण्याचा सुप्रसंग आला. पाठोपाठ 'निंबाळकर घराण्याच्या इतिहासा'चा पुरस्कार झाला आणि आतां या आषाढ-श्रावणांत रा०बेंद्रे यांच्या या चिकित्सा-ग्रंथाचा पुरस्कार करण्याचा आनंद लाभत आहे! पुनः ऐतिहासिक कागदपत्रांचा एक नवा खण्ड याच मालेंत छापण्यास इतक्यांतच प्रारंभ हि झाला आहे! यावरून मंडळानें सुरू केलेली पुरस्कृत ग्रंथमालेची योजना किती यशस्वी व उपयुक्त होत आहे याचा चांगलाच प्रत्यय सर्वांस येईल.

त्रैमासिकाशिवाय **स्वीय** ग्रंथमालेतील दोन पुस्तकें निम्मीं छापून झालीं असून पुरस्कृत-ग्रंथमालेंत आणखी निदान तीन पुढील पुस्तकांची तयारी चालू आहे. स्वीय मालेसाठीं हि आणखी दोन ग्रंथांचें कच्चें काम आरंभिलें आहे. मनुष्यबळ व द्रव्यबळ हीं जर अधिकाधिक मिळतील तर यापेक्षां हि कामगिरी करून दाखवितां येईल!

रा० बेंद्रे यांचा हा ग्रंथ वाचला म्हणजे कोणास हि दिसून येईल कीं, त्यांनीं त्याच्या रचनेसाठीं किती श्रम, वेळ व पैसा खर्चिला आहे. सुमारें अकरा वर्षांपूर्वी ते मंडळांत आले आणि तेव्हांपासून आपली दगदगीची सरकारी नोकरी संभाळून त्यांनीं विलक्षण दृढतेनें व हौसेनें, जीवापाड कष्टून महाराष्ट्र-

इतिहासाचा व्यासंग निरपेक्षबुद्धीनें केला. त्याचें फल जनतेला अर्पण करण्याचा योग आल्यानें त्यांस व त्याचा पुरस्कार करण्याचा योग आल्यानें मंडळास अतिशयच समाधान वाटणें साहजिकच आहे. रा० बेंद्रे हे नुसतेच कष्टाळू नाहींत तर तीक्ष्ण बुद्धीचे व टापटिपीचे तरुण आहेत. रा० य. न. केळकर व रा०वा. सी. बेंद्रे असे नवे व दमदार अभ्यासक जनतेपुढें येत आहेत ह्यावरून ही संशोधनविद्या कशी जातिवंत व वाढती आहे हें हि समजून येते.

पुरस्कार म्हणजे अर्थात् गुणदोषात्मक समालोचन किंवा अभिप्राय नव्हे. ज्या विषयावर रा० बेंद्रे यांनीं ग्रंथ लिहिला आहे त्या विषयामध्यें मतभेदाचीं स्थळें जागोजाग आढळतील. त्यांनीं बसविलेले नियम, दिलेले अभिप्राय आणि योजलेले कित्येक शब्द विरोधी टीकेचे हि विषय होतील; उदाहरणार्थ शोधना, असंबंधित वगैरे शब्द व रूपे आक्षेपाचा विषय होतील. त्यावेळी पूर्वी हि समर्थादिकांनीं चालणा वगैरे शब्द वापरले त्याचा निर्वाह कसा करावयाचा हा विचार करावयास पाहिजे. आपल्या अडचणींची व श्रमांची रा० बेंद्रे यांनीं विशेष जाणीव वाचकांना करून दिली नसली तरी त्यांनीं शेवटीं जे उपसंहारांत चार शब्द लिहिले आहेत त्यांतील सद्भावाकडे व विनंतीकडे वाचकांनीं अवश्य लक्ष द्यावें.

या ग्रंथांत सामान्य वाचकांना पण त्याहून संशोधकांना आणि त्यांतल्या त्यांत नूतन संशोधकांना पुष्कळ उपयुक्त व महत्त्वाची माहिती वाचावयास मिळेल. पुराव्याची छाननी कशी करावी, अर्थ कसे ठरवावे, कागदाचें मूळ रूप कसें ओळखावे, हीणकस कसे बाहेर काढावे, कालस्थलपरीक्षा कशी करावी, कठोर सत्यप्रियता कशी राखावी, पूर्वग्रहाची बाधा न होऊं देतां निरंजन दृष्टीनें सत्यासत्य कसे पारखावें, कागद, लेखणी, शाई, अक्षर, वळण. मुद्रा इ०शतविध परीक्षा कशी कसून करावी, इंगितज्ञ कसें व्हावें, लक्षप्रमाणांचें वजन कसें तोलावें, वृत्तांत मिसळलेलें मत व मतांत गुंतलेलें वृत्त हीं हंसक्षीरन्यायानें विभक्त कशीं करावीं, सर्व पहावें पण वेचकच कसें घ्यावें, इत्यादि शेकडों बाबींचा विचार रा० बेंद्रे यांनी सांगितला आहे. त्यांच्या अनुभवाचा व व्यासंगाचा लाभ त्यांनीं इतरांस करून दिला आहे. वास्तविक अजून रा० बेंद्रे यांच्या विषयावर निर्दोष व रमणीय ग्रंथ व्हावयास आधीं दुसरी पुष्कळ सिद्धता व्हावयास हवी आहे. तिचें किंचित् दिग्दर्शन येथें करून ठेवितों.

आज चाळीस पन्नास वर्षे महाराष्ट्र-इतिहासाचें संशोधन आमचे महाराष्ट्रीय विद्वान् करीत आहेत. हें काम ज्याला जसें सुचलें व साधलें तसें त्यानें केलेलें आहे. सरकार व विद्यापीठ हे दोघे हि या कामीं विरोधी न म्हटले तरी पराकष्ठेचे उदासीन राहिलेले आहेत! त्यामुळें या कामाला पाहिजे होत्या त्या सवलती व सोयी उपलब्ध झाल्या नाहींत. खुद्द **सरकारी दप्तर-खाना** हि अद्यापि विद्वानांस सररहा खुला नाहीं. या पुणें दप्तरखान्यांत **पांच कोटी कागद व सत्तावीस हजार रुमाल** आहेत. शास्त्रीय दृष्ट्या यांतील कागदांचा तपास व संशोधन होणें फार फार अगत्याचें आहे. शिवकालीं, निदान पेशवेकालीं, सरकारी कागद कसे असत, किती प्रकारचे असत, शिक्के कसे होत, रुजु संमत, देणे देवावे, बार, तेरीख, पैवस्ती वगैरे कोठें कशा पडत याचे **नियम प्रत्यक्ष उदाहरणें तपासून ठरविण्याचें साधन** हें पेशवे-दप्तरच होय. तेथेंच हें काम सर्वांगसुंदर करितां येईल. ज्याला सायनेव्हो व लँगलॉ डिप्लोमॅटिक म्हणतात त्याची सिद्धता या पुणें दप्तराचे अभ्यासानें जशी होईल तशी अन्यत्र होणें कठीण किंबहुना अशक्य आहे! परंतु इकडे रानडयां च्यानंतर चांगलें लक्ष कोणीं दिलें नाहीं. हें पुणें दप्तरसंबधींचें काम वास्तविकपणे आमचे नवे दिवाण, अमात्य व लोकसभेंतील सभ्य यांचें आहे. परंतु त्यांचे तिकडे यत्किंचित् हि लक्ष नाहीं. त्यामुळें **जुन्या कागदांची परीक्षा पक्की व नक्की** करण्याचे नियम बांधण्यास फारच कटकट पडत आहे. रा० बेद्रे यांनीं या मुद्दयावर जोर दिला आहे हें योग्यच केलें आहे. त्याचप्रमाणें आमचेकडील कागद-पत्रांचा संग्रह जो इंडिया ऑफिसांत वगैरे पडला आहे तो आमचा आम्हांकडे परत येईल अशी तजवीज झाली पाहिजे. विलायतेंत त्याचे कोणी उपासक नाहींत आणि येथें आहेत त्यांस उपास पडत आहेत! हें बरोबर नाहीं. कोणी पार्लमेंटा-पावेतों हा प्रश्न नेऊन ही आमची संपत्ति इकडे परत येईल असे करावें. श्रीशिवाजी मेमोरियल् कमिटी किंवा प्रिन्सेस चेंबरमधील आमचे दक्षिणी संस्थानिक यांनीं येट बादशहांपावेतों हा विषय नेऊन हा संग्रह संपादन केला पाहिजे. आपल्या मंडळांत हि संग्रह आहे. त्याची संपूर्ण यादी होऊन मग त्यावरून पुनः काल-वार, विषयवार, व्यक्तिवार **फेरयाद्या** तयार झाल्या पाहिजेत! त्याखेरीज इतिहास-लेखक व इतिहासाभ्यासक व संशोधक या त्रिवर्गास हि फार अडचण होत आहे. एकतर निरपेक्षसेवक पुढें येतील तर किंवा द्रव्याची सोय होईल तरच हें कार्य घुरें होईल! एरव्हीं नाहीं. शिवकालीन कागदांबद्दल तर फारच

अडचणी आहेत. रा० बेंद्रे यांचे इतकी निराशा नको. अजून त्या वेळचे पुष्कळ कागद सांपडतील. बिलायतेंत व येथें अजून फार शोध व चाळणा व्हावयास पाहिजे. तसेंच विजापुरीं फार्शी फर्मानांचा रा० दाते यांचे कडील जो संग्रह हल्लीं तपासण्याचें काम चालू आहे, तशीं फर्मानें मुसलमान घराण्यांत पुष्कळ सांपडलीं पाहिजेत. हैद्राबाद ( भागानगर ) येथील दप्तरखानें व सर्व निजामी मराठवाडा येथे पुष्कळच तपास होणें आहे. आदिलशाही व निजामशाहीच नव्हे तर थेट बाम्हनीशाही फर्मानें हि सांपडणें शक्य वाटूं लागलें आहे. पोथ्या, चित्रें, नाणीं, शिलालेख पुष्कळच पडलेले आहेत. तीं साधनें जमवून तपासून लावून व्हावयास पाहिजेत. यांतील प्रत्येक बाबीचा तपास ही एक स्वतंत्र शास्त्र-शाखा आहे. कित्येक शाखांचा अभ्यास हि सुरू झाला नाहीं. आमचेकडे कागद बरेच छापले गेले परंतु त्यांचीं **मूळें** बारा वाटांस गेलीं ! मग त्यांचा तपास होऊन त्यांजवरून अस्सल व बनावट याचे नियम ठरविणार कसे ? खुद्द संशोधकांना हि पुष्कळ मोह सुटत नाहींत. इतिहासलेखकांना हि संशोधकांचें वैशिष्ट्य ध्यानांत येत नाहीं. राजवाड्यांसारखा धुरंधर संशोधक या लडथडींत आम्हांस पूर्ण फलदायी झाला नाहीं ! असो ! हें सर्व काम आधीं व्हावयास हवें. आधीं कागद जमविणें, मग लावणें, मग खरेखोटे तपासणें आणि हें करतां करतां प्रत्यक्ष उदाहरणें देऊन व पाहून नियम ठरविणे मग पुढली चिकित्सा व मग इतिहासरचना. असो. पण हें सर्व पराधीन आहे. तें कधीं होईल ते होवो! तोंवर स्वस्थ बसतां येत नाहीं हें पाहून रा० बेंद्रे यांनीं मंडळासारख्या संस्थेंतील व्यासंगी विद्वानांचा व संग्रहाचा **ममत्वबुद्धीनें** व मंडळाविषयीं **पूर्ण प्रेम व निष्ठा** ठेवून उपयोग करून घेतला व आपल्या अध्ययनाचें फल **स्वार्थत्यागानें** जनतेस अर्पून ज्या राजवाड्यांना त्यांनीं गुरु केलें त्यांची परंपरा पुढें चालविली याबद्दल त्यांचें अभिनंदन करून यापुढील त्यांचे संभाजीवरील व इतर बहुमोल ग्रंथ त्यांनीं लवकरच याप्रमाणेंच प्रसिद्ध करावे अशी विनंती त्यांस करून हा पुरस्कार आटपतों.

पुणें शहर,
श्रावण बद्य ११, १८५०

**दत्तो वामन पोतदार**
**गंगाधरराव नारायणराव मुजुमदार,**
चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, पुणें.

# साभार-स्वीकार

प्रसिद्ध इतिहास-संशोधक कै० पांडोबा पटवर्धन यांनीं इ०सन १९१६च्या अखेरीस इतिहासाच्या नावडत्या क्षेत्रांत काम करण्याची बळजबरीची दीक्षा मला प्रथम दिली. दोनतीन वर्षें सांप्रदायाचें कडक शिक्षणही अगदीं आपलेपणानें माझ्या माथीं मारलें व इतिहासाची गोडी लाविली. त्यांच्या अकालीं निधनानें माझी अभ्यासाची लंगडी पडलेली बाजू नंतर कांहीं वर्षें श्री० पांडुरंग मार्तंड ऊर्फ आबा चांदोरकरांनीं सांभाळली. अर्थात् हा नावडत्या विषयावरील पहिला ग्रंथ म्हणजे या पांडोबा-द्वयींच्याच श्रमांचें फल आहे. त्यानंतर श्री० दत्तोपंत आपटे यांचेंच मला विशेष साहाय्य झालें. वेळीं-अवेळीं केव्हांही त्यांच्याकडे जाऊन कोणत्याही मुद्द्यावर चर्चा करूं म्हटलें तरी त्यांची कधींच ना नसे. विशेषतः खंडन-मंडनात्मक दोन्हीही दृष्टींनीं कोणत्याही मुद्द्यावर वाद करण्याच्या त्यांच्या पद्धतीमुळे तर आपल्या प्रतिपादित विषयांतील तत्त्वांच्या गुणदोषांबद्दलची दृढता करून घेणे बरेंच सोपें जातें. परंतु त्यांनीं मला जर विशेष उपकृत करून ठेविलें असेल तर शक-सन-मिति-तिथी पद्धतीच्या दुर्मिळ परंतु रूक्ष ज्ञानाच्या दानानें. या विषयावरील जी कांहीं माहिती दिली गेली आहे ती सर्व त्यांनींच दिलेल्या विविध माहितीचे सार आहे. या मंडळींचें साहाय्य जरी उपकार-फेडीच्या बाहेरचें असलें तरी त्याहीपेक्षां अधिक साहाय्य भारत-इतिहास-संशोधक-मंडळाच्या पाक्षिक व वार्षिक सभांच्या द्वारें झालें आहे. या सभांत वाचलीं जाणारीं टांचणें 'क्षुल्लक' असल्याचा कोणाला कधीं कधीं भास होतो. परंतु माझ्यासारख्या गरीब अभ्यासकांना संशोधकीय ज्ञानसंपादनाचें एवढेंच साधन आहे अशी अनुभवानें माझी दृढ समजूत होऊन राहिली आहे. मंडळाच्या चालकांनीं चिकाटी धरून इतिहासाभ्यासूंना संशोधकीय ज्ञानदानाचा हा राजमार्ग अनिर्बाधित चालू ठेवावा अशी त्यांना नम्र सूचना आहे. श्री० सरदार आबासाहेब मुजुमदार यांनीं फारसी साधनांबद्दलची माहिती वेळोंवेळीं दिली व प्रो० पोतदारांनीं या पुस्तकाचें टांचण नजरेखालीं घालून कांहीं महत्त्वाच्या सूचनाही केल्या त्याबद्दल त्या दोघांचाही मी फार आभारी आहें.

औंध-संस्थानाधिपति श्रीमंत बाळासाहेब पंत प्रतिनिधि यांनीं मोठया उदारतेनें आपल्या बहुमोल ग्रंथ-संग्रहाचा मला उपयोग करूं दिला. त्या-

बद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच होणार आहेत. त्याचप्रमाणें श्री० सरदार तात्यासाहेब मेहेंदळे व श्री० बाळासाहेब घोरपडे यांनींही आपल्या निवडक व दुर्मिळ पुस्तकांच्या सुंदर संग्रहांचा वाटेल त्या वेळीं फायदा घेऊं दिला त्याबद्दल त्यांचाही मी फार आभारी आहें. श्री० बाबुराव फाटक, श्री० गि. भि. नरे व श्री० द. वि. नाईक यांनीं मला माझ्या अभ्यासांत उणीव व निरुत्साह न भासूं देण्याकरितां अनेक तऱ्हांनीं शक्य ती मदत मोठ्या प्रेमानें दिली आहे व पुढें देतीलही; परंतु मला मात्र त्यांच्या ऋणांतून मुक्त होणें कठीण दिसत आहे.

श्रीमंत औध-संस्थानाधिपति, भारत-इतिहास-संशोधक मंडळाचे व सत्कार्योत्तेजक सभेचे चालक, दे० भ० वासुकाका जोशी व विजय प्रेसचे मालक या सर्वांनीं आपापल्या संग्रहांतील साधनांचे व अक्षरांच्या नमुन्यांचे ठसे उपयोगास दिल्यानें या पुस्तकांत रहाणारें मोठेंच व्यंग दूर करितां आलें आहे. त्याबद्दल मी त्यांचा फारफार आभारी आहें.

पुस्तक-प्रकाशनाची मोठीच खटखट असते. परंतु या पुस्तकाच्या बाबतींत मात्र ती मुळीं भासलीही नाहीं. त्याचें खरें श्रेय अर्थातच विजय प्रेसच्या ध्येयाला आहे. तसेंच पुस्तकांत अशुद्धें वगैरे राहिलीं म्हणजे बरीच हुरहुर लागून राहते. या पश्चात् होणाऱ्या पश्चात्तापापासून माझी मुक्तता श्री० ह. स. गोखले यानीं केल्यानें मला निवांतपणें पुढील अभ्यासक्रमास लागतां येत आहे. पुस्तकाचें अंतरंग व बहिरंग जर सुबक, व्यवस्थित व बिनचुक झालें असेल तर त्याला विजय प्रेसचे मालक श्री० आप्पासाहेब गोखले यांची दक्षताच विशेष कारणीभूत झाली आहे. या दोघांही गोखले बंधूंचे या पुस्तक-प्रकाशनांत मजवर बरेच उपकार झाले आहेत. त्याबद्दल त्यांचे आभार मानणें अगदीं क्रमप्राप्तच आहे.

शेवटीं हें पुस्तक म्हणजे उपरिनिर्दिष्ट सर्व मंडळींच्या श्रमांचे व आशीर्वादांचें फल व जी कांहीं थोडीबहुत शिकवणूक व पुस्तकें मिळालीं त्यांतील घेतां व देतां आलें तें सार आहे, ही गुप्त ठेवलेली गोष्ट नमूद करून ही माझी अल्प सेवा वाचकांस सादर करीत आहें.

पुणें शहर,
९ ऑगस्ट, १९२८.

वा. सी. बेंद्रे

# शिवशाहीचा चर्चात्मक इतिहास

# साधन-चिकित्सा

नवीन अनुभवानें नूतन विचारमालिका निर्माण करण्यास अलौकिक बुद्धिमत्ता असावी लागते. अशी तीव्र बुद्धि सर्वांच्याच वांट्याला येते असा सृष्टिनियम नाहीं. नवीन विचारमालिका रूढ करणारे पुरुषश्रेष्ठ अगदीं विरळाच सांपडतात. भूतकालच्या अनुभवाच्या पायावर विचारसरणीची इमारत चढविणें मात्र तितकें दुःसाध्य नसतें. म्हणून मनुष्यप्राणि प्रथम या भूतकालीन ज्ञानाची अपेक्षा करतो व या ज्ञानाच्या साहाय्यानें तो आपल्या विचारांत भर टाकून आचारांची दिशा ठरवीत असतो. ज्ञानसंवर्धनाला व त्याबरोबर देशाच्या अगर समाजाच्या प्रगतीला हा भूतकालीन अनुभवाचा अथांग ज्ञानसागर मंथन करणें इष्ट असतें म्हणून सामान्य कर्ती माणसें या ज्ञानसागरांतील निधि बाहेर काढण्याच्या खटपटीला लागलेली दिसतात. जी विचारसंपत्ति शोधून काढली जाते ती सामान्य जनतेत रूढ करण्याच्या प्रयत्नांत कित्येक खटपट करीत असतात. कांही रूढ झालेल्या विचारांना आपल्या शोधक बुद्धीनें व निरनिराळ्या भेदाभेदसूचक शब्दांच्या आवरणानें निर्दोष करण्याचा प्रयत्न करितात. अशा वेळीं नूतन कल्पनाही रूढ केल्या जातात. नवीन विचार किंवा आचार वाङ्मयांत भर टाकूं शकतात. विचाराशिवाय वाङ्मयाची वृद्धि होत नाहीं. जेथें नूतन विचार नाहीं तेथें नूतन वाङ्मयप्रसूति नाहीं. विचार नवीन असेल तर तें वाङ्मय नवीन व प्रगतिपर असेल. नुसत्या शब्दांच्या अगर अक्षरांच्या भरण्यानें नवीन वाङ्मयनिर्मिति होऊं शकणार नाहीं. नवीन शब्दसृष्टीनें वाङ्मयाची प्रगति झाली असें म्हणतां येणार नाहीं. विचारांच्या स्पष्टीकरणाला नवीन शब्दांचा भरणा करण्याची जरूर पडेल. नवीन शब्दांचा भरणा करणें म्हणजे वाङ्मयासाठीं लागणाऱ्या साधनांची निष्पत्ति करणें होय. भूतकालीन विचारमालिकांचा प्रसार करण्याचे निरनिराळे प्रकार आहेत. इतिहास, चरित्रे, निबंध, नाटकें,

कादंबऱ्या, गोष्टी वगैरे वाङ्मयनिर्मिति भूतकालीन किंवा वर्तमानकालीन विचारमालिकेची द्योतक असते. यांतही नवीन विचारमालिकेची भर पडत असते. परंतु ती अल्पांशानें पडते. अशा वाङ्मयनिर्मितींतील विचार चांगले सुसंस्कृत असतील तर भाषेची संस्कृति उच्च ठरेल. परंतु तपशिलाच्या अभावी भूतकालीन विचारसरणींत बरेच दोष रहात असतात, इतकेच नव्हे तर चुकीच्या समजुतीमुळेंही रूढ विचारांत दोष शिरलेले असतात. यायोगें वाङ्मयाला गौणत्व येतें. विचारपद्धति सदोष राहिल्यानें व त्यामुळें आचरणांत वैगुण्य प्राप्त झाल्यानें कार्यांत अटकळीप्रमाणें यश संपादतां येत नाहीं. म्हणून भाषेतील दोष काढून टाकण्याकरितां जसे व्याकरणानें निर्बंध घालण्यांत येतात त्याचप्रमाणें शास्त्रीय वगैरे वाङ्मयप्रसूतींतही त्या त्या शास्त्राला योग्य असे शास्त्रीय निर्बंध घालावे लागतात. यायोगें मागाहून घुसडले जाणारे दोष काढतां येतात. तसेंच तपशिलाच्या अभावीही शिरलेले दोष काढून टाकतां येतात. कोणत्याही शास्त्रीय वाङ्मयांत प्रत्यक्ष अनुभवाचा फायदा घेतां येतो. जी गोष्ट सांगावयाची ती प्रत्यक्ष पडताळून घेतां येते. परंतु इतिहासाच्या बाबतींत मात्र पडताळून पाहण्यास आवश्यक साधनें लुप्त झालेलीं असतात. अशा स्थितींतही मनुष्य आपल्या देशाचा अगर समाजाचा इतिहास शोधून काढण्याची धडपड करीत असतो. भूतकालीन इतिहासाच्या शोधनानें वाङ्मयांत जितकी भर पडूं शकते तितकी भर इतर कोणत्याही साधनानें पडत नाहीं. व्यवहारी मनुष्य आपल्या इतिहासाच्या पायावर वर्तमानकालीन परिस्थितीच्या सामुग्रीनें देशाच्या अगर समाजाच्या वैभवाचा इमला उभारण्याचा प्रयत्न करीत असतो. ज्या वेळीं देशाच्या अगर समाजाच्या वैभवाचा प्रश्न समोर येतो त्या वेळीं साहजिकच देशाचा अगर समाजाचा पाया किती निर्दोष व कसदार म्हणजे सुसंस्कृत आहे हें पाहण्याची उत्कंठा लागते. अशा वेळीं त्या देशांत अगर समाजांत इतिहाससंशोधनाची आवड वाटते. कोणत्याही देशांत राष्ट्रविषयक कल्पनांचा प्रादुर्भाव झाला किंवा संघटनेची आवश्यकता भासूं लागली म्हणजे तो देश अगर समाज आपल्या इतिहासाकडे विशेषच चिकित्सापूर्ण दृष्टीनें पाहूं लागतो व त्यांत अभिमानाचीही जागृति होते. इतिहासाची जुळणी करूं लागलें म्हणजे तपशिलाभावीं व अनेक अन्य तऱ्हांनीं इतिहासाच्या सामुग्रींत शिरलेले दोष, अतिशयोक्तीचा वगैरे मजकूर, खो

साळपणा इत्यादि वैगुण्यें दूर करण्यासाठीं चिकित्सा करतांना कांहीं सामान्य नियम ठरवून घ्यावे लागतात. नंतर या निर्बंधांच्या चाळणींतून इतिहास चाळून काढला म्हणजे त्या शास्त्रशुद्ध इतिहासापासून त्या देशाला अगर समाजाला फायदा करून घेतां येतो. परंपरेच्या विचारसरणीवरून त्या देशाची अगर समाजाची सामान्य प्रवृत्ति समजते. या सामान्य प्रवृत्तीच्याच अनुरोधानें संघटना होऊं शकते. आत्मविकासालाच आत्मानुभवाची जरूर असते, आणि एकदां कां आत्मविकासाकडे प्रवृत्ति झाली म्हणजे मनुष्य आत्मानुभवशोधनाकडे लक्ष देऊं लागतो. याच वेळीं देशांत राष्ट्रीय भावना उत्पन्न झाल्याचें स्पष्ट होतें व तो देश आपल्या विविध इतिहासाकडे अर्थपूर्ण दृष्टीने पाहूं लागतो.

इतिहास तीन प्रकारानें मुख्यतः रूढ केला जातो. संशोधकीय इतिहासांत इतिहासकालीन वस्तुस्थिति तत्कालीन भाषेंत व शास्त्रशुद्ध तपशिलांत वर्णन करण्याचा प्रयत्न केला जातो. गोष्टीरूप इतिहासांत जें शब्दचित्र संशोधकीय इतिहासांत रेखाटलेलें असतें तें सामान्य प्रकारानें व प्रचलित भाषेंत साधारण दर्जाच्या माणसालाही पटेल असें समजून देण्याचा प्रयत्न केला जातो. राजकारणी किंवा ध्येयवादी इतिहासकार आपल्या इतिहासाच्या साधनानें जनतेंत आत्मविकास आणि राष्ट्रांत स्फूर्ति व चैतन्य उत्पन्न करण्याचा प्रयत्न करीत असतो. गोष्टीरूप व संशोधकीय इतिहासकारांनी रूढ केलेल्या ऐतिहासिक ज्ञानाचा फायदा घेऊन तो जनतेची प्रवृत्ति आपल्या ध्येयसंपादनार्थ वळविण्याचा प्रयत्न करितो. जनतेला आत्मकर्तृत्वाबद्दल विश्वास पटविण्याचा ऐतिहासिक उदाहरणासारखा कोणत्याही अन्य साधनांचा उपयोग सहज व खात्रीपूर्वक करतां येत नाहीं. हे तीनही प्रकारचे इतिहास राष्ट्राला परिपोषक असे असतात. या तीनही प्रकारांच्या इतिहासांची महती आपापल्या प्रकारें श्रेष्ठ असते. परंतु संशोधकीय इतिहास चिर राहतो. गोष्टीरूप इतिहास भाषेच्या व लोकांच्या समजुतींतील फेरबदलीबरोबर फेरबदल पावतो. राजकारणी किंवा ध्येयवादी इतिहास राजकीय वर्तमानपरिस्थितींत क्रांति घडतांच बदलतो. अशा इतिहासांत जीं तत्त्वें विशेषेंकरून गोंवण्याचा प्रयत्न केला जातो त्या तत्त्वांचा विकास किंवा ऱ्हास झालेला असतो. क्रांतीनंतरच्या नवीन प्रवृत्तीला हा पूर्वीचा साक्षात्कार तितका परिणामकारक वाटत

नाहीं. कोणत्याही इतिहासांत सत्यार्थ व शक्यता सोडून जर अतिशयोक्तीचा किंवा काल्पनिक मजकूर दिला जाईल तर त्या इतिहासाला यक्षिणीच्या किंवा आरबी गोष्टींइतकींच मनरंजनापुरती किंमत राहील; परंतु इतिहासाला वाङ्मयांत जें श्रेष्ठ स्थान प्राप्त झालें आहे तें टिकवण्याकडे ऐतिहासिक ग्रंथकारांची साहजिकच प्रवृत्ति असते. म्हणून संशोधकीय इतिहास उपलब्ध झालेल्या पुराव्याचें चिकित्सापूर्ण परीक्षण करून पायाशुद्ध रचावा लागतो. गोष्टीरूप इतिहासांत संशोधकीय इतिहासाचाच आधार घ्यावा लागतो. राजकारणी इतिहासांत संशोधकीय व गोष्टीरूप इतिहासकारांनीं जी मर्यादा घालून दिली तिचें उल्लंघन करतां येत नाहीं. परंतु या मर्यादा देशांत जोंपर्यंत सशास्त्रीय इतिहासलेखनाची जाणीव उत्पन्न झालेली नसते तोंपर्यंत त्या पाळल्या जात नाहींत.

देश राजसत्ताबादी असेल तर देशाच्या इतिहासांत विभूतिपूजनाकडेसच विशेष कल दिसून येतो. त्यामुळें इतिहासांत अतिशयोक्ति व फाजील स्तुति केलेली आढळते. विभूतिपूजन हा सर्व हिंदूंप्रमाणेंच महाराष्ट्राचा परंपरागत अंगीं खिळलला देहस्वभाव आहे. महाराष्ट्रीय विभूतिपूजकांनीं आपल्या आवडत्या देवतेला पूजा बांधतांना शास्त्रीय इतिहासलेखनपद्धतीचें अनुकरण केलेलें नाहीं ही गोष्ट निर्विवाद आहे. वीरदेवतेच्या अर्चनांत आपल्या पूज्य मूर्तीकडे दोषैक दृष्टीनें किंवा दोषादोषविवेचक पद्धतीनें पाहण्याची त्यांना जरूरच भासली नव्हती. शौर्याचें अगर गुणांचे वर्णन करितांना त्यांच्या कार्यकर्तृत्वाच्या मर्यादेकडे किंवा कालगणती व कालनिर्देशाकडे त्यांचें कधींच लक्ष वेधलें नव्हतें. सांपडतील त्या पुष्पांचे हार गुंफावयाचे, त्यांवर कृत्रिम सुवास पसरवून त्या पुष्पांनाही आपल्या अकृत्रिम प्रेमानें शोभायमान करावयाचें, व असले हार आपल्या विभूतींना अर्पण करावयाचे इतकीच काय ती या इतिहासलेखनांत दृष्टि ठेवण्यांत येत असे. परंतु हीं भक्तिभावाचीं गीतें केवळ श्रद्धावान् भक्तजनांसाठींच गायलीं असल्याकारणानें त्यांना तीं आवडणें साहजिक होतें. परंतु देशांत राष्ट्रीयत्वाची जाणीव उत्पन्न होतांच जनता व्यक्तींच्या चरित्रांपेक्षां सबंध देशाचा व समाजाचा इतिहास जाणण्याची अपेक्षा धरूं लागली. त्या वेळीं तीं भावगीतें तिच्या मनाला पटत नाहींशीं झालीं. ती सर्व समाजाकडे तितक्याच आपलेपणानें पाहूं लागली.

म्हणून या भावगीतांतील असंबद्धता व कथानकांत शिरलेली परस्परविरोधी विवेचनपद्धति तिला तेवढी मानवली नाहीं. शिवाय महाराष्ट्रीय ऐतिहासिक ग्रंथ व्यक्तीपुरतेच राहिल्यानें त्यांतून राष्ट्रेतिहास किंवा स्वदेशेतिहास शोधून काढणें जड जाऊं लागलें व महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय वगैरे प्रगतीबरोबर महाराष्ट्राला आपली इतिहासलेखनाची जुनी संकुचित दृष्टि सोडून शास्त्रीय पद्धतीनें स्वदेशेतिहासाची रचना करण्याची अधिकाधिक जाणीव होऊं लागली व महाराष्ट्रांत त्याप्रमाणें नवीन इतिहासरचनेच्या प्रयत्नास सुरवात झाली.

## १ महाराष्ट्राच्या इतिहासाचे विभाग

इतिहासाचें क्षेत्र अत्यंत विस्तीर्ण आहे. जगाच्या भूपृष्ठाइतकें अमर्याद व कालाच्या अनादित्वाप्रमाणें अनादि आहे. तें कोणालाही आक्रमतां येण्यासारखें नाहीं. चांगल्या इतिहासेच्छु किंवा अभ्यासू मनुष्याला या क्षेत्राचा अगदीं लहान भागही सबंध आयुष्यभर खपूनही आक्रमतां येत नाहीं. म्हणून प्रत्येकजण आपापल्या सोईप्रमाणें या इतिहासक्षेत्राचे भाग पाडून घेतात. इतिहासाचे तीन प्रकारानें म्हणजे स्थलनिर्देशानें, कालनिर्देशानें किंवा विषयवारीनें विभाग पाडले जातात. कोणाही मनुष्याला ज्या देशाबद्दल आपलेपणा किंवा आदर वाटत असेल त्याच देशाचा तो इतिहास अभ्यासितो. परंतु या स्थलविभागानंतर जे कालविभाग पाडले जातात ते मात्र अभ्यासूच्या सोईप्रमाणें व ऐतिहासिक साधनांच्या प्राप्तीवरून पाडले जातात. विशेषतः तत्कालीन राजकीय व सामाजिक प्रवृत्तिही लक्षांत घेतली जाते. ह्याही मर्यादेपेक्षां ज्या वेळी अधिक संकुचित क्षेत्र आंखून घ्यावें लागतें त्या वेळीं विषयवारीनें आणखी विभाग पाडण्यांत येतात. महाराष्ट्र हाच स्थलविभाग आपण इतिहासलेखनासाठीं आंखून घेतला व या महाराष्ट्राच्या इतिहासांत कालमर्यादेप्रमाणें आणखी विभाग पाडूं म्हटलें तर इ. सन ११ ते १४ व्या शतकांचा प्रथम विभाग, १५ व १६ व्या शतकांचा दुसरा विभाग, १७ व्या शतकांचा तिसरा विभाग, १८ व्या शतकाच्या चवथा विभाग, व १९ व्या शतकाचा पांचवा विभाग असे ठोकळमानानें पांच विभाग, पाडतां येतील. या पांच विभागांना यादवकाल, मुसलमानी काल,

शिवशाहीचा काल, पेशवाईचा काल व इंग्रजी काल अशीं अनुक्रमें नांवें देतां येतील. यांतील तिसरा विभाग म्हणजे शिवशाहीचा काल हा प्रस्तुत ग्रंथाचा विषय आहे. या विभागास शिवाजीमहाराज बंगलुराकडून परत पुण्यास आले त्यावेळेपासून सुरुवात होऊन शाहूच्या आगमनानें शेवट होतो. यांत मुख्यतः शिवाजी, संभाजी, राजाराम व ताराबाई अशा चार कारकीर्दींचे समावेश केला आहे. त्याचें कारण इतकेंच कीं, या सर्व कालांत महाराष्ट्रांतील मराठ्यांच्या प्रवृत्ति किंवा कार्यकर्तृत्व यांत ठोकळमानानें एकाच प्रकारचे सातत्य होतें. स्थल व कालविभागानंतर विषयवारीनें भाग पाडून इतिहासाचे क्षेत्र संकुचित करतां येतें. विषयवारीतही तीन प्रकारचे पोटभाग पडतात. [१] व्यक्तिविषयक म्हणजे चरित्रपर, [२] प्रसंगपर व [३] व्यवहारपर. सांप्रत पहिले दोनच विशेष रूढ आहेत. तिसरा भाग फारच सूक्ष्म अभ्यासाचें द्योतक असून त्या अभ्यासास लागणारीं आवश्यक साधनें उपलब्ध नाहींत. परंतु हा तिसरा भागच विशेष महत्त्वाचा मानला जातो. कारण तो राष्ट्राला मार्गदर्शक असतो. महाराष्ट्राच्या इतिहासाचे जर विषयवारीनें विभाग पाडूं लागलों तर कारकीर्दींच्या अगर चरित्रांच्या रूपानें बरेंच भाग पाडले जातील. आदिलशाही, कुत्बशाही वगैरे स्थूल विभाग सोडले व नुसत्या शिवशाहीचे भाग पाडूं लागलों तर शिवाजी, संभाजी, राजाराम, वेडा शिवाजी, संभाजी, ताराबाई वगैरेंच्या कारकीर्दी किंवा मोरोपंत, हंबीरराव, खंडो बल्लाळ वगैरे पुरुषांच्या चरित्रपर असे विविध भाग पाडतां येतील. आणखीही त्यांत प्रसंगवर्णनाचे भाग पाडूं म्हटलें तरी अफझलवध, जयसिंगस्वारी, बाजीचा आत्मयज्ञ, राज्यारोहणादि प्रसंगवर्णनें स्वतंत्रपणें लिहितां येतील. याहीपेक्षां तिसऱ्या म्हणजे व्यवहारपद्धतीनें भाग पाडावयाचे असतील तर शिवाजीच्या किंवा इतर कोणाच्याही अंमलांतील शासनपद्धति, आरमारीपद्धति, जमीनपद्धति, लष्करीपद्धति वगैरेची तुलनात्मक इतिहासरचना करतां येण्यासारखी आहे. जितकी बारीकसारीक विभागांवर इतिहासरचना होईल तितका स्वदेशाचा इतिहास पूर्णत्वास जाऊं लागला असें समजावें. इतिहासाचे विभाग पाडतांनाही कांहीं निर्बंध पाळावे लागतात. स्थलविभाग पाडतांना आपण आपल्या ज्या स्थलविशेषाला मर्यादित करतों तें स्थल राजकीय, सामाजिक अगर धार्मिक बाबतींत तरी एक

घटक असावें, किंवा तें स्थल राजकीय किंवा इतर सोईसाठीं प्रांतधारीनें घटक मानलेलें असावें. कालविभागांसाठीं कालमर्यादा ठरवावयाची ती त्या देशांतील अगर स्थलविभागांतील राजकीय, सामाजिक किंवा धार्मिक प्रवृत्तीवरून ठरवावी. विषयवारीनें भाग पाडतांना स्थलकालाचे सर्वच निर्बंध पाळणें आपोआपच भाग पडत असतें.

## २ महाराष्ट्र-इतिहास-लेखनाचे प्रयत्न

महाराष्ट्राच्या इतिहासाचे कसेही व कितीही खंड पाडले तरी त्या इतिहासाच्या व्याप्तीच्या मानानें इतिहासलेखनाचे प्रयत्न फारच अल्प प्रमाणांत झालेले आहेत असेंच दिसून येतें. इंग्रजीच्या पूर्वीची इतिहासरचना व्यक्तिविषयक, एकांगी व अतिशयोक्तिपूर्ण आहे. पौराणिक कालाचा इतिहास पुराणांतून ग्रथित केलेला आहे. परंतु त्यावरून खरा इतिहास ओळखणें फार जड जातें. यानंतरचा इतिहास विशेषतः फारसी व मराठी बखरी व काव्यांतून लिहिला गेला आहे. इंग्रजीपूर्वी ऐतिहासिक टिपणें करण्याची आवड असे. त्यांत जगाच्या सुरुवातीपासून तो टिपणकाराच्या कालापर्यंत कोण कोण राजे होऊन गेले त्यांची नांवनिशी व राजवटींचीं वर्षें देण्याचा प्रयत्न होत असे. कधीं कधीं या राजांच्या कारकिर्दीतला एखादा दुसरा निवडक प्रसंग देण्यांत येतो. मुसलमानी पातशाहीपासूनचे प्रसंग मात्र बरेच नोंदलेले आढळतात. शिवशाही व पेशवाईच्या शकावल्याही तयार करीत असत. काव्यरूपांत इतिहास गोंवण्याकडे तर बराच कल दिसतो. परंतु या सर्व इतिहासलेखनांत चिकित्सकपद्धतीचा अवलंब न केल्यामुळे बऱ्याच चुका राहिल्या आहेत. या सर्व लेखनांत सशास्त्र इतिहासलेखन करणें हा मुख्य उद्देश नव्हता. इतिहासलेखनाचा सशास्त्र मार्ग इंग्रजी अमदानींत इंग्रज अभ्यासूंच्या सांनिध्यानें अवलंबिला गेला. इंग्रजींतच इतिहासलेखनास सुरुवात झाली असें म्हटलें असतां चालेल. परंतु इंग्रजी अभ्यासूंचें लक्ष केवळ संस्कृत, अरबी, फारसी यांसारख्याच भाषा शिकण्याकडे व त्यांत प्रावीण्य मिळविण्याकडे राहिल्यानें यांचा कल विशेषतः मुसलमानी व त्यापूर्वीचा इतिहास लिहिण्याकडे होता. हे इंग्रजी अभ्यासू भाषा शिकतांनाच त्या भाषेंत जी साधनसामुग्री त्यांना उपलब्ध होई तिचें संशोधन करीत असत. विशेषतः

लष्करी अंमलदारांनींच इतिहासांत बरेंच लक्ष घातलें होतें. रॉयल एशिआटिक सोसायटीसारख्या संस्था स्थापन करण्यांत आल्या व त्यांनीं स्वतःचीं त्रैमासिकेंही चालू केलीं. इंडिअन अँटिक्वेरी, एपिग्राफिका इंडिका, वगैरे सारखीं इतिहासाला वाहिलेलीं स्वतंत्र नियतकालिकेंही काढण्यांत आलीं. हे इंग्रज अभ्यासू विशेषेंकरून अधिकारी वर्गांतील असल्यानें त्यांना या कार्यासाठीं सरकारी मदत सहज मिळांवितां आली. यांनीं संस्कृत काव्यग्रंथ वगैरे जमविण्याचा सारखा तडाखा लाविला होता. निरनिराळ्या ठिकाणचे शिलालेख व ग्रंथसंग्रह वगैरेंची यादी करण्याकरितां सरकारी खर्चानें सरकारी अधिकारी नेमून घेतले होते. उपलब्ध झालेले ताम्रपटही छापून काढले. इ. सन १९०४ त'इंडिअन ओल्ड मॉन्युमेंट्स प्रोटेक्शन ॲक्ट'ही करून घेतला. मध्ययुगीन कालाच्या इतिहाससंशोधनांत, सर टेम्पल, फ्लीट, बर्डवुड, बर्जीस, सिवेल, वॉल्टर इलिअट, विल्सन, ब्राऊन, बर्नेल, राइस, यूल, कनिंगहॅम, हेग, वगैरे युरोपीय पंडितांनीं जी मेहनत केली ती फार महत्त्वाची आहे. परंतु या इतिहासलेखनांत त्यांना फारसे यश आलें नाहीं. या इतिहासलेखनांतील बराचसा प्रयत्न व्यक्तिशः झाल्याकारणानें त्याला जितकें संघटित रूप यावें तितकें आलें नाहीं. उलट बरेचसे जुने ग्रंथ व्यक्तिगत झाल्यानें व दूरदेशी जाऊन पडल्यानें त्या ग्रंथांच्या साहाय्यानें पुन्हा चर्चा करण्याइतकी सामुग्री नवीन चिकित्सक पंडितांस मिळणें सुसाध्य राहिलें नाहीं. युरोपीय पंडितांबरोबर बाळशास्त्री जांभेकर, डॉ० भांडारकर, सुखटणकर, छत्रे, भाऊ दाजी, कीर्तने, यज्ञादिनी, कृष्णशास्त्री, वापट, गोपीनाथराव, रंगाचार्य, सुब्रह्मण्य अय्यर, बी. सूर्यनारायणराव वगैरे मंडळींनीं कांहीं कमी श्रम घेतले अशांतला प्रकार नाहीं. किंबहुना यांनींच जे या इतिहासरचनेंत आस्थापूर्वक श्रम घेतले त्यामुळेंच आपणांला आपला मध्ययुगीन कालाचा आपलेपणानें लिहिलेला इतिहास लाभत आहे. कॅंपबेलच्या गॅझेटिअर-रचनेच्या वेळीं ही मंडळी सारखी परिश्रम घेत होती म्हणून गॅझेटिअरमध्यें पुराणकालच्या व मध्ययुगीन कालाच्या इतिहासांनीं बराच भाग व्यापला आहे. गॅझेटिअर रचनेपूर्वी जीं मुंबई व इतर प्रांतांचीं सरकारी 'सिलेक्शन'चीं पुस्तकें निघालीं त्यांवरूनही सरकार व सरकारी अधिकारी आणि विशेषतः लष्करी अधिकारी या इतिहासरचनेंत मन घालून किती आस्थापूर्वक परिश्रम करीत होते हें दिसून येतें. गॅझेटिअरच्या रचना-

कालांतच इतिहासरचनेची बरीच चळवळ उडाली होती. परंतु सर्व विद्वानांचें लक्ष पौराणिक व मध्ययुगीन कालाकडे वेधलें होतें. सांप्रतही याच कालाच्या इतिहासाबाबत श्री० नानासाहेब वैद्य, वगैरेंचे प्रयत्न चालू आहेत. परंतु या मध्ययुगीन कालाच्या इतिहासाला जितकी अभ्यासू मंडळी व सरकारी मदत मिळाली तिच्याकडे लक्ष दिलें तर मुसलमानी व मराठी-शाहींतील इतिहासाची हेळसांडच झाल्याचें दिसून येईल. फारशी ग्रंथांच्या अभ्यासामुळें मोगली इतिहास बराच उपलब्ध होऊं शकला. परंतु या इतिहासासाठीं फारसे परिश्रम घेतल्याचें दिसून येत नाहीं. मराठ्यांच्या इतिहासाकडे या अभ्यासूंची दृष्टि न वळण्याचीं कारणें अनेक आहेत. मुख्य कारण म्हणजे साधनाभाव. परंतु इतरही कारणें झालीं. त्यांत प्रतापसिंहाच्या लंडनमधील कैफियतीनें इंग्रज अधिकाऱ्यांच्या मनांत उत्पन्न झालेली तेढ. मराठे व इंग्रज यांच्यामधील हिताहितसंबंधांबद्दलची जागृत असलेली जाणीव. इतिहासकालीन साधनांच्या चिकित्सेंत व्याकरणासारख्या साधनाभावीं येणाऱ्या भाषेच्या व लिपीच्या अडचणी, साधनांच्या किंवा इतिहासाच्या लेखनानें प्रत्यक्ष खालसा जमिनीवर येणाऱ्या हक्काबद्दलची ब्याद, इनाम रेकॉर्ड्स कमिशनची योजना व त्या कमिशनचा* ढिलाई कारभार, इनाम रेकॉर्ड्स कमिशनमुळें नंतरच्या अधिकाऱ्यांनीं ऐतिहासिक साधन-प्रकाशनाच्या बाबतींत स्वीकारलेले दिरंगाईचें धोरण, शिवाजी उत्सव व राजकारण यांचा संबंध एकत्र जडविल्यानें सरकारचे मनांत उद्भवलेला किंतु, अशीं बारीकसारीक पुष्कळ कारणें झालीं, कीं त्यामुळें महाराष्ट्राच्या इतिहासरचनेकडे सामान्य जन किंचित् साशंकतेनें पाहूं लागले. साधनाभावाला मुख्य कारण म्हणजे इनाम-कमिशन होय. इनाम-कमिशनसाठीं बहुतेक सर्व खेड्यांपाड्यांतून दप्तरखाना गोळा करून आणला. 'त्यांतील बराचसा दप्तरखाना जप्त झाला व तो हल्लीं 'एलिनिएशन दप्तर' म्हणून पुण्यांत ठेवला आहे. त्यांतील रद्दी कागदांबरोबर मुद्द्याचे कागदही नाश झाल्याचें दिसतें. तसेंच त्यांतील कांहीं महत्त्वाचे कागद म्हणजे राजकीय स्वरूपाचे कागद मुंबई सरकारनें आपल्या खास दप्तरखान्यांत ठेवल्याचें समजतें. हा दप्तरखाना अद्यापपावेतों इतिहास-

*Correspondence re the Poona Duftur (1835-1845 A. D.)-Selections from the Records of the Bombay Government No. XXX, new series, (1856).

लेखकांस मोकळा नव्हता. इनाम-कमिशन जें दप्तर गोळा करीत होतें त्या दप्तराची त्यावेळीं तरी चांगली जोपासना केली असल्याचें दिसून येत नाहीं. प्रसिद्ध नातू हे त्यावेळीं एक मुख्य व जाणते कमिशनर होते. त्यांच्याच निर्णयावर कोणते कागद परत द्यावयाचे व कोणते न द्यावयाचे हें ठरत असे. हा दप्तरखाना तपासण्यासाठीं आणून त्यावर कमिशनर्स नेमले; परंतु या कमिशनर्सना वेळ मिळत नव्हता. ज्या वाड्यांत व वाड्याच्या चौकांत हीं कागदांचीं पोतीं आणून टाकलीं होतीं तेथें तीं सुटून अस्ताव्यस्त पडलीं होतीं. कागद पायानें तुडविले जात व शेवटीं कित्येक कचऱ्याच्या राशींतही जाऊन पडत. कित्येक महत्त्वाचे कागद चोरीसही गेल्याचे सरकारचे नजरेस आलें होतें. हा कारभार सरकारास न मानवल्यानें नातू वगैरे कमिशनर्सना रजा दिली'.* ज्या वेळीं पौराणिक व मध्ययुगीन कालाच्या ऐतिहासिक साधनांची जोपासना करण्याची पूर्ण कळकळ बाळगिली जात होती त्याचवेळीं मराठ्यांच्या ऐतिहासिक साधनांची अशी विल्हेवाट लागत रहावी हें विचित्र तर खरेंच. अद्यापही पौराणिक किंवा मध्ययुगीन कालाच्या इतिहास-संशोधक संस्थांना जी सरकारी मदत होते त्याच्या शतांशानेंही या मराठ्यांच्या इतिहाससंशोधक संस्थांना मदत होऊं नये ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे. अशी परिस्थिति असूनही ऑर्म, स्कॉट वेअरिंग, डफ, एल्फिन्स्टन यांनीं या इतिहासाच्या बाबतींत जी विशेष खटपट केली ती फार महत्त्वाची आहे. न्या० रानड्यांनीं व चिपळूणकरांनीं या इतिहासरचनेस निराळीच दृष्टि देऊन देशांत इतिहासरचनेची जागृति करून दिली. मोडक, केळूसकर वगैरेंनींही इतिहास रचले. सरदेसाई यांनीं रियासती लिहिल्या. इतर मंडळींनींही शालोपयोगी इतिहासांची पुस्तकरचना केली. परंतु या सर्वांत चिकित्सक दृष्टीनें मराठ्यांचा इतिहास अभ्यासिला नाहीं ही गोष्ट निर्विवाद आहे. मराठ्यांचा इतिहास लिहिण्यास साधनांपासूनच सुरुवात झाली पाहिजे व साधनांच्या पुरेशा प्राप्तीनंतरच इतिहास तयार केला पाहिजे ही रा० ब० साने, राजवाडे, पांडोबा पटवर्धन, खरेशास्त्री वगैरे इतिहाससंशोधकांचीच

*Correshondence re the Poona Duftur (1835-'845 A. D )-Selections from the Records of the Bombay Government No. XXX, new Series, (1856)-Particularly the Mill's & Goldsmith's reports.

बिचारसरणी युक्त होती यांत शंका नाहीं. इंग्रज इतिहासकारांनीं जी इतिहासरचनेसाठीं सामुग्री वेळोवेळी गोळा केली ती ब्रिटिश म्युझिअम् व इंडिया ऑफिस रेकॉर्ड्समध्यें जाऊन पडली आहे. या दोनही संस्थांच्या संग्रहाच्या याद्या* पाहिल्यास हिंदुस्थानांतून कितीतरी ऐतिहासिक महत्त्वाचे कागदपत्र तेथें जाऊन पडले आहेत तें सहज समजेल. एतद्देशीय नवीन इतिहाससंशोधकांस हा संग्रह येथें मिळण्याची व्यवस्था होणें अगदीं इष्ट होतें; परंतु तशी सोय झालेली नाहीं. हें इतिहासरचनेच्या प्रगतीस फार घातुक आहे. सारांश, मराठ्यांच्या व मुसलमानी इतिहासरचनेच्या प्रयत्नांस सुरुवात या दहाबारा वर्षांतच झाली असें म्हणतां येईल. त्यापूर्वीच्या प्रयत्नांना लोकांचा व सरकारचा पाठिंबा नसल्यानें यश आलें नाहीं व यापुढेंही जर ऐतिहासिक साधनांच्या संग्रहाच्या बाबतींत कांहीं सुरक्षिततेची कायद्यानें योजना घडून आली नाहीं तर साधनांचें परीक्षण व साधनांची प्राप्ति हीं दोन्हीही कठीण होऊन जातील. ऐतिहासिक साधनांच्या मालकीबाबत कांहीं-तरी नियंत्रण घातले गेल्याखेरीज इतिहासरचना करतांना अनेक अडचणी उत्पन्न होतील; आणि ऐतिहासिक साधनांच्या मूळ धन्यापेक्षां हे संग्राहकी नवीन कोठावळे इतिहासाच्या हानीस कारणीभूत होतील.

## ३ शिवशाहीच्या इतिहासरचनेचें स्वरूप

शिवशाहीच्या इतिहासरचनेपुरतेंच याठिकाणीं समालोचन करावयाचें आहे. शिवशाहीचा इतिहास लिहिण्याचा प्रथम प्रयत्न संस्कृतांत झाल्याचें आज उपलब्ध झालें आहे. हा इतिहास समकालीन असल्यानें महत्त्वाचा आहे; परंतु तो स्तुतिपर आहे. नंतर राजारामाचे आज्ञेवरून मराठींत बखर-रूपांत इतिहासरचनेचा प्रयत्न झाल्याचें दिसतें. परंतु तो बराच त्रोटक व एकांगी असून त्यांत प्रसंगवर्णनाचा क्रम कालानुरोधानें केलेला दिसत नाहीं. ताराबाईनें खंडो बल्लाळाकडून बखर लिहिल्याचें समजतें; परंतु ती बखर उपलब्ध नाहीं. नंतर पंताबाईत बखर-रूपाने शिवशाहीचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न झाला; परंतु यांत समकालीन माहितीचा अभाव असून इतकथेवर बराच भर दिलेला आढळतो. इतिहास-लेखन सशास्त्र नसल्यानें

*Reports on the Records at the India Office by F. C. Danvers.

दोष फार आहेत. भाटांनींही बरींच कवनें केलेलीं आहेत. परंतु प्रत्यक्ष माहिती नसल्यानें या कवनांत बखरीसारखेच दोष आहेत. फारसी ग्रंथकारांनीं शिवशाहीची स्वतंत्र अशी ग्रंथरचना केल्याचें उपलब्ध नाहीं. मुसलमानी राजांच्या संबंधांत ज्या वेळीं या शिवशाहीची माहिती देणें जरूर पडे तेव्हां ती देण्यांत येत असे. परंतु या लेखनांत शिवशाहीचा शत्रुपक्ष असल्यानें एकपक्षीयतेचे दुर्गुण शिरलेले आहेत. युरोपीय भाषेंतही या शिवशाहीचा इतिहास लिहिण्याचा १७ व्या व १८ व्या शतकांत उपक्रम झाला होता. परंतु या प्रवासी ग्रंथकारांची वृत्ति थोडीशी मोगलांकडे वळली असल्याकारणानें या लेखनांतही खऱ्या वस्तुस्थितीचा विपर्यास झालेला आढळतो. इंग्रजी अमदानींत स्कॉट वेअरिंग, डफ, एल्फिन्स्टन, मिल, जोन्याथन स्कॉट वगैरेंनीं इतिहास रचण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यांचा भर फारसी साधनांवरच विशेष राहिल्यानें हे इतिहास फारसी ग्रंथाच्या वळणावरच गेले. यांतील डफचा प्रयत्न किंचित् बरा आहे; परंतु डफचा इतिहास व गॅझेटिअरमधील माहिती सोडली तर या इतिहासरचनेकडे फारसें कोणाचेंच लक्ष वेधल्याचें दिसून येत नाहीं. म्हणून डफच्या इतिहासाला विशेष महत्त्व चढलें. कारण तो सविस्तर व थोडाबहुत शास्त्रीय पद्धतीस अनुसरून लिहिला गेला होता. या महत्त्वामुळें मुसलमानी राजांची जितकी स्तुति केली जाई तितकाच मराठ्यांबद्दल तिटकारा उत्पन्न होत राही. शेवटीं परिणाम असा झाला कीं, मराठ्यांच्या कामगिरीचा इतिहास मराठ्यांनाच विवक्षित साशंक दृष्टीनें पाहणें भाग पडलें व अंतीं तर तोच इतिहास चांगला रूढ झाला. अशा परिस्थितींत इ. सन १८९६ पासून शिवाजीउत्सव* सुरू झाल्यानें या उत्सवाकडे अधिकारीवर्गानें आपली नाखुशी दाखविली. पुढें राजकीय चळवळींशीं शिवोत्सवाचा संबंध जडल्यानें व विशेषतः शिवाजीची इतिहासकारांनीं बंडखोरांत गणती केल्यानें मराठ्यांच्या इतिहासाचा अभ्यास म्हणजे क्रांतिकारक चळवळीचा सहकार होऊन राहिला. सन्मान्य किंवा शिष्ट लोक या इतिहासास मदत करीतनासे झाले; व कादंबऱ्या, नाटकें, संतचरित्रें यांसारख्याच ग्रंथरचनेकडे लेखक व अभ्यासू लक्ष पुरवूं लागले. न्यायमूर्ति रानडे यांनीं जरी असा ग्रह न होण्यासाठीं योग्य तो प्रयत्न वेळींच

*लो० टिळकचरित्र, खंड १ ला (१९२१)—४३५.

करून ठेवला होता, तरी या स्वदेशी चळवळीनें या इतिहासाला थोडासा व्यत्यय आणला. परंतु बाह्यतः जरी सामान्य लोकांना या इतिहासाच्या अभ्यासाबद्दल एकप्रकारचा धाक वाटत होता तरी या भीतीमुळेंच त्यांचे मनांत शिवाजी व मराठे यांच्या इतिहासाबद्दलचें प्रेम उत्कटतेनें वाढूं लागलें होतें. विद्वान् माणसें या इतिहासावर या पूर्वीपासूनच मनन करूं लागलीं होतीं व या इतिहासाकडे विशेषच आपलेपणाच्या भावनेनें पाहूं लागलीं होतीं. उपलब्ध इतिहासांत शिवशाहीबद्दल विपर्यास झाला असल्याचें त्यांच्या प्रत्ययाला येऊं लागले व कीर्तन यांनीं डफच्या इतिहासाबद्दल प्रथम साशंकपणा व्यक्त केला. परंतु त्यांना व त्यांच्याबरोबरच्या विद्वानांना हा विपर्यस्त मजकूर खोडून टाकण्यासाठीं ऐतिहासिक साधनसामुग्री जुळविली पाहिजे हा एकच मार्ग राहिला असल्याचे वाटलें व त्याप्रमाणें त्यांनीं इतिहासाची साधनसामुग्री जुळविण्याचे प्रयत्न चालू केले. रा०ब० साने, मोडक व चिपळूणकर यांनीं 'काव्येतिहाससंग्रह' सुरू केला. रा०ब० पारसनिसांनीं 'इतिहाससंग्रह' प्रसिद्धीस आणला. रा०ब० गुप्ते यांनीं चां. का. प्रभूंचीं साधनें प्रकाशित केलीं. गुरु० राजवाड्यांनीं 'भारत-इतिहास-संशोधक-मंडळा'ची स्थापना केली. दिवेकर व गुप्ते यांनीं 'चां. का. प्रभु इतिहास-मंडळ' स्थापलें. नंतर देव चांदोरकरांनीं 'सत्कार्योत्तेजक सभा' काढली. भारत-वर्ष, प्रभात, विविध-ज्ञानविस्तार वगैरे मासिकांत ऐतिहासिक चर्चा होऊं लागली. परंतु त्या सर्व प्रयत्नांत साधनें जुळविणें व जुळती इतिहासरचना करणें एवढेंच कायते कार्य होत होतें. हें सर्व कार्य तितक्या जोमानें होत नव्हतें. कारण, सामान्य जनतेला सरकारच्या या इतिहासाबाबतच्या धोरणाबद्दल थोडी भीतीच वाटत होती. परंतु गुरु० राजवाडे यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेनें जशी इतिहासलेखकांच्या विचारांत भयंकर क्रांति घडवून आणली त्याचप्रमाणें कोल्हापुर संस्थानाधिपति कै० शाहू छत्रपति महाराज यांच्या अलौकिक चातुर्यानें शिवाजीबद्दलची सरकारी अधिकारी व सन्मान्य लोकांच्या मनांतील तेव्हा इ० सन १९२०त शिवाजीमेमोरिअलच्या कोनशिलासमारंभाच्या वेळीं खास युवराजांकडून कायमची काढून टाकविली. शिवशाहीच्या इतिहासाच्या क्रांतीचें श्रेय या द्वयीनाच आहे, याबद्दल शंका नाहीं. आतां फक्त इतिहासांत घुसडलेला विपर्यस्त व

खोडसाळपणाचा मजकूर दूर करून त्यांत भर टाकून इतिहास शास्त्रशुद्ध रचावयाचा आहे. मार्गांतील अडचणी दूर झाल्या आहेत व परिश्रम करण्यास वाव मिळाला आहे. परंतु साधन प्राप्तीचे प्रयत्न जमेस न धरले तर इतिहासरचनेचे खास प्रयत्न आणखी १०–१५ वर्षेपर्यंत तरी करतां येतील किंवा नाहीं याची शंका वाटते. कारण अद्यापि साधन-प्राप्ति बरीच व्हावयाची आहे व साधनपरीक्षेचे सशास्त्र निर्बंध अंगीं बाणण्यास थोडासा अवधि लागणें साहजिक आहे. साधन-सामुग्री गोळा होऊं लागली तेव्हां संग्राहकांना तिच्या परीक्षणाबद्दल फारशी माहितीही नव्हती व सशास्त्र परीक्षणाच्या निर्बंधांचा अभ्यास करण्याकडे त्याची प्रवृत्तिही वळली नव्हती. इतकेंच नव्हे तर ऐतिहासिक विधानें कोणत्या मर्यादेपर्यंत करतां येतात याची अटकळ बांधण्याइतकी इतिहासलेखकांची अद्यापिही तयारी झाली नाहीं, असें म्हटलें असतां चालेल. याचें कारण म्हणजे इतिहास-लेखन-शास्त्राभ्यासाकडे कोणींच लक्ष पुरविलें नाहीं हें होय. असें होण्याला अभ्यासास जरूर तीं साधनें उपलब्ध नाहींत व जी कांहीं अत्यंत परिश्रमानें माहिती गोळा केली गेली, ती माहिती फक्त अगदीं हाताच्या बोटांवर मोजण्या-इतक्याच मंडळींना असल्यानें त्यांच्या व्यक्तिशः माहितीचा फायदा इतरांना मिळण्याची संधी प्राप्त झाली नाहीं. या मंडळींत अग्रगण्य गुरु० राजवाडे यांनीं आपल्या प्रस्तावनांतून कोठेकोठें ह्या शास्त्रीय निर्बंधांचा उल्लेख केला आहे. परंतु तो पुरेसा नाहीं. तेव्हां ही सर्व माहिती गुरु० राजवाडे, प्रसिद्ध संशोधक पांडोबा पटवर्धन, खरेशास्त्री, रा०ब० साने, आबा चांदोरकर, श्री० मेहेंदळे, दत्तोपंत पोतदार व बाबासाहेब आपटे यांच्या पुरतीच राहिली, ही गोष्ट खरी; परंतु इतिहासरचनेला जसा साधन-संग्रह अत्यंत जरूर आहे तसाच इतिहास-लेखनाला इतिहास-लेखन-शास्त्राचा अभ्यास आवश्यक आहे यांत शंका नाहीं. या अभ्यासाशिवाय इतिहास-रचना करतां यावयाची नाहीं; आणि त्यांतूनही कोणी ती करूं म्हणेल तर त्यांत हास्यास्पद दोष शिरतील व शेवटीं जगाच्या प्रगतीकडे लक्ष दिलें तर अशा इतिहास-रचनेला कवडीही किंमत राहणार नाहीं. सांप्रतच्या परिस्थितींतच सशास्त्राभ्यासाच्या अभावीं शिरलेले दोष काढणेंच जड जाणार आहे; इतकेंच नव्हे तर त्या दोषांमुळें इतिहास-रचनेस वेळोवेळीं अडथळेही होणार आहेत.

## ४ इतिहासलेखनासाठीं पुराव्यांचा अभ्यास

कल्पकतेच्या जोरावर रचलेला इतिहास कादंबरीच्या जातींत समाविष्ट होतो. ऐतिहासिक साधनांच्या आधारावर शास्त्रशुद्ध लिहिलेला इतिहास जातिवंत इतिहासांत जमा होतो. कोणत्याही इतिहासकालीन उल्लेखाला अगर इतिहासाचा पुरावा देणाऱ्या वस्तूला इतिहासाचें साधन असें म्हणतात. हीं साधनें दोन प्रकारचीं असतात. पहिल्या प्रकारांत इतिहासकालीन किल्ले, इमारती, शिलालेख, ताम्रपट, कागदपत्रे वगैरेसारखीं साधनें येतात, व दुसऱ्या प्रकारांत दंतकथा, म्हणी, पोवाडे आदि काव्ये यांचा समावेश होतो. या साधनांच्या साहाय्यानें इतिहासरचना करावयाची असते. परंतु इतिहासाच्या रचनेविषयीं थोडाही विचार करतांच असें सहज दिसून येईल कीं, ही रचना ज्या साधनांच्या साहाय्यानें करावयाची त्या साधनांत कांहीं बरीं, कांहीं वाईट, कांहीं खरीं तर कांहीं खोटीं अशीं असतात. त्यांत एकाच प्रसंगाचीं भिन्न भिन्न वर्णनें केलेलीं आढळतात, प्रसंगाच्या बाबी अगदींच भिन्न भिन्नही असूं शकतात, व स्वभावाबद्दल तर कधींच एकवाक्यता आढळत नाहीं. अशा स्थितींत ऐतिहासिक ज्ञान कोणतें, तें कोठून व कसें मिळवावयाचें असतें, व या ज्ञानमार्गाचे रस्ते इतर ज्ञानसंवर्धनाच्या मार्गापेक्षां कसे भिन्न आहेत तें समजून घेतलें म्हणजे वर सांगितलेली विविधता व परस्परविरोधी वर्णनें कां आढळतात तें आपोआपच समजणार आहे. आणि ते समजलें म्हणजे इतिहास-रचनेंत कोणती खबरदारी घेणें जरूर आहे तें कळतें.

मनुष्याच्या ज्ञानसंग्रहापैकीं बहुतेक भाग ऐकीव असतो. प्रत्यक्ष अनुभवलेलें किंवा मिळालेलें ज्ञान अगदींच अल्प असतें. परंतु अशा ऐकीव ज्ञानावर मात्र मनुष्य विश्वास ठेवतो. प्रत्येक गोष्ट जर तो स्वतः पडताळून पाहूं म्हणेल तर तें त्याला शक्य नसतें. परंतु प्रत्येक ऐकीव गोष्ट सत्य असेलच असा मुळींच संभव नसतो. निरनिराळे बातमीदार एकाच बातमीचें वर्तमानपत्रांतून कसें भिन्न वृत्त देतात हें आतां सर्वांच्या परिचयाचें झालें आहे. परंतु अशा बातम्या वाचतांना आपणाला आपल्या मनाशीं त्या बातमीचा तथ्यांश जुळवितां येतो. वर्तमान परिस्थितींत आपणांस निर्णय करतां येणें शक्य असतें. परंतु इतिहासांत मात्र स्वतःचा निर्णय करून घेण्याइतकें साधन व ज्ञान आपणांस नसतें. आणि जें कांहीं सांगितलें जातें तें सत्य आहे असेंच

समजणें भाग पडतें. जी माहिती सांगितली जाते ती त्या सांगणाराच्या समजुतीप्रमाणें बहुधा खरी असते. अशी माहिती मिळवितांना त्यानें काळजी घेतली होती किंवा नाहीं, त्याचे मनांत त्या वेळीं कांहीं पूर्वग्रह होता किंवा काय, अथवा ती सांगतांना तो केवळ स्मरणानें सांगत होता किंवा कसें, तसें करितांना कांहीं मजकूर लपविण्या-छपविण्याकडे त्याची प्रवृत्ति होती किंवा काय हे प्रश्न अलाहिदा होत. कसेंही असलें तरी जें कांहीं वाचलें किंवा ऐकलें तें सत्य असावें असें गृहीत धरण्याकडे आपला कल असतो आणि यायोगें व्यवहाराचा गाडा चालत असतो. इतकेंच नव्हे तर नेहमीं-च्या ज्ञानसंग्रहास हाच मार्ग स्वीकारिला जातो. परंतु इतिहासाच्या अभ्यासांत ज्ञानसंग्रहाचा सांठा करावयाचा इतकाच उद्देश न ठेवतां, खरें कोणतें व खोटें कोणतें असावें हें शोधण्याचाही उपक्रम करावयाचा असतो. म्हणून ज्या साधनांच्या द्वारें ऐतिहासिक माहितीचे पुरावे मिळतात त्या साधनांचे गुणावगुण ओळखण्याचें ज्ञान संपादावें लागतें. परंतु ऐतिहासिक पुराव्यां-च्या शास्त्राचा अभ्यास झाल्याशिवाय तें ज्ञान प्राप्त होऊं शकणार नाहीं.

इतिहासाच्या बाबतींत पुराव्यांचें कार्य किती आहे व पुराव्यांची जुळणी करितांना त्यांची तपासणी कशी करावी हें चांगले समजण्यासाठीं कायदा व रसायनादि शास्त्रांत पुराव्यांबद्दल जीं तत्वें स्वीकारली जातात त्यांचा तुलनात्मक दृष्टीनें विचार करूं. पुराव्यांच्या उपयोगांच्या मूळ उद्देशांतच कायदा, इतिहास आणि शास्त्र यांत भिन्नत्व आहे. न्यायदानांत भांडणें तोडणें इतकाच उद्देश असतो. त्यांत भांडणें भांडणारे स्वतःच पुरावे आणीत असतात आणि निर्णय करणारा फक्त दोघांच्या भांडणाच्या निकालापुरताच विचार करितांना केवळ प्रसंगोचित पुराव्यांचाच विचार करितो. परंतु शास्त्र व इतिहास यांच्या पुराव्यांच्या प्रकरणांत असली व्यावहारिक दृष्टि नसते. त्यांत फक्त पुराव्यांच्या तपासणीवरून सत्य काय आहे हें शोधावयाचें असतें. म्हणून या पुराव्यांच्या परीक्षणाच्या तत्वांत दोन भिन्न प्रकार दृष्टीस पडतात.

१. कायद्यांत पुराव्याच्या अभावीं प्रकरण निकालांत काढून टाकतां येतें किंवा लवादानें तोडतां येतें. निर्णय देणाराला प्रकरणांतील खरेखोटेपणाच्या शोधनासाठीं अधिक पुरावा मिळविण्याची जबाबदारी त्याचेवर नसते. परंतु शास्त्रीय किंवा इतिहाससंशोधकाला पुराव्यांच्या अभावीं निर्णय यावयाचा

लागतो. जर त्याला उपलब्ध पुरावा कोणत्याही निर्णयास पुरा न वाटेल, परंतु प्रकरणावरील निर्णय त्या पुराव्यांवरून काढतां येत असेल तर तो निर्णय संभवात्मक म्हणून द्यावा लागतो; आणि अधिक पुराव्यांची वाट पाहणें भाग पडतें. संशोधनांत हाच मार्ग उचित असतो. परंतु जर कांहीं मर्यादा या सत्यसंशोधनांत कोणी घालून घेऊं म्हणेल तर मात्र तें त्याचें करणें ज्ञानार्जनाच्या दृष्टीनें घातुक होईल.

२. न्यायदानांत भांडणें त्वरित तोडण्याच्या मुख्य उद्देशामुळें कोणता पुरावा स्वीकारावयाचा व कोणता न स्वीकारावयाचा हें निर्बंध घालून ठरविणें भाग पडतें. उलट शास्त्रांत व इतिहासांत निर्णयासाठीं कायद्यांतले निर्बंध घालण्याची जरूर नसते. त्यांना सर्व प्रकारचे पुरावे जमेस धरणें भाग असतें. कायद्यांत जे निर्बंध घातलेले असतात तेच निर्बंध आपण इतर शास्त्रांत किंवा इतिहासांत घालूं लागलों तर सर्वच उपलब्ध पुरावे सोडून द्यावे लागतील. उदाहरणार्थ, कोणत्याही लिखाणाची नक्कल कांहीं अपवादाखेरीज पुराव्यास न धरणें, साक्षीदाराला दुसऱ्या माणसाच्या मताबद्दल वगैरे बोलूं न देणें, असले कायद्यांतील निर्बंध जरी कितीही चांगले असले तरी ते इतिहासांत स्वीकारतां यावयाचे नाहींत. परंतु इतकें मात्र खरें कीं, पुराव्याच्या कायद्यांत ग्रथित* केलेलीं कित्येक तत्त्वें फारच उपयुक्त असून तीं संशोधनांत मार्गदर्शक होतील. दुय्यम दर्जाच्या पुराव्यापेक्षां अव्वल पुरावा अधिक विश्वासार्ह मानावा हें तत्त्व सर्व परीक्षणांत केव्हांही महत्त्वाचेंच ठरेल. कारण त्यांत हेतुपूर्वक किंवा सहज चुकीनें होणारे दोष रहात नाहींत. इतिहास अगर साधनलेखक दुसऱ्यांनीं सांगितलेला मजकूर मूळ पाहिल्याशिवाय लिहितांना बरोबर नक्कल करूं शकेल असें नसतें. त्यांत त्याची चुकीचीही समजूत झाली असण्याचा संभव असतो. कदाचित् विस्मृतीही होणें साहजिक आहे. परंतु हे दोष न्यायदानांत येऊं देणें योग्य नसतें. कारण त्यांत सर्व साक्षीदारांचा प्रत्यक्ष संबंध असून बरीच सहेतुक विपर्यास करण्याची इच्छा साक्षीदारांत असते. त्यामुळें दुय्यम पुराव्यांच्या योगानें निर्णयकाला मूळ बाबतींत निर्णय देण्यांत अनेक अडचणी

* 'The Indian Evidence Act, 1872, and Taylor's 'Principees of Evidence'.

उत्पन्न होतात व न्यायदानाचें काम झपाट्यानें व कमी खर्चांत होऊं शकत नाहीं. परंतु इतिहासांत कालाच्या किंवा खर्चाच्या महत्त्वापेक्षां सत्यशोधनाला अधिक महत्त्व असतें.

भूतकालीन पुराव्यांचा उपयोग इतिहासाप्रमाणें रसायनादि शास्त्रांतही केला जातो. यांत सत्यशोधन हेंच उद्दिष्ट असतें. परंतु इतिहास व इतर शास्त्रांतील पुराव्यांच्या उपयोगांतील उद्दिष्टांत जरी एकवाक्यता असली तरी त्या पुराव्यांच्या विश्वसनीयतेचें प्रमाण ठरविण्याचें परिमाण अगदीं भिन्न आहे. कोणत्याही विषयावरील पुराव्यांतील विवक्षित तपशील व त्याचे महत्त्वमापनाचे नियम सामान्य असतात. पुरावा देणारा साक्षीदार विश्वासार्ह आहे किंवा नाहीं, त्याचें निरीक्षण बरोबर अगर चुकीचें आहे, तो ज्या भाषेंत सांगतो किंवा आपला विषय सांगण्यास जी शब्दयोजना करितो, ती सरळ आहे किंवा त्यांत कांहीं श्लेष आहेत, तो जे निर्णय काढतो ते शहाणपणानें व निरपेक्षबुद्धीनें काढीत आहे किंवा नाहीं, हे व अशाच प्रकारचे प्रश्नरूप महत्त्वमापनाचे सामान्य नियम होत. निसर्गाच्या हालचालींची माहिती देतांना त्यांत पूर्वग्रह-प्रेरणेनें अगर हेतुपूर्वक किंवा स्वार्थपरायणतेनें विपर्यास करण्याचें फारसें कारण नसतें. म्हणून इतर शास्त्रांतील पुराव्यांत फारसा सहेतुक विपर्यास आढळत नाहीं; परंतु इतिहासांत मानवी हालचालींबद्दलच विशेषतः बोलावयाचें असल्यामुळें पुरावे देणाऱ्या साक्षीदारांच्या मनावर स्वार्थादि संबंधामुळें अनेक तऱ्हेचे परिणाम झालेले असतात. त्यामुळें इतर शास्त्रांतील पुराव्यांत व इतिहासाच्या पुराव्यांत गुणदोषाच्या बाबतींत बरीच भिन्नता आहे. इतिहास व इतर शास्त्रांत पुराव्यांच्या उपयोगाच्या बाबतींतही भिन्नता दृष्टीस पडते. ही तफावत पुढील प्रकारांत पहावयास मिळते. [१] रसायनादि शास्त्रांत पुराव्याचें स्वरूप व स्वभावधर्म सामान्य असतात. इतिहासांतील पुरावे व्यक्तिविषयक व स्वतंत्र असतात. [२] दृष्टिगोचर झालेल्या परिणामांचीं कारणें शोधण्यासाठीं ठरविलेल्या अनुमानपद्धतीप्रमाणें पुराव्यांचा इतर शास्त्रांत ठराविक दिशेनें उपयोग केला जातो. इतिहासांत पुराव्यांच्या तपशिलावरून अनुमान-पद्धति बसवून अज्ञात ऐतिहासिक प्रसंगाचा मुगावा लावावयाचा असतो. [३] इतर शास्त्रांत पुराव्यांचा जरूर तितकाच उपयोग करून सिद्धान्त प्रस्थापित

करावयाचा उद्देश असतो. इतिहासांत कोणताही सिद्धान्त निश्चयात्मक प्रस्थापित करितां येणें शक्य नसल्यामुळें पुराव्यांच्या उपयोगाची मर्यादा ठरवून घेतां येत नाहीं. [४] इतर शास्त्रांत पुराव्यांतून निर्णायक निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न करावयाचा असतो. इतिहासांत असा निर्णायक निष्कर्ष काढतां येत नाहीं; म्हणून संभाव्यासंभाव्यता शोधण्याचाच प्रयत्न करावयाचा असतो.

१. रसायनादि शास्त्रांत निसर्गांतील जड वस्तूंच्या स्वभाव-धर्माचें ज्ञान हाच मुख्य अभ्यासाचा विषय असतो. या स्वभावधर्माविषयीं जें कांहीं ज्ञान प्राप्त झालेलें असतें, तें कोणाच्या तरी अनुभवावरूनच संपादलेलें असतें. परंतु असें परंपरेनें आलेलें ज्ञानही शास्त्रशाला पुन्हा स्वानुभवानें पडताळून पाहतां येतें. जे पुरावे उपलब्ध असतात ते सामान्य स्वरूपाचे व स्वभावधर्माचे असतात. ते व्यक्तिविशेष किंवा विवक्षित स्वरूपाचे नसतात. म्हणून हे सृष्टिविषयक शास्त्रांतील पुरावे सिद्धान्तरूप ठरतात. इतिहासांत याचे उलट स्थिति आढळते. कारण त्यांत मानवी हालचालींच्या वृत्तान्ताचीच जुळणी विशेषतः केली जाते. अशा हालचालींत कोणतीही एक हालचाल तपशिलानें व स्वरूपानें दुसरीशीं साम्य असल्याचें अगदीं क्वचितच संभवतें. त्यामुळें स्वरूपानें व गुणानें असम असलेल्या हालचालींवरून सामान्य सिद्धान्त बसवितां येणें शक्य नसतें. फारतर एकाच जातीच्या अनेक हालचालींची तुलना करतां येऊन त्यांतून ठोकळ मानानें कांहीं मर्यादेपर्यंत त्यांच्या कार्य-कारण-भावाबद्दल थोडेसे अनुमान-सिद्धान्त सांगतां येतील. परंतु या सिद्धान्तांना सामान्य सिद्धान्तासारखे निर्णयात्मक सिद्धान्त म्हणतां येणार नाहीं. विस्तवानें भाजतें ह्या सिद्धान्ताला स्थलकालानें बाध येणार नाहीं व ज्या वस्तूंच्या योगानें विस्तव उत्पन्न केला जातो त्यांच्या गुणदोषानेंही हा सिद्धान्त ढळणार नाहीं. तसेंच विस्तवानें भाजतें हा सिद्धान्त खरा किंवा खोटा हें प्रत्यक्ष अनुभवानेंही सांगतां येईल. परंतु क्रांतीच्या कारणांना सिद्धान्ताचें रूप देतां येणार नाहीं. निरनिराळ्या वेळीं व निरनिराळ्या देशांत क्रांत्या झाल्या: परंतु त्या सर्वांत कोणतेंच एक कारण सिद्ध म्हणून मानतां येत नाहीं. जे कारण एका क्रांतीला कारण झालें तेंच कारण पुन्हा केव्हां तरी क्रांति घडून आणण्याला

कारणी होईलच असें नाहीं. फार तर एवढें म्हणतां येईल कीं, जुलूम-जबरदस्ती होऊं लागली म्हणजे क्रांति होण्याचा संभव असतो, किंवा लोकांची प्रवृत्तिच बेबंदशाहीकडे असली म्हणजे देशांत सारख्या क्रांत्या घडत असतात. इतकेंच. एखादा शास्त्रज्ञ अमुक एक उष्णता दिली म्हणजे पाण्याला उकळी आलीच पाहिजे म्हणून जसा सिद्धान्त सांगतो तसा सिद्धान्त इतिहासांत सांगतां येत नाहीं. म्हणून रसायनादि शास्त्रीय संशोधक जे पुरावे उपयोगांत आणतो ते पुरावे सामान्य स्वरूपाचे व स्वभावधर्माचे असल्याबद्दलची प्रथम खात्री करून घेतो; नाहींतर त्याचे सिद्धान्त सामान्य राहणार नाहींत. इतिहासांतील पुरावे व्यक्तिविशेष व स्वतंत्र असले तरी चालतात. कारण इतिहासाची रचना व्यक्तींच्या हालचालींच्या वृत्तान्तांनींच होत असते.

२. शास्त्रीय संशोधनाचा मुख्य उद्देश ठराविक परिणामांवरून कारणें शोधावयाचा असतो. म्हणजे कारण-मीमांसेचें अनुमान बिनचूक असल्याबद्दल प्रत्यक्ष अनुभवानें खात्री करून घेतलेली असते. मुख्य जें कांहीं शिकवावयाचें किंवा शोधावयाचें असतें तें म्हणजे प्रयोग करण्याची क्रिया हें होय. शास्त्रीय संशोधक दुसऱ्याच्या अनुभवावर विसंबेल; परंतु जेथें त्याला जरूर वाटेल तेथें तो त्या बाबीबद्दल स्वतःच अनुभव घेईल. प्रत्यक्ष प्रयोग करून अनुभवलेलें ज्ञान तें प्रत्यक्ष ज्ञान होय; आणि शास्त्रज्ञ बहुधा प्रत्यक्ष ज्ञानावरच विशेष जोर देत असतो; व पुराव्यांचें परीक्षण व एकीकरण ठराविक अनुमान-पद्धतीनें करतो. इतिहासांत याच्या अगदीं उलट स्थिति आढळते. ऐतिहासिक पुराव्यांतून कारणात्मक मजकूर प्राप्त होईल म्हणावें तर ते सर्व पुरावे तपशिलात्मक असतात व कार्यें म्हणजे ऐतिहासिक प्रसंग अज्ञात असतात. त्यामुळें कार्य व कारण यांतील संबंध दर्शविण्यास कोणतीच ठराविक अनुमान-पद्धति स्वीकारतां येत नाहीं. फार तर असे तपशील एकत्र करून व त्यांचें परीक्षण करून ते सत्य आहेत काय, असल्यास कोठपर्यंत त्यांत सत्यत्व असूं शकेल, याचा आपणाला अंदाज काढतां येईल. असा अंदाज कदाचित् खात्रीलायक असूं शकेल व त्याबद्दल विचारी माणसाला संशयही वाटणार नाहीं; परंतु तो अंदाज एखादे वेळीं संशयात्मक व संभवनीयही असूं शकेल. बरेच वेळां इतिहासांत मृत्युतिथि वगैरेसारखे प्रसंग निर्णयात्मक ठरूं शकतात. परंतु राजारामाच्या नांवानें केलेल्या कटांत

सोयराबाईचें पूर्ण अंग होतें किंवा नाहीं हें निर्णयात्मक सांगतां येणार नाहीं. नवीन विश्वसनीय माहिती उपलब्ध होतांच हा समज चुकीचाही ठरण्याचा संभव आहे. परंतु अशी माहिती मिळाल्यानंतरही सोयराबाईचें कटांत पूर्ण अंग नव्हतें हें विधानही निर्णयात्मक असें म्हणतां येणार नाहीं. तीही एक अधिक विश्वासार्ह अशीच बाब होऊन राहील. इतिहास-संशोधक आपल्या समजुतीप्रमाणें एखादा निर्णय देईल; परंतु तो निर्णय शास्त्रज्ञाप्रमाणें प्रत्यक्ष पडताळून पाहतां येणें शक्य नसल्यामुळें त्या निर्णयाला निर्णायक स्वरूप राहणार नाहीं. इतिहास-संशोधक ज्यावेळीं निर्णय हा शब्द वापरतो त्या वेळीं त्या शब्दाचा अर्थ अधिक विश्वसनीय इतकाच असतो. शास्त्रज्ञ निर्णयात्मक बोलूं शकेल. इतिहास-संशोधकाचे शोध नेहमीं संभवात्मकच राहतील. सृष्टिशास्त्रांतील परिणाम दृष्टिगोचर होणारे असून सामान्यतः सिद्धच असतात. इतिहासांतील परिणाम म्हणजे ऐतिहासिक प्रसंग अज्ञात असून सिद्ध करण्यास कठीण असतात. म्हणून कोणतीही अनुमानपद्धति बिनचूक असल्याबद्दल खात्री करून घेतां न आल्यामुळें इतिहासांत ठराविक अनुमान-पद्धतीचा उपयोग करतां येत नाहीं व त्यामुळें अनुमानांवरून पुराव्यांच्या ग्राह्यतेचें प्रमाण ठरवितां येत नाहीं.

३. इतर शास्त्रांत संशोधनाचा उद्देश सामान्य सिद्धान्त प्रस्थापित करण्याचा असतो. हे सिद्धान्त अनेक प्रकारचे असूं शकतील. कांहीं सिद्धान्तांचा उपयोग रोजच्या व्यवहारांत होईल व कांहींचा सृष्टिरचनेचें ज्ञान संपादन करण्याकडे होईल. परंतु शास्त्रीय शोध नेहमीं उपकारकच असतात. इतिहासांत इतिहासकालीन जे कांहीं प्रसंग घडले असल्याचें सांगितलें जातें त्यांतील तथ्यार्थ शोधण्याचा प्रयत्न करावयाचा असतो. अशा प्रसंगांच्या मीमांसेवरून कदाचित् राजकारणी माणसांना थोडाबहुत फायदा करून घेतां येईल. परंतु ज्यापासून कोणाला सामान्य फायदा होईल असा सिद्धान्त सांगतां येणार नाहीं. क्वचित्प्रसंगीं थोडींबहुत इतिहासकालीन प्रसंगांवरून अनुमानानें प्रवृत्तिपर कांहीं सूचक प्रमाणें काढतां येतील; म्हणून पुराव्यांच्या उपयोगाच्या उद्देशांतही अशी भिन्नता दृष्टीस पडते.

४. रसायनादि शास्त्रांत निर्णायक निष्कर्ष काढण्याचा उद्देश असतो. इतिहासांत संभाव्यतेपलीकडे निष्कर्ष काढतां येत नाहीं. इतर शास्त्रांत सामान्य

सिद्धान्त रचावयाचे असल्याकारणानें एखाद्या सिद्धान्ताविरुद्ध दुसरा सिद्धान्त स्थापित झाला तर तो सिद्धान्तही शास्त्रशांस पटतांच पूर्व सिद्धान्तांत फरक करून नवीन सिद्धान्त निर्णायकच मानला जातो. हाही सिद्धान्त सामान्य सिद्धान्त असतो. म्हणजे इतर शास्त्रांत संशोधन करून केलेली दुरुस्ती किंवा प्रगति निर्णायक स्वरूपाचीच राहते. आणि असे सिद्धान्त स्वतंत्र व सामान्य असे मानले जातात. या नवीन सिद्धान्तांनीं जुन्यांतील खोटेपणा ठरविला जात नाहीं, तर त्या सिद्धान्तांत आणखी भर टाकली जाते किंवा त्यांच्या सिध्यर्थ जे प्रयोग केले जातात त्या प्रयोगांत अधिक स्वल्पता साधली जाते. इतिहासांत मनुष्याच्या हालचालींशीं संबंध जडल्यानें त्यांत कोणत्याच प्रकारचा सामान्य सिद्धांत ठरवितां येत नाहीं. 'व्यक्ति तितक्या प्रकृतिं' ही म्हणही विकारांच्या व निरनिराळ्या विचारांच्या योगानें जें मनुष्यांत स्वभाव-वैचित्र्य दृष्टीस पडतें त्यावरून रूढ झाली आहे. मनुष्य नेहमींच स्वार्थाकडे लक्ष देत असतो आणि या सामान्य प्रवृत्तीवरून कदाचित् स्वभावांतील व वागणुकींतील सामान्य गुण ठरवितां येतील. परंतु त्यांतही जो बाहेरून विरोधी-भावाचा संस्कार होत असतो त्यामुळें अशा सामान्य गुणांतही फेर पडूं शकतो. मनुष्यांतील या स्वार्थी प्रवृत्तीच्या गुणदोषावरूनच अर्थशास्त्र रचलेलें आहे; आणि या अर्थशास्त्रांत सांगितलेले नियम जरी सत्य व व्यवहार्य असले तरी ते सर्वांना सरसहा लागूं पडतीलच असें नाहीं; परंतु खरा अर्थशास्त्रज्ञ किंवा इतिहासज्ञ या स्वार्थरूपी सामान्य गुणाव्यतिरिक्त जातिमत्सर, धर्म-भावना, रूढिकल्पना वगैरेंचाही मनुष्यावर परिणाम घडत असतो हें जमेस धरीत असतो; म्हणून एखाद्या मनुष्यानें जी गोष्ट केली ती अमुकच उद्देशानें किंवा मनोविकारानें केली याबद्दल केवळ तर्क करणें शक्य नसतें. जेथें व्यक्तीच्या विकाराबद्दल निर्णयात्मक तर्क करतां येत नाहीं तेथें समाजाच्या कार्यांतील मनोभूमिकेबद्दल फारसें खात्रीपूर्वक सांगतां न येणें साहजिकच आहे. कदाचित् भौगोलिक परिस्थितीचा होणारा परिणाम किंवा निरनिराळ्या विकारांस बळी पडण्याचा एखाद्या समाजाचा स्वभावधर्म वगैरेंबद्दल थोडीफार निष्कर्षात्मक सामान्य प्रवृत्ति सांगतां येईल, आणि अशा स्पष्टीकरणापासून जनतेला इतिहासकार बराच फायदा करून देईल. परंतु असलें निवेदन नेहमीं तार्किकच असें ठरेल; सिद्धान्त ठरणार नाहीं.

सारांश, पुराव्याचा उपयोग करितांना इतिहासलेखकाला इतर शास्त्रांतील पुराव्यांच्या बाबतींतिल निर्बंधांपेक्षां अगदीं वेगळेच निर्बंध घालून घ्यावे लागतात व कायदेपंडित किंवा शास्त्रज्ञ यांच्या पुराव्यांच्या परीक्षणापेक्षां त्याचेवर अधिक जबाबदारी येत असते. अर्थातच इतिहासासाठीं पुराव्यांच्या परीक्षणाचे नियम बरेच भिन्न असावे लागतात. यामुळें इतिहाससंशोधकाला या निर्बंधाच्या ज्ञानाची प्राप्ति केल्याशिवाय इतिहाससंशोधनाचा कारभार बिनचूक आटोपतां येत नाहीं. कोणत्याही शास्त्रांतील तत्त्वें नवीन शास्त्रीय पुस्तकानें निर्माण करण्यांत येत नसतात, तर अस्तित्वांत असलेल्या तत्त्वांचें नियमीकरण करणें हेंच शास्त्रज्ञाचें काम असतें. असें नियमीकरण झालें म्हणजे मात्र त्या शास्त्राची किंवा कलेची वाढ झपाट्यानें होऊं लागते. जो इतिहासाभ्यासू या शास्त्रीय नियमानुसार आपला अभ्यास करून इतिहासांतील सत्यशोधनाचा प्रयत्न करतो त्यालाच इतिहाससंशोधक म्हणतात; आणि इतिहाससंशोधक जो इतिहास तयार करतो त्याला संशोधकीय इतिहास म्हणतात. कोणत्याही अभ्यासांत पूर्वग्रहावरून अनेक अडचणी येतात. इतिहासांतही त्या येत असतात. त्या प्रथम दूर करण्याचा प्रयत्न केल्याशिवाय अभ्यासांत किंवा इतिहाससंशोधनांत प्रगति करून घेतां येणें शक्य नसतें. प्रथम आपण ज्ञानाच्या कोणत्या पायरीवर आहोंत तें ओळखलें पाहिजे. नंतर आपण कोणत्या परिस्थितींत अभ्यास करूं म्हणतों त्या परिस्थितीचें ज्ञान करून घेतलें पाहिजे; म्हणजेच अभ्यास नीट करतां येऊन यश संपादतां येईल. कोणत्याही ज्ञानसंवर्धनाच्या मार्गांत मनुष्याला जें प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष ज्ञान झालेलें असतें, त्याचा त्याचेवर परिणाम झालेला असतो. या परिणामांना संस्कार असें म्हणतात. जेव्हां या संस्कारांविरुद्ध एखादी गोष्ट करावयाचा प्रसंग येतो तेव्हां मागील संस्कार झटकून विसरतां येत नाहींत. अभ्यासूची अशी स्थिति होते तर इतरेजनांनीं संस्कारास चिकटून राहून नवीन ज्ञानास विरोध केला तर नवल कसलें. इतिहासाचे बाबतींत या संस्काराचे परिणाम नेहमीं पहावयास सांपडतात. म्हणून प्रथम मूळ साधनचिकित्सेच्या अभ्यासापूर्वी इतिहासलेखनांत संशोधकाला वर्तमान परिस्थितींत कोणकोणत्या अडचणी येऊं पाहतात त्याचें प्रथम ज्ञान करून घेणें इष्ट आहे.

## ५ संस्कारांचा इतिहास-रचनेस अडथळा

मानवी प्राणी स्वभावतःच परंपरागत संस्कारांनीं बद्ध असतो. कोणत्याही गोष्टीशीं त्याचा संबंध जडला, कीं त्याचे हृदयांत ममत्व उत्पन्न होतें व या ममत्वाविरुद्ध कोणतीही सत्य वा असत्य गोष्ट घडली कीं, त्याच्या मनाची चलबिचल उडते. मग ती गोष्ट कितीही कटु वा असत्य असेना; तो ती विसरण्यास अगदीं नाखुष असतो. परंपरागत आलेल्या असत्य व अहित-कारक गोष्टींचा त्याग करून व्यक्तीची अगर देशाची किंबहुना सर्व समाजा-ची प्रगति व्हावी म्हणून मानवी प्राण्याला सदसद्विवेकबुद्धीची परमेश्वरानें उत्तम जोड करून दिली आहे. परंतु मानवदेहावर घडलेले संस्कार व प्रत्येक व्यक्तीच्या ठायीं वसत असलेलें सदसद्विवेकबुद्धीचें कमीअधिक प्रमाण या प्रगतीच्या नेहमीं आड येत असतें. संस्कारांचा अज्ञानामुळें मनावर पूर्ण पगडा बसलेला असतो व कितीही असत्य गोष्ट असली तरी त्यांतील असत्यता पटविणें फार कठीण जातें.

नेहमींचीच गोष्ट आहे. मला माझे तीन चार वर्षांचे मुलीनें एकदां गोष्ट सांगण्यास सांगितलें. मी नवीनच गोष्ट रचून सांगू लागलों. परंतु ती गोष्ट तिनें सुरूही करूं दिली नाहीं. म्हणूं लागली कीं, 'मला कावळ्याची व चिमणीची गोष्ट सांग'. मीही हट्ट पाहून बरें म्हटलें. मीं म्हटलें 'एक होता कावळा व एक होती चिमणी. चिमणीनें आपलें घर मऊमऊ गवताच्या काड्या जमवून बांधलें होतें. तिनें आपल्या अंगावर पाऊस व उन्ह लागूं नये म्हणून—' माझी गोष्ट इतकीच राहिली. 'दादा, तूं खोटें सांगतोस. चिमणीचें घर होतें मेणाचें व कावळ्याचें होतें शेणाचें'. यापूर्वी तिला समोरील झाडावरील कावळ्याचा कोठाही दाखविला होता व चिमणीचा कोठा-ही खेळावयास दिला होता; परंतु आजीनें, आईनें व शेजारच्या बरोबरीच्या सोबतिणीनें जी गोष्ट ज्या स्थितींत सांगितली ती त्याच भाषेंत न सांगितल्या-मुळें माझी गोष्ट तशीच राहिली व ती नाखुष होऊन गेली. उलट तक्रार ऐकून तिच्या आजीनें तिचीच बाजू घेऊन सांगितलें कीं, 'तुमच्या शास्त्र-शुद्ध गोष्टी तुमचेजवळ ठेवा. मुलांची करमणूक करितांना हा त्रास कशाला हवा! पोर जवळ आली तिला दोन गोष्टी सांगून शिकवावयाचें तें सोडून तिच्यापाठीं हा खरेखोटेपणाचा त्रास कशाला हवा! जुनीं माणसें होऊन

गेलीं तीं काय वेडीं होतीं !' शेवटीं आजीनें ती गोष्ट पुन्हा व्यवहारांतल्या स्वरूपांत सांगितली आणि नातही आजीवर खूष होऊन विजयानंदानें झोंपी गेली. हीच परिस्थिति इतिहास-संशोधनांतही तंतोतंत दृष्टीस पडते.

परंपरेनें प्राप्त झालेल्या ऐतिहासिक विकृतही गोष्टींचा महाराष्ट्रावर पूर्ण पगडा बसला आहे. अशा परिस्थितींत कोणत्याही ऐतिहासिक सत्याबद्दल चर्चा करतांना जर एखाद्या संस्कारप्रणीत गोष्टींविरुद्ध दोन शब्द बोलावे लागले तर ते ऐकण्याची व ऐकूं देण्याची तयारी* नसते. सामान्य जनतेच्या मनांत खळबळाट उत्पन्न होतो व उत्पन्न करविलाही जातो. त्यामुळें जितकी प्रगति इतर शास्त्रांत सहज करतां येते तितकी ती इतिहासासारख्या शास्त्रांत करून घेणें बिकट जातें. त्यामुळें संस्कारजन्य विकारांच्या विरुद्ध बंड उभारून राष्ट्राला परिपोषक अशी विचारक्रांति घडवून आणण्याकरितां नवीन शास्त्रीय पद्धतीचा इतिहास रचनेस जरूर आहे हें पटविणेंचा† मोठें कठीण काम होतें. या कार्यास महाराष्ट्रीय संशोधकांना जवळजवळ वीस-पंचवीस वर्षें झगडावें लागलें. सध्यां महाराष्ट्रांत संशोधनाची थोडीबहुत अभिरुचि जडली आहे. अभ्यासाचे व संशोधनाचे मार्ग मात्र अद्यापीही तितके अंगवळणीं पडले नाहींत. त्यामुळें सामान्य जनतेंत उडणारा खळबळाट व 'आजीबाई'चा पुरस्कार‡ संशोधनाच्या कार्यांत तितकी प्रगति करूं देत नाहीं. कोणतीही वाङ्मयविषयक सुधारणा राष्ट्राला कितीही परिपोषक किंवा मार्गदर्शक असली, तरी तिचें स्वरूप तात्त्विक व परिणाम अप्रत्यक्ष असतील तर ती राजकीय किंवा सामाजिक सुधारणांसारखी थोडक्या कालांत जनतेंत फैलावूं शकत नाहीं. इतकेंच नव्हे तर अशा तात्त्विक सुधारणांची उपयुक्तता पटूनही तिची आवश्यकता मान्य होत नसते. असल्या सुधारणांवरील वादांना प्रत्यक्ष परिणामांचें नियंत्रण नसल्यामुळें त्या वादांत स्वैरपणाचा अवलंब केला जातो आणि मूळ तत्त्वांच्या वादाचा मुद्दा सुटून शब्दसंचार करणें एवढेंच बाकी राहतें.

*प्रस्तावना—कृष्णाजी नारायण आठल्येकृत (केरळकोकिळ) ज्ञानेश्वरी (शेवटची आवृत्ति) व विनायकबुवा साखरेकृत ज्ञानेश्वरी.

† शिवचरित्रप्रदीप, पृष्ठ २५४-८८, व याच विषयावरील इतर लेख.

‡ Shivaji Souvenir-Marathi-Hindi Section-pp. 95-110 (1927).

खरं पाहिलें तर संस्कार म्हणजे प्रत्यक्ष अनुभवानें मिळविलेलें ज्ञान. इतर बाबींत हें ज्ञान सिद्धान्तरूप म्हणजे निर्णायक असल्यानें या ज्ञानांत नवीन शोधांनीं भर पडत असते. त्यामुळें मनुष्याला या नवीन भरीमुळें आनंदच होतो. इतिहासांतही जेव्हां नवीन भर पडते तेव्हां कोणाचाच त्याला विरोध नसतो. परंतु इतिहासांत जें संभवात्मक ज्ञान प्राप्त झालेलें असतें त्यांत नवीन शोधांनीं फरक घडून येतात किंवा अगदींच विरुद्ध ज्ञान मिळतें. त्यामुळें संपादलेलें व अंगीं पडलेलें ज्ञान सोडून देतांना नुकसान झाल्यासारखें वाटतें. परंतु ऐतिहासिक ज्ञानांत निश्चयात्मक कांहींच नसतें हें तत्त्व जर संशोधकांनीं आपल्या मनावर बिंबविलें तर तो या ऐतिहासिक नफ्यातोट्यांवरून आपल्या अभ्यासाची प्रगति मोजणार नाहीं. व्यक्तिशः त्याचे मनावर झालेले परिणाम त्याच्या अभ्यासास बाधक होणार नाहींत. त्याचप्रमाणें इतरांच्या मनावर झालेल्या परिणामांवरून त्याच्या विचारांनाही मर्यादा पडणार नाहीं; परंतु मुळांतच इतिहासांतील संभवात्मक ज्ञानाला निश्चिततेचा शिक्का बसल्यानें सांप्रत इतिहाससंशोधनाचे मार्गांत अडथळे उत्पन्न होत असतात यांत शंका नाहीं.

या संस्कारांच्या परिणामाप्रमाणेंच इतिहासक्षेत्रांतील सामान्य वादामुळेंही इतिहासाचें बरेंच नुकसान होत असतें. कोणत्याही विषयांत सामान्य वाद-स्थलें असतातच. परंतु सामान्य वादस्थलांप्रमाणेंच विवक्षित स्वरूपाचे वादही सामान्यपणें अभ्यासूंचे बऱ्याच नुकसानास कारणी होतात. या वादां-बद्दलही विचार करणें जरूर आहे.

## ६. इतिहास-रचनेंतील सामान्य वाद

चर्चा म्हणजे वाद. आणि कोणत्याही विषयावर चर्चा करण्यास प्रारंभ झाला, कीं त्यांत पूर्वपक्ष व उत्तरपक्ष हा आलाच. परंतु चर्चेंत एकदां क पक्षाभिमान जागृत झाला म्हणजे मूळ तत्त्वाची चर्चा बाजूस राहते असा सामान्य अनुभव आहे. चर्चेंतील या सामान्य प्रवृत्तीशिवाय इतिहासांत कांहीं चर्चेच्या विशिष्ट प्रवृत्ति असल्याचें आढळतें. त्या प्रवृत्तींवरून जे वाद उत्पन्न होतात त्यांतील मुख्य वाद [१] साधनाच्या प्रकाशनाची युक्तायुक्तता ठरविण्यांत, [२] व्यक्तिविषयक प्रयत्नांतील व्यक्तिविशिष्ट गुणदोषविवेचनांत, [३] संग्राहक व लेखक यांच्या परस्पर संबंधांत, उत्पन्न झालेले दृष्टीस पडतात.

१. ज्या देशाच्या इतिहासाची रूपरेखा तत्कालीन इतिहास-लेखकांनीं कालनिर्देश करून व ऐतिहासिक प्रसंगांची कालानुक्रमानें संगति जुळवून आंखलेली असते त्या देशांत इतिहासाचें संशोधन करितांना फक्त बारीकसारीक प्रमेयें किंवा व्यक्तिविशिष्ट कार्यांतील श्लेष काढून त्यांतील तपशील फार बारकाईनें तयार करणें एवढेंच कार्य बाकी राहतें. इतिहासाचा सांगाडा पूर्ण तयार झालेला असतो; परंतु ज्या देशाच्या इतिहासाचा नुसता सांगाडाही तत्कालीन लोकांनीं तयार केलेला जेथें उपलब्ध नसतो व तदनंतर सांपडलेल्या अवशिष्ट पुराव्यांवरून रचलेला सांगाडाही शास्त्रशुद्ध तयार झालेला नसतो, तेथें मात्र संशोधकांनीं कोणत्या मार्गानें आपलें संशोधन करावें हें ठरवून घेणें फार कठीण जातें. ऐतिहासिक प्रसंगाचा नक्की कालनिर्देश केलेला नसतो म्हणून त्या प्रसंगाबद्दलचें संशोधन अमुक एका कालापुरतें मर्यादित करतां येत नाहीं. प्रसंगांची मांडणी संगतवार केलेली नसते म्हणून साधनांतील गर्भितार्थ समजत नाहीं. कित्येक प्रसंगांचा अजूनही पत्ता लागलेला नाहीं म्हणून ऐतिहासिक उपलब्ध प्रसंगांवरून निश्चित अनुमानें काढणेंही जड जातें. अशा परिस्थितींत हंसक्षीर न्यायानें तत्कालीन ऐतिहासिक कागदपत्रांची किंवा ऐतिहासिक साधनांची तपासणी करून त्यांच्या युक्तायुक्ततेबद्दलचा विचार ठाम करणें व त्यांची प्रसिद्धीसाठीं निवड करणें फार कठीण जातें. विशेषतः कित्येक प्रसिद्ध व्यक्तींची व स्थलांची आपणांस नुसती ओळखही न झाल्याकारणानें व त्यांच्याबद्दलची पुरेशी माहिती उपलब्ध नसल्यामुळें तर ऐतिहासिक साधनांचा दर्जा ठरविणें मुष्किलीचें होऊन बसतें. म्हणून अमुक एक प्रकारचींच साधनें इतिहासास योग्य व बाकीचीं सर्व टाकाऊ, अतएव प्रसिद्धीस अयोग्य असें म्हणणें रास्त होणार नाहीं. कारण जें साधन विवक्षित माणसाच्या मर्यादित दृष्टीला टाकाऊ वाटेल तेंच साधन दुसऱ्या एखाद्या प्रसंगीं दुसऱ्याला मोठें महत्त्वाचें असें वाटेल. कोणालाही प्रत्येक साधनाचें सर्वांगीण परीक्षण करणें शक्य नाहीं. कारण साधनांच्या परीक्षणास अवश्य असणाऱ्या अनेक बाबींची महाराष्ट्राच्या इतिहासांत वाण आहे व कोणालाही देशाचा सर्वांगीण इतिहास लिहिण्यासाठीं आवश्यक तयारी करण्याइतकी फुरसत नाहीं. नुसत्या राजकीय इतिहासाला एखादें साधन अनावश्यक वाटलें तरी तें त्या देशाच्या धार्मिक, बौद्धिक, सामाजिक,

आर्थिक वगैरे अनेक तऱ्हांच्या ऐतिहासिक विवेचनास उपयुक्त असतेंच. परंतु अमकीं अमकीं साधनें विनाकारण प्रसिद्ध करून कालाचा व खर्चाचा व्यय केला, अमुक प्रकारचीं साधनें पुन्हा उघडकीस आणून विनाकारण समाजांत वितुष्ट माजविलें वगैरेंसारखे सामान्य वाद मात्र माजत असतात. सारांश, महाराष्ट्रीय मराठ्यांच्या इतिहासाचा सांगाडाच जेथें अगदीं विकृत व त्रुटित अशा स्थितींत आहे तेथें साधनांच्या युक्तायुक्ततेबद्दलचे वाद निष्फळ आहेत यांत शंका नाहीं. प्रत्येक भूतकालीन अवशिष्ट पुरावा जशाच्यातशा स्थितींत अभ्यासूंच्या समोर आलाच पाहिजे व त्याचें परीक्षण करणें व त्याचा उपयोग कितपत होईल हें ठरविणें एकाच्याच मर्जीवर न राहतां त्यांतील आवडीनावडीचा समान हक्क इतिहासक्षेत्रांत वावरणाऱ्या सर्व अभ्यासकांकडे राहिला पाहिजे.

२. कोणत्याही कार्याचा प्रारंभ एखाद्या व्यक्तीकडूनच होत असतो. नंतर एखाददोन व्यक्ति तें कार्य कांहीं कालपर्यंत नेटानें करूं शकतात. त्यांच्या कार्याचा आदर्श समोर दिसूं लागतांच जनतेचा त्या कार्याकडे ओढा लागतो व तें कार्य 'समाज' संस्थारूपानें लोककाज म्हणून हातीं घेतो. अशा नूतन कार्यास हात घालणाऱ्या संस्थाही कांहीं कालपर्यंत व्यक्तिभूत राहणें साहजिक असतें. परंतु लोकांत जसजशी त्या कार्याबद्दल अभिरुचि उत्पन्न होत जाते तसतशा या संस्था सुधारण्याच्या मार्गाला लागतात. हाच कोणत्याही कार्यांतील सामान्य धर्म आहे. जोंपर्यंत एखादें कार्य व्यक्तिगत असतें तोंपर्यंत त्या कार्यांत व्यक्तिश्रेष्ठत्व व व्यक्तिवैगुण्य शिरणें साहजिक असतें. अशी अपूर्णतावस्था नसावी हें खरें. परंतु ती नसणें मात्र तितकें शक्य नसतें. संस्थांच्या बालदशेंतही हाच अनुभव प्रत्ययास येतो. अशा वेळीं संस्थांचें कार्य व्यक्तिगत असतें व ती संस्था दोषास पात्र होते. परंतु पूर्णतावस्था प्राप्त करून घेण्याच्या या पायऱ्या आहेत. अशा वेळीं व्यक्तिश्रेष्ठत्वाला विशेष महत्त्व देऊन किंवा व्यक्तिवैगुण्याकडे दुर्लक्ष न करितां त्यांतच त्या कार्याचें सर्वस्व कल्पून मिथ्या वाद वाढविले जातात. त्यामुळें मुख्य कार्यावरील विश्वास उडतो व उडविला जातो. अशा तऱ्हेनें इतिहास-रचनेस व विशेषतः साधन-संचयाच्या कामांत फार मोठे अडथळे येतात. तरी सुरवातीस झालेल्या चुकांकडे किंवा व्यक्तिदोषांकडे दुर्लक्ष करून मुख्य कार्यांत येणारे अडथळे

दूर केले पाहिजेत. साधन-संचयाचें काम जितकें साधेल तितक्या झटपटीनें व जोरानें होण्यासाठीं ऐतिहासिक संग्रह व्यक्तीच्या मालकींतून सामाजिक संस्थांकडे जाऊन देशाच्या उपयोगास हजर होतील अशी व्यवस्था झाली पाहिजे. हल्लीं जी संशोधनांत व्यक्तिशः कार्य करून दाखविण्याकडे ओढ दिसते त्याऐवजीं संशोधनाचें कार्य संघशक्तीनें करण्याची प्रवृत्ति अभ्यासूंत उत्पन्न करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत.

३. इतिहासक्षेत्रांत काम करणाऱ्या अभ्यासकांत कांहीं संग्राहक म्हणून ऐतिहासिक साधनांचा जमाव करीत असतात, तर कांहीं इतिहासलेखनाचें काम करीत राहतात. संग्राहकांच्या संपत्तीवरच लेखकांचा डोलारा सजावयाचा असतो. परंतु मानवप्राणी स्वभावतःच स्वार्थी असल्यानें लेखकांचा व संग्राहकांचा नेहमींच बेबनाव होत असतो. लेखक स्वार्थपरायणता लपवून 'समाजाच्या सार्वत्रिक हक्काचा फायदा' म्हणून, किंवा 'सामाजिक कळवळ्याचा' आंव घालून संग्राहकांच्या संपत्तीचा वारसा आपणाकडे घेऊं पाहतात. असला प्रयत्न स्वभावधर्मानुरूपच होत असतो. परंतु संग्राहकाला रास्त मोबदला—मग त्याला तो द्रव्यरूपानें दिला जावो, किंवा नांवाच्या रूपानें मिळो—मिळाल्याशिवाय आपल्या संपत्तीचा वारसा दुसऱ्याकडे जाऊं देणें मानवत नाहीं. अशा परस्परविरोधी मनोभावनांमुळेंच या इतिहासक्षेत्रांत वावरणाऱ्या शास्त्यांमध्येंच सामान्य वाद माजतात. या वादांचें स्वरूप जितकें निर्भेळ व सरळ असावें तितकें तें राहूं शकत नाहीं. खरें म्हटलें तर ज्यानें परिश्रम केले त्याला त्याच्या परिश्रमाचा योग्य तो मोबदला देणें हेंच प्रत्येक लोककाजाकरितां झटणाऱ्याचें ध्येय असावयास पाहिजे. परंतु लोकसमूहास चकित करून दाखविणारें कार्य आपल्याच हातून व्हावें ही जी बाल्यावस्थेंतील बरबर काम करून महती प्राप्त करून घेणाऱ्यांच्या मनांत नैसर्गिक आकांक्षा जडलेली असते त्या आकांक्षेमुळें त्यांना त्या संग्राहकांच्या परिश्रमाचें योग्य तें चीज करण्याची बुद्धि होत नाहीं. यामुळें मुख्य कार्याचें किती नुकसान होत असतें हें पाहण्याइतकी त्यांच्यांत दूरदृष्टिही राहूं शकत नाहीं. ही अहमहमिकेची घाई कार्यातील उथळपणाची किंवा बाल्यावस्थेची निदर्शक असते. मुख्यतः असे वाद घालणारांचे प्रयत्न आगोठींत पाऊस पडूं लागतांच जोरानें फोंफावणाऱ्या रोपट्यांप्रमाणें असतात. त्या रोपट्यांत

मूळचा बीजाचा जोर नसल्यानें ते वाढही घेऊं शकत नाहींत व जीवनाचा पुरवठा अधिक होऊं लागतांच लंजूर होऊं लागतात. परंतु असल्या रोपट्यांची क्षेत्रांत गर्दी मात्र होते व ते इतरांस त्रासदायक होतात. सारांश, इतिहास-संशोधन बाजूस राहून अशा प्रकारचे सामान्य वाद सुरू होतात. हे सर्व इतिहासशास्त्रांतील प्रगतीच्या बाल्यदशेचे द्योतक आहेत. संग्राहकांना योग्य ती मदत देऊन त्यांनीं केलेला संग्रह त्यांचे आवडीप्रमाणें आपण जर त्यांना छापूं न दिला किंवा तसें करण्यास लागेल ती मदत न केली तर त्या संग्रहावर आपणाला हक्क सांगतांच येत नाहीं व त्याच्या प्रसिद्धीबद्दल संग्राहकांची हेटाळणीही करितां येत नाहीं. परंतु स्वार्थांधतेपुढें इतकी विवेकबुद्धि टिकाव काढूं शकत नाहीं व संग्राहकांच्या मनःस्थितीचा विचार करण्याइतकी सबडही रहात नाहीं. यामुळें इतिहास-रचनेंत बरेच अडथळे उत्पन्न होतात, लोकांत गैरसमज उत्पन्न होतात व उत्पन्न केले जातात. त्यामुळें संग्राहकांच्या प्रयत्नांना यश येत नाहीं व संग्राहकांच्या अपयशामुळें लेखकांचेंही कार्य अपूर्णच राहतें. सारांश, इतिहासशास्त्रांतील या शाखा परस्पर-साहाय्यक असल्यामुळें या दोन्हीही शाखांत काम करणाऱ्या ज्ञात्यांनीं उगाच वाद माजविण्यापेक्षां किंवा एकमेकांच्या कार्यांत अडथळे आणण्यापेक्षां परस्परांस शक्य तितकें साहाय्य करीत राहिलें पाहिजे. असें केलें तरच इतिहास-रचनेंतील अडथळे दूर होऊन कार्य सुलभ होईल.

इतिहासांतील सामान्य वादांप्रमाणेंच ऐतिहासिक वाङ्मयनिर्मितींतही ज्या कांहीं समजुती रूढ केल्या जातात. त्यांतील कांहीं समजुतींमुळें इतिहासाच्या संशोधनास थोडाबहुत विरोध होत असतो. तीनही प्रकारचे इतिहास-लेखक निरनिराळ्या प्रकारांनीं महत्त्वाचे असले तरी त्यांतील गोष्टीरूप व राजकारणी इतिहासांना संशोधकीय इतिहासाइतका आधारभूत मानण्याचें कारण नसतें. परंतु बरेच वेळां ह्या मुख्य तत्त्वांतील भेदाकडे दुर्लक्ष करून संशोधकीय इतिहासांतील नवीन शोधांच्या विरुद्ध गोष्टीरूप इतिहासांतील आधार देण्यांत येतात. सामान्य जनांनीं असला मार्ग धरला तर त्यांत त्यांचें अज्ञान दिसून येतें; परंतु ज्या वेळीं इतिहासाभ्यासूच असा प्रकार आरंभितो तेव्हां तो प्रकार हास्यास्पद ठरतो. इतिहासांतील निर्णय करण्याला संशोधक श्रेष्ठ अगर संकलनकार म्हणजे गोष्टीरूप इतिहास रचणारा श्रेष्ठ हें जो इतिहासाभ्यासू

असतो त्याला सांगावयास पाहिजे असें नाहीं. इतिहासाच्या ज्ञानापुरतेंच जर श्रेष्ठत्व पहावयाचें तर त्याचें उत्तर कोणीं कशीही बाकिली केली तरी इतिहासज्ञ संशोधकाकडेच बोट दाखवील आणि संशोधक व संग्राहक यांतील भेद स्पष्ट करून सांगेल कीं, संशोधक संकलनकाराइतका बेजबाबदार* राहून चालणार नाहीं आणि म्हणूनच निर्णय करावयाचा झालाच तर तो संशोधकच योग्य असा निर्णय करूं शकेल. परंतु सामान्य जनांची अशी भुलावणी करण्याचा नेहमीं प्रयत्न होत असतो. यामुळेंही इतिहासरचनेंत अभ्यासूंच्या कालाचा व्यय केला जातो. इतिहासविषयक इतर वाङ्मय म्हणजे कादंबऱ्या, नाटकें वगैरेंचाही बरेच वेळां परिणाम या इतिहासरचनेंत नवीन नवीन अडचणी उत्पन्न करण्याकडे होतो.

कादंबरीकार, नाटककार व अशाच प्रकारचे ललित वाङ्मयकार आपल्या कादंबऱ्या, नाटकें, वगैरेंतील संविधानकें पूर्ण ऐतिहासिक आहेत असें लिहितात. या लिहिण्याचा साधारण जनतेला व्हावा तसा उलगडा होत नाहीं. मुळांतच इतिहासवाचनाची गोडी फार थोडी. त्यामुळें सामान्य जनतेला इतिहासाचें ज्ञान अगदींच अल्प असतें. त्यांत जर एखाद्या शब्द-चित्रानें किंवा चित्रपटाच्या साह्याच्यानें कोणताही ऐतिहासिक प्रसंग नटविला गेला कीं तें शब्दचित्र किंवा तो चित्रपट इत्थंभूत इतिहास असाच मानला जातो. एकतर इतिहास इतिहास म्हणून वाचण्याची आम्हांस अजूनही संवय जडली नाहीं. 'अवतार' व 'लीला' यांबद्दलच्या कल्पना आम्हांपुढें भारत-रामायणादि ग्रंथांतून व कथा-पुराणांतून सारख्या ठेवल्या गेल्यानें आम्हांस मानवी कृत्यांचें चिकित्सापूर्ण परीक्षण केलेलें खपत नाहीं. कथा-पुराणांतील विवेचनपद्धति विशिष्ट प्रकारची असून तिचाच आमचे मनावर पूर्ण पगडा बसला आहे. दोषादोषांचें विवेचन करितांना आम्हांस एकांत पूर्ण आभास व दुसऱ्यांत पूर्ण विकास असेंच पहाण्याची संवय जडलेली आहे. हीच अतिशयोक्ति आमच्या तुलनाशक्तीचा मूळ पाया आहे. मोगल म्हटले कीं मराठ्यांचे शत्रु, मराठे म्हणजे लुटारू बंडखोर, इंग्रज म्हटले कीं सदा

* गो. स. सरदेसाईकृत 'शालोपयोगी भारतवर्ष' ( १४ वी आवृत्ति ) पृष्ठ ७३ व इतर प्रसंग.

सत्तावान वगैरेंसारख्या कल्पनाही साधारण जनतेंत अगदीं रूढ होऊन गेल्या आहेत. यांचाच पुरस्कार कादंबऱ्या व नाटकांत किंवा काव्यांत केला जातो. इतकेंच नव्हे तर खुद्द इतिहासकारांनाही एखाद्या नाटकांत* उपस्थित झालेली 'तुळशी', एखाद्या कादंबरींतील† 'गड आला पण सिंह गेला' ही उक्ति, मुसलमानाचा हिंदु बनविलेला एखाद्या नाटकांतील‡ 'दौलतराव', यासारखीं अनैतिहासिक विधानें आपल्या इतिहासांत इतिहास म्हणून नमूद करण्याचा मोह पडतो. एखादा प्रसंग कमीजास्ती होतो त्यामुळें इतिहासाचें फारसें नुकसान होत नाहीं. परंतु एखाद्या कादंबरीकारानें किंवा नाटककारानें जेव्हां आपल्या शब्दचित्रानें एखाद्या ऐतिहासिक व्यक्तीच्या स्वभावचित्राचें विवेचन केलेलें असतें तें मात्र बरेच वेळां सामान्य जनतेंत गैरसमज उत्पन्न करतें. महाराष्ट्राचा इतिहास अपूर्ण असल्यानें कोणाही ऐतिहासिक विभूतीचें अगर समाजाचें सर्वांगसुंदर स्वभावचित्र रेखाटण्याइतकी महाराष्ट्रांत सामुग्री नाहीं. त्यामुळें असल्या ऐतिहासिक कादंबऱ्यांतील किंवा नाटकांतील स्वभावचित्रें पूर्ण विकृत अशीं निघजल्यास नवल नाहीं. संभाजी-चेंच¶ स्वभावचित्र घ्या. अगदीं वस्तुस्थितीला सोडून आहे. सूर्याजी पिसाळाचें§ उदाहरण घ्या. त्याचे बद्दलची सर्व माहिती अगदीं असत्य आहे. परंतु जनतेंत रूढ झालेली कल्पना दूर करण्यास इतिहासास मात्र बरेच प्रयास पडतील यांत शंका नाहीं. सारांश, जनतेंत इतिहास व ललित-वाङ्मयांतील कथानकें यांतील सत्यासत्यतेचा छडा लावण्याइतकी परीक्षकबुद्धि विकास पावलेली नाहीं. त्यामुळें जनतेंतील गैरसमज घालविण्याकरितां शक्य तो प्रयत्न प्रथम झाला पाहिजे. इतिहासाचें वाचन व कादंबरी-नाटकांचें वाचन यांतील भेदाभेद त्यांना स्पष्ट करून दिला पाहिजे. स्वदेशाच्या इतिहासाची मुळांतच

*आत्माराम मोरेश्वर पाठारेकृत 'संगीत संभाजी'—व प्रचलित इतिहास.

†हरि नारायण आपटेकृत 'गड आला पण सिंह गेला' व J. Sarkar's 'Shivaji and His Life,-p. 209 (1919) व इतर इतिहास.

‡राम गणेश गडकरीकृत 'राजसंन्यास' व कांहीं अलिकडील शालोपयोगी इतिहास.

¶विष्णु हरि औंधकरकृत 'बेबंदशाही'.

§हरि नारायण आपटेकृत 'केवळ स्वराज्यासाठीं'.

म्हणजे बालवयांतच शिकवण न दिली गेल्यामुळें ही परिस्थिति उत्पन्न झाली आहे, ती दूर करण्याचेही प्रयत्न प्रथम झाले पाहिजेत.

कोणत्याही कलेच्या अगर शास्त्राच्या अभ्यासांत येणाऱ्या अडचणींचा इशारा मिळाला म्हणजे कार्य झालें असें नाहीं. अभ्यास कोणत्या दिशेनें केला पाहिजे. अभ्यासांत मुख्यतः कोणती दृष्टि ठेवली म्हणजे अभ्यास सोपा व फलदायी होईल, याचाही अभ्यासास सुरुवात करण्यापूर्वीच विचार करून ठेवला असला पाहिजे. तसेंच जें शिकावयाचें त्याचें महत्त्व व त्याची उपयुक्तता यांचाही प्रथमच विचार झाला पाहिजे. इतिहासलेखनांत मुख्यतः कोणती दृष्टि ठेवावी याबद्दल स्वतंत्र देशांत फारसा मतभेद नसतो. तसेंच इतिहासलेखनाचें धोरण प्रथम ठरवून घेऊन त्याप्रमाणें इतिहासाची विशिष्ट पद्धतीनें मांडणी करण्याचें प्रयोजनही स्वतंत्र देशांत येत नाहीं. परंतु जेथें देश स्वतंत्र नसतो व निरनिराळ्या लोकसमूहाचे राजकीय अगर इतर संबंध भिन्न स्वरूपाचे व अर्थाचे असतात तेथें इतिहासाच्या दृष्टिकोणाबद्दल विचार न झाला तर अभ्यासांत गैरसमज उत्पन्न होण्याची भीति असते.

## ७ इतिहास-रचनेतील दृष्टि

इतिहासाची गणना शास्त्रांत केली जाते. कारण तो ठराविक पद्धतीनें रचला जातो. तसेंच त्यांत ठराविक मर्यादेपर्यंतच भूतकालीन मानवी हालचालींचें वर्णन केलेलें असतें. कोणत्याही शास्त्राला पद्धती उपकारक असतात. या पद्धती जितक्या निर्दोष व चांगल्या असतात तितकेंच इतिहासाचें स्वरूप सुंदर व निर्दोष होत असतें. मानवी प्रगतीबरोबर ऐतिहासिक विषयांच्या मर्यादा मात्र विस्तृत कराव्या लागतात. इतिहास म्हणजे भूतकालीन शेष पुराव्यांच्या साहाय्यानें शाबीत झालेल्या मानवी हालचालींचें मंथन करून काढलेलें सार. हें ज्ञान विविध असतें. हा गतगोष्टींचा ज्ञानसंग्रह सारखा वर्धमान होणारा असतो. म्हणून याला वेळोवेळीं योग्य ती मर्यादा घालून भूतकालीन पुराव्यांची एकत्रित व सुयंत्रित अशी पद्धतशीर मांडणी करावी लागते. यालाच इतिहास-रचना असें म्हणतात. या भूतकालीन ज्ञानसंग्रहाची इतिहासांत निर्दोष व पद्धतशीर मांडणी केली जाते म्हणून इतिहासाची शास्त्रांत गणना करणें सयुक्त ठरतें. ज्ञानसंग्रह व त्याची

पद्धतशिर मांडणी हे दोनच विशेष इतिहासांत आढळतात असें नाहीं; तर त्यांत आणखी एक विशेष दृष्टीस पडतो. हा विशेष म्हणजे भूतकालीन ज्ञानसंग्रहांतून दोषादोष विवेचकपद्धतीनें किंवा चिकित्सापूर्ण दृष्टीनें काढलेलें निर्णयसार हा होय. नुसत्या भूतकालीन पुराव्यांची रचना कितीही पद्धतशिर केली गेली व त्या पुराव्यांतून काढलेलें सार किंवा महत्त्व जर जनतेस न पटविलें गेलें तर त्या ज्ञानाचा फारसा उपयोग होणार नाहीं. म्हणून हल्लीं इतिहासांत हा तिसरा विशेष महत्त्वाचा व आवश्यक असा गणला जातो. कच्च्या मालांतून सुंदर वस्तु निर्माण करण्यांतच मनुष्याची खरी कर्तबगारी व श्रेष्ठत्व दिसून येत असतें. या कर्तबगारींतील तेजस्विता कारागिराच्या उच्च मनोवृत्तीबरोबर विकास पावत असते. या निर्णयसारांतील बारीकसारीक भेद जरी जमेस धरले नाहींत तरी त्यांत परंपरागत व सामान्य प्रकार नेहमींच रूढ असलेले दिसतात. स्वाभिमान, आणि स्वदेश स्वधर्म व स्वभाषा यांवरील निर्भेळ प्रेमाच्या प्रमाणावरून या प्रकारांतील सरसनीरसता व निर्दोषसत्यता ओळखली जाते. सारांश, इतिहास-रचनेला शास्त्राचें स्वरूप येण्यासाठी उपरि-निर्दिष्ट कसोट्या लावण्यांत येतात आणि या कसोट्यांतून इतिहास उतरविण्यास ज्या मार्गाचा अवलंब करावा लागतो त्याला पद्धति म्हणतात. या पद्धती ठराविक असतात म्हणून इतिहासाला शास्त्र असें म्हणावें लागतें.

इतिहासलेखन हीही एक कला आहे. इतिहासलेखक जर आपल्या सुरस पण साध्या, जोरदार परंतु सरळ भाषेंत आपला इतिहास सांगणार नाहीं तर त्या इतिहासाचें महत्त्व कोणालाच पटणार नाहीं. नुसती भूतकालीन प्रसंगांची जंत्री वाचकांना विकाररहित ठेवील. इतिहासलेखकाची लेखनकला उच्च दर्जाची असेल तर तो इतिहासलेखक भूतकालाच्या चित्रपटाच्या हालचाली त्वरित करून वाचकांच्या मनावर परिणाम करूं शकेल. ऐतिहासिक सत्यांतील तत्त्वांचा किंवा नीतीचा परिपोष करून त्या तत्त्वांच्या किंवा नीतीच्या योगानें नूतन पिढीवर परिणाम घडवून आणण्यांत इतिहासलेखकाचें कौशल्य दिसून येतें. हें कौशल्य लेखकाच्या नीतिमत्तेच्या दर्जावर व उदारमतवादावर अवलंबून राहतें. याच कौशल्यावरून सामान्य जनतेवर होणाऱ्या इतिहासाच्या परिणामांचें परिमाण कमीअधिक ठरत असतें. परंतु हें भाषेचें अगर लेखन-कौशल्याचें प्रमाण निरनिराळ्या तऱ्हेच्या इतिहासलेखनांत निरनिराळ्या

मापानें मोजावयाचें असतें. संशोधकीय इतिहासांत जितकी समकालीन भाषा वापरली जाईल तितकें त्या भाषेंतील कौशल्याचें प्रमाण अधिक सरस ठरेल. भाषेच्या स्वरूपावरून व प्रचारावरून तत्कालीन संस्कृतीचा खरा बोध होत असतो. भाषेच्या स्वरूपांत फेरबदल होतांच संशोधकीय इतिहासांत खऱ्या वस्तुस्थितीचें प्रदर्शन होणार नाहीं आणि कोणतेंही साध्य पूर्ण साधतां आलें नाहीं म्हणजे ती कला सरस ठरत नाहीं. गोष्टीरूप इतिहासकाराला वर्तमान व अगदीं सामान्य भाषा वापरणें भाग पडतें. कारण त्याचा इतिहास लहानांपासून थोरांपर्यंत सारखाच उपयोगांत यावयाचा असतो. म्हणून गोष्टीरूप इतिहासाची भाषा जर साधी, सरळ व प्रचलित असेल तर ती उच्च मानतां येईल. उलट राजकारणी इतिहासाची भाषा जर जोरदार व निरनिराळे कल्पनातरंग उठवून मनोविकारांना जागृति देणारी असेल तर ती उच्च ठरेल. सारांश, या तीनही प्रकारच्या इतिहासलेखनाची भाषाशैली अगदीं भिन्न असते. तेव्हां या भिन्न प्रकारांचें एकाच दृष्टीनें परीक्षण करितां येणार नाहीं.

कोणत्याही कलेंत आपणांला परंपरा दृष्टीस पडतात. या परंपरा मानवी-प्रवृत्तीच्या कमीअधिक तेजाच्या द्योतक असतात. इतिहासलेखनकलेंतील परंपरा कित्येक वेळां देशाच्या परिस्थितीवर अवलंबून राहतात. स्वतंत्र देशांतील इतिहासलेखनपरंपरा सामान्यतः राजसत्तावादी किंवा समाजसत्तावादी अशा दोन तऱ्हांच्या असूं शकतात. परंतु परतंत्र देशांतील इतिहास-लेखन-कलेंतील परंपरा मात्र विविध असून त्या अगदीं परस्परविरोधीही असूं शकतात. महाराष्ट्रीय मराठ्यांच्या इतिहासाच्या बाबतींत तीन परंपरा रूढ आहेत. पहिली विभूतिपूजकांची किंवा हिंदु पौराणिक म्हणजे कथेकरी किंवा बखरकारांची परंपरा, दुसरी प्रतिपक्षीयांची परंपरा व तिसरी जेत्यांची इतिहासलेखनपरंपरा. पहिली परंपरा एकांगी असून फक्त भाविक जनांसच पटवून घेतां येते. या परंपरेची तुलनात्मक पद्धति विसाव्या शतकांतील नव्या मनूला मानणार नाहीं. कार्यकारणपद्धतीनें भूतकालीन प्रसंगांचा विचार न केला असल्यामुळें ती पद्धति चिकित्सापूर्ण दृष्टीला दोषिक वाटते. भारत-रामायणादि ग्रंथलेखनशैली उचलल्यानें त्यांत ऐतिहासिक प्रसंग व इतर आगांतुक अवास्तव मजकुराची इतकी गर्दी झालेली असते कीं, त्यांतील

ऐतिहासिक मजकूर शोधून काढणें जड जातें. सारांश, या परंपरेच्या लेखन-शैलींत बरेच दोष राहिल्यानें ती विसाव्या शतकांतील सशास्त्रीय दृष्टीला पटणारी नाहीं. व्यक्तीच्या इतिहासापेक्षां देशाच्या अगर समाजाच्या इतिहासाची आणि विशेषतः भूतकालीन प्रवृत्तीच्या ज्ञानाची अधिक जरूर भासत असल्यामुळें ही विभूतिपूजकांची परंपरा आज उपयुक्त ठरणार नाहीं. दुसरी परंपरा प्रतिपक्षीयांची किंवा फारसी अगर मुसलमानी ग्रंथकारांची. या परंपरेच्या इतिहासांत ऐतिहासिक प्रसंगांचें विवेचन जरी समग्र असतें तरी तें फक्त मुसलमानी सरदारांपुरतें किंवा पातशाहीपुरतेंच असतें. त्यांत मुसलमानांविरुद्ध असणाऱ्या सर्व राजांची व सरदारांची हकीगत विकृत स्थितींत व नाचक्की करणाऱ्या भाषेंत दिलेली असते. त्यांत त्यांच्या शत्रु-पक्षीयांच्या विजयाची वगैरे माहिती दिलेली नसते. अगदीं भागच पडलें तर नाइलाज म्हणून क्षुल्लक उल्लेख करण्यांत येतो. अशा तऱ्हेनें मुद्दाम एकांगी हकीगत देण्याचा प्रयत्न होत असल्याकारणानें हीही परंपरा सदोष असून या परंपरेंतील ऐतिहासिक ग्रंथांना सत्याची कसोटी लागूं शकत नाहीं. तिसरी परंपरा जेत्यांची अगर इंग्रज इतिहासकारांची. देश परतंत्र केला, कीं जेत्यांनीं प्रत्येक गोष्टीवर आपली छाप बसवून आपलें श्रेष्ठत्व जितांना न पटविलें तर जेत्यांना आपलें अस्तित्व त्या देशांत अबाधित ठेवतां येणेंच शक्य नसतें. अर्थात् या परंपरेचे लोक जित देशांचा इतिहास जितांकरितां तयार करीत नसून जेत्यांकरितां प्रथम तयार करितात. किंबहुना असा इतिहास त्या देशाचा नसून किंवा जितांचाही नसून जेत्यांचा असतो. परंतु नंतर याच परंपरेचे लोक आपला इतिहास जितांच्या पचनीं पाडूं लागतात. असल्या इतिहासांत लेखन कोणत्या धोरणानें करावयाचें, कोणते प्रसंग विशेष प्रकारें समजून द्यावयाचे व कोणत्या प्रसंगाकडे दुर्लक्ष करावयाचें हें इतिहासकार प्रथम आपल्या धोरणानें ठरवून घेतात. अशा इतिहासांत ऐतिहासिक प्रसंग अस्सल पुराव्यांच्या आधारावर एकत्रित केलेले असतात परंतु त्या प्रसंगावद्दलच्या निर्णयांत जित विरुद्ध जेता असा दृष्टिकोण रहातो. त्यामुळें तें प्रसंगवर्णन किंवा तें इतिहासलेखन जो चित्रपट उभा करितो त्या चित्र-पटाच्या दर्शनांत केव्हांही त्या राष्ट्राच्या स्वाभिमानाला, कर्तबगारीला व आत्मविश्वासाला खचीच करण्याचा प्रयत्न करण्यांत येतो. तेव्हां हीही परंपरा

जरी शास्त्रशुद्ध रचना करणारी असली तरी सदोष असते. म्हणून याही परंपरेवर विश्वासून कार्यभाग साधणें शक्य नाहीं. स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा याला सोडून जो इतिहास रचला जातो त्याला स्वदेशाचा इतिहास म्हणतां येणार नाहीं. तो स्वधर्माचा इतिहास होणार नाहीं व भाषेचाही इतिहास होणार नाहीं. अर्थात् स्वकीयांचाही हा इतिहास असूं शकणार नाहीं. सारांश, या तिन्हीही परंपरांचें अनुकरण करून महाराष्ट्राचा शास्त्रशुद्ध राष्ट्रीय इतिहास रचतां येणार नाहीं यांत शंका नाहीं.

मनुष्यमात्रांचीं मनें त्वरित संस्कृत करणारें इतिहासासारखें अन्य साधन नाहीं. इतिहासकालांतील अनुभवाच्या दाखल्यांनीं बुद्धीचा विकास व निर्णायक शक्तीची वाढ करून घेतां येते. इतिहासाच्या अभ्यासानें मानवी प्राण्याला व्यवहाराचें व नीतीचें ज्ञान प्राप्त होत असतें. यामुळेंच इतिहासाला व्यवहारानें वाङ्मयांत महत्त्वाच्या स्थानावर अधिष्ठित केलें आहे. या श्रेष्ठ स्थानाबरोबरच इतिहासकाराला मोठ्या प्रमाणांत जबाबदारीही घेणें भाग पडत असतें. त्याला उपलब्ध पुराव्यांवर केवळ विसंबून राहतां येत नाहीं. वर्तमानकालीं उपलब्ध न झालेले पुरावे पुढें उपलब्ध होण्याचा संभव असतो व उगाच पुराव्यांच्या अभावीं काढलेलीं अनुमानें फोल ठरून त्यामुळें सामान्य जनतेवर अनिष्ट परिणाम घडण्याचा योग येतो. ही गोष्ट त्याला नेहमीं आपल्या डोळ्यासमोर ठेवणें जरूर असतें. परंतु कांहीं आधुनिक इतिहासकारांचा असा ग्रह झालेला दिसतो, कीं त्यांनीं एकदां का उपलब्ध पुराव्यांची छाननी व जुळणी करून टाकली कीं, त्यानंतर इतिहास-रचनाच संपली. या समजुतीनें इतिहासांत कालाच्या व कार्याच्या दृष्टीनें स्पष्ट दिसणारे खंड-भेद कल्पनाशक्तीनें भरून काढण्यांत येतात. त्यामुळें जनतेस निराळीच दिशा लावल्यासारखें होतें. क्वचित्प्रसंगीं ही पद्धत जरी उपकारक होत असली तरी अंतीं ती बहुधा अहितकारकच ठरते. इतिहासांत चुकीचा मजकूर येऊन बसल्यानें तो काढून टाकणें किंवा त्या तपशिलावरून झालेले संस्कार दूर करणें फार जड जातें. कांहीं इतिहासकारांच्या किंवा संशोधकांच्या मतानें ऐतिहासिक उपलब्ध साधनें फक्त कालाच्या व प्रसंगांच्या क्रमानें निःपक्षपातपूर्वक छापलीं कीं कार्य संपलें. परंतु यामुळें इतिहासाचें थोडेंसें नुकसान होत असतें. छापलेल्या साधनांचें परीक्षण सर्वस्वीं दुसऱ्या अभ्यासकां-

वर सोंपविल्याकारणानें मुख्य संग्राहकाचें झालेलें मत कोणालाच समजूं शकत नाहीं. इतर पुराव्यांवरून व कागदपत्रांच्या परिस्थितीवरून त्या संग्राहकाला जीं अनुमानें सरळपणें व सहज काढणें सोईस्कर असतें तीं अनुमानें इतर अभ्यासकांला मूळ साधनांची परिस्थिति डोळ्यांपुढें नसल्याकारणानें काढतां येणें शक्य नसतें. साधनसंग्राहकानें जर आपलीं अनुमानें टांचणरूपांत त्याबरोबरच प्रकाशित केलीं तर त्या अनुमानांवरून खास प्रसिद्ध साधनांत न दिलेली आनुषंगिक माहिती मिळून इतर अभ्यासकांना त्या साधनांचें परीक्षण करणें सोपें जाईल. परंतु नेहमीं अशा टांचणाच्या महत्त्वाकडे दुर्लक्ष्य करण्यांत येतें व हें महत्त्व न समजल्यामुळें संकलनकार अशा टांचणांच्या आवश्यकतेबद्दलचें अज्ञान प्रकट करीत असतात.

आधुनिक इतिहास केव्हांही अधिक सशास्त्र, विद्वत्ताप्रचुर व कौशल्यपूर्ण असतात यांत शंका नाहीं. परंतु असें असूनही ते जनतेच्या मर्जीत उतरत नाहींत हीही गोष्ट नाकबूल करून चालणार नाहीं. याचें कारण असें दिसतें कीं, जनतेच्या सापेक्ष दृष्टीला त्या इतिहासांत पूर्णता दिसत नाहीं. माहितीच्या अभावापेक्षां इतिहासांतील विवेचनांत आपलेपणाचा अभाव हें मुख्य कारण दिसतें. स्वदेशाच्या इतिहासाकडे पाहण्याची इतिहासलेखकांची दृष्टीच मुळीं दोषपूर्ण असते. त्यामुळें नीतीचें किंवा अनुभवाचें उपयुक्त ज्ञान असल्या इतिहासांत सामान्य जनतेला सांपडत नाहीं. गतवैभवाच्या पायावर भविष्यकालाचा सुंदर इमला चढवूं पाहणाऱ्या प्रागतिक जनतेची भूतकालाचा धागा–कर्तबगारीचा व स्वाभिमानाचा धागा–तुटलेला किंवा कुजका असलेला दिसतांच निराशा होते व ती इतिहासाकडे साशंकपणानें पाहूं लागते. जोंपर्यंत स्वदेशाच्या इतिहासाकडे परकीय किंवा प्रतिपक्षीय दृष्टीनेंच स्वदेशीय इतिहासकार पाहतील तोंपर्यंत त्यांच्या इतिहासांत निर्जीवता व आत्मद्रोहच दिसेल यांत शंका नाहीं. जोंपर्यंत सामाजिक जागृति होऊन स्वातंत्र्य मिळविण्याची आकांक्षा सामान्य जनतेंत उत्पन्न झाली नव्हती तोंपर्यंत गतवैभवाची किंवा समाजाच्या स्वभावचारित्र्याची आठवणही कोणाला फारशी होत नव्हती. तसाच समाजाच्या शीलाचा अभिमानही जागृत झाला नव्हता. परंतु ही परिस्थिति बदलल्या कारणानें स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा यांवरील विश्वास दृढ होत चालला, श्रद्धा अढळ होऊं लागली, प्रेम वाढूं

लागलें व त्याबरोबरच समाजाचा शीलाच्या अभिमान दुणावूं लागला. अर्थातच अशा जागृतींत आपलेपणानें इतिहासरचना न झाली, स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा यांचेसाठीं झीज सोसणाऱ्या प्रत्येक पुण्यात्म्याच्या कार्याचें योग्य तें गुणग्रहण न केलें गेलें, आत्मद्रोही स्वकीयांच्या बाबतींतही यथान्याय दोषारोप न केला गेला तर त्या इतिहासापासून राष्ट्राला शिकण्याजोगें कांहींच राहणार नाहीं. म्हणून अशा इतिहासाकडे जनता साहजिकच शंकित दृष्टीनें पहाते व आपली नापसंती दर्शविते. गुरु०राजवाडे यांनीं आपल्या परिश्रमानें प्रतिपक्षीय व जेते यांच्या संस्कारांच्या कुपथ्यामुळें इतिहासलेखकांत जडलेल्या रोगाचें निदान सर्व स्वकीयांना पटवून दिलें व राष्ट्रास पोषक अशी इतिहासरचनेची नवीन परंपरा घालून दिली. याच परंपरेचें अनुकरण केल्याविना इतिहासाला शास्त्र व कला म्हणून जें जगांत महत्त्व आहे तें महाराष्ट्राला मराठ्यांच्या इतिहासांत पटवून घेतां येणार नाहीं, इतिहासाच्या साहाय्यानें राष्ट्रांत जिवंतपणा उत्पन्न करितां येणार नाहीं व जनतेंत आत्मविश्वास व समाजांत एकदिली राखणें सुलभ जाणार नाहीं. स्वदेशीय स्वकीयांच्या इतिहासाकडे आपलेपणानें पाहणें, स्वकीयांच्या गुणांची चहा करितांना दोषांवर पांघरूण न घालणें, जगांतील इतर राष्ट्रांशीं तुलना करून आपला दर्जा ठरवितांना वगैरे आपला देश इतिहासकालीन निर्मेळ कटु वा गोड सत्यांतून कोणती शिकवणूक घेऊन राष्ट्र जिवंत ठेवूं शकेल अशाच तऱ्हेचें विवेचन करणें व त्यायोगें जगांतील इतर राष्ट्रांप्रमाणें इतिहासाचें मुख्य कार्य व ध्येय कायम राखणें हीच 'राजवाडी' किंवा राष्ट्रीय इतिहासाची परंपरा होय. देशांत जागृति झाल्यानें साहजिकच याच परंपरेचें अधिकाधिक अनुकरण होत आहे. सारांश, यापुढें इतिहासलेखनकलेची कोणतीही जुनी परंपरा स्वीकारून चालणार नाहीं. स्वदेशाचा इतिहास स्वराष्ट्रोपयोगी असाच निपजला पाहिजे. परंतु नवीन परंपरा किंवा नवीन पद्धति स्वीकारावयाची तर उपलब्ध असलेल्या एकांगी व अपुऱ्या साधनांच्या साहाय्यानें संपूर्ण इतिहासाची निष्पत्ति होणें कठीण आहे. नवीन ऐतिहासिक साधनें उपलब्ध होण्याचा क्रम सारखा चालूच रहातो व इतिहासांत नवीन भर पडत रहाणें ती अव्याहत चालू राहाते, ही गोष्ट जरी खरी असली तरी सांप्रत उपलब्ध असलेलीं साधनें अगदींच अपुरीं आहेत. त्यामुळें सशास्त्र

इतिहासरचनेस ताबडतोब प्रारंभ होणें शक्य नाहीं. इतिहासरचनेसाठीं साधनसामुग्री जुळविण्याचेंच काम मोठ्या जोरानें झालें पाहिजे. या साधनांवरूनच इतिहासरचना करणें भाग पडेल. राष्ट्रीय इतिहासरचनेंत समकालीन साधनांवर आणि विशेषतः स्वकीय साधनांवरच भर ठेवणें प्राप्त आहे. तसेंच रचनेंत जी दृष्टि ठेवावयाची तीही आपलेपणाची असणें अत्यंत जरूर आहे.

कोणत्याही कार्यांत उपयुक्ततेवरून कार्य करण्याची दिशा जशी ठरविण्यांत येते त्याचप्रमाणें आपण पार पाडलेलें कार्य चिरस्वरूपाचें म्हणजे अमर असावें असाही एक कार्य करणाराचा मुख्य उद्देश असतो. या उद्देशानुरूप कार्य करण्याची दिशाही आंखून घ्यावी लागते. इतिहासाच्या उपयुक्ततेवरून इतिहासकारानें आपल्या इतिहासलेखनांत कोणती दृष्टि ठेवावी याचा आतां थोडक्यांत विचार झाला. इतिहास चिरस्वरूपाचा निर्माण व्हावा अशी जर इच्छा असेल तर तो शास्त्रशुद्ध असाच रचण्यांत आला पाहिजे याबद्दलचें विवेचन आलेंच आहे. तसेंच इतिहासाच्या रचनेसाठीं अभ्यास करतांना प्रथम साधनपरीक्षणाचा अभ्यास करणें जरूर आहे यांतही आतां शंका राहिली नाहीं. परंतु अभ्यास करितांना अभ्यासकाला तीन गोष्टींचें मुख्यतः ज्ञान करून घ्यावें लागतें. प्रथम साधननिष्पति कोणत्या क्षेत्रांत, स्वरूपांत व कितपत होऊं शकेल हें जाणलें पाहिजे. प्राप्त झालेल्या ऐतिहासिक साधनांचें बाह्यांगपरीक्षण करतां आलें पाहिजे. नंतर अंतरंगपरीक्षण करण्याची तयारी केली पाहिजे. अशा तऱ्हेनें साधनांचें परीक्षण करतां आलें म्हणजे मग इतिहासरचनेच्या पद्धतीचा अभ्यास करून इतिहासरचनेस सुरुवात करतां येईल. म्हणून प्रथम साधननिष्पत्ति व बाह्यांगपरीक्षण यांचाच विचार करूं. निरनिराळ्या प्रकारच्या साधनांत निरानिराळ्या तऱ्हेनें बाह्यांग परीक्षावें लागतें. अंतरंगपरीक्षणाचे नियमसामान्य असतात. म्हणून बाह्यांगपरीक्षणाचा विचार करितांना निरानिराळ्या प्रकारच्या साधनांसाठीं स्वतंत्र असा विचार करावा लागतो. परंतु येथें हेंही सांगून ठेवणें इष्ट आहे कीं, शिवशाहीच्या साधनांचें बाह्यांगपरीक्षण पूर्णपणें व निश्चयात्मक करतां येण्यासाठीं संपूर्ण नियमावलि तयार करण्याइतकीं विपुल साधनें उपलब्ध नाहींत.

## ८ साधनक्षेत्राची व्याप्ति

ऐतिहासिक साधनें किंवा इतिहासकालीन पुरावे यांच्याच प्रामाण्यावर इतिहासरचना अवलंबून असते. हीं साधनें इतिहासकालीन विचारांची व आचारांची माहिती सांगणारीं सूत्रें असतात. या साधनांच्या अभावीं मानवीशक्तीचा कित्येक शतकांचा इतिहास कालानें गडप करून टाकला आहे. कांहीं थोडाबहुत इतिहास अजूनही उपलब्ध होऊं शकेल. परंतु बराचसा इतिहास अज्ञातच राहील. प्राचीन इतिहासाप्रमाणें अर्वाचीन मराठ्यांचा इतिहास तितका अज्ञात न राहिला तरी त्यांतील कित्येक गोष्टींची साक्ष देणारीं साधनें कालानें आपल्या पोटांत घातलीं आहेत. प्रयत्नांच्या अभावीं अवशिष्ट साधनांतील बरीच साधनें नष्ट होण्याचा संभव आहे. म्हणून जीं साधनें उपलब्ध झालेलीं आहेत व जीं उपलब्ध होण्याचा संभव आहे तीं मिळवून त्यांची प्रथम जोपासना करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. उपलब्ध साधनांबद्दल पुढें उल्लेख येणारच आहे. गुरु० राजवाडे यांनीं मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें कोठें कोठें सांपडूं शकतील याचा आपल्या लेखांतून* वेळोवेळीं थोडाबहुत विचार केला आहे. तसेंच कै० पांडोबा षटवर्धन व श्री० आबा चांदोरकर यांनीं जीं संशोधनवृत्तें भारत इतिहास-मंडळांत सादर† केलीं त्यांत याबद्दल सूचना केलेल्या आहेत. प्रस्तुत प्रसंगी फक्त शिवशाहीकालीन व शिवशाहीचीं साधनें कोठकोठें उपलब्ध होऊं शकतील त्या क्षेत्राच्या व्याप्तीबद्दल विचार करावयाचा आहे.

साधनांच्या व्याप्तीच्या क्षेत्राबद्दल निश्चित अनुमान बांधण्यास इतिहासाच्या प्रसंगांची निदान रूपरेषा तरी माहीत असावी लागते. इतिहासाचे तपशील जसजसे प्रयत्नानें समजूं लागतात तसतशी साधनक्षेत्राची व्याप्ति वाढत जाते व क्षेत्रांतील ठिकाणांच्या बारीकसारीक तपशिलांचाही बोध होत जातो. मराठ्यांच्या इतिहासांतील कांहीं प्रसंग अज्ञात आहेत ही गोष्ट जरी खरी असली तरी मराठ्यांच्या इतिहासाची रूपरेषा ठरविण्याइतकी

* ऐतिहासिक प्रस्तावना—(राजवाडे-लेखसंग्रह भाग १ ला)-वि. का. राजवाडे यांच्या-संपादक चित्रशाळा प्रेस (१९२८).

† भारत इतिहास संशोधन मंडळाचे वार्षिक अहवाल व संमेलनवृत्तें.

सामुग्री उपलब्ध झाली आहे. त्यावरून या क्षेत्राची व्याप्ति ठोकळमानानें सांगतां येईल.

शहाजी व शिवशाहीच्या पूर्व कालाची मराठी व फारसी ऐतिहासिक साधनें विशेषतः विजापूर व पुणें-सुपें प्रांतीं मिळूं शकतील. शहाजीच्या नंतरच्या हालचाली विजापूर, बंगलूर, मदुरा वगैरे दक्षिण कर्नाटक प्रांतांत झाल्याकारणानें त्यांची माहिती तिकडेच सांपडेल. गोंबेकर पोर्तुगीज व कारोमांडल किनाऱ्यावरील परदेशीय (पोर्तुगीज, डच, इंग्रज व फ्रेंच) वखार-वाल्यांकडेही शहाजीच्या हालचालींच्या नोंदी आढळतील. शिवशाहीच्या इतिहासाला मावळांत सुरवात झाली म्हणून या पूर्व हालचालींचे समकालीन कागदपत्र पुणें-सुपें प्रांतांत व विशेषतः मावळांतच अधिक उपलब्ध होण्या-सारखे आहेत. शिवशाहीस सुरवात झाली तेव्हांचे म्हणजे शिवाजी स्वतंत्र म्हणून हालचाली करूं लागला त्या वेळचे कागदपत्र मावळाबाहेर जुन्नर प्रांतांत व विजापुरांतही सांपडणें साहजिक आहे. शिवाजीनें स्वतंत्र म्हणवून घेऊन मुलुखगिरीस प्रारंभ केला त्यापासूनचे कागदपत्र दक्षिण महाराष्ट्र, उत्तर कर्नाटक, कोंकण, गोवा, आग्रा, बऱ्हाणपूर, विजापुरकर व गोवळकोंडेकर यांच्या दरबारीं-दप्तरांत असावयास पाहिजेत. पोर्तुगीजांकडे शिवाजीचा व शिवाजी-च्या हालचालींबद्दल इतरांचा पत्रव्यवहार चालू होताच. इंग्रज व मराठे यांचा याच वेळीं शत्रुत्वाचा व मित्रत्वाचा प्रथम प्रसंग घडल्यामुळें इंग्रजांच्या सुरतेच्या व लंडनमधील दप्तरांत तत्कालीन साधनें सांपडलीं पाहिजेत. डच लोकांचीही कोंकणकिनाऱ्यावर व्यापार वाढविण्याची खटखट चालू होती. त्यांनीं वेंगुर्ल्यास वखारही काढली होती. त्यांच्याशींही मराठ्यांचा संबंध जडला होता. त्यामुळें बंटम, कारवार, वेंगुर्ला, सुरत व मद्रास सेंट थॉमस येथील दप्तरांत व तसेंच आम्स्टरडम व मिडलबर्ग येथील दप्तरांत तत्कालीन साधनें सांपडतील. मोगली दप्तरांतही शिवाजीच्या हालचाली नमूद होत होत्या. शिवाजीनें अफझल मारून विजापुरापर्यंतचा बराचसा मुलूख घेतला व शिद्दी जोहाराला चकवून शाहिस्ताखानाला शास्ता केली. म्हणून जयसिंगाला दक्षिणेंत यावें लागलें. या वेळेपासून शिवशाहीच्या साधनक्षेत्राचा विस्तार फार वाढला. कारण यानंतर शिवशाहीचा हिंदुस्थानांत वावरणाऱ्या सर्व सत्तांशीं संबंध जडला. या वेळेपासूनचीं तत्कालीन मराठी

व फारसी साधनें सर्व दक्षिण हिंदुस्थानांत व दिल्ली आग्रा येथें उपलब्ध होण्याचा संभव आहे. इंग्रज वखारवाले या वेळीं दक्षिण हिंदुस्थानांत व्यापारार्थ सर्वत्र वावरत होते. म्हणून सेंट थॉमस, मच्छलीपट्टण, हुगळी, बंटम, कारवार, हुबळी, मुंबई व सुरत येथील इंग्रजी दप्तरांत व इंग्लंड येथील इंग्रज कंपनींच्या दप्तरांत इंग्रजी भाषेंतील तत्कालीन वृत्तें, पत्रव्यवहार, वगैरे सांपडणें अगदीं साहाजिक आहे. गोवा व पश्चिम किनाऱ्यावर पोर्तुगीजांचें प्राबल्य होतें. म्हणून गोवा, दमण, चौल व वसई येथील पोर्तुगीज दप्तरांत व लिस्बनला पोर्तुगालच्या सरकारी दप्तरांत पोर्तुगीज भाषेंतील मराठ्यांच्या इतिहासास उपयुक्त अशी विपुल सामुग्री मिळेल. पश्चिम किनाऱ्यावरील व्यापार मिळविण्यासाठीं डच लोकांची बरीच धडपड चालली होती. त्यांचा व मराठ्यांचा पत्रव्यवहार त्यासंबंधांत झालेला आहे. त्यामुळें डच लोकांच्या बेंगुर्ला, सुरत, मद्रास व हॉलंडमधील डच कंपनींच्या भाषेंतच दप्तरांत डच बरीच माहिती मिळेल. याशिवाय फ्रेंच, इंग्रज, पोर्तुगीज, इटालिअन, डच, चिनी, आरब वगैरे लोकांनीं निरनिराळ्या वेळीं हिंदुस्थानांत प्रवास केला आहे. त्यांचीं प्रवासवृत्तें नुसत्याच राजकीय इतिहासास नव्हे तर सामाजिक व इतर इतिहासासही फार महत्त्वाचीं आहेत. संस्कृत व मराठी काव्यें, बखरी व फारसी अखबार हिंदुस्थानांत सर्वत्र आढळतात. अवघ्या समकालीन साधनसामुग्रीच्या क्षेत्राचीच इतकी मोठी व्याप्ति आहे. दुय्यम प्रकारचे इतिहासग्रंथ वगैरे इतर सर्वत्र सांपडतात.

इतिहासाच्या रूपरेषेवरून फार तर समकालीन साधन-सामुग्री तत्कालीं कोठें कोठें सांपडूं शकली असती हें समजतें. परंतु ती त्यानंतर कालाच्या ओघाबरोबर कोठें कोठें वाहात गेली असेल हें सांगतां येणार नाहीं. हें जाणण्याला या कालांतील साधन-सामुग्रीच्या संग्रहांचा व जोपासनेचा वगैरेंचा इतिहास शोधून काढावा लागतो. साधन-सामुग्रीच्या स्थलांतरास व नाशास अनेक कारणें होतात.

अ. मूळ संपादकांच्या कुटुंबांतील किंवा वंशजांतील विभक्तपणाच्या प्रसंगामुळें साधनांची पांगापांग होते.

आ. मूळ संपादकांच्या वंशजांच्या स्थलांतरानें साधनांचें स्थलांतर होतें.

इ. स्थावर इस्टेटींच्या गहाणविक्रीमुळें स्थलांतराबरोबर निराळ्याच घराण्यांत कागदसंग्रह जातो.

ई. सरकारी कागदपत्र राजधानीच्या अगर मुख्य ठिकाणीं जोपासण्यास नेले जातात.

उ. कित्येक वेळां कागदपत्र सरकारजमा करण्यांत आल्यानें स्थलांतर पावतात.

ऊ. इस्टेटींच्या बाबतींत पुरावा करण्यासाठीं अगर पुरावा नाहींसा करण्यासाठीं साधनें चोरीस गेल्यानें स्थलांतर पावतात.

ए. इतिहास-रचनेसाठीं जे व्यक्तिशः व सार्वजनिक स्वरूपाचे साधन-संग्रह करण्याचे प्रयत्न होतात त्यामुळें साधनांचें स्थलांतर होतें.

ऐ. संग्रह ज्या ठिकाणीं असतो त्या गृहाच्या नाशाबरोबर साधनें नाश पावतात.

ओ. वंशजास साधनांची उपयुक्तता नसली व तीं साधनें संग्रहित करण्याची अडचण भासूं लागली म्हणजे तीं अग्निवश केलीं जातात किंवा रद्दी म्हणून विकलीं गेल्यानें नाश पावतात.

औ. साधनांची जोपासना नीट न राहिली तर ती फाटून, किडून वगैरे नाश पावतात.

अं. सरकारी साधनें जोपासनेस लागणाऱ्या द्रव्याभावामुळें किंवा जागेच्या अडचणीमुळें कित्येक वेळां जाळली जातात व रद्दी म्हणून विकलींही जातात.

अः कित्येक वेळां महत्त्वाचा पुरावा नाहींसा करण्यासाठींही साधनांचा नाश केला जातो.

क. इतिहास-संग्राहकांच्या अनास्थेमुळें व त्यांचेमागें त्यांचे संग्रह व्यवस्थित राखण्याची योजना नसल्यामुळें साधनें नाश पावतात.

ख. इतिहास-संग्राहक युक्तायुक्ततेचा विचार करून—आणि त्यांत विशेषतः व्यक्तिशः कार्याचाच विचार होत असल्यानें—बरींच साधनें कायमचीं निकालांत काढतात.

साधनांच्या स्थलांतराचा इतिहास शोधून काढणें जड आहे. कारण व्यक्तिशः जे प्रयत्न होतात त्यांची नोंद करण्यांत येत नाहीं व पुढेंही करण्याचा योग येत नाहीं. सामाजिक स्वरूपाच्या प्रयत्नांत मात्र तसें नाहीं. यांत

साधनांच्या संपादनाच्या प्रयत्नांपासून तों थेट वर्तमानकालापर्यंतची परिस्थिति निदर्शनास आणणारे उल्लेख सांपडूं शकतात. परंतु या उल्लेखांपासून जो इतिहास काढावयाचा तो काढण्याइतकी या उल्लेखांची अगर साधनांची जुळणी केलेली नसते. म्हणून साधनांच्या स्थलांतराचा इतिहास फारसा उपलब्ध नसतो. आणि हा इतिहास अवगत झाल्याशिवाय साधनक्षेत्राची व्याप्ति बरोबर समजत नाहीं. जेथें साधनें असावींत म्हणून वाटतें तेथून तीं साधनें पूर्वीच निघून गेलेलीं असतात. इतिहाससंशोधकाला किंवा संग्राहकाला साधनक्षेत्राची व्याप्ति समजणें जरूर असतें. म्हणून त्याला या सामाजिकसंग्रहांतील साधनांचा जितका इतिहास उपलब्ध होईल तितकी तो इतिहासांत प्रगति करूं शकेल. म्हणून ही अडचण दूर करणें जरूर आहे.

महाराष्ट्रांत ऐतिहासिक साधनें गोळा करण्याचें काम बऱ्याच वर्षांपासून सुरू झालेलें आहे. युरोपीय लोकांनीं केलेले संग्रह बहुधा कोणत्याना कोणत्या तरी संस्थेच्या संरक्षणाखालीं गेलेले आहेत. परंतु यांपैकीं कांहीं संस्था नामशेष होऊन गेल्या आहेत. जो संग्रह संस्थांकडे गेला नाहीं तो नाहींसा झाला नसला तरी त्याचा पत्ता लागणें मोठें कठीण आहे. कांहीं संस्थानाधिपतींनीं जमविलेले संग्रह सार्वजनिक उपयोगासाठीं व्यवस्थित ठेविले आहेत. बरींच साधनें सरकारी संग्रहालयांत सामील झालेलीं आहेत. यांशिवाय व्यक्तिशः कांहीं संग्रह झाले आहेत. महाराष्ट्रांतील साधनें बरींच 'इंडिया ऑफीस' व 'ब्रिटिश म्युझिअम'मध्यें गेलीं आहेत. एलिनिएशन दप्तर, भारत-इतिहास-संशोधक मंडळ, पारसनीस-संग्रह, सत्कार्योत्तेजक सभेचा संग्रह, राजवाडेसंग्रह, व निरनिराळ्या संस्थानांतील दप्तरखान्यांत बऱ्याच साधनांचा समावेश केला गेला आहे. यांशिवाय व्यक्तिशः कांहीं संग्रह झाले आहेत ते निराळेच. या सर्व संग्रहांत सामील झालेल्या साधनांच्या मूळ ठिकाणांच्या याद्या तयार झाल्या पाहिजेत. या संग्रहालयांतील वस्तूंचीं व कागदपत्रांचीं फेरिस्तें तयार केलीं पाहिजेत. असें न झालें तर या व्यक्तिशः अगर सामाजिक संग्रहांचा मुळींच उपयोग होणार नाहीं. ह्या संग्रहांची व्याप्ति फार मोठी आहे. त्यामुळें कोणी कितीही कष्टाळू इतिहासलेखक असला तरी या संग्रहांचा उपयोग करणें शक्य नाहीं. या संग्रहांच्या याद्या व फेरिस्तें तयार नसल्यामुळें जो एखाद्या घराण्याच्या नांवापत्त्यावरून एखाद्या ऐतिहासिक प्रसंगा-

च्या माहितीचा शोध लवकर घेतां येणें सहज साध्य होतें तें आतां जड जातें. परंतु संग्राहकाला आपल्या संग्रहाचें फेरिस्तें करण्यास अनेक कारणानें सवड नसते. कोणी हौशी अभ्यासू तें काम हातीं धरील तर तीही फारशी आशा नसते. इतकेंच नव्हे तर निरनिराळ्या ऐतिहासिक प्रसंगांवर जे अनेक प्रयत्न झालेले आहेत त्यांचीही जंत्री उपलब्ध नसल्याकारणानें बरेच वेळां त्याच त्या प्रश्नावर अभ्यासूंच्या कालाचा व्यय होतो.

संग्रहांतील वस्तूंची अगर साधनांची यादी किंवा विषयवार फेरिस्तें करणें अथवा निरनिराळ्या प्रयत्नांचें एकीकरण करून द्विरुक्ति टाळणें हें काम कोणालाच फारसें आवडण्यासारखें नसतें. याचें कारण असें कीं, अशा कामाचा मोबदला द्रव्यरूपानें अगर कीर्तिरूपानें जनतेकडून मिळण्याची फारशी आशा नसते. उलट हें काम फारच मेहेनतीचें व त्रासदायक असतें. खरें म्हटलें तर अशा तऱ्हेचें फेरिस्तें करण्याचें काम सरकारनेंच मनावर घेतलें पाहिजे. असलें काम भाडोत्री माणसांकडून होऊं शकेल. पोटासाठीं कोणीही अभ्यासू हें काम करण्यास तयार होईल. प्रत्येक सरकार आपापल्या राज्यांत भाषेच्या व कलाशास्त्रांच्या उत्तेजनासाठीं थोडाबहुत खर्च करतेंच. परंतु हा खर्च बक्षिसें देण्याकडे होत असतो. असें न करितां फेरिस्तें वगैरेसारख्या कार्याला मदत करून जनतेचें पाऊल पुढें टाकण्याचा हा चोख मार्ग स्वीकारला तर खात्रीनें देशाचें कल्याण होईल. असल्या कार्याची विशेष जरूर आहे. इतिहासांत तर असल्या फेरिस्त्यांची अत्यंत जरूर आहे. बरीच मेहनत घेऊन साधनांचा संग्रह केलेला असून फेरिस्त्यांच्या अभावीं त्यांचा उपयोग करतां येणें दुरापास्त झालें आहे. ऑर्म किंवा मॅकेनझी देशी साधनांचें कलेक्शन घ्या, भारत-इतिहास-मंडळांतील संग्रह घ्या, पारसनीस अथवा राजवाडेसंग्रह घ्या, या सर्व संग्रहांचा उपयोग करणें मुष्किलीचें झालें आहे. या सर्व संग्रहांचीं फेरिस्तें झाल्याशिवाय त्यांचा उपयोग करतां येणें शक्य नाहीं व असल्या मोठ्या व वाढत्या संग्रहांचें तपशीलवार वगैरे फेरिस्तें करणें दरिद्री संस्थांच्या आंवाक्यांतील नाहीं. यासाठीं या कामास सार्वत्रिक स्वरूपाची म्हणजे सरकारीच मदत होणें जरूर आहे. अशी मदत सरकारनें केल्यास ती अधिक सयुक्तिक होईल. पुण्याचें एलिनिएशन दप्तर घ्या. या संग्रहांत हजारों साधनें अगदीं उपयुक्त असूनही फेरिस्त्यांच्या अभावीं

उपयोगांत आणलीं जात नाहींत. असे संग्रह तपासण्याचे प्रत्येक अभ्यासूनें वेगवेगळे प्रयत्न केले तर सर्वांच्याच कालाचा व्यय होईल व इतिहासाची प्रगति मंदगति राहील.

साधनप्राप्ति करून घेणें हें इतिहास-संशोधकाचें मुख्य उद्दिष्ट असतें. हें उद्दिष्ट साधण्यास सर्वांचा इतिहासाकडे ओढा लागेल असेच प्रयत्न करावे लागतात. साधनांच्या संग्रहाचा पत्ता लागला म्हणजे कार्यभाग साधत नाहीं. साधनें प्राप्त करून घेण्यास कांहीं व्यावहारिक गोष्टींचें ज्ञान असावें लागतें. इतिहासाच्या सार्वजनिक कामाच्या नांवाखालीं कोणाला जुलुमजबरदस्ती सांगून चालत नाहीं. संग्राहकांच्या किंवा संशोधकांच्या प्रामाणिकपणाच्या कसोटीकडे धूर्ततेनें पाहण्याची लोकांत प्रवृत्ति असते. त्या कसोटीला एखाद्यानेच उतरून चालत नाहीं तर सामान्यपणें तशी वागणूक सर्वांनाच ठेवावी लागते. लोकांचा संशोधकावरील भरंवसा उडाला म्हणजे कितीही सचोटीचा माणूस असला तरी त्याचेवर विश्वास बसत नाहीं. सारांश, साधनांची प्राप्ति करून घेतांना सावधगिरी बाळगिली तर साधनांची प्राप्ति करून घेणें फारसें कठीण जात नाहीं.

## ९ साधन-मीमांसा

ऐतिहासिक साधनें प्राप्त करून घेतलीं म्हणजे तीं उपयोगांत तशींच सहज आणतां येतात अशांतला भाग नाहीं. तीं उपयोगांत आणण्यासाठीं त्यांचें परीक्षण करावें लागतें. त्या साधनांत उपलब्ध होणारी माहिती नवीन आहे किंवा काय, त्या माहितीनें एखादी अनिश्चित गोष्ट निश्चित होऊं शकेल किंवा कसें, उपलब्ध होणारी माहिती इतिहासकालांतील कोणत्या विवक्षित स्थळीं व प्रसंगीं अधिष्ठित होणारी आहे वगैरे बाबींचें ज्ञान करून घेण्याकरितां संशोधकाला पुष्कळशी पूर्व-तयारी करणें जरूर असतें. ज्या कालाचें संशोधन करावयाचें त्या कालाच्या उपलब्ध इतिहासाचें संपूर्ण ज्ञान असणें आवश्यक असतें. ज्या देशाच्या इतिहासाचें संशोधन करावयाचें त्या देशाच्या भूगोलाचें व विशेषतः भूतकालीन भूगोलाचें ज्ञान करून घ्यावें लागतें. ज्या लोकांचा इतिहास रचावयाचा त्या लोकांच्या भूतकालीन व वर्तमानकालीन रीतिरिवाजांचे, स्वभावांचें वगैरे उपलब्ध ज्ञान उत्तम

असलें पाहिजे. अशा तऱ्हेची सामान्य माहिती करून घेतल्यानंतर साधनें ज्या लिपींत लिहिलीं गेलीं असतील त्या लिपीचें वर्तमानकालीन व भूत-कालीन स्वरूप चांगलें अभ्यासिलें पाहिजे. तसेंच ज्या भाषेंत तीं साधनें लिहिलीं गेलीं असतील त्या भाषेचें वर्तमानकालीन व तसेंच इतिहास-कालीन स्वरूप जाणलें पाहिजे. तत्कालीन भाषेचें व्याकरण, संप्रदाय, लिहिण्यांतील संक्षिप्तांचे वगैरे परिपाठ, लेखनपद्धति, लेखनप्रशस्ति वगैरेंचें ज्ञान प्रथम करून घेतलें पाहिजे. सारांश, इतिहासकालीन सर्वांगीण परिस्थितीचें उत्तम ज्ञान करून घेतल्याशिवाय साधनांचा उपयोग करूं म्हटलें तर जमणार नाहीं. या पूर्व तयारीशिवाय केलेले साधनचिकित्सेचे प्रयत्न सदोष राहिले आहेत. या पूर्व-तयारीनें बहिरंग तपासतां येतें.

एखाद्या साधनाचें बहिरंग तपासलें व त्या साधनांत उपलब्ध झालेली माहिती एखाद्या निश्चित स्थळीं इतिहासांत बसवितां आली म्हणजे इतिहासकाराचें कार्य संपत नाहीं. त्या साधनाचें अंतरंग परीक्षणें जरूर असतें. कोणत्याही इतिहासकालीन-प्रसंगाचीं दोन स्वरूपें असणें शक्य नसतें. त्या प्रसंगाचें स्वरूप एकच असावयाचें. परंतु संशोधनांत असे पुष्कळ प्रसंग आढळलील कीं, एकाच गोष्टींचीं भिन्नभिन्न स्वरूपें वर्णिलेलीं असतील व त्यांतील तपशील परस्परविरोधीही असतील. अर्थात् या दोन्हीही गोष्टी संभवणार नाहींत. त्यांतील एक असत्य किंवा वस्तुस्थितीस सोडून अगर विपर्यस्त असली पाहिजे. म्हणून नुसती इतिहासकालीन माहिती मिळाली आहे तेव्हां ती ग्राह्य धरलीच पाहिजे असें नाहीं. अशा माहितीचें परीक्षण करून तिच्यांतील सत्यासत्यतेचा निर्णय लावला पाहिजे. परंतु अमुक एका साधनांतील मजकूर खरा अगर खोटा आहे हें सांगणारा दुसरा तत्कालीन तोंडी अगर लेखी साक्षीदार मिळणें कठीण असतें. क्वचित् प्रसंगीं असा योग घडून येतो. परंतु नेहमींच साधनांतील मजकूर तपासण्याचें प्रत्यक्ष साधन उपलब्ध नसतें. म्हणून साधनांचें परीक्षण करण्याचे अन्य मार्ग स्वीकारावे लागतात. इतिहासांतील कोणतीही साक्षीदार निखालसपणें निर्भेळ व निर्लेप सत्यपरिस्थिति सांगणारा मिळेलच असें समजून चालत नाहीं. साक्षीदार किती विश्वासार्ह आहे याचेंच परीक्षण करावयाचें असतें. असें परीक्षण करितांना साक्षीदाराची योग्यता, त्याला प्रत्यक्ष माहिती असण्याचा संभव, त्याची

तें साधन लिहिण्याबेळची मनःस्थिति वगैरेचा विचार करावा लागतो. अशा तऱ्हेनें साधनांची फेरतपासणी करणें याला अंतरंगपरीक्षण असें म्हणतात.

एखाद्या साधनाचें बहिरंग व अंतरंग तपासलें म्हणजे त्या साधनाच्या सत्यासत्यतेचा व त्यांतील माहितीच्या तथ्यातथ्यतेचा निर्णय करितां येईल. परंतु ऐतिहासिक साधनांच्या उपयोगांत आणखी एक अडचण येत असते. ऐतिहासिक साधनांत कित्येक समकालीन असतात व कित्येक असमकालीन असतात. त्या साधनांतील उल्लेख तत्कालीन समजुतीचे निदर्शक असतात. एखाद्या असमकालीन साधनांत तत्पूर्वी घडलेल्या प्रसंगाचा चुकीचा उल्लेख त्या वेळच्या प्रचलित समजुतीप्रमाणें कदाचित् बिनचूकही असेल. परंतु अशा वेळीं केवळ बहिरंग व अंतरंग तपासणीवर भागत नाहीं. प्रत्येक साधनाचा समकालीन व असमकालीन यांसारखा दर्जा प्रथम ठरविणें भाग पडतें. कारण इतिहासरचनेंत विशेषतः समकालीन समजुती एकत्रित करण्याचा मुख्य उद्देश असतो. परंतु समकालीन पुरेसे पुरावे उपलब्ध होणें शक्य नसतें म्हणून असमकालीन पुराव्यांचाही इतिहासांत उपयोग करावा लागतो. समकालीन पुरावा असमकालीन पुराव्यांपेक्षां तत्कालीन परिस्थितीचें अधिक विश्वसनीय वर्णन देणारा असतो असा नियम आहे. म्हणून साधनांचें बहिरंग व अंतरंग तपासण्यापूर्वी संशोधकाला साधनांची विश्वसनीयता ओळखण्यासाठीं त्यांचा दर्जा कोणता हें प्रथम जाणतां आलें पाहिजे. हें जाणण्यास कांहीं सामान्य नियम सांगतां येतील; परंतु प्रत्येक वेळीं सारासार विचाराची जोड देणें अवश्यच असतें.

इतिहासांतील कोणत्याही प्रसंगाची तत्संबद्ध माणसांनीं लिहून ठेवलेलीं समकालीन अस्सल साधनें श्रेष्ठ होत. विशेषतः असल्या साधनांचें लिखाण जर राजकीय अगर सरकारी अधिकाऱ्यांच्या हातचें असेल किंवा त्यांच्या संमतीनें केलेलें असेल तर तें अव्वल दर्जाचें मानावें. अशा समकालीन साधनांत निकटसंबंध नसलेल्या एखाद्या माणसानें समकालीन ऐतिहासिक प्रसंगाचा उल्लेख केला असेल व ती त्याची माहिती प्रत्यक्ष पाहिलेली नसून ऐकीव असेल तर तें साधन जरी महत्त्वाचें असलें तरी त्यांत थोडीशी सरभेसळ असण्याचा संभव असतो. अशा साधनावरून तत्कालीन लोकापवादाची मात्र अव्वल दर्जाची माहिती मिळते. अशा समकालीन साधनांतील

सरमेसळीचें प्रमाण ती माहिती लिहिणाऱ्याच्या पात्रापात्रतेवर अवलंबून राहतें. अशी माहिती देणाऱ्याच्या हेतूकडे विशेष लक्ष पुरवून तपासणी केली म्हणजे त्या ऐतिहासिक प्रसंगाच्या उल्लेखांत शिरलेली सरमेसळ काढून टाकतां येते. दुय्यम प्रकारच्या साधनांत कांहीं वर्षांनीं तयार केलेल्या अस्सल लिखाणांत जे अस्सल समकालीन पुराव्यांवरून भूतकालीन प्रसंगांचे उल्लेख केलेले असतात व ज्याला गोतमुखें किंवा सरकारी अधिकाऱ्यांकडून संमती मिळालेली असते अशा लेखांचा समावेश होतो. ज्या अस्सल साधनांत परंपरेची परंतु संबद्ध माणसांनीं जुनी ऐतिहासिक माहिती दिलेली असते तीं तिसऱ्या दर्जाचीं साधनें होत. अशा साधनांतील प्रामाण्याची सरसनिरसता परंपरेवर व कालावधीच्या कमीअधिक प्रमाणावर अवलंबून राहते. परंतु ऐकीव माहिती मिळवून असंबद्ध माणसानें तयार केलेलीं लिखाणें चतुर्थ दर्जात जातात. यांतील सरसनिरसता तृतीय दर्जाच्या साधनां-प्रमाणेंच कालावधीच्या कमीअधिक प्रमाणावर अवलंबून असते. अशा लिखाणांत लिहिणारास जी निरनिराळ्या तऱ्हेनें ऐकीव माहिती मिळते त्या माहितींतील विविधतेमुळें लिहिणाराचा बराच गोंधळ उडालेला असतो. कालनिर्देशांत हटकून चुका असतात व प्रसंगांची संगति निर्दोष राहूं शकत नाहीं. या चारही प्रकारच्या साधनांत अस्सल, मसुदा व नक्कल असे तीन पोटभेद आहेत. मसुद्यांत अस्सल कागदपत्रांतील पूर्णत्व नसण्याचा क्वचित् संभव असतो. तसेंच नकलेंत नकलकाराचे हस्तदोष, वाचनदोष व हेतुपूर्ण शोध घातलेले असण्याचाही संभव असून नकलेचें प्रामाण्य नकलकारावर सोंपवावें लागतें. सारांश, अस्सल कागद व मसुदे निर्भयपणे उपयोगांत आणतां येतात. नकलांची मात्र त्यांतील प्रत्येक भागाचें पूर्ण व सूक्ष्म परीक्षण करून तपासणी करावी लागते. अशी तपासणी केल्याशिवाय त्या जमेसच धरितां येत नाहींत. अशा प्रकारें ऐतिहासिक साधनांचा दर्जा ठोकळमानानें बारा तऱ्हांनीं ठरवावा लागतो.

साधन अस्सल असलें काय किंवा नक्कल असलें काय त्याच्या प्रामाण्या-प्रामाण्यतेविषयींची कसोटी लावून पाहणें नेहमीं जरूर असतें. लिहिण्याची पद्धति, अक्षरांचें वळण, कागद व शाई यांचा जुनाटपणा हे ऐतिहासिक लिखाणाचे काल दर्शविणारे सामान्य प्रकार होत. त्या लिखाणांची सत्यता

शोधण्यासाठीं निरनिराळ्या कसोट्या लावाव्या लागतात. युरोपीय साधनांच्या अस्सलपणाची खात्री करून घेणें त्यांच्या लेखनपद्धतीमुळें सोपें जातें. साधनाखालील साधनलेखकाची सही पडताळून पाहिली म्हणजे कार्य भागतें. त्यामुळें युरोपीय साधनांच्या सत्यासत्यतेबद्दल फारसा वाद माजण्याचें कारण रहात नाहीं. तसेंच संवयीमुळें किंवा त्यांच्या प्रघातामुळें लेखक लेखनकालाचा जसा अचूक निर्देश करतो तसाच तो लेखनांतील तपशिलालाही शक्य तितक्या ठिकाणीं कालानें मर्यादित करीत असतो. परंतु हिंदी लेखनपद्धति अगदीं भिन्न असल्यानें साधनांच्या अस्सलपणाबद्दल खात्री देणें फार कठीण जातें. या साधनांचा अस्सलपणा ठरविण्यासाठीं त्यांचे परीक्षण करावें लागतें. हें परीक्षण निरनिराळें व अप्रत्यक्ष अशा प्रकारच्या ताळ्यांनीं पडताळून करणें भाग पडतें. परंतु हे मार्गही तितके सोपे व निश्चित स्वरूपाचे नाहींत. एखादा कागद जर कालनिदर्शकपरीक्षेंत उतरत असेल व त्यावर असलेला शिक्कामोर्तब वगैरे बरोबर असेल तर त्या कागदाच्या प्रामाण्याबद्दल फारसा वाद राहणार नाहीं. परंतु अशा शिक्क्यामोर्तबाच्या अभावीं त्या कागदाचें अंतरंगपरीक्षण करून व त्यांतील तपशील तपासून नंतर त्याच्या प्रामाण्याबद्दल निर्णय करावा लागतो. युरोपीय पद्धतीप्रमाणें एतद्देशीय साधनपत्रांत स्वदस्तुरची सही करण्याचा रिवाज नव्हता; त्यामुळें तें पत्र खास संमतीनें लिहिलें आहे कीं तें नक्कल आहे, याबद्दल शंका येणें साहाजिक असतें. खासगी पत्रव्यवहारांत ह्या शंकेचें निरसन करण्याइतका इतर पुरावा उपलब्ध नसतो. परंतु अशीं व्यक्तिविषयक पत्रें बनावट असण्याचाही फारसा संभव नसतो. राजकीय किंवा सरकारी पत्रें बनावट असण्याचा बराच संभव असतो. परंतु अशा पत्रांच्या प्रामाण्याबद्दल शंका राहूं नये म्हणून कांहीं सरकारी दंडक घातले गेले होते. सरकारी पत्रांवर शिक्कामोर्तब न झाला किंवा तो पत्रव्यवहार दंडकाप्रमाणें शिक्कामोर्तबाच्या योग्य नसला तरी त्यावर सरकारी अधिकारी पत्राचे शेवटीं वगैरे आपल्या हातानें 'बहुत काय लिहिणें', 'बार', 'सूद' वगैरे सारखे दंडक करीत. परंतु तीं दंडकाचीं अक्षरें खास अधिकाऱ्यांचींच आहेत किंवा नाहींत हें आज ओळखण्याला मात्र आपणांस तेवढी सोय नाहीं. त्यामुळें ही कसोटीही फार थोड्या वेळीं लावतां येते. अशा परिस्थितींत हिंदूंची विविध लेखन-पद्धति व विशेषतः शक, सन, तिथि,

वार, मिति, तारीख, वगैरे लिहिण्याची चाल हेंच काय तें कसोटी लावण्याचें मुख्य साधन बाकी राहातें. नुसत्या मुसलमानी म्हणजे हिजरी किंवा फसली तारीख लिहिण्यानें ताळा पाहतां येत नाहीं. ताळा पाहण्यास हिंदी तिथि-वार देण्याची पद्धति किंवा हिंदी व मुसलमानी दोन्हीही पद्धतींनीं तारीख लिहिण्याची पद्धत सोईची पडते. हिंदी तिथि-वार ठरविण्याचें कोष्टक सरळ नसून बरेंच भानगडीचें आहे. त्यांतील तिथि-वारांचे वारीकसारीक भेद कांहीं कालानंतर नेमके सांगतां येणें फारसें सोपें नाहीं. पंचांगादि साधनांच्या अभावीं तिथि-वारासकट एखाद्या पत्राला नेमकी तारीख देणें कठीण आहे. त्यामुळें बनावट पत्रांत आणि विशेषतः मागाहून तयार केलेल्या बनावट पत्रांत तर असल्या चुका हटकून होत. खरे जंत्री व पिलेची तपशीलवार जंत्री होईपर्यंत ज्योतिष-गणिताची सुलभ-पद्धति तयार केलेली असूनही व हें गणित करण्याची पूर्ण माहिती उपलब्ध असतांना सुद्धां चांगल्या तज्ज्ञ माणसांकडून तात्पुरतें गणित करण्यांत चुका झाल्या आहेत. वाडच्या राजनिशींत किंवा राजवाडे खंडांतही अशीं उदाहरणें सांपडतात. त्यांत राजवाडे व वाड यांनीं काढलेल्या तिथीत वगैरे जंत्रीप्रमाणें तपासल्यास चुका आढळतात. सारांश, हिंदी तिथि-वारांचें तात्पुरतें गणित बरोबर येणें कठीण पडतें. तेव्हां या तिथि-वारांच्या परीक्षेंत जर एखाद कागद उतरेल तर त्या कागदाला समकालीन लेखण्यास फारशी हरकत राहात नाहीं. परंतु या तिथि-वार-शक-संवत्सरांच्या कसोट्या एखाद्या साधनास लावत येत नसतील तर त्या साधनांतील मजकुराच्या सुसंगतीचें प्रमाण नामनिर्देशांतील बिनचुकता व इतर बारीकसारीक भेदाभेद यावर अवलंबून राहील कागद जर समकालीन व अस्सल असेल तर त्यांतील मजकुराच्या प्रामाण्याबद्दल शंका घेण्याचें कारण नसतें. परंतु तो जर नक्कल असेल त स्याचें परीक्षण अशा स्थितींत अनिश्चित राहतें.

येथपर्यंत साधन-परीक्षणाचा सामान्यपणें विचार झाला. यापुढे निर निराळ्या साधनांचा तपशीलवार विचार करणें प्राप्त आहे. बहिरंगपरीक्षणा विचार करितांना प्रत्येक जातीच्या साधनांचा स्वतंत्र विचार करावा लागेल अंतरंग-परीक्षणाचे सामान्य नियम सर्व जातींच्या साधनांत सारखेच असतात

## १० साधनें

शिवशाहीच्या साधनांचा तपशिलवार विचार करतांना त्या साधनांचे भाषाबार भाग पाडावे लागतात. कारण तसे भाग पाडणें लेखनपद्धतीच्या व राजकीय संबंधांच्या दृष्टीनें फार सोईचें आहे. महाराष्ट्रीय साधनांचे भाषाबार विभाग पुढीलप्रमाणें पाडले जातातः—

अ. परदेशीय साधनें–

१ इंग्रजी
२ डच
३ पोर्तुगीज
४ फ्रेंच व इतर युरोपीय साधनें.

आ. स्वदेशीय साधनें—

१ संस्कृत
२ फारसी
३ हिंदी व इतर स्वदेशीय साधनें.
४ मराठी

या भागांतील मराठी साधनांचे आणखीही पोटविभाग पाडणें अभ्यासाच्या दृष्टीनें सोईचें आहे.

मराठी साधनें

१ सनदा, पत्रें
२ जमाखर्च
३ महजर, करीने, पुरशिसी वगैरे
४ शकावल्या
५ कूळकटी, वंशवेल, टिपणें, इ०
६ बखरी
७ पोवाडे व काव्यें
८ ऐतिहासिक म्हणी व वाङ्मय.

यांशिवाय नाणीं, शिलालेख, चित्रें, वगैरे साधनांचा स्वतंत्रच विचार करावा लागेल. यावरून शिवशाहीचा इतिहास अभ्यासणाऱ्याला निदान चार पर-

देशीय व चार स्वदेशीय म्हणजे आठ भाषांचें ज्ञान असलें पाहिजे. शिवाय चार लिप्या माहिती असाव्या लागतात. यांशिवाय ऊर्दू, कानडी, वगैरे दक्षिण हिंदुस्थानांतील भाषा, कोंकणी, भिल्ली, गुजराती, वगैरेही स्वदेशीय भाषांत साधनें उपलब्ध होत असल्यानें त्याही भाषा जाणणें जरूर होतें. कित्येक संस्कृत ग्रंथ तामील लिपींत लिहिलेले आहेत. मराठी शब्दयोजनेंत बरेच वेळां कर्नाटकाच्या संबंधामुळें कानडी शब्द येतात. दक्षिण कर्नाटकांतील कारभाराचें ज्ञान करून घेण्यास तेलगू व कानडी भाषांचा फार उपयोग होईल. परंतु या भाषा व या भाषेंतील साधनें प्रस्तुत लेखकाला अवगत नसल्यानें त्या भाषेंतिल साधनांवर स्वतंत्रपणें विचार करण्याचें सोडलें आहे. महाराष्ट्राच्या इतिहासाला जी मोठी अडचण येते ती हीच कीं, महाराष्ट्राच्या इतिहासाचीं साधनें विविध भाषेंत विविध प्रवृत्तींच्या व संस्कृतींच्या माणसांनीं लिहून ठेवलेलीं आहेत. या विविधतेमुळें निर्णायकाला निर्णयात्मक लिहिणें जड जातें.

## ११ परदेशीय साधनें-इंग्रजी

परदेशीय भाषेमध्यें महाराष्ट्राच्या इतिहासास उपयुक्त अशीं साधनें बरींच उपलब्ध आहेत. यांतील बहुतेक समकालीन असल्यानें तीं महत्त्वाचीं आहेत. मराठ्यांच्या इतिहासाच्या परभाषीय व परदेशीय साधनांत मुख्यतः इंग्रज, डच व पोर्तुगीज लोकांच्या साधनांचा अधिक भरणा आहे. इंग्रजी ही आतां आपली राजभाषा झाली असल्यामुळें या भाषेंतील साधनांचें वाचन आपणांस फारसें कठीण जाणार नाहीं. तसेंच इंग्रजी साम्राज्याच्या विस्तारामुळें कित्येक परभाषीय साधनग्रंथ वगैरे आपणांस इंग्रजींत भाषांतरित केलेले मिळतात. त्यामुळें इंग्रजींतील ऐतिहासिक साधनांचा संग्रह फार मोठा झाला आहे. खास इंग्रजांचा इंग्रजींतील पत्रव्यवहार वगैरे कांहीं कमी नाहीं.

इंग्रजांनीं इ० सन १७व्या शतकाच्या प्रारंभीं सर टॉमस रो याच्या नेतृत्वाखालीं हिंदुस्थानाशीं पद्धतशीर व्यापार करण्यास सुरुवात केली. इंग्रजांचा मुख्य संबंध प्रथम मोगलांशीं जडला. पश्चिम किनाऱ्यावर बाटेनें ते मंगलूर व दाभोळ येथें उतरत. परंतु ते बाटसरू म्हणून तेथें उतरत. त्यांचें

मुख्य ठाणें सुरतेला होतें. त्यांनीं मद्रास व इराण येथेंही लवकरच ठाणें दिलें. इ. सन १६२८ नंतर इंग्रजांचा कोंकणपट्टींत थोडासा शिरकाव झाला. इ. सन १६५४ पर्यंत ते व्यापारी या नात्यानें दाभोळ व राजापूर येथें रहात. यानंतर इंग्रजांचा संबंध दक्षिणेंतील शाह्यांशीं जडला. राजापूर, कोल्हापूर, हुबळी, अथणी, रायबाग, कारवार वगैरे ठिकाणींही त्यांचा मुक्काम होऊं लागला. बऱ्हाणपूर, धरणगांव व चोपडा येथेंही इंग्रजांनीं आपल्या लहान लहान वखारी उघडल्या होत्या. त्यामुळें या सर्व ठिकाणांहून या व्यापाऱ्यांनीं जीं जीं पत्रें आपल्या अध्यक्षाला अगर इतर मित्रमंडळींना लिहिलीं त्यांत ते स्थानिक माहिती देत. परंतु त्यांतील बरीचशी माहिती केवळ ऐकीव अशीच असे. इ. सन १६६१ पर्यंत इंग्रजांनीं हिंदुस्थानांत कायमचें स्वतंत्र ठाणें देण्याची तयारी केली व त्यांनीं मुंबईला आपली स्वतंत्र अशी स्थापना करून घेतली. यानंतर महाराष्ट्र व कर्नाटक या प्रांतांतील राजेरजवाड्यांशीं जे इंग्रजांचे संबंध जडले, त्यांत केवळ व्यापार हाच अर्थ राहिला नव्हता. यानंतर इंग्रजांच्या पत्रव्यवहाराला थोडथोडें राजकीय स्वरूप येऊं लागलें. मुद्दाम लोक पाठवून ते 'बंडखोर' शिवाजीची हकीकत आणवूं लागले. त्याच्या हालचालींचे अहवाल सुरत येथील आपल्या अध्यक्षास पाठवूं लागले. शिवाजी आग्र्याहून परत आल्यानंतर ते त्याला 'बडा बंडखोर' म्हणून संबोधूं लागले. त्याच्या अगदीं बारीकसारीक बातम्या आणण्यासाठीं पगारी हेर ठेवूं लागले. मुंबईप्रमाणेंच कारवार येथील इंग्रज वखारवाल्यांना बातमी आणवण्याचें काम करावें लागे. अशा प्रकारें मिळविलेली सर्व हकीकत सुरतेला ठराविक वेळीं जाहीर करूं लागले. शिवाजीच्या राज्याभिषेकाच्या सुमारापासून शिवाजीला ते 'राजे' म्हणूं लागले व शिवाजीच्या कारभाराची अगदीं इत्थंभूत हकीकत मिळवीत. शिवाजी 'राजे' यांच्याशीं बोलणीं लावीत. नंतर संभाजी व त्यानंतरच्या अमदानींत इंग्रज स्वतंत्र सत्ताधारी म्हणून मराठ्यांशीं तहादिक करीत. या सर्व उत्तर कालांतील पत्रव्यवहारांत इ. सन १६६१च्या पूर्वीच्या पत्रव्यवहारासारख्या तटस्थपणाची वृत्ति दिसून येणार नाहीं. या कालाच्या इंग्रजी साधनांत वखारवाल्यांच्या खासगी पत्रव्यवहाराशिवाय स्थानिक व हिंदुस्थानांतील इतर भागांतील परिस्थितीतीचें वर्णन देणारे अहवाल उपलब्ध होतील. प्रत्येक वखारींत बारानशी व रोजनिशी

ठेवली जात असे. रोजनिशींत रोजची माहिती दिली असल्यानें ती फार महत्त्वाची आहे. बारनिशींत फारसी, मराठी, इंग्रजी वगैरे पत्रांचे इंग्रजींत आवक-जावक नोंदले जात. या बारनिशींत एकत्र परंतु सारांशरूपांत पत्रव्यवहार मिळण्याचा संभव आहे. अशा रोजनिशा व बारनिशा सर्व वखारींत ठेवल्या जात. त्यामुळें स्थानिक माहिती देणारे बरेच उल्लेख यांत मिळतील. तहनामे व याद्या यांचाही बराच भरणा सांपडेल. सतराव्या शतकांत इंग्रज, डच आणि पोर्तुगीज यांचें वांकडें आल्यानें इंग्रजांना स्थानिक लोकांची वगैरे मदत घ्यावी लागे. त्यामुळें त्यांच्या व इतर हिंदी सत्ताधाऱ्यांशीं याद्या, तहनामे, ठराव वगैरे बरेच होत. त्याचप्रमाणें इंग्रज वखारवाले मासिक व वार्षिक खर्चाचे आढावेही ते आपल्या अधिकाऱ्यांना पाठवीत. इंग्रज, आपल्या हद्दींत जाहिरनामेही बरेच काढीत. प्रत्येक वखारीच्या कार्यवाहक मंडळीच्या (Council) बैठकीच्या ठरावांतील ठराव व चर्चा मराठी इतिहासास बरीच सामुग्री पुरवतील. सारांश, इंग्रजींत विविध-प्रकारचीं साधनें उपलब्ध व्हावयास पाहिजेत. याशिवाय प्रवासवृत्तें व दिनवृत्तें वगैरे बरींच असून शिवशाहीच्या इतिहासास समकालीन आहेत.

सुदैवानें इंग्रजी साधन-संग्रह अग्निदेवाच्या सपाट्यांत न सांपडतां वांचला आहे. यांतील बराच भाग अस्सल असून फार महत्त्वाचा आहे. या इंग्रजी साधन-संग्रहांतील बराच भाग अप्रकाशित आहे. कांहीं प्रकाशित झाला आहे. इंग्रजांच्या सतराव्या शतकांतील हिंदुस्थानांतील हालचालींना 'फॅक्टरी एज' म्हणजे 'व्यापारी युग' असें म्हणतात. या कालांतील त्यांच्या हालचाली फार महत्त्वाच्या आहेत. इंग्रजांचे अप्रकाशित साधनसंग्रह निरनिराळ्या ठिकाणीं आहेत. या संग्रहांत खासगी पत्रव्यवहार फारसा नाहीं. जो संग्रह आहे तो कंपनीच्या कारभाऱ्यांचा आहे. म्हणून इंग्रजी संग्रहाला जगांतील सर्वांत मोठा इतिहासोपयोगी संग्रह असें मानलें जातें. शिवशाहीच्या इतिहासास उपयुक्त असा साधन-संग्रह मुंबई सेक्रेटरीएट, पुणें एलिनिएशन दप्तर, मद्रास, कलकत्ता व पाटणा येथील दप्तरांत थोडाबहुत आहे. लंडन येथील वॉर ऑफिस, पब्लिक रेकॉर्डस् व ब्रिटिश म्युझिअम् मध्यें बराच आहे. परंतु सर्वांत महत्त्वाचा व मोठा संग्रह इंडिया ऑफिसमध्यें आहे. पॅरिस म्युझिअम व फ्रेंच पब्लिक रेकॉर्डस्, आम्स्टरडम् व मिड्लबर्ग येथील डच कंपनी-

च्या पत्रव्यवहारांत, पोर्तुगीजांच्या गोवा, लिस्बन व एव्होरा येथील दफ्तरखान्यांतही इंग्रजी शिवकालीन पत्रव्यवहार आहे. यांतील इंडिआ ऑफिसमधील संग्रहाच्या याद्या डॅनव्हर्सनें केलेल्या आहेत. हल्लींही तो संग्रह नीट जोपासला जात आहे. शिवकालीन इतिहासाला लागणाऱ्या साधनसंग्रहाच्या साधनांची व्याप्ति समजावी म्हणून यांत संग्रहित केलेल्या कांहीं साधनांची माहिती देणें जरूर आहे. इंडिआ ऑफिसांतील सतराव्या शतकांतील सुरवातीचा संग्रह आकस्मिक कारणामुळें व हलगर्जीपणामुळें नाहींसा झाला. परंतु इ. सन १८५८त या संग्रहांतील त्या वेळच्या दफ्तरदाराला चालू दफ्तरांना जागा करण्याचा प्रश्न आला तेव्हां जुना संग्रह टाकाऊ वाटला व २१ टन कागद रद्दीच्या भावानें १५९ पौंड व दहा पेन्सांना विकला. नंतर १८५९त जागेच्या अभावीं 'स्टोअरकीपर जनरल'नें ३१ गाड्या भरून २०,००० व्हॉल्यूम्सचा जो संग्रह न्यू स्ट्रीटवरून लेडनहॉल स्ट्रीटला नेला त्यांतून बराचसा लवकरच विकला. परंतु इतक्यानें भागलें नाहीं. इ. सन १८६०त सर चार्ल्स वूड, सेक्रेटरी ऑफ स्टेटफॉर इंडिया, यानें कॅनन रोडवरील इंडिया ऑफिसांत व लेडनहॉल स्ट्रीटला ठेवण्यांत आलेले संग्रह व्हिक्टोरिया स्ट्रीटला नेण्यापूर्वी त्यांतील सर्व निरुपयोगी दफ्तरांचा नाश करण्याचा किंवा विकण्याचा हुकूम दिला. या हुकुमावरून पुस्तकें, पत्रव्यवहार वगैरे मिळून ३०० टन कागदसंग्रह ३०९५ पौंड १६ शिलिंगाला विकला. इ. सन १६६७त जेव्हां इंडिआ ऑफिस आपल्या नवीन गृहांत आलें त्या वेळींही मोठ्या प्रमाणावर संग्रहाचा नाश केला. इ. सन १८७७त व त्यानंतरही संग्रहाची विल्हेवाट लावण्यांत आली. परंतु या वेळीं नाशासाठीं काढलेले कागद उपयुक्त नसल्याची खात्री करून घेतली होती. या सर्व संग्रहाचा नाश करण्याच्या प्रसंगीं योग्य ती काळजी घेतली नसावी व त्यांत बराच महत्त्वाचा कागदसंग्रह नाहींसा झाला असावा असें इ. सन १८८७त डॅनव्हर्सचें मत होतें. या वेळेपर्यंत कोणीं केव्हांच पद्धतशीर तपासणी केली नसल्याचेंही तो ठासून सांगतो. एकंदरींत जो संग्रह नाहींसा झाला त्यांत ग्रेटब्रिटनच्या इतिहासाला उपयोगी असा संग्रह जेव्हां टाकाऊ म्हणून ठरविला होता तेव्हां हिंदुस्थानच्या उपयोगाकडे फारसें कोणींच लक्ष न दिल्यास नवल कोणतें ! ही

सर्व परिस्थिति डॅनव्हर्सनें लोकांच्या समोर मांडली*, तेव्हां लोकांत बरीच ओरड† झाली. त्यामुळें एक 'कमिटी' नेमली व डॅनव्हर्सकडे सर्व संग्रह लावण्याचें काम दिलें. त्यानें व त्याच्या हाताखालील माणसांनीं त्या कामास सुरुवात केली. त्यांनीं आपल्या त्रैमासिक अहवालांत कामाचा बराच तपशील दिला आहे. शिवशाहीपुरताच आपणांस विचार करावयाचा असल्यानें त्यांतील शिवशाहीच्याच भागाचा संक्षेपानें उल्लेख करीत आहें. इंडिआ ऑफिसमधील मूळ संग्रहाचे कालानुरोधानें तीन भाग पाडले आहेतः [१] फॅक्टरी रेकॉर्ड्स (१६००ते१७०८), [२] टेरिटोरिअल रेकॉर्ड्स (१७०८ते१८५८) आणि [३] इंपेरीअल् रेकॉर्डस् (१८५८ते तहाहयात) त्यांतील फॅक्टरी रेकॉर्ड्सचे [१] मरिन रेकॉर्डस् (दर्यावर्दी लोकांचें दप्तर), [२] कोर्ट मिनिट्स् (कार्यवाहक मंडळींचे ठराव वचर्चा), [३] लेटर्स फ्रॉम इंडिआ (हिंदुस्थानांतून आलेला पत्रव्यवहार), [४] डिस्पॅचीस टू इंडिआ (हिंदुस्थानांत पाठविलेला पत्रव्यवहार), [५] फॅक्टरी रेकॉर्ड्स (वखारवाल्यांचीं दप्तरें) वगैरे भाग पाडले आहेत.

हिंदुस्थानाहून लंडनला गेलेलीं पत्रें १६०३ते१७०८ पर्यंतचीं आहेत. हिंदुस्थानाला आलेलीं पत्रें १६२७ते१६५२पर्यंतचीं तुरळक पण १६५३ते १७५३पर्यंतचा बहुतेक सर्व संग्रह आहे. यांतील १७०८पर्यंतचा पत्रव्यवहार १३ दप्तरांत आहे. वखारवाल्यांच्या दप्तरांत कित्येक वखारवाले इंग्लंडशीं स्वतंत्र पत्रव्यवहार करीत नसत. परंतु या संग्रहांत निरनिराळ्या ठिकाणचा स्वतंत्र असा शिवशाहीस उपयुक्त होण्यासारखा पत्रव्यवहार आढळतो. मुंबई (१६६९ते१७०४), कुडलूर आणि पोर्टो नोव्हो (१६८१ते१६८७), कोनीमेर (१६८२ते१६८५), फोर्ट सेंट डेव्हिड (१६९०ते१७५९), फोर्ट सेंट जॉर्ज (१६५५ते१७०५), कारवार (१६६६ते१७१७), मंडाळपोळम् (१६७६ते१६८६), मच्छलिपट्टण (१६७०ते१७००), राजापूर (१६५९ते १६६०), सुरत (१६२०ते१८००) व बिजगापट्टण (१६९२ते१६९५). याशिवाय मद्रास व मुंबईचा निराळा संग्रह आहे. इंग्लंडचा स्थानिक व

* Report of the Secretary of State for India in Council on the Records of the India office, vol. 1, by F. C. Danvers.

† Allen's Indian Mail, issue of 10th June 1887, etc.

शिवाय पोर्तुगीज, डच, वगैरेंच्या दप्तरांमधून मुद्दाम तपासून या कालाचे इतिहासास उपयुक्त म्हणून आणलेले संग्रह इंग्रजींत भाषांतरित करून ठेवलेले आहेत. पोर्तुगीज रेकॉर्ड्स लिस्बन व एव्होरा येथून व डच हेग येथून आणलें होतें. याशिवाय 'पब्लिक रेकॉर्ड्स ऑफिस'मधून व कांहीं 'बॉर ऑफिस'मधूनही 'इंडिया ऑफिस रेकॉर्ड्स'मध्यें कागदसंग्रह सामील केला. २३१ व्हॉल्यूम्सचा ऑर्मसंग्रह, हमिल्टनसंग्रह वगैरे कागदसंग्रह निराळेच. सारांश, डॅनव्हर्सनें केलेल्या रिपोर्टावरून* साधनांची बरीच रूपरेषा समजते. डॅनव्हर्सनंतर सेन्सबरीनेंही बरी व्यवस्था ठेवली व संग्रह वाढविला. डॅनव्हर्सच्या रिपोर्टावरून मुंबई, मद्रास व कलकत्ता येथील प्रेन्सिडेंसीच्या खालीं असलेल्या फॅक्टरींचे पत्रव्यवहार मुंबई, मद्रास व कलकत्ता येथे सांपडतील. मुंबई गॅझेटीअर लिहितांना इंडिया ऑफिसमधून बरीच माहिती नक्कल करून आणली आहे. तीही सेक्रेटरीएटमध्यें असली पाहिजे. मुंबई, मद्रास व कलकत्ता येथें बराच अप्रकाशित संग्रह असून तो शिवशाहीच्या इतिहासाला उपयुक्त आहे. यापैकीं मद्रासच्या संग्रहांत मलबारचाही संग्रह सामील केला असल्यानें तर त्याला फारच महत्त्व येणार आहे. मुंबईचा इंग्रजांचा दप्तरखाना मूळ कॅथेड्रलमध्यें होता. तो शेवटीं एल्फिन्स्टन कॉलेजच्या इमारतींत येऊन पडला आहे. याची बऱ्या प्रकारची व्यवस्था ठेवली आहे. त्यांत मुंबईच्या हुकुमाखालील सर्व बखारींचा दप्तरखाना सामील करून घेतला आहे. शिवशाहीस उपयुक्त असा साधनसंग्रह फक्त मुंबई व सुरतच्याच दप्तरांत आढळतो. परंतु यांतही बराच खंड आहे. मुंबईकरांच्या मुख्य दप्तरांत इ. सन १६७६ ते १७०४पर्यंतचीं ७ जाबकाचीं बांधीव पुस्तकें आहेत. इ. सन १६४६ ते १७८६पर्यंतच्या ३७ आवकाच्या पुस्तकांपैकीं बरींच शिवशाहीला उपयोगी ठरतील. इंग्लंडहून आलेल्या पत्रांचीं इ. सन १६८१ ते १८२०पर्यंतचीं २४ पुस्तकें आहेत. परंतु यांत इ. सन १६८५ ते

* Quarterly Record Reports (1891-1898) by F. C. Danvers, Report on the India Office Records (1898) by F. C. Danvers, with Appendices, and Indian Historical Records Commission-Proceedings of Meetings, Vol. IV-1922-pp. 13-18 & Vol. VIII-1925-pp. 69-127.

१७४२पर्यंत मोठा खंड असल्यानें इ. सन १६८१ ते १६८५पर्यंतचीं थोडींच पत्रें शिवशाहीस उपयोगी पडतील. सुरतेच्या दप्तरांत ४ पुस्तकें इ. सन १६५९ ते १७०४च्या मुख्य कौन्सिलच्या दिनवृत्तांनीं भरलेलीं आहेत. इ. सन १६४६ ते १७०१पर्यंतचें आवकचें १ पुस्तक, इ. सन १६२० ते १७००च्या जावकाचीं ४ पुस्तकें व डचांच्या माहितीचीं २९ पुस्तकें आहेत. बंटमच्या आवकाचें इ. सन १६७१ ते १६८३पर्यंतचेंही एक पुस्तक या संग्रहांत आहे. इतकाच काय तो शिवशाहीच्या इतिहासास उपयोगी पडण्यासारखा साधनसंग्रह असल्याचे समजतें.* याशिवाय पुणें एलिनिएशन दप्तरांतील संग्रह वेगळाच. या संग्रहाचा इतिहासाच्या दृष्टीनें सविस्तर फेरिस्त केलेला नाहीं. परंतु यांत इंग्रजी साधनें ८५५९ बंडलें असल्याचें प्रसिद्ध आहे.* मद्रासचा बराचसा संग्रह छापला गेला आहे.

अप्रकाशित साधनसंग्रहाच्या व्यासंगिकडे पाहतां प्रकाशित इंग्रजी साधनें अगदींच अल्प आहेत म्हटलें तरी चालेल. तसेंच हा अप्रकाशित संग्रह डफ, हंटर, मिल, आयर्विन, सरकार यांसारख्या इतिहासकारांनीं थोडासा उपयोगांत आणला. परंतु या इतिहासकारांनीं तो स्वतः बारकाईनें तपासला नाहीं. इतकेंच नव्हे तर हा संग्रह तपासण्यास आणि विशेषतः मराठ्यांच्या इतिहासलेखनाच्या दृष्टीनें तपासण्यास त्यांना मराठ्यांच्या ऐतिहासिक पुरुषांच्या नांवाची बगैरे मुळींच माहिती नव्हती. या माहितीच्या अभावीं हा संग्रह तपासून उपयोगांत आणणें फार कठीण आहे. या अप्रकाशित संग्रहापैकीं कांहीं निवडक हिंदुस्थानसरकारच्या साहाय्यानें छापण्याचा उपक्रम ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसनें केला आहे. सर फोस्टर हे या ग्रंथांचे संपादक आहेत. साधनांची निवड करितांना व विशेषतः साधनांतील भाग गाळतांना जी फोस्टरची दृष्टि दिसते त्यांत त्याला मराठ्यांच्या इतिहासाचें महत्त्व चांगलेसें पटलेलें दिसत नाहीं. त्याची दृष्टि बरीचशी ग्रेटब्रिटनच्या बखारवाल्यांच्या इतिहासाकडेच ओढ घेत असल्यानें मराठ्यांच्या इतिहासांतील बराचसा अगदीं महत्त्वाचा व मुद्दयाचा भाग गौण असा वाटत असावा. त्याचप्रमाणें त्यांना मराठी नांवाचा व गांवांचा बोध होत नसावा.

* A Handbook of the Bombay Government Records by A. F. Kindersley (1921).

यामुळें फोस्टरचे ग्रंथावर विसंबून चालणार नाहीं. मराठ्यांच्या इतिहासाकरितां साधनें तपासण्याचा स्वतंत्रच प्रयत्न करावा लागणार असें यावरून स्पष्ट होत आहे. आतांपर्यंत जो इंग्रजी साधनसंग्रह प्रसिद्ध झाला त्यांत इ. सन १६०८ ते १६१८ पर्यंत सहा खंड व इ. सन १६१८ ते १६६९ पर्यंतचे तेरा खंड* छापून प्रसिद्ध झाले आहेत. यांत विशेषतः सुरतेहून लिहिलेलीं व सुरतेला पाठविलेलीं पत्रें कांहीं गोषवारा देऊन, कांहीं भागशः व कांहीं संबंध देऊन विषयवारीनें व कालानुक्रमानें देण्याचा प्रयत्न केला आहे. यांत कारवार, राजापूर, मलबार, मुंबई वगैरे ठिकाणचाही पत्रव्यवहार देण्यांत येत आहे. या खंडांत दक्षिण हिंदुस्थानाच्या इतिहासास उपयोगी पडणाऱ्या साधनांना इ. सन १६५४ नंतरच सुरुवात होते. १६५४ नंतरच्या साधनांत मराठ्यांच्या इतिहासाला उपयुक्त अशी बरीच समकालीन माहिती मिळते. इ. सन १६६९ नंतरचा संग्रह अजून छापावयाचा आहे. परंतु त्याची व्याप्ति फार मोठी असल्याचें समजतें. प्रत्येक वखारीच्या महत्त्वाच्या व निवडक पत्रव्यवहाराला एकएक वर्षाला एकएक खंड द्यावा लागेल, इतकीं साधनें संग्रहांत असल्याचें समजतें. अर्थात् या कालाच्या साधनांत मराठ्यांच्या इतिहासाला उपयोगी पडणारीं विपुल साधने मिळतील. या सर्व प्रकाशित संग्रहाचा विचार केला तर मूळ इंडिया ऑफिसमध्यें असलेल्या संग्रहावरून मराठ्यांच्या इतिहासाची रचना बरीच सुलभ जाईल यांत शंका नाही. परंतु हा संग्रह मराठ्यांच्या इतिहासाची बारकाईची माहिती आणि खरें स्वरूप जाणणाऱ्या संशोधकाकडून तपासविला पाहिजे. इंग्रज सरकारनें आपल्या इतिहासासाठीं अधिकारी रवाना करून डच, पोर्तुगीज वगैरे दप्तर-खान्यांतून माहिती आणून ग्रेट ब्रिटनच्या इतिहासलेखनाचा मार्ग सुलभ करून ठेविला. हिंदुस्थानसरकारनेंही असाच प्रयत्न केला पाहिजे. विशेषतः मुंबई सरकारनें मराठ्यांच्या इतिहासाकडे विशेष सहानुभूतिपूर्वक मदत करून इंडिया-ऑफिसमधील संग्रहाच्या नकला आणवून एतद्देशीय इतिहासलेखनास मदत केली पाहिजे. असो. वखारवाल्यांच्या या प्रकाशित पत्रव्यवहाराव्यतिरिक्त आणखीही इंग्रजी साधनें प्रकाशित केलीं आहेत. 'कोर्ट मिनिट्स' म्हणजे

* English Factories in India edited by Sir W. Foster

'कार्यवाहक मंडळींचे ठराव' म्हणून इ. सन १६५४ पर्यंतचे पांच ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. त्यांतही थोडीबहुत माहिती मिळते. फोर्ट सेंट जॉर्ज येथील खजिनाही बराच आहे. यांतील बहुतेक छापून काढला असावासें दिसतें. यांत पत्रव्यवहार सबंध देण्यांत आला आहे. हा मद्राससरकारनें प्रसिद्ध केला आहे. परंतु यांतील पत्रव्यवहाराला इ. सन १६७० पासून सुरुवात होते. या मालेचे बरेच खंड आहेत. त्यांत 'कन्सल्टेशन व डायरीज्', 'फोर्ट-सेंट जॉर्जहून पाठविलेलीं पत्रें', 'फोर्ट-सेंट जॉर्जला इंग्लंडहून आलेलीं पत्रें', 'फोर्ट-सेंट जॉर्जहून लहान लहान वखारींना वगैरे गेलेलीं पत्रें', 'संड्रीज' म्हणजे किरकोळ वगैरे-सारख्या उपमाला आहेत. या सर्वांचा मराठ्यांच्या कर्नाटकांतील राजकारणाच्या इतिहासाला बराच उपयोग आहे. ही सामुग्री फार महत्त्वाची आहे. याशिवाय लव्हच्या 'व्हेस्टीज–३ खंड' मध्येंही कांहीं निवडक साधनांचा समावेश झाला आहे. विशेषतः यांत तत्कालीन लोकांचीं पत्रें वगैरेंचे जे नमुने दिले आहेत ते संशोधकाला तत्कालीन इंग्रजी लेखनाचें स्वरूप समजून घेण्यास महत्त्वाचे आहेत. इंग्रजींत इंग्रजांचीं व इतरांचीं प्रवासवृत्तें व दिनचर्या बऱ्याच प्रकाशित झालेल्या आहेत. 'सफरी'च्या वृत्तांची माहिती देणाऱ्या मालिकाही प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांत हकलुयट सोसायटीचे व परचासचे ग्रंथ महत्त्वाचे आहेत. सांप्रत रो, ट्राव्हर्निअर, थेवनो, बर्नीअर, फ्रायर, स्ट्रेशम मास्टर, हेजीस, मनुशी, ओव्हिंगटन, नोरीस, चर्चिल, डिलाव्हेल वगैरे शिवकालीन प्रवासवृत्तें व दिनचर्या इंग्रजीमुळें ओळखीच्या झालेल्या आहेत. आणखीही प्रवासवृत्तें व दिनचर्या विपुल असाव्यात, इतकेंच नव्हे तर प्रसिद्धही झालेल्या असाव्यात. परंतु, आपणाला कोणकोणत्या कालीं कोण आला ही नीटशी माहिती अद्यापि झाली नसल्यानें नेमका ग्रंथ शिवकालीन म्हणून उचलतां येत नाहीं. परंतु त्या वेळच्या इंग्रज लेखकांबद्दल आपणांस जसजशी माहिती होत जाईल तसतसा आपणांला या महत्त्वाच्या ग्रंथांचा सुगावा लागून त्यांची तपासणी करितां येईल. इंडिअन हिस्टोरिकल रेकॉर्डस कमिशनचे अहवाल, रॉयल एशिआटिक सोसायटीचीं त्रैमासिकें, अहमद शफी यांचे व आयंगारचे इंडिअन हिस्टोरिकल क्वार्टरली, जर्नल ऑफ दि बॉंबे हिस्टोरिकल सोसायटी, कलकत्ता व इंडिअन रेव्ह्यूज् वगैरेसारख्या इंग्रजी मासिकांतूनही सांप्रत इंग्रजी साधनें प्रकाशित होत आहेत. सारांश, मराठ्यांचा इतिहास

प्रकाशित व अप्रकाशित इंग्रजी साधनांचें परीक्षण करून जुळणी करण्यास एका चांगल्या चलाख व तज्ज्ञ माणसाला अठरा अठरा तास खपूनही दोन वर्षें पुरणार नाहींत.

इंग्रजी साधनांचा उपयोग करितांना मात्र बऱ्याच गोष्टींबद्दल सावधगिरी बाळगावी लागते. इंग्रजी पत्रांतील माहिती समकालीन या दृष्टीनें फार महत्त्वाची आहे. परंतु त्यांत गांवाच्या व नांवाच्या बऱ्याच चुका झालेल्या आहेत. कित्येक ठिकाणीं तर त्यांचें लिहिणें अगदीं दुर्बोध झालें आहे. इ. सन १६६१च्या पूर्वीचीं पत्रें तर पूर्वीचे संदर्भ पूर्ण माहितीचे असतील तरच लागतात. ह्या पत्रांत तत्कालीन वर्णलेखनपद्धतींतील वैशिष्ट्याशिवाय 'अ'चा उच्चार 'u'नें दर्शविलेला असतो. प्रथमारंभींचा 'अ' 'hu'नें लिहितात. 'g'चा उपयोग 'ज'चा उच्चार दर्शविण्यास करितात. कधीं कधीं 'स्ट' यासारख्या संयुक्त व्यंजनापूर्वी येणारा परंतु आद्याक्षर दीर्घोच्चारीत 'अ' 'e'नें लिहितात. 'rr' किंवा 'rh' यांनीं 'ड' व्यक्त करितात. 's' किंवा 'c'चा उपयोग 'श' दर्शविण्यास करितात. दीर्घ स्वरापुढे येणाऱ्या 'य'सारख्या अर्धस्वरांचा लोप करितात. कठीण उच्चारांच्या लांबलचक नांवामागें 'in' किंवा 'en' जोडतात. स्वरापुढील 'ह' गाळतात. स्वरापुढे येणाऱ्या 'ı' च्या जागीं 'y' लिहितात. 'ıt'मधील 'ı' 'y'नें दर्शवितात. द्वित्त 't' बऱ्याच ठिकाणीं वापरतात. अंत्य 't'पुढें 'e' लिहितात. इ० पत्रांत संक्षिप्त शब्द लिहिण्याचा बराच प्रचार होता. कांहीं संक्षिप्तें तर विचित्र आहेत. 'y'चा उपयोग आद्य 'th'साठीं करून शब्दांचे संक्षेप केलेले असतात. संक्षेपांत संक्षेपित भागापैकीं कोणतीं अक्षरें ठेवावीं व कोणतीं न ठेवावीं यांचा फारसा धरबंद नाहीं. इतकेंच कीं, इंग्रजी ही 'चित्र' भाषा असल्यानें वाचनास फारसा ताप पडत नाहीं. परंतु अशा प्रकारचे अनेक दोष इंग्रजांनीं केलेल्या नामोच्चारांत व लिखाणांत असल्याकारणानें पत्रांतील मजकुराचा संबंध चट्कन् लक्ष्यांत येत नाहीं.

युरोपीय व क्रिस्ती राष्ट्रांत क्रिस्ती शक चालू होता. ही क्रिस्ती पंचांगपद्धति सौरमानाची आहे. ह्या पद्धतीला जुलिअन पद्धति असें म्हणतात. ही जुलिअन पद्धति रोममध्यें कित्येक शतकें चालू होती. या पद्धतीच्या गणितांत सौरमानाच्या सूक्ष्म गणितानें दर वर्षीं अगदीं थोडा फरक पडत

असे. त्यामुळें कित्येक शतकांनीं हा फरक बराच वाढला व या खिस्ती पंचांगाप्रमाणें येणारा क्रांतिसंपात व प्रत्यक्ष संपात यांत दहा दिवसांचें अंतर असलेलें इ. सन १६ व्या शतकांत लक्षांत आलें. ही क्रांतिसंपातांत वगैरे चूक होऊं लागल्यामुळें जुलिअन पद्धतींत सुधारणा घडवून आणण्याचें बरींच वर्षें घाटत होतें. परंतु इ. सन १५८२ पर्यंत कांहींच सुधारणा घडून आली नाहीं. इ. सन १५८२ च्या मार्च महिन्यांत १३ वा पोप ग्रेगरी यानें हुकूम काढून ग्रेगरीपद्धत किंवा नवीन खिस्ती पंचांगाची पद्धति सुरू केली. क्रांतिसंपात प्रत्यक्ष संपातापेक्षां दहा दिवसांनीं मागें जात होता, तो जुळविण्यासाठीं ५ आक्टोबर १५८२ला १५ आक्टोबर १५८२ असें म्हणावें असें फर्माविलें व दर चारशें वर्षांत ३ सालें म्हणजे ४०० नें भाग न जाणाऱ्या शेंकड्यांच्या सालास लीपइअर धरूं नये असें ठरवून जी थोडीबहुत कसर वाढत होती ती तोडली. जुलीअन-पद्धतीप्रमाणें १७ व्या शतकांत ११ दिवस, अठराव्या शतकांत १२ दिवस, एकोणिसाव्या शतकांत १३ दिवस व विसाव्या शतकांत १४ दिवसांचा क्रांतिसंपात व प्रत्यक्ष संपातांत फरक पडतो. स्पेन, पोर्तुगीज व इटलीच्या बऱ्याच भागानें ग्रेगोरीअन किंवा नवीन पद्धतीचा स्वीकार रोमबरोबरच पोपच्या आज्ञेवरून इ. सन १५८२त केला. फ्रान्समध्यें इ. सन १५८२च्या डिसेंबरांत केला. स्वित्झर्लंड, नेदरलंड व जर्मनींतील रोमन कॅथोलिक लोकांनीं १५८३त ही नवीन पद्धति स्वीकारली. पोलंडनें इ. सन १५८६ त व हंगारीनें १५८७ त घेतली. हॉलंड, डेन्मार्क व जर्मनींतील प्रोटेस्टंट लोकांनीं आणि स्वित्झर्लंडनें अनुक्रमें इ० सन १७००त व १७०१त नवीन पद्धति सुरू केली. स्कॉटलंडमध्यें १६००त व स्वीडनें १७५३त नवीन पद्धति चालू केली. ग्रेट ब्रिटननें १७५१त पार्लमेंटचा कायदा होऊन २ सप्टेंबर १७५२ला १४ सप्टेंबर १७५२ समजून नवीन पद्धति सुरू केली. रशियांत मात्र अद्यापपावेतों जुनीच पद्धत चालू आहे* सतराव्या शतकांत्या खिस्ती पंचांगांतील विविधतेमुळें हिंदुस्थानांतून गेलेल्या माहितीबद्दल गैरसमज होत व तारखांतील फरक लक्षांत घेऊन वस्तुस्थिति जाणावी लागे हें

* मोडक जंत्री--प्रस्तावना--पृष्ठ७., Encyclopaedia Britanica Calendar pp. 664-682, and Popular Encyclopaedia-Calendar-pp, 23-27.

नीटसें सर्वांच्या लक्षांत येत नसे असें त्यावेळींही डाग रजिस्टरमधील डचांच्या पत्रावरून स्पष्ट होत आहे.* इंग्रजी व परभाषीय साधनें वाचतांना निरनिराळ्या राष्ट्रांनीं निरनिराळ्या वेळीं नवीन पद्धति स्वीकारली हें सांप्रतही तेवढें विचारांत घेतलें जात नाहीं. तसेंच इंग्रज आपलें नवीन वर्ष २५ मार्चला सुरू झाल्याचें समजत. त्यामुळें नवीन सनाचे जानेवारी ते मार्च २४ तारखेपर्यंतच्या पत्रांत इ० सन देतांना गत व चालू असा जोड सनांचा उल्लेख करून लिहीतः जसें १६६४।५. अशा वेळीं त्या पत्रांचा सन म्हणजे चालू म्हणजे दुसरा आंकडा धरावा लागतो. परंतु ही चाल इंग्रजांनीं ज्या वेळीं ग्रेगोरिअन-पद्धति स्वीकारली त्यावेळीं म्हणजे इ० सन १७५२त मोडली व इतर देशांप्रमाणें १ जानेवारीला वर्षारंभ मानूं लागले. तसेंच पोर्तुगीजांचा मुख्यतः रोमन कॅथोलिक पंथ होता. ज्याप्रमाणें रामनवमी, हनुमानजयंती वगैरेसारख्या नांवांनीं आपण ठराविक दिवसांचा उल्लेख करितों त्याचप्रमाणें रोमन कॅथोलिक पंथाचे लोक वर्षाच्या ३६५ दिवसांचा ठराविक 'सेंटां'च्या किंवा धर्मवीरांच्या नांवानें उल्लेख करितात. या पद्धतींत प्रत्येक दिवसाला कोणाना कोणा तरी धर्मवीराचें नांव दिलेलें असतें. जसें १ नवंबर ='ऑल सेंटस् डे' ११ नवंबर='सेंट मार्टिन्स फीस्ट' इ०. यांत त्यांचा मुख्य उद्देश असा असतो कीं, त्या त्या धर्मवीराच्या नांवानें त्या त्या दिवशीं आराधना व उत्सव करावयाचा. या पद्धतीला क्वचित् ठिकाणीं 'फीस्टस् कॅलेंडर' असेंही म्हणतात. परंतु या रोमन कॅथोलिक पंथांतही इतर निरनिराळ्या परंपरा ( Churches ) असल्यानें या पद्धतींत थोडाबहुत भेदाभेद दृष्टीस पडतो. त्यामुळें एक परंपरा जर एकाद्या दिवसाला एखाद्या धर्मवीराचें नांव देत असेल तर दुसरी परंपरा त्या दिवसाला आपल्या एखाद्या धर्मवीराचें नांव देईल व दुसऱ्या एखाद्या दिवसाला राहिलेल्या धर्मवीराचें नांव देऊन त्याची प्रार्थना करील. निरनिराळ्या देशांतील परंपरेंत जरी विविधता असली तरी हिंदुस्थानांतील पोर्तुगीजांच्या प्रदेशांत फारशी विविधता दृष्टीस पडत नाहीं. सांप्रतही ही पद्धति रोमन कॅथोलिक लोकांत चालू असल्यानें या पद्धतीचीं पंचांगें दरवर्षीं छापलीं जातात. या पंचांगांना

* Dagh Register-166?-by J. A. Van de Chijs-p. 547

'मेरीअन' कॅलेंडर–सेंट मेरीचीं पंचांगें–असें म्हणतात. हीं पंचांगें सर्वत्र मिळतात. या दिवसांच्या 'फीस्ट'मध्यें दरवर्षीं फरक होत नसल्यानें ही पद्धति स्थलाभावामुळें येथें देण्याची आवश्यकता दिसत नाहीं. या पद्धतीनें केलेले दिवसांचे उल्लेख इंग्रजी व इतर साधनांतही आढळतात.

इंग्रजांच्या हिंदु-चालीरीति चांगल्याशा अंगवळणीं न पडल्यामुळें त्यांच्या पत्रांतून साध्याही गोष्टींचा हास्यास्पद विपर्यास केलेला आढळतो. मुसलमानी मोगली पद्धतीप्रमाणें प्रत्येक बादशाह आपला जुलूस सन सरकारी कागद-पत्रांवर लावतो. ती चाल मराठी राज्यांतही चालू होती असें समजून मराठी पत्रांतील 'राजशका'चें भाषांतर किंवा रूपांतर देतांना 'राजशक' हा 'जलूस' असें समजून संभाजीच्या किंवा राजारामाच्या कारकीर्दींतही या राजशकाचें भाषांतर संभाजीच्या अगर राजारामाच्या राज्याभिषेकाचें अमकें अमकें वर्ष असें लिहितात.* असेच आणखी एक उदाहरण मजेखातर द्यावयाचें तर असें देतां येईल कीं, ज्या वेळीं अफझलखानाशीं शिवाजीनें बोलणें लाविलें त्या वेळची हकीकत नंतर दोन महिन्यांच्या आंतील एका पत्रांत दिली आहे. त्यांत 'शिवाजीनें आपल्या मातेची शपथ देऊन' बोलणे लाविलें ही माहिती त्यानें पुढील शब्दांत दिली आहे. "And (Shivaji) sent his mother as a hostadge assuring him of his reality."†(आणि शिवाजीनें आपल्या आईला ओलीस पाठविलें व आपल्या खरेपणाची साक्ष पटविली.) सारांश, हिंदुस्थानां-तील लोकांच्या चाली रीतीबद्दलच्या इंग्रजलेखकांच्या अज्ञानामुळें अशा चुका होणें साहजिक होतें. शिवाय अशी माहिती लिहिणाराच्या मनांतील हेतु जरी कितीही निर्भेळ असले तरी त्या लेखकाला ज्या मार्गानें माहिती मिळते किंवा लिहिणारा ज्या परिस्थितींत असतो त्या परिस्थितीचे परिणाम त्याच्यावर घडणें व नंतर ते त्याच्या लिखाणांत शिरणें साहजिक असतें. मोगलांचे सान्निध्यांत राहणारा इंग्रज मोगलांचे गोडवे गाऊन मराठ्यांचा द्वेष किंवा त्यांचेबद्दल विपरीत कल्पना करून घेईल यांत संशय नाहीं. उलट मराठ्यांबरोबर वागणारा इंग्रज आपल्या अधिकाऱ्याच्या विरुद्धही मराठ्यांच्या

* भा. इ. सं. मंडळ--त्रैमासिक-वर्ष २, अंक १ ते ४, पृष्ठ ३२, ३७.

† The English Factories in India-1655-60 by W. Faster, p. 248.

बाजूनें हुजत घालण्यास मागेंपुढें पहात नसे.* सारांश, या इंग्रजी लिखाणांत जरी समकालीनता असली तरी त्यांतील हेतु व परिस्थिति यांची छाननी नीट केल्याशिवाय कोणाच्याही स्वभाववैचित्र्याबद्दल केलेले आरोप मान्य अगर त्याज्य ठरविणें योग्य होणार नाहीं. तसेंच मानवी स्वभावधर्मानुरूप आपल्या धन्याजवळ आपल्या कार्याची बढाई मारून बढती करून घेणें अगदीं साहजिक असतें. तेव्हां ज्या ज्या वेळीं इंग्रज व मराठे यांचे शत्रुभावाचे संबंध जडले त्या त्या वेळीं झटापटींचीं अगर कारवाईचीं केलेलीं वर्णनें विपर्यस्त, एकांगी व अतिशयोक्तिपूर्ण असणें साहजिक आहे. परंतु बारकाईनें माहिती मिळवून ती तपशिलवार व क्रमप्राप्त सांगण्याची इंग्रज लोकांची पद्धति शास्त्रशुद्ध आहे. जर एखादी माहिती दिली गेली व नंतर ती खोटी म्हणून खास बातमी मिळाली तर त्याबद्दलची ते दुरुस्ती करण्यास विसरत नसत. इंग्रजी दप्तरांतील समकालीन साधनें अस्सल व मसुदे अशीं दोन प्रकारचीं आहेत. शिवशाहींत इंग्रजांचा अंमल राज्यकर्ते या नात्याचा फारसा नव्हता. त्यामुळें पत्रव्यवहाराखेरीज इतर हुकूम किंवा परंपरेच्या सनदा या कालांत फारशा दिल्या गेल्या नसल्यामुळें या दप्तरांत किंवा इतरत्र नकला सांपडणें दुरापास्त आहे.

इंग्रजी साधनांत आणखी एका प्रकारच्या साधनांचा भरणा आहे. तो म्हणजे प्रवासवृत्तें व दिनवृत्तें यांचा होय. या प्रवासवृत्तांचा मराठी इतिहासास फारच उपयोग होणार आहे. यांतील माहिती जरी थोडीबहुत विकृत असली तरी त्यांत दिलेली सामाजिक, भौगोलिक व इतर माहिती क्वचितच इतरत्र सांपडण्याचा संभव आहे. इतिहासकालीन परिस्थितीचें योग्य तें आकलन झाल्याशिवाय राजकीय इतिहासांतील प्रमेयें समजणें दुर्घट आहे. विशेषतः हिंदूंच्या विभूतिपूजनांतील आपला देव तितका श्रेष्ठ व इतर कनिष्ठ हा जो अतिशयोक्तीचा तारतम्यभाव दृष्टीस पडतो त्यामुळें तर तत्कालीन परिस्थिती-विषयीं अधिकच गूढ होऊन राहतें. तें गूढ सहज उकलण्यास या प्रवासवृत्तांचा फार उपयोग होणार आहे. परंतु प्रवासवृत्तांतील मजकुराबद्दलही बरीच सावधगिरी बाळगावी लागते. हे इंग्रज प्रवासी स्वस्तःबद्दल तर फाजील

* Keigwin's Letters to Surat & Surat's Despatches to Bombay-1684 or 1685.

अभिमान बाळगीत. यांच्या लिखाणांत आत्मप्रौढी बरीच दृष्टोत्पत्तीस येते. यांचा कल नेहमींच कमीअधिक प्रकारची प्रत्येक गोष्टीवर टीका करण्यांत आढळतो. पाश्चात्य व पौर्वात्य संस्कृतीचा निकट संबंध येतांच यांचे मनांत भयंकर चलबिचल उडते. यांचा पौर्वात्य संस्कृतीशीं बेताचाच संबंध येत असे. त्यामुळें ते या पौर्वात्य संस्कृतीचा व चालीरीतींचा उपहास करतांना आढळतात. यांनीं प्रत्यक्ष पाहिलेल्या वस्तुस्थितीचें वर्णन शुद्ध व सहज असतें. निसर्गरचना, पशुपक्ष्यांची माहिती, वनस्पति व रानाजंगलांची माहिती फार महत्त्वाची असते. मापें, वजनें व चलनपद्धति यांचा फारच बारकाईनें अभ्यास केलेला असतो. परंतु स्थानिक चालीरीति व इतिहास यांची माहिती ऐकीव असते. अशा माहितींत मूळ सांगणाराच्या चुका व माहिती ऐकणाराच्या समजुतींतील चुका असे दोन प्रकारचे दोष आढळतात. या प्रवासवृत्तांवरून समकालीन गोष्टींचा किंवा प्रसंगांचा बोध चांगला होतो. विशेषतः कार्यकारणभावाचा त्यांत छडा लावण्याचा प्रयत्न केलेला असतो. परंतु त्यांतील सत्यासत्यता किंवा प्रामाण्याप्रामाण्यता सांगणाराच्या प्रकृतिमानावर अवलंबून राहते. मात्र या माहितींतील विशेष म्हटला म्हणजे या प्रवाश्यांनीं आपली माहिती शास्त्रशुद्ध कालनिर्देश करून देण्याचा केलेला प्रयत्न हा होय. समकालीन ऐतिहासिक प्रसंगांच्या वर्णनानें हीं प्रवासवृत्तें मराठ्यांच्या इतिहासांत भर टाकतात. परंतु पुराणकालापासून श्रुति आणि स्मृति यांत जागृत असलेल्या गोष्टी ऐकून त्या आम्हीं प्रत्यक्ष पाहिल्या म्हणून सांगून आपलीं प्रवासवृत्तें आश्चर्यजनक करून सोडण्याचा मोह त्यांना आवरत नाहीं. साध्या म्हणीच्या समर्थनार्थ सांगितलेली गोष्टही अगदीं ऐतिहासिक म्हणून ठोकून देतात. एतद्देशीय चालीरीतींची त्यांना सकारण माहिती न मिळाल्यामुळें ते त्याबद्दल बराच विपर्यस्त मजकूर लिहितात. केव्हां केव्हां तर तो अगदीं हास्यास्पद असतो. हिंदूंत सतीची चाल होती. परंतु महाराष्ट्रांत तिचा फारसा किंवा सक्तीचा म्हणून प्रसार झालेला नव्हता. पण पुराणांतही क्वचित् आढळणारे असे, म्हणजे राजाबरोबर शेंकडों लोक त्याच्या चितेवर चढत, यासारखे प्रसंग एखाद्या कुलाची दंतकथा ऐकून त्यांतील एखादा कर्ता राजा मेल्याची बातमी नमूद करितांना हे प्रवासी देतात व शेंकडों माणसांना त्याच्या चितेवर धाडतात. प्रत्यक्ष आवडती पत्नीही राज्य करण्यास मागें राहिल्याचीं

खबर देतात. परंतु बारा बलुते, नोकरचाकर वगैरे सेवा करण्यास स्वर्गांत गेल्याचें सांगतात. अशाच प्रकारच्या अनेक भाकडकथा हे प्रवासी आपल्या प्रवासवृत्तांत देतात. इंग्रज व हिंदु यांची राहाणी अगदीं भिन्न असल्यामुळें या प्रवाश्यांनीं हिंदु स्त्रियांविषयीं लिहितांना बरीच साशंकवृत्ति दर्शविलेली असते. परंतु हा सर्व परिणाम येथील चालीरीतींतील नावीन्याचा व त्यांच्या अज्ञानाचा होय. एकंदरींत या प्रवासवृत्तांतील असले विषयस्त मजकूर गाळून टाकले तर इतिहासास उपयुक्त असा बराच मजकूर सांपडतो.

इंग्रजांनीं लिहिलेल्या इतिहासग्रंथांचाही भरणा कांहीं कमी आहे असें नाहीं. परंतु सर्वच इतिहासकारांची प्रवृत्ति मुख्यतः सबंध हिंदुस्थानाचा इतिहास आणि विशेषतः उत्तरकालीन म्हणजे इंग्रजी अंमलाचा इतिहास लिहिण्याकडे असल्यामुळें मराठ्यांच्या वांट्याला फारच थोडा भाग येत असे. विशेषतः मराठ्यांचा इतिहास देऊंच म्हटलें तर तो पेशवाईचा इतिहास देणें सोपें व सोईस्कर होतें. सर्व इतिहासांत तसें पाहिलें तर डफचाच इतिहास अधिक साविस्तर आहे. इंग्रजांचे इतिहासग्रंथ चिकित्सक बुद्धीनें लिहिले जातात यांत शंका नाहीं. परंतु इतिहास संपूर्ण लिहून काढण्याची बळकट इच्छा मराठी इतिहासाच्या अपुऱ्या व थोड्या साधनांवर पूर्ण होणें शक्य नव्हतें. तेव्हां चरित्र किंवा इतिहास लिहिणें म्हणजे उपलब्ध साधनांचें विशेषसें परीक्षण न करितां सर्व प्रसंग एकत्र करण्याकडेच अधिक दृष्टि ठेवणें भाग होतें. जे प्रसंग चिकित्सापूर्ण दृष्टीनें परीक्षण्यास इतर अधिक जबाबदार साधनांची प्राप्ति होण्यासारखी होती तेथें त्यांनीं सत्यासत्यतेचा थोडाबहुत विचार केला. परंतु जे प्रसंग पडताळून पाहणें साधनाभावीं शक्य नव्हतें ते प्रसंग बिसंगत भासले तरी ते ग्रथन करावे लागले. ही परिस्थिति फक्त मराठ्यांच्या पूर्वार्धापुरतीच होती. उत्तरार्धाच्या इतिहासाबद्दलची हकीकत त्यांचे दप्तरीं पूर्णपणें सांपडण्यासारखी होती. शिवाय इंग्रजांना या मराठ्यांच्या इतिहासाच्या पूर्वार्धाची फारशी जरूर नव्हती. कारण त्यांना त्यांच्या लोकांचा इतिहास त्यांच्या लोकांकरितांच लिहावयाचा होता व असें करितांना जो देश आपल्या अमलाखालीं आला त्या देशाच्या व त्या देशांतील लोकांच्या संस्कृतीच्या माहितीचें लोण स्वदेशीं पोहोंचवावयाचें होतें. मराठ्यांच्या इतिहासांतील कमीअधिक मजकुरानें त्यांचा फारसा तोटा व फायदाही

व्हावयाचा नव्हता. त्यांना फक्त जित लोकांची भूतकाल व वर्तमानकालाची प्रवृत्ति आपल्या लोकांस दाखवावयाची होती. म्हणून त्यांना ऐतिहासिक प्रसंगाबद्दलच्या सारासारविचाराची किंवा त्यांतील तथ्यातथ्य शोधण्याची जरूर पडली नाहीं. त्यामुळें यांचा इतिहास म्हणजे तत्कालीन पुराव्यांची जंत्री यापलिकडे त्याचें महत्त्व मानतां येणार नाहीं. इंग्रजी ग्रंथकारांचा भर विशेषतः मराठी व फारसी बखरीवरच होता. कागदपत्रांचा त्यांनीं थोडाबहुत उपयोग केला असें मानलें तरी त्यांना शिवशाहीच्या कालांतील खास कागदपत्र उपलब्ध झाले होते असें मानण्यास फारसा पुरावा अंतर्गत मजकुरावरून दिसत नाहीं. डफच्या इतिहासांतील शिवशाहीपुरत्याच्या भागाचा विचार केला तर असें स्पष्ट दिसतें कीं, डफला ज्या मराठी बखरी उपलब्ध होत्या त्या बखरींतील माहिती जर फारसी ग्रंथांत नसेल तरच ती घेतली आहे. नाहींतर फारसी साधनांनाच प्रामाण्य दिलें आहे. तसेंच जे थोडेबहुत व्यक्तिशः कांहीं घराण्यांचे कागद त्याला पहावयास मिळाले, त्यांवरूनही जेथें जेथें बखरींतील मजकूर सुधारतां आला तितका त्यानें सुधारण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचप्रमाणें त्यांनीं इंग्रजी साधनांचाही थोडाबहुत उपयोग केलेला दिसतो. परंतु इंग्रजी साधनें व फारसी व मराठी बखरी यांतिल जी बरीच विसंगतता त्यास आढळून आली त्यामुळें बखरींतील सरळ मजकूर घेण्याकडे त्यांनीं आपला कल ठेवलेला दिसतो. तसेंच ऐतिहासिक साधनांची परीक्षा व दर्जा ठरवून त्याप्रमाणें इतिहासलेखन करण्याइतका त्याचा व्यासंगही नसावासें वाटतें. सारांश, डफचाच प्रयत्न सर्व इंग्रजी इतिहासकारांत श्रेष्ठ आहे. परंतु माहितीच्या अभावीं व फारसी ग्रंथावरच विशेष भर राहिल्यामुळें त्यांत चुका झाल्या असून एकांगीपणाही शिरला आहे. डफच्या चुका हेतुपूर्ण नसल्या तरी जसा त्याचा साधनाभावीं नाइलाज होता, तसा त्याच्यांत मराठ्यांबद्दलचा इतिहास लिहितांना तितका आपलेपणाही असणें साहजिक नव्हतें. त्यामुळें विचारसरणीला न पटणारा इतिहास आपल्या कृतींत गोंवतांना त्याला त्याबद्दलची सावधानता बाळगण्याची जरूर भासली नाहीं किंवा त्याप्रमाणें इशारतही देण्याची निकड नव्हती. निदान डफला आपल्या चुकांबद्दल जाणीव असल्याचें तरी स्पष्ट दिसतें. परंतु विशेष लक्ष्यांत घेण्यासारखी गोष्ट म्हणजे त्यानें एतद्देशीय ग्रंथांतील ज्या अस्सल

अगर समकालीन फारसी साधनांवरून निदान कालनिर्देशाच्या बाबींतील तरी ज्या अनेक चुका सुधारण्याचा प्रयत्न केला आहे तो प्रयत्न घुढें कित्येक अर्वाचीन ग्रंथकारांना न समजल्यामुळें मात्र त्यांचेकडून अगदीं अक्षम्य अशा चुका झाल्या आहेत. इतर भाषेंत लिहिलेल्या ऐतिहासिक साधनांचीं इंग्रजी भाषांतरेंही विपुल आहेत. 'गव्हर्नमेंट सिलेक्शन्स्'* मध्येंही इ० सन १८१८ ते १८४५ पर्यंत जमविलेली माहिती 'मेमॉयर' वगैरेंचे रूपानें व सांपडलेल्या अवशिष्ट साधनांचे उतारेही देऊन दिली आहे. ती फार महत्त्वाची आहे. परंतु या पुराव्यापेक्षां अस्सल समकालीन साधनांवरच भिस्त ठेवणें चांगलें; कारण, या सर्व 'मेमॉयर्स'मध्यें डफचेंच अनुकरण विशेष केले आहे व त्यांत शिवशाहीस उपयुक्त अशी थोडीच माहिती आहे.

## १२ डच साधनें

डच लोकांचें हिंदुस्थानाशीं व्यापार करण्याकडे सन १५९२त प्रथम लक्ष वेधलें. इ० सन १५९४त हॉलंडमधील आमस्टरडम् येथील व्यापाऱ्यांनीं प्रथम संघ स्थापला व व्यापारार्थ योजना केल्या. नंतर आणखीही व्यापारी-संघ निघाले. परंतु या सर्वांचें एकीकरण करून त्या नवीन व्यापारी-मंडळास पूर्वेकडील व्यापाराचा पूर्ण अखत्यार डच सरकारनें एकवीस वर्षांच्या करारानें दिला. त्यांनीं इ० सन १६०२त पोर्तुगीजांशीं गोव्याजवळ एक भांडण केलें. नंतर इ० सन १६०५त मच्छलीपट्टणला वखार स्थापली. त्या नंतर त्यांनीं आस्ते आस्ते आपला शिरकाव करून घेण्यास सुरवात करून शिवशाहींत सुरत, बेंगुर्ला, कारोमांडल व मलबार किनाऱ्यावर कांहीं भागांत त्यांना व्यापार करतां आला. डच लोकांनीं पोर्तुगीजांच्या विरुद्ध व पुढें पुढें इंग्रजांच्या विरुद्धही अनेक लढाया दिल्या. पोर्तुगीज लोक स्थानिक लोकांशीं मिळून न रहातां त्यांच्यावर धार्मिक जुलूमजबरदस्ती करीत. उलट डच स्थानिक लोकांच्या धार्मिक भावनेला न दुखविण्याचें आश्वासन देत. हिंदी राजांना डच साहाय्य करीत व पोर्तुगीजांचा पाडाव करण्याचा प्रयत्न करीत. हिंदी लोकांना पोर्तुगीजांची जी फार दहशत वाटत होती ती डचांच्या

* A Hand Book of the Bombay Government Records by W. F. Kindersley, pp. 31-35 & 73-83.

मदतीमुळें पार नाहींशी झाली. डचांना इंग्रज व पोर्तुगीजांनीं हिंदुस्थानांत कायमची सत्ता स्थापूं दिली नाहीं. त्यामुळें या डच लोकांचा शिवशाहीशीं किंवा मराठ्यांशीं शेजारी या नात्यानें प्रत्यक्ष किंवा फार वेळ टिकणारा असा संबंध जडला नाहीं. डच लोकांनीं शिवाजी, आदिलशाह व भागानगरकर यांच्याशीं आपले लोक पाठवून नेहमीं बोलणीं लावलीं. डच डॉक्टर व प्रवासीही नेहमीं मुख्य मुख्य ठिकाणीं गेले असल्याचें समजतें. शिवाजीच्या इ० सन १६६५पर्यंतच्या हालचालींच्या वेळीं डच वेगुर्ल्यास होते. परंतु यांचा फारसा आंत शिरकाव झाला नाहीं. यावरून असें अनुमान बांधण्यास हरकत दिसत नाहीं कीं, यांच्या पत्रव्यवहारांत खास स्थानिक वृत्तें थोडीं असून तीही जबाबदार या नात्यानें लिहिलीं गेलीं नसावींत. डचांच्या व्यापाऱ्यांना अगर प्रवाश्यांना विजापूर, दिल्ली वगैरे ठिकाणीं शिवशाहीबद्दल मिळालेली माहिती एकपक्षीय व विपर्यस्त असण्याचा संभव आहे. मद्रास किंवा कारोमांडल किनाऱ्यावर मिळविलेली माहितीही विपर्यस्तच असणें साहजिक आहे. परंतु डच व्यापारी दक्षिण कर्नाटकांत बरेच दिवस व्यापार करीत होते. तेथील त्यांची माहिती महत्त्वाची आहे. परंतु बाकीची माहिती जरी समकालीन या दृष्टीनें महत्त्वाची असली तरी ती प्रमाण न मानतां एकपक्षीय असण्याचा संभव आहे हे जाणूनच तिचें परीक्षण केलें पाहिजे. अशा परिस्थितींत मराठ्यांच्या प्रकृतिस्वभावाची माहिती बरीच अविश्वसनीय वाटली तर नवल नाहीं. या ऐतिहासिक सामुग्रीचें महत्त्व असें आहे कीं, ज्या कालनिर्देशाच्या अभावीं मराठ्यांचा इतिहास विस्काळित व त्रुटित होऊन राहिला आहे त्या कालनिर्देशाला हीं साधनें फार महत्त्वाचीं ठरतील. यांतील दक्षिण कर्नाटकांतील माहिती समकालीन व स्थानिक असल्यानें महत्त्वाची आहे. सारांश, या डच साधनांतील प्रत्यक्ष मिळविलेली माहिती महत्त्वाची समजावी. परंतु सांगीवांगीवरून तयार केलेली माहिती सांगणाराच्या प्रकृतिस्वभावाप्रमाणें विकृत असणें साहाजिक आहे हें लक्षांत ठेवावें. याशिवाय या डच लोकांचा स्थानिक माहितीचा अहवाल लिहिण्याचा परिपाठ होता. त्यासाठीं ते स्वतंत्र माणूस नेमीत. अशा अहवालांत व प्रवासवृत्तांत आपल्या इतिहासांतील दुर्घट परंतु अज्ञात स्थलें ठकलण्यास योग्य अशी माहिती मिळूं शकेल.

डच कंपनीचा हिंदुस्थानाशीं झालेला पत्रव्यवहार वगैरे आमस्टरडम्, (Amsterdam), झीलंड (Zeeland), डेल्फ्ट् (Delft), रोटरडम् (Rotterdam) हूर्न (Hoorn) व एन्खुइझेन (Enkhuizen) या ठिकाणांहून होत असे. या सर्व ठिकाणचे सतरा (Deputies) उपाध्यक्ष आमस्टरडम् किंवा मिडलबर्ग (Middleburg) ला जमत. या सर्व ठिकाणीं निरनिराळा दप्तरखाना असे. परंतु सर्व पत्रव्यवहार वगैरेच्या नकला आमस्टरडम् व मिडलबर्गला जात. इ०सन १७९६त कंपनी मोडून डच सरकारानें सर्व कारभार आटोपला. इ० सन १८३२त डचांनीं कंपनीचा सर्व दप्तरखाना आमस्टरडमला 'वेस्ट इंडिअन स्कॉलर्स हाऊस'मध्यें जमा केला व इ० सन १८५१त मिडलबर्गचा 'कलोनिअल रेकार्डस'मधील दप्तरखानाही त्यांत सामील केला. नंतर हा सर्व संग्रह इ०सन १८५६त हेगला नेला. या संग्रहांतील व्यापारविषयक बऱ्याच संग्रहाचा नाश केला. जमाखर्च वगैरे नीट जोपासले आहेत. हा रिज्क्सरचीफ (Rijksarchief) संग्रह इ. सन १६२३ पर्यंत तारीखवार लावला आहे. सन १६२४ नंतरचा स्थलवारीनें म्हणजे सुरत, कारोमांडल, मलबार, वगैरे स्थलांच्या नांवानें लावला आहे. यांत १६३४ इसवीनंतर सामान्य हकीकतीचे अहवाल राखिले आहेत. या संग्रहांत एकंदर ५६४ बंडलें किंवा दसरें हिंदुस्थान-विषयक असून शिवशाहीकालीन आहेत. या संग्रहांतून जवळजवळ २००० कागदांच्या नकला करून इंडिआ ऑफिसमध्यें ठेवल्याचें समजतें. परंतु या नकला हिंदुस्थानाच्या इतिहासासाठीं म्हणून घेतलेल्या नसून ग्रेट ब्रिटनच्या इतिहासासाठीं मिळविल्या आहेत. या डचांच्या कागदांत इतर साधनांपेक्षां अधिक सविस्तर माहिती असते असा अनुभव आहे. या संग्रहांत पोर्तुगीज, स्पॅनिश व इंग्रजीही साधनें आहेत.* परंतु त्याबद्दल इतरत्र उल्लेख येणार आहे. डच साधनांतील बरींच साधनें त्यांचीं ज्या इतर राजांशीं तह व बोलणीं होत व कारस्थानें रचलीं जात त्याबद्दलचीं आहेत. त्यामुळें तीं बरींच महत्त्वाचीं आहेत. विशेषतः त्यांचा जो आदिलशाह वगैरेशीं गोव्याच्या पोर्तुगीजांविरुद्ध कारस्थान करण्याबाबत पत्रव्यवहार झाला तोही तेथें असल्याचें समजतें. शिवाय यांत खासगीही संग्रह असल्याचें दिसतें.

* Reports on the Records Relating to the East in the State Archives at the Hague by F. C. Danvers (Feb. 1894 Feb. 1895 & Dec. 1895.)

डचांचा हिंदुस्थानांतील कांहीं दप्तरखाना इंग्रज व पोर्तुगीज यांच्या हातीं लागला व अगदीं थोडाच हेगला जाऊन पोहोंचला. त्यांचा सुरत येथील दप्तरखाना व विशेषतः बेंगुर्ला व कर्नाटकांतील दप्तरखाना मिळता तर बरें होतें. त्याचा पत्ता जेव्हां लागेल तेव्हां लागो. पण सध्यां तरी तो आपणांला उपलब्ध नाहीं. परंतु जो उपलब्ध आहे त्याचें परीक्षण मराठ्यांच्या इतिहासाच्या दृष्टीनें अद्यापि कोणींच केलेलें नाहीं. असें परीक्षण झाल्यास पुष्कळ नवीन व महत्त्वाची माहिती त्यांत मिळेल यांत शंका नाहीं. हेग येथील संग्रह तपासण्यास एखाद्या अभ्यासूला निदान एक वर्ष तरी घालवावें लागेल असें दिसतें. लिस्बन, एव्होरा, गोवा येथेंही डच साधनें असल्याचें समजतें.

डच भाषेंतील प्रकाशित साधनांचा भरणाही बराच आहे. मुद्दाम लिहिलेल्या अहवालांचें प्रकाशन 'डाग रजिस्टर' या नांवाखालीं झालें आहे. या डाग रजिस्टरचे बरेच ग्रंथ प्रकाशित झाले असून त्यांत इसवी सन १६४० ते १८०७ पर्यंतचे अहवाल छापले आहेत. या ग्रंथांत बरीच उपयुक्त माहिती मिळते. विशेषतः शहाजीच्या कर्नाटकांतील हालचालींचें तर बरेंच सविस्तर वर्णन आढळतें. शिवाय डजंग ( de Jonge ) यानें इ० सन १५९५ ते १६१० पर्यंतचा व नंतर एल् व्हान डिवेंटर ( L. Van Deventer ) यानें इ० सन १६१० ते १८२० पर्यंतचा डच लोकांचा हिंदुस्थानांतील इतिहास गोंवला आहे. त्यांत बरींच डच साधनें छापलीं आहेत. या शिवाय कित्येक प्रवाश्यांच्या प्रवास-वृत्तांचे ग्रंथ आणि डच ईस्ट इंडिया कंपनीच्या सफरींच्या वर्णनाचीं पुस्तकें इंग्रजींत भाषांतरित केलेलीं आढळतात. डचांनीं बराच ग्रंथ-संग्रह प्रसिद्ध केल्याचें समजतें. परंतु डच भाषेच्या अज्ञानामुळें आपणांस शिवशाहीच्या उपयोगास योग्य असे ग्रंथ नेमके उचलतां येत नाहींत. परंतु सर्व प्रकाशित ग्रंथांत जो मजकूर दिला गेला आहे तो हिंदुस्थानाच्या इतिहासास उपयोगी पडेलच असें नाहीं. कारण तो मजकूर रचतांना रचणाराची दृष्टि हॉलंडच्या इतिहासाकडे विशेष होती. त्यामुळें ग्रथित केल्या गेलेल्या माहितींत बरेच खंड-भेद आढळतील व शेवटीं मूळ डच साधनांचाच अभ्यास करावा लागेल यांत शंका नाहीं. इंडिया ऑफिसमध्यें जी डच सामुग्री आहे ती 'हेग ट्रान्सक्रिप्टस्' म्हणून ओळखली जाते. त्यांतील बराच भाग इंग्रजींत भाषांतरित केला आहे.

मराठ्यांच्या इतिहास-रचनेस डच साधनांचा अभ्यास अवश्य आहे. अशा साधनांचा अभ्यास एकाद्या डच भाषाभिज्ञानें करण्यास सुरुवात केली पाहिजे. डच भाषा जाणणाऱ्यांची जर या कामांत मदत न होईल तर शिवशाहीचा इतिहास पूर्ण होणार नाहीं. परंतु कोणत्याही साधनांचें परीक्षण वरवर केलेलें नसावें. बेठ म्हणून किंवा प्रौढी म्हणून आम्हीं हीं साधनें पाहिलीं आहेत असें सांगणारांचा या साधन-परीक्षणांत फारसा उपयोग होणार नाहीं. म्हणून डच साधनें भाषांतरित होणेंच आवश्यक आहे. हीं साधनें भाषांतरित झालीं तर त्यांची सूक्ष्म दृष्टीनें छाननी करणाऱ्या संशोधकांना त्यांचा योग्य तो उपयोग करून घेतां येईल. परंतु संशोधनाची सूक्ष्म-दृष्टि येण्यास इतिहासाच्या इतर साधनांचा व इतर बारीक सारीक गोष्टींचा पूर्ण अभ्यास झाला असला पाहिजे. परंतु हा अभ्यास व डच भाषाभिज्ञता या दोन्हीही गोष्टी एके ठिकाणीं सांपडणें दुरापास्त आहेत. म्हणून डच साधनांचें भाषांतर होणें जरूर आहे.

डच साधनांतील तारखा केव्हां केव्हां नवीन पद्धतीप्रमाणें व क्वचित्-प्रसंगीं जुन्या पद्धतीनेंही दिल्या असण्याचा संभव आहे. डच ही केवळ चित्रभाषा नसल्यानें यांतील उच्चारभेद कमी प्रमाणांत आढळतात. गांवांच्या आणि नांवांच्या चुका डचांच्या साधनांत झाल्या नाहींत असें नाहीं. परंतु त्या फार अल्प प्रमाणांत आहेत. तसेंच इंग्रजी लिखाणांत जे व्यक्ति अगर प्रकृतिदोष आढळून येतात त्याप्रमाणें डच साधनांतही आढळतात. डच भाषेच्या अज्ञानामुळें व विशेषतः डच भाषेंतील हस्त-लिखित साधनें प्रत्यक्ष परीक्षणास न मिळाल्यामुळें डच लेखनांतील सामान्य प्रघाताबद्दल विवेचन करणें शक्य झालें नाहीं.

## १३ पोर्तुगीज साधनें

शिवकालीन इंग्रज व डच लोकांचीं साधनें केवळ राजकीय स्वरूपाचीं नसल्यामुळें त्यांतील मजकुरांत फारशा राजकारणी लटपटी नसत. परंतु पोर्तुगीज हे शिवशाहीच्या पूर्वीं पासूनच राज्यकर्ते म्हणून प्रसिद्धीस आलेले होते. या राज्याचा ऱ्हास शिवशाहीबरोबरच सुरू झाला. पोर्तुगीजांचा अंमल गोवा, बारदेश, साष्टी वगैरे प्रांतांत असून उत्तर कोंकणांत मुंबई-चौल ते सुरतपर्यंत-

च्या सर्व किनाऱ्यावर त्यांचाच अंमल चालू होता. त्यामुळें पोर्तुगीजांच्या या प्रदेशांतील साधनांत राजकीय कारस्थानें व लटपटी सांपडणें शक्य आहे. म्हणून इंग्रज किंवा डच या लोकांच्या शिवशाहीच्या साधनांपेक्षां पोर्तुगीज साधनांची व्याप्ति जशी अधिक, तशीच या साधनांच्या परीक्षणांत काळजीही अधिक घ्यावी लागते. गोव्याचा व्हाइसरॉय हा पोर्तुगीजांच्या हिंदुस्थानांतील वसाहतीचा मुख्य अधिकारी होता. म्हणून पोर्तुगीजांच्या हिंदुस्थानांतील सर्व मुलुखांतील हकीकत गोव्याला पत्रव्यवहाररूपानें जाणें साहजिक होतें व गोवेकर पोर्तुगालच्या राजाला जबाबदार असल्यानें त्यांचे मासिक व वार्षिक अहवाल पोर्तुगालला जात व त्यांचीं प्रत्युत्तरें गोव्यास येत. गोवेकर पोर्तुगीजांकडे समुद्रावरील पूर्ण वर्चस्व सतराव्या शतकाच्या मध्यापर्यंत राहिलें होतें. त्यामुळें समुद्रांतील व्यापारी व इतर गलबतांस जा-येस दस्तक देणें, आपल्या मुलुखांतील रयतेस हुकूम काढणें, सनदापत्रें देऊन जहागिरी चालविणें, शेजारच्या सत्ताधीशांशीं तहादिक बोलणीं लावणें किंवा झगडणें, कर बसविणें वगैरे सर्व व्यवहार यांचे मुलुखांत चालू असल्यामुळें पोर्तुगीज दप्तरांत निरनिराळ्या प्रकारचे कागदपत्र सांपडणें शक्य आहे.

शहाजी व पोर्तुगीज यांचे संबंध किंचित् शत्रुत्वाचे होते. शिवाजीनें पोर्तुगीजांशीं पुष्कळसें सलोख्याचें धोरण स्वीकारलें होतें. कधीं कधीं थोडेंबहुत झगडावें लागे. वैमनस्य मात्र तितकें वाढलें नव्हतें. परंतु संभाजीचे कारकीर्दींत पोर्तुगीजांचा नायनाट केल्याशिवाय मराठी राज्याचा बचाव होणेंच शक्य नाहीं अशी परिस्थिति पोर्तुगीज व औरंगजेब एक झाल्यामुळें उत्पन्न झाली. त्यामुळें पोर्तुगीजांचें व संभाजीचें अगदीं हाडवैर आलें व शेवटीं पोर्तुगीजांचा बराच ऱ्हास झाला. अशा परिस्थितींत पोर्तुगीजांच्या साधनांत शहाजीविरुद्ध थोडीबहुत तेढ दिसते. शिवाजीशीं सलोखा दिसतो. परंतु संभाजीचें नांवही अपशब्दाच्या जोडीशिवाय घेण्याइतकी त्यांच्या मनाची शांतवृत्ति रहात नाहीं. अर्थात् इतिहासाला असली अतिशयोक्ति काढून टाकल्याशिवाय चालणार नाहीं. आणखी एक विवक्षित दोष या पोर्तुगीज साधनांतून स्पष्ट दिसतो. पोर्तुगीजांचें ख्रिस्ती कॅथोलिक धर्मावर आत्यंतिक प्रेम होतें. कदाचित् पोर्तुगीजांचें हिंदुस्थानांतील राज्य त्यांच्यांतील कडव्या धर्माभिमानी पुरोहित भिक्षूंचे हातीं होतें असें म्हटलें तरी

चालेल. त्यामुळें हिंदु व मुसलमान रयतेवर या लोकांचे फार जुलूम होत. परंतु हे जुलूम वस्तुतः जुलुम नसून ते पुण्यमार्ग होत असे ते मानीत. यांच्या त्या-वेळच्या 'ननरी' व 'मोनेस्टरी' या संस्थांमुळें राज्यांतील नैतिक आचरण बिघडलें होतें. प्रत्येक धर्माभिमानी 'फादर' पैसे लुबाडण्याच्या मागें लागला होता. त्यामुळें या लोकांनीं लिहिलेल्या अहवालांतील मजकूर खोटा, बनावट व जाणूनबुजून विपर्यास केलेला असा आढळतो. त्यांत हिंदु व मुसलमान धर्माची व रीतीरिवाजाची निंदा केलेली आढळते. ठाणेदारांच्या पत्रव्यवहारांतही वस्तुस्थितीचा मुद्दाम विपर्यास केलेला असतो. त्यामुळें या पोर्तुगीज साधनांतील पत्रव्यवहारांत वगैरे जी स्थानिक माहिती दिलेली असते ती इंग्रज बखारवाल्यां इतकी सहज प्रमाणभूत मानणें चुकीचें ठरतें. परंतु मोगल, आदिलशाह, शिवाजी, वगैरेबरोबर यांचे जे सरकारी करारमदार वेळोवेळीं झाले त्यांत बरीच ऐतिहासिक सामुग्री मिळेल.

गोवा दप्तर हें एक अत्यंत महत्त्वाचें असें ऐतिहासिक साधनांचें फार मोठें आगर आहे. विशेषतः आनंदाची गोष्ट ही कीं, ह्या दप्तराची व्यवस्था नीट ठेवण्यांत आली असून त्यांचें फेरिस्त करण्याचा विचार चालू आहे. त्यांतील महत्त्वाचा भाग छापून काढण्याकरितां तेथील सरकारनींच खास खटपट चालू केली आहे. जवळ जवळ दीड-दोन हजार रुमाल भरतील इतकी साधन-सामुग्री आहे. या दप्तरांतील कागदपत्रें वाचतांना आपणांला नेहमीं ही गोष्ट लक्षांत ठेवावी लागते कीं, तीं एकपक्षीय असतात किंवा प्रतिपक्षीयत्वाच्या भावानें लिहिलेलीं असण्याचा संभव आहे. तेव्हां अशा कागदपत्रांचा इतिहासांत उपयोग करितांना, विशेषतः एकमेकांबद्दलच्या तक्रारींचा मजकूर फार सावधगिरीनें वाचला पाहिजे. तसेंच त्यांचे गुप्त बेत व हेतु या कागदपत्रांवरून स्पष्ट होण्याचा बराच संभव आहे. परंतु अडचण ही कीं, असलीं कागदपत्रें परीक्षण्यास मराठ्यांच्या इतिहासाच्या रचनेंत बरीच प्रगति झाली पाहिजे. नाहीं तर गुप्त हेतूंचें वगैरे कोडें उकलणें तितकें शक्य होणार नाहीं. गोवा दप्तरांत थोडेबहुत इतरही खासगी पत्रव्यवहार असावेत. लिस्बनचे खास राजदरबारांतील कागदही फार महत्त्वाचे आहेत.

पोर्तुगीज-संग्रह लिस्बन व एव्होरा येथें आहेत. एव्होराच्या 'पब्लिक लायब्ररीं'त बराच संग्रह आहे. या संग्रहांतूनच कुंज ? रिव्हारा (J. H. da Cunha

Rivara) यानें आर्काइव्ह पोर्तुगीज ओरिएंटल (Archivo Portuguez Oriental) या नांवाचे सहा साधनग्रंथ तयार केले आहेत. त्यांत हिंदुस्थानविषयक माहिती आहे. लिस्बन येथील 'ॲक्याडेमिक रिअल देस सायन्सिस' (Academic Real des Sciences) या संस्थेच्या संग्रहांतही कांहीं इतिहासोपयोगी साधनें आहेत. ही संस्था उपयुक्त साधनसंग्रह जशाचा तसा व संपूर्णच छापते. यांतील इ० सन १६४९ ते १६७७ पर्यंतचे हिंदुस्थानची ऐतिहासिक माहिती देणाऱ्या साधनांचे ग्रंथ महत्त्वाचे आहेत. लिस्बनच्या सरकारी दप्तरखान्यांत 'टार दो टामो' (Tarre do Tombo) व 'बिब्लिओथिका नॅशनल' (Bibliothica National) हे दोन संग्रह फार जुने आहेत. 'टार दो टामो' हें संग्रहालय १३व्या शतकापूर्वीचें असून त्यांत पुष्कळ संग्रह होता. परंतु त्यानंतर त्याला १६व्या शतकांत आग लाग्न त्यांतील कांहीं संग्रह जळाला. इ० सन १७५५त जो धरणीकंप झाला त्यांत मुद्दाम बांधलेल्या नवीन संग्रहालयाचाही नाश झाला व त्याबरोबर बराच संग्रह नाहींसा झाला. परंतु जो कांहीं संग्रह त्या मातीच्या वगैरे राशींतून काढून सेंट बेंडिक्टच्या मोनेस्टरींत ठेवला होता तो नंतर इ० सन १७५७त हल्लींच्या जागीं आणला. या संग्रहांत आणखीही कांहीं संग्रहांची भर पडली व हल्लीं या संग्रहांत [१] 'डॉक्युमेंटस् रेमिटिडो' (Documents Remittidos), [२] 'कार्पो क्रोनालॉजिको' (Corpo Chronologico), [३] 'गव्हेटा ॲंटिगा' (Gavetas Antigas), [४] 'कार्टा मिसिव्हा' (Cartas Missivas), आणि [५] कार्टा डो विस रीस (Cartas dos Vice Reis) असे पांच भाग असून यांतच बायकरनें (Biker) 'ट्राबोदा द इंडिआ' (Trabodos da India) नांवाचे जे ग्रंथ छापले त्यांचे मूळ साधनांचे वगैरे ८० ग्रंथ आहेत. या संग्रहांतील 'डॉक्युमेंटस् रेमिटिडो'चीं मूळ २०० बांधीव पुस्तकें होतीं; व त्यांत हिंदुस्थानाला लिहिलेल्या व हिंदुस्थानांतून लिस्बनला गेलेल्या पत्रांचा संग्रह होता. या २०० पुस्तकांपैकीं बहुतेक गोव्याला पाठविलीं व ६२ पुस्तकें या संग्रहांत ठेवलेलीं आहेत. या ६२ पुस्तकांत इ०सन १६०५ ते १६९७पर्यंत हिंदुस्थानाहून लिस्बनला गेलेल्या पत्रांचा संग्रह केलेला आहे. यांत एकंदर १२,४६५ पत्रें असून त्यांतील कांहीं भाग 'ॲकॅडेमिक रिअल सायन्सिस'नें छापले आहेत.

या संग्रहांतील इंग्रजांना उपयुक्त अशा साधनांच्या नकला करून त्या भाषांतरितही केलेल्या इंडिआ ऑफिसमध्यें ठेवल्या आहेत. परंतु या नकलांचा शिवशाहीच्या इतिहासाला फारसा उपयोग होणार नाहीं. कारण या सर्व नकला इंग्रज कंपनीच्या इतिहासापुरत्याच केलेल्या आहेत. हा संग्रह हिंदुस्थानच्या इतिहासाला अत्यंत महत्त्वाचा आहे. 'कार्पो क्रॉनोलोजिको'च्या संग्रहांत इ० सन ११३७ ते १६४८ पर्यंतचीं साधनें आहेत. यांत गोव्यांतील व पोर्तुगीजांच्या इतर भागांतील लोकांस व अधिकाऱ्यांस काढलेले कांहीं थोडे जाहिरनामे वगैरे आहेत. याही भागांतील कांहीं साधनांच्या नकला इंडिया ऑफिसमध्यें ठेवून त्या भाषांतरित केलेल्या आहेत. 'गव्हेटा अँटिगा'चा संग्रह म्हणजे 'टार दो टामो'चा मूळचा जुना संग्रह. यांत शिवशाहीस उपयुक्त असे थोडेच कागद सांपडूं शकतील. 'कार्टा मिसिव्हा' व 'कार्टा दो विस रिस'मध्यें जो संग्रह आहे तो किरकोळ स्वरूपाचा असून त्यांतील थोडाच हिंदुस्थानच्या इतिहासाला उपयोगास येईल. 'बिब्लिओथिका नॅशनल'च्या दुसऱ्या मुख्य संग्रहाचे दोन भाग आहेत. [१] 'अँटिगा कॉन्सेलो अल्ट्रामरिनो' (Antiga Conselho Ultramarinos) व 'पोंबल कलेक्शन' (Pombal Collection). यांतील पहिल्या भागाचे दोन पोट विभाग पाडले आहेत. त्यांतील दुसऱ्या उपविभागांत हिंदुस्थानविषयक बरीच माहिती सांपडते. हीं साधनें इ० सन १६०३ ते १८२३पर्यंतचीं आहेत. या भागांतील कांहीं साधनांच्या नकला 'इंडिया ऑफिसां'त भाषांतरासह ठेवल्या आहेत. 'पोंबल कलेक्शन'मध्यें बरेच जुने इतिहासग्रंथ सांपडतात. यांत सुमारें ७५७ बांधीव पुस्तकें आहेत. या लिस्बनच्या संग्रहाशिवाय 'इंडिया ऑफिस रेकॉर्डस्' मध्यें 'पोर्तुगीज इन् इंडिया' (Portuguese in India-Disputes with the English regarding Bombay etc. 1661-1725) असें दप्तर आहे. त्यांत इ० सन १६६१ ते १७२५पर्यंतच्या पोर्तुगीज व इंग्रज यांच्यामधील भांडणांचे कागदपत्र आहेत. इंडिया ऑफिसमध्यें जीं पोर्तुगीज साधनें आहेत तीं 'पोर्तुगीज ट्रान्सक्रिप्टस्' म्हणून ओळखलीं जातात.*

*Ms. Notes of F. C. Danvers on the Portuguese Records of India. Vols. I to III (Aundh Archives) & Report on India Office Records 1898 by F. C. Danvers.

पोर्तुगीज साधनें विपुल आहेत. कारण पोर्तुगीजांचा हिंदुस्थानशीं आणि विशेषतः महाराष्ट्राशीं बराच संबंध जडला होता. परंतु या सर्व साधनांचा चांगला अभ्यास करून तो इतिहासाच्या उपयोगाला आणण्याचा प्रयत्न दुर्घट असला तरी तो प्रयत्न साध्य आहे. या अव्वल पत्रव्यवहाराखेरीज प्रवासवृत्तें व व्यक्तिवृत्तान्त बरेच सांपडूं शकतील. कित्येक प्रसिद्धही झालेले आहेत. त्यांतील बरेच 'कलकत्त्याच्या इंपेरिअल लायब्ररी' व 'मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटी'च्या पुस्तक-संग्रहांच्या याद्यांवरून व आयर्विननें "स्टोरी द मोगरला" जी महत्त्वाची ग्रंथसूची जोडली आहे त्यावरूनही शिवकालीन असल्याचें दिसतें. परंतु त्या पुस्तकांतील प्रत्यक्ष माहिती झाल्याशिवाय त्याबद्दल आजच लिहितां येत नाहीं.

डॉ० कुज व डॅनव्हर्स यांचे पोर्तुगीज संग्रहावरून पोर्तुगीजांच्या इतिहासाबाबतचे ग्रंथ बरेच महत्त्वाचे आहेत. परंतु साधनांची व लेखनाची व्याप्ति बरीच संकुचित राहिल्यामुळें त्यांत बरीच एकपक्षीयता व चुका दृष्टीस पडतात. प्रो०सेन व पिंसुर्लेकर यांचा या पोर्तुगीज साधनांवरून शिवशाहीचा इतिहास लिहिण्याचा व उपयुक्त साधनांचें प्रसिद्धीकरण करण्याचा उपक्रम चालू आहे. यायोगें मराठ्यांच्या इतिहासांत बरीच भर पडणार आहे.

पोर्तुगीज साधनांच्या परीक्षणांत बरीच सावधगिरी बाळगावी लागेल. पोर्तुगीज लोकांच्या साधनांत इंग्रजी साधनांतील इतर दोषांसारखे दोष आढळतील. यांच्या पंचांगपद्धतीच्या दहा दिवसांच्या फरकामुळें कधीं कधीं इंग्रजी व पोर्तुगीज साधनांच्या तारखांतील तफावत नजरेस पडेल. परंतु या सर्व फरकांपेक्षां पोर्तुगीज साधनांची विविधता मात्र साधनपरीक्षणांत बरीच सावधगिरी ठेवण्यास लावते. पोर्तुगीज हे राज्याधिकारी असल्यानें त्यांचीं सनदापत्रें, कायदे वगैरे प्रकारचीं साधनें उपलब्ध होतात. सनदापत्रें वगैरेसारखीं पत्रें आलीं कीं त्यांत वाद आले, निकालांतील एकपक्षीयता आली, नकलांतील दोष वगैरे व्यवहारांतील अनेक लटपटी त्यांत आल्या. या सर्वांचा समावेश जाणूनबुजून करण्यांत येत असल्याने तो काढून टाकणेही तितकेंच कठीण असतें. सारांश, व्यवहारोपयोगी पत्रव्यवहारांतील विविधतेमुळें जसा साधनांतील भाव ओळखून मूलार्थ शोधावा लागतो. त्याचप्रमाणें पोर्तुगीज व महाराष्ट्रांतील इतर राष्ट्रें यांचे जे अनेक तऱ्हांचे संबंध जडले त्यामुळें पोर्तुगीजांच्या राजकीय दप्तरांतील राजकारणी पत्रव्यवहारांतीलही

भावार्थ जाणल्याशिवाय साधनांच्या उपयुक्ततेबद्दल कोणताही निर्णय करणें बरोबर होत नाहीं. पोर्तुगीजांच्या पत्रव्यवहारांत मुख्य गोष्ट लक्षांत ठेवाबयाची असते ती ही कीं, गोंव्यांतील पोर्तुगीज अधिकारी पोर्तुगालच्या राजाला जबाबदार असत. त्यामुळें ते जेव्हां जेव्हां तिकडे बातमी देत त्यावेळीं आपली बाजू सांवरून धरून पोर्तुगालमध्यें आपला दर्जा कायम रहावा अशाच प्रकारचे त्यांचे अहवाल जात. शत्रुपक्षाकडील हकीकत तितकी सविस्तर न देणें, स्वतःच्या कामगिरीचा उल्लेख करितांना त्यांत विशेषच तिखटमीठ लावणें वगैरे दोष यांच्या लिखाणांत सर्वत्र आढळतात.

## १४ फ्रेंच व इतर युरोपीय साधनें

शिवशाहीच्या इतिहासाला उपयोगी पडण्यासारखीं इतर युरोपीय भाषांतूनही साधनें असल्याचें त्यांच्या इंग्रजी भाषांतरावरून समजून येत आहे. राहिलेल्या युरोपीय भाषांतील साधनांत फ्रेंच साधनांचाच भरणा विशेष असल्याचें दृष्टोत्पत्तीस येत आहे. शिवशाहीच्या कालांत फ्रेंच, स्पॅनिश, इटालिअन, डॅनिश वगैरे लोकांचा हिंदुस्थानाशीं फारसा संबंध जडला नव्हता. फ्रेंचांची एक वखार सुरतेला व एक कारोमंडल किनाऱ्यावर होती. स्पॅनिश लोकांचा पोर्तुगीजांमुळें मध्यंतरीं थोडासा संबंध जडला होता. परंतु पोर्तुगीजांनीं आपल्या हद्दींत स्पॅनिश लोकांचा मुळींच शिरकाव होऊं दिला नाहीं. मात्र बरेच लोक नोकरीनिमित्तानें अगर प्रवासी म्हणून इकडे येत. फ्रेंच फादरांची योजना कडव्या पोर्तुगीज फादरांबद्दल होत असे. फ्रेंच फादर कर्नाटकांत बरेच होते. ते १६ व्या शतकाच्या अखेरीपासूनच इकडे आले होते. त्यामुळें या फादर लोकांचीं आत्मवृत्तें किंवा इष्ट-मित्रांस धाडलेलीं स्थानिकवृत्तें बरीच सांपडतील. फ्रेंच प्रवाशांचे वृत्तान्तही बरेच सांपडूं शकतील. ट्राव्हर्नीअर (१६४२–६६), बर्नीअर (१६५५- १६६७), थेवनो (१६६५- १६६७), डेलन (१६६९–१६७६), करे (१६६८- १६७३), डिला व्हेल (१६७०--१६७४), कार्ट्र यांचीं व अशाच तऱ्हेचीं आणखीही प्रवासवृत्तें इंग्रजींतून आपल्या उपयोगास येत आहेत. या यादीवरून फ्रेंच प्रवासी सारखे हिंदुस्थानांत येत होते. ते विशेषतः मालाची ने-आण करण्याचेंच काम करीत; त्यामुळें यांच्या गलबतांना पोर्तुगीज, इंग्रज वगैरेंच्या बंदरांत फारशी मनाई नसे. मनुशी, वगैरे

मंडळीही नोकरी-निमित्तानें इकडे येऊन राहिली होती. परंतु ही जी नोकरी-निमित्तानें मंडळी येत त्यांपैकीं कित्येक मोगल, आदिलशहा, कुत्बशहा, शिवाजी वगैरेंच्या पदरीं रहात. नोकरीस राहणाऱ्या या व पोर्तुगीज, इंग्रज आणि डच लोकांचा पेशा तेवढा चांगला नसे. कारण त्यांतील बहुतेक गुन्हेगार-मंडळींतील असून देशत्याग करणारीं असत. या लोकांची नीति चांगली नसे. ते मुसलमान बायांशीं वगैरे लग्नें लावीत व शेवटीं मुसलमानही बनत. स्वतंत्रषणामुळें व्यसनी बनत, धर्म पाळीत नसत व यांची व्यभिचाराकडे अधिक प्रवृत्ति राही. असें तत्कालीन प्रवासी यांचें वर्णन देतात.* आणि हीं वर्णनें सत्याला बरींच धरून आहेत. त्यामुळें या लोकांचा फार थोडा पत्रव्यवहार सांपडेल; व जो कांहीं असेल त्यांत अतिशयोक्ति व बेजबाबदार-पणाच अधिक दिसून येईल. आत्मसमर्थनार्थ ते त्यांत बाटेल ती खोटी व बनावट गोष्ट सांगण्यास मागेंपुढें पाहात नाहींत. या साधनांत प्रवास-वृत्तांचाच भरणा विशेष असण्याचा संभव आहे. यांत स्थानिक परिस्थिति समजूं शकेल; परंतु हीं साधनें तपासतांना बरीच सावधगिरी बाळगावी लागेल, व इंग्रजी प्रवाशांबद्दलच्या ज्या कांहीं सामान्य गोष्टी वर सांगितल्या त्या सर्व या प्रवाशांनाही लागू पडतील. जर्मन-भाषेंत इतिहास लिहिल्याचें प्रसिद्ध झालेंच आहे. स्पॅनिश-संग्रहांत पोर्तुगालच्या संग्रहांतून गेलेला संग्रह उपलब्ध होईल.

युरोपीय साधनांबद्दल थोडीबहुत जी माहिती देण्यासारखी होती ती वर आलीच आहे. हे सर्व संग्रह पुन्हा तपासले गेले पाहिजेत. अशी तपासणी केली म्हणजे विशेष खात्रीपूर्वक अशी साधनांची व्याप्ति सांगतां येईल. युरोपीय साधनांची तपासणी करणें पुष्कळ सोपें जातें. स्वदेशीय साधनांचें मात्र तसें नाहीं. स्वदेशाच्या इतिहासाला स्वदेशीय साधनांचें महत्त्व जितकें अधिक असतें तितकेंच तीं तपासून उपयोगास आणणें कठीण असतें. याचाच विचार आतां करावयाचा आहे.

## १५ स्वदेशीय साधनें

शिवशाहीशीं संबंध जडलेलीं सर्व युरोपीय राष्ट्रें अद्यापही जिवंत आहेत.

* A New Account of East India and Persia, 1662-168!-Travels of John Fryer-Hakluyat Series.

त्यांच्या राजधान्यांवर परचक्रांनीं धाड घातली नाहीं व अग्निदेवाची कधीं अवकृपा झाली नाहीं. त्यामुळें या युरोपीय लोकांजवळील कागदपत्रांचा वगैरे साधनसंग्रह शाबूत राहूं शकला. परंतु एतद्देशीय राजकीय व इतर दप्तरांची त्या त्या राज्यांच्या ऱ्हासाबरोबर राखरांगोळी झाली. शिवशाहीशीं संबंध असलेलीं आदिलशाही, कुत्बशाही व मोगली अशीं तीन मोठीं राज्यें साम्राज्यें होतीं. इतरही थोडींबहुत नायक, रामनगरकर वगैरेंचीं लहान लहान मांडलिकी राज्यें होतीं. परंतु आदिलशाही व कुत्बशाही शिवशाही संपण्यापूर्वीच पार निकालांत निघालीं. मराठ्यांनीं मोगली साम्राज्याला पायबंद देऊन शेवटीं नामशेष करून टाकलें. इंग्रजींत तर ते साफ नाहींसें झालें. खास शिवशाहीवर संभाजी मरतांच गंडांतर कोसळलें. त्यानंतर कसेंबसें सांवरून मोगली साम्राज्याच्या ऱ्हासावर मराठशाहीची उभारणी झाली. रामनगर व इतर लहान लहान राज्यें शिवशाहींतच नष्टप्राय होऊन गेलीं व त्यांचा राजकीय दप्तरांचा नाश झाला.

आदिलशाही व कुत्बशाही दप्तर मोगली परचक्रांत नाहींसें झालें. शिवशाहींतील खास शिवशाहीचा दप्तरखाना रायगडावर प्रथम निकालांत निघाला. नंतरचा जिंजींत गडप झाला. इतकेंच नव्हे तर मोरोपंतादि सरकारकून शिवाजीचे कोण अधिकारी होते हें समजण्याइतकेही* कागदपत्र खास शिवाजीच्या नातवाच्या म्हणजे शाहूच्या हातीं लागूं शकले नाहींत. शिवाजीचे मुख्य दप्तरखाने सरकारकुनांचे घरीं होते ही गोष्ट खरी आहे. परंतु राजधानी फस्त होतांना किंवा शत्रूकडून लुटली जातांना अग्नीला अगर शत्रूला राजा व सरकारकून हा व्यक्तिशः भेदभाव बाळगण्याचें कारण नव्हतें. हिंदुस्थानांतील शिवकालीन युद्धनीतिच अशा प्रकारची होऊन राहिली होती कीं, प्रथम जाळपोळ व नंतर हातघाई. त्यामुळें नुसतींच राजकीय दप्तरें उद्ध्वस्त झालीं इतकेंच नाहीं तर सर्व महत्त्वाच्या ठाण्यांबरोबर तेथील ठाणेदारांचीं व देशमुखादि सर्व कर्त्या लोकांचींही दप्तरें नाहींशीं झालीं. परंतु ही परिस्थिति मराठशाहींत किंवा पेशवाईत न राहिल्यामुळें किंवा शत्रूचें ठाणें घरांतून किंवा महाराष्ट्रांतून उठल्यामुळें पुढील म्हणजे शाहूपासूनचे दप्तरखाने सुरक्षित

* शाहूमहाराजांची रोजनिशी, खंड १, पृष्ठ ४१—वाड.

राहिले. परंतु त्याच्याशीं प्रस्तुतच्या चर्चेचा संबंध नसल्यामुळें त्याबद्दलचा येथें विचार करण्याचें प्रयोजन नाहीं. शिवशाहींत अधिकार परंपरेनें एकाच घराण्यांत चालत असत. त्यामुळें राजकीय महत्त्वाचीं साधनें एकाच घराण्यांत व एकत्रित मिळण्याचा पुष्कळसा संभव होता. परंतु ह्या घराण्यांचें मुख्य राहणें राजधानींत होत गेल्यामुळें हाही संभव नाहींसा झाला आहे. इतकेंच नव्हे, तर या घराण्यांतील तत्कालीन खासगी पत्रव्यवहारालाही आजचा महाराष्ट्र मुकला आहे. तसेंच हीं शिवकालांत नांवारूपास चढलेलीं घराणीं पेशवाईत अगदीं नामशेष झाल्यानें त्यांच्या घराण्यांतील परंपरेच्या ऐतिहासिक माहितीचा वगैरेही धागादोरा पार तुटून गेला आहे. अशा परिस्थितींत संशोधकांची राजकीय दप्तरखाना हातीं लागण्याची आशा समूळ नाहींशी झाली आहे. नाहीं म्हणण्यास महाराष्ट्रांतील किंवा हिंदुस्थानांतील ऐतिहासिक अस्सल व समकालीन साधनांचा अवशेष फक्त व्यक्तिगत परंतु कमी महत्त्वाच्या किंवा संबंधाच्या घराण्यांतील खासगी दप्तरांतील राजकीय सनदापत्रांत उरला आहे. तो साध्य करून घेणें जरूर आहे.

परंतु अशा खासगत दप्तरांतीलही महत्त्वाचा भाग इंग्रजी अधिकाऱ्यांच्या हातीं लागतांच कोठें 'मॅकेन्झी कलेक्शन' तर कोठें 'ऑर्म कलेक्शन' या नांवाखालीं 'ब्रिटिश म्यूझिअम्'मध्यें अधिष्ठित झाला आहे. तसेंच कोठें 'लेज कलेक्शन्' यासारख्या नांवांनीं एडिन्बर्ग वगैरेंच्या विश्वविद्यालयांत जाऊन पाहुणचार खात आहे. पारिस-म्युझिअममध्येंही तो निरनिराळ्या नांवाखालीं प्रदर्शित होत आहे. खरें पाहिलें तर असले संग्रह केवळ हिंदुस्थानच्या इतिहासास महत्त्वाचे असल्यानें हिंदी सरकारनें पुन्हा हिंदुस्थानांत परत आणून ठेवण्याची खटपट करावयास पाहिजे. परंतु याच्या उलटच क्रिया घडत असल्यामुळें हे समुद्रपर्यटन करून गेलेले संग्रह हिंदुस्थानांत परत येऊन राहण्याची आशा तितकी धरवत नाहीं. परंतु ही गोष्ट कालांतरानें तरी घडवून आणली पाहिजे यांत शंका नाहीं.

हा परदेशांत गेलेला स्वदेशीय संग्रह सोडल्यानंतर जो कांहीं अवशिष्ट राहिला, त्यांतील बराच महत्त्वाचा मोठा भाग एलिनिएशन दप्तरांत सरकारनें हस्तगत करून तो खास चौकीपहाऱ्यांत ठेविला आहे. 'इनाम कमिशन'च्या रिपोर्टावरून असें स्पष्ट दिसतें कीं, हा संग्रह जेव्हां गोळा करण्यांत आला

तेव्हां त्यांतील कांहीं थोडा भाग अव्यवस्थित कारभारामुळें नाहींसा झाला. परंतु जो कांहीं पुढें राहिला तो मात्र नीट बंदोबस्तांत ठेविला आहे यांत शंका नाहीं. परंतु या बंदोबस्ताची जितकी जरुरी आहे तितकीच त्या संग्रहाचे फेरिस्त होण्याची जरुरी आहे. नुसती या संग्रहाची विल्हे कशी लावावी याबरच जो खर्च झाला तो जर फेरिस्त करण्यांत लावला गेला असता तर आतांपर्यंत दोन फेरस्ते तयार झाले असते. तसेंच कोणत्याही संग्रहाची एका विवक्षित माणसाकडून निवड करून त्या संग्रहाच्या इतिहासोपयुक्ततेचा निर्णय करणें अगदीं अशास्त्रीय व असंभजसपणाचें आहे; इतिहासाचा सर्वांगीण अभ्यास करणारा इतिहासज्ञ मिळणेंच दुरापास्त आहे आणि त्यांतल्या त्यांत मराठ्यांच्या अज्ञात इतिहासांत सर्वांगीण प्राविण्य प्राप्त झालेला इतिहासज्ञ तर सांपडणें अगदींच अशक्य आहे. सारांश, या संग्रहाचें चांगलें फेरिस्त होणें जरूर आहे. आणि असें फेरिस्त सरकारी योजनेशिवाय होणें शक्य नाहीं. फेरिस्त्यांत अमुक संग्रह गाळावा वगैरे सूचना व्यर्थ आहेत. सरसहा फेरिस्त झालें तर हा एलिनिएशनचा कागद-संग्रह मराठ्यांच्या इतिहासांत क्रांति घडवून आणल्याशिवाय राहणार नाहीं. हा संग्रह सध्यां भेदाभेद न धरतां संशोधकांस सोईनें व सहजप्राप्त होण्याचे मार्ग मोकळे केल्याचें सरकारनें जाहीर* केले आहे ही आनंदाची गोष्ट आहे. जर हा संग्रह उपयोगांत न आणला गेला तर शिवकालीन राजकीय दसरांप्रमाणेंच हाही संग्रह हयात असून मराठ्यांच्या महाराष्ट्रीय इतिहासाला कायमचा अंतरेल.

आतां यानंतर राहिलेला थोडासा व नीरस भाग संशोधकांनीं मिळवा-बयाचा आहे. पैकीं पारसनीस-कागदसंग्रह व मंडळसंग्रह हे समाज संस्था या दृष्टीनें उपयोगास आणतां येण्याइतके सार्वत्रिक हक्काचे समजूं. परंतु राजवाडे व देवसंग्रह पुन्हा व्यक्तिसंग्रह होऊनच राहण्याचा संभव आहे. असें होऊं न देणें याकरितां तर त्यांनीं निरनिराळ्या घराण्यांतून व्यक्ति-संग्रह उचलून एकत्रित केले. असें असतांना ह्या एकत्रित केलेल्या संग्रहांचें पुन्हा शोधन

* A Handbook of the Bombay Government Records by A. F. Kindersley. p. 15.

व संग्रह करणें इतरांवर पडूं नये व हेही संग्रह सार्वत्रिक उपयोगास कोठें-तरी लवकरच ठेवलेले प्रसिद्ध होईल अशी खात्री आहे. राजवाडेसंग्रहा-बद्दल योजना झालीच आहे. परंतु ती अमलांत येईल तेव्हां खरें. कांहीं संग्राहक संशोधनासाठीं हिंडून साधनें गोळा करितात व तीं आपल्या स्वतः-च्याच संग्रहांत ठेवतात. भावेसंग्रह किंवा रा०ब० गुप्तेसंग्रह घ्या. परंतु आपल्याजवळ संग्रह ठेवण्याची ही प्रवृत्ति अत्यंत अनिष्ट आहे. संग्रह जवळ असावा ही इच्छा असणें अगदीं नैसर्गिक आहे. परंतु कालाच्या फेऱ्यांत आपल्या जिवलग संग्रहाची कशी पोरकी स्थिति होऊन जाईल याकडे संग्राहकानें अवश्य लक्ष देऊन विवेक साधावा. संग्रहाच्या वर्तमान-कालीन जोपासनेच्या विचारापेक्षां त्याच्या भूतकालीन परिस्थितीकडे लक्ष देऊन व्यवस्था ठेवावी. या पोरक्या पोरांना त्यांच्या स्वतःच्या घरांत शोधणारीं दुसरीं कोणीं तरी मायेचीं माणसें मिळणें साहजिक असतें. परंतु अशा अनाथांना सनाथ करण्याकरितां त्यांच्या मायेच्या घरांतून उचलून दुसरीकडे पुन्हा अनाथ करून टाकल्यास त्यांचे कालाशिवाय कोणीच हाल पाहूं शकत नाहीं ही गोष्ट विसरून चालणार नाहीं. हे संग्राहकांचे संग्रह सोडले म्हणजे ऐतिहासिक संग्रहांचीं गरीबशीं माहेरघरें शोधणें भाग आहे.

या माहेरघरांकडे धाव घेणारे संग्राहक, संशोधक किंवा इतिहास-कार यांचा तेथें सत्कार होतो. परंतु आपल्याच कार्यांतील स्वार्थशून्य-तेची महती मनांत बाळगून गर्वोक्तीनें या माहेरघरांची कृतज्ञतापूर्वक सामान्य-जनतेला ओळख करून न देतां हे त्यांचा बरेच वेळां उपहास करीत असतात. जी गोष्ट लक्षांत घ्यावयास पाहिजे ती न घेतां केवळ आपलें कार्य हेंच काय तें सर्वस्व व आपली परिस्थिति तीच इतरांची, अशी भ्रामक कल्पना मनांत बिंबवून घेऊन या माहेरघरांच्या परिस्थितीचा उपहास करणें अयोग्य आहे. हीं माहेरघरें चंद्रमौली असलीं व त्यांतील साधनसामुग्री जर उन्हाची व पावसाची मोजदाद घेत असली, किंवा उंदरांघुशींना या माहेर-घरांत धान्याचे कणही दृष्टीस न पडल्यामुळें ही साधनसामुग्री जर त्या प्राण्यांना जिवंत ठेवीत असली, किंवा मिळेल ते अर्धेमुर्धे ठिगळाचें व जाडे-भरडें वस्त्राच्छादन देऊन जर या साधनसामुग्रीची लाज राखली जात असेल, किंवा जेथें सर्वस्व किंवा सगळें ऐश्वर्य एखाद्या चिंधींत बांधून ठेवून एखादा

उरलासुरला पण मोडकातोडका पेटारा तेथें या साधसामुग्रीच्या नशिबीं आला असेल तर आजच्या महाराष्ट्रानें या माहेरघरीं साधनसामुग्रीची उपेक्षा होते असें म्हणणें रास्त होणार नाहीं. या माहेरघरांच्या गरीबीचा उपहास केल्यानें त्यांचे गरीबीवर डाग देण्याचें क्रूर कृत्य केव्हांही फलदायी होणार नाहीं. गेल्या दोन तीन शतकांपर्यंत काळाशीं सारखें झगडून आपल्या संसाराची हानि होतांनाही मोठ्या धीरानें ज्यांनीं आपल्या कागदपत्रांच्या मोटी वाहून सुरक्षित ठेवण्याच्या प्रयत्नांत मध्यान्हीची आठवण होऊं दिली नाहीं, ज्यांनीं केवळ परंपरागत भावनेवर दृढविश्वास ठेवून आपल्याजवळच्या साधन-सामुग्रीपासूनच्या हिताहिताची जराही विचक्षणा न करीत बसतां तिची आज-पर्यंत ज्यांनीं आपलेपणानें जोपासना केली, घरांत धड बसण्यालाही पुरेशी जागा नसतांना ज्यांनीं या साधनसामुग्रीची कधीं गर्दी मानली नाहीं, त्यांना किंवा त्या घराण्यांना केवळ संशोधकी वृत्ति फावल्यावेळीं स्वीकारल्यामुळें आपणांसारख्या उपरी माणसानें वस्तुस्थितीचा विचार न करितां जर उपेक्षेचा आरोपशब्द लाविला तर अज्ञानी माणसांत विरक्ति आली किंवा आपणा-सारख्या उपरी माणसांची चीड वाटली तर नवल नाहीं. आपल्या उपेक्षेंत जितका प्रेमभाव असतो म्हणून आपण मानतों त्याच्या कितीतरी पटीनें या घराण्यांत त्यांच्या जवळच्या साधन-सामुग्रीबद्दल ममत्व जडलेलें असतें. या ममत्वामुळेंच हीं घराणीं आपले कागद दुसऱ्याच्या हातीं जाऊं नयेत म्हणून फार दक्षता बाळगतात. तसेंच भाऊबंदकी ही ही या पौराणिक कलियुगाची स्पष्ट कल्पना देणारी एक अजब चीज आहे. ही हिंदूंच्या संस्कृतीच्या किंवा सामाजिक-बंधारणापद्धतीचा एक मोठा दोष आहे. हा दोष बहुतेक ठिकाणीं आढळतोच. विशेषतः जेथें परंपरेची थोडीतरी पुण्याई शिल्लक राहिलेली असते तेथें तरी हा दोष हटकून असावयाचाच. ह्या दोषामुळें हीं घराणीं आपल्या कागदपत्रांबद्दल बरींच साशंक राहतात. त्यांचे जवळील कागदपत्रांचा प्रत्यक्ष संबंध त्यांच्या भाऊबंदकीशीं असो वा नसो तीं घराणीं मात्र असा समज करून घेतात कीं, आहे तें सारें त्या कागदांत आहे. या फाजील श्रद्धेमुळें यांच्या त्या कागदपत्रांची चोरीही नेहमीं होते. अशा तऱ्हेनें कागदपत्रांची पांगापांग होते. फाजील श्रद्धा व पांगापांग यां-मुळें कागदपत्र बाहेर काढण्याचा संकोच वाटतो. सारांश, या माहेरघरीं

जाऊन ऐतिहासिक कागदपत्रें पाहून या घराण्यांच्या इतिहासावर सबंध महाराष्ट्राचा इतिहास रचूं म्हटलें तर कोठें ममत्व, तर कोठें अंधश्रद्धा, तर कोठें संकोचवृत्ति, तर कोठें साशंकवृत्ति यांचा सारखा अडथळा येत असतो. कोणत्याही घराण्यांतील सर्वच कागद एकदम हातीं येतात असें नाहीं. आज थोडे तर नंतर कांहीं असा क्रम लागतो. मुख्य कागदपत्र तर लवकर हातीं येतच नाहींत. परंतु ही परिस्थिति फार वेळ टिकणार नाहीं. लोकसमाजांतील अज्ञानाबरोबर हे सर्व अडथळे आपोआप निघून जातील.

अशा तऱ्हेचे अनेक अडथळे उत्पन्न झाले असतांना सुद्धां गेल्या बीस-पंचवीस वर्षांत बरीच साधन-सामुग्री नुसतीच संग्रहित केली गेली, इतकेंच नसून त्यांतील बराच भाग छापून प्रसिद्धही झाला आहे. गुरु०राजवाडे यांचे बावीस खंड, 'काव्येतिहास-संग्रहांत' रा०ब० साने यांनीं ग्रथित केलेला सांठा व विशेषतः 'पत्रें व याद्या,' 'इतिहास-संग्रहां'त छापून काढलेला पत्र व इतर संग्रह, वाडांच्या 'रोजनिश्या', 'प्रभात', 'कायस्थप्रभूंच्या इतिहासाचीं साधनें', भारतवर्ष वगैरेसारख्या व इतर मासिकांत प्रकाशित झालेला संग्रह, सत्कार्योत्तेजक सभेनें प्रकाशित केलेलें वाङ्मय व विशेषतः भारत-इतिहास-संशोधक-मंडळानें वेळोवेळीं ग्रंथ व मासिक-रूपानें प्रकाशित केलेली माहिती विपुल असली तरी फारच अपुरी आहे असें म्हणणें प्राप्त आहे. 'बिब्लिओथिका-इंडिका', 'मोस्लेमिका-इंडिका', 'इंडियन अँटेक्वेरी', 'रॉयल एशियाटिक सोसायटी'सारख्या मासिकांत फारसी व इतर साधनांची कांहीं कमी प्रसिद्धि झाली नाहीं. 'डेक्कन-क्वार्टर्ली', 'हिस्टॉरिकल रिव्ह्यू', 'मॉडर्न रिव्ह्यू', 'इंडियन रिव्ह्यू', यांतही वेळोंवेळीं लेखरूपानें साधन-सामुग्री छापली जात आहे. तीही कमी महत्त्वाची आहे असें नाहीं. परंतु मासिकांत प्रकाशित झालेली माहिती इतिहासकाराला नेहमींच आठवण होऊन प्राप्त करून घेतां येतेच असें नाहीं. त्यामुळें या मासिकांत येणाऱ्या माहितीचा कोठेंतरी नियमानें आढावा छापून प्रसिद्ध होणें जरूर आहे, आणि असा आढावा प्रत्येक स्थानिक सरकारनेंच प्रसिद्ध केला पाहिजे. दर तीन महिन्यांनीं ज्याप्रमाणें सरकार नवीन पुस्तकें व मासिकें यांची यादी देतें त्या प्रमाणेंच मासिकांतील लेखांचा आढावा देणें शक्य व सोपें आहे. सारांश अशा तऱ्हेनें बरीच साधन-सामुग्री प्रसिद्धीस येत आहे. परंतु मराठ्यांच

इतिहासवृक्ष तयार करितांना 'आधीं कळस मग पाया रे' अशीच स्थिति होऊन राहिली आहे. आधीं पानें नंतर बोखे, नंतर फांद्या नंतर बुंधा अशा पद्धतीनेंच ह्या वृक्षाची उभारणी करावी लागत आहे. जवळची सामुग्री तर इतकी अव्यवस्थित आहे कीं, त्यांतील कोणतीं पानें कोणत्या ठिकाणीं बसतील, कोणत्या डहाळ्या कोणत्या ठिकाणच्या हें समजण्याससुद्धां आज मार्ग उपलब्ध नाहीं. त्यामुळें या विखुरलेल्या पानांची निवडानिवड व फांद्यांची छाटाछाट करून मूळ वृक्षाचा परिघ कसा शोधन करून काढावा हें एक मोठें कोडेंच होऊन राहिलें आहे. त्यामुळें मराठी ऐतिहासिक सामुग्री सरस नीरस ठरविणें फार दुर्घट होतें व ऐतिहासिक सामुग्रीचें प्रसिद्धीकरण करितांना तिच्या युक्तायुक्ततेच्या विचारांत फारच ढिलाई ठेवावी लागते.

एतद्देशीय साधनांची व्याप्तीही कांहीं कमी नाहीं. हिंदुस्थानांत मुसलमानी अंमलांत फारसी ही राजभाषा असल्यानें फारसी फर्मानें, कौल, महजर इत्यादि कागदपत्रें, तवारिखा, वृत्तें, वगैरे टिप्पणें व इतर इतिहासग्रंथ किंवा चरित्रें यांचा भरणा फारसी भाषेंत विशेष आहे. संस्कृत भाषेंत विशेषतः दानपत्रें व चरित्रात्मक काव्यें सांपडतात. हिंदींत क्वचित् पत्रें व काव्यें उपलब्ध होतात. तामिल, कानडी, वगैरे द्राविडी भाषेंतही कागदपत्रें व दानपत्रें आहेत. कानडी, मराठी किंवा बाळबोधी लिपींत संस्कृत साधनें लिहिलेलीं आढळतात. मराठींत सनदापत्रें, याद्या, वगैरे साधनें सांपडतात. मराठी साधनांचें लिखाण विशेषतः मोडींत आहे. या एतद्देशीय साधनांतील सरस नीरस भाग ओळखण्याचे कांहीं ताळे ठरवितां येतात. तसेंच या साधनांच्या लिपींतही वेळोवेळीं फरक होत गेल्यामुळें वाचनांत बरेच दोष येतात. त्यांचा व भाषेच्या कालमानानें बदलत्या प्रचारांचें स्वरूप वगैरेंबद्दल पुढें स्थूलमानानें विचार करूं.

## १६ संस्कृत साधनें

संस्कृत साधनांत दानपत्रें, ऐतिहासिक काव्यग्रंथ, शिलालेख यांसारख्या साधनांचा समावेश होतो. या साधनांतील शिलालेखांचा उल्लेख इतरत्र येणार आहे. शिवकालीन संस्कृत साधनांची व्याप्ति फारशी नाहीं. परंतु जीं

साधनें मिळूं शकतात तीं मात्र महत्त्वाचीं असतात. यांतील काव्यग्रंथ सहा प्रकारचे असूं शकतात. [१] ओळखीच्या माणसानें केवळ त्या माणसाच्या कार्यकर्तृत्वाबद्दल प्रेम व आदर वाटून लिहिलेले ग्रंथ, [२] ओळखीच्या माणसानें एकाद्याच्या आज्ञेनें त्याच्या चरित्रावर लिहिलेले ग्रंथ, [३] ओळख करून घेतलेल्या माणसानें एखाद्याच्या चरित्रावर कांहींतरी प्राप्तीच्या इच्छेनें लिहिलेले ग्रंथ, [४] ओळख करून घेऊन एखाद्याच्या इष्टमित्रांसाठीं तयार केलेले ग्रंथ, [५] एखाद्याची प्रत्यक्ष ओळख नसतांना केवळ ऐकीव माहितीवर तयार केलेले ग्रंथ, व [६] एखाद्या कवीनें एखाद्याच्या मृत्यूनंतर बऱ्याच वर्षांनीं तयार केलेले चरित्रग्रंथ, असे निरनिराळे भाग पाडतां येतात. यांतील पहिल्या प्रकारचे ग्रंथ निस्पृह असतात, दुसऱ्या, तिसऱ्या व चवथ्या प्रकारचे ग्रंथ बरेच स्तुतिपर असतात; पांचव्यांत कमीअधिक अविश्वसनीय मजकूर उतरण्याचा संभव असतो व सहावे अगदींच ऐकीव असल्यानें बरेच अविश्वसनीय असणें साहजिक असतें.

शिवशाहीचीं संस्कृत साधनें फारच थोडीं उपलब्ध झालेलीं आहेत. शहाजीचे तीनचार ताम्रपट; शिवाजी, संभाजी व राजाराम यांचीं दहाबारा दानपत्रें, तंजावरच्या राजघराण्यांतील कांहीं दानपत्रें; शिवकाव्य, राधामाधवविलासचंपू, पर्णालपर्वतग्रहणाख्यान, शिवभारत, भोंसलवंशावली लहान व मोठी, शाहेंद्रविलासादि कांहीं तंजावरच्या राजांचीं काव्यचरित्रें, व शिवाय तंजावरच्या कवींच्या निरनिराळ्या विषयांवरील ग्रंथांतील प्रशस्तीचा भाग इतकींच काय तीं शिवकालीन संस्कृत साधनें उपलब्ध आहेत. वरील काव्यग्रंथांवरून आणखीही काव्यग्रंथ त्या वेळीं लिहिले असून ते अगदीं शिवाजी व शहाजी यांच्या चरित्रपर असावेत असें मानण्यास आधार सांपडतो.* वरील साधनांपैकीं शिवकाव्य व भोसलवंशावल्या व कांहीं तंजावरचीं काव्यें समकालीन किंवा शिवकालीन नाहींत. राधामाधवविलासचंपू, पर्णालपर्वतग्रहणाख्यान व शिवभारत हीं काव्यें समकालीन असल्यानें फार महत्त्वाचीं आहेत.

* राधामाधवविलासचंपू-संपादक वि. का. राजवाडे; पर्णालपर्वतग्रहणाख्यान-संपादक स. म. दिवेकर, पृ. ३, ४, शिवभारत-संपादक स. म. दिवेकर, पृ. ६. वगैरे.

दानपत्रांतील दानाचा भाग फारसा ऐतिहासिक महत्त्वाचा नसतो. परंतु दान देणाराच्या वंशाचें व खुद्द देणाराचें प्रशस्तिपर जें थोडेंबहुत चरित्र वर्णन केलेलें असतें तें फार महत्त्वाचें असतें. प्रशस्तींत गुणवर्णनच येणें साहाजिक असतें. दोषांचा मुळींच नामनिर्देश नसतो. हा भाग बरेच वेळां काव्यमय असतो. यांत प्रसंगाचा कालनिर्देश केलेला नसतो. परंतु हे सर्व प्रसंग कालानुक्रमानें व संगतवार मांडणी करून वर्णिलेले असतात. तसेंच यांतील उल्लेख खास त्या राजघराण्याला संमत असतात ही गोष्ट यांत फार महत्त्वाची आहे. परंतु अशा प्रशस्तींत विशेषतः मुख्यमुख्य प्रसंगांचीच त्रोटक माहिती दिलेली असते. एकंदरींत या दानपत्रांतील ऐतिहासिक माहितींत फक्त अनुल्लेखांशिवाय इतर फारसे दोष असूं शकत नाहींत. परंतु असलीं दानपत्रें अजूनही पुष्कळ उपलब्ध व्हावयास पाहिजेत. दानपत्रांच्या प्रशस्तींत नेहमीं भर पडत असे. त्यामुळें जितकीं अधिक दानपत्रें मिळतील तितकीं तीं अधिकाधिक माहिती देतील.

शिवकालीं संस्कृत काव्यें बरींच रचलीं गेलीं असावींत. हे संस्कृत ग्रंथ कोठें देवनागरी तर कोठें तामील किंवा कानडी लिपींत लिहिलेले आढळतात. खास संभाजीनेंच कांहीं काव्यग्रंथ लिहिल्याचा उल्लेख आहे. पैकीं 'बुधभूषणम्' हें काव्य नुकतेंच प्रसिद्धही झालें आहे. इतरही काव्यें जर पूर्णावस्थेंत प्राप्त होतील तर एखाद्या तरी काव्याच्या प्रशस्तींत आपणाला कांहीं ऐतिहासिक प्रसंगाचा निर्णयात्मक पुरावा मिळेल. 'बुधभूषणम्' काव्यावरूनही ग्रंथकाराच्या प्रगल्भ विचारांचा व विद्वत्तेचा छडा लावतां येतो. या बुधभूषणांत आणखी कांहीं काव्यांचा उल्लेख केला आहे. त्यांत कलसच्या काव्याचाही उल्लेख आहे.* 'शिवभारत'कार कवि परमानंदानेंही शहाजीमहाराजांच्या चरित्रावर व शिवचरित्रावर आणखी कांहीं काव्यें केल्याचा उल्लेख केला आहे. हा परमानंद तसाच जयराम कवि हे शिवाजीला समकालीन असल्यानें यांचे काव्यग्रंथांतून दृक्प्रत्ययाचा बोध करून घेतां येणें शक्य आहे. जयराम कवीनें 'पर्णालपर्वतग्रहणाख्यान' नांवाचें आख्यान सांगितलें असून शिवाय 'राधामाधवविलासचंपू' लिहिला आहे. त्याचे आणखीही

* बुधभूषणम् काव्य-संभाजी राजेकृत-प्रस्तावना.

काव्यग्रंथ असावेत. यांशिवाय तंजावरच्या राज्यांत व खास शहाजी महाराजांकडे परमानंद व जयराम या कवींना समकालीन असे आणखीही कवि होते. त्यांची बहुतेक जंत्री 'इंडिअन ॲंटिक्वेरीमध्यें' 'दक्षिणी कवि' या लेखांत व गुरु० राजवाडे यांच्या राधामाधवविलासचंपूच्या प्रस्तावनेंत आलेली आहे. त्या कवींचेही शिव व शहाजीच्या चरित्रांवर काव्यग्रंथ असून ते उपलब्ध होतील. त्याचप्रमाणें संभाजी व राजाराम यांच्याही कारकीर्दीचे काव्यग्रंथ मिळूं शकतील. 'शिवभारत' हा ग्रंथही अर्धाच आहे. संपूर्ण मिळाल्यास फारच मजा उडणार आहे. सारांश, काव्यग्रंथांची आणि विशेषतः समकालीन काव्यग्रंथांची व्याप्ति फार मोठी आहे. इतकेंच नव्हे तर उत्तरकालीनही कांहीं 'शिवकाव्य' 'भोंसलवंशावली'सारखे काव्यग्रंथ उपलब्ध आहेत व आणखीही होतील.

भाटांची संस्था नामशेष झाल्यानें व केवळ 'स्फूर्ति'काव्यें च निर्माण होऊं लागल्यानें काव्यांकडे पाहाण्याचा दृष्टिकोन जरा बदलून गेलेला आहे. स्फूर्तिकाव्यांतील प्रत्यक्ष वस्तुस्थितीपेक्षां कल्पनाशक्तीच्या भराच्या आज अंगवळणीं पडून गेल्या कारणानें काव्यांत वस्तुस्थितींतील सत्य नसावयाचेंच असाच कोणाचाही समज होणें साहजिक आहे. परंतु भाटांच्या संस्थेचें काव्य अगदींच वेगळ्या प्रकारचें असतें. त्यांत वर्तमान-कालच्या परिस्थितींत भविष्य-कालांतील कल्पनेची जोड दिलेली नसते तर त्यांत भूत-कालीन साम्य दाखविण्याचाच प्रयत्न झालेला असतो. भाटांच्या काव्याचा मुख्य उद्देशच असा असतो कीं, घडलेली हकीगत साग्र परंतु आपलेपणानें सांगावयाची. त्यांत त्यांचा ती हकीगत गौण समजून 'स्फूर्ति' उत्पन्न करण्याकरितां नवीन कल्पना सुचविण्याकडे कल नसतो. त्यांची अशी खात्रीच झालेली असते कीं, त्यांच्या काव्याचा प्रसंगच मूर्तिमंत 'स्फूर्ति' उत्पन्न करणारा आहे. परंतु असे स्फूर्तिदायक प्रसंग सांगतांना मात्र ते प्रसंग सहज व विशिष्ट प्रकारानें समजावे म्हणून हे भाट आपल्या काव्योक्तींस नेहमीं भूत-कालीन पूर्ण रूढ झालेल्या प्रसंगाचे दाखले देत असतात.* ते आनुवंशिक संस्काराचे पडताळे पाडून दाखवीत असतात. लोकांच्या अंग-

* पर्णालपर्वतग्रहणाख्यान, पृष्ठ ३, व या व शिवभारतादि ग्रंथातील इतर अनेक उपमा.

वळणीं पडलेलीं वर्णनें जशींच्या तशींच घालून आपलीं काव्यें सुलभ करितात.* पूर्व संस्कृतीचा फायदा घेऊन आपलें काव्य विशेषच स्फूर्तिदायक करितात. जसें आपल्यांत पोवाडे म्हणणारे भाट इकडे होते तसेच ते इतर हिंदुस्थानांतील भागांतही होते. जसे हे भाट मराठी, हिंदी वगैरे पोवाडे करीत, त्याप्रमाणें शिवकालीन किंवा शिवपूर्वकालीन भाट संस्कृत भाषेंत काव्यें करीत. द्राविड देशांत संस्कृत भाषा अधिक प्रचारांत होती. सारांश, उपरिनिर्दिष्ट चरित्रग्रंथांतील कविता सर्व भाटांच्या काव्यासारखीच होती. त्यांच्या काव्यांना आजच्या स्फूर्तिकाव्यांच्या कोटींत न ढकलतां पोवाडे वगैरेसारख्या भाटांच्या कवितेंतच समाविष्ट केलें पाहिजे. जो कोणीं या काव्यांचें परीक्षण करील त्याला हें सहज समजणारें आहे. एकदां का या काव्यांतील भेद समजला म्हणजे इतिहासकाराला या काव्यांना ऐतिहासिक साधनांत महत्त्वाचें स्थान देण्यास फारशी कुचंबणा करण्याचें प्रयोजन पडणार नाहीं.

काव्येतिहासग्रंथ किंवा चरित्रग्रंथ लिहिणाऱ्या या भाटांचा किंवा शाहिरांचा असा नेहमींच सांगण्याचा थाट असतो कीं, त्यांचीं तीं चरित्रकाव्यें किंवा प्रसंगवर्णनें प्रत्यक्ष पाहून किंवा माहिती मिळवून सविस्तर रचलेलीं आहेत. असलीं काव्यें जरी स्वतःच्या पोटाकरितां रचली असलीं तरी तीं त्यांस एखाद्या राजाच्या आग्रहामुळें रचावीं लागलीं किंवा केवळ देवाची आज्ञा झाली म्हणून लिहिण्यास सुरुवात केली व तीं देवानेंच लिहवून घेतलीं असें नेहमीं सांगितलें जातें.† या इशाऱ्यावरून काव्यांत स्फूर्तिविषयक भाग येण्याचा बराच संभव असतो. परंतु लिहिणाऱ्याच्या मनांत कांहीं इष्ट साधावयाचें असल्यानें आपल्या काव्यांत स्तुतिपर मजकुराशिवाय दोष राहूं नये अशी नेहमींच काळजी बाळगावी लागते. विशेषतः हीं चरित्रें किंवा शाहिरी काव्यें प्रत्यक्ष संबंधी माणसालाच म्हणून दाखवावयाचीं असतात ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे शाहीराच्या प्रसंगाच्या वस्तुस्थिति वर्णनाची जबाबदारी लक्षांत येते. हा शाहीर जर समकालीन असेल तर त्याच्या वर्णनांतील सत्यता पुष्कळच निर्भेळ असूं शकते. विशेषतः या

* शिवभारत—बाललीला, व इतर प्रसंग पहा.

† शिवभारत-पृष्ठ ९; पर्णालपर्वतग्रहणाख्यान-पृष्ठ ३.

भाटांची विवेचनपद्धति समग्रवृत्तान्त देणारी असल्यामुळें असल्या वृत्तान्तांत बराचसा ऐतिहासिक सत्य भाग प्राप्त होतो. समकालीन शाहिराची माहिती फार बारकाईची व जबाबदारीनें मिळविलेली असते व हीं शाहिरी काव्यें संबंधी व प्रत्यक्ष हजर असणाऱ्या माणसांसमोर गाबयाचीं असल्याकारणानें प्रसंगाच्या तपशिलांत चूक सहसा राहण्याचा संभव नसतो. परंतु हीं काव्यें प्रशंसापर असतात. बक्षिशी मिळविण्याच्या उद्देशानें घन्यासाठीं तयार केलेलीं असतात, ही गोष्ट विसरून चालणार नाहीं. या काव्यांत आणि विशेषतः संस्कृत परंतु शिवाजीच्या संबंधी माणसांसमोर गाइलेल्या काव्यांत जरी एकांगीपणा शिरला असला तरी त्यांत महाराष्ट्राला आपलेपणानें लिहिलेला इतिहास व सार मिळाल्याशिवाय राहणार नाहीं. म्हणून या शाहिरी काव्याचें महत्त्व महाराष्ट्रीय इतिहासास फार मोठें आहे. त्यांत आपलेपणानें लिहिलेला समग्र इतिहास प्राप्त होत आहे. त्यांतील माहिती जबाबदारीनें व बारकाईनें मिळविलेली असल्यामुळें व तत्कालीन संबंधी व प्रत्यक्ष साक्षीदार माणसांनाही संमत असल्यामुळें इतिहासास अत्यंत उपयोगी अशी आहे. परंतु समकालीन शाहीराची कविता जितकी प्रमाणभूत असते तितकी ती असमकालीन शाहिराची नसते हेंही विसरून चालावयाचें नाहीं.

या शाहिरी काव्यांचें समकालीन म्हणून महत्त्व आहे किंवा संमति असते म्हणून सत्यार्थ सांपडतो. प्रत्यक्ष गायलें असल्यामुळें जबाबदारपणा यांत जसा दृष्टीस पडतो तसाच या काव्यांत एकांगीपणा असल्यामुळें कांहीं दोष हटकून घडून येतात. शाहिरी काव्यें प्रशंसापर असल्यामुळें पराजयाच्या किंवा अपमानकारक प्रसंगांचा त्यांत उल्लेख करण्याचें टाळलेलेंच असतें. परंतु कांहीं वेळां हा उल्लेख कार्यकारणभावासाठीं अगर इतर कांहीं कारणामुळें करणें भागच पडलें तर तो इतका ओझरता किंवा सफाईनें करितात कीं, त्याचा ऐकणारांवर परिणामच होऊं नये. खरें म्हटलें तर असा प्रसंग येण्याची जरूर नसते. परंतु विचारपद्धति मुळांतच परिणामांवर अवलंबून रहात असल्यामुळें जी गोष्ट कार्यकारणपद्धतीनें अगदीं प्रशंसापर असते तिचा केवळ परिणामांवरून विचार केला तर ती अगदीं अपमानकारक वाटते. परंतु कार्य-कारणभावावरून विचार प्रतिपादन करण्याची शास्त्रीय पद्धति इकडे परिचित नसल्यामुळें अशी माहिती गाळण्यापलीकडे गत्यंतरच नव्हतें. एकंदरींत

अपमानकारक किंवा पराजयाचा मजकूर गाळणें हा एक सामान्य दोष सोडला, कीं दुसरा दोष असा दिसतो कीं, कोणत्याही बऱ्यावाईट गोष्टीच्या कारणाची मीमांसा करतां आली नाहीं, कीं दैववाद किंवा दैवीशक्तीचा आधार घेणें हा होय. तसेंच भारतरामायणादि ग्रंथ या शाहिरांसमोर असल्यानें कोणत्याही प्रसंगाची उपलब्ध व अनुपलब्ध संगति जुळवितांना भारतादि ग्रंथांतील कोणत्या तरी भागाशीं साम्य पाहून तशीच माहिती देणें हा एक दोष दृष्टीस पडतो. शिवाय नांवांचें संस्कृतीकरण, अतिशयोक्तीच्या वर्णनाची आवड, अवतारावर वगैरे विश्वास, इत्यादि बारीकसारीक गोष्टींतही गौणत्व दृष्टीस पडतें. या काव्यांत उपमा व कविकल्पनाही थोड्याबहुत दृष्टीस पडतात. परंतु त्या सर्व भूतकालीन इतिहासाचें साम्य दाखविण्याकडेच उपयोगांत आणल्या जातात. मूळ प्रसंगांत जरी आदलाबदल केलेली नसते तरी आपल्या चरित्रनायकाच्या पराक्रमाचें वर्णन मात्र अधिक रम्य व उदात्त करण्याकडे या लेखकांचा कल असतो. परंतु ऐतिहासिक प्रसंग आपणाला स्पष्ट व निर्भेळ मिळतात. देवादिकांच्या तोंडीं घातलेला मजकूर कवीचा किंवा चरित्रनायकाचा निर्णयात्मक विचारदर्शक असतो. त्यावरूनच आपल्याला कारणांचा बोध होऊं शकतो. म्हणींचा अगर रूढ नीतितत्त्वांचा जेथे आगांतुक उपयोग केला जातो तेथें निश्चित असें समजावें कीं, कवींनीं त्या प्रसंगांतील वैगुण्य लपविण्याचा सफाईनें प्रयत्न केला आहे. प्रसंगाचा उल्लेख कालानुक्रमानें केलेला असतो. परंतु एखाद्याच्या तोंडीं स्वगत आलें कीं, कोणता भूतकालचा इतिहास तेथें येऊं शकेल याचा नेम नाहीं. परंतु यांतही बराच कालानुक्रम साधलेला असतो. शाहिरी कथानकांत ग्रंथित केलेलीं पत्रें, निरोप व भाषणें कविनिर्मित असतात ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे अशा पत्रांत एका पक्षाच्या मनःस्थितीचा पूर्ण बोध होऊं शकतो. किंबहुना प्रतिपक्षीयाबद्दल तत्कालीन कोणता समज प्रचलित होता याची अगदीं स्पष्ट कल्पना येते. सारांश, अशा काव्यांचें वाचन करितांना अनुल्लेखांबद्दल फार सावधानता ठेवावी. उत्तमोत्तम गुणांचें व वस्तूंचें चरित्रनायकावर जें आवरण चढविलें जातें तें दूर करीत रहावें. अवतारकल्पनेनें केलेली कार्याची मीमांसा शुद्ध मानवी कार्य या दृष्टीनें शोधावी. स्वगतांत आलेल्या विचारांचे ऐतिहासिक समालोचन म्हणून त्याचा उपयोग कारण-मीमांसेकडे करावा. दैववादाची अगर

दैवी-शक्तीची कास धरून जेथें संगति लावण्याचा प्रयत्न केला जातो तेथें अधिक सत्य शोधण्याची खटपट करावी. कथानकांतील पत्रादि भाषणांवरील कृत्रिमतेचा पडदा दूर करावा. भारत-रामायणादि ग्रंथांतील साम्य असलेल्या प्रकरणांचा काव्यांत उपयोग केला असल्यास तो दूर करावा. विशिष्ट माणसांस नेहमींच अंधश्रद्धेनें लावण्यांत येणाऱ्या गुणावलींचें वगैरे छेदन करून मूळ प्रकृति शोधून काढावी. आगांतुक नीतीचीं तत्त्वें कसोटी लांवूंन काढून टाकावी व प्रसंग निर्भेळ दृष्टीनें पहावा. अशा अनेक तऱ्हांनी मजकुरास चाळण लावून मजकूर शुद्ध करावा लागतो. असें केलें तर कोणत्याही साधनांतून निर्भेळ व सत्य इतिहास सांपडणार नाहीं इतका इतिहास या शाहिरी काव्यांतूनच सांपडेल. हा शाहिरी इतिहासच मराठ्यांचा खरा इतिहास पूर्ण करूं शकेल. म्हणून या समकालीन शाहिरी काव्यांना कोणत्याही इतर साधनांपेक्षां अधिक महत्त्वाचा मानणें भाग पडतें. असमकालीन शाहिरांच्या काव्यांचें महत्त्व मात्र व्यस्त प्रमाणांत ठरवावें लागतें. सर्वच ऐकीव माहितीवर बहुधा भिस्त असल्यामुळें त्यांत सरस-नीरस भाग ठरविणेंही जड असतें. शिवकाव्यादि असमकालीन ग्रंथ याच मालिकेत जातात. त्यांचे महत्त्व फक्त परंपरा समजून घेण्यापुरतेंच असतें. या काव्यांतही अस्सल व नक्कल असे भेद आहेत. परंतु ते परीक्षण्याचे नियमही सामान्यच असतात.

एखाद्या काव्याचें लेखन जुनें आहे कीं नवें आहे हें ओळखणें शाई व कागद यांच्या बहिरंगपरीक्षणानें व लेखाच्या अंतरंगावरूनच ओळखावें लागतें. संस्कृत भाषेचें संस्कृतीकरण शिवकालापूर्वी कित्येक शतकें पूर्ण होऊन गेलें होतें. त्यांत कालानुरोधानें विशिष्ट प्रकारचे तत्कालीन नवीन भाषेचे प्रघात वगैरे शिरणें तें ती भाषा प्रचारांतून गेल्यानें बंद झालें होतें. भाषेत किंवा तिच्या व्याकरणांत जे फरक घडून येतात व शब्दकोशांत जी भर पडते ती फक्त भाषा प्रचारांत असेपर्यंतच पडत असते. एकदां कां भाषा बोलण्यांतून अगर व्यवहारांतून गेली, कीं तिचें कायमचें व्याकरण ठरून जातें. त्या भाषेच्या व्याकरणाच्या मर्यादा नंतर उल्लंघण्यांत येत नाहींत. भाषेला तेथेंच कायमचें नियंत्रण पडत असतें. भाषेंत नवीन प्रचार शिरण्याचा किंवा शब्दयोजना करण्याचा क्रम खुंटला म्हणजे त्या भाषेंतील लिखाणाचा काल ठरविण्याचें भाषेंतील प्रचाराचें वगैरे साधन नाहींसें होतें. लेखनाच्या

लिपीच्या बळणावरून काल ठरविण्याचेंही साधन या संस्कृत साधनांत तेवढें बाकी राहिलेलें नाहीं. कारण संस्कृत साधनें बहुधा बालबोधी लिपींतच लिहिलेलीं आढळतात. परंतु बालबोधीचेंही संस्कृतीकरण जवळ जवळ थांबल्यासारखें झालें होतें. त्यामुळें त्या लिपीच्या सुधारणेच्या कालावरून साधनांचा कालनिर्णय करण्याचा सहज मार्ग राहिला नाहीं. आतां एकच मार्ग राहिला आहे, आणि तो म्हणजे मजकुराच्या अंतरंगपरीक्षणाचा होय. संस्कृतांतील पोथ्यांची नक्कल करितांना त्या भाषेच्या ज्ञानाची आवश्यकता असते. हे नकलकारही आपण श्रेष्ठ आहोंत असें समजत. त्यामुळें प्रत्येक लिखाणावर लेखकाचें नांवगांव वगैरे लेखनकालासह दिलेलें असतेंच. परंतु त्याबरोबर नक्कल असल्यास नकलकारही आपलें नांवगांव देऊन नकलेचा लेखनकाल देत असतो. यामुळें साधनांचा लेखनकाल ठरविण्याला बरीच मदत होते.

संस्कृत साधनांचें लेखन श्लोकबद्ध असल्यानें नकलकारांना त्यांत सहज घुसडाघुसडी करतां येत नाहीं. सामान्य माणसाकडून जर नकलेंत चूक झाली तर ती तेव्हांच लक्षांत येऊं शकते. परंतु संस्कृतांत पाठभेदही थोडेबहुत आढळतात. निराळा पाठ तयार करणें तितकें सोपें नसतें. श्लोकांचे गण, मात्रा, यमक जुळावयाचें असतें. अर्थातच अशी जुळणी करतां येण्याइतकें बुद्धिचातुर्य असेल तर मात्र असले पाठभेद उत्पन्न होतात. असें झालें म्हणजे मात्र ते शोधून काढणें जड जातें. परंतु श्लोकबद्ध रचनेमुळें पाठभेद फारच अल्प प्रमाणांत उपलब्ध होऊं शकतात. नकलकारांच्या इतर दोषांबद्दल येथें विवेचन करण्याची जरूरी नाहीं.

कोणत्याही भाषेंतील लेखनांत श्लोकबद्ध विवेचन करतांना कालाच्या उल्लेखांसाठीं अंकलिपीचा उपयोग करतां येत नाहीं. तसेंच अक्षरीं कालाच्या संख्येचा उल्लेख करावयाचा तर वृत्तांतील गण, मात्रा व यमक यांना अनुरूप अशी शब्दयोजना ठरीव एका शब्दांत करणें कठीण जातें. म्हणून संस्कृत, मराठी वगैरे काव्य-वाङ्मयांतील संख्यालेखनांत ठराविक पदार्थनामानें किंवा त्या पदार्थवाचक शब्दानें संख्या लिहिण्यांत येते. ज्योतिषांत बहुतेक श्लोकबद्धच रचना असल्यानें तर या तऱ्हेचे संख्यावाचक उल्लेख बरेच आढळतात. ही संख्यालेखनाची 'वामगति' म्हणजे कोणत्याही संख्येंतील उजवीकडील

पहिला अंक म्हणजे एकं स्थानीं असलेला अंक प्रथम लिहावयाचा, नंतर दशंस्थानाचा उल्लेख करावयाचा, त्यानंतर शतं, सहस्र, दशसहस्र वगैरेंचा अनुक्रमें निर्देश करण्याची पद्धति आहे. ह्या पद्धतींत* संख्या सांगतांना अंकाऐवजीं जे विशिष्ट अर्थाचे किंवा पर्यायाचे शब्द योजण्यांत येतात ते असेः— ०=पूर्ण, अभ्र, गगन; १=पृथ्वी, चंद्र, रूप; २=अश्वि, पक्ष, अक्षि, दो, यम, कर, पाद, नेत्र; ३=क्रम, ग्राम, राम, पुर, लोक, गुण, अग्नि; ४=समुद्र, वेद, युग, कृत; ५=बाण, वायु, भूत, अक्ष, प्राण; ६=रस, अंग, ऋतु, तर्क: ७=ऋषि, स्वर, तुरग, पर्वत: ८=वसु, सर्प, मतंगज: ९=संख्या, नंद, रंध्र, निधि, गो, अंक, नभश्चर (ग्रह); १०=आशा, दिशा; ११=महेश्वर; १२=अर्क; १३=विश्व; १४=मनु, इंद्र, भूवन; १५=तिथि; १६=कला, अष्टि, राजा; १७=अत्यष्टि, घन; १८=धृति; १९=अतिधृति; २०=कृति, नख, अंगुलि; २१=प्रकृति, मूर्छना, स्व; २२=जाति; २३= आकृति, विकृति, संस्कृति, अर्हत्; २४=जिन, सिद्ध; २५=तत्त्व, अतिकृति: २६=अहोकृति; २७=नक्षत्र: ३२=दशन, द्विज, दंत; ३३=सूर; आणि ४९=तान. ही पद्धति समजण्यासाठीं एक दोन उदाहरणें देणें जरूर दिसतें. शिवजन्मकाल†—भूबाणप्राणचन्द्राब्दैः सम्मिते शालिवाहने। =१५५१शालिवाहन शक: अवरंगजेबाचा मृत्युकाल‡—शाके रंध्रकरांगभूपरिमिते संवत्सरे च व्यये।=शके १६२९[८?] व्यय संवत्सर; अर्नाळा किल्ला बांधल्याचा शक‡—अंक-बाण रसचंद्र शकातें, ज्येष्ठ पिंगल सितेंदु दिनातें। पंचमी ध्रुव सुपुष्यहि जेव्हां, येशवंत बुरुजाकृति तेव्हां ॥ यांतील अंकबाण रसचंद्र शकातें म्हणजे १६५९ शकांत असा अर्थ आहे. अंकालेखनाप्रमाणें वार व मास दर्शवितांना ठराविक शब्दांची योजना केली जाते. वर्षाचे १२ मास. या मासांना जीं निरनिराळीं नांवें§ दिलीं जातात तीं अशीः [१] चैत्र=मधु, [२] वैशाख=माधव, [३]

* ग्रहलाघव गणेश-दैवज्ञकृत—भांषातरकार-कृष्णशास्त्री गोडबोले—आ. ३ री (१८८७) पृष्ठ १६९-६; आणि इतिहासमंजरी -द. वि. आपटे-पृष्ठ ३१.

† शिवभारत—पृष्ठ. ९१

‡ इतिहास—मंजरी—पृष्ठ ३१३-१४.

§ अमरकोश—प्रथमकांड.

जेष्ठ=शुक्र, [४] आषाढ=शुचि, [५] श्रावण=नभस, [६] भाद्रपद=नभस्य, [७] आश्विन=इष, [८] कार्तिक=ऊर्ज, [९] मार्गशीर्ष=सह किंवा आग्रहायणि, [१०] पौष=सहस्य [११] माघ=तप, आणि [१२] फाल्गुन=तपस्य. मासांचे दोन पक्षः—पहिला—शुक्ल, शुद्ध किंवा सित; व दुसरा—कृष्ण, बह्य, असित अगर बहुल. वारांना सुद्धां स्वतंत्र नांवांनीं* उल्लेखितातः—[१] रविवार=आदितवार, [२] सोमवार=चंद्रवार किंवा इंदुवार, [३] मंगळवार =भौमवार, [४] बुधवार=सौम्यवार, [५] गुरुवार=बृहस्पतवार, [६] शुक्रवार=भृगुवार किंवा भार्गववार आणि [७] शनिवार=मंदवार असें म्हणतात. तिथि, वार, शक, संवत्सरपद्धतीबद्दल घुढें विवेचन येणारच आहे. संस्कृतांत जे विशेष आढळून येतात त्यांचाच येथें उल्लेख केला आहे.

## १७ फारसी साधनें

मुसलमानांच्या आगमनाबरोबर हिंदुस्थानांत फारसीचा प्रवेश झाला, व मुसलमानी सत्तेबरोबर ती राजभाषा म्हणून सर्वांवर अधिकार गाजवूं लागली. इ० सनाच्या १५ व १६ व्या शतकांत तिचा सर्वत्र प्रसार झाला होता. खेडेगांवांतून महजरादि कांहीं गांवकी थाटाचीं कागदपत्रें मराठींत लिहिलीं जात. परंतु बहुतेक सर्व राजकीय दप्तर फारसींतच ठेवलें जाई इतकेंच नव्हे तर फारसी ही राजभाषा झाल्यानें तिचा व्यवहारांत इतका उपयोग केला जाऊं लागला कीं, मराठी पत्रांत फारसी शब्दांचा अर्ध्याहून अधिक उपयोग केला जाई. उलट लिपी वापरावयाची ती मोडीही क्वचित् प्रसंगीं वापरली जाई. विशेषतः १७ व्या शतकाच्या अखेरीस अशा प्रकारचीं बरींच पत्रें आढळतात. खास कुत्बशहानें आदिलशहास लिहिलेलें ऊर्दू भाषेंतील पत्रही मोडी लिपींत लिहिलेलें आढळत आहे.† यांचें कारण असें देतां येईल कीं, महाराष्ट्रांतील लोकांच्या व्यवहारांत मराठी व मोडीच विशेषेंकरून शिवाजीनें रूढ केल्यानें त्याचा लोकांवर परिणाम झाला होता.

शिवशाहीच्या इतिहासाला उपयुक्त अशीं मोगली राजकीय साधनें

* अमरकोश—प्रथमकांड.

† भारत इतिहास संशोधक मंडळ संग्रह.

फारसींतच मिळतील. औरंगजेबाचीं बरींच पत्रें उपलब्ध होऊं शकतील, परंतु विजापूर व गोवळकोंडा येथील दप्तर मात्र हातीं लागणें कठीण आहे. या दोन्हीही शाह्यांचा शिवशाहींतच ऱ्हास झाला व सर्व खजिन्याबरोबर कागद-पत्रांचा दप्तरखानाही नाहींसा झाला. फारसी साधनांत इतिहासोपयोगी अशीं प्रत्यक्ष राजकीय साधनें जर कांहीं उपलब्ध झालींच तर तीं मोगली दप्तरांतच उपलब्ध होतील. खासगत पत्रांचा व इतिहासग्रंथांचा सांठा मात्र मराठी-पेक्षां अधिक मिळण्याचा संभव आहे. फारसी साधनांचे स्थूल मानानें चार प्रकारचे भाग पाडतां येतील. [१] फर्मानें किंवा दरबारी हुकूम व कौलनामादि इतर सरकारी पत्रें, [२] वाक्यांसारखीं वाकेनिविसांनीं किंवा इतर सुभेदारांनीं आपापल्या हुजुरांत लिहिलेलीं पत्रें, [३] तवारिखांसारखीं नंतर जुळवून तयार केलेलीं टिपणें, व [४] नामे यांसारखीं चरित्रकारांनीं मुद्दाम तयार केलेलीं चरित्रें. सरसनिरसतेच्या मानानें हे सामान्य चार भाग पडतात. महाराष्ट्रांतील खासगी पत्रव्यवहार मराठींत होत होता. राजकीय थाटाचीं व हवालदारांचीं पत्रें मात्र फारसींत होत.

फारसी अप्रकाशित साधनांचा सांठा बराच आहे. प्रत्येक इतिहास-कालीन घराण्यांत एखादी तरी फारसी सनद संग्रहीं असतेच. असल्या सनदा बहुधा शिवकालीन अगर शिव-पूर्वकालीन असतात. शिवशाहींत व पेशवाईंत मराठी सनदाच देण्याचा प्रघात असे. कांहीं युरोपीय वगैरे लोकांशीं व दिल्लीच्या नामधारी पादशहाशीं अगर त्यांच्या वजिरांशीं जो पत्रव्यवहार होत असे तो फारसींत होई. परंतु सर्व महत्त्वाचा व राजकीय-विषयक अन्तर-राजकीय-कारभार मराठींतूनच चाले. त्यामुळें ज्या कांहीं फारसी सनदा आज महाराष्ट्रांतील इतिहासकालीन घराण्यांत सांपड-तात त्यांत मलिकंबरी सनदाच विशेष आहेत. त्यानंतर मोगलांच्या सनदांचा भरणा आहे. आदिलशाही व कुत्बशाही सनदाही बऱ्याच खासगत संग्रहांत आहेत. राजकीय कारभाराचीं कागदपत्रें व देशमुखी-देशपांडेपणाच्या वेळच्या शिवशाहीच्या पूर्वीच्या कागदपत्रांच्या संग्रहाचा मात्र अद्यापि पत्ता नाहीं. बहुतेकांचा नाशच झाला असावा. फारसी इतिहासग्रंथही कित्येक घराण्यांत जोपासलेले आहेत. हे खासगत संग्रह सोडले म्हणजे महाराष्ट्रांतील मोठे संग्रह म्हणजे भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, पारसनीस-संग्रह व राजवाडे-

संग्रह. या तीन संग्रहांत फारसी साधनांचा संग्रह आहे. यांतील प्रो० पोतदार यांनीं नुकताच प्रदर्शित केलेला आदिलशाही कागदपत्रांचा संग्रह बराच महत्त्वाचा आहे. महाराष्ट्रांतील एलिनिएशन दप्तरांतील फारसी संग्रह अजूनपर्यंत चांगलासा तपासला गेला नाहीं. परंतु त्यांतही बरींच साधनें महत्त्वाचीं आहेत असें तज्ज्ञांचें मत आहे. गोवा व मद्रास रेकॉर्डस् मध्येंही फारसींत लिहिला गेलेला पत्रव्यवहारही संग्रहित केला आहे. उत्तर-हिंदुस्थानांतील निरनिराळ्या संग्रहांत मोगली पत्रांचा संग्रह आहे. त्यांतील बहुतेक साधनें उत्तर-हिंदुस्थानांतील राज्यकारभाराचीं आहेत. मोगलांच्या आणि विशेषतः औरंगझेबाच्या पत्रांत दक्षिणेंतील कारभाराचा उल्लेख आढळतो. परंतु मोगलांचें दक्षिणेंतील दप्तर उपलब्ध होण्याची फारशी आशा धरवत नाहीं. इंडिआ ऑफिस व ब्रिटिश म्युझिअममध्यें फारसी साधनांचा संग्रह बराच आहे. यांतील कांहीं लाबिला आहे. परंतु या साधनांचें फेरिस्त सूक्ष्म तपासणी करून केलेलें नाहीं. त्यामुळें साधनांचा विषय बिनचुकपणें अवगाहन करतां येत नाहीं. शिवाय न लाबला गेलेला असा बराच संग्रह इंडिआ ऑफिसच्या माळ्यावर पडला आहे. मराठ्यांच्या इतिहासाचें चागलें ज्ञान असल्याशिवाय फारसी संग्रहाचें फेरिस्त करतां येणार नाहीं. कारण कित्येक कागदांचा काल ठरविणें, पत्र कोणाचें कोणाला गेलें वगैरे पाहाणें याला या साधनांच्या परीक्षणाचें चांगलें ज्ञान होणें अवश्य आहे. कारण हिंदी लेखन-पद्धति व युरोपीय लेखन-पद्धति यांत बराच भेद असून हिंदी लेखन-पद्धतींतील निर्णायक लेखनकालाचा अभाव व लेखकाच्या नांवाचा वगैरे नामनिर्देश नसणें ह्या मोठ्या अडचणी आहेत. इंग्लंडमध्यें 'लेज कलेक्शन' वगैरे सारखे कांहीं संग्रह इतर विश्वविद्यालयांच्या संग्रहालयांत ठेवलेले आहेत. त्यांतही फारसी फर्मानें असल्याचा उल्लेख आढळतो. डॅनव्हर्सच्या अहवालांवरून हेग, लिस्बन, एव्होरा व पारिस-म्युझियम व स्टेट आर्काइव्हसमध्येंही फारसी साधनें असल्याचें समजतें. आतांपर्यंत फारसी साधनांचें संशोधन आयर्विन व प्रो०सरकार यांनींच विशेषतः केलेलें दिसतें. इलिअट व डौसन यांनीं कांहीं शिवकालीन फारसी इतिहास-ग्रंथांची इंग्रजींत भाषांतरें प्रसिद्ध केलीं. परंतु तीं संक्षिप्तस्वरूपांत असून भाषांतर व रूपांतर हीं दोन्हीही सदोष आहेत. इलिअट-डोसनमधील बादशाही नामा, काफीखान व

अलमगिरनामा हे ग्रंथ शिवशाहीस उपयुक्त आहेत. आयर्विन व प्रो० सरकार यांच्या परिश्रमानें फारसी साधनांतील बरींच उपयुक्त साधनें आपल्या निदर्शनास आलीं आहेत. स्टोरिआ-द-मोगर या ग्रंथाच्या चवथ्या खंडाच्या शेवटीं जी ग्रंथसूचि दिली आहे त्यावरून व प्रो० सरकार यांनीं आपल्या औरंगजेबाच्या चरित्राच्या दुसऱ्या व तिसऱ्या खंडांत जी ग्रंथसूचि दिली आहे त्यावरून दरबारी माणसांकडून लिहविलेले सय्यद अहमदचा तुझक-इ-जहांगिरी, अबदुल हमीद लाहोरीचा व महमद वारीसचा पादशाह-नामा, महंमद सालीह कंबूचा अमल-इ-सालीह असे चार शहाजहानच्या चरित्राचे ग्रंथ असून मिरझा महंमद कासीमचा अलमगीरनामा व महंमद साकी मुस्ताइद खानाचा मासिर-इ-अलमगिरी हे औरंगजेबाच्या चरित्राचे ग्रंथ उपलब्ध झाले आहेत. यांतील लाहोरीचा पातशाहनामा, अलमगीरनामा व मासिर-इ-अलमगिरी हे मूळ ग्रंथ बिब्लिओथिका इंडिकामध्यें छापले आहेत. खासगत लिहिलेल्या इतिहासग्रंथांत अकिलखान रझी याचा झाफरनामा, बकिअत, हलत-इ-अमलगिरी किंवा औरंगजेबनामा या नांवानें उपलब्ध असलेला छोटा इतिहास, मुंतखब-उल्-लुबाब नांवाचें काफी-खानानें लिहिलेलें औरंगजेबाचें चरित्र, नष्ख-इ-दिलकश या नांवाचा भीमसेनानें लिहिलेला औरंगजेबाचे चरित्राचा ग्रंथ व इशरदासचा फतूत-इ-अलमगिरी अशा चार ग्रंथांचा समावेश होतो. यांतील काफीखानाचा ग्रंथ बिब्लिओथिका इंडिकांत छापलेला आहे. मराठी ९१ कलमी बखरीचें तरीख-इ-शिवाजी हें भाषांतर व मोगली सरदारांची हकीकत सांगणारा मासिर-उल्-अमारा हे दोन ग्रंथ शिवशाहीच्या फारसी साधनांत थोडेबहुत उपयुक्त ठरतील. परंतु याहीपेक्षां महत्त्वाचीं मोगली साधनें उपलब्ध झालीं आहेत. अखबरत-इ-दरबार-इ-मुअला नांवाच्या कलकत्त्याच्या रॉयल एशि-आटिक सोसायटीच्या दप्तरांत औरंगजेबाच्या कारकीर्दीतील ३, ४, ८–१५, १७, २०–२२, ३६–४० आणि ४२ ते ४९ या वर्षांचा दरबारी पत्रव्यवहार आहे. याशिवाय औरंगजेबाच्या कारकीर्दीतील बरींच पत्रें व पत्रांचे मसुदे व टांचणें उपलब्ध झालेलीं आहेत. यांतील कित्येक शिवशाहीच्या इतिहासाला फार महत्त्वाचीं आहेत. त्यांचा येथें विस्तार करीत नाहीं. विजापुर व गोवळकोंडा यांच्या इतिहासाबाबतचे ग्रंथही उपलब्ध आहेत. त्यांत

मिरझा इब्राहीम झुबाइरीचा बसातिन-इ-सलातिन, तरिख-इ-हफ्त-कुर्सी, सय्यद नुरुल्लाचा तरिख-इ-आलि आदिलशहा, तरिख-इ-कुत्बशाही व सय्यद महंमद मिर अबु तुरबचा कुत्बनामा-इ-अलम हे ग्रंथ उपलब्ध झाले आहेत. यांशिवाय पारसनीस व मावजी संग्रहांतील फर्मानें व फारसी कागदपत्रें, सरदार आबासाहेब मुजुमदार यांनीं मिळविलेलीं व मंडळांत ठेवलेलीं अनेक आदिलशाही फर्मानें वगैरे अस्सल फारसी साधनेंही बरींच आहेत. यांतील कांहीं श्री० आबासाहेब यांनीं भाषांतर करून छापलीं आहेत. सारांश, फारसी साधनसंग्रह फार मोठा आहे. परंतु त्याच्या व्याप्तीच्या मानानें त्यांतील फारच थोडा भाग छापला गेला आहे. रॉयल एशिआटिक जर्नल व इंडिअन हिस्टॉरिकल कमिशनच्या अहवालांत कांहीं थोडा छापला जातो. परंतु हा साधनसंग्रह संशोधन करणें व छापणें हें काम विशेषतः ज्यांची भाषा उर्दू आहे त्यांनाच विशेष सोईचें व सोपें आहे.

फारशी साधनांच्या व्याप्तीप्रमाणेंच फारशी लेखनकलेंतील पद्धतीही विविध आहेत. फारसी लिपी बरीच जुनी असल्यानें ती बरीच संस्कृत झाली होती. तिच्या वळणांत किंवा मोडींत फरक होण्याची स्थिति नाहींशी झाली होती. परंतु लिपीच्या वळणांत मात्र दोन परंपरा स्पष्ट दिसून येतात. [१] आरबी व [२] फारसी. आरबी वळणाच्या अक्षरांना बरेच रफार वगैरे देऊन विभूषित करण्याचा प्रयत्न केलेला असतो व वळण जरा लांबट असतें. फारसींत आरबीइतका विभूषित करण्याचा परिपाठ नाहीं. फारसी लिखाण वाचण्यास जड जातें व तें वाचण्यास बराच अभ्यासही लागतो. या वर्णमालेंत स्वरांना गौणत्व दिल्यामुळें व कांहीं व्यंजनांच्या अक्षराकृति ओळखण्याचें साधन केवळ त्या अक्षराकृतींवरील अगर खालील टिंबावरून अगर टिंबांच्या संख्येवरून स्पष्ट होणारें असल्यानें त्यांतील भेद लवकर लक्षांत येत नाहींत. विशेषतः जेव्हां अशीं भेदसूचक टिंबें गाळलीं जातात तेव्हां तर लेखन फारच दुर्बोध होऊन राहातें. लघेटीच्या लिहिण्यांत टिंबें गाळण्याचाच परिपाठ असे. फारसीच्या लेखनांत अलिफ्, दाल्, झाल्, रे, जे, झे, वाव व ये हीं अक्षरें कोणत्याही पुढच्या अक्षराकृतीस जोडलीं जात नाहींत त्यामुळें हीं अक्षरें स्वतंत्रपणें लिहिल्यानें वाचनास सुबोध असतात. परंतु इतर सर्व अक्षराकृति इतरांना जोडून लिहिल्या जातात. त्यामुळें जलद लिहितांना आकृतींच्या

आकारांत तर फरक पडून दुर्बोधता येतेच पण फर्डेशाहींत तर एकदोन व्यंजनाकृति एखाद्या रफारांत अगर फराट्यांत गुप्त होऊन जातात. सारांश फारसीचें वाचन इतर कोणत्याही लिपीच्या वाचनापेक्षां अस्पष्ट असतें. अशा लेखनांतील मजकुराची संगति जरी अभ्यासानें लावतां आली तरी अपरिचित शब्द व विशेषनामें लावण्यांत हटकून चुका होतात. विशेषनामें परिचयाचीं असतील तर तीं अनुमानानें किंवा अजमासानें लावणें फारसें जड जाणार नाहीं. परंतु या ऐतिहासिक विशेषनामांचा परिचय नुकताच कोठें होऊं लागल्यामुळें बरींचशीं विशेषनामें अगदीं चुकीनेंच वाचलीं जातात. तसेंच मुसलमानी नांवें व किताब यांमधील भेदही जितका स्पष्ट व्हावा तितका तो झालेला नाहीं. एकतर सर्व किताबांची यादी मिळाली नाहीं किंवा तयार झाली नाहीं आणि दुसरें कारण असें कीं, चरित्र अगर इतर ग्रंथांत व बऱ्याच कागदपत्रांत माणसांच्या खास नांवांपेक्षां हुद्दा व किताब यांचाच विशेषेंकरून उल्लेख केलेला आढळतो. परंतु हे किताब कधीं वंशपरंपरेनें तर कधीं अधिकारपरंपरेनें चालत असत. त्यामुळें ऐतिहासिक कार्यांतील कार्याकारणपरत्व ठरवितांना यांतील व्यक्तिभिन्नत्व नीटसें लक्षांत न आलें तर त्या प्रसंगाचें वाचन पूर्ण सदोष राहण्याचा संभव असतो.

फारसी कागदपत्रांचे निरनिराळे प्रकार असून त्यांचीं निरनिराळीं नांवें आहेत. परंतु या सर्व प्रकारांचा मराठी साधनांखालीं विचार व्हावयाचा आहे. मराठी साधनांतील कांहींचीं नांवें संस्कृतावरून नवीन बसविलीं असल्यानें त्या नांवाचे फारसी शब्द राजव्यवहारकोशांतून घ्यावेत.* फारसी नांवें येथें विस्तारभयास्तव देत नाहीं. या सर्व प्रकारच्या पत्रव्यवहाराला कागद वापरावयाचा तोही ठराविक प्रकारचा वापरला जाई. हे कागद वापरण्याचे प्रघात सामान्यरूपांत बसविण्याइतके कागदपत्र तपासण्यास मिळाले नाहींत. शिवशाहीच्या सुमारास कागदांचे कांहीं ठिकाणीं कारखाने होते व कांहीं ठिकाणीं कागद मुल्ला-लोक आपल्या फावल्या वेळीं करीत असत. मुसलमानी सरदार व पातशहा किंमतीचे व रुपेरी अगर सोनेरी बेगडानें मढविलेले व वेलबुट्टी काढलेले कागद वापरीत. मुसलमानांइतके

* शिवचरित्रप्रदीप—सदाशिव महादेव दिवेकरसंपादित, पृष्ठ १३७–१९०.

किंमतीचे व निरनिराळ्या सांच्यांचे कागद जगांत इतर लोकांत वापरण्याचा क्वचितच परिपाठ असेल. यांच्या ग्रंथांत मूळ लिखाणापेक्षां या वेलबुट्टीचें व त्याला लागणाऱ्या मेहेनतीचें जितकें कौतुक करावें तितकें थोडेंच होतें. कित्येक वेळां ही वेलबुट्टी अगर कागदांवरील चित्रकाम फारच मनोहर असतें. कागदांचे आकारही अगदीं पांच इंच रुंदीपासून १५ इंचांपर्यंत असत. रंगीत कागदही वापरले जात. फर्मानांचा कागद फार मोठा असे. फर्मानाचा कागद कवडीनें घांसून गुळगुळीत केलेला असे. कित्येक वेळां अगदी कांद्याच्या पापुतऱ्यासारखा पातळ व गुळगुळीत कागदही दुसऱ्या एखाद्या जाड कागदावर डिकवून वापरण्यांत येत असे.

निजामशाहीचीं बरींच फर्मानें प्रथम फारसींत व नंतर मराठींत लिहिलेलीं आढळतात. या फर्मानांच्या शेवटीं मोर्तब सूदचा शिक्का असे व त्याखालीं मुश्रीफ, दप्तरखास, मजमु, नियातीब व सुरनिवीस यांचे बारसूदचे व तालिकसूदचे शेरे असत. हवालदार व सरदार आपापल्या पत्रांवर शिक्का करीत. सर्वच फारसी साधनांवर मोर्तब होत नसे. मोर्तबाऐवजीं या सरदारांचे मुतालिक आपला शिक्का शेवटीं करीत. आदिलशाही फर्मानांवर आदिलशहाचा शिक्का व कुत्बशाही फर्मानांवर कुत्बशहाचा शिक्का डोक्यावर असला म्हणजे तेथें इतर वजिरांचे वगैरे शिक्के होत नसत. मात्र अल्लाह मुल्क लिल्लाह, हुवल खलील किंवा हुवल गनी किंवा नुसता अलिफ यांसारखीं वचनें माथ्यावर लिहीत. मोर्तबाऐवजीं त्या त्या सरदारांचे फक्त शिक्के होत. आदिलशहाच्या शिक्क्याजवळ देवाच्या नांवाचाही शिक्का असे. मोगली फर्मानांवर दोन तुग्रे लिहिण्याची चाल होती. पहिली तुग्र्याची आडवी चौकडी अल्लाच्या नांवाची असे व दुसरी उभी चौकडी बादशहाच्या नांवाची असे. त्याशिवाय सर्व सिंहासनाधिष्ठित तद्वंशीय पादशहांची निरनिराळ्या चक्रांत क्रमानें ग्रथित केलेल्या नाममालिकेचा एक भला मोठा शिक्का असे. त्या शिक्क्याच्या डोक्यावर घुमटासारखी आकृति असून त्यांत 'हुवल अला' म्हणजे परमेश्वर श्रेष्ठ आहे अशीं अक्षरें असत. महत्त्वाच्या फर्मानांवर पातशहा आपला केशरी पंजा उठवीत असे. या फर्मानांवरही 'मर्तब सूद'चा शिक्का नसून त्याऐवजीं दक्षिणेंतील फर्मानांवर

निजामाचा शिक्का असतो. मराठी व फारसी पत्रव्यवहारपद्धति सारखीच आहे. पत्र पाठविणारा आपलें व पत्र ज्याला पाठविलें त्याचें नांव पत्राचे प्रथमारंभीं मजकुरांत लिहीत. पत्राखालीं सही करण्याचा परिपाठ नव्हता. सन प्रथमारंभीं व तेरिख व महिना नेहमीं शेवटीं देण्यांत येतो. फर्मानांतील बहुतेक अर्धा भाग अलकाबानें म्हणजे सरदारांच्या अगर पातशहाच्या गौरवात्मक विशेषणांनीं व पदव्यांनीं भरलेला असे. संस्कृत दानपत्रांच्या प्रशस्तींत जशी कुळकट देण्याचा प्रघात असे तद्वतच फारसी फर्मानांत पातशहाच्या अगदीं राजवाड्याच्या उंबरठ्यापासून वर्णन मिळतें. किताबांच्या व विश्वासाच्या ह्या विशेषणांतून सुटतां घुरे वाट होते.

फारसी कागदपत्रांचा काल ठरविणें मराठी साधनांएवढेंच कठीण जातें. परंतु मराठी व फारसी साधनांचें परीक्षण व कालनिर्णय करण्याचा मार्ग एकच असल्यानें तो येथें देत नाहीं. फारसी सन व तारखांबद्दल मात्र विचार करणें जरूर आहे.

फारसी व बऱ्याच मराठी साधनांत मुसलमानी तारीख, महिना व सन लिहिण्याची पद्धति होती. मुसलमानी सन चार प्रकारचे आढळतात. [१] हिजरी, [२] आरबी किंवा सुहुर, [३] फसली, व [४] इलाही. यांतील सुहुरसन अक्षरीं लिहिण्याची वहिवाट होती. बाकीचे बहुधा संख्यांकांतच लिहिले जात. हिजरी सन हिसाबी पद्धतीप्रमाणें ता. १५ जुलै व हेलाली पद्धतीप्रमाणें ता. १६ जुलई इ० सन ६२२ रोजीं सायंकाळीं सुरू झाला. हिजरी सनाचें साल चांद्रमानाचें असतें. तीस वर्षांच्या कालचक्रांत दुसरें, पांचवें, सातवें किंवा आठवें, दहावें, तेरावें, पंधरावें किंवा सोळावें, अठरावें किंवा एकोणिसावें, एकविसावें, चोविसावें, सव्विसावें किंवा सत्ताविसावें आणि एकोणतिसावें साल अधिक समजून यांतील जिल्हेज महिन्याचे २९ सा ऐवजीं ३० दिवस धरतात. बाकी इतर सालीं प्रत्येक महिन्याचे दिवस अनुक्रमें ३० व २९ असतात. सुहुर सनाचा प्रारंभ २४ मे इ० सन ६०० म्हणजे हिजरी सनाच्या बावीस वर्षें आधीं झाला. सुहुर सनाचा प्रारंभ मृगापासूनच होतो. याला मृगसाल असेंही म्हणतात. हा अक्षरीं लिहिण्याचा प्रघात आहे. या सनाचे महिने व तारिखा हिजरीप्रमाणेंच असतात. सुहुर सन अक्षरीं लिहितांना जी पद्धति वापरली जाते

ती येणेंप्रमाणें :—१=इहिदे, २=इसन्ने, ३=सल्लास, ४=आर्बा, ५=खमस, ६=सीत, ७=सब्बा, ८=सम्मान, ९=तिस्सा, १०=अशर, २०=अशरीन, ३०=सल्लासीन, ४०=आर्बैन, ५०=खमसेन ६०=सीतैन, ७०=सबैन, ८०=सम्मानीन, ९०=तिस्सैन, १००=मय्या, २००=मय्यातैन, ३००=सल्लासमय्या, ४००=आर्बामय्या, ५००=खमसमय्या, ६००=सीतमय्या, ७००=सब्बामय्या, ८००=सम्मानमय्या, ९००=तिस्सामय्या व १०००=अलफ. या पद्धतीनें सन लिहितांना प्रथम एकं स्थानांतील १ ते ९ चा उल्लेख करावयाचा, नंतर दशं स्थानचा म्हणजे १० ते ९०चा निर्देश करून मग किती शें व हजार तें लिहावयाचें. जसें सुहुर सन १३८७ लिहावयाचा असेल तर तो ७+८०+३००+१००० म्हणजे सब्बा सम्मानीन सल्लासमय्या व अल्फ असा लिहिला जाईल. फसली सन दक्षिणेंत शहाजहानानें इ० सन १६३६ त सुरू केला. त्यामुळें दक्षिणेंतील साधनांत फसली सनाचा उल्लेख आला तर तो फसली सन १०४६ पासूनचा येतो. फसली सनही सुहुर सनाप्रमाणें मृगापासूनच सुरू होतो. फसली सनाचे महिने व दिवस हिजरीप्रमाणेंच असतात. हा सन सुहुर सनापेक्षां ९ वर्षांनीं पुढें असतो. सुहुर व फसली सन सौरमानावर बसविला असल्यामुळें सुहुर सनावरून इसवी सन काढावयाचा असल्यास सुहुर सनांत मृगापूर्वी ६०० व मृगानंतर ५९९ वर्षें जसा मिळवून काढतात तसेंच फसली सनांत मृगापूर्वी ५९१ व नंतर ५९० वर्षें मिळविलीं म्हणजे इसवी सन निघतो. परंतु हिजरीच्या सनावरून इसवी सन काढावयास नेमकें कोष्टक सांगतां येणार नाहीं. कारण अदमासें ३२–३३ वर्षांनीं सौरमानाप्रमाणें चांद्रमानाच्या वर्षांत सबंध एक वर्षाचा फरक पडतो. म्हणून शिवशाहींतील हिजरी सनावरून इसवी सन काढावयाचा असेल तर हिजरीच्या १०२६ पासून १०५९ पर्यंत ५८९, १०६० पासून १०९२ पर्यंत ५९०, १०९३ पासून ११२६ पर्यंत ५९१ व ११२७ पासून ११६० पर्यंत ५९२ मिळवावे म्हणजे इसवी सन येतो. हिजरी सन १०२६च्या ३ मोहरमानंतर इ० सन १६१७चा वर्षारंभ सुरू होतो, हिजरी सन१०६० च्या ८ मोहरमाला इ० सन १६५० चा वर्षारंभ होतो, व हिजरी सन ११२७ च्या ५ मोहरमाला इ० सन १७१५ सुरू होतो, म्हणून त्या-पूर्वीच्या मोहरमच्या दिवसांच्या पत्रांतील इसवी सन काढतांना मागील

कालचक्राचें कोष्टक लावावें लागेल. अकबराचा इलाही सन दक्षिणेंत चालू नव्हता. परंतु अकबरानें घालून दिलेल्या महिन्यांचीं नांवें मात्र मुसलमानी महिन्यांच्या ऐवजीं दिलेलीं आढळतात. मुसलमानी महिन्यांचीं नांवें व दिवसः [१] मोहरम–३० दिवस, [२] सफर–२९ दिवस, [३] रबि-उल-अव्वल ३० दिवस, [४] रबि-उल-आखर किंवा रबि-उस्-सानी–२९ दिवस, [५] जमाद-उल-अव्वल–३० दिवस, [६] जमाद-उल-आखर किंवा जमाद उ-सानी–२९ दिवस, [७] रजब–३० दिवस, [८] साबान–२९ दिवस [९] रमजान–३० दिवस, [१०] सव्वाल–२९ दिवस, [११] जिकाद –३० दिवस आणि [१२] जिहज–२९ दिवस व अधिक वर्षीं ३० दिवस. जुन्या फारसी महिन्यांचीं नांवेंः—[१] फरवरी, [२] आर्दिबेहस्त, [३] खुर्दाद, [४] तीर, [५] अमरदाद, [६] शहरिअर, [७] मेहेर, [८] आबान, [९] आजुर, [१०] दय, [११] बहमन, आणि [१२] इस्फिंदार. मुसलमानी महिने व दिवसांची गणती चांद्रमानानें केलेली आहे. जुन्या फारसी महिन्याचे दिवस कोठें सरसहा ३० मानून कांहीं ३२ दिवसांचे महिने मानले जातात व कांहीं ठिकाणीं २९ व ३० दिवसांचे महिने मानून त्यांतील कांहीं ३२ दिवसांचे धरून त्यांची गणती सौरमानाप्रमाणें केलेली आहे. परंतु यांतही एका दिवसाचा फरक येतो. कित्येक ठिकाणीं सर्व महिन्यांचे दिवस सरसहा ३० मानून वर्षाखेरीला ४-५ दिवस अधिक धरतात. चालू पद्धतींत मात्र दयचे २९, फरवरी ते शहरीअरचे ३१ दिवस धरून बाकीच्या महिन्यांचे ३० दिवस धरतात. मुसलमानी पद्धतीप्रमाणें दिवसांना नांवें दिलेलीं आहेत तींः—एकशंबा, दोशंबा, सिशंबा, चहारशंबा, पंजशंबा, जुम्मा किंवा आदिना व शंबा किंवा हत्फा. हीं नांवें अनुक्रमें रविवार ते शनवारचीं जाणावींत. उपरिनिर्दिष्ट तीन सनांशिवाय जलूस सनही चालण्याचा प्रघात होता. जलुस सन प्रत्येक बादशहाच्या राज्याभिषेकापासून सुरुवात होतो. दक्षिणेंतील पातशहा आपला जलुस लावीत नसत. मोगल पातशहा मात्र आपला जलूस पाळीत. शिवशाहींत दोनच जलुस मुख्यतः झाले. पाहिला शहाजहानाचा. तो १८ जमादिलाखर १०३७ हिजरीला म्हणजे ता० १४ माहे फेब्रुवारी सन १६२८ रोजीं सुरू झाला, व औरंगजेबाचा १ रमजान १०६८ हिजरीला म्हणजे ता० २४ मे १६५८ पासून

सुरू झाला. परंतु जलुस सन हिजरीप्रमाणें मुसलमानी महिना व तारखेवर बदलतो हें लक्षांत ठेवावें.*

हिजरी सन लिहिण्याची आणखी एक पद्धत आहे. या पद्धतीप्रमाणें फारसी वर्णांना ठराविक किंमती दिल्या असून त्या वर्णांच्या समुच्चयानें होणाऱ्या दोन तीन शब्दांचें विशिष्ट अर्थदर्शक एक वाक्य बनवावयाचें. संस्कृत पद्धतीप्रमाणें ठराविक शब्दसमुच्चयानें संख्या दर्शविली जाते. त्यांत त्या शब्दसमुच्चयांना अर्थ असावयास पाहिजे असें नाहीं. परंतु या पध्दती-प्रमाणें ज्या अक्षरयोजनेनें शब्द तयार करावयाचे त्यांत विशिष्ट प्रकारचा अर्थ व किंमत साधली पाहिजे. या पध्दतीला अब्जदपध्दति असें म्हणतात. या अब्जदपध्दतीचें सूत्र किंवा कारिका अशीः—"अब्जद हौवज्ञ हत्ती कलीमन साफस कुर्शत साखज झजघ." या आठ अर्थहीन शब्दांच्या योगानें संख्या दर्शविली जाते तीः अब्जदः १, २, ३, ४: हौवज्ञः ५, ६, ७; हत्तीः ८, ९, १०; कलीमनः २०, ३०, ४०, ५०; साफसः ६०, ७०, ८०, ९०; कुर्शतः १००, २००, ३००, ४००; साखजः ५००, ६००, ७००; झजघः ८००, ९००, १०००. या पध्दती-प्रमाणें प्रत्येक वर्णाची किंवा अक्षराची किंमत समजावी म्हणून वर्ण-मालेंतील अक्षरांची अकारविल्हेप्रमाणें किंमती देत आहे. अलिफ=१, बे किंवा पे=२, ते=४००, से=५००, जीम किंवा चीम=३, हय=८, खय=६००, दाल=४, झाल=७००, रे=२००, जे किंवा झे=७, सीन=६०, शीन=३००, साद=९०, ज्वाद=८००, तोय=९, झोय=९००, अइन=७०, घइन=१०००, फे=८०, काफ=१००, काफ किंवा गाफ=२०, लाम=३०, मीम=४०, नून=५०, वाव=६, हे=५, ये=१०. या पद्धती-प्रमाणें एखादें उदाहरण सोडविलें म्हणजे ही पद्धति सहज लक्षांत येईल. या पध्दतीप्रमाणें वाक्य रचण्यास थोडेंसें कौशल्य लागतें. काफीखानानें शिवाजीच्या मृत्यूचा सन रचला. तो सार्थ व बरोबर आहे म्हणून त्याबद्दल त्यानें फार अभिमान व कृतकृत्यता मानली आहे. काफीखानानें शिवाजीच्या

* The Indian Calendar by R. Sewell and S. B. Dikshit (1896) pp. 42-47 and 101-106; Indian Chronology by L. D. S. Pillai (1911) pp. 43 and 45 व बाळाजी प्रभाकर मोडककृत जंत्री (१८८९) पृष्ठ ५-८, आणि खरे-जंत्री.

मृत्यूचें जें सूत्र रचलें आहे तें:— 'काफीर बजहनम रफ्त' म्हणजे 'काफर नरकाला गेला'. यांतील अक्षरसंख्याः काफ = २० + अलिफ=१ + फे= ८०+ये=१०+रे=२००+बे=२+जीम=३+हे=५ + नून=५०+मीम=४० +रे=२००+फे=८०+ते=४०० = काफीर बजहनम रफ्त=१०९१ हिजरी. या पद्धतीनें सन देण्याची बरीच वहिवाट होती. कबरस्थानावरील किंवा घुमटावरील मृत्युलेख याच पध्दतीनें देत; फारसी इतिहासग्रंथांत मृत्यु अगर जन्म-सन याच पद्धतीनें दिलेले आढळतात. फारसी शिलालेखांतही हीच पद्धति अनुसरलेली दिसून येते. मात्र या पद्धतीनें मुसलमानी धर्मानें स्वीकारलेला जो हिजरी सन तोच लिहिला जातो.

उत्तर हिंदुस्थानांत मुख्यतः फसली सनच चालू होता. या सनाच्या जोडीला जलुस देण्यांत येत असे. दक्षिणेंत हिजरी सन देण्याचा प्रथम प्रघात होता. परंतु सतराव्या शतकाच्या प्रारंभापूर्वीच सुहुर देण्याची बरीच वहिवाट पडून गेली होती. सुहुर सन बहुधा कागदपत्रांत आरंभी अक्षरीं लिहिलेला असतो. आंकड्यांत दिलेला सन हिजरी असतो. हा हिजरी सन विशेषेंकरून शेवटीं देण्यांत येत असे. कित्येक वेळां हिजरी सनही अक्षरीं परंतु शेवटीं लिहिल्याचें आढळतें. सामान्यतः पत्राचे पूर्वार्धांत अक्षरीं येणारा सन सुहुर सन व शेवटीं आंकड्यांत येणारा सन हिजरी असतो. दक्षिणेंत मोगली पत्रांवर जलुस सन दिला जात असे व सुहुर सनाऐवजीं फसलीचा उपयोग करीत. सुहुर अगर फसली सनामागें सुहुर अगर फसली सन असा स्पष्ट उल्लेख आढळतो. कित्येक ठिकाणीं 'सुहुर सन' असे शब्द लिहून त्यापुढें आंकडा घालतात. परंतु तो फसली असल्याचें आढळून येतें. कित्येक पत्रांवर जलुसच देण्यांत येत असे. फारसी इतिहास-ग्रंथांत दक्षिणेकडे हिजरी व उत्तरेकडे जलुस सनाचा उल्लेख करतात. परंतु सर्वच कागदपत्रांत सन दिला जातो असें नाहीं. फर्मानें व अशाच तऱ्हेच्या सरकारी परंतु महत्त्वाच्या पत्रांतून सनांचा निर्देश करीत. परंतु इतर पत्रव्यवहारांत नुसत्याच मुसलमानी महिन्याचा व चंद्राचा म्हणजे तारिखेचा 'छ' लिहून निर्देश करीत. अशा वेळीं त्या पत्राचें वर्ष ठरविणें कठीण जातें. पत्रांवरून पैवस्ती म्हणजे पावती-तारीख घालण्याचा रिवाज असे. अशा पैवस्तींतही सनाचा उल्लेख करण्यांत येत नसे. अशा वेळीं सन ठरविण्यासाठीं आंतील

मजकुरावरच भिस्त ठेवावी लागते. परंतु अशा महिन्याच्या व तारखेच्या उल्लेखांवरून प्रथम हिजरी सनच काढणें सोपें असतें. कारण हिजरी सन मुसलमानी महिन्यांप्रमाणें मोहरमांत सुरू होतो. सुहुर किंवा फसली सनाशीं मुसलमानी महिन्यांचा कांहीं एक संबंध नसतो. तसेंच वारांचाही विभाग मानला जात नाहीं. म्हणून वार व तारीख दिल्यानें जो ताळा पाहतां येणें शक्य झालें असतें तोही मार्ग राहिलेला नाहीं. खरे व पिले यांची या शिवशाहीच्या कालाची तपशिलवार जंत्री प्रकाशित झाली असल्यानें तारखा काढणें वगैरे सोपें झालें आहे. परंतु या जंत्रींतून मुसलमानी तेरिखेला जी इंग्रजी तारीख व मराठी तिथि देण्यांत आली आहे ती दिवसाला जी मुसलमानी तेरिख असते तिची होय. मुसलमानी तेरिख सायंकाळीं सूर्यास्तानंतर सुरू होते. त्यामुळें आदले दिवशीं सायंकालानंतर लिहिलेल्या पत्रांत जी मुसलमानी तेरिख दिली जाईल तिचें इंग्रजी तारखेंत रूपांतर करितांना एका दिवसाचें अंतर पडेल. अशा वेळीं वार दिला असल्यास नक्की तारीख काढणें सोपें झालें असतें. तसेंच अधिक वर्षांच्या कालगणतींतील विविधतेमुळें व चंद्रदर्शनाबद्दलच्या मतभेदांमुळेंही थोडासा फरक पडल्याचें दृष्टीस येईल.

फारसी पत्रांच्या सरसनिरसतेचें परिमाण ठरविण्याचे मार्गही मराठी साधनांसारखेच असल्यामुळें त्यांची येथें चर्चा करीत नाहीं. फक्त फारसी ग्रंथांत जी प्रतिपक्षीयत्वाची छाप दृष्टीस पडते व ज्यामुळें वाचतांना सावधगिरी बाळगावी लागते तेवढ्याचाच विचार केला म्हणजे झालें.

शिवकालीन मुसलमानी शाहींच्या फारसी फर्मानांत किंवा इतर कागदपत्रांत मराठ्यांबद्दलची तेढ आढळणें अगदीं साहजिक आहे. केव्हां केव्हां असेंही दृष्टीस पडतें कीं, मुलुख शिवाजीच्या ताब्यांत असला तरी दिल्लीच्या सम्राटाचीं फर्मानें आणण्याची लोक खबरदारी घेत. यावरून जरी थोडाबहुत शिवशाहीच्या डळमळीत अंमलाचा बोध होऊं शकला तरी त्या फर्मानांत निर्देशिलेला मुलूख खरोखर कोणाच्या ताब्यांत होता याचा नेमका सुगावा लागत नाहीं. राज्याच्या विस्तृततेमुळें लोक गैरसमज करवूनही फर्मानें आणून ठेवीत. अर्थात् कार्यसिद्धीस्तव गैरवांका मजकूर समजाविल्यामुळें अशा फर्मानांत मराठ्यांच्या विरुद्ध मजकूर असणें लिहिणाराच्या शत्रुभावास अगदीं घरून असतें. अशा फर्मानांचा उपयोग करितांना अर्थातच

लिहिणारानें शत्रुपक्षास लाविलेल्या अपमानकारक विशेषणांपासून सावध राहावें लागतें. असा प्रकार सरकारी पत्रांत जरी मोठ्या प्रमाणांत आढळला नाहीं तरी वाकेनिविसाच्या मजकुरांत मात्र तो हटकून आढळावयाचाच. शिवकालांत म्हणजे इ०सन १६७६च्या पूर्वार्धांत मोंगलांच्या जुन्नर परगण्यांत मित्रत्वानें जाऊन राहिलेला फ्रायर नांवाचा एक इंग्रज प्रवासी या वाकेनिविसांच्या काम करण्याच्या पद्धतीबद्दल लिहितांना म्हणतो* कीं " ठरावापेक्षां कमी सैन्य ठेवून राजाची फसवणूक करून पुरेशुरी तैनात उपटण्याचा प्रकार या देशांत सर्वत्र आढळतो. पातशहानें सरदारांच्या सैन्यावर व सरदारांच्या हालचालींवर नजर ठेवून बातमी बेळींच पोहोंचविण्यासाठीं सरकारी अधिकारी नेमलेले असतात. त्यांनीं या सरदारांच्या सैन्याची वगैरे फार बारीकसारीक बातमी द्यावयाची असते. परंतु हे बादशहातर्फेचेच अधिकारी प्राप्तीच्या आशेनें या सरदारांचीच मेहेरनजर राहील असेंच काम करीत राहतात. पातशहाला खात्रीपूर्वक म्हणून अगदीं खोटाच मजकूर समजावितात. पातशहाकडून यांना फक्त नक्त तैनातच मिळते. परंतु या सरदारांकडून त्यांची चांगलीच सरबराई केली जाते. एखाद्या लढाईंत पराजय झाला कीं, हे अधिकारी पराजयाची अनेक आंगचींच कारणें देऊन त्यांत त्या सरदारांकडे वांक नाहीं असें दाखविण्याची पराकाष्ठा करितात. परंतु जय झाला असला तर त्या प्रसंगाचें वर्णन जितकें तिखटमीठ लावून उठावदार करतां येणें शक्य असतें तितकें ते करितात. या सरकारी अधिकाऱ्यांना वाकेनवीस असें म्हणतात." याचप्रमाणें इतरही तत्कालीन लोकांचें मत आहे. परंतु खास जुन्नरच्या सुभेदाराकडे शिष्टाईस गेलेल्या या इंग्रज वकिलाचे वरील उद्गार बाचले म्हणजे या वाक्यांतील मजकूर मराठ्यांची नालस्ती केल्याशिवाय तयार होणेंच शक्य नव्हतें, असेंच अनुमान काढणें भाग पडेल. परंतु मोगली साम्राज्य पूर्ण प्रस्थापित असें साम्राज्य असल्यामुळें कोणतीही खरी गोष्ट अपमानास्पद असल्यास ती वर्ज करून किंवा तिला साधेल तितक्या प्रकारानें त्यांतील कमीपणाचा भाव काढून टाकण्याचा प्रयत्न यशस्वी होणें सहज होतें. कधीं कधीं तर आपल्यावर पातशहा

* A New Account of India & Persia by John Fryer.

रुष्ट होईल हीही त्यांना कल्पना असे. परंतु निरानिराळ्या सबबींवर वेळ मारून नेतां येणें शक्य होतें या परिस्थितीचीही त्यांना जाणीव असे. त्यामुळें ते अशी जबाबदारी पत्करूनही दक्षिणेंतील सुभेदारांची तरफदारी करून त्यांना त्यांचेकडे सुभे कायम ठेवण्यांत मदत करीत. हे सुभेदारही या वाकेनिवीसांची तरफदारी करीत व पैसाही देत. त्यामुळें हे वाकेनिवीस त्या सुभेदारांच्या अगदीं मुठींत रहात. परंतु एखाद्या गोष्टींतील नुसताच कमीपणा काढून टाकला म्हणजे सारें निभावत नसे. एखाद्या जयाचें वर्णन इतकें अतिशयोक्तीचें करावें लागे कीं, त्यामुळें सरदारांचा फार मोठेपणा व शौर्य दिसून येईल. कित्येक वेळां तर प्रांतांत कांहींएक हालचाल नसतांनासुद्धां खोटी बातमी देऊन सरदारांचे खर्च अगदीं निकडीचे म्हणूनच चालले आहेत असें दाखवीत. अशा प्रकारें जेथें वाकेच मुळांत दोषपूर्ण किंवा एकपक्षीय व अतिशयोक्तीचे असत तेथें त्यावरून तयार केलेलीं तवारिखांसारखीं टिपणें तितकीं निर्भेळ होणें शक्यच नव्हतें. विशेषतः या अतिशयोक्तिपूर्ण वाक्यांवरून जे नामे किंवा चरित्रग्रंथ मुद्दाम तयार करविले किंवा केले गेले ते विपर्यस्त झाले असले तर नवल कसचें ! ऐतिहासिक प्रसंगाबद्दलचा चरित्रकारांनीं केलेल्या सहेतुक गफलतीचा नीट विचार केला तर या चरित्रग्रंथांतील मूळ ऐतिहासिक प्रसंग शोधून काढणें जड जातें. यांत वस्तुस्थितीचा विपर्यास केलेला असतो, आणि अशातऱ्हेनें केलेली इतिहासरचना जर आपण सत्य म्हणून घेऊं लागलों तर त्याचा परिणाम चांगला होणार नाहीं. असल्या विवेचनामुळें आपणावर एखाद्याची सहेतुक निंदा केल्याचा अपवाद येईल. अगदीं सोपेंसें उदाहरण घ्यावयाचें तर मोगली किंवा मुसलमानी फर्मानांतून मराठ्यांच्या नांवाचा उच्चार 'काफर' वगैरे शब्दांनीं केला जातो, किंवा मराठ्यांचा नामनिर्देश एकवचनी किंवा उपहास करण्याच्या दृष्टीनेंच केला जातो. तो जर आपण शब्दशः अनुसरला तर एकतर आपणांस खऱ्या वस्तुस्थितीचा बोध झाला नाहीं म्हणून अज्ञान तरी पदरांत घ्यावें लागतें किंवा मराठ्यांच्या अगर एखाद्या विवक्षित समाजाबद्दल केवळ अनादर बाळगून इतिहास लिहिण्याचा विडा उचलिला आहे असा तरी समज केला जातो. समजा कीं, एखाद्या प्रसिद्ध ग्रंथकारानें तत्कालीन व नंतरच्याही सामाजिक पद्धतीप्रमाणें सर्वत्र व सर्व प्रकारच्या

साधनांतून 'शिवाजी', 'संभाजी' वगैरेसारखे संबोधलेलें सांपडूनही 'शिवा' व 'संभा' याप्रकारानें छत्रपतींस संबोधलें तर अक्षम्य ठरतें. या एकाच प्रवृत्तीवरून कितीही प्रसिद्ध व अभ्यासी ग्रंथकार असला तरी त्याच्या इतिहासाकडे प्रत्येकजण साशंकदृष्टीनें पाहूं लागतो. आणि विशेषतः ज्या ग्रंथांत असें अनादरपूर्ण संबोधन एखाद्या विशिष्ट जाति अगर समाजांतील योद्धयांनाच लावलें जाऊन इतरांना योग्य तो मान दिला जातो त्यावेळीं त्या ग्रंथांतील एकपक्षीयता किंवा ग्रंथकाराची खोडसाळ प्रवृत्ति पूर्णपणें स्पष्ट झाल्यानें तो ग्रंथ बव्हंशीं टाकाऊ ठरतो. सारांश, तवारिखांसारखीं टिपणें किंवा नाम्यादि चरित्रग्रंथ खास मोगली किंवा मुसलमानी प्रवृत्तिपर असल्याकारणानें मराठयांच्या इतिहासाला ते पूर्ण प्रमाणभूत मानतां येणार नाहींत. त्रयस्थ या नात्यानें इंग्रज किंवा इतर परदेशीयांनीं मराठयांविरुद्ध केलेला आरोप जितका तत्कालीन परिस्थितीचा किंवा तत्कालीन समजुतीचा निर्भेळ द्योतक ठरेल तितका तो शत्रुपक्षीय लिखाणांतील खात्रीनें मानतां येणार नाहीं. फारसी साधनांचा उपयोग आदिलशाही, कुतुबशाही किंवा मोंगली अंतर्राजकीय चित्रें पाहण्यास अत्यंत इष्ट होईल व त्या दृष्टीनें तीं साधनें फार महत्त्वाचीं आहेत. परंतु मराठयांच्या इतिहासाला तीं केव्हांही सदोष ठरतील यांत शंका नाहीं. विशेषतः ज्या फारसी साधनांत धर्मवेडेपणाचें प्रतिबिंब दृष्टीस पडतें त्यावरून लेखकाच्या मनोविकाराचा पूर्ण कयास बांधून नंतर त्या लिखाणांतील ग्राह्याग्राह्यतेचा विचार करावा लागतो व त्यांतील शुद्ध व गाळीव मजकूर घ्यावा लागतो. परंतु असा शुद्ध गाळीव मजकूर घेऊं म्हटलें तरीही हीं फारसी साधनें मराठयांच्या इतिहासांत कांहीं कमी भर टाकूं शकतील असें नाहीं. तवारिखांत व पुष्कळ बेळां नाम्यांसारख्या चरित्रग्रंथांतही जी हकीगत दिलेली असते त्यांच्या कालनिर्देशांत थोडीशी अपूर्णावस्था दृष्टीस पडते. ज्या महिन्याखालीं अगर वर्षाखालीं एखाद्या प्रसंगाचें वर्णन केलेलें असतें तो सर्व प्रसंग त्या मर्यादित कालांतच घडला असें मानणें अगदीं चुकीचें असतें. त्यांतील मुख्य अगर शेवट त्या मर्यादित कालांत घडला व बाकीचा सर्व प्रसंग अनुसंधानवाचक म्हणून प्रसंग स्पष्ट करण्याकरितां तेथें दिला गेलेला असतो. समकालीन फारसी चरित्रग्रंथ बरेच उपलब्ध आहेत. परंतु त्यांतील सर्व मजकूर मोगली किंवा आदिलशाहीच्या इतिहासाबाबतचाच असल्याकारणानें जेथें जेथें मराठयांचा

या शाह्यांशीं विशेष प्रामुख्यानें संबंध जडला तितक्यापुरतेच उल्लेख त्यांत केलेले आढळतात. त्यामुळें शिवशाही व मोगल किंवा आदिलशाही व शिवशाही यांच्या परस्पर संबंधांच्या इतिहासापुरतीच माहिती आपणांस या फारसी ग्रंथांत मिळूं शकते. अर्थात् नुसत्याच फारसी साधनांचा उपयोग चौकस-बुद्धीच्या प्रवाश्याच्या वृत्ताइतकाही होणार नाहीं. फक्त शिवशाहीची शत्रुपक्षीय बाजू मात्र यांत विशेष स्पष्ट होत असल्यानें शिवशाहीच्या मराठी साधनांतील एकपक्षीयता काढून टाकणें सोपें जाईल. जे फारसी ग्रंथ आज उपलब्ध आहेत ते शिवशाहीचे शत्रु मोगल व आदिलशहा यांचेच किंवा त्यांच्याकरितां मुद्दाम तयार केलेले आहेत. फक्त शिवशाहीचा इतिहास सांगणारा असा मराठ्यांचा अगर इतरांचा एकही समकालीन फारसी ग्रंथ उपलब्ध नाहीं. नाहीं म्हणावयास एकदोन बखरींची फारसी भाषांतरें आहेत. परंतु या भाषांतरित केलेल्या बखरी उत्तरकालीन आहेत. सारांश, फारसी साधनें केवळ शिवाजीच्या शत्रूपक्षीयांकडचीं असल्यानें त्यांचा मराठ्यांच्या इतिहासास उपयोग करितांना दृष्टिकोण बदलावा लागतो हें स्पष्ट होईल. परंतु हीं साधनें कितीही सदोष असलीं तरी सुदैवानें त्यांतील बरींच व विशेषतः फारसी ग्रंथ समकालीन असून हयात आहेत. इतकेंच नव्हे तर खास औरंगजेबाचीं पत्रेंही बरींच उपलब्ध झालीं आहेत व होत आहेत. परंतु यांतील मुख्य भरणा उत्तरहिंदुस्थानांतील असल्यानें त्यांचा मराठी इतिहासाला उपयोग कितपत होईल ही गोष्ट वेगळी. कारण त्या पत्रांचा संबंध फारसा दक्षिणेशीं पोहोंचत नाहीं. तरी तींही सर्व पत्रें नीट बारकाईनें अभ्यासणें जरूर आहे. कांहीं फारसी ग्रंथ इंग्रजींत भाषांतरित झाले आहेत. कांहीं फर्मानांचें भाषांतरही प्रसिद्ध झालें आहे. एकंदरींत फारसी साधनांचा भरणा बराच आहे व मराठी इतिहासाच्या संशोधकाला फारसी आल्याशिवाय त्याला त्याच्या कार्यांत चांगलेंसें यश मिळावितां येणार नाहीं. त्याची सबंध एक बाजू लंगडी पडेल.

## १८ हिंदी व इतर भाषेतील साधनें

भूषण कवीची ग्रंथावली हें एक शिवशाहीविषयक हिंदी काव्य उपलब्ध असून तें मिश्रबंधूंनीं काशीच्या नागरीप्रचारिणी सभेमार्फत इ० सन

१९०७त छापलें आहे. हें एक स्तुतिपर काव्य आहे. यापेक्षां याला फारशी किंमत देण्यासारखें तें नाहीं. छत्रप्रकाश नांवाचा लाल कवीनें लिहिलेला आणखी एक ग्रंथ प्रसिद्ध आहे; हाही काशीच्या नागरीप्रचारिणी सभेनें छापला आहे. या ग्रंथाचें पॉगसननें इंग्रजी भाषांतर 'History of the Boondelas' (1826) या पुस्तकांत केलें आहे. कलसचीं दोन तीन पत्रें उपलब्ध झाल्याचें समजतें. भूषण कवीचा ग्रंथ शिवकालीन असल्यानें महत्त्वाचा आहे, यांत शंका नाहीं. परंतु त्याचा उपयोग इतिहासरचनेला फारसा व्हावयाचा नाहीं. पॉगसनच्या इंग्रजी भाषांतरावरून कै० पांडोबा पटवर्धन यांनीं मराठींत अनुवाद करून बुंदेल्याची बखर या नांवाचें लहानसें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. ह्या बखरीबद्दल पुढें विवेचन येणार आहेच. बसातिन-इ-सलातिनी या फारसी ग्रंथाचें उर्दू-हिंदी भाषांतर बडोद्यांत प्रसिद्ध झालें आहे. जयसिंगाचा मुलगा रामसिंग याचें हिंदींत लिहिलेलें चरित्र उपलब्ध झालेलें आहे. त्याच-प्रमाणें आणखीही हिंदी चरित्रग्रंथ असल्याचा संशोधकांना वास लागला आहे. सारांश, आणखीही कांहीं महत्त्वाचीं हिंदी साधनें उपलब्ध होऊं शकतील यांत शंका नाहीं. गुजराथीमध्यें ऐतिहासिक साधनें असण्याचा संभव आहे. परंतु अद्यापपावेतों कोणतेंही साधन उपलब्ध झाल्याचें ऐकिवांत नाहीं. कानडी, उर्दू, तामील वगैरेही भाषांतून बराच साधनसंग्रह सांपडणें शक्य आहे. परंतु दक्षिणेंत बऱ्याच विद्वान् मंडळींनीं संशोधनांत लक्ष घातलें असलें तरी त्यांचें देशी भाषांतील साधनांच्या संग्रहाकडे व शिवशाहीकालीन इतिहासाकडे फारसें लक्ष गेलेलें नाहीं. त्यांचा अद्यापिही संस्कृताकडेच ओढा आहे. कानडींत बराच साधनसंग्रह मिळाला पाहिजे. तसेंच त्याचें संशोधनही झालें पाहिजे. कारण शिवशाहीचा बराच मोठा इतिहास कर्नाटकांतील आहे. म्हणून कानडी संग्रहाशिवाय मराठ्यांच्या इतिहासाची पूर्तता व्हावयाची नाहीं. कानडी साधनें उपलब्ध होऊन त्यांचें परीक्षण झाल्याशिवाय त्यांचेबद्दल लिहिणें शक्य नाहीं. जशीं जयसिंग-जसवंतसिंगाच्या मोहिमेपासून हिंदी साधनें मिळणें शक्य आहे त्याचप्रमाणें शहाजी विजापुरकरांच्या नोकरीवर राहिल्यापासून कानडी साधनें कर्नाटकांत सांपडणें शक्य आहे. फारसी ही राजभाषा झाल्यामुळें व कानडी आणि विशेषतः गुजराथी, हिंदी वगैरे भाषांना वाली न राहिल्यामुळें त्यांचा व्यव-

हारांत फारसा उपयोग होत नव्हता. फारसी भाषाच व्यवहारांत विशेष राहिली होती. त्यामुळें गुजराथ, राजपुताना, पंजाब, अलाहाबाद वगैरे प्रांतांतून सर्व राजकीय विषयक पत्रें फारसींतून होत असत. महाराष्ट्राला गुजराथ जवळ असूनही तेथें गुजराथींत लिहिलेलीं फारच थोडीं शिवकालीन साधनें मिळूं शकतील. बहुतेक सर्व चित्रगुप्त कायस्थ लोक फारसीच लिहीत. उत्तर-हिंदुस्थानांत तर मुसलमानांचाच भरणा व वर्चस्व होतें. सारांश, इतर भाषांतून जर साधन-सामुग्री उपलब्ध झालीच तर ती कानडी अगर तेलगूंतच होऊं शकेल. आणि या दृष्टीनें प्रयत्नही होणें अत्यंत जरूर आहे. ही गोष्ट खरी आहे कीं, कर्नाटकांतही पूर्वीपासूनच मराठी भाषा व मोडी लिपी बरीच वापरली जात असे. कारण बरेच विजापुरी अधिकारी महाराष्ट्रांतूनच पुरविले जात.

मराठीशिवाय इतर देशी भाषांतून लिहिणारे लोक शिवशाहीच्या कालांत स्वतंत्र नव्हते; मुसलमानांचेच अंकित होते. त्यामुळें साधनांच्या परीक्षणाच्या वेळीं साधन-लेखक कोणाला जबाबदार किंवा अंकित आहे हें प्रथम जाणावें. म्हणजे त्याप्रमाणें त्याच्या मनःस्थितीचा बोध करून घेतां येईल. या सर्वही भाषांतील लेखन-पद्धति फारसी किंवा संस्कृतवरूनच ठरून गेलेली असल्यानें मराठींतील साधनांसाठीं केलेलें विवेचन यांनाही लागूं पडेल.

## १९ मराठी साधनें

महाराष्ट्रांत इतिहास-संशोधनाची आवड उत्पन्न झाल्यापासून बरींच साधनें उपलब्ध झालीं व आणखीही बरींच होतील यांत शंका नाहीं. प्रथमतः बखरींतील एकत्रित व विस्तृत संविधानकें मिळाल्यानें महाराष्ट्राला त्या बखरींनीं मोहून टाकलें. या बखरीबद्दल इतिहासज्ञांचें इतकें ममत्व जडलें कीं, त्या बखरीपरता इतिहास नाहीं असें वाटूं लागलें. त्यावेळीं अव्वल प्रकारच्या पत्रादि साधनांकडे फारसें लक्ष गेलें नव्हतें. बखरींचें चिकित्सापूर्ण परीक्षण करणेंही त्यामुळें जड होतें. अर्थात् बखरीच्या प्रामाण्याबद्दलच विचार प्रदर्शित होऊं लागले. बखरींवर अगदीं अंधश्रद्धा बसली. पुढें तर ती बरीच दृढ झाली. परंतु नंतर नवीन नवीन बखरी मिळेनाशा झाल्या. तेव्हां प्रमुख घराण्यांच्या अगर व्यक्तींच्या पराक्रमांचीं वगैरे वर्णनें देणाऱ्या समकालीन व तदनंतरच्या तकरीरा, करीने, याद्या, टिपणें, सनदा, महजर वगैरे साधनांकडे महाराष्ट्रीय अभ्यासूंचें लक्ष वेधलें. संशोधनांतील प्रगतीमुळें बखरींतील मजकुरांतील

विसंगतपणा स्पष्ट होऊं लागला. तेव्हां इतरही कागदपत्रें तपासण्याची जरुरी भासूं लागली. अशाप्रकारें संशोधनाचें क्षेत्र अमर्यादित झालें. परंतु क्षेत्राच्या व्याप्तीच्या अज्ञानामुळें नवींनवीं साधनें मिळविणें हेंही कार्य तितकेंच दुर्घट बाटूं लागलें. हातीं लागावा तो सर्व संग्रह इंग्रजी किंवा पेशवाई अमदानीचा निघावा. त्यामुळें शिवकालीन कागद क्वचित्च सांपडतील असा १५-२० वर्षांपूर्वी कयास बांधला गेला होता. परंतु प्रयत्नांबरोबर शिवकालीन साधनांची व्याप्ति फारच विस्तृत होऊं लागली आहे.

साधनें जसजशीं उपलब्ध होत गेलीं तसतशीं त्या साधनांच्या चिकित्सेची चर्चाही होऊं लागली. ही चर्चा मात्र निरनिराळ्या वेळीं व निरनिराळ्या प्रसंगीं परस्परविरोधी तत्त्वांचा अवलंब करूनही केलेली आढळते. या चर्चेला थोडेंबहुत विधायक किंवा शास्त्रीय स्वरूप गुरु०राजवाडे यांनींच प्रथम दिलें. गुरु०राजवाडे यांनीं आपल्या ऐतिहासिक प्रस्तावनांतून सविस्तर व इतर प्रसंगीं तुरळक चर्चा केलेली आहे. परंतु ही सर्व चर्चा स्वतंत्र असली तरी ती बरीच अपुरी आहे. हल्लीं जितकीं अस्सल व समकालीन ऐतिहासिक साधनें उपलब्ध झालीं आहेत तितकीं तीं त्या चर्चेच्या वेळीं उपलब्ध झालेलीं नसल्यामुळें त्यांच्या परीक्षणाचा त्या चर्चेंत अंतर्भाव केला गेला नाहीं. अस्सल व समकालीन विपुल व विविध पत्रांच्या अभावीं प्रथम उपलब्ध झालेल्या बखरीच विशेष महत्त्वाच्या अशा सर्वत्र मानल्या जात. गुरु०राजवाडे यांची स्वतंत्र चर्चा सोडली तर साधनांच्या चिकित्सेचा कोणींच फारसा विचार केला नाहीं. निरनिराळ्या वादांत मात्र बरीच साधार व निराधार चर्चा करण्यांत नेहमीं येत असे. फारसी साधनांवरच विशेष भिस्त ठेवणाऱ्या इतिहासकारांचा तर महाराष्ट्रीय सर्वच साधनें अप्रमाण म्हणून ठरविण्याकडे भर असे. उलट मराठी साधनांच्या अभिमान्यांना साधनांच्या चिकित्सेसाठीं वेळ घालविण्याला सवड नव्हती. इतिहासग्रंथ लवकर प्रसिद्ध करावेत ही इच्छा फार प्रबळपणें त्यांच्यांत वागत होती. त्यामुळें त्यांना बखरीच्या तपशिलांतील विसंगतता समजूनही ती दूर करतां आली नाहीं. त्यांतील पौराणिक थाटाची अतिशयोक्ति काढतां आली नाहीं. उलट बखरींच्या प्रामाण्याची विचारसरणी तर त्यांचेसमोर उभी होती. त्यामुळें बखरींतील न पटणाऱ्या विधानांची टवाळकी करतांना बखरी सरसहा त्याज्य, प्रमाबट,

गाथा वगैरेसारखे एककल्ली शेरे दिले जात. परंतु एखाद्या प्रसंगांतील बखरीचा मजकूर आपल्या प्रतिपाद्य विषयाला जुळता वाटल्यास तीच बखर सर्वांत उत्तम व विश्वसनीय ठरूं लागे. मात्र थोडेच दिवसांनीं तीच बखर टाकाऊ ठरविण्यास हेच ग्रंथकार मागें पहात नसत. सारांश, बखरीची चिकित्सा आपल्या विषयाला जुळती अगर न जुळती माहिती मिळेल त्याप्रमाणें केली जाई. अशा बेजबाबदार व धरसोडी वर्चेमुळें साधारण वाचकवर्गाचा ऐतिहासिक साधनांबद्दल मात्र बराच गैरसमज होत गेला. त्या गैरसमजाचा परिणाम अव्वल प्रकारच्या साधनांवरही होत आहे ही फार शोचनीय गोष्ट आहे.

मराठी साधनांची व्यासिही कांहीं कमी नाहीं. अनुपलब्ध साधनसामुग्री सोडली तर भारत-इतिहास-मंडळांतील संग्रह, पारसनीस, राजवाडे व मावजी संग्रह, सत्कार्योत्तेजक सभेचा संग्रह, तसेंच कोल्हापूर, सातारा, फलटण, औंध, मुधोळ वगैरे संस्थानिकांचे दप्तरखाने, एलिनिएशनदप्तर, गोवा दप्तर, हे मोठे संग्रह असून त्यांत बरींच अप्रकाशित साधनें संगृहीत झालेलीं आहेत. भारत-इतिहास-मंडळांतील निरनिराळ्या संग्राहकांनीं मिळविलेले संग्रह फार मोठे असून महत्त्वाचे आहेत. या संग्रहांचें अनुक्रमणिकेसारखें साधें फेरिस्त जवळजवळ तयार होत आलें आहे. परंतु संग्रहांत बरीच झपाट्यानें भर पडत असल्यानें त्या संग्रहाचें फेरिस्त तितक्या जलदीनें पैशाच्या अभावीं होत नाहीं. या संग्रहांत विशेषतः सातारा व पुणें जिल्ह्यांतील कागदपत्रें आहेत. संस्थानी संग्रहाखेरीज इतर कोणत्याच संग्रहाचें उपयुक्त असें फेरिस्त तयार झालेलें नाहीं. एलिनिएशन दप्तरांत विपुल कागदपत्रें आहेत; परंतु या साधनांचें परीक्षण झालेलें नाहीं. यांतील कांहीं वेचक साधनें पारसनीस व वाड यांनीं प्रसिद्ध केलीं आहेत. भावे वगैरे कांहीं इतिहासप्रेमी माणसांनीं थोडेबहुत कागद जमविले होते व संग्रहांतून उपयोगास नेले होते. ते त्यांच्याच संग्रहांत आहेत. सारांश, उपरिनिर्दिष्ट मुख्य संग्रहाव्यतिरिक्त आणखीही थोडे किरकोळ व्यक्तिविषयक संग्रह आढळतात. इंडिया ऑफिसच्या माळ्यावर हिंदी संग्रह बराच पडला आहे. त्यांत अगदीं घुस्त्यांपासून ते सनदांपर्यंत कागदपत्र आहेत. परंतु त्यांची निवड केली गेली नाहीं. ते कागदपत्र तसेच धूळ खात पडले आहेत. याशिवाय ब्रिटिश म्यूझियममधील व्यक्तिगत संग्रहांत बरेच मोडी कागदपत्र आहेत.

मराठी प्रकाशित साधनांत खास शिवशाहीचीं साधनें दोन हजारांवर भरतील. राजवाडे यांचे ८, १०, १५, १६, १७, १८, २०, २१, व २२ हे खंड शिवशाहीला विशेष उपयुक्त आहेत. भारतवर्ष, प्रभात, कायस्थ-प्रभूंचीं साधनें यांतील तुरळक साधनें शिवशाहीकालीन आहेत. काव्येतिहास-संग्रहांतील पत्रें व याद्या, इतिहास-संग्रह व मंडळाचे अहवाल, संमेलन-वृत्तें व त्रैमासिकें, पारसनीसांचीं सनदा-पत्रें व याद्या यांत शिवशाहीचीं बरींच अस्सल पत्रें दिलीं आहेत. रामदास-रामदासी व विविधज्ञान-विस्तारांतही थोडीं शिवकालीन साधनें प्रसिद्ध झालीं आहेत. सरदेसाई, चिटणीस, वगैरे कांहीं घराण्यांच्या इतिहासांचीं साधनें प्रसिद्ध झालीं आहेत. शिव-चरित्रप्रदीप वगैरेसारख्या स्वतंत्र पुस्तकांतूनही साधनें प्रकाशित झालीं आहेत; परंतु हीं सर्व साधनें खासगी स्वरूपाचीं आहेत. तीं राजकीय नाहींत. आठव्या खंडांतील साधनें मात्र राजकीय असून महत्त्वाचीं आहेत. प्रकाशित झालेला संग्रह चांगल्या स्थितींत न छापला गेल्यामुळें तो संग्रह वापरणें बरेंच जड जातें. प्रत्येक ग्रंथ फेरिस्तवार लावल्याशिवाय इतिहासरचनाच होणें शक्य नाहीं. तरी हे संग्रह लावले गेले पाहिजेत. विशेषतः एलिनिएशन व इंडिया-ऑफिससंग्रह ताबडतोब लावला गेला पाहिजे. मराठी साधनसंग्रह फेरिस्त्याच्या अभावीं जसा उपयोगांत आणणें कठिण झालें आहे, त्याचप्रमाणें हा संग्रह छापतांना प्रसंगवार किंवा साल-वारीनें लावतां येणें शक्य नसल्यामुळें व विशेषतः हा अनेक ठिकाणीं तुरळक तुरळक असा आल्यामुळें, या साधनांचा उपयोग करणें जड जातें. प्रकाशित साधनांत राजवाडे वगैरे मंडळींनीं जो संग्रह छापला आहे त्यांत वाचनाच्या फारशा चुका नाहींत; परंतु कित्येक संपादकांनीं वाचनाच्या अक्षम्य चुका आपल्या ग्रंथांत राहूं दिल्या आहेत. कित्येक प्रकाशित साधनांचा कालनिर्णय झालेला नाहीं. त्यामुळें किंचित् अडचण येते. तसें-च हीं साधनें जशीं सांपडलीं तशींच छापण्यांत आलीं असून त्यांचें अद्याप-वावेतों परीक्षण व्हावयाचें आहे. प्रकाशित सर्वच साधनांची येथें नांव-निशी देण्याचें प्रयोजन दिसत नाहीं. कारण या साधनांचा इतरत्र उल्लेख आलेलाच आहे; परंतु या सर्व प्रकाशित साधनांत विविध प्रकार दृष्टीस पडतात व या साधनांच्या लेखनाची पद्धतिही कांहीं ठराविक असून

सर्वत्र अनुसरल्याचें दिसून येत आहे. म्हणून या लेखनप्रशस्तींचें व लेखनाच्या जाबत्याचें ज्ञान प्रथम करून घेऊन नंतर साधनांच्या चिकित्सेकडे वळूं.

## २० लेखनप्रशस्ति

मराठी साधनांच्या चिकित्सेला किंवा परीक्षणाला कागदपत्रादि साधनांचे प्रकार व तीं लिहिण्याचे थाट समजले म्हणजे त्या साधनांचें प्रयोजन व त्या प्रयोजनाबरोबरच त्यांचें महत्त्व सहज ध्यानांत येण्यासारखें असतें. एकाच प्रकारचा मजकूर निरनिराळ्या तऱ्हेच्या पत्रांत मायन्यांतील व शेवटच्या भागांतील थोड्याच फरकांनीं दिलेला दृष्टीस पडतो. अशा तऱ्हेच्या निरनिराळ्या पत्रांवरून काय बोध करून घ्यावा, त्यावरून कांहीं अधिक ज्ञान प्राप्त करून घेतां येईल किंवा नाहीं वगैरे गोष्टी या लेखनप्रशस्तीवरून सहज लक्षांत येतात. गुरु० राजवाडे यांनीं इतिहासकालीन कागदपत्रांवरून शिवशाहीकालीन लेखनप्रशस्तीवर जो लेख लिहिला आहे. त्यांतून महत्त्वाचा उतारा* पुढें देत आहें. तो मनन केल्यास कोणत्याही मराठी साधनांचा प्रकार व महत्त्व जाणणें सोपें जाईल यांत शंका नाहीं.

"पत्रें दोन प्रकारचीं असत, खासगी व सरकारी. हीं दोन्ही प्रकारचीं पत्रें कागदावर लिहावीं लागतात आणि लिहितांना प्रथमारंभीं रेघ काढावी लागते. मराठी मोडी लिहावयाचें म्हणजे प्रथम रेघ काढल्याशिवाय गत्यंतरच नसतें. ती रेघ विवक्षित स्थळीं कशी काढावी व विशेषतः मायन्यांत कशी काढावी, हें या प्रशस्तींत सांगितलें आहे. प्रशस्ती रचण्याचा मुख्य हेतु मायने कसे लिहावे हा आहे; तेव्हां निरनिराळ्या मायन्यांच्या रेघा कशा काढाव्या ह्याचेंच वर्णन प्रशस्तींत प्रथमतः येणें रास्त आहे. रेघा अथवा रेषा ह्यांसंबंधीं हेमाडपंती नेम खालील श्लोकांत सांगितला आहेः—

मित्राणां त्रितया रेषा द्वे भृत्यस्य रिपोरपि।
षड्गुरोः स्वामिनः पंच एकैकं पुत्रकन्ययोः॥

शंकराचार्यादि गुरूंना सहा, राजाला पांच, मित्राला तीन, सेवक व शत्रु ह्यांना दोन आणि पुत्रकन्यकादि मंडळीला एक रेषा द्यावी असा हेमाडपंती निर्बंध होता. कोणत्या दर्ज्याच्या मनुष्याला मायन्यांत किती रेघा

* भा. इ. सं. मंडळ-अहवाल—शके १८३१ चा. पृष्ठ ६१ ते ६८

काढून मान द्यावा ह्याचा तपशील येथपर्यंत झाला. आतां कागद मोडल्यावर श्रीकाराच्या खालील पहिली ओळ किती तऱ्हेनें काढतां येते तें सांगतों. कागद उजव्या बाजूनें मोडून त्याचे चार रकाने पडतात. रेघ चार रकाने ओढली म्हणजे तीस सबंध रेघ म्हणतात. तींत पहिल्या रकान्यांत एका अक्षराची जागा कोरी ठेविली म्हणजे तिला दफे म्हणतात; दोन अक्षरांची ठेविली म्हणजे दफाते म्हणतात; तीन अक्षरांची ठेविली म्हणजे कतें म्हणतात; व चार अक्षरांची ठेविली म्हणजे महजर म्हणतात. पहिल्या दोन रकान्यापुरतीच तेवढी रेघ ओढली म्हणजे तीस पहिली जिल्हे म्हणतात. नुसत्या तिसऱ्या व चवथ्या रकान्यापुरतीच रेघ ओढली व पहिले दोन रकाने मोकळे ठेविले म्हणजे त्या रेघेस दुसरी जिल्हे म्हणतात. मधील दुसरा व तिसरा, असे दोन्ही रकाने भरून शिवाय पहिल्या व चवथ्या रकान्यांतील दोन दोन अक्षरांची जागा घेऊन रेघ ओढली म्हणजे त्या त्या रेघेला बीत म्हणून संज्ञा आहे.* ह्याच बीत रेघेस अकार प्रारंभीं लावला म्हणजे त्या रेघेला अज् म्हणण्याचा संप्रदाय आहे; एकार लाविला म्हणजे एकुण्हत् म्हणतात. बाक देऊन बीत रेघेचा प्रारंभ केल्यास वास्लात् म्हणण्याच परिपाठ आहे. मायन्याची पहिली रेघ ओढण्याचे कारणपरत्वें इतके प्रकार आहेत. ह्या सर्व प्रकारांहून आणिक तीन प्रकारची रेघ आहे. रेघेच्या प्रारंभीं दकार काढला म्हणजे दकारी रेघ सिद्ध होते. कित्येकवेळां रेघेच्या प्रारंभीं एक शून्य देतात; व कित्येकदां दोन उभ्या रेघा देतात. ह्याविषयीं हेमाडपंती श्लोक येणेंप्रमाणेः—

खं ब्रह्म निर्गुणं प्रोक्तं रेषे हरिहरद्वयोः ।
दकारेण स्नेहमाप्नोति; तावल्लक्ष्मीः स्थिरा भवेत् ॥

म्हणजे शून्य दिलें असतां ब्रह्माचा निर्देश होतो; दोन उभ्या रेघा दिल्या असतां हरिहरांचा उल्लेख होतो; व दकार काढला असतां मित्रत्वाचा आविष्कार होतो. ह्या सर्व रेघा कशा काढावयाच्या तें पुढील आकृतीवरून कळेल.

* ह्या संबंधींचा राजव्यवहार कोशांतील श्लोक असाः— रकाना तुर्यभागः स्यात्तृतीयांशो मुशद्दरः । अर्धभागो भवेज्जिल्हे बितं मध्यांश उच्यते ॥ ८. ले. प. ॥ २१ ॥ शिवचरित्र-प्रदीप, पृष्ठ १७०.

| | पहिला रकाना | | दुसरा रकाना | | तिसरा रकाना | चवथा रकाना |
|---|---|---|---|---|---|---|
| | दफे | दफाते | कर्ते | महजर | | |
| सबंद रेघ | ——— | | ——— | | ——— | ——— |
| दफे रेघ | ……—— | | ——— | | ——— | ——— |
| दफाते रेघ | ……—— | | ——— | | ——— | ——— |
| कर्ते रेघ | …… | ……—— | ——— | | ——— | ——— |
| महजर रेघ | …… | …… | ——— | | ——— | ——— |
| पहिली जिल्हे | ——— | | ——— | | | |
| दुसरी जिल्हे | …… | …… | ——— | | ——— | ——— |
| बीत रेघ | ……—— | | ——— | | ——— | ——— |
| अज रेघ | ३)—— | | ——— | | ——— | ——— |
| एकुण्हत् रेघ | )—— | | ——— | | ——— | ——— |
| वासलात् रेघ | )—— | | ——— | | ——— | ——— |
| दकारी रेघ | छ—— | | ——— | | ——— | ——— |
| खं रेषा | ०—— | | ——— | | ——— | ——— |
| दुरेषी रेषा | ॥—— | | ——— | | ——— | ——— |
| दुरेषी दकारी | ॥छ—— | | ——— | | ——— | ——— |

ह्या पंधरा रेघांखालीं सर्व प्रकारच्या लहानमोठ्या रेघा पडतात. ह्या सर्व रेघा हेमाडपंताच्या वेळेपासून आहेत. कित्येकांचीं शुद्ध संस्कृत नांवें जशींचीं तशींच राहिलीं आहेत; व कित्येकांचीं फारसीच नांवें तेवढीं प्रचलित आहेत."

याच प्रकरणीं गुरु० राजवाडे यांनीं जें 'मेस्तक पुस्तक' प्रसिद्ध केलें आहे त्यांतील उताराही* महत्त्वाचा असल्यानें पुढें देत आहें. हें मेस्तक हेमाडपंतीचाच अनुवाद आहे असें नक्कलकार सांगतो.—"कागद करोनि वर्ख। निक सव्यें मोडावे कौतुकें। च्यारी रकाने नेटके। समान करावे ॥३०॥ चहूं माजि विभागता। नांवें सांगेन ऐक आतां। पहिला रकाना म्हणतां। येक चि जाणिजे ॥३१॥ रकाने दोनि लिहिजेति। जिलेहे ऐसें तयाशि म्हणति। तीन रकाने जैं सांपडति। तैं मशूदर ॥३२॥ मधील दोनि लिहिजेती। तैं बिंति ऐसें तया म्हणती। त्यांत अर्धार्ध सांडिती। तैं तैनेतं ॥३३॥ त्यांत हि सांडिती दोहींकडे। मध्यें दोनि अक्षरें लिहिणे घडे। तैं किर्दार म्हणतां आवडे। शेणवयासि ॥३४॥ येणे चि माने जिल्हेचा। विभाग नेमिला साचा। बिंताबिंतैनाचा। तपसील निका ॥३५॥ रकाना मोईन अक्षरें च्यारी। सांडूनि येका अक्षराची बारी। रेखा वोढिजे मशूदरी। तैं हर्फ जाणिजे ॥३६॥ टाकितां अर्धा रकाना। दफाते दफात म्हणती विचक्षणा। जाणोनि ऐशिया मना लेखन कीजे ॥३७॥ पुढील सांडता रकाना। मागील तीनि रकाने विचक्षणा। हमंदर लिहिती लेखना। आर्दासा व किताबती ॥३८॥ च्यारी रकाने कायती। शरायनी जीस लिहिती। जीणे न्यून पूर्ण पुरे पडती। कागद देखा ॥३९॥"

"रेघा कशा काढाव्या ह्याचा खुलासा करण्यापूर्वी रेघा ज्या यंत्रानें काढावयाच्या त्या लेखणीचें स्वरूप व ज्या द्रव्यानें काढावयाच्या त्या शाईची कृति प्रथम देणें उचित होतें. नाचण्याचें शिरें करून व तें काजळानें घोटून काळी शाई करण्याचा परिपाठ महाराष्ट्रांत फार पुरातनचा आहे. लाखी, लोखंडी वगैरे इतर हि आणीक शायांचे प्रकार आहेत. परंतु कारकुनाच्या मोडी लिहिण्याला सर्वत्र काजळानें घोटून तयार केलेल्या काळ्या शाईचाच उपयोग महाराष्ट्रांत हमेशा होई. लेखण्या प्रायः बोरूच्या करीत.

* भा. इ. सं. मंडळ—अहवाल—शके १८३४-भाग १ला, पृष्ठ ३४.

मोडी अक्षर लिहिण्याला बोरूखेरीज दुसऱ्या कोणत्याही लांकडाचा उपयोग करीत नसत. बोरूची लेखणी एक-मजली किंवा दोनमजली करीत. लेखणीच्या उतारांत खांचा, खोचा व मेहरपी हि करणारे कित्येक कुशल कारकून असत. उतारावर आंतील मेंडाचें टेंगूळ ठेवण्याचा हि कोठें कोठें प्रचार आहे. बोरू दोन प्रकारचे असतः साधे व कळक्ये. कळक्या बोरूंना बिस्तवावर भाजून काळे चट्टे पाडण्याचा हि संप्रदाय कोठें कोठें असे. श्रीमंतांच्या मुलांना लिहिण्याकरितां ज्या लेखण्या करीत त्यांच्यावर सोन्याचा वर्ख चढवीत. गरीबांच्या मुलांची ही हौस रुपेरी किंवा सोनेरी बेगडीवरच भागविली जाई. उत्तम लेखणी म्हटली म्हणजे तिचा उतार सरळ असावा, डावीकडे किंवा उजवीकडे झुलूं नये. नाहीं तर

वामनेत्रा स्त्रियं हंति। उन्नेत्रा मतिभ्रंशका ॥
दक्षिणेन तु नेत्रेण। राजा भवति निश्चयात् ॥ १ ॥

[अ] पत्रें दोन प्रकारचीं असत–खासगी व सरकारी. पैकीं सरकारी पत्रें कोणत्या रेघांनीं लिहावीं तें प्रथम सांगितलें पाहिजे. वर ज्या पंधरा प्रकारच्या रेघा सांगितल्या आहेत त्यांतील सबंद रेघ म्हणजे चार-रकानी रेघ काढून छत्रपतींचीं आज्ञापत्रें लिहिलीं जात. आज्ञापत्रें लिहिण्याचें व त्यांवर छत्रपतींचा शिक्का करण्याचें काम चिटणिसाचें असे. 'सुज्ञ असा' अशीं अक्षरें छत्रपतींच्या स्वदस्तुरचीं आज्ञापत्राच्या शेवटीं असल्यास शिक्का करीत नसत. खालील लहान अंमलदारांस हि छत्रपतींचीं आज्ञापत्रें शिक्कयाशिवाय चार-रकानी जातः—

१. जातपाटील यांस लिहिणें तें ताा ( तहां ) म्हणोन.
२. खिजमतगारांस माा ( मशहुरल ) म्हणोन.
कुळकर्णी, जकाते वगैरे तिरगुळ, गोळक यांस राा म्हणोन.

[आ] दकारी तीन-रकानी पत्रें छत्रपतींचीं जमीदार पोा देशमुख देशपांडे यांस मशारूल अनाम म्हणोन.

[इ] बीतरेघी पत्रें ब्राह्मण, गोसावी, बैरागी, भिक्षुक, पंडित वगैरेंस.

[ई] पदाधिकारी संस्थानिकांस मथळ्याघरील श्रीच्याखालीं बीतरेघ काढून 'सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य' येथपर्यंत दकारपूर्वक लेहून, नंतर राजश्रीच्या पुढें जसें ज्याचें वैभव तशी कमीजास्त

आगा सोडून, नांव, आडनांव, मरातब लेहून 'गोसावी यांसि' काढून पहिल्या किंवा दुसऱ्या जिल्हेंत दुसरी ओळ पुरी करावी. तिसऱ्या तीन-रकानी ओळींत स्नेाा आपलें नांव रामरामपूर्वक घालावें.

[उ] (१) शिलेदार, (२) बारगीर नामधारक, (३) हषमलोक मानकरी, (४) सर्व शूद्रपरस्परें, (५) किल्लेकरी, हवालदार, कारकून अखंडित पासून मायना काढून बीतरेघ व एक जिल्हा एवढ्यांत मायना आटपीत असत. (६) श्रीनजीक दोन-रकानी रेघेंत 'राजश्री आडनांव गोसावी यांसि' येवढा मजकूर घालून, नंतर चौरकानींत स्नेहांकित म्हणोन मजकूर जमीदार, ठाणेदार वगैरे कनिष्ठ नोकरांना लिहीत. (७) सामान्य शूद्रांस डावेकडील कागदाचा रकाना एक टाकून तीन रकाने योग्यतेनुरूप लिहीत. (८) महजर, चकनामे, खरीदपत्रें वगैरे सर्व सरकारी कागद चार रकानी रेघेंत सुरू होत."

सरकारी कागद ७८ प्रकारचे* असत. त्यांची अकारविल्हे नांवनीशी पुढीलप्रमाणेः—

१. अभयपत्र—दहशतीनें परांगदा झालेल्यास परत आणण्याबद्दल लिहावयाचें तें.
२. अमानत किंवा जप्तीपत्र—एक वादी भोगवटा करतो, दुसरा फिर्याद आला, सबब लिहिलें तें.
३. अर्जाइनामपत्र—नजर देऊन इनाम घेणें तें.
४. आमंत्रणपत्रिका—दरबारांत बोलाविलें ती.
५. आज्ञापत्र—छत्रपतीचें खुद्द पत्र तें.
६. इनामपत्र—धन्यांनीं कृपा करून जमीन अगर गांव देणें त्याबद्दलचें.
७. कबजपत्र—कबजा दिल्हा तें.
८. कबुलायत—ठराव करून लिहून घेणें ती.
९. कर्जरोखा—रिणकोनाम लिहून घेणें तो.
१०. करीना—वादी यांची हकीकत लिहून घेणें तो.

* सरकारी कागदपत्रांचे प्रकार गुरु०राजवाडे यांनीं दिल्याप्रमाणें दिले आहेत. परंतु ते सोईसाठीं अकारविल्हे लाविले असून त्यांतील स्पष्टीकरणांत कांहीं ठिकाणीं जुन्या ग्रंथांवरून फरक करून अर्थ विशेष स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

११. कुंकुमपत्र–लग्न-मुंजीचें पत्र तें.
१२. कुंठितपत्र–कलमाकलमास लबाडी दिसून आली सबब यापरतें बोलणें नाहीं म्हणोन लिहून घेणें तें.
१३. कौलनामा–रयतेस इस्तावा देऊन लावणी अगर वसाहत करण्यासाठीं जें पत्र लिहून देणें तें.
१४. खरेदीपत्र–खरेदी जमीन वगैरे घेतलें तें.
१५. खोका–हुंडीवर भरपाई लेहून घेतली, ठिकाणीं हुंडीचा ऐवज पावला न पावला, चौकशी केली तरी दाखविणें तो.
१६. खोटपत्र–कलमाकलमाची पुरवणी पांढरमुखें झाली नाहीं. खोटा पडला. नंतर लिहून घेणें तें.
१७. गुन्हेगारी किंवा दंडपत्र–न्यायी खोटा झाला त्यापासोन द्रव्य घेणें त्याचें पत्र तें.
१८. जातकतबा किंवा मोकदमजामीनकतबा–जातीस जामीन मोकदमास घेणें तो.
१९. जातपत्र–आपण लिहून देणें तें.
२०. जन्मटिपण–जन्मतां केलें तें.
२१. जप्तीचिट्टी–जप्ती करविली ती.
२२. जप्तीपत्र–वर नं. २ पहा.
२३. जाब–हुंडी गमावली पुन्हां लिहून घेणें तो.
२४. जामीनसाखळी–रयतेस एकमेकांस जामीन घेणें ती.
२५. जामीनी–ऐवज कुळाकडून येणें थकला, त्यास तगादा केला, सबब बोलाबयास आला, तेव्हां त्याजपासोन खात्री घेणें ती.
२६. तकरीर–वाद्याचा लेख वाद्यास दाखवून त्याजवरी लेहून घेणें ती.
२७. तगीरपत्र–कामावरून काढणें तें.
२८. तचकरेपत्र–महालीं कमाविसदारावरी पैका घेतल्याचा मुद्दा शाबीत करून तुफानदार आला, ज्याजपासोन निशा सरकारनें घेऊन कमाविसदार बोलावून आणून रुजुवात करविली; सबब पत्र लेहून घेणें तें.
२९. तह–सरकारनें कोणताही जुजबी करार किंवा नियम केला तो.

३०. तहनामा–दोन राज्यांत नेमबंदी झाली तो.
३१. ताकीदपत्र–बखेडा जाला त्याविषयीं लिहिणें तें.
३२. थळपत्र–थळ नेमून दिल्हें, तेथें पंचाईत जाली, तें.
३३. दस्तक–हंशील माफ करणें जकातीचें तें.
३४. दंडपत्र–वर नं. १७ पाहा.
३५. दुमालपत्र–नवा अंमलदार आला, माजी अंमलदारापासोन इनामी वगैरे जाबसाल लेहून आणणें तें.
३६. निवाडपत्र–सरकारांत न्याय मिळाला तें.
३७. निशाचिट्टी–जमीदारापासून अगर कमाविसदारापासून ऐवजाची खातर घेणें ती.
३८. निशापत्र–जमीदार सामील करून कारकुन कमाविसदारांनीं द्रव्य खादलें त्याजपासोन घणी घेणें, निशा घेणें तें.
३९. निशेदारी–वर नं. २५ मधील जामीनीला उगवणी ती. खताखालीं 'यासि उगवणीस धणी अमुक' पुढें गुंतवणें तसें लिहिणें.
४०. नेमोत्तरपत्र–वादीस थलींहून निरोप देतेसमयीं पुन्हां यावयाची मुदत करून घ्यावी तें.
४१. पावती–ऐवज पावला म्हणून लिहून घेणें ती.
४२. पुरशिस–करीना व तकरीर यांतील कलमें एकमेकांचीं बोलणीं विचारून लिहून घेणें ती.
४३. फारखती–खत गमावलें त्याची.
४४. बहालपत्र किंवा बक्षिसपत्र–बक्षिस दिल्हें तें.
४५. बक्षिसपत्र–वर नं. ४४ पाहा.
४६. भाळपत्र–दिवा काढण्यास राजी झाला त्याचे मस्तकीं उच्चारपत्र शीरीं बांधतात तें.
४७. मनाचिट्टी–तगादा मना करणें ती किंवा बरातदार उठवून आणणें ती.
४८. मसालापत्र किंवा हुकमी रोखा–हुकूम मोडला अगर सालाबाद शिरस्त्याप्रमाणें न वर्तला तरी मसालापत्र लिहिणें तो.
४९. महजर–महालांत किंवा कसब्यांत पंचाईत किंवा मनसुबी जाली तो.

५०. माफीपत्र–अस्मानी म्हणजे पर्जन्य न पडला अथवा फार लागला व सुलतानी म्हणजे दग्यानीं लुटलें, त्याबद्दल सूट देणें तें.
५१. मुचलका-वादी यांचा परस्परें तंटा लेहून घेणें तो.
५२. मुदतबंदी–मुदत करणें ती.
५३. मृत्युपत्र–मरणसमयीं लिहिलें तें.
५४. मोकदम-जामीनकतबा [वर नं. १८ पहा.]
५५. मोजदादपत्र–अंमलाबरी गेल्याबरी सरकारी जिनसा माजी मामलत-दारापासोन घेणें तें.
५६. यजितपत्र–सर्वमतें खोटा झाला त्यापासोन लेहून घेणें तें.
५७. यादी–संस्थानिकांनीं हुजुर अर्ज करणें ती.
५८. राजीनामा–वादी यानीं खुषीनें लेहून दिल्हा तो.
५९. रोखा–करारमाफक तगादा व वरात करणें तो.
६०. लग्नचिट्टी–लग्नाचे वेळीं लिहिली ती.
६१. वदणुक–पांढर, बलोते व भोंवरगांव मेळवून यांचे माथां इमान टाकून साक्ष पुसणें ती.
६२. वंशावळ–पिढ्यांतील नांवें लेहून घेणें ती.
६३. वाटेपत्र किंवा विभागपत्र–आपापसांत समजुतीनें वाटे झाले तें.
६४. वृत्तिपत्र-वृत्ति नेमून दिल्ही तें.
६५. सडीपत्र–महालींहून वाद्याचें वर्तमान लेहून आणणें तें.
६६. सनद–गांवावर किंवा महालावर मामलतदार किंवा कमाविसदार यांस लेहून देणें ती.
६७. समजपत्र वाद न करितां समजुतीस आले तें.
६८. समापत्र–भाऊबंद वगैरे वतनभाऊ मेळवून घेणें एकदिल सारें होणें त्याचा ठराव करणें, तो केला तें.
६९. समलातीपत्र–मदतीस बोलावणें तें.
७०. सरंजामपत्र–सरंजाम दिल्हा तें.
७१. सरकतनामा–सरकतीनें शेत वगैरे उदीम करणें तो.
७२. सामिलनामा–जातीनें आंगवण नाहीं सबब भाऊ उभा करणें त्यास लेहून देणें घेणें तो.

७३. सारांश–वाद्याबाद्यांचा कयास निवडून संभावितांचें मत देणें तो.
७४. साहित्यपत्र–नव्या अंमलदाराच्या मदतीकरितां दिलें तें.
७५. साक्षपत्र–साक्ष अगर गोही लिहून दिली तें.
७६. सोडचिट्टी–अंमल सोडणें त्याबद्दल लेहून देणें किंवा जप्ती करून सोडणें ती.
७७. हजिरीपत्रक–हजिरी घेणें तें.
७८. हसेबंदी–दरमुदत ऐवज घेणें त्याविषयीं लेहून घेणें ती.
७९. हरकीपत्र–न्यायांत खरा झाला त्यापासोन पैका घेणें त्याचें पत्र तें.
८०. हरदुमुसना जुमला ( मुजरा ? )–चिट्टी गमावली ती नवीन करून घेणें त्यास.
८१. हुकुमीपत्र–कामगिरीवर रवाना करणें तें.
८२. हुकमो रोखा–वर नं. ४८ पहा.
८३. हुजत-पोत्यास ऐवज जमा केला त्याची पावती देणें ती.
८४. हुंडी–ऐवज देऊन देशावरावरी घेणें ती.

" हे सर्व कागद चार-रकानी किंवा पहिल्या दप्त्याचें एक अक्षर सोडून लिहीत. वरील नांवांत कित्येक नांवें संस्कृत आहेत व कित्येक फारसी आहेत. संस्कृत नांवें हेमाडपंतापासूनचीं आहेत. फारसी नांवें संस्कृताचीं च भाषांतरें आहेत. चकनामा, वतन, वगैरे फारसी नांवांनीं हि कित्येक संस्कृत-नांवांचीं पत्रें लिहिलीं जात.

उपरिनिर्दिष्ट ७८ प्रकरणीं सरकारी कागदपत्रें मुसलमानी अमलांत जशीं लिहिलीं जात तशींच तीं शिवाजीच्या रियासतींत हि लिहिलीं जात. ह्या-शिवाय शिवाजीनें जो लेखनप्रशस्तीचा कायदा केला त्यांत एकंदर सात मुख्य बाबी होत्या. त्या येणेंप्रमाणें:—

१. राजश्रीनीं सर्वांस लिहिण्याचा जाबता राजकीय संप्रदाय धारे.
२. अष्टप्रधानादि पदाधिकारी यांचा परस्परें व स्वामीस लिहिण्याचा संप्रदाय.
३. लहानथोर मराठे-मंडळ यांनीं लिहिण्याचा संप्रदाय.
४. यवनीपत्रें लिहावयाची चाल.
५. जमीदारी लिहावयाचे संप्रदाय.

६. व्यावहारिक सर्व संप्रदाय अहद ब्राह्मण तहद एकंदर चाल.

७. जमाखर्च, हिशेबाची धारे, हेमाडपंती आहेत. शिवाय नवीन ठरविलें."

वतनपत्र, खंडणीपत्र, वाके, बातमीपत्रें, बखरी, शकावल्या, कुळकटी व रोजकीर्दी, खतावण्या, ताळेबंद वगैरेसारखीं जमाखर्चाचीं टिपणें, फेरिस्त, जाबते, स्मरणार्थ केलेलीं टिपणें वगैरेही अनेक प्रकारचीं साधनें आहेत. या सर्व साधनांत त्या त्या साधनाच्या प्रकाराचें नांव गोंबलेलें असतेंच. परंतु कित्येकवेळां नसतेंही. साधनाचा प्रकार समजला म्हणजे त्या साधन-लेखनाचा उद्देश समजतो व या उद्देशावरून लेखकाच्या जबाबदारीची व माहितीची मर्यादा अजमावतां येते. लेखनांतील ठराविक मायन्यावरूनही कोणत्या दर्जाच्या माणसानें कोणत्या दर्जाच्या माणसाला पत्र लिहिलें हें समजतें व त्यावरून बरेचवेळां लेखक व ज्याला लिहिलें त्या माणसाचें नांव व दर्जा समजतो. ऐतिहासिक साधनांच्या अन्तरंगपरीक्षणांत हींच माहिती विशेष महत्त्वाची असते. खासगी पत्रव्यवहाराचे वगैरे मायने इंग्रजीपर्यंत रूढ होते तसेच होते. म्हणून सर्व मायने देऊन येथें विस्तार करीत नाहीं. मायन्यांचा अभ्यास अस्सल प्रकाशित साधनांवरून करणें फारसें कठीण जाणार नाहीं.

खासगी पत्रव्यवहार कोणीं व कोणाशीं केला हें ज्याच्याकडे संग्रह सांपडला त्याच्याकडील माहितीवरून व साधनांत त्याबद्दल असलेल्या पुराव्यांवरून ओळखतां येतें. परंतु सरकारी पत्रांचें तसें नाहीं. तीं पत्रें निरनिराळ्या अंमलदारांकडून सरकारचेच नांवानें लिहिलीं जात. त्यामुळें हीं पत्रें कोण व कशीं तयार करीत हीही माहिती असणें जरूर आहे. तसेंच या पत्रांच्या नकला कशा व कां केल्या जात त्यावरील संमति कोण व कां करीत असत, याचाही रिवाज अभ्यासिल्याशिवाय या पत्रांच्या प्रामाण्याप्रामाण्यतेबद्दलचा विचार करणें शक्य होणार नाहीं. तेव्हां शिवकालीन लेखनप्रशस्तीप्रमाणेंच तत्कालीन कानु-जाबतेही महत्त्वाचे आहेत. यांत दिलेल्या कामाच्या वांटणीवरून त्या त्या सरकारी कागदपत्रांतील महत्त्व सहज लक्षांत येतें. तसेंच लिहिणाऱ्याचा ठावठिकाणा समजला म्हणजे गर्भितार्थ शोधणेंही फारसें कठीण जात नाहीं. म्हणून प्रथम त्यावेळचा कानु-जाबता देऊन नंतर मराठी साधनांच्या चिकित्सेचा विचार करूं.

## २१ सरकारी जाबता

शिवाजीमहाराजांनीं आपल्या राज्याभिषेकसमयीं जे कायदेकानु मुक्रर केले त्यांतच पुढें उद्धृत केलेला जाबता दिला आहे. हा जाबता राज्याभिषेकाच्या दिवशीं लिहिल्याचें लिहिलें आहे; परंतु या जाबत्यांतील कामाच्या वांटणीस राज्याभिषेकापासून सुरुवात झाली असें समजण्याचें कारण नाहीं. ह्या जाबत्यांतील कारभाराची वांटणी त्यापूर्वीपासूनच अमलांत होती. शिवाजीमहाराजांनीं घालून दिलेला* जाबताः—

" मुख्य प्रधान यांणीं सर्व राजकार्य करावें. राजपत्रांवरी शिक्का करावा. सेना घेऊन युद्धप्रसंग स्वारी करावी. तालुका ताब्यिनांत स्वाधीन होईल त्याचा रक्षून बंदोबस्त करून, आज्ञेनें वर्तावें व सर्व सरदार सेना त्याजबरोबर जावें. त्यांनीं सर्वांसमंत चालावें, येणेंप्रमाणें.

अमात्य यांणीं सर्व राज्यांतील जमाखर्च चौकशी करून दप्तरदार फडणीस त्यांचे स्वाधीन असावें. लिहिणें चौकशीनें आकारावें. फडनिशी, चिटनिशी, पत्रांवर निशाण करावें. युद्धप्रसंग करावे. तालुका जतन करून आज्ञेंत चालावें.

सचिव यांणीं राजपत्रें शोध करून अधिकउणें अक्षर मजकूर शुद्ध करावी. युद्धप्रसंग करून तालुका स्वाधीन होईल तो रक्षून आज्ञेत वर्तावें. राजपत्रांवर चिन्ह संमत करावें.

मंत्री यांणीं सर्व मंत्र विचार राजकारण यांतील सावधतेनें विचार करावे. आमंत्रण, निमंत्रण, वाकनिशी त्यांचे स्वाधीन. तालुका जतन करून युद्धादि प्रसंग करावे. राजपत्रांवर संमत चिन्ह करावें.

सेनापती यांणीं सर्व सैन्य रक्षण करून युद्धप्रसंग स्वारी करावी. तालुका स्वाधीन होईल तो रक्षून हिशेब रुजू करून आज्ञेनें वर्तावें व फौजेचे लोकांचे बोलणें बोलावयें. सर्व फौजेचे सरदार यांणीं त्यांजबरोबर चालावे.

पंडितराव यांणीं सर्व धर्माधिकार, धर्म, अधर्म पाहून विचिक्षा करावी.

* सनदापत्रें – सं.पारसनीस व मावजी पृष्ठें १२९-१३२; व इतिहास आणि ऐतिहासिक–ऐतिहासिक विविध विषय—२२-२४.

ाष्टांचे सत्कार करावे. आचार, व्यवहार, प्रायश्चित्त पत्रें होतील त्यांजवर संमत चिन्ह करावें. दानप्रसंग, शांति, अनुष्ठान तत्काळीं करवावें.

न्यायाधीश यांणीं सर्व राज्यांतील न्याय, अन्याय मनास आणोन बहुत मेंकरून न्याय करावे. न्यायाचीं निवाडपत्रें याजवर संमत चिन्ह करावें.

सुमंत यांणीं परराज्यांतील विचार करावा. त्यांचे वकील येतील त्यांचे त्कार करावे. युद्धादि प्रसंग करावे. राजपत्रांवर संमत चिन्ह करावें.

चिटणीस यांणीं सर्व राज्यांतील राजपत्रें त्याहावीं. राजकारणपत्रें उत्तरें ाहावीं. सनदी दानपत्रें वगैरे महाली हुकमी याचा जाबता, फडनिशी, टनिशी अलाहिदा त्याप्रमाणें त्याहावें. हातरोखा, नाजूकपत्रें याजवर र्तिब अथवा खासदस्तक मात्र बरकडाचा दाखला चिन्ह नाहीं. चिटनि-ानींच करावें.

फौजेचे सबनीस, बक्षी यांणीं सर्व फौजेची हजेरी चौकशी करावी. यादी रून समजावावें. रोजमुरा वाटणें. सत्कार करावा. युद्धादिप्रसंग करावा.

सेनाधुरंधर यांणीं बिनी करावी. आघाडीस जावें उतरावें. फडफर्मास ा करावी. लुट करणें, मना करणें, चौकशी, ताकीद याजकडे. पुढें ोन सेना रक्षण करावी.

किल्ले, कोट, ठाणीं, जंजिरे येथील कायदे करून दिल्हे त्याप्रमाणें ालदार, सुभेदार, कारखानीस, सरनोबत, तट-सरनोबत लोक यांचे जाबते न दिले. त्याप्रमाणें चालोन सावधतेनें स्थळें रक्षावीं. तगीरी, बहाली रून व्हावी. हाजमी नेमणूक तालुकदार याकडे परवाना, किल्ल्या. ालदार याचा हुकूम, शिक्के त्यांचे नांवचे कारखानिशी सबनिशी जाबता ाहिदा असे.

अष्ट-प्रधानाचे अधिकारी यांणीं खासगीचे अधिकारी यांचे इतल्यांत रून दसरीं हिशेब गुजरावे.

सुभे, मामले, तालुकदार यांस ज्याजकडे जें नेमलें, तें त्यांणीं जाबते-णें चालावें. हुजूरचे दरखदार, चिटनीस, फडनीस, मुजुमदार यांचे त्यानें चालून हिशेब गुजरावे.

बारा महालाचे अधिकारी यांणीं आपलालें काम दुरुस्त राखून हिशेब कारून दफ्तरांत गुजरावे.

दरुणी महालचे कामकाज दिवाण नेमून दिल्हे त्यांणीं सर्व पाहून करावें. चिटनीस, फडनीस यांणीं आपलाले दरखाचे कागदपत्र त्याहावे, त्याजवर निशाणचिन्ह दिवाणांनीं करून व त्यास समजावून हुजुर मोर्तब समक्ष करावे.

पोतनीस यांणीं पोते जमाखर्च लिहिणें करावें. नजर पेशकशी जमा करावी. पोतदार यांणीं पारख करावी.

अष्ट-प्रधान यांजकडे देहे व तालुके व स्वारीस जावयास दरखदार सर्व हुजुरचे जावे. त्याचे दाखल्यानीं व्यवहार करावा. स्वारीस जाणें त्यास, मुतालीक करून दिल्हे त्यांणीं सेवा, व्यापार चालवावा. हुजुर रहावें.

आबदारखाना चिटनीस यांजकडे सराफखानासुद्धां अधिकार सांगितला. मज्यालसी विडे, अत्तर-गुलाब व हारतुरे ( फळ ) फळावळ, खुशबोई खरेदी जमाखर्च यांणीं करून हिशेब दफ्तरीं गुजरावा.

पागा, जुमलेदार, सरदार यांणीं कैद करून दिल्ही त्याप्रमाणें चालून, सेनापती व प्रधान यांचे समागमें कामेंकाजें करावीं.

येकूण कलमें वीस.

(आ) जाबता लष्कर, सरनोबत, सेनापती व सरलष्कर, सरदार जुमलेदार, पागा यांजबरोबर दरखदार हुजुरचे मुजुमदार, कारभारी, दिवाण व जमेनीस, सबनीस, फडनीस, चिटणीस यांणीं सर्वांनीं वर्तणें.

सरदार यांणीं सर्वाध्यक्षपणें सर्वांचे अनुमतें स्वारी, कामकाज हुजुरचे आज्ञेप्रमाणें करावें.

कारभारी, दिवाण यांणीं सरदार व मुजुमदार एकमतें कारभार करावा. पोते, जामदारखाना, कोठी, बाजार येथें देखरेख कारभारी यांची असावी. चिठ्ठीवांचून कारखानीयाचा खर्च करूं नये. रोखा मजमूकडील व्हावा. मजमदाराचें निशाण जाल्यावर कारभारी यांणीं रुजू करावें. सरदारांनीं नंतर शिक्कामोर्तब करावें.

मुजुमदार याणीं एक विचारें कामकाज, कारभार करावा. मुजुमदाराबांचून सरदारांनीं कारभार करूं नये. मुजुमदाराचें निशाण, सरदारांचा शिक्का उभयतांनीं मिळोन कारभार मुलुक, परमुलुक, कारखाने, पोते, जामदारखाना, कोठी, पागा व बाजार वगैरे येथील जमाखर्च हिशेब होणें तें उभयतांनीं पहावें. खरेदी करणें उभयतांचे विचारें करावी. लष्करची जमा,

सुदती, तैनात हजिरी गणती करणें व समजाविशी करणें उभयतांनीं करावी. मोकाशी याची व पैदास्ती, परमुलखी खंडणी जमा होईल ती, उभयतांनीं मिळोन करावी. अखेर सालीं एकंदर हिशेब एकबेरजा करून हुजुर आणावी. कारखाने व बाजार येथें खर्च करणें तो परवानगीनें करूं नये चिठ्ठयारोखानीं निशाण, शिक्का मोर्तबनिशीं करावा.

सबनिसांनीं लष्करची जमा, सुदती, तैनात, हजीर, गणती करणें, ते सरदार, मुजुमदार, कारभारी यांस बसवून त्यांचे विचारें करावी. तैनात जाबता सबनिसांनीं करून, मुजुमदाराचें निशाण घ्यावें. मग शिक्कामोर्तब करावें. पोते, जामदारखाना, कोठी, बाजार, वगैरे खर्च देणें येईल, ते शिपाई-लोकांस चिठ्ठीरोखा मुजुमुकडील सरदारांचे शिक्क्यानिशीं होईल त्याप्रमाणें खर्च करावा. लोकांचे हिशेब अखेरसालीं करावे. ते मुजुमदारास रुजू करून मग लोकांची समजाविशी उभयतांनीं करावी. देणें फाजील उतरून मुजुमदाराकडे द्यावें.

जिमेनिस यांणीं पोते, जामदारखाना, कोठी, बाजार वगैरे पैदास्ती कमाविस जमा याजवर दखलगिरी करावी. पैदास्ती, जाबते जमिनिसानीं करावे. तेथें मुजुमदाराचें निशाण, सरदारांचा शिक्का कारखान्यावर राखणें ते मुजुमदाराकडील लिहिणारे लिहितील. निशाण मग शिक्का होईल. मग रोखियावर बाहेर चिन्ह करावें. पोते, जामदारखाना येथील लाखोटे, शिल्लकबारी करणें तो कारभारीसमक्ष जिमेनिसांनीं करावे.

फडनीस, चिटनीस ह्यांणीं आपापले दरखाचे जाबतेप्रमाणें लिहिणें करून, मजमदाराचें निशाण होऊन यांचे इतल्यानें करावें. फडनिसानें अबघा दिवस मुजुमदारापाशीं कारभार करावा. रोजकीर्द घडून रात्रीं मजूम दसरीं घ्यावी. बोटखत घालणें तें लिहिणार व फडनिसांनीं मिळोन घालावें. अखेरसालीं हिशेब दसरदार व फडनिसानीं मिळोन करावे. फडनिसानीं एकबेरजी हिशेब आकारून हुजुर घेऊन यावें. चिटनिसानीं जे कागद येतील त्याचे लखोटे फोडून सरदार मजमदार यांस वाचून दाखवावे. पैवस्ती घालावी. जाब लेहून रवासुदती मजमदारांनीं घालावी.

पोतनीस व जामदारखाना, कोठी याचे निसीदे यांणीं जमा येईल त्याचे जमा व खर्च करून मजमदाराचें निशाण घ्यावें. खर्च करणें तो रोखिया-

प्रमाणें करावा. पोतीयाचा रोजनामा बरकड कारखानीयाचा बदेरा करून मुजुमदाराचें निशाण, मग सरदारांचा शिक्का घ्यावा. महिने झडतीया कराव्या. अखेर साल बारामाही झडती करावी. मुजुम दफ्तरीं घ्यावी.

कारखानीयाचे लिहिणार व बाजारचे लिहिणार यांणीं जमेचा हिशेब, जमाबंदी करणें ते सरदार, मजमदार यांचे मतें करावी. खर्च रोखियाप्रमाणें करावा. रोजखर्च करून निशाण व शिक्का घेऊन अखेरसालीं हिशेब घेऊन मुजुमदाराषाशीं द्यावा. मुजुमदार सरदार यासी समजावितील.

एकूण जाबत्याचीं कलमें आठ.

( इ ) जाबता चिटनिसी लिहिण्याचा.

नूतन इनामगांव कोणास दिल्हा त्यांचीं पत्रें व वतनपत्रें.

२ फडनिसी
  १ नांवाचे
  १ मोकदमास
  —
  २

३ चिटनिसी.
  १ तालुकदार
  १ सुभे, मामले, वर्तमान भावी
  १ देशमुख, देशपांडये, जमेदार
  —
  ३

—
५

मोकासेगांव, तैनातेस जमीन वगैरे दिल्हे यास पत्रें.

१ फडनिसी मोकदमास

३ चिटनिसी
  १ तालुकदार
  १ कमाविसदार
  १ जमीदार
  —
  ३

सदरहू खेरीज साहित्यपत्रें चिटनिशी.

जाबसाली हुकुमी कागद राजकारणी चिटनिशी.

ताकीद, रोखे चिटनिशी.

१ सरंजामाचे
१ शेतसनदेचे
१ वृत्तीचे
१ इनामाचे
१ वरातेचे

५

तहनामा चिटनिशी.

कानुजाबते एकंदर जकातीसुद्धां चिटनिशी.

मुलुखास, गांवास, जमिनीस, कौल इस्ताव देणें तो चिटनिशी.

खंडणी करून पैका ठरेल. करार याचा कौल फडनिशी.

नवा अंमलदार, कमावीस त्यांच्या सनदा.

१ नांवची फडनिशी
१ जमीदार वगैरे चिटनिशी

२

घासदाणीयाचे रोखे होणें ते चिटनिशी फडफर्मास रोखसुद्धां.

रसद व इरसाल लग्नकार्य सामान आणावयाचीं पत्रें चिटनिशी यांजमध्यें रसद महालपैकीं उगवून घेणें. त्याची सनद सादर होईल म्हणून लेहिणें पडलें. तरी चिटनिशी सनद मजरा असें म्हणोन फडनिसानें त्याहाबें, बुडती रसद करार जाली असेल ते ती पाठविणें तरी चिटनिशी आणि त्याजबर तुट वरात फडनिशी.

तहकूब रोखे चिटनिशी.

१ शेताचे
१ बाकी तहकूब जालेवर
१ नापीक जाहले तरी तहकूब वसूल पहाणी जाहल्यावर वसूल घेतला जाईल

३

कदीम इनाम, वतन, वर्षासन, स्वराज्य, परराज्यांत चालत असेल त्याचीं ताकीदपत्रें व भोगवट्याचीं सारी चिटनिशी गांव, नांबसुद्धां.

पुरातन वतनाचा इनसाफ होऊन, वतनदारी करार जालीयावरी त्याचीं पत्रें सर्व चिटनिशी, वतनदार यांचीं पत्रें अगर जिल्हेदार, सुभेदार, यांस पत्रें होतील. त्याजमध्यें हरकी शेरणी करार होईल ती जागा ठेवून त्याहाबी. तेथेंच फडनिसांनीं अमकें हातें भरावे.

नूतन हरकोणास वतन, इनाम वतन दिल्हें, त्याचे नांवाचें पत्र फडनिशी व त्याजमध्यें अमके रुपये घेतले भरावे. बाजे जीं पत्रें होतील, ते चिटनिशी.

प्रायश्चित्त देणें तरी व गोताई करावयाची आज्ञा जोशी, उपाध्ये यांसी पत्रें व ब्राह्मणांस व शूद्रांस हरकोणास पत्र देणें तें चिटनिशी. प्रायश्चित्तामुळें हरकी व शेला दिवाणांत घेणें. अमके रुपये जमा म्हणोन फडनिसानें भरावे. वरकड पत्रें चिटनिशी रुपये शिवाय जाल्यास फडनिसाकडील कांहीं नाहीं.

हरकोणास परस्परें कज्जा होऊन, व्यवहार दिवाणांत आला तरी निवाड्याप्रमाणें खऱ्यास हरकी, खोट्यास गुन्हेगारी, याचीं पत्रें चिटनिशी. हरकी, गुन्हेगारी बेरीज मात्र फडनिसांनीं भरावी.

खंड, गुन्हेगारी व हरकी पैदास्त बदअमलाचीं पत्रें चिटनिशी.

हरकोणास वरात दिल्ही, ती पावण्यास दिवसगत लागलीयास ताकीदपत्र वरातीप्रमाणें, रुपये आदा करणें म्हणोन चिटनिशी, आणि वरात शंभराची असली, महाली ऐवज कमी पडला त्यापैकीं पन्नास करार करून देणें, तर फडनिशी आणि एके वेळेस शंभराची वरात दिल्ही ती फिरली, फिरून करार जाली ती चिटनिशी, अधिकउणें जाल्यास फडनिशी.

कोठीचीं व रहदारीचीं दस्तकें एकंदर चिटनिशी.

तलब रोखा चिटनिशी. वतनीमहालांत व बंदर, किल्ले वगैरे कानुजाबते देणें ती चिटनिशी.

दरसाल दारूगोळा व कापड हुजुरून किल्ले, कोट, ठाणीं व जेथें रवाना करणें व तेथून हुजुर आणवणें तरी पत्रें चिटनिशी. हुजत मात्र फडनिशी.

आल्या कागदाचा लाखोटा फोडून वाचून दाखविणें, करून रवाना करणें चिटनिशी.

जिनसास निरख करून कानु-जाबता करून देणें तो चिटनिशी.

हुजुरून गांबास व कोठीस व परगण्यास अंमलदार पाठविला तरी हुजुर-च्याप्रमाणें करार म्हणोन. जिल्हेकडील सारीं पत्रें चिटनिशी.

हरएकाची मालियेत वगैरे जप्त करणें, ज्याची त्यास देवविणें तीं पत्रें चिटनिशी.

गड, कोट, किल्ला वगैरे देणें, हद्द देणें व एखाद्यास कैद करणें, सोडवणें-वीं पत्रें चिटनिशी.

राजकारणीं बातम्यांचीं पत्रें चिटनिशी.

खास दस्तकी, हातरोखा, मोर्तबी लिहिणें तो एकंदर चिटनिशी. हर कोणास किल्ला, कोट, सरंजाम देणें व इनाम वतनें व वरातीबाबद सांगोन पत्रें पाठविणें, तेविषयीं पत्रें व खंड, गुन्हेगारी, हरकी, मसाला, नजर वगैरे भरून चिटनिसानींच करावें. यादी लेहून ठेवून दप्तरांत पाठवावी. त्याप्रमाणें त्यांणीं जमाखर्च करावा. लाखोटा, हातरोखा चिटनिसांनीं करावा व हातरोख्यास चिन्ह अथवा दाखला चिटनिसाखेरीज कोणाचा नाहीं.

तकवती, वसाहती, कौल चिटनिशी.

घर, जागा, ठाव-ठिकाण, लाकूडफाटें, शेतभात, अमानत करणें अगर देवविणें यांचीं पत्रें चिटनिशी.

जाबत्यांचीं कलमें चिटनिशींचीं बत्तीस.

( ई ) जाबता कारखानिशी व सबनिशी किल्ले, कोट, जंजिरे, ठाणीं येथील कानु, कायदे चालण्याची.

पोतें व जामदारखाना याची हुजत व जमाखर्च सबनिसाकडे व्हावा. हुजतीवर मोर्तबाखालीं रुजू कारखानिशी. म्हणून चिन्ह कारखानिसांनीं करावें. पोतें जामदारखानीयावर खर्चीं चिठ्ठी होणें, ते सबनिशीकडील व्हावी. हवालदाराचें मोर्तब खालीं. रुजू कारखानिशी म्हणोन कारखानिसांनीं करावें, व पोतें जामदारखान्याची कीर्द रोजचे रोज दोहींकडील दाखल्यांनीं रुजू होऊन कीर्दीवर मबलग सबनिसाचे होऊन, हवालदाराचा शिक्का व मोर्तबाखालीं चिन्ह रुजू कारखानिशी, कारखानिसांनीं करावें.

किल्ल्याहून मुलकांत रोखापत्र करणें जालें, तरी सबनिशीकडील व्हावें. शिक्का हवालदारांनीं करावा. मोर्तबाखालीं चिन्ह रुजू कारखानिसांनीं करावें.

लोकांची हजेरी घेणें ती सबनिसांनीं घ्यावी. दाखल्यास कारकून कारखानिसाचा असावा. याप्रमाणें पोतें व जामदारखान्याची बांटणी जाली तरी करावें.

मुलकांत रोखा व पत्र करणें तो नक्षी कापडाचा, सबनिशी मोर्तबाखालीं रुजू कारखानिशी, कारखानिसांनीं करावें. व याखेरीज ऐनजिनसी व जाबद फर्मास याचा रोखा होणें तो कारखानिसाकडील व्हावा. मसाला सबनिसांनीं करावा. मोर्तबाखालीं रुजू कारखानिसी करावें. सबनिसांनीं करावें.

हिशेब हवालदारास अगर तालुकदारास अथवा सरकारांत समजाविणें तो सबनिशी व कारखानिशीकडील, एकबेजीं हिशेब सबनिसांनीं आपले-पाशीं घेऊन समजवावें. जवळ कारखानिसांनीं बसावें. दोहीकडील हिशेब घुसणें तो सबनिसास घुसावा.

सरकारांत अगर तालुकदारास अगर सरदारास, सुभेदारास, दुसरे किल्लेदारास कागदपत्र लिहिणें तो सबनिसांनीं ल्याहावा. चिन्ह सबनिसांनीं करावें. शिक्का, मोर्तब सुभेदारांचा जाहलियावर कारखानिसांनीं बार मात्र करावें. चिन्ह करूं नये. बार करून ठेविल्याखेरीज रवाना न करावें.

मुलुखांतील घेऱ्याच्या पाहाण्या करणें, तरी सबनिशीकडून आकार करून सबनिसांनीं द्यावा. जमेस कारखानिसांनीं धरावें. आकाराचा रोखा व कौल देणें तो सबनिसांनीं द्यावा. शिक्का, मोर्तब हवालदाराचे जाहालियावर कारखानिसांनीं रुजू चिन्ह करावें.

एकूण सबनिशीं कलमें सात.

( उ ) ऐनजिनसी व वजनीं व सुमारी जिन्नस किंवा जमाखर्च होईल, त्याची कीर्द कारखानिशीकडील व्हावी. हुजत कारखानिसांनीं द्यावी. हवालदाराचा शिक्का मोर्तब जाहालियावर खालीं रुजू सबनिशी, सबनिसांनीं करावें. कोठीस खर्चाची चिठ्ठी होणें, ती कारखानिसांनीं ल्याहावी. हवालदारानें मोर्तब जाहालियावर रुजू सबनिशी करावें.

ऐन जिनसी व वजनीं व सुमारी बांटणी होऊं लागली, तरी कारखानिसाकडे व्हावी. दाखल्यास कारकून सबनिसाचा असावा.

ऐन-जिनसी व वजनी व सुमारी खर्च होईल, त्याची कीर्द कारखानिसांनीं

ल्याहावी. त्याजवर मबलग कारखानिसाचे जाहालियावरी शिक्का, मोर्तब हवालदारांचे जालियावरी रुजू सबनिसांनीं करावें.

मुलकांत रोखापत्र ऐनजिनसी व सुमारी होणें, तो कारखानिसांचा व्हावा. मसाला सबनिसांनीं भरावा. हवालदाराचें मोर्तब जालीयानंतर रुजू सबनिशी चिन्ह करावें.

पैदास्ती कुणबिणी अथवा पोरगे, घोडे, गुरें आलीं तरी हुजत कारखानिसांनीं द्यावी. मोर्तब खालीं रुजू सबनिशीं करावे. खर्च जाला तर कारखानिसाची चिठ्ठी व्हावी. मोर्तब खालीं रुजू सबनिशीं करावें.

इमारत जाली तरी तेथील काम घेणें, तें कारखानिसांनीं घ्यावें. देखरेख सबनिसांनीं करावी. कारखान्यावरील लोकांस वांटणी जाली तरी नक्ती व कापड सबनिसांनीं करावी. दाखला कारखानिसांचा असावा. ऐनजिनसी कैली, वजनी, सुमारी वाटणी जाली तरी कारखानिसांनीं करावी. दाखला सबनिसांचा असावा.

आरमाराचा कारखाना करणें जालें तरी कारखानिसांकडील कारकुनानें ल्याहावें. काम कारखानिसांनीं घ्यावें. देखरेख सबनिसांनीं करावी.

एकूण कारखानिशीं कलमें सात.

एकूण जाबत्याची ( ई व ऊ ) कलमें चौदा."

वरील जाबत्यांवरून सरकारी पत्रांचा लेखक, कारखाना व पत्रांखालील रुजू, बार, वगैरे चिन्हें कोण करीत हें जाणणें तेवढेंसें कठीण जाणार नाहीं. हें समजूं लागलें म्हणजे पत्रांतील मजकुराविषयींच्या खरेखोटेपणाबद्दल साधार अनुमान करणेंही सोपें जाईल. दरबारी जाबत्यांप्रमाणेंच सरकारकून, चिटनिस, सबनीस, वगैरेंच्या गुमास्त्यांचे व कारकुनांचे जाबते ठरीव होते. परंतु ते अद्यापि उपलब्ध झालेले नाहींत. पत्रलेखन बहुधा हे गुमास्ते अगर कारकूनच करीत. खास सरकारकुनांचीं पत्रें अगदीं थोडींच असत.

## २२ लेखन-पद्धति

मराठी साधनें मोडी अगर बालबोधी लिपींत लिहिलेलीं असतात. दानपत्रें किंवा काव्यें यांसारखींच साधनें बहुधा बालबोधींत लिहिलीं जात. बाकी सर्व-प्रकारच्या मराठी साधनांचें लेखन मोडींतच झालेलें आहे. इ० सन १४ व्या शतकाच्या प्रारंभापासूनच मोडी लिपी प्रचारांत असल्याचें दिसून

येतें. कालमानानें व देशभिन्नत्वाप्रमाणें मात्र मोडी लिपीच्या वळणांत व अक्षरसंकेतांत फरक झालेले दिसून येतात. शिवशाहीच्या कालापुरताच विचार केला तर मावळांतील मोडीचें वळण व सातारा, बेळगांव, कर्नाटक वगैरे भागांतील वळणांत बरेंच भिन्नत्व असल्याचें दिसून येईल. कोंकण-पट्टींतील मोडीचें वळण इतर सर्व भागांपेक्षां अधिक वळणदार व सुबोध आहे. कालमानानेंही मोडी वळणांत फरक होत गेला आहे. शिवाजीच्या कारकीर्दींतील पूर्वभागापेक्षां उत्तरभागांतील वळण बरेंच सुधारलेलें व सुबोध असल्याचें आढळतें. संभाजीकालीन वळण बरेंच स्पष्ट आहे. राजारामाच्या कारकीर्दींत तर चिटणिशी सुबोध व गोंडस वळणाचा प्रसार झाला होता.

मराठींतील कोणताही लेख असो त्याचे माथ्यावर श्रीकार किंवा श्री घालून नंतर कुलदैवतेचें किंवा आराध्य दैवतेचें नांव लिहिलें जात असे. कधीं कधीं अशीं दोनदोन नांवेंही लिहिलेलीं आढळतात. लेख महत्त्वाचा असल्यास त्या लेखाच्या उजव्या बाजूच्या कोपऱ्यावर त्या लेखाच्या प्रती व प्रत्येक प्रतीस लागलेले बंद यांचा उल्लेख केला जातो. एखाद्या पत्राला अगर करीन्याला दहा बंद असले तर त्या पत्राच्या अगर करीन्याच्या सुरुवातीस उजवीकडे १/१० असें लिहिलें जाई. त्या करीन्याच्या चार प्रती असतील तर १/४ असें लिहिण्याचा प्रघात असे. एकाच बंदाच्या लेखावर असा उल्लेख केला जात नसे. कोणत्याही पत्रांत देवाचें अगर माणसाचें नांव आलें व त्या देवाबद्दल अगर माणसाबद्दल बहुतच सन्मान व पूज्यभाव दाखवावयाचा असेल तर त्या देवाचें अगर माणसाचें नांव मजकुरांत न लिहितां त्या देवाच्या अगर माणसाच्या कमीअधिक मान्यतेप्रमाणें जेथें जेथें उल्लेख करणें जरूर तेथें तेथें कमीअधिक जागा रिकामी सोडली जाई व त्या देवाचें अगर माणसाचें नांव माथ्याला उजव्या कोपऱ्यावर स्वतंत्र लिहिलें जाई. मोरोपंत पिंगळे किंवा इतरांनीं लिहिलेल्या पत्रांत जर शिवाजीचा उल्लेख करावयाचा असेल तर ते 'राजश्री———स्वामी' असें लिहीत शिवाजीच्या पत्रांत जिजाऊसाहेबांचा उल्लेख आल्यास 'मातोश्री——— साहेबांनीं' वगैरे असें लिहीत. एखाद्या देवाला जहागीर देतांना 'श्री———— देवाच्या' पूजेस वगैरे असें लिहीत. पत्रांतील मजकुरांत जागा कोरी टाकतांना नेहमींच पत्राचे कोपऱ्यावर या गाळलेल्या नांवांचे उल्लेख केलेले

असतात असें नाहीं. बरेच वेळां थोरले स्वामींचा म्हणजे शिवाजीमहाराजांच्या नांवाचा वर नांव लिहून उल्लेख करण्याची जरूरच भासत नसे इतकें तें त्यांना स्पष्ट वाटे. बहुधा देवाचीं व ज्यांचेबद्दल देवासारखा पूज्यभाव वाटतो अशा साधुसंतांचीं वगैरे नावें बालबोधींत बहुमान दाखविण्यासाठीं लिहीत. पत्राचे मायने ठराविक असतात. बरेच मायने अद्यापही चालू असल्यामुळें त्यांचा उल्लेख करीत नाहीं. शिवाजीमहाराज प्रथम सरकारकुनांना व सुभेदारांना बहुतेक 'मशहुरल हजरती राजश्री' व हवालदार, कारकून वगैरेंना 'मशहुरल अनाम राजश्री' असें लिहीत. राज्याभिषेकानंतर राजमान्य राजश्री वगैरे मायना लिहिला जाई. कचेरींतून सरकारी पत्रें रवाना होत, त्यावर 'रख्तखाने' असें असे. मराठी लेखांत विशेषेंकरून त्या लेखाचें नांव देण्याचा प्रघात असे. त्यामुळें लेख आज्ञापत्र, खुर्दखत, हातरोखा, महजर, करीना किंवा इतर कांहीं प्रकारचा आहे किंवा कसें हें ओळखणें सोपें जातें. पत्र कोणाच्याही नांवाचें असलें तरी तें त्याचेंच खास स्वदस्तुरचें आहें असें मानण्यास फारसें साधन नसतें. पत्रावर सही अगर निशाणी केली जात नसे. महजर, गोही, संमतपत्र यांसारख्याच लेखांवर सही अगर निशाणी होत असे. लेख लिहिणारा आपल्या हस्तकांकडून लेख लिहवून घेई अगर स्वतःही लिही. सरकारी कागदपत्रें सर-कारकुनांचे कारकून अगर गुमास्तेच तयार करीत. या कागदपत्रांचे मसुदे जवळ-जवळ ठरीव आहेत. मजकुरांत जी कांहीं भिन्नता असेल तेवढाच काय तो निराळा मजकूर लिहिला जाई. खास पत्राचा मसुदा कारकुनास समजाविला जाई व पत्र लिहून झाल्यानंतर हे अधिकारी शोध अगर अधिक मजकूर घालून पत्र पुरें करीत. लेखांत प्रथम मायना व नंतर सुहुर सन, किंवा राज्याभिषेक शक अगर तिथि मिति व शकाचा उल्लेख करून पत्रास सुरुवात होई. लेखाच्या पूर्व भागांत पत्राचें कारण दिलें जाई. या कारणांत ज्या पत्राला उत्तर अगर विनंतीचा विचार करावयाचा तें पत्र अगर विनंति सविस्तर लिहून नंतर उत्तरभागास सुरुवात केली जाई. यांत लिहिणाराचा मजकूर असतो. पत्राचे उत्तरार्धाचे शेवटीं मुसलमानी तारीख व महिना दिला जाई. त्यानंतर मोर्तब सूद, बहुत काय लिहिणें, जाणिजे, वगैरे-सारखीं ठराविक वचनें किंवा दरख घालून लेख पुरे करीत. मोर्तब सूदच्या ऐवजीं राज्याभिषेकानंतर मोरोपंतादि सरकारकून

लेखनसीमा, लेखनालंकार वगैरे असें कित्येक ठिकाणीं उपयोगांत आणीत असें दिसतें. सरकारी कागदपत्रांवरील हीं शेवटीं लिहिलीं गेलेलीं वचनें बहुधा त्या त्या कारखान्याचे अगर खात्याचे अधिकारीच करीत. पत्रांवर शिक्का करणें त्यालाही कांहींतरी पद्धति असावी असें स्पष्ट दिसतें. परंतु ही पद्धति समजण्याचें तत्कालीन निश्चित साधन अद्याप उपलब्ध झालें नाहीं. अनुमानानें मात्र या पद्धतीची थोडीबहुत रूपरेषा समजूं शकते. रा० पुरंदरे मास्तर यांनीं मिळविलेल्या एका बाडांत* शिक्का व मोर्तब-पद्धतीबद्दल पुढील अर्थाचे उल्लेख आढळतातः—

१ सिकापद्धति.

४ दकारी पत्रांवर पाठीमागें शिक्का करणें.

१ कनिष्ठ पहिले ओळीचा

१ मध्यम दुसरे ओळीचा.

१ उत्तम तिसरे ओळीचा

१ बरोबरी तीन ओळीखालीं करणें.

—

४

१ बीत होत नाहीं तेथें निशाणी खास दस्तकावर अगर थैलीस लखोटे करून सिका करावा.

१ मोर्तब यास चार रकाने माथ्यावर करावा.

१ मशोदर उजवीकडे पहिले ओळीस करणें.

१ एक रकाना टाकून लिहिणें त्यास डावीकडे पहिले ओळीस करणें.

—

८

१ मोर्तबपद्धति.

१ सर्वांस खालीं शेवटीं करणें

१ नांवांची मोहर सिकापद्धति

१ खडे बंदाचे जोडगिरीवर पाठीमागें पाठ कोरीवर दरदोनप्रमाणें.

—

३

* भारत इतिहाससंशोधकमंडळ—संग्रह.

वरील उल्लेखांत बरेंच तथ्य दिसतें. परंतु वर दिलेल्या प्रकारांपेक्षां आणखीही प्रकार रूढ असल्याचें स्पष्ट दिसून येत आहे. म्हणून जीं उपलब्ध अस्सल पत्रें पहावयास मिळालीं त्यांवरून जी अनुमानपद्धति बसावितां येत आहे ती पुढें देत आहें. त्यांत अपूर्णतावस्था किंवा चूकही राहण्याचा संभव आहे. कारण शेंकडों कागदपत्रें उपलब्ध झाल्याशिवाय या शिक्का-पद्धतींतील विविध गमकें समजणें शक्य नाहीं. परंतु जीं कांहीं अनुमानें बांधतां येतात तीं येणेंप्रमाणें:—

१. शिक्का अगर मोर्तब राजाच्या परवानगीशिवाय वापरण्यास अधिकार नसे.

२. देशमुख, देशाधिकारी, हवालदार, सुभेदार व प्रांतानिहाय सरकारकून, सेनापति, सहस्री, पंचसहस्री, न्यायाधीश यांसारखे हुकुमत चालविणारे जे सरकारी अधिकारी त्यांना अधिकाराच्याप्रमाणें शिक्कामोर्तब दिला जाई.

३. सरंजामाप्रमाणें सरदारांना शिक्क्यामोर्तबाची परवानगी असे.

४. कोणचाही अधिकारी आपल्या हाताखालील नोकरांना अगर आपल्या अधिकारांतील प्रजेला हुकूम काढतांना शिक्का माथ्यावर श्रीखालीं कागदाचे मध्यावर करी.

५. ज्या लेखानें आज्ञा किंवा हुकूम फर्मावयाचा अशाच पत्रांच्या माथ्यावर नांवाचा शिक्का व शेवटीं मोर्तब केला जाई. इतर पत्रांवर फक्त मोर्तबच होत असे. खास घरगुती पत्रांवर शिक्का किंवा मोर्तब होत नसे.

६. शहाजी व शिवाजीमहाराज यांचे शिक्के फक्त सनदा व खास हुकुमी पत्रें किंवा याद्या यांवरच होत असत. करार, तह, खुर्दखत, कौलनामा वगैरेसारख्या पत्रांवर फक्त त्यांचे मोर्तबच होत. कराराच्या व तहाच्या प्रत्येक कलमाकलमाला मोर्तब केला जाई.

७. छत्रपतींच्या नांवाचा शिक्का ज्यांवर होत असे त्या पत्रांवर, जर ते हुकूम खास सरकारकुनांचेच नसतील तर, कोणातरी प्रधानाचाही शिक्का पत्राचे सुरूवातीस कलम नऊंत सांगितल्याप्रमाणें बाजूस होत असे.

८. शहाजी, शिवाजी व इतर छत्रपतींचे शिक्के नेहमीं माथ्यावरच होत असत.

९. प्रधानांचे शिक्के पत्रारंभींच्या पहिल्या चारपांच ओळींच्या डावीकडे अगर बंदाचे मागें सुरवातीस जागा कोरी सोडून तेथें बहुधा होत.

१०. मुख्य प्रधानाचे शिक्के कांहीं वेळां प्रथमारंभीं माध्यावर किंवा शेवटीं एका बाजूस केलेले आढळतात.

११. शहाजीमहाराजांचेही सरकारकून शिवाजीमहाराजांच्या सरकारकुनांसारखे पत्रांवर एका बाजूस आपले शिक्के करीत.

१२. महजरावर शिक्के करणें ते प्रत्येकजण आपापल्या सहीच्या जागीं करीत.

१३. वर दिलेल्या बाडांतील उताऱ्याप्रमाणें शिक्कयाची पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या अगर नंतरच्या ओळीच्या जागेवरून सरकारकुनांच्या व ज्याला पत्र दिलें त्याच्या एकमेकांच्या कनिष्ठ किंवा उत्तम दर्जाचा व संबंधाचा बोध होतो.

१४. मोर्तबाच्या शिक्क्यांत 'मोर्तब सूद', 'लेखनसीमा', 'लेखनावधी', 'मर्यादेयं विराजते' वगैरेसारखीं अक्षरें असतात.

१५. प्रत्येकजण आपापल्या आवडीप्रमाणें नांवाच्या व मोर्तबाच्या शिक्कयाचे आकार ठरवीत. सामान्यतः नांवाचा शिक्का ज्या आकाराचा असतो त्याच आकाराचा मोर्तबही करण्याची प्रवृत्ति दिसते.

१६. बापाच्या अगर कर्तबगार माणसाच्या मृत्यूनंतर नवीन माणसाच्या नूतन शिक्कयाला सरकारी परवानगी मिळेपर्यंत जुनाच शिक्का चालू राही. कित्येक घराण्यांत मूळ पुरुषापासून चालत आलेले शिक्के चालत असत.

१७. एकाच माणसाचे एकापेक्षां अधिक शिक्के क्वचित् ठिकाणीं चालू असल्याचें दिसतें.

१८. सरकारकुनांचे शिक्के निरनिराळ्या प्रकारचे असून त्यांचा उपयोग ठराविकच असावासें वाटतें.

शिक्के धातूवर कोरून तयार करण्यांत येत. अक्षरें व विवक्षित खुणा अगर वेलबुट्टी आंत खोदली जाई. नेहमींच्या लिहिण्याची शाई लावूनच शिक्के उठवले जात. त्यामुळें अक्षरें पांढरीं व बाकीचा भाग काळा उठे. बहुतेक वेळां अक्षरेंही शाईनें भरलीं जात. त्यामुळें शिक्के बहुतेक अस्पष्टच उठत. लेखावर स्वदस्तुरचें म्हणून एवढेंच निशाण व्हावयाचें. त्यामुळें शिक्के नेहमींच खास मनुष्याच्या ताब्यांत असत. बहुधा हे दागिन्याबगैरेसारखे काळजीपूर्वक जोपासले जात व विशेषेंकरून घरांतील मुख्य पत्नीच्या अगर कर्तृत्ववान् स्त्रीच्याच ताब्यांत रहात. शिवाजीमहाराजांचे मुख्य शिक्के जिजाऊसाहेबांच्या व नंतर वडील पत्नीच्या ताब्यांत होते. संभाजीचे शिक्के

येसूबाईच्याच ताब्यांत होते. राजाराममहाराजांचेही ताराबाईच्या हातीं होते. शिक्के करणें ते मात्र शिक्केनवीस नेमलेले असत ते खास लेखी हातरोखा मिळाला तरच अधिकाऱ्यांच्या अगर ज्यांचे ताब्यांत शिक्का असे त्यांच्या समक्ष शिक्के करीत. देशमुखादि घराण्यांत ज्या पातीकडे शिक्के असत त्या पातीला शिक्केकरी देशमुख असें म्हणत.

कागदपत्रें तयार झालीं म्हणजे तीं निरनिराळ्या कारखान्यांत किंवा सरकारकुनांकडे नोंदावयास अगर रुजू अगर संमत घेण्यास जात. वर जे जाबते दिले आहेत त्यांवरून कोणतीं पत्रें किती होत व त्यावर कोणाचे बार, संमत, रुजू यासारखे शेरे होत हें समजून आलेंच आहे. त्याबद्दल अधिक लिहिण्याची जरूर नाहीं. ज्याप्रमाणें महाराजांच्या सरकारी पत्रांच्या लेखनाचें प्रयोजन निरनिराळ्या खात्यांत होई त्याप्रमाणेंच सुभेदार व सरसुभेदार, देशमुख, देवस्थानें वगैरेही मोठमाठे सरदार, जहागिरदार यांचेही गुमास्ते, पेशवे वगैरे असत. सुभेदाराचें पत्र हवालदार, देशमुख वगैरेकडे बार होतच असे. तेव्हां अशा पत्रांवरील 'बार' वगैरेसारखे शेरे देणारे अधिकारी सुभेदाराच्या हाताखालचे असतात. 'सूद' याचा अर्थ फक्त 'झाला' असा असल्यानें 'बार' किंवा 'बार-सूद' या शेऱ्यांत फरक नसतो. पत्र पोहोंचतांच पैवस्ती म्हणजे पोहोंचल्याची तारीख घालण्याचा परिपाठ होता. कित्येक वेळां ही पैवस्ती पत्राचे डोक्यावर घातली जाई व कित्येक वेळां शेवटही लिहिली जाई. पैवस्तींत फक्त तारीख व महिनाच लिहिला जातो.

मराठी साधनांत आणखी एक विशेष लक्षांत येतो. तो म्हणजे कागदांच्या आकाराचा होय. पुष्कळशा पत्रांना अगदीं लहान आकाराचे कागद वापरीत. शिवपूर्वकालीन कागदांचा आकार लहान असून तो पुढें थोडा थोडा वाढतच गेला. परंतु हा आकार फारसी फर्मानांसारखा रुंद व लांब झाला नव्हता. तसेंच सनदापत्रेंही मोठ्या बेगडी किंवा नक्षीच्या कागदांवर देण्यांत येत नसत. सर्व पत्रांना साधाच परंतु चिवट कागद वापरला जाई. एक बंद न पुरल्यास दुसरा बंद जोडला जाई व अशा जोडावर वर सांगितल्याप्रमाणें कांहींतरी चिन्ह अगर मोर्तब केलें जाई. जर मागील कागद कोरा असेल तरच असलें चिन्ह केलें जात असे. उपलब्ध झालेल्या कागदांवरून असें अनुमान काढतां येतें कीं, प्रत्येक प्रकारच्या लेखास कोणत्या

आकाराचा कागद वापरावा हें ठरलेलें असावें. त्याप्रमाणेंच या आकारांवरून कागदपत्रांचा कालही ठरवितां येणें शक्य आहे. परंतु यासंबंधीं अनुमानानें नक्की पद्धति बसविणें शक्य न झाल्यामुळें याबद्दल अधिक लिहितां येत नाहीं.

शिवशाहीकालीन मराठी साधनांत फारसी अपभ्रष्ट रूपांचा व फारसी शब्दांचा अतोनात भरणा आहे. कित्येकवेळां तर पत्र फारसी आहे कीं मराठी आहे याबद्दल मतिभ्रम होतो. विशेषतः या मराठीकरणांत फारसी शब्दांचें मूळ रूपही न बदलतां तो शब्द अगदीं विरोधी अर्थानें योजला जातो तेव्हां तर फारच अडचण उत्पन्न होते. विशेषतः या कालच्या पत्रांच्या नकला वाचतांना तर बराच घोंटाळा उडतो. मोडी वाचनांत विवक्षित अक्षरांच्या नेहमींच चुका आढळतात. त्यांत या विरोधी शब्दांची जोड मिळाल्यास नकलकाराची तिरपीट उडते. शेवटीं ती नक्कल मूळ पत्राच्या अगदीं विरुद्ध मजकूर उपस्थित करिते. मोडी वाचनाच्या चुका विशेषेंकरून ज्या होतात किंवा नकलकारांच्या झाल्या आहेत, त्यांतील सामान्य अशा—'व' व 'ह', 'क' व 'ला', 'द' व 'प' यांसारख्या समवळणाच्या अक्षरांत परस्परांची अदलाबदल होते. क्रमांकांत २ व ४ हे चुकवितात. शब्द वाचतांना तोडण्यांत चुका होतात. पुढच्या शब्दांतील आद्य मागच्या शब्दांतील भागांत घुसतो. या जशा वाचनांतील चुका आहेत तसेच कांहीं मराठी शब्दांचेही प्रचार भाषेंतून नाहींसे झाले आहेत व कांहीं मराठी शब्द कालांतरानें अर्थभिन्नत्व पावले आहेत. थोडकेंसें उदाहरण द्यावयाचें झालें तर 'वारला' हा शब्द इतिहासकालीं फक्त 'मुक्त केला' याच अर्थानें विशेषतः वापरला जाई. आतां हा शब्द 'मेला' या अर्थानेंच वापरला जातो. त्यामुळें क्वचित्-प्रसंगीं अर्थभिन्नत्व आल्यानें त्या वेळच्या साधनांतील वर्णिलेल्या प्रसंगाचा बिनचूक बोध तात्काळ होऊं शकत नाहीं. कित्येक वेळां असले शब्दप्रयोग बरेच घोंटाळ्यांत घालतात. तसेंच शिवकालीन भाषेची वाक्यरचनाही विशिष्ट प्रकारची आहे. त्यामुळें एखाद्या प्रसंगांतील दिलेल्या विविध गोष्टींतील आनुषंगिकत्व किंवा क्रम सहज लक्षांत येत नाहीं. विशेषतः यांतील क्रियाविशेषणांची योजना व शब्दयोगी अव्ययें यांचा वाक्यांतील उपयोग विवक्षित पद्धतीचा असल्यामुळें या शिवकालीन साधनांचें वाचन त्याच पद्धतीनें करणें आवश्यक होतें. याबद्दल पुढें विचार होणारच आहे. येथ-

पर्यंत साधनांच्या स्वरूपाबद्दलच चर्चा झाली; परंतु एवढ्यावरून त्यांचें प्रामाण्या-प्रामाण्य ठरविणें शक्य नाहीं. तें परीक्षण वर दिलेल्या नुसत्या तत्कालीन रिवाजांचे तोडगे लावून होणार नाहीं. त्या परीक्षणास आणखी ताळे-पडताळे पाहणें जरूरीचें असतें. त्याचा विचार पुढें होणारच आहे.

## २३ साधनांचा दर्जा व शकपद्धति

वरील विवेचनावरून सरकारी कागदपत्रांचें स्वरूप लक्षांत येईल. खासगी पत्रव्यवहारांत फारशी अडचण येत नाहीं. परंतु कागदपत्र अस्सल असले म्हणजे त्याचा दर्जा वरिष्ठ असें म्हणतां येणार नाहीं. या कागदपत्रांचा दर्जा लेखांतील मजकुराप्रमाणें कमीअधिक ठरतो. साधनांचा दर्जा ठरविण्यास त्या साधनांचें अंतरंग तपासावें लागतें. परंतु कागदपत्रांच्या प्रकारांवरूनही साधनांचे सामान्यपणें दर्जे ठरवितां येतात. मागें दिलेल्या सामान्य नियमांप्रमाणें ज्या कागदांत एकच परंतु समकालीन बाब प्रत्यक्ष पाहून अगर अनुभवून लिहिलेली असते ते कागदपत्र श्रेष्ठ प्रकारचे किंवा प्रथम दर्जाचे ठरतात. या प्रकारच्या कागदपत्रांत कांहीं खासगी पत्रव्यवहार येऊं शकतो. तसाच त्यांत बऱ्याच सरकारी कागदपत्रांचाही समावेश होतो. अशा कागदपत्रांत ज्या लेखांना एकापेक्षां अधिक अधिकाऱ्यांची मान्यता असते ते सर्वांत महत्त्वाचे मानावे. या प्रकारच्या कागदांत अभयपत्र, सनदापत्रें, वगैरे सर्व पत्रांचा व रोख्यांचा समावेश होतो. ज्या कागदांत अनेक गोष्टींचा व बऱ्याच मोठ्या कालांतील तपशिलांचा तत्कालीन साक्षीदारांच्या पुराव्यांवरून उल्लेख केलेला असतो त्या कागदपत्रांचा द्वितीय दर्जा लागतो. यांत कांहीं आज्ञापत्रें, इनामपत्रें, निवाडपत्रें, वृत्तिपत्रें व सर्व करीने, तकरीरा, पुराशीसी, महजर, याद्या, शकावल्या, टिपणें यांसारखीं साधनें समकालीन माणसांनीं तयार केलीं असतील तर त्यांचा समावेश होतो. तिसऱ्या दर्जांत कुळकटी-सारखीं म्हणजे संबंधीय घराण्यांतील खास परंपरेच्या माहितीवर व थोडाबहुत कागदपत्रांचा आधार घेऊन पश्चात् लिहिलेल्या साधनांचा समावेश होतो. कालांतरानें व कशीतरी माहिती मिळवून असंबंधी माणसांनीं तयार केलेलीं व अनेकविध माहिती देणारीं बखरीसारखीं साधनें चतुर्थ दर्जांत येतात.

कोणत्याही साधनांचें परीक्षण करणें तें प्रथम कागदांतील संदर्भावरून,

त्यांतील हेतु जाणून करावें लागतें; परंतु कागदपत्रें कोणत्या नांवाखालीं व जाबत्याच्या शिरस्त्याप्रमाणें कोणीं कोणास लिहिलीं हें समजलें म्हणजे त्या कागदाचा प्रकार व त्याबरोबरच त्याचा हेतु ओळखतां येतो. लिहिणाराचा हेतु समजला म्हणजे त्या पत्रांतील ऐतिहासिक प्रसंगनिवदेनांत केलेली अतिशयोक्ति अथवा गफलत सहज ओळखतां येते. यायोगें शेवटीं ऐतिहासिक साधनांचा दर्जा ठरवितां येतो. परंतु नुसत्या हेतु जाणण्यानें हा दर्जा ठरविण्याचा प्रकार निर्दोष असूं शकणार नाहीं. त्याला मुख्य व दुसरी कसोटी म्हणजे कालाची. जर ऐतिहासिक साधन समकालीन असेल तर दर्जा वरिष्ठ लागूं शकेल. परंतु ही कालाची कसोटी लावणें कांहीं ठिकाणीं सोपें जातें; परंतु बरेच ठिकाणीं कालनिर्देशाच्या अभावीं किंवा काल-निर्देशांतील अपूर्णतेमुळें ही कसोटी लावतां येत नाहीं. शिवशाहींतील पूर्वार्धापर्यंत तरी मराठी साधनांत सुहुरसन व मुसलमानी तारीख व महिना देण्याचीच चाल रूढ होती. वार, तिथि, मिति, शक, संवत् व राजशक इत्यादि कालनिर्देश पत्रांवर घालण्याचा प्रघात शिवाजीनें चालू केला. फारसी सरकारी पत्रांप्रमाणेंच कित्येक पत्रांवर फक्त महिना व चंद्र दिलेला आढळतो. त्यामुळें या पूर्वभागांतील पत्रांचा काल ठरविणें जड जातें. केवळ शाई, कागद वगैरे बहिरंगांवर विसंबावें लागतें. राजवाडे–खंडांत अशा पत्रांच्या व सुहुरसन दिलेल्याही कित्येक पत्रांच्या तारखा ठरविण्यांत चुका झाल्या आहेत. या चुका खरे व पिले यांच्या तपशिलवार जंत्र्या तयार झाल्या असल्यामुळें आपणांस उकलत आहेत. यापूर्वी ठराविक कोष्टकांच्या साहाय्यानें गणित मांडून तारखा ठरवीत. अर्थात् गणित जुळेच अशांतला भाग नसे. आतां खरे–जंत्रीसारखें साधन निर्माण झालें आहे. तेव्हां अशा ज्या साधना-भावीं चुका राहून गेल्या आहेत त्या सुधारून घ्याव्या. या चुका राजवाडे खंडांतच आहेत अशांतला प्रकार नाहीं. इतर ज्यांनीं तारखा देण्याचा प्रयत्न केला आहे त्यांतही त्या आढळतात. ज्यांनीं तिथि व शक देण्याचा प्रयत्नच केला नाहीं त्यांच्या चुका होण्याचें कारण नाहीं.

मराठी साधनांचा नक्की काल काढण्यास दोन्हीही पद्धति म्हणजे मुसल-मानी व मराठी पद्धति माहिती पाहिजेत. शिवकालाची जंत्री खरे यांनीं केलेली आहे. त्यामुळें त्या पद्धतींची चर्चा येथें करण्याची जरूर नाहीं. खरे

जंत्रीच्या साहाय्यानें आपणाला वाटेल त्या चंद्राची अगर तिथीची इंग्रजी तारीख वगैरे काढतां येते. तरीही कांहीं गोष्टी येथें नमूद करणें इष्ट दिसतें. खरे जंत्रींत सुहुरसन केव्हां सुरू होतो हें दाखविलेलें असतें. परंतु सुहुरसन सुरू होण्याचा दिवस प्रत्येक वर्षाचें गणित करून ठरविलेला नाहीं. म्हणून सुरवातीच्या दिवसांत किंवा वर्षारंभाच्या एक दोन दिवसांत मतभेद आढळणें शक्य आहे. याकरितां वर्षारंभींच्या दिवसाच्या पत्रांतील दिवस काढतांना हा दिवस नीट छानून पहावा. सुहुर, हिजरी, वगैरे सनांबद्दलची माहिती वर फारसी साधनांखालीं आलीच आहे. मद्रास व तामील भाषा प्रचलित असणाऱ्या प्रांतांत इतर भागांप्रमाणें गत संवत्सर देण्याचा प्रघात नसून वर्तमान संवत्सर देतात. तसेंच उत्तर हिंदुस्थानांत अमावास्येनंतरच्या प्रतिपदेपासून म्हणजे अमान्त महिना सुरू होत नाहीं. पौर्णिमेनंतरच्या प्रतिपदेपासून म्हणजे पौर्णिमान्त महिना सुरू होतो. त्यामुळें महाराष्ट्रांतील महिना एका पंधरवड्यानें आधीं सुरू होतो. राजशक ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीपासून सुरू होतो व हा चालू राजशकांत दिलेला असतो. तिथीचा निर्देश करणें तो कित्येक वेळां सूर्योदयात् जी तिथि असेल ती देऊन करितात. सूर्योदयाच्या सुमारास जर तिथीचें संक्रमण होत असेल तर स्थानपरत्वें गत अगर उदित तिथि मानली जाते. त्यामुळें एकाच प्रसंगाच्या दोन तिथि दिल्या जातात. केव्हां केव्हां प्रसंग ज्या घटकेला घडला त्या घटकेला जी तिथि असेल तीच देतात. अशा वेळीं वाराची जोड असल्यास आपणास वेळही ठरवितां येते. विशेषतः मृत्यूची तिथि या तिसऱ्या प्रकारचीच असते. शकावल्यांत व टिपणांत या सर्व भानगडी बरेच वेळां आढळतात. आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवावी लागते ती अशी कीं, ज्या वेळीं एखादा काल दिलेल्या कालांत बेरीजवजाबाकी करून काढून दिलेला असतो किंवा आपण असा काढूं पहातों तेव्हां नेहमीं तीन वर्षांनीं येणारा अधिकमास आणि एकशेएकेचाळीस वर्षांनीं येणारा क्षयमास वगैरे आपल्या हिशेबांतून अलगच निसटून जातो. क्षयतिथीचाही कधींकधीं कालगणतींत फटका बसल्याशिवाय रहात नाहीं. परंतु येथें शक, मिति, तिथि, संवत्सर-पद्धतीच्या बारीकसारीक तपशिलांचा विस्तार करीत नाहीं. शिवशाहीच्या कालापुरतें सुहुरसनावरून शक-संवत्सर-सन वगैरे काढण्याचें एक लहानसें कोष्टक दिलें म्हणजे सर्व काम भागेल. पुढील

कोष्टकाचा मूळ पाया सुहुरसन धरिला आहे. सुहुरसन म्हणजे मृगसाल हें मागें सांगितलेंच आहे. हें मृगसाल तारीख २४ मेला सुरू होतें असें सर्वच जंत्रीकारांनीं मानलें आहे. अर्थात् प्रत्येक वर्षाच्या एका सुरुवातीच्या दिवसाचा तपशील दिला म्हणजे त्या वर्षांतील इतर कोणत्याही दिवसाचा तपशील गणितानें शोधून काढणें सोपें जातें. म्हणून पुढील कोष्टकांत मृगसालाच्या प्रारंभींच्या प्रथम दिवसाची माहिती भरली आहे. कोष्टकास अलफपासून सुरुवात केली आहे. एक ते नऊचीं नांवें डोक्यावर देऊन दशकांचीं नांवें डावीकडे दिलीं आहेत. त्यावरून अनुक्रमें उभ्या व आडव्या रकान्यांचा बोध होईल. प्रत्येक रकान्यांतील दरवर्षाच्या तपशिलांत प्रथम इ० सन व तारीख २४ मेला जो चंद्र म्हणजे मुसलमानी तारीख होती ती दिली आहे. दुसऱ्या ओळींत प्रथम शकाचा आंकडा देऊन नंतर त्या त्या सुहुरसनाच्या अवधींत एखादा अधिकमास आला असल्यास त्याचा उल्लेख केला आहे. मृगसाल साधारणतः ज्येष्ठांत सुरू होतें, म्हणून जो शक दिलेला असतो तो सुरुवातीचा होय असें समजावें. तिसऱ्या ओळींत संवत्सरांचें नांव दिलें आहे. तेंही सुरुवातीच्या संवत्सराचेंच आहे. चवथ्या ओळींत हिजरीसन दिला असून त्यानंतर मृगसालाच्या सुरुवातीस जो मुसलमानी महिना असतो त्याचा क्रमांक दिला आहे. हिजरीसन सुरुवातीचा समजावें. इसन्ने समानीन अलफ म्हणजे इ० सन १६८१ या वर्षी दोन अधिकमास व एक क्षय-मास आला आहे. या कोष्टकाचा उपयोग समजण्यास दोन उदाहरणें सोडवून दाखवितों. छ ५ रजब सलास आर्बैन व अलफ=सलास आर्बैन मुसलमानी तिसऱ्या महिन्यांत सुरू झाला. कोष्टकाच्या खालीं दिलेल्या दुसऱ्या कोष्टकावरून रजब हा सातवा मुसलमानी महिना आहे. तेव्हां या सातांतून तीन वजा केले म्हणजे रजब महिन्यांत सुहुरसन सुरू होऊन चार महिने झाले असें ठरतें. मुसलमानी व मराठी महिने चांद्रमानाचेच असल्यानें व सुहुर ज्येष्ठांत सुरू होत असल्यानें आपणांला ज्येष्ठापासूनही पुढें चार महिन्यांनीं रजब येतो असें तात्काळ सांगतां येतें. म्हणजे तिसऱ्या कोष्टकावरून हा चवथा महिना म्हणजे आश्विन येतो. आणि मुसलमानी तारखेंत दोन मिळविले म्हणजे सामान्यतः तिथि येते. म्हणजे छ ५ रजबला, आश्विन शुद्ध ७ मी शके १५६४ चित्रभानु संवत् व हिजरी

सन १०५२ आला. आतां इ० सनाची तारिख काढावयाची तर २४ मेला छ ४ रबिलावल होता हें दिलेंच आहे. त्यावरून ५ रजबपर्यंत किती दिवस भरतात तें काढावें. जसें:— रबिलावल=२९–४=२५, रबिलाखर ३०, जमादिलावल २९, जमादिलाखर ३० व रजब ५ मिळून ११९ दिवस येतात. नंतर २४ मेनंतर ११९ दिवसांनीं कोणती तारीख येते ती शोधावी. २४ मे ते ३१ मेचे ७ दिवस वजा करून नंतर राहिलेल्या ११२ दिवसांत तीन पूर्ण महिने बसतात. त्या महिन्यांच्या दिवसांची बेरीज म्हणजे जून ३०, जुलै ३१ व ऑगस्ट ३१= ९२ दिवस ११२ तून वजा देतां बाकी २० राहते तीच पुढच्या महिन्याची तारीख समजावी. यावरून आपणांस ५ रजबला २० सप्टेंबर होता हेंही समजून येतें. आतां १७ मोहरम आर्बाआर्बैन व अलफ याची तिथि व इंग्रजी तारीख काढूं. आर्बा हा मुसलमानी तिसऱ्या महिन्यांत म्हणजे रबिलावलांत सुरू होतो. या महिन्यापासून मोहरम पुढें मोजूं लागलों तर तो दहावा महिना येतो. हें सहज काढतां यावें म्हणून जर प्रथम आंकड्यांत सुरुवातीच्या महिन्याचा क्रमांक वजा जात नसेल तर दुसऱ्या क्रमांकांतून वजा द्यावा म्हणजे महिने मोजीत बसण्याचा त्रास वांचतो. क्रमांक १३ यांतून ३ वजा दिले तर आपणांस मोहरम हा दहावा महिना असल्याचें समजतें. अर्थात् चवथ्या ओळींत दिलेला हिजरीसन येथें बदलला व तो १०५४ आला. मराठी महिना काढतांना ज्येष्ठापासूनचा दहावा महिना म्हणजे चैत्र येतो. परंतु या सुहुरसालांत चैत्र हा अधिक महिना असल्यानें व अधिकमास प्रथम येत असल्यानें दहावा मास अधिक चैत्र आला व त्याबरोबरच शक व संवत बदलला. तिसऱ्या कोष्टकांत अधिकमास मोजण्याची सोय नाहीं म्हणून गणितानें जो मराठी महिना येतो त्याचे पूर्वी जर अधिकमास येऊन जात असेल तर तो अधिक महिना प्रथम बाद देऊन नंतर मराठी महिना शोधावा. असो. वरील गणितावरून १७ मोहरमला १७+२=१९–१५ शुद्ध=४वद्य अधिक चैत्र शके १५६६ संवत् तारण येतो व दिवसांच्या पहिल्या उदाहरणांत दिलेल्या गणितानें १७ मार्च इ० सन १६४४ येतो. वरील रीतीच्या विरुद्ध क्रिया केली म्हणजे सुहुर व मुसलमानी महिना व तारीख काढतां येईल.

| अलफ | इहिदे | इसने | सलास | आर्बा |
|---|---|---|---|---|
| इ. स.१५९९चं.९ | १६००चं २० | १६०१चं. १ | १६०२चं. १२ | १६०३चं. २२ |
| शक १५२१ | १५२२अ.श्रा. | १५२३ | १५२४ | १५२५अ. आ. |
| संवत विकारी | शार्वरी | प्लव | शुभकृत | शोभन |
| हि.स.१००७म.११ | १००८म.११ | १००९म. १२ | १०१०म.१२ | १०११म. १२ |
| **अशर** | | | | |
| इ. स.१६०९चं२९* | १६१०चं.१० | १६११चं.२१ | १६१२चं. ३ | १६१३चं. १३ |
| शक १५३१ | १५३२ | १५३३अ. आ. | १५३४ | १५३५ |
| संवत सौम्य | साधारण | विरोधी | परिधावी | प्रमादी |
| हि.स १०१८म.३ | १०१९म.३ | १०२०म. ३ | १०२१म. ४ | १०२२म. ४ |
| **अशरीन** | | | | |
| इ. स.१६१९चं.१९ | १६२०चं. १ | १६२१चं.१२ | १६२२चं. २२ | १६२३चं. ४ |
| शक १५४१अ. श्रा. | १५४२ | १५४३ | १५४४अ. आ. | १५४५ |
| संवत सिद्धार्थी | रौद्र | दुर्मती | दुंदुभी | रुधिरोद्गारी |
| हि.स.१०२८म.६ | १०२९म.७ | १०३०म. ७ | १०३१म. ७ | १०३२म. ८ |
| **सलासीन** | | | | |
| इ. स.१६२९चं१० | १६३०चं.२१ | १६३१चं. २ | १६३२चं. १४ | १६३३चं२५* |
| शक १५५१ | १५५२अ.आ. | १५५३ | १५५४अ. वै. | १५५५* |
| संवत शुक्ल | प्रमोद | प्रजापती | अंगिरा | श्रीमुख |
| हि.स.१०३८म.१० | १०३९म.१० | १०४०म. ११ | १०४१म. ११ | १०४२म.११ |
| **आर्बैन** | | | | |
| इ. स.१६३९चं.२ | १६४०चं.१२ | १६४१चं. २३ | १६४२चं. ४ | १६४३चं. १५ |
| शक १५६१ | १५६२ | १५६३अ.ज्ये. | १'५६४ | १५६५अ. चै. |
| संवत प्रमाथी | विक्रम | वृष | चित्रभानु | सुभानु |
| हि.स.१०४९म.२ | १०५०म.२ | १०५१म. २ | १०५२ म.३ | १०५३म. ३ |
| **खमसैन** | | | | |
| इ. स.१६४९चं२१ | १६५०चं.३ | १६५१चं. १४ | १६५२चं२५* | १६५३चं. ६ |
| शक १५७१अ.आ. | १५७२ | १५७३अ. वै. | १५७४ * | १५७५ |
| संवत विरोधी | विकृती | खर | नंदन | विजय |
| हि.स १०५९म.५ | १०६०म.६ | १०६१म. ६ | १०६२म. ७ | १०६३म. ७ |
| **सितैन** | | | | |
| इ. स.१६५९चं.१२ | १६६०चं.२४ | १६६१चं. ५ | १६६२चं.१५ | १६६३चं२६* |
| शक १५८१ | १५८२अ.ज्येष्ठ | १५८३ | १५८४अ. चै. | १५८५* |
| संवत विकारी | शार्वरी | प्लव | शुभकृत | शोभन |
| हि स.१०६९म.९ | १०७०म. ९ | १०७१म. १० | १०७२ म.१० | १०७३म. ११ |

| | खमस | सीत | सबा | समान | तिसा |
|---|---|---|---|---|---|
| इ. स. | १६०४चं.४ | १६०५चं.१५ | १६०६चं२६* | १६०७चं.७ | १६०८चं.१९ |
| शक | १५२६ | १५२७अ.चैत्र | १५२८* | १५२९ | १५३०अ.मा. |
| संवत | क्रोधी | विश्वावसू | पराभव | प्लवंग | कीलक |
| हि. स. | १०१३म.१ | १०१४म.१ | १०१५म.२ | १०१६म.२ | १०१७म.२ |
| इ. स. | १६१४चं.२४ | १६१५चं.५ | १६१६चं.१७ | १६१७चं२८* | १६१८चं.९ |
| शक | १५३६अ.ज्ये. | १५३७ | १५३८अ.आ- | १५३९* | १५४० |
| संवत | आनंद | राक्षस | नल श्विन | पिंगल | कालयुक्त |
| हि. स. | १०२३म.४ | १०२४म.५ | १०२५म.५ | १०२६म.६ | १०२७म.६ |
| इ. स. | १६२४चं.१६ | १६२५चं२६* | १६२६चं.८ | १६२७चं.१८ | १६२८चं२९* |
| शक | १५४६अ.चैत्र | १५४७* | १५४८ | १५४९अ.श्रा. | १५५० |
| संवत | रक्ताक्षी | क्रोधन | क्षय | प्रभव | विभव |
| हि. स. | १०३३म.८ | १०३४म.९ | १०३५म.९ | १०३६म. ९ | १०३७म.१० |
| इ. स. | १६३४चं.६ | १६३५चं.१७ | १६३६चं२८* | १६३७चं.९ | १६३८चं.१९ |
| शक | १५५६ | १५५७अ.मा. | १५५८* | १५५९ | १५६०अ.श्रा. |
| संवत | भाव | युवा | धाता | ईश्वर | बहुधान्य |
| हि. स. | १०४३म.१२ | १०४४म.१२ | १०४६म.१ | १०४७म.१ | १०४८म.१ |
| इ. स. | १६४४चं२७* | १६४५चं.८ | १६४६चं.१८ | १६४७चं२८* | १६४८चं.१० |
| शक | १५६६* | १५६७ | १५६८अ.श्रा. | १५६९* | १५७० |
| संवत | तारण | पार्थिव | व्यय | सर्वजित | सर्वधारी |
| हि. स. | १०५४म.४ | १०५५म.४ | १०५६म.४ | १०५७म.५ | १०५८म.५ |
| इ. स. | १६५४चं.१७ | १६५५चं२८* | १६५६चं.९ | १६५७चं.२० | १६५८चं.१ |
| शक | १५७६अ.मा. | १५७७* | १५७८ | १५७९अ.श्रा. | १५८० |
| संवत | जय | मन्मथ | दुर्मुख | हेमलंबी | विलंबी |
| हि. स. | १०६४म.७ | १०६५म.८ | १०६६म.८ | १०६७म.८ | १०६८म.९ |
| इ. स. | १६६४चं.८ | १६६५चं.१८ | १६६६चं२९* | १६६७चं.१० | १६६८चं.२२ |
| शक | १५८६ | १५८७अ.श्रा. | १५८८ | १५८९ | १५९०अ.मा. |
| संवत | क्रोधी | विश्वावसू | पराभव | प्लवंग | कीलक |
| हि. स. | १०७४म.११ | १०७५म.११ | १०७६म.१२ | १०७७म.१२ | १०७८म.१२ |

| सबैन | इहिदे | इसन्ने | सलास | आर्बा |
|---|---|---|---|---|
| इ. स.१६६९चं.३ | १६७०चं.१४ | १६७१चं२४* | १६७२चं. ६ | १६७३चं. १७ |
| शक १५९१ | १५९२अ. वै. | १५९३ * | १५९४ | १५९५अ.भा. |
| संवत सौम्य | साधारण | विरोधीकृत | परिधावी | प्रमादी |
| हि.स.१०८०म.१ | १०८१म.१ | १०८२म. २ | १०८३म. २ | १०८४म. २ |
| **समानीन** | | | | |
| इ. स.१६७९चं.२३ | १६८०चं.५ | १६८१चं. १५ | १६८२चं२६* | १६८३चं. ९ |
| शक १६०१अ.ज्येष्ठ | १६०२ | ०३अ. आ.चै. | १६०४* | १६०५ |
| संवत सिद्धार्थी | रौद्र | दुर्मती क्षय चौ. | दुंदुभी | रुधिरोद्गारी |
| हि.स.१०९०म.४ | १०९१म. ५ | १०९२म. ५ | १०९३म.६ | १०९४म. ६ |
| **तिसैन** | | | | |
| इ. स.१६८९चं.१४ | १६९०चं२४* | १६९१चं. ५ | १६९२चं.१७ | १६९३चं२८* |
| शक १६११अ. वै. | १६१२ | १६१३ | १६१४अ. भा. | १६१५* |
| संवत शुक्ल | प्रमोद | प्रजापती | अंगिरा | श्रीमुख |
| हि.स.११००म. ८ | ११०१म.९ | ११०२म. ९ | ११०३म. ९ | ११०४म. १० |
| **मय्या** | | | | |
| इ. स.१६९९ चं. ४ | १७०० चं१५ | १७०१चं२६* | १७०२चं. ७ | १७०३चं.१८ |
| शक १६२१ | १६२२अ.आ- | १६२३ * | १६२४ | १६२५अ.श्रा. |
| संवत प्रमाथी | विक्रम [श्विन | वृष | चित्रभानू | सुभानु |
| हि.स.१११० म.१२ | १११९ म.१२ | १११३म. १ | १११४ म. १ | १११५म. १ |
| **अशर** | | | | |
| इ. स.१७०९चं.२४* | १७१० चं. ६ | १७११चं. १६ | १७१२चं२८* | १७१३चं.१० |
| शक १६३१* | १६३२ | १६३३अ. भा. | १६३४ * | १६३५ |
| संवत विरोधी | विकृती | खर | नंदन | विजय |
| हि.स.११२१ म. ४ | ११२२ म.४ | ११२३ म.४ | ११२४ म. ५ | ११२५ म. ५ |

| मुसलमानी महिना | मोहरम* | सफर | रबि–उल –अवल | रबि–उल –आखर | जमाद–उल –अवल | जमाद–उल –आखर |
|---|---|---|---|---|---|---|
| क्रमांक | १–१३ | २–१४ | ३–१५ | ४–१६ | ५–१७ | ६–१८ |

* हिजरी सन बदलतो.

| मराठी महिना | ज्येष्ठ | आषाढ | श्रावण | भाद्रपद | आश्वीन | कार्तिक |
|---|---|---|---|---|---|---|
| क्रमांक | ० | १ | २ | ३ | ४ | ५ |

टीपः— मध्यंतरीं जर अधिक मास येत असेल तर तो प्रथम बजा करावा.

| | खमस | सीत | सबा | समान | तिसा |
|---|---|---|---|---|---|
| इ. स. | १६७४चं.२७* | १६७५चं.८ | १६७६चं.२० | १६७७चं.१ | १६७८चं.१२ |
| शक | १५९६* | १५९७ | १५९८अ श्रा. | १५९९ | १६०० |
| संवत | आनंद | राक्षस | नल | पिंगल | कालयुक्त |
| हि. स. | १०८५म.३ | १०८६म.३ | १०८७म.३ | १०८८म.४ | १०८९म.४ |
| इ. स. | १६८४चं.१८ | १६८५चं२९* | १६८६चं.११ | १६८७चं.२२ | १६८८चं.४ |
| शक | १६०६अ.श्रा. | १६०७ | १६०८ | १६०९अ.आ. | १६१० |
| संवत | रक्ताक्षी | क्रोधन | क्षय | प्रभव | विभव |
| हि. स. | १०९५म.६ | १०९६म.७ | १०९७म.७ | १०९८म.७ | १०९९म.८ |
| इ. स. | १६९४चं.९ | १६९५चं.१० | १६९६चं.२ | १६९७चं.१३ | १६९८चं.२३ |
| शक | १६१६ | १६१७अ.आ. | १६१८ | १६१९ | १६२०अ.ज्ये. |
| संवत | भाव | युवा | धाता | ईश्वर | बहुधान्य |
| हि. स. | ११०५म.१० | ११०६म.१० | ११०७म.११ | ११०८म.११ | ११०९म.११ |
| इ. स. | १७०४चं३०* | १७०५चं.११ | १७०६चं.२२ | १७०७चं.३ | १७०८चं.१४ |
| शक | १६२६ | १६२७ | १६२८अ.आ. | १६२९ | १६३०अ.वै. |
| संवत | तारण | पार्थिव | व्यय | सर्वजित | सर्वधारी |
| हि. स. | १११६म.२ | १११७म.२ | १११८म.२ | १११९म. ३ | ११२०म. ३ |
| इ. स. | १७१४चं.२० | १७१५चं.१ | १७१६चं.१३ | १७१७चं.२३ | १७१८चं.४ |
| शक | १६३६अ.आ. | १६३७ | १६३८ | १६३९अ.ज्ये. | १६४० |
| संवत | जय | मन्मथ | दुर्मुख | हेमलंबी | विलंबी |
| हि. स. | ११२६म. ५ | ११२७म.६ | ११२८म.६ | ११२९म.६ | ११३०म.७ |

| रजब | साबान | रमजान | सव्वाल | जिल्काद | जिल्हेज | मुसलमानी महिना |
|---|---|---|---|---|---|---|
| ७–१९ | ८–२० | ९–२१ | १०–२२ | ११–२३ | १२–२४ | क्रमांक |

| मार्गशीर्ष | पौष | माघ | फाल्गुन | चैत्र* | वैशाख | मराठी महिना |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | क्रमांक |

* शक व संवत बदलतो.

कोष्टकांत जेथें जेथें* अशी खूण केली आहे तेथें तेथें मुरबातीचा जो मुसलमानी महिना दिलेला असतो त्याच्या पूर्वीच्या महिन्याची मुसलमानी तारीख असते, व शकापुढें केलेली खूण २४ मे वैशाखाच्या शेवटच्या आठवड्यांत आलेली दर्शविते. जसें:—सलास खमसैन व अलफ यांतील छ २५ हा मुसलमानी ७व्या म्हणजे रजबचा नसून जमादिलाखराचा आहे व वैशाखांत म्हणजे २५+२=२७−१५= वद्य १२ ला २४ मे आली असें समजावें. परंतु या खुणांचा उपयोग फक्त इंग्रजी तारीख काढण्यासाठींच व मुरबातीच्या पांच-सात दिवसांच्या गणितांत चूक होऊं नये म्हणूनच करावयाचा आहे.

## २४ सरकारी व खाजगी पत्रें

सर्व तऱ्हेच्या ऐतिहासिक साधनांत पत्रांना अव्वल दर्जा प्राप्त होतो. कोणत्याही प्रकारचें पत्र असेना, त्यांत लिहिणाराचा दुसऱ्याला कांहींतरी कळविण्याचा हेतु असतो. अर्थात् जी माहिती दुसऱ्याला सांगावयाची ती दुसऱ्याच्या अनुभवाप्रमाणें व वर्तमान-परिस्थितीच्या ज्ञानाप्रमाणें त्याला पटणारी अशीच असली पाहिजे. सामान्यतः लिहिणाराचा ज्या गोष्टीवर विश्वास बसतो किंवा त्याला जी विश्वासार्ह वाटते अशीच गोष्ट तो दुसऱ्याला कळवीत असतो. अशा कळविण्यांत दोघांचेही हितसंबंध असतात म्हणून त्याबद्दल चौकशी करणें, खरीखोटी तपासणें वगैरे क्रिया आपोआपच घडत असते. त्यामुळें पत्रांतील मजकुराला प्रत्यक्ष साक्षीदाराइतकें महत्त्व प्राप्त होतें. ज्या पत्राचें लेखन एका व्यक्तीपेक्षां अधिकांच्या संमतीनें होतें अशा पत्रांतील माहितींत चूक असण्याचा कमी संभव असतो. कारण माहिती देणारे एकापेक्षां अधिक साक्षीदार असून त्यांचें त्या माहितीच्या अरेषणाबद्दल एकमत असतें. परंतु पत्रांतिल माहिती समकालीन नसेल तर मात्र वरील नियम लागूं पडत नाहीं. अशा वेळीं त्या माहितीची तत्कालीन कोणती परंपरा रूढ होती इतकेंच समजतें.

पत्रांचे सामान्यतः तीन भाग पाडतां येतील. [१] राज्यकारभाराचीं सरकारी पत्रें, [२] व्यावहारिक सरकारी पत्रें व [३] खासगी पत्रें. राजकीय विषयक पत्रांत तहनामे, तह, करार, कायदे-कानु, खंडणीपत्रें, राज्यबंधारणेसाठीं अधिकाऱ्यांना वेळोवेळीं काढलेले हुकूम, निरनिराळ्या वेळीं राज्य-

संरक्षणासाठीं परमुलुखांतून आणलेलीं बातमीपत्रें, रोजनामे, निरनिराळ्या कारखान्यांच्या घटनेसाठीं व सुधारणेसाठीं फर्मावलेल्या याद्या, हीं व यासारख्या लेखांचा समावेश होतो. हीं साधनें म्हणजे प्रत्यक्ष तत्कालीन राजकीय इतिहासच असतात. परंतु मराठी उपलब्ध साधनांत या पहिल्या प्रकारच्या साधनांचा फारच थोडा भरणा आहे. कांहीं थोडीं राजवाडे-खंड ८ मध्यें छापलीं आहेत. इतरत्रही थोडींबहुत आहेत. परंतु त्यांत लहानसहान सरदारांना आपापल्या सरंजामानिशीं सरकारी कामावर रुजू होण्याबाबतचे हुकूमच विशेष आहेत. या हुकुमांवरून मोठ्या मुख्य राजकाजाचा तपशिलवार बोध होत नाहीं. अशा प्रकारचीं पेशवेकालीन पत्रें मात्र बरींच उपलब्ध झालीं आहेत व होतही आहेत. शिवकालीन साधनें उपलब्ध नाहींत, म्हणून दुसऱ्या प्रकारच्या म्हणजे राजकीय व्यावहारिक पत्रांवरच अधिक भिस्त ठेवावी लागत आहे. या प्रकारांत सनदा, रोखे, खुर्द-खत, वगैरे सरकारी अधिकाऱ्यांनीं प्रजेच्या अगर सरदार-नौकरांच्या संरक्षणाकरितां प्रजेवर अगर सरदार वगैरे व्यक्तिशः माणसांवर काढलेले मुलकी कारभाराचे हुकुम, अर्ज वगैरेंचा समावेश होतो. या पत्र-लेखनाचा मुख्य उद्देश म्हणजे व्यवहारांतील गोष्टींचा उलगडा करून सुरळीत चालविणें हा होय. त्यामुळें अशा पत्रांत व्यवहारास प्रथम स्थान दिलें जातें, व व्यवहारासाठीं जो कांहीं राजकीय कारभाराचा भाग येईल तो व्यवहार-पूर्ततेसाठीं घ्यावयाचा असल्यानें त्याला दुय्यम पुराव्याचें स्थान मिळतें. या साधनांत पहिल्या प्रकारच्या साधनांप्रमाणें प्रत्यक्ष पुरावा नसतो. यांत एवढेंच विशेष असतें कीं, अप्रत्यक्षपणें दिलेल्या पुराव्याला सरकारी अंमलदारांची संमति असते. मराठी उपलब्ध साधनांत याच साधनांचा विशेष भरणा आहे. तिसऱ्या प्रकारच्या साधनांत म्हणजे खाजगी पत्रांत राज्यकारभार, व्यवहार व घरगुती अशा तीनही प्रकारचा प्रत्यक्ष पुरावा सांपडतो. ह्या प्रकारच्या साधनांचें महत्त्व ज्या व्यक्तींमधील पत्रव्यवहार असेल त्या व्यक्तींच्या महत्त्वावर अवलंबून असतें. या तिसऱ्या प्रकारच्या साधनांत एकच गौणत्व असूं शकतें. आणि तें हें कीं, त्या पत्रांतील मजकुराचा खरेखोटेपणा त्या त्या व्यक्तीच्या प्रवृत्तीवर व त्याच्या मर्यादित अनुभव व ज्ञानावर अवलंबून राहतो. परंतु महत्त्वाच्या घराण्यांतील खाजगी पत्रव्यवहार फारसा उपलब्ध झालेला नाहीं.

राज्यकारभाराविषयक पत्रांत जो वर्तमान-स्थितीचा उल्लेख असतो तो त्या कालाच्या इतिहासास फार महत्त्वाचा असतो. कारण तो कारण अगर कार्य-रूपानें इतिहासांतील जागा पटकावितो. यांत लिहिणाराची मनोभूमिका हीच तत्कालीन राजकीय परिस्थितीचा बोध करून देत असते. त्यामुळें अशा पत्रांतील मजकुराची चिकित्सा करून खरेखोटेपणा शोधून काढण्याची जरूरच रहात नाहीं. मात्र या जातीच्या उपलब्ध पुराव्यांवरून नंतर परिणाम कोणते घडून आले व कांहीं फेरबदल घडून अगर घडवून आणले किंवा कसें यांचें शोधन करावें लागतें. परंतु दुसऱ्या प्रकारच्या पत्रांचें परीक्षण करणें जरूर होतें. सनदापत्रादि सरकारी व्यावहारिक पत्रांतील माहिती अधिक विश्वासार्ह मानावी लागते. कारण कीं, ही माहिती समकालीन व प्रत्यक्ष पाहिलेली अगर प्रत्यक्ष अनुभवावरून दिलेली असते. अशा पत्रांतील मजकूर जितका अधिक समकालीन व प्रत्यक्ष पाहून लिहिलेला असेल तितका तो अधिक प्रमाण मानावयास हरकत नसते. अशा पत्रांतील ऐतिहासिक प्रसंगाच्या तपशिलांतील बिनचुकपणा किंवा पूर्णतावस्था मात्र लिहिणाराच्या मनोभूमिकेवर व दर्जावर अवलंबून राहील. परंतु इतिहासास मुख्य गोष्ट जरूर असते ती म्हणजे ऐतिहासिक प्रसंगाच्या कालनिर्देशाची. ती यांत बिनचुक सांपडते. म्हणूनच ऐतिहासिक प्रसंगाच्या कालाचा निर्णय या समकालीन पत्रांच्या अगर साधनांच्या आधारानेंच विशेषेंकरून करणें भाग पडतें. बहुधा सरकारी हुकूम किंवा सनदापत्रें वगैरे गोतमुखें निवाडा करून किंवा अन्य तऱ्हेनें चौकशी करून दिले जात असत व हे हुकूमही राजाच्या इतर माहितगार कामदारांच्या तपासणीनें किंवा संमतीनें सुटत असत. म्हणून या पत्रांतील नमूद केलेली इतर असमकालीन माहितीही समकालीन योग्य पुराव्यांच्या अभावीं कमीअधिक प्रमाणानें ग्राह्य धरावी लागते. अस्सल सरकारी कागदपत्रांचें परीक्षण करितांना दोन महत्त्वाच्या गोष्टी लक्षांत ठेवल्या पाहिजेत. या सनदापत्रांतील समकालीन मजकूर जर प्रत्यक्ष पाहिलेला किंवा ऐकलेला असेल तर तो अव्वल दर्जाचा आहे असें मानण्यास हरकत नाहीं. परंतु जो मजकूर परंपरेनें आलेला असून त्याचा उपयोग केवळ लेखनपूर्ततेसाठीं केलेला असेल तर तो मात्र कालमानाप्रमाणें दुय्यम मानणें जरूरीचें असतें. त्या मजकुराची प्रामाण्यता त्या माणसास मिळालेल्या पुराव्यांवरून कमीअधिक ठरत असते.

मात्र अशा मजकुराच्या असत्यतेवरून किंवा अप्रामाण्यावरून त्या पत्रांतील सर्वच वर्तमान मजकूर असत्य अगर अग्राह्य मानणें सयुक्तिक होणार नाहीं. विशेषतः घरगुती पत्रें किंवा बिनसरकारी पत्रांत आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. ती म्हणजे लिहिणाऱ्याचा दर्जा व त्याचे लिहिण्याचे उद्दिष्ट हेतु ही होय. समजा, दोन घराण्यांत अगर व्यक्तींत तंटे आहेत. यांतील एकानें दुसऱ्याविरुद्ध लिहिलेला मजकूर जरी अगदीं प्रत्यक्ष साक्षीभूत म्हणून लिहिलेला असला तरी त्यांत नेहमीं मिथ्यावाद किंवा विपर्यास असणें अगदीं साहजिक असतें. अशावेळीं दुसरी बाजू प्रकाशित झाल्याखेरीज असल्या मजकुराचा उपयोग करणें फार धोक्याचें असतें. पत्रें अस्सल खरीं; परंतु तीं सहेतुक विपर्यास करून लिहिलेलीं असतात. म्हणून त्यांतील अशा प्रकारचा विपर्यस्त मजकूर पूर्ण परीक्षण केल्याशिवाय इतिहासाला आधारभूत मानतां येत नाहीं. कारण, तो खऱ्या परिस्थितीचा द्योतक असतो असें नाहीं. अशा पत्रांतील विपर्यस्त मजकूर गाळून टाकावा, म्हणजे शिलकी मजकूर अव्वल प्रकारचा उरेल.

सरदार स्वारीवर धाडले म्हणजे त्यांना मदत घेतांना निरनिराळ्या वेळीं व निरनिराळ्या ठिकाणीं कर्तृत्ववान् लोकांना सरंजाम वगैरे इनामें द्यावीं लागत. तसें केलें तरच ते त्या सरदारांना येऊन मिळत. अशा वेळीं पातशहाचीं फर्मानें आणवून त्या लोकांची समजूत घालण्यास कालावधीचा प्रश्न असे. त्यामुळें सरदार स्वारीवर धाडले म्हणजे पातशहा आपल्या शिक्कयाचे कोरे फर्मानांचे कागद त्यांचे हवालीं करीत व जशी वेळ पडे त्याप्रमाणें ते सरदार पादशहाच्या नांवानें फर्मानें देत. या फर्मानांना डौलाचीं पत्रें असें म्हणतात. मजकुरावरून हीं पत्रें बादशहाकडून शिक्का होऊन तितक्या अवधींत येणें शक्य नसल्याकारणानें त्यांतील पादशहाच्या शिक्कयाबद्दल संशय येतो. परंतु तसा संशय घेण्याचें कारण नसतें. अशा प्रकारचीं डौलाचीं पत्रें मोगल बादशहाचीं व आदिलशहाचीं बरींच निघत.

सनदापत्रांबद्दल मन साशंक करण्यास कित्येक वेळां महाराष्ट्रांतील तत्कालीन भाषावैचित्र्य कारणीभूत झालें आहे. फारसी खलिते मराठींत भाषांतरित करतांना किंवा मराठी फारसींत समजाविंतांना कित्येक वेळां "इंशील मजकूर धरून भाषेनें लिहिले जातात." अशा प्रसंगीं सरकारी पत्र जरी एखाद्या खास हवालदाराचें अगर सुभेदाराकडून लिहिलेलें असलें

तरी तें राजाचें अगर पादशहाचें आहे असें भासविलें जाण्यासाठीं त्याप्रमाणें भाषांतर केलें जातें. अशा लेखनपद्धतीमुळें या पत्रांतील हंशील मजकूर जरी कोणत्याही रीतीनें अगर विशिष्ट उद्देशानें खोटा लिहिला नसला तरी या पत्रांचें प्रामाण्य ठरविण्यासाठीं लावण्यांत येणाऱ्या कसोटीला हीं पत्रें उतरत नाहींत. त्यामुळें हीं पत्रें बनावट ठरलीं जातात. ताम्रपट बनावट केले जात व सनदाही क्वचित्प्रसंगीं बनावट केल्या जात. म्हणून या पत्रांनाही बनावट म्हणण्याचा प्रघात पडला आहे. किंबहुना कोणत्याही अपुऱ्या माहितीवर लिहिलेल्या जुन्या चिठोऱ्याला सरसहा 'बनावट' हें विशेषण देण्याचा प्रघातच पडला आहे. कोणतेंही पत्र बनावट ठरवितांना तें बनावट कां केलें व त्यांतील कोणता भाग बनावट असूं शकतो व विशेषतः व्यक्तीच्या नफ्यातोट्याचा भाग बनावट करितांना ऐतिहासिक सामान्य भाग बनावट असूं शकेल किंवा काय, तसेंच सनदापत्रांच्या सारखींच सामान्य इतर सरकारी पत्रें नफ्यातोट्याच्या दृष्टीनें 'बनावट' करणाराला महत्त्वाचीं असतात किंवा काय, याचा अवश्य विचार करावयास पाहिजे. आपल्या विधेयास पटलें तर मान्य व न पटल्यास त्याज्य, ही परंपरा स्वीकारून चालणार नाहीं. तसेंच प्रत्येक साधनांतून ऐतिहासिक महत्त्वाच्या प्रसंगाचा नेहमींच स्वतंत्रपणें बोध होतो असें नाहीं. किंबहुना असली आकांक्षाही बाळगण्याचें कारण नाहीं.

सरकारी पत्रांचे मसुदे तयार केले जात. खासगी पत्रांचेही मसुदे करण्याची व करून दप्तरीं ठेवण्याची चाल असे. कांहीं सरकारी पत्रें निरनिराळ्या कारखान्यांत बारही केलीं जात. पत्रांचे मसुदे हे अस्सल पत्रांइतकेच अव्वल प्रकारचा पुरावा देतात. क्वचित्प्रसंगीं मूळ पत्रांत घातलेले शोध किंवा अधिक मजकूर मसुद्यांत उतरला जात नाहीं. तसेंच मसुद्याप्रमाणें पत्र तयार झालें व रवाना होऊन इष्ट मनुष्याला मिळालें किंवा नाहीं, हें समजण्याला मार्ग नसतो. इतिहासकालीं टपालाची व्यवस्था आतांइतकी सुरक्षिततेची नव्हती आणि कित्येक वेळां जासुदाच्या अभावीं पत्रें रवाना होत नसत. पत्रांच्या मसुद्याप्रमाणें कित्येक पत्रांच्या नकला केलेल्या आढळतात. खासगी पत्रांच्या नकला करून ठेवण्याचें फारसें प्रयोजन नसे. तसेंच राज्यकारभार विषयक बऱ्याच पत्रांच्या नकला करण्याचें कारण पडत नसे. कारणपरत्वें अशा नकला करण्याचें कारण झालेंच तर तें समकालींच कारण पडे. त्यामुळें

असल्या पत्रांच्या नकला समकालींच व पत्र लिहिणारा अगर पत्र ज्याला लिहिलें तोच विशेषतः करी. तह, तहनामे वगैरे पत्रांच्या नकला मात्र व्यवहारविषयक सरकारी पत्रांप्रमाणेंच कारणपरत्वें व कालांतरानेंही केल्या जात. नकला दोन प्रकारच्या असतः [१] सहीशिक्क्याची व [२] खासगी. शिवकालीं 'नकल' या शब्दाऐवजीं तालिक हा शब्द रूढ होता. सर्व सनदा खुर्दखतें वगैरे पत्रांच्या बाबतींत कीं, ज्यांचा मजकूर अधिकाऱ्यांना समजणें जरूर असतो अशा पत्रांत 'तालिक लेहोन घेऊनु अस्सल भोगवटियास देणें' असा शेवटीं शेरा असे. त्यामुळें देशाधिकारी वगैरेजवळ ज्या तालिका असतील त्याही अस्सल साधनांइतक्याच महत्त्वाच्या मानण्यास हरकत नाहीं. तालिकांवर सहीशिक्का घेण्याचा प्रघात असावा. मात्र यांवर शिक्का होणें तो छत्रपतींचा होत नसे. मूळ सनदापत्रांवर मात्र छत्रपतींचा शिक्का होत असे. कंकांचे कागदांत 'तालिकेवर शिक्का होणे असे' असा शेरा असून दुसऱ्या तालिकांवरून शिक्काही झालेला आढळला.* त्या अर्थी तालिक लेहोन घेतल्यानंतर शिक्का घेतला जात असे असें मानण्यास हरकत दिसत नाहीं. अर्थात् अशा तालिका मुळाइतक्याच अव्वल मानण्यास हरकत नाहीं. कारण त्या समकालीं होत असून त्यांच्या बिनचुकतेबद्दल आपणांस पुरावा असतो. खासगी नकला मात्र केव्हां केल्या असतील याचा नेम नाहीं. ज्या वेळीं कारण पडे त्या वेळीं त्या केल्या जात. बहुधा या कालांतरानेंच केल्या जात व कांहीं विशिष्ट हेतूनें म्हणजे आपल्या दिवाणीदावे वगैरेंच्या पुराव्यासाठीं केल्या जात. अर्थात् अशा नकलांत गफलत होण्याचा संभव असतो. कालांतरानें नकला केल्या कारणानें वाचनाचेही दोष त्यांत शिरलेले असतात व लेखन-दोषही शिरतात. म्हणून असल्या नकलांचें परीक्षण बरेंच काळजीपूर्वक करणें भाग पडतें. परंतु कोणत्याही पत्रांच्या नकलेला अस्सल पत्रांइतकें प्रामाण्य देतां येत नाहीं. नकलेच्या वाचन व परीक्षणासंबंधीं पुढें विचार होणार असल्यानें येथें त्याबद्दल विस्तार करीत नाहीं.

## २५ जमाखर्च

अस्सल कागदपत्रांइतकेच जमाखर्चही अव्वल प्रकारचीं ऐतिहासिक

* भारत-इतिहास-संशोधक-मंडळ—संग्रह.

साधनें म्हणून मानलीं जातात. पुराव्याच्या दृष्टीनें तर जमाखर्चांनाच विशेष प्रामाण्य देतात. एकतर बिनचुकतेच्या दृष्टीनें जमाखर्च अधिक प्रमाण असतात व यांत कल्पनेचा किंवा हेतुप्रदर्शनाचा भाग नसतो. जी गोष्ट घडून गेली तिचाच उल्लेख करावयाचा असतो. जमाखर्च दोन प्रकारचे आहेत. [१] सरकारी व [२] खासगी. मागें दिलेल्या जाबत्यांवरून सरकारी जमाखर्च कोण कसे ठेवीत व ते सरकारांत कसे गुदरीत याची थोडीशी माहिती मिळालीच आहे. जमाखर्चाचें लेखन रोजबारीनें व्हावयाचें असल्यानें त्या जमाखर्चांत जे तपशील दिले जात ते अगदीं समकालीन व प्रत्यक्ष पुराव्यांच्याच आधारें दिले जात. शिवाय झाली ती गोष्ट नोंदतांना विशेष लक्ष पुरवावयाचें तें हिशेबाकडे पुरवावें लागे. एकादी गोष्ट अपमानकारक असेल तरती लिहूं नये वगैरे श्लेष त्यांचे मनांत येत नसत. विशेषतः प्रत्येक वेळचा सरंजाम वगैरेंचा तपशील फार बारकाईनें या जमाखर्चांवरून समजूं शकतो. मुक्काम व बारीकसारीक हालचालींचाही जमाखर्चाच्या कलमांवरून पत्ता लागतो. सामाजिक व आर्थिक इतिहासास तर या जमाखर्चाइतकें महत्त्वाचें व सविस्तर साधन नसतें.

प्रत्येक घराण्यांत व कारखान्यांत जमाखर्च ठेवीत असत. सांप्रत रूढ असलेली जमाखर्चाची देशी पद्धति व शिवशाहीकालीन पद्धति सारखीच आहे. परंतु तत्कालीन शब्दयोजनेची माहिती हवी असल्यास गुरु०राजवाडे यांनीं 'मेस्तक पुस्तक'* छापलें आहे तें अवश्य पहावें. परंतु खर्चाच्या रकमेपेक्षां खर्चाचे तपशीलच इतिहासास महत्त्वाचे असतात.

जमाखर्च मागाहून तयार करणें तेवढें सोपें नसतें. तसेंच जमाखर्चाच्या नकलाही करण्याची जरूरी नसते. म्हणून जमाखर्चाचे कागद बहुतेक अस्सलच असलेले आढळतात. शिवकालीन मराठी जमाखर्च अद्याप उपलब्ध झालेले नाहींत. उपलब्ध झाल्यास इतिहासांत बरीच भर पडूं शकेल यांत शंका नाहीं. जमाखर्चाचें लिहिणें संवत्सर-प्रतिपदेपासून सुरू करण्याची पूर्वापार वहिवाट आहे. जमाखर्च तिथि व मितिवार लिहिला जाई. यांत मुसलमानी तारखेचा उपयोग करीत नसत.

* भा. इ. सं. मंडळ—अहवाल—भाग १ला, शके १८३४, पृष्ठ २७-५६.

## २६ महजर, करीने, पुरशिसी वगैरे

महजर, करीने, तकरीरा, पुरशिसी, याद्या, व यासारखीं इतर साधनें न्याय मिळविण्याच्या अगर देण्याच्या उद्देशानें तयार केलेलीं असतात. म्हणून तीं दुय्यम प्रकारचीं मानलीं जातात. त्यांत प्रत्यक्ष पुरावा असतोच असें नाहीं. मात्र मजकूर साधार लिहिण्याची खबरदारी घेतलेली असते; हेंच या साधनांस महत्त्व प्राप्त करून देणारें मुख्य कारण आहे. यांतील मजकुराची कालमर्यादा कित्येक वर्षांची व केव्हां तर तपांची किंवा पिढ्यांचीही असूं शकते. या साधनांतून सामान्य इतिहासाला अव्वल दर्जाची पूर्ण व एकत्रित माहिती मिळत नाहीं ही गोष्ट खरी आहे. परंतु यांतून व्यक्तिशः घराण्यांनीं कोणत्या ऐतिहासिक प्रसंगांत किती भाग घेतला याचा अव्वल पुरावा गोळा करितां येतो. करीने तयार करितांना व्यक्तिशः घराण्यांनीं ज्या विशिष्ट जमिनीच्या मालकीबद्दल अगर वतनाबाबत किंवा इतर कांहीं हक्कांबद्दल कथला मांडलेला असतो त्या बाबींचा इतिहासाशीं फारसा संबंध नसतो म्हटलें तरी चालेल. म्हणून त्या बाबींच्या खरेखोटेपणाबद्दल न्यायनिवाडा करण्याची आपणांस जरुरी नसते. परंतु अशा निवाड्यासाठीं किंवा पंचाइतीसाठीं देण्यांत येणाऱ्या कागदांत त्या त्या घराण्यांतील कर्तृत्ववान् व्यक्तींच्या पराक्रमाचा व विशेषतः सरकार-कामाचा जो उल्लेख केलेला असतो तोच इतिहासास महत्त्वाचा असतो. असा मजकूर प्रत्यक्ष पाहिलेल्या अगर पाहून नमूद केलेल्या किंवा सरकारी पत्रांनीं मान्य झालेल्या साधनांवरून घेतलेला असतो. त्यामुळें आपणांला त्या त्या घराण्याच्या सरकारकामावरून ऐतिहासिक प्रसंगाचा किंवा त्यांतील कित्येक बाबींचा चांगलाच बोध होऊं शकतो. असा करीना सादर झाला कीं सरकारी कामदार किंवा गोतपंचायत बसून चौकशी करितात व पुन्हा तकरीरा व पुरशिसा लिहून घेतात. यामुळें करीन्यांत लिहिलेल्या वादाच्या मजकुराची छाननी होऊन तो सुधारला जाई. अशा रीतीनें गोतमुखें चर्चा झाली कीं गोत व हवालदार महजर करून वाद तोडीत. या महजरांत पुन्हा दोन्ही बाजूंचीं म्हणणीं नमूद होत व सादर केलेलीं कागदपत्रेंही नकल होत. अशा प्रकारें हीं साधनें बऱ्याच माहितगार व स्थानिक लोकांच्या तपासणींतून जावयाचीं असल्यानें फारच सावधगिरीनें व पुराव्यानिशीं लिहिलीं जात.

शकावल्या व याद्या ह्या वादाच्या साहित्यासाठीं माहिती मिळविण्याच्या उद्देशानें नकला करून अगर माहिती मिळवून तयार करीत. याद्या व टिपणें हीं तकरीरा अगर करीना लिहिण्याची पूर्वतयारी असे. कित्येक वेळां केवळ स्मरणार्थ म्हणूनही अद्भुतप्रसंगांचीं टिपणें करून ठेवलीं जात. पूर्वी टिपणें करण्याची वहिवाट किंवा आवड होती व या टिपणांसाठीं मुद्दाम माहितीही आणण्याचे प्रयत्न केल्याचे उल्लेख आढळतात. परंतु हीं टिपणें म्हणजे केवळ करीन्यासाठीं केलेल्या गोष्टी नसतील तर तीं फक्त ऐतिहासिक अत्यंत महत्त्वाच्या प्रसंगांचीं किंवा अद्भुत गोष्टींचीं अगर दैविक चमत्कारापुरतींच आढळतात. परंतु या सर्व साधनांत दोन विभाग पाडावे लागतात. पहिला ज्यांत नुसत्या शिवशाहीच्याच कालाचा उल्लेख असून ती शिवशाहींतच लिहिलेलीं असलेलीं व दुसरा जीं उत्तरकालीन असून त्यांत शिवशाहीच्या प्रसंगाचा उल्लेख केलेला असतो तीं. या उत्तरकालीन साधनांत बहुधा जुन्या कागदपत्रांच्या अगर टिपणांच्या अभावीं केवळ वंशपरंपरेनें अगर बखरी वगैरे-वरून उपलब्ध असलेली अगर ऐकींव माहिती घेण्यांत येते. अशा उत्तरकालीन तकरीरा, करीने, टिपणें व याद्या यांतील माहिती इतिहासांत वापरतांना थोडीशी सावधगिरी बाळगणें जरुरीचें असतें. जर अशा उत्तरकालीन साधनांत पूर्व-कालीन मजकूर खास पत्राची नक्कल देऊन दिलेला नसेल तर तो मजकूर बखरीप्रमाणेंच चतुर्थ प्रकारचा मानावा. त्याला अव्वल पुराव्यांची जोड मिळेपर्यंत अव्वल मानूं नये. शिवाय या साधनांत ऐतिहासिकदृष्ट्या एक वैगुण्य असतें आणि तें हें कीं, कोणत्याही प्रसंगाचा उल्लेख करितांना त्या प्रसंगाचा पूर्णपणें उल्लेख न करितां तो फक्त त्या घराण्यांतील व्यक्तीपुरताच मर्यादित व त्यांतील वर्णन प्रामुख्यानें त्या घराण्याकडेच विशेष कर्तृत्वाचा भाग देणारें असें असतें. कित्येक वेळां या मजकुरावरून वाचणारांचा गैरसमज होण्याचा संभव असतो. यांतील ऐतिहासिक प्रसंगांची माहिती संगतवार कालानुक्रमें दिलेली असते. परंतु यांतील सर्वच मजकूर कालनिर्देश करून दिलेला असतो असें नाहीं. कालनिर्देश केला असलाच तर तो बहुशः संवत्सरांनीं किंवा शकांनींच मर्यादित असतो. कोठें कोठें तुरळक तिथिमित्यांचाही उल्लेख सांपडतो. जेथें असे उल्लेख केलेले असतात तेथें ते त्या मजकुराच्या मुख्य भागाविषयींचे असतात. या साधनां-

तील प्रसंग जरी क्रमवार असतात तरी बरेच वेळां 'नंतर', 'मग', 'पुढें' वगैरे शब्दांनीं वर्षेंच्यावर्षें व्यापिलीं जातात. कित्येक घराण्यांत विवक्षित बाद पिढयान्‌पिढया चालतात व दरपिढींत करीना, तकरीर, पुरशिस, वगैरे देण्यांत येते. अशा करीन्यांत वगैरे एक विशेष लक्षांत येतो. तो म्हणजे हे करीने आधींच्या पिढीनें जसे सादर केलेले असतात तसेच नकला करून त्यांतील मजकूर थेट बाद सांगणाराच्या पिढीपर्यंत आणून पोहोंचविण्यासाठीं बाढविलेला असतो इतकेंच. आंतील मजकुराच्या लिखाणांत किंवा वाक्य-रचनेंतही क्वचित् ठिकाणींच फेरबदल केलेला आढळतो.

ज्या घराण्यांत ऐतिहासिक कागदसंग्रह सांपडतो त्या घराण्यांत महजर, करीना, पुरशीस, तकरीर वगैरेचें एकतरी भेंडोळें सांपडावयाचेंच. या भेंडोळ्या-वरून त्या घराण्यांत कोणत्या स्वरूपाचे व कोणत्या ऐतिहासिक प्रसंगांचें माहिती देणारे कागद सांपडूं शकतील याचा कयास बांधतां येतो. तकरीरा, करीने, पुरशीसी, हे कागद फक्त कथला सांगण्यापुरतेच तयार केले जात. ते सरकारी दप्तरांत प्रविष्ट केले जात नसत. त्यामुळें त्यांचे अस्सल मसुदे व नकला एकाच ठिकाणीं सांपडूं शकतात. सरकारांत गुजरलेली कैफियत मात्र सरकारदप्तरीं समाविष्ट केली जाई. तकरीर, करीने वगैरे कागदांत वर्णिलेलीं कागदपत्रें गोत महजर देतांना तपाशीत व ती दाखविण्यास किंवा आणून दाखविण्यास मुदतही देत. नंतर निवाडा किंवा महजर देत. महजराबर सर्व देसक व बलुते यांच्या सह्या किंवा साक्षी असत. ज्या मंडळींनीं महजर केला त्या मंडळींची प्रथम यांत यादी दिलेली असते. ही यादी देतांना प्रत्येक माणसाचा हुद्दा त्याचे नांवापुढें लिहिला जाई. सर्व पाटील वगैरे मराठमंडळींना मोकदम म्हणून लिहिलें जाई. जोशाच्या नांवाच्या व बापाच्या नांबापुढें 'भट' हें उपपद जोडण्यांत येई. बलुते वगैरेचींही नांवें लिहितांना हजर माणसांच्या व त्याच्या बापाच्या नांवापुढें जातिवाचक शब्द घातले जात. हजाम-न्हावी यास महाला, भाट यास ठाकूर, परीट यास वरठा, सुतार यास सुतार, कुंभार यास साळवी, गुरव यास दरणा, महार यास नाक, सोनार यास पोतदार, रामोशी यास नाइकवाडी व त्याचे व त्याच्या बापाच्या नावाला 'ई' हें एक उपपद जोडलें जाई, इ०. यांसारखीं स्वतंत्र जातिवाचक नांवें दिलीं जात. जसें, गोदूमहाला बिन राममहाला–कसबे कळंब इत्यादि.

महजर करण्यास बसलेल्या सर्वच मंडळींना लिहितां येत नसे. कांहीं आपल्या सह्या व शिक्के करीत. परंतु कांहींची निशाणी घातली जाई. या निशाणीचेही प्रकार निरनिराळे आहेत. ह्या निशाण्याही धंद्यारोजगाराप्रमाणेंच घातल्या जात. उदाहरणार्थः— मराठ्यांच्या निशाणींत मोकदमांचा नांगर व रावांची कट्यार अगर तरवार, सेठीयाची तागडी, हजामाचा आरसा, परिटाचें धोपटणें, मोगरी किंवा बडवणें, सुताराची वाकस किंवा किकर, कुंभाराचें चाक, गुरवाचें धुपाटणें, महाराची काठी, रामोशाचा नांगर, मांगाचा बिळा व दोर, चांभाराचा इंगा, इत्यादि. महजर लिहिणें तो बहुधा ज्या गांवीं महजर केला जातो तेथील कुलकर्णीच लिहीत असे. जर कागदपत्रांच्या आधारें निवाडा देतां येत नसेल तर दिव्य देऊन त्यांत जो खरा होई त्याचे बाजूचा निवाडा होत असे.

## २७ शकावल्या

शकावल्यांचा उपयोग महाराष्ट्राच्या इतिहासाला फार होणार आहे. कारण मूळ चरित्रें लिहिण्याची प्रवृत्ति अशीच आहे कीं, त्यांत तपशील असला व कालनिर्देश नसला तरी चालतो. त्यामुळें ऐतिहासिक साधनांतून कालनिर्देश फारसा आढळत नाहीं. म्हणून अशा माहितीला नियंत्रित करणारा हाच काय तो एक धागा साधनांत प्राप्त आहे. याच धाग्याने इतिहासाची स्वतंत्र रचना करतां येणें शक्य आहे. म्हणून शकावल्यांबद्दलची येथें स्वतंत्र व तपशिलवार चर्चा करणें प्राप्त आहे. ज्यांना हल्लीं आपण शकावल्या म्हणतों त्यांना क्वचित्प्रसंगीं शकसंवत्सरयुक्त याद्या अशीही संज्ञा दिलेली आढळते. या शकावल्या किंवा त्यांचीं तुरळक पानें जेथें कागदसंग्रह प्राप्त होतो तेथें मिळतातच. या सर्व शकावल्या मूळ एकाच प्रतीच्या नकला असाव्यात असें ज्या कांहीं थोड्या शकावल्या उपलब्ध झाल्या आहेत त्यांवरून वाटतें. या शकावल्यांच्या सूक्ष्म निरीक्षणानें या शकावल्यांत दोन तरी विभाग करावे लागतात. हे विभाग रचना-कालाचे द्योतक आहेत. पहिला विभाग शिवशाहीचा किंवा राजाराम अखेरपर्यंतचा व दुसरा शाहूपासूनचा. या दुसऱ्या विभागाखालीं येणाऱ्या शकावल्या बऱ्याच उपलब्ध आहेत. यांत जरी जगाच्या आरंभापासूनचा मजकूर ग्रथित केलेला असतो तरी तो फार तर पांच सहा

बंदांतच—कांहीं बखरींत दिलेल्याप्रमाणेंच—आटोपलेला असतो. यांत चारी युगांच्या राजांची संख्या व वर्षें यांची बेरीज असते. ही पौराणिक थाटाची असते. तसेंच यांत शिवाजीमहाराजांच्या महत्त्वाच्या तीस-चाळीस वर्षांच्या कारकीर्दींतील अधिकाधिक दहा-बारा प्रसंगांचाच उल्लेख असतो. शिवाय असले प्रसंगही क्वचितूच तिथि मासांनीं मर्यादित असतात. संभाजी व राजाराम यांच्या कारकीर्दींतील घडामोडींचा अवघ्या अर्ध्या बंदांतच समाचार घेतलेला असतो. म्हणजे फार तर तीन-चार संभाजीच्या व दहा-बारा नंतरच्या प्रसंगांचे उल्लेख असतात. अशा प्रकारें या दुसऱ्या विभागांत येणाऱ्या किंवा उत्तर-कालीन शकावल्यांत शाहूपूर्वीचा मजकूर अगदींच त्रोटक, तिथि-मासांच्या उल्लेखांखेरीज व पौराणिक-पद्धतीचा असा असतो. परंतु यांत जेथपासून ताराबाईची अगर शाहूची कारकीर्द चालू होते तेथपासूनची माहिती सविस्तर व तिथि-मित्यांनीं उल्लेखित अशी मिळते. प्रथम-विभागांत येणाऱ्या शकावल्या राजाराम अखेरपर्यंतच्या असतात. त्यांतही दुसऱ्या विभागांतील शकावल्यांप्रमाणें क्वचित् युगांची माहिती जोडलेली असते. परंतु यांची सुरुवात बहुधा औरंगजेबाच्या जन्मापासूनच झाल्याचें उपलब्ध प्रतींवरून दिसून येतें. यांत विशेषतः मराठ्यांच्याच कारकीर्दींचा उल्लेख केलेला असतो व तो मराठ्यांच्या बाजूचाच निदर्शक आहे. या शकावल्यांना हिंदवी राज्याची शकावली असेंही म्हणणें बरेंच सार्थ ठरेल. यांत शिवाजीच्या जावळीवरील स्वारीपासूनची सविस्तर हकीगत समजते. त्या पूर्वीची हकीगत फारच त्रोटक आहे. या शकावलीकाराचा उद्देश शिवशाहीचा किंवा फक्त महाराष्ट्रीय राजकीय घडामोडींचा उल्लेख करण्याचा असावा असें स्पष्ट दिसून येतें. शिवाजीच्या पूर्वीच्या पुणें-सुपें प्रांतांतील घडामोडी केवळ हिन्दवी राज्याकरितां नसल्यानें तितक्या त्या शकावलीकाराला महत्त्वाच्या वाटल्या नसाव्यात. सारांश, दादाजी कोंडदेव व शहाजी यांच्या अमदानीतील घडामोडींचा या शकावल्यांत मुळींच विस्तार नाहीं. जशा दुसऱ्या प्रकारच्या किंवा उत्तर-कालीन शकावल्या शाहू व पेशवे यांच्याच वर्णनात्मक असतात तशाच या प्रथम विभागांतील किंवा शिवशाहीच्या शकावल्या फक्त शिवाजी, संभाजी व राजाराम यांच्याच कारकीर्दींच्या आहेत. याप्रमाणें या शकावल्यांचें स्वरूप उपलब्ध शकावल्यांच्या नकलांवरून स्पष्ट दिसून येतें.

शिवशाहीच्या शकावलीच्या कांहीं थोड्याच नकला उपलब्ध आहेत. त्यांचा आरंभ व अंत कांहींचीं पानें गहाळ झाल्यामुळें नक्की सांगतां येणार नाहीं. ज्यांचा आरंभींचा भाग उपलब्ध आहे त्यांवरून शकावलीचा प्रारंभ औरंगजेबाच्या जन्मापासून करितात असें दिसतें. शिवापूरकर देशपांड्यांच्या वहींतील (फोर्ब्स-कलेक्शन-मुंबई) जी शकावली आहे तिचा व त्याच घराण्यांत आणखी एक तसेंच बाड मिळालें आहे तिचा प्रारंभ औरंगजेबाच्या जन्मापासूनच केला आहे. परंतु याचे मथळ्यावर "श्री" वगैरे कांहींएक नसून तत्पूर्वीच्या एक व त्यापूर्वीच्या मजकुराच्या शेवटचें अर्धें अर्शी पानें कोरीं सोडलीं असून हा पूर्वीचा मजकूर चारी युगांची माहिती राजे व कारकीर्दी यांच्या वर्षांच्या मोजदादीचीं आहेत. यावरून जुनी माहिती या शकावलीच्या प्रतीस जोडण्याचा प्रयत्न केला आहे एवढेंच ठरतें. म्हणजे शकावलीचा प्रारंभ जेधे व इतर शकावल्यांप्रमाणें औरंगजेबाच्या जन्मापासूनच होतो. कोणत्याच शकावलीचा शेवट असें सुचवीत नाहीं, कीं शकावली येथें पूर्ण झाली. कांहीं शकावल्यांत राज्याभिषेकापर्यंतचा मजकूर आहे, कांहींत राजाराम अखेरपर्यंतचा मजकूर आहे, तर कांहींत शाहूच्या आगमनापर्यंतचा तपशील आहे. शकावल्यांत दिलेली माहिती त्या त्या घराण्याच्या करीन्यांत तकरीरांत वगैरे घेतलेली असते. ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे करीना, तकरीर वगैरे कागदपत्र व शकावल्या यांचा अन्योन्य संबंध आहे असें स्पष्ट होतें. शकावलींतील राजकीय मजकुरांतील फक्त जरूर तितकाच नामनिर्देश करीन्यासारख्या कागदपत्रांत केलेला असतो. हीही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे शकावलीचा उपयोग करीना वगैरेसारख्या कागदपत्रांच्या तयारीला होत असतो व त्यामुळें असले कागदपत्र तयार करण्याची जरूर भासेल त्या वेळीं प्रथम शकावली व कुळकट शोधावी लागते. प्रत्येक घराणें आपली शकावली स्वतंत्र रचीत असेल असें म्हटलें तर कुळकटी स्वतंत्रपणें तयार करावयाची जरूरच पडणार नाहीं. उलट कुळकटीच्या पूर्ततेसाठीं शकावली मात्र मिळवावी लागत असली पाहिजे. प्रत्येक घराण्याच्या शकावलीची रचना स्वतंत्र असती तर त्यांत बरेचसे असंबंधित उल्लेख व बारीकसारीक टिपणें येण्याइतकी घराण्यांना स्वतंत्रपणें माहिती मिळणें फार दुर्घट दिसतें. कदाचित् या सर्व शकावल्या कुळकर्टीच्या याटाच्याच बनल्या असत्या. शिवाय

या शकावल्यांतील प्रसंग–एक राजवाडे शकावली सोडली तर–अगदीं एकाच सांच्यांतील असून शब्दयोजनेंतही भयंकर साम्य आहे. शब्दयोजना, प्रसंगांचा लेखनक्रम व माहितींतील न्यूनाधिक्याबद्दलचे दोष यांतील साम्य लक्षांत घेतलें कीं, या सर्व एकाच प्रतींच्या नकला असाव्यात असें अगदीं स्पष्ट होतें. राजवाडे-शकावलीच्या शेवटीं दिलेल्या टिपेवरून शकावलीपेक्षांही अधिक तिथीवार व संवत्सरयुक्त माहितीच्या टिपणीवर त्या लेखकाची योजना झाली असून त्यानें ती 'यादी' तयार केली हें स्पष्ट आहे. अर्थात् या यादीचें शकावल्यांशीं तितकें साम्य मिळणार नाहीं. परंतु त्यांतील कित्येक प्रसंग शकावलींतील विस्तारांचें त्रोटक पुनर्लेखन आहे ही गोष्ट कोणाच्याही लक्षांत आल्याशिवाय रहाणार नाहीं. आणि याच साम्यतेमुळें राजवाड्यांच्या यादीचा शकावलींत समावेश सहज होऊं शकतो. यावरून या शकावल्या स्वतंत्र नसून एकाच प्रतीच्या नकला आहेत असें स्पष्ट होत आहे. आतां अर्थात् दुसरा प्रश्न उत्पन्न होतो कीं, ही मूळ प्रत कोणातरी एका घराण्यांत एखाद्या व्यक्तीनें रचून तिचा सर्वत्र फैलाव झाला किंवा कसे ? ज्याअर्थीं शकावल्यांचा उपयोग संभाजी व राजाराम यांच्या कारकीर्दींतील करीन्यांतही किंवा इतर पत्रांतही केलेला आढळतो त्याअर्थीं मूळ शकावलीचा रचनाकाल विवक्षित महिन्यांनीं अगर वर्षांनीं दर्शवितां येत नाहीं. तसेंच ज्याप्रमाणें नकलांवरून ही कोणत्या घराण्यांतील नकल आहे हें त्यांत घातलेल्या त्या त्या घराण्यांच्या व्यक्तींच्या नामनिर्देशांवरून स्पष्ट होतें, तसें मूळ प्रत कोणातरी घराण्यांत तयार झाली असेल असें समजण्यास मुळींच धागा सांपडत नाहीं. उलट कोणाही घराण्याला इतक्या पिढ्यांची बारीकसारीक दरबारी बातमी सहज मिळूं शकेल हेंही संभवनीय दिसत नाहीं. विशेषतः मूळ शकावलींतील शिवाजी व भोंसले घराण्याच्या खासगी प्रसंगांच्या उल्लेखाचा विचार केला तर दोनच अनुमानांना जागा राहते. एकतर ही शकावली खास भोंसले घराण्यांनीं तयार केली असावी किंवा खास दरबारी दप्तरांतील हा एक भाग असावा. नकलकारांच्या घराण्यांचा उल्लेख सोडून दिला तर या शकावल्यांत फक्त भोंसले घराणें व दरबारी प्रसंग यांचेच उल्लेख आढळतात. यावरून ती अन्य घराण्यासाठीं अगर घराण्यांतील माहितीवर रचली आहे असें खात्रीनें म्हणतां येणार नाहीं. जर शकावली एखाद्या व्यक्तीनें रचली

असें म्हटलें तर त्यांतील कालमानाप्रमाणें दुबार रकान्यांतील प्रसंगांच्या विसंगत मांडणीचा उलगडा होत नाहीं. प्रसंगांचा अनुक्रम कालमानाप्रमाणें लावण्यास एवढ्या लहानशा गोष्टींत लेखकाला मोठेंसें कठीण नव्हतें. परंतु जो हा शकावलींतील लेखनाचा दोष आहे तोच आपणांला शकावली-रचनेचें कोडें सोडविण्यास उपयोगीं पडत आहे. या दोषांमुळेंच आपणांला असें स्पष्ट होत आहे कीं, लेखकाला प्रसंगांची माहिती जशी मिळाली तसतशी ती नोंदली गेली. यावरून शकावलीचा रचनाकाल मर्यादित नसून अमर्यादित आहे असें स्पष्ट होतें. अर्थात् हा रचनाकाल शकावलींतील कोणत्यातरी वर्षापासून सुरू होऊन शकावलीच्या अंताला अंत झाला असें मानावें लागतें. परंतु प्रथमारंभींचे जे उल्लेख आहेत त्यांतील माहिती अगदींच ठोकळमानानें दिलेली आहे. हीही गोष्ट विचारांत घेतली व इतक्या महत्त्वाच्या प्रसंगांचाही उल्लेख तिथिमासांत न करितां शकसंवत्सरांत केला आहे हेंही लक्षांत घेतलें तर या प्रसंगांचा रचनाकाल ह्या प्रसंगाच्या बारीक-सारीक तपशिलाचें साधारणतः विस्मरण होण्यास जितका अवधि लागेल तितक्या अवधीनंतरचा असावा असें मानणें भाग पडतें. शकावल्यांतील शके १५७५ किंवा सन १६५४च्या पूर्वीचे प्रसंग अगदींच तुरळक असून संवत्सरमर्यादित आहेत. यावरून शकावलीच्या मूळ प्रतीच्या रचनेस कैक्हांतरी शके १५७५ किंवा इ० सन १६५४ नंतर सुरवात झाली असावी. तेव्हां ह्या मूळ प्रतीच्या रचनेचा प्रारंभकाल इ० सन १६५५ नंतरचा धरला व ही शकावली भोंसले घराण्यांतील किंवा शिवदरबारांत तयार होऊं लागली असें मानलें तर प्रश्न असा उद्भवतो कीं, हा रचना-प्रारंभाचा काल कोणता व शकावली रचनेचा हेतु तरी कोणता असावा.

मुसलमानी रियासतीपासून तों थेट इंग्रजी-अमदानीपर्यंत सर्व आवक व जावक पत्रांची बारनिशी होत असे. त्याचप्रमाणें रोजच्या खर्चाचा आढावा घेणें हीही चाल चालूच होती. मुसलमानी अमदानींत तवारिखांवरून आत्मचरित्रवजा रोजनिशी अगर पातशहाच्या कारकीर्दीतील महत्त्वाच्या हकीगतींचीं टिपणें वेळचेवेळीं मिळवून स्वतंत्र नोंद करून ठेवण्याची वहिवाट त्या वेळीं चांगली रूढ होती. पूर्वी शहाजीमहाराजांच्या अमदानींतही तिचा स्वीकार केला गेला असावा; परंतु तसें मानण्यास आज कांहीं साधन

उपलब्ध नाहीं. मात्र ही पद्धति इतर राज्यव्यवस्थेप्रमाणें शिवाजीनें आपली राज्यव्यवस्था मुक्रर केली त्या वेळीं उचलली यांत शंका नाहीं. अर्थात् राजा या नात्यानें आपल्या राज्यांतील जमीन-महसूल वगैरे बाबींची व्यवस्था करणें जसें जरूरीचें होतें, तसेंच निरनिराळ्या भागांतील राजकीय उलथापालथीचें टिपण करून तदनुरोधें मुलुखाचा व नवीन राजकारणाचा बंदोबस्त लावणें तितकेंच महत्त्वाचें होतें. तेव्हां अशीं टिपणें करून ठेवण्याची पद्धति चालू करणें शिवाजीला आपली राज्याची मांडणी होतांच इष्ट वाटल्यामुळें आज आपण जिला शकावली म्हणून म्हणत आहोंत त्या राजकीय घडामोडीच्या कीर्दीस सुरुवात झाली. अर्थात् अशा टिपणांचा हेतु फक्त कारकीर्दीचा आढावा मिळावा इतकाच असावा व रचनाकालास प्रारंभही इ० सन १६६२ च्या नंतरचा असावा. कारण याच सुमारास शिवाजीची अन्तर्गत राज्यव्यवस्था कायम झाली. प्रारंभकाल जरी विवक्षित-कालापासूनचा धरला तरी अशीं टिपणें मराठी राज्याच्या अंन्तापर्यंत चालावयास पाहिजे होतीं. परंतु मराठी राज्यावर जें संभाजीच्या मृत्यूनंतर किंवा मृत्यूमुळें गंडांतर आलें त्यामुळें मराठी राज्याचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे एकमेकांपासून दोन तुकडे अलिप्त पडले. राजारामाचे कारकीर्दींत जी शिवशाहीची वाताहत झाली त्यांत बरेंचसें सरकारी दप्तर नाहींसें झालें व जें कांहीं पन्हाळा व चंदीचंदावरावर जोपासलें तेंही नंतर नाहींसें झालें. शाहूच्या आगमन-प्रसंगीं जी दुफळी झाली त्यांतही राहिल्या-साहिल्याची वाट लागली. तसेंच शिवकालीन जुनीं घराणींही औरंगजेबांनीं जो महाराष्ट्रावर वरवंटा फिरविला त्यांत साफ रसातळास गेलीं. त्यामुळें कागदपत्रांतील धागा अजीबात तुटला. शाहूच्या नूतन कारकीर्दी-बरोबर नवीन दप्तर सुरू झालें. या नूतन अमदानींत जुन्या कागदपत्रांची अगर राजकीय जमाखर्चाची जरूर भासणें जरी साहजिक असलें तरी मराठी राज्याची त्या वेळीं पुन्हा स्थापनाच झाल्यानें तेवढी निकड वाटण्याचें फारसें कारण राहिलें नव्हतें. अशा कागदपत्रांच्या अभावीं केवळ गोताच्या सांगण्यावर भरंवसा ठेवून नूतन सनदाही देण्यांत आलेल्या आपल्या पाहण्यांत आहेत. त्यावरून व शाहूच्या दप्तरीं शिवकालीन कर्त्या माणसांची माहितीही देण्याइतके, व ते कोण व कोणत्या हुद्द्यावर होते हेंही समजण्याइतके कागदपत्र शाहू व प्रतापसिंहाच्या-काळीं सातारा-दप्तरांत नव्हते. इतकेंच नव्हे तर खुद्द

चिटणिसांना सनद 'लोकांनीं तसेंच होतें म्हणून सांगितलें' याबरून दिलेली आहे. त्या सनदेंत कागदपत्रांचा उल्लेख नाहीं. मोरोपंताचे घराण्यांतील नंतरचें दप्तरही तारगांवांस केव्हांच जाळून फस्त केलें होतें. ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे सरकारी दप्तरखाना शिवकालीन घराण्यांबरोबरच मराठी राज्याला अंतरला हें सिद्ध होत आहे. मात्र संभाजीचे काळीं भांडण भांडणारांनीं या शकावलीच्या नकला घेतल्या व त्याचप्रमाणें राजाराम-काळींही कांहींकांनीं नकला केल्या त्यामुळें या शकावलीची प्राप्ति होत आहे. शाहूकालीन नूतन राज्यबंधारणेंतही राजकीय घडामोडींच्या कीर्दीची वहिवाट चालू करणें इष्ट होतें; परंतु तिची पूर्तता मागील जमाखर्चानें करणें तितकें सोपें, शक्य व जरूरीचें नव्हतें. या कारणानें ही कीर्द शाहूकालापासून नवीनच चालू होऊन ती पेशवाई-अखेरपर्यंत बिन-हरकत चालू राहिली यांत शंका नाहीं. अशा रीतीनें या मराठी राज्याच्या राजकीय घडामोडींच्या दोन कीर्दी स्वतंत्रपणें महाराष्ट्रांत अस्तित्वांत आल्या. वास्तविक दोन्हीही एकच, परंतु त्या उपरिनिर्दिष्ट कारणानें दोन स्वतंत्र झाल्या. याचें खरें कारण म्हणजे सरकारी दप्तरखाना हा खास राजाच्या मालकीचा म्हणून मानला जात नसून तो ज्या व्यक्तीकडे कारभार आला त्याच्याच घरीं रहात असे हें होय. यावरून शिवशाही-शकावलीच्या रचनेची समाप्ति शाहूच्या आगमनापर्यंतची धरली तर लेखनाचा अंतकालही तोच मानावा लागेल. शकावलीरचनेचा हेतूही लक्षांत घेतला तर शकावलीची रचना महाराजांच्या वांकोनिविसाकडून होण्याचा अधिक संभव दिसतो.

या शकावलीचा प्रसार कसा व कां झाला याचा जर थोडासा विचार केला तर या शकावलीच्या नकलांचा लेखनकालही ठरविणें फारसें कठीण जाणार नाहीं. शिवकालीं नूतन राज्यारंभ झाल्यानें गोताच्या साक्षीनें गांवा-शिवांचे खटले तोडतांना ज्या राजकार्यावरून अगर स्वामिकार्यावरून न्याय मिळविण्याची अपेक्षा करावयाची तीं सर्व राजकार्यें किंवा स्वामिकार्यें केवळ एकच पिढीच्या कालाला मर्यादित असल्यानें अशा प्रकारची माहिती मिळविण्यासाठीं अन्य साधनांची मदत घेणें जरूर नव्हतें. तसेंच राज्य-संस्थापनेंत हजीर तो वजीर किंवा काम मग दाम हाच न्याय चालू राहणें शक्य असल्यामुळें परंपरेच्या हक्काची तक्रार सांगण्यांत फारसें हंशील नव्हतें.

मुलुखांतही तेवढी स्थिरस्थावर नव्हती. परंतु शिवाजी महाराजांनीं सिंहासनावर चढून राज्याभिषेक करून घेतांच हा काल बदलला. आपले हक्क किंवा अधिक पारितोषिकें मिळण्याची प्रत्येकाला आशा लागली. शिवाजीच्या मृत्यूनंतर व विशेषतः औरंगजेबाच्या स्वारीनें महाराष्ट्रांत कित्येक भागांत पुन्हा अनिश्चित परिस्थिति भासूं लागली. सोयराबाई व अनाजीपंताच्या कारस्थानामुळें कित्येक शिवकालीन घराण्यांत तेढ उत्पन्न झाली व अनेक खटलीं उपस्थित झालीं. त्या वेळीं न्यायाचा कांटा आपलेकडे झुकवून घेण्याकरितां आपल्या घराण्यांतील पुरुषांनीं शिवशाहीस केलेल्या मदतीची व शौर्यपूर्ण स्वामिकार्याची जंत्री देणें जरूर पडे. अर्थात् आपल्या तर्फेचे तकरीरा करीन्यादि कागद तयार करितांना आपल्या घराण्याची त्या कागदपत्रांत नोंद करण्यासाठीं त्यांना राजकीय घडामोडींची माहिती बिनचूक मिळविणें इष्ट असे; व अशी माहिती बिनचूक मिळविण्यास केव्हांही मुसलमानी राज्यांतील तवारिखांप्रमाणें कांहींतरी योजना दरबारीं असणें साहजिक असे. म्हणून ते उपरिनिर्दिष्ट राजकीय घडामोडींच्या खतावणीकडे धांव घेत. अर्थात् ज्या कालीं अशी माहिती गोळा करावी लागे त्या कालापर्यंतचीच नक्कल ते करून घेत व आपली आजची ह्या घराण्यांतील शकावली तेथेंच विराम पावे. अर्थात् या विरामावरून आपल्याला त्या शकावलीच्या नकलेच्या लेखनकालाचा निर्णय करितां येतो. प्रथम प्रथम जरी मूळ कीर्दीवरून नकल करून घेण्याचा प्रयत्न झाला असला तरी नंतर नकलेवरून नकला होणें साहजिक आहे. यावरून या शकावल्यांची जोपासना कोणत्या हेतूनें व सहेतुक कशी झाली हें लक्षात येईल. यानंतर शिवकालीन पुरुषांच्या पराक्रमावर दौलतीचे खटले सांगणारीं घराणीं अगदींच बिरळ राहिल्यानें या कीर्दींच्या दोन्हीही तुकड्यांची सांधणी झालीच असल्यास क्वचित् प्रसंगीं झालीही असेल; परंतु दोन्हीही तुकड्यांची सांधणी करणारीं घराणीं सांपडणें जरी शक्य असलें तरी अशी पूर्ण शकावली प्राप्त होण्याची आशा मात्र फारच अल्प आहे. कारण पेशवेकालीन सर्व कागदपत्रांत दिलेली शिवकालीन माहिती इतकी त्रोटक आहे कीं, त्यावरून त्यांना शिवकालीन कागदपत्रें मुळींच उपलब्ध नव्हतीं असें स्पष्ट दिसतें. त्यांचा सर्व भर ऐकीव माहितीवर आहे. अर्थात् उत्तरकालीन शकावल्यांचीही पूर्तता करण्यास अशाच

माहितीचा उपयोग झाल्यानें त्यांतील पूर्वकालीन मजकूर विसंगत व चुकीचा आढळतो. अशा तऱ्हेनें या दोन प्रकारच्या कीर्दी अस्तित्वांत येऊन आजच्या शकावल्यांचा प्रसार झाला व नकलांवरून नकलाही तयार करण्यांत आल्या. भाऊबंदकीचे खटले जसजसे वाढूं लागले तसतसा या शकावल्यांचा प्रसार प्रत्येक घराण्यांत अधिकाधिक होऊं लागला. आतां वर केलेल्या स्पष्टीकरणाप्रमाणें या राजकीय घडामोडींच्या जमाखर्चाच्या नोंदी अगदीं तत्कालींच झाल्यानें या शकावलींतील माहितीला ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्व प्राप्त झालें आहे.

शकावल्यांच्या नोंदींत कशा व कोणत्या प्रकारच्या चुका अगर लेखनदोष आढळणें साहजिक आहे व असल्या शकावल्यांतील माहिती इतिहासांत घेतांना तिचें परीक्षण करण्यास कोणत्या कसोटीस उतरून घेणें जरूर पडेल त्याचा विचार करूं. मूळ प्रतीच्या अभावीं तकरीरा अगर करीने तयार करण्याकरितां केलेल्या नकलांचा नंतर विचार करूं. प्रथम मूळ कीर्दलेखनाचाच विचार करूं. सरकारांत माहिती पुरविणाऱ्या माणसांच्या मनांत विकल्प नसला व ती लिहितांना मुख्य बाबीबद्दलची माहिती जरी अगदीं बिनचूक असली तरीही एखाद्या आनुषंगिक बारीकसारीक बाबतींतील काल अगर किरकोळ भागांविषयीं अप्रत्यक्ष रीतीनें मिळविलेल्या माहितींत गैरसमजुतीचा प्रकार शिरणें साहजिक असतें. परंतु असले प्रसंग क्वचितच आढळतात. कारण विशेषतः शकावलींतील टिपणें अगदीं ठळकठळक बाबींचींच असतात. माहिती कळविणाऱ्या अगर ती संकलित लिहून ठेवणाऱ्या माणसांकडून नांवांतील वर्णन्यासांत वगैरे हस्तदोष अगर इतर शब्दलोप अगर मुसलमानी वगैरे नांवांबद्दलच्या अज्ञानामुळें त्या नांवांतील वर्णन्यासांत कांहीं दोष या शकावल्यांत शिरकले आहेत. तसेंच एखाद्या सरदाराचें अगर राजाचें नांव देणें वगैरे तें टोपणनांवांनें देणें वगैरेही दोष दृष्टीस पडतात. परंतु हे दोष कोणत्याही कालीं घडणारे व सामान्य असतात. अर्थात् अशा प्रकारचे दोष दृष्टीस पडल्यानें या कीर्दींची बिनचुकपणाची योग्यता मात्र कमी होत नाहीं. हें जरी खरें असलें, तरी संशोधकानें असल्या चुका सुधारून शुद्ध प्रतच तयार केली पाहिजे. मूळ प्रतींत किंवा असल्या कीर्दींच्या लेखनांत आणखी एक चूक रहाण्याचा

संभव असतो; ती चूक म्हणजे एखाद्या शकाच्यानंतर त्या शकांतील मजकूर लिहून आल्यास व असल्या मजकुराचा कालनिर्देश नंतर 'एका महिन्यानें' वगैरेसारख्या मोघम शब्दांत लिहून आला असला व हें टांचण तितकें नीट काळजीपूर्वक उतरून न घेतलें गेलें तर ती नोंद दुसऱ्या अगर नंतरच्या शकांत जाणें साहजिक असतें. तसेंच कोणताही शोध देणें तो जर एखाद्या अक्षराला गिरवूनच दिला असला तर वाचनांत दुर्बोधता आणणें किंवा शोध घातला असतांही त्या शोधाची नक्की जागा दाखविणारें काकपद न लिहिणें असलेही बारीकसारीक दोष मूळ कीर्दींत राहणें शक्य आहे. अर्थातच असल्या दोषांमुळें त्यावरून नक्कल करणाराची समजूत न पटल्यामुळें ते दोष अधिकच विपर्यस्त झालेले आहेत. वर ज्या दोषावलीचा निर्देश केला ती मूळ कीर्दींतील आहे असा म्हणण्याचा मुळींच आशय नाहीं व मूळ प्रत पहावयास मिळाल्याशिवाय असें विधान करणें चुकीचें होईल. परंतु उपरिनिर्दिष्ट विवेचन करण्याचें कारण इतकेंच कीं, त्यायोगें एकच चूक सर्व अगर बऱ्याच नकलांत कां दृष्टीस पडते याचा उलगडा करितां येतो. या प्रकारें शकावलींत सामान्यतेनें आढळणारे गुणदोष कसोटी लावून कसे सुधारावयाचे याचें स्पष्टीकरण झाल्यानंतर प्रत्येक व्यक्तिशः नकलेंत किंवा नकलेवरून केलेल्या नकलेंत कोणत्या रीतीनें चुका घडून येतात व शोधानंतर त्या कोणत्या मार्गानीं सुधारतां येतात किंवा येणें शक्य असतें याचा विचार करूं. नकलकारांचे हस्तदोष दोन प्रकारचे आहेत. मोडी लिपीचें वाचन चुकीचें केल्यामुळें किंवा दिलेल्या नोंदींचा मूळ अर्थ न समजल्यामुळें अर्थविपर्यासानें एखादें अक्षर अगर शब्द बदलण्यानें दोष घडून येतात; व दुसरें, लिहितांना सहज अजाणतेपणीं हस्तदोषानें एखादा शब्द, वाक्य अगर ओळ गाळण्यानें अगर एखाद्या शब्दाबद्दल नजरचुकीनें चुकीचा शब्द लिहिण्यानें दोष घडून येतात. कित्येक आधुनिक नकलकारांनीं जुनी भाषा काढून टाकण्याचा प्रयत्न केल्यामुळें असल्या नोंदींत बराच अर्थविपर्यास होऊन मजकूर लिहिलेला आढळतो. परंतु असल्या दोषांबद्दल येथें लिहिण्याचें प्रयोजन नाहीं. असल्या नकलांना नवीन सुधारलेली आवृत्ति म्हणूं व या बाबीचा ऊहापोह करण्याचें येथेंच सोडून देऊं. सारांश, वर सांगितल्याप्रमाणें दोन्ही प्रकारच्या घडून येणाऱ्या चुकांचें शुद्धीकरण आपणाला आंतील अनुमानिक अगर तदवलंबी मजकुरा-

वरून करितां येण्यासारखें असतें. 'ब' 'द्' 'ह्' 'ला' 'क' 'ल' 'व' इत्यादि समवळणी अक्षरवाचनाच्या चुका संदर्भावरून तेव्हांच शुद्ध करितां येतात. अक्षर, शब्द अगर सबंध ओळ अगर वाक्य गळलें असेल तर तें दुसऱ्या नकलेवरून भरून काढतां येतें. तिथि, वार, पक्ष, मास, शक व संवत्सर यांतील हस्तदोष गणिताच्या साहाय्यानें दूर करितां येतात. एकाद्या शकांतील प्रथम अगर शेवटचें कलम नजरचुकीनें पूर्वीच्या अगर नंतरच्या शकांत घुसडलें गेलें असेल तर त्या नोंदीचा शक मागें अगर पुढें होतो तो गणिताच्या प्रमाणानें अगर प्रत्यंतर पुरावा पाहून सुधारतां येतो. या चुका विशेषतः एखाद्या शकाच्या शेवटच्या पौष-फाल्गुनादि एकदोन महिन्यांतील नोंदी प्रथम येऊन त्यानंतर प्रथमचे चैत्रवैशाखादि महिने आले असले तर होतात. नकल करितांना हे या शकाचे शेवटचे महिने पूर्वील शकांतील असें समजून लेखन केलें जातें; किंवा एखाद्या शकाचे चैत्रादि प्रथम महिने शेवटीं आले असले म्हणजे या प्रथम महिन्याच्या नोंदीनंतरच्या शकाखालीं घालण्याचा नकलकारांना मोह पडतो. वस्तुतः मूळ नोंदींचा क्रम माहितीच्या पोहोंचेवर अवलंबून असतो. मुसलमानी व युरोपिअन नांवांतील चुका इतर पुराव्यांवरून दुरुस्त कराव्या लागतात. अशा प्रकारें नकलांतून वगैरे जसे लेखनदोष दृष्टीस पडतात तसेच विसाव्या शतकांतील माणसांस घोंटाळ्यांत घालणारे कांहीं विशेष सोळा सतराव्या शतकांतील लेखनांत पहावयास सांपडतात. ह्या लेखनपद्धतींतील कांहीं प्रकार पुढें देतों. एखाद्या बाबीची नोंद करितांना जेव्हां तदनुषंगिक परंतु तत्पूर्वी घडलेल्या एका अगर अधिक बाबींची नोंद करावयाची असते तेव्हां ती 'ऊन' प्रत्ययांत धातुरूपें योजून नंतर या बाबीपुढें मुख्य बाब दिलेली असते. परंतु या सर्व बाबी एकाच कार्याच्या भागमात्र असतात. अर्थात् ज्या तिथीपुढें अशी माहिती दिलेली असते तींतील मुख्य बाबीचा त्या तिथीशीं संबंध धरावयाचा असतो, व 'ऊन' प्रत्ययान्त धातुरूपानें दर्शित केलेल्या बाबी तत्पूर्वी घडल्या असें समजावयाचें. नोंद करतांना ज्या वेळीं दोन अगर अधिक बाबी स्वतंत्र परंतु एकमेकांशीं संबंधित असून एकाच तिथीला अगर मितीला घडल्या असें दाखवावयाचें असतें, तेव्हां 'ते समईं', 'तेव्हां' यांसारखीं क्रियाविशेषणें योजून संबोधीत; परंतु स्वतंत्र बाबी दर्शविल्या जातात. जर एखाद्या

गोष्टींचें विवेचन करितांना नंतर घडलेल्या तत्कार्यासंबंधींही बाबी सांगणें जरूर किंवा इष्ट वाटल्यास 'मग', 'नंतर', 'उपरी' इत्यादि शब्दांचा उपयोग केला जातो. अर्थात् ज्या तिथीला ही नोंद केलेली असते त्या तिथीशीं मुख्य बाबीचा संबंध असून 'मग', 'नंतर' वगैरे पुढें येणारीं कलमें त्या तिथीनंतरचीं आहेत असें समजावें. एकाच तिथि अगर मितीपुढें येणाऱ्या स्वतंत्र बाबींची नोंद करतांना या बाबींतील स्वतंत्रपणा दर्शविण्यासाठीं या बाबतींतील प्रत्येकीपुढें '१' हा आंकडा घातलेला असतो. एखाद्या मुख्य बाबीची फोड करतांना जर तत्पूर्वी घडलेल्या गोष्टी अनुसंधानवाचक अगर कारणात्मक म्हणून लिहिणें जरूर असल्यास हीं कारणात्मक किंवा अनुसंधानवाचक वाक्यें एकापुढें एक परंतु पूर्ण क्रियापदांनीं युक्त अशा अगदीं स्वतंत्र वाक्यांचा उपयोग करून कोणत्याही कारणात्मक अव्ययाची योजना न करितां एकापुढें एक संगतवार लिहिलेलीं असतात. अशा वेळीं अनुसंधानवाचक सर्व वाक्यांनीं दर्शविलेल्या स्वतंत्र बाबींची कालमर्यादा भिन्न असून मुख्य बाबीच्या तिथीच्या बरीच पूर्वीची असते. अर्थात् दिलेल्या तिथीचा अगर मितीचा संबंध मुख्य बाबीकडे घ्यावयाचा असतो. तसेंच एखाद्या नकलेंत चूक अगर द्विरुक्ति असेल तर या नकलेवरून दुसरी नकल करून घेतांना नकलकार ती न सुधारतां तशीच घेऊन तिच्यापुढें तो 'रुजू' हा शब्द लिहितो.

जेधे-शकावली, शिवापूर दप्तरांतील यादी, शिवापुरकर देशपांडे वहींतील शकावली, गदाधर प्रल्हाद शकावली, घोडेगांवकर वहींतील शकावली आणि सहा कलमी शकावली, अशा शकावल्या शिवचरित्र-प्रदीपांत छापल्या आहेत. त्यांतील घोडेगांवकर व सहा कलमी शकावल्या ह्या शकावल्या नसून टिपणें आहेत. जेधे-शकावली भा० इ० मंडळाच्या चतुर्थ अहवालांत प्रथम छापली होती. तिचें इंग्रजी भाषांतर प्रो० सरकार यांनीं त्रिशत-सांवत्सराच्या सोव्हिनरमध्यें छापलें आहे. त्यांत मूळ मराठीचें तत्कालीन प्रघाताप्रमाणें वाचन न केल्यामुळें चुका राहिल्या आहेत. प्रो० सरकार यांनीं या शकावल्यांवर एक लेख लिहून इंडियन हिस्टॉरिकल रेकॉर्ड्स कमिशनपुढें वाचला आहे. त्यांतही त्यांनीं उपलब्ध पुराव्यांचा व शकावल्यांचा उपयोग केलेला दिसत नाहीं. वरील प्रसिद्ध शकावल्यांशिवाय फोर्बस कलेक्शनमधील शकावली, जाधवांची शकावली व कै० पांडोबा पटवर्धन यांनीं मिळविलेली शकावलीही अगदीं

जेधे-शकावलीशीं जुळती होती. आणखीही शकावलीच्या पुष्कळ नकला मिळूं शकतील. या शकावल्यांचे लेखन तिथीवार केलेलें नसतें. प्रत्येक शकाखालीं दिलेल्या मासाच्या संगतींतही अनुक्रम नसतो. त्यामुळें या शकावल्यांचा उपयोग इतिहासांत जितका सहजपणें करितां यावा तितका तो करितां येत नाहीं. म्हणून या सर्व शकावल्या मिळवून व नीट तपासून त्यांतील सर्व नोंदी एकत्र जुळवून टीपांसह व इंग्रजी तारखांसह छापणें जरूर आहे. याप्रमाणें एक शकावली तयार केली असून त्यांतील प्रत्येक प्रसंगाला अस्सल कागदपत्रांच्या साह्याच्यानें टीपा देण्याचें काम जवळ जवळ पूर्ण होत आलें आहे. शकावल्यांना अशा टीपा देतांना मात्र या शकावल्यांच्या प्रामाण्याबद्दल पक्की खात्री पटूं लागते. सकृद्दर्शनीं ज्या चुका वाटतात त्या फक्त आपल्याच वाचनाचे दोष असल्याचें स्पष्ट दिसून येतें.

## २८ कुळकटी, वंशवेली, बाडें, इ०

प्रत्येक घराण्यांत वंशवृक्ष तयार केलेला असतोच. इतिहास-प्रसिद्ध घराण्यांतून कुळकटी म्हणजे कुलेतिहासाचीं टिपणें करून ठेवलेलीं आढळतात. कुळकटी व वंशावल्या फक्त कुलेतिहास रचण्याच्या व क्वचित् प्रसंगीं अशा माहितीचा घरगुती कथल्यांत उपयोग करण्याच्या उद्देशानें लिहिल्या जातात. यांतील हकीकत घराण्यापुरतीच मर्यादित असते. त्यांत कर्तृत्ववान् पूर्वजांनीं काय केलें हेंच सांगितलेलें असतें. या कुळकटींत किंवा वंशवेलींत पिढी दर पिढीला भर पडत जाऊन यांत अगदीं हयात पिढीपर्यंतची हकीगत लिहून ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. यांतील कांहीं माहिती अगदीं अस्सल कागदपत्रांवरून अगर अव्वल पुराव्यांवरून घेतली जाते. परंतु त्यांतील बराच भाग कुलांतील परंपरेच्या माहितीवरूनच दिला जातो. वंशवेलींतून फारशी घालमेल होण्याचा संभव नसतो. कधीं कधीं शाखा तोडल्या जातात इतकेंच. कित्येक वंशवेलीचा क्रम डावीकडून उजवीकडे लिहिण्याचा असतो. परंतु शिवकालीं बऱ्याच वंशवेली उजवीकडून डावीकडेसच लिहिलेल्या आढळतात. विशेषतः हा क्रम मावळी भागांत व देशावरचा आहे. वंशवेलींतील नांवें तींच तींच येत राहिल्यानें क्वचित् प्रसंगीं नकल करतांना मधलाच भाग सुटून गेलेला असतो. मोठमोठ्या नामांकित घराण्यांच्या वंशावलींना अगदीं ब्रह्मधापासून सुरुवात

झालेली आढळते. यांतील नांबांचा पहिला क्रम पुराणांवरून घेतलेला असतो. वंशवेलींतून प्रत्येक व्यक्तीची किंवा त्यांतील मुख्य व कर्तृत्ववान् व्यक्तीचीही जन्म अगर मृत्यु तारीख देण्यांत येत नसे. कित्येक वेळां या वंशवेली बऱ्याच अपूर्ण असतात. यांतील सहा-सात पिढ्यांची हकीगत बहुधा बरोबर असते. परंतु त्या पूर्वीची हकीगत जर मागील विश्वासार्ह टिपणावरून घेतली गेली नसेल तर बरींच नांवें सुटलीं जातात व त्यामुळें बऱ्याच पिढ्या तुटतात. धार्मिक बाबतींत गत पिढ्यांची माहिती असणें जरूर असल्यानें ह्या वंशावळी सर्वत्र जोपासल्या जात. हल्लीं परिस्थिति बदलली असल्यानें वंशवेलीचा लेखनपरिपाठ सुटून गेला आहे.

कुळकटी वंशवेलीप्रमाणें प्रत्येक घराण्यांत तयार करीत नसत. तसें करण्याची जरूरही नसे. घराणें इतिहासप्रसिद्ध असेल तर घराण्यांत कुळकट तयार करण्यांत येई. अशी कुळकट तयार करितांना परंपरेची व दप्तरांत असलेली सर्व माहिती जमेला धरली जाई. यांत प्रत्येकानें राजकार्य अगर विशिष्ट कार्य काय साधलें, तें केव्हां व कसें केलें वगैरे हकीगत दिली जाई. परंतु प्रसंगवर्णन करतांना कालनिर्देश करण्याची त्यांना जरूर भासत नसावी असें दिसतें. कागदपत्रें हातीं असतांनासुद्धां अशा कुळकटींत कालनिर्देश न केल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. क्वचित्प्रसंगीं कालनिर्देश केला गेलाच तर तो तीर्थयात्रेचा अगर जन्ममृत्यूचा. म्हणून कुळकटी व बखरी प्रामाण्याच्या दृष्टीनें जवळ जवळ एकाच दर्जात येतात. कुळकटी एकाच घराण्याला मर्यादित असतात व त्यांचें लिखाण त्याच घराण्यांत व परंपरेच्या माहितीवर केलेलें असल्यामुळें त्यांत फारशी सरभेसळ होण्याचा संभव नसतो व त्यांस कागदपत्रांतील माहितीही उपलब्ध असण्याचा संभव असतो, म्हणून या कुळकटींना बखरींपेक्षां अधिक प्रमाण मानाव्या लागतात. या कुळकटींत त्या घराण्यांतील निरनिराळ्या पातीबद्दलचा मजकूर मात्र कमीअधिक प्रकारानें सरसनीरस रचला जातो. परंतु इतिहासांतील रचनेला या मजकुरापासून फारसा बाध येण्याचें कारण नसतें. कुळकटींचें लेखन बरेच वेळां राजाच्या अगर एखाद्या सरदाराच्या कानावर हकीकत घालण्याच्या उद्देशानें केलेलें असावेंसें दिसतें. केवळ कुलाची कथा लिहून ठेवणें इतकाच काय तो अशा लेखनांत हेतु नसतो.

इतिहासकालीं छापण्याची कला प्रसृत नसल्यामुळें मोठमोठे किंवा चांगले ग्रंथ जसे नकल करून संग्रहांत ठेवीत त्याचप्रमाणें महत्त्वाच्या प्रसंगांचीं टिपणें वगैरे करण्याचाही परिपाठ असे. अशा टिपणांचीं बाडें संग्रहांत ठेवलीं जात. या बाडांत जगाच्या आदिपासून तो तहत चालू राजकीर्दीपर्यंत देवादिक, राजे, पादशहा यांच्या याद्या व त्यांच्या कारकीर्दीची कालगणति, कांहीं निवडक ऐतिहासिक व अद्भुत प्रसंगांच्या तिथ्या, शक-सन-पद्धतींचीं टिपणें, लेखनपद्धति वगैरेंची कांहीं माहिती, किंवा औषधी अगर मंत्रतंत्रांची माहिती यांसारख्या टिपणांचा समावेश होत असे. शकावल्या, पत्रांच्या नकला, वगैरेही मुद्दाम माहिती आणवून लिहून ठेवीत. परंतु अशीं बाडें सर्वत्रच आढळतात असें नाहीं. हा एक प्रकारचा व्यासंग किंवा शोक असे.

वरील सर्व साधनांतील माहिती तृतीय दर्जाची होय. हीं सर्व साधनें प्रत्येकजण आपापल्या उपयोगासाठीं करीत असल्यानें त्यांतील खरेखोटेपणा लिहिणाराच्या एकट्याच्याच साक्षीवर अवलंबून राहतो. त्याच्या लिहिण्यांतील चुका दूर करण्याचें अगर त्याचें लिहिणें तपासून दुरुस्त करण्याचा फारसा प्रसंग येत नाहीं. विशेषतः जें लिहिलें जातें त्याला आधार दिलेला नसतो. त्यामुळें अशा माहितीवर सर्वस्वी अवलंबून तिचा इतिहासरचनेस उपयोग करणें तितकें सुरक्षित नसतें. शिवाय या साधनांचा नक्की लेखनकाल कोणता हेंही सांगणें मोठें कठीण जातें. कारण त्या साधनांत पिढी दरपिढीस भरच पडत असते.

## २९ बखरी

बखरी म्हणजे चरित्रग्रंथ. या बखरींबद्दल गुरु० राजवाडे यांनीं चवथ्या खंडांत परीक्षणात्मक सविस्तर टीका लिहिलीच आहे. शिवचरित्र-प्रदीप व शिव-भारत या दोन्हीही ग्रंथांतून बखरींतील मित्यांतील विसंगतपणाचा बराच ऊहापोह केला आहे. इतरत्रही वर्तमानपत्री वादाच्या भरांत या बखरींचें भ्रामक प्रामाण्य दाखविण्याच्या प्रयत्नांना उत्तरात्मक टीकाही प्रसिद्ध झाली आहे. त्यावरून बखरींतील प्रसंगांचा अनुक्रम कालानुरोधें साधलेला नाहीं, लेखनांत बराच विसंगतपणा व तपशिलांत अवास्तवपणा व पौराणिक अतिशयोक्ति शिरल्याचें वगैरे स्पष्ट झालें आहे.

बखरींचें लेखन विशेषतः उत्तर-कालीं झालें आहे. यांत फक्त परंपरेनें आलेली माहिती ग्रथित करण्याचा प्रयत्न झाला आहे. अशा माहितीच्या परंपरा अनेक असून त्यांतील जी लेखकाला योग्य वाटली तिचाच त्यानें स्वीकार केला आहे. बाकीच्यांचा त्यानें परामर्ष घेण्याचा प्रयत्न केला नाहीं. कोणाही बखरकाराला अस्सल कागदपत्रांचा संग्रह पहावयास मिळाल्याचें मुळींच दिसून येत नाहीं. क्वचित् प्रसंगीं खासगत–सरकारी नव्हे–एखादें पत्र उपलब्ध झालें असलें तरी त्याचा उपयोग परंपरेच्या माहितीपुढें करण्याचें धाडस त्या कालच्या लेखकाला नसणें साहजिक होतें. त्यांनीं परंपरेनें आलेल्या माहितीलाच विशेष प्राधान्य दिलेलें आहे. क्वचित् ठिकाणीं कांहीं घराण्यांतील कर्तृत्ववान् व्यक्तींची माहिती असल्या तुटपुंज्या कागदाच्या आधारानें बखरींत देण्याचा मात्र प्रयत्न केलेला दिसतो. बखरींतील संविधानकाला विशेष स्वारस्य व जिवंतपणा आणण्यासाठीं जशी स्वरचित व काल्पनिक संभाषणें घालण्याचा त्या वेळीं परिपाठ असे, त्याचप्रमाणें या बखरकारांनीं पत्रेंही रचून व या बखरींत घालून संविधानकाला स्वारस्य आणण्याचा सुंदर प्रयत्न केला आहे. संस्कृत ग्रंथांतूनही अशीं पत्रें देण्याचा त्या वेळीं परिपाठ होता, तोच प्रकार मराठी बखरकारांनीं उचलणें अगदीं साहजिक आहे. परंतु कित्येक वेळां हीं पत्रें खरीं असें समजून या पत्रांच्या संख्येवरून बखरींचें प्रामाण्य ठरविण्याचा प्रयत्न करण्यांत येतो; परंतु असें करणें तत्कालीन वस्तुस्थितीचें अज्ञान दर्शवितें. विशेषतः पत्रें रचून घालण्याचा प्रकार ज्या वेळीं ग्रंथ विशेष मोठा करण्याइतकी सवड होती त्या वेळींच होणें शक्य आहे. परंतु मूळ संविधानकांतील प्रसंगाचा कालक्रम न समजल्यामुळें पत्र रचून घालतांना ज्या प्रसंगाचें पत्र रचून घालावयाचें तो प्रसंग ज्याच्या नांवाचें पत्र लिहावयाचें त्याच्या हयातींत घडला किंवा न घडला हें नक्की न समजल्यामुळें अशीं पत्रें हयात नसलेल्या माणसाच्या नांवांनींही लिहिलेलीं आढळतात. सारांश, कोणतेंही पत्र पहा; त्यांत अचुक असा भाग सांपडेल कीं, त्यावरून तें पत्र मागाहून बनवून घातलें आहे असें स्पष्ट दिसेल. सारांश, बखरींचें लेखन वर्तमानकालांतील चिकित्सापूर्ण बुद्धीनें केलें जात नसे. उलट कयेकरी व पुराणिकसांप्रदायांची महाराष्ट्रावर जी तत्कालीं छाप बसली होती तिचा मात्र या चरित्रलेखनावर पूर्ण परिणाम झाला

असल्याचें दिसून येतें. बखरींतील विवेचनपद्धति पौराणिक स्वरूपाची राहिल्यानें त्यांत अशक्य कोटींतील अद्भुत गोष्टी व विचित्र विधानें घुसडलीं गेलीं. बखरींत पद्धतशीर व संगतवार मजकुराचा अभाव रहाण्यास आणखी एक कारण झालें आहे. पेशवेउत्तरकालीं या बखरींचा उपयोग अक्षरवळणाकडे विशेष केल्यानें उपलब्ध होणाऱ्या बखरींच्या नकला जितक्या बिनचूक व्हावयास पाहिजे होत्या तितक्या त्या झाल्या नाहींत. बखरींतील जे कांहीं कालनिर्देश आढळतात ते बहुधा अद्भुत अशा वाटणाऱ्या प्रसंगांचे किंवा जन्ममृत्यूंचे. परंतु अद्भुत माणसांचे जन्मही विशेषच दिवसाला झाले पाहिजेत हीही कल्पना रूढ असल्यानें नक्की तिथि माहिती नसल्यास अक्षयतृतीया, रामनवमी, कृष्णाष्टमी, अशा अवतारी पुरुषांच्या जन्मतिथीच देण्यांत येत. म्हणून बखरींतील जे थोडे कालनिर्देश असतात ते चुकीचे ठरतात. तसेंच एखादी तिथि दिली व त्यानंतरची शेवटची मृत्युतिथि माहीत असली म्हणजे मधील संविधानकाला बेरीजवजाबाकीनें कालमर्यादा दिली जाते. जेव्हां अशी ताळेबंद कालमर्यादा देण्यांत येते तेव्हां या ताळेबंदीचा प्रथम व शेवटच्या तिथीचा पुरावा म्हणून केव्हांच सांगतां येणार नाहीं. कारण, मधली ताळेबंदी लेखकांनीं बसविलेली असते. ती स्वतंत्र पुराव्यावरून दिलेली नसते. सारांश, बखरींचें लेखन जितकें शास्त्रशुद्ध व साधार व्हावयास पाहिजे होतें तितकें तें झालेलें नाहीं. म्हणून या बखरींना प्रामाण्याच्या दृष्टीनें चतुर्थ म्हणजे शेवटच्या दर्जात टाकणें भाग आहे.

शिवशाहीचा इतिहास सांगणाऱ्या दहाबारा बखरी उपलब्ध झाल्या आहेत. त्यांतील मुख्य मुख्य बखरींचीं नांवें व रचनाकाल पुढें देत आहें.

| | |
|---|---|
| सभासदी बखर | इ. सन १६९७ |
| चित्रगुप्त बखर ( सभासदीचा अनुवाद ) | इ. सन १७५९ |
| रायरी बखर<br>एक्याण्णव कलमी बखर<br>नव्वद किंवा शाहाण्णव कलमी बखर<br>तारीख-इ-शिवाजी | सर्व एकच<br>इ. सन १७०२ |
| चिटणिशी बखर—शिवाजी किंवा सप्तप्रकर्णात्मक चरित्र | इ. सन १८१० |

| | |
|---|---|
| चिटणिशी बखर–संभाजी | इ. सन १८१० |
| चिटणिशी बखर–राजाराम | इ. सन १८१० |
| मराठी साम्राज्याची छोटी बखर | इ. सन १८१७ |
| शिवदिग्विजय | इ. सन १८१८ |
| शिवाजीप्रताप | इ. सन १८२९ |
| शेडगांवकर बखर | इ. सन १८५४ |
| बुंदेल्याची बखर | इ. सन १९१८ |

वरील बखरींतील सभासदी, चिटणिशी व कलमी बखरी बऱ्या आहेत. छोटी बखर माहितीपूर्ण आहे. परंतु शेडगांवकर बखर व शिवदिग्विजय अगदींच टाकाऊ असून बनावट भारुडांनीं भरलेल्या आहेत.

कोणत्याही बखरीची मूळ प्रत मिळाली तरच तिच्यांतील वैगुण्य लेखकाच्या माथीं मारतां येतें. चिटणिशी बखरींखेरीज कोणत्याही बखरीची मूळ प्रत उपलब्ध झालेली नाहीं. इतकेंच नव्हे तर सभासदी व कलमी बखरींखेरीज इतर बखरींच्या एकापेक्षां अधिक नकलाही ताडून पहाण्यास अद्याप मिळालेल्या नाहींत. सभासदी बखरीच्या तीन-चार प्रती रा० ब० साने यांनीं तपासून त्यांतील स्पष्ट व चांगल्या प्रतीचाच स्वीकार केला आहे. त्यानंतर माझ्याही पाहण्यांत दोन तीन नकला आल्या. शिवाय रा० य. रा. गुप्ते यांनींही एक सभासदीची प्रत मिळविली आहे. त्या सर्वांच्या परीक्षणावरून असें स्पष्ट होत आहे कीं, या नकलांतून मूळ प्रतीच्या लेखनानुक्रमांतही बराच फेरबदल केलेला आहे. कित्येक प्रसंगांतील मजकूर अधिक वाटतो व तो देण्याचा क्रमही निराळा असलेला आढळतो. खरें म्हटलें तर सभासदीच्या लेखनकालीं प्रसंगांच्या क्रमाबद्दल विस्मृति होण्याइतका काल लोटून गेला नव्हता. परंतु उपलब्ध प्रतींतील क्रम मात्र कालाच्या दृष्टीनें चुकीचा आहे यांत शंका नाहीं. परंतु या निरनिराळ्या प्रतींचें परीक्षण करितांना हा क्रम सुधारतां येतो. त्याअर्थीं असें अनुमान काढण्यास हरकत दिसत नाहीं कीं, कदाचित् मूळ प्रतीची नकल जितकी बिनचूक व्हावी तितकी झालेली नसून आतां ज्या प्रती उपलब्ध होत आहेत त्या तितक्या विश्वसनीय नाहींत. मूळ प्रतीच्या अभावीं बऱ्याच नकला मिळवून त्यावरून मूळ पाठ शोधून काढण्याचा प्रयत्न करणें एवढाच काय तो मार्ग राहिला आहे.

असें झाल्यास ही सभासदी बखर तत्कालीन परिस्थितीची बरीच विश्वसनीय माहिती देऊं शकेल यांत शंका नाहीं. चित्रगुप्ती बखर हा सभासदीचा अनुवाद असून तोही अर्ध्या शतकानंतरचा आहे. यावरूनही मूळ सभासदीचा क्रम त्या वेळीं जो चित्रगुप्ताला उपलब्ध होता तो राहिला नसल्याचें कांहीं ठिकाणीं स्पष्ट होत आहे. रायरी बखर, एक्याण्णव व शाहाण्णव कलमी बखरी व तरीख-इ-शिवाजी ह्या एकाच बखरीच्या नकला आहेत. नकलेंत मात्र थोडेबहुत फेरबदल आढळतात; परंतु ते फारच क्षुल्लक आहेत. ह्या बखरींतील लेखनक्रम पुष्कळ अंशीं युक्त आहे. मात्र दोन तीन ठिकाणीं क्रम सुटला आहे. परंतु ही चूक नकलकाराची आहे किंवा मूळ प्रतींतील आहे हा प्रश्नच आहे. चिटणिशी बखरींतील माहिती परंपरेच्या माहितीवरून दिलेली असून बरीच अधिक आहे. परंतु बखरींच्या लेखनकालीं परंपरेच्या माहितींत बराच विपर्यास वगैरे येण्याइतका कालही लोटला होता व निरनिराळे प्रसंगही घडून गेले होते. मराठी साम्राज्याच्या छोट्या बखरींत बरीच माहिती मिळविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. शिवदिग्विजयांत इतर बखरींना माहिती असलेले कित्येक प्रसंग दिलेले नसून कांहीं गोष्टींचा पाल्हाळ लाविला असून बखरीची मांडणी अगदींच कथेकरी थाटाची आहे. लिहिण्यांत पोंच फारच थोडा आहे. शिवाजीप्रताप ही बखर उत्तरकालीन असल्यानें त्यांत पूर्वीच्या बखरींपेक्षां सुसंगतपणा असणें शक्य नव्हतें. शेडगांवकर बखर लिहिणारा मनुष्य अगदींच अडाणी दिसतो. त्याला आपण काय लिहितों हेंच समजत नाहीं. कांहींतरी कोणतें तरी बाड त्याच्या हातीं लागलें व त्याला जसें लिहितां आलें तसें तो लिहीत गेला. ही बखर अगदींच टाकाऊ आहे. कारण लेखकाला आपण काय लिहितों हें जाणण्याइतका तो सुबुद्ध नाहीं. बुंदेल्याच्या बखरींत मराठ्यांचा उल्लेख आला आहे इतकेंच. ती बखर लिहिण्याचा मुख्य उद्देश मराठ्यांचा इतिहास देण्याचा नाहीं. अर्थात् यांतील माहिती ऐकीव आहे व बरीच चुकीचीही आहे.

शिवाजीमहाराजांच्या इतिहासांत बखरकारांची गडबड उडण्याचीं मुख्यतः कारणें झालीं तीं—

[१] शिवाजीमहाराजांनंतर लागलीच चरित्रलेखनास सुरुवात करतां येण्याइतकी स्थिरता नव्हती.

[२] शिवाजीमहाराजांच्या वेळचीं दप्तरें व घराणीं यांचा नाश झाला होता.

[३] शिवाजीच्या हालचाली अत्यंत शीघ्रतेनें झाल्या.

[४] एकाच ठिकाणीं एकाच स्वरूपाचे एकापेक्षां अधिक प्रसंग घडल्यामुळें कहींनीं तपशिलांत अदलाबदल केली. कांहींनीं ते सर्व एकच असें समजून चरित्ररचना केली.

[५] शिवाजीनें लढाऊ हालचाली एकापेक्षां अधिक जागीं व शत्रूंशीं एकाच वेळीं चालू ठेविल्यानें एका बाजूच्या लढाईनंतर दुसऱ्या बाजूची लढाई वर्णन करण्याच्या क्रमांत कालनिर्देश न करतां आल्यामुळें प्रसंगांच्या तपशिलांचा घोंटाळा उडाला.

[६] कोणते सरदार कोठें होते हें नक्की माहीत नसतांना केवळ सरदारांच्या यादीवरून दर वेळीं यादी देण्यांत आली. मुसलमानी सरदारांचीं अधिकारपरत्वें एकच नांवें राहिल्यामुळें कोणता प्रसंग बापाच्या व कोणता त्याच्या मुलाच्या अमदानींत घडला हें त्यांना समजलें नाहीं.

[७] कोणता मुलूख कोणाकडे होता ह्याचीही चांगली कल्पना त्यांना नव्हती.

[८] मोगल, आदिलशाह व कुत्बशाह यांचे शिवाजीशीं हितसंबंध कसकसे बदलत गेले हें न समजल्यामुळें कित्येक प्रसंगांची त्यांना समजूत पटली नाहीं.

[९] शिवशाहीकालीन राजकीय परिस्थितींत एकसारखा फरक होत गेल्यानें त्या वेळच्या परिस्थितीची चांगलीशी कल्पना त्यांना नव्हती.

[१०] स्वतंत्रपणें हालचाली करणाऱ्या मोरोपंतादि सरदारांच्या कामगिरीची वगैरे हकीगत उपलब्ध नव्हती.

[११] चरित्र-लेखनांत मुख्यत्वेंकरून प्रसंगवर्णन करण्याकडेसच अधिक प्रवृत्ति होती.

[१२] दंतकथेच्या परंपरेंत खंड पडण्यास राज्यांतील व राज्यपद्धतींत अनेक फरक झाले होते.

अशाच तऱ्हेचीं आणखीही कांहीं बारीकसारीक कारणें घडून आल्यामुळें बखरकारांना शिवाजीच्या चरित्राचें मर्म व वृत्त चांगलेंसें अवगाहन करतां आलें नाहीं. परंतु जे कांहीं प्रसंग वर्णन केले गेले त्यांतही अधिक विसंगतपणा

व कालानुक्रमाच्या चुका ह्या बखरींचें प्रकाशन करतांना शिरलेल्या आहेत. प्रकाशनाच्या समयीं ज्या चुका झाल्या आहेत त्यांचीं मुख्य कारणें अशीं:-

[१] प्रकाशनाचे वेळीं एकच प्रत उपलब्ध असल्यानें व प्रकाशनसमयीं शिवशाहीची तपशिलवार माहिती उपलब्ध नसल्यानें शब्दांचे, वाक्यांचे व कलमांचे परिच्छेद चुकीनें पाडले गेले.

[२] कित्येक शब्दांचें वाचन चुकीचें केलें गेलें. त्यामुळेंही कांहीं शब्द-परिच्छेद चुकीचे पाडले गेले.

[३] एकापेक्षां जेथें अधिक नकला उपलब्ध होत्या तेथें मूळ प्रतीचें वाचन शोधण्याचा प्रयत्न झाला नाहीं. ज्या प्रतीचा चांगला अर्थ लागला तोच पाठ गृहीत धरिला गेला.

संभाजीच्या चरित्रांत तर यांनीं फारच घोंटाळा केला आहे. अगदीं वस्तुस्थितीला सोडून मजकूर लिहिला गेला. याचें मुख्य कारण एकच होतें. तें हें कीं, शिवाजीनंतर राज्य गेलें व राजारामांनीं मिळविलें ही कल्पना. परंतु राज्य संभाजी पकडला गेल्यानंतर गेलें याची कल्पनाच बखरकारांना नाहीं. त्यामुळें त्यांनीं अगदींच विपर्यस्त तपशील देऊन संभाजीबद्दल फारच चुकीचीं अनुमानें काढलीं आहेत.

बखरींत जरी कांहीं अतिशयोक्तीचा व अविश्वसनीय भाग शिरला असला तरी त्यांना साधन या दृष्टीनें महत्त्व आहे. प्रामाण्याचा दर्जा मात्र शेवटचा लागतो हें खरें. या बखरींत आपलेपणानें लिहिलेला मजकूर सांपडतो. त्यामुळें फारसी ग्रंथकारांच्या विरुद्ध बाजूची मनोभूमिका काय होती हें यावरून चांगलें समजतें. शिवाय या बखरींचा उपयोग इतिहास-रचनेला मार्गदर्शक किंवा पोषक करण्याइतका या बखरींतून इतिहासाचा परंपरेनें आलेला धागा हातीं लागूं शकतो. परंतु बखरींचा उपयोग इतिहासांत कांहीं विवक्षित मर्यादेपुरताच करावा लागतो व यांतील मजकुराला इतर साधनांपेक्षां पुरावा म्हणून बराच गौण समजावा लागतो. बखर जितकी समकालीन असेल तितकें तिला प्रामाण्य अधिक प्राप्त होतें; आणि मूळ बखरींत तिच्या नकलेपेक्षां बरेच कमी दोष असूं शकतात. याकरितां होतांहोईतों मूळ प्रत शोधून काढणें इष्ट असतें. मूळ प्रत न सांपडल्यास जितक्या प्रती सांपडतील त्यांवरून मूळ पाठ शोधून काढण्याचा प्रयत्न करावा. मूळ पाठाचें वाचन

करतांना त्यांतील लेखकाचा मुख्य हेतु कोणता, लेखकाचे लेखनाचे प्रघात, तत्कालीन भाषा-प्रचार, तत्कालीन वर्णन करण्याची शैली वगैरे सर्व लहान-सहान बाबी लक्षांत घेऊन बखरींचें वाचन करावें व परिच्छेद पाडावेत. असें केल्यास तत्कालीन ऐतिहासिक प्रसंगांबद्दलच्या समजुतींची खरी कल्पना येऊं शकेल व बखरींचा साधन या दृष्टीनें इतिहासरचनेंत उपयोगही करणें सोपें जाईल. मात्र बखरींतील मजकुराला इतर अस्सल व अव्वल पुराव्यांच्यापेक्षां अधिक किंवा बरोबरीनेंही प्रामाण्य देतां येणार नाहीं. परंतु बखरींसारख्या साधनांच्या आधारेंच इतिहासाची संगति जुळविणें सोपें जातें हेही विसरून चालणार नाहीं.

बखरींबद्दल बरीच चर्चा झाली असल्यामुळें बखरींचें विवेचन अगदीं थोडक्यांत व सामान्य स्वरूपांतच केलें आहे. येथें अधिक विस्ताराची आतां आवश्यकता राहिली नाहीं. शिवाय साधनांचा दर्जा ठरविण्याचे अंतरंग-परीक्षणाचे नियम पुढें येणार असल्यानें प्रत्येक साधनाबद्दल विशेष चर्चा करावी असें नाहीं. अन्तरंग-परीक्षणाच्या नियमान्वयें प्रत्येक साधनाचें परीक्षण केल्यास सर्व कांहीं आपोआपच समजून येणार आहे.

## ३० पोवाडे व काव्यें

शिवशाहीकालीन पोवाडे फारच थोडे उपलब्ध आहेत. तशींच शिव-शाहीवरील ऐतिहासिक काव्यंही फारच थोडीं उपलब्ध झालीं आहेत. जे पोवाडे उपलब्ध झाले ते शाळिग्राम व आक्कर्थ यांनीं छापून काढलेले आहेत. या पोवाड्यांवर सुंदर टिका* लिहिण्याचें कामही रा० यशवंत नरसिंह केळकर यांनीं केलेलेंच आहे. आणखीही एक पोवाड्यांवर पुस्तक छापत आहे. सारांश, ऐतिहासिक पोवाडे व काव्यें यांच्या संशोधनाकडे लक्ष वेधत चाललें आहे. संस्कृत साधनांची चिकित्सा करतांना या भाटांच्या रचनेच्या कलेबद्दल थोडासा विचार केलाच आहे. पोवाडे रचणारे आपल्याला शाहीर म्हणवीत व ठाकूर जातीचे भाट स्तुतिपर काव्यें रचणें हाच आपला जाति-धर्म आहे असें समजत. शाहीर बहुधा गोंधळी जातींतील असत. शहाजी,

* ऐतिहासिक पोवाडे-भा०इ०सं०मंडळ, पुरस्कृत ग्रंथमाला; पुष्प ८वें.

शिवाजी, संभाजी वगैरेंच्या पदरीं बरेच कवि वगैरे होते. त्यांतच कांहीं भाट होते. परंतु हे भाट नेहमीं हिंदी भाषेंत काव्यरचना करीत. परंतु दुर्गादास ठाकुरासारखे* लोक मराठींतही काव्यरचना करीत. कित्येक भाट म्हणजे ठाकूर इकडेच येऊन राहिल्यानें ते मराठींतच काव्य करूं लागले होते. यांची कविता जितकी उपलब्ध व्हावी तितकी ती झाली नाहीं. ठाकूर जातीचे लोक अद्यापही महाराष्ट्रांत रहात असून त्यांचेजवळ पुष्कळ जुनीं बाडें आहेत. जर शोध केला तर त्यांच्याकडे शिव-संभाजीकालीन काव्यें सांपडूं शकतील. परंतु ह्या भाटांना लिहितां वगैरे येत असल्यानें यांचीं काव्यें सुरक्षित कोठें तरी जोपासलीं गेल्याची शक्यता वाटते. शाहिरी पोवाडयांची मात्र तशी स्थिति नाहीं. गोंधळी-शाहीर बहुधा निरक्षर असल्यानें त्यांची काव्यनिष्पत्ति जी कांहीं परंपरेनें चालू राहील तेवढीच. पंचक्रोशींत एखादा तरी गोंधळी असावयाचाच. असें असतांना शिवशाहींत शाहिरी-काव्यें च निर्माण झालीं नाहींत असें नाहीं. उलट अगदीं एखादा शौर्याचा प्रसंग घडतांच मजालसींत† शाहिरांनीं पोवाडा रचून म्हटल्याचे उल्लेख आहेत. यावरून असें अनुमान काढण्यास हरकत दिसत नाहीं कीं, शिवकालीं पोवाडे बरेच रचले गेले असतील; परंतु ते पोवाडे म्हणून दाखविणारे परंपरेचे शाहीर आज आपणांस मिळत नाहींत. जेथें जुन्या पोवाडयाच्या चालीची परंपराही टिकूं शकली नाहीं तेथें पोवाडे उपलब्ध नच झाले तर नवल कसलें! कदाचित् गोंधळी लोकांत जर अधिक प्रयत्न केला तर कांहींतरी निष्पत्ति होऊंही शकेल. प्रयत्न झाला पाहिजे.

या काव्यांच्या अगर पोवाड्यांच्या ऐतिहासिक प्रामाण्याबद्दल येथें पुन्हा विस्तार करण्याची जरूर नाहीं. मागें यांच्या प्रामाण्याप्रामाण्याबद्दलचें विवेचन आलेंच आहे. येथें एकच गोष्ट नमूद करणें इष्ट आहे कीं, पोवाड्यांत पाठभेद सहज व झटकन् होऊं शकतात. पोवाडयाची चालच इतकी सुलभ आहे कीं, त्यांत वाटेल तो शब्द घालतां येतो. एखाद्या मात्रा—अर्धमात्रेनें वृत्तांत फरक पडत नाहीं. शिवाय शाहिरांनासुद्धां पोवाडयांतील शब्द आलटून

* स्वराज्यांतील भाट व त्यांची कामगिरी—प. कृ. ठाकुरकृत.
† जेधे शकावली, जेधे करीना इ०.

पालटून म्हणून दाखविण्यांत किंवा समयसूचकतेनें एखादी कोटी ढकलून म्हणण्यांत मोठें कसब वाटतें. सारांश, संस्कृत व इतर काव्यें जितकीं निर्भेळ राहूं शकतात तितके पोवाडे राहूं शकत नाहींत. कित्येक चौक विसरले जातात व कित्येक नवे प्रचारांत येतात. परंपरेचा अभिमान मात्र या शाहिरांत जागृत असल्यानें पोवाडे परंपरेनें म्हणण्याचा व कायम टिकविण्याकडे या शाहिरांचा नेहमीं कल असे. त्यामुळें मूळ पोवाडयांत एकदम व सहज फरक किंवा पाठभेद घडवून आणला जात नसे इतकेंच.

## ३१ ऐतिहासिक म्हणी व वाङ्मय

एखादा विशिष्ट प्रसंग घडला आणि त्याचा लोकांवर चांगलाच परिणाम झाला, कीं त्या अनुरोधें एखादी तरी म्हण प्रचारांत येते. तो प्रसंग जितका संस्मरणीय असतो तितकी ती म्हण प्रचारांत अधिक कालपर्यंत टिकते. जे प्रसंग देशावर दूरवर संस्मरणीय ठरतात, त्या प्रसंगावद्दलच्या म्हणी तितक्याच दूरवर पसरतात. परंतु भाषेचे विवक्षित संप्रदाय बहुधा स्थानमर्यादित असतात. आणि असल्या ऐतिहासिक प्रसंगांवरून अगर पुरुषांच्या नांवांवरून आलेल्या म्हणी फार कालपर्यंत टिकतात असें नाहीं. म्हणून शिवकालीन ऐतिहासिक म्हणींचा भरणा तत्कालीन व त्यानंतरच्या दोन तीन पिढयांच्या वाङ्मयांतच विशेष आढळूं शकतो. शिवकालीन प्रसंगांच्या कांहीं म्हणी अद्यापही रूढ आहेत. जसें: गनिमी कावा, कल्याण, चतुर साबाजी, होता जिवा म्हणून बचला शिवा, इत्यादि. परंतु जसजसा काल लोटतो तसतसा सामान्य जनांना त्या प्रसंगांबद्दलचा विसर होतो व म्हणी टिकविण्याची जी तोंडी परंपरा असते तिच्यांतही खंड पडतो. पेशवेकालीन कित्येक म्हणी सध्यां प्रचारांत आहेत. त्यांचाही विचार केला तर पेशवे-उत्तरकालीन म्हणीच अधिक उपयोगांत आणल्या जात आहेत. ज्या ऐतिहासिक म्हणींचा प्रसार सर्वत्र झालेला असतो त्यांतील ऐतिहासिक अभिप्राय सर्वांनाच ठाऊक असतो. परंतु ज्या म्हणी एखाद्या गांवांत अगर लहानशा भागांतच स्थानिक महत्त्वामुळें प्रचारांत असतात त्यांचें मात्र शोधन अधिक झालें पाहिजे. त्यावरून नुसतें तेथील स्थानमाहात्म्यच नव्हे तर एखाद्या अज्ञात ऐतिहासिक प्रसंगाचाही बोध होऊं शकतो. असल्या गांवकी म्हणी बऱ्याच कालपर्यंत टिकतात. कारण त्या गांवच्या माणसांसमोर त्या

म्हणींतील प्रसंगविषय सांगणारा थोडातरी अवशिष्ट पुराबा हयात असतो. जसें–वसई-तारापूरला 'लोहाराची कुऱ्हाड किंवा हातोडा' ही म्हण प्रचारांत आहे. हीच म्हण संभाजीच्या कारकीर्दीपूर्वीही प्रचारांत होती. म्हणीची दंतकथा अशी आहे कीं, एकदां एक मोगल पादशहा व पोर्तुगीजांची लढाई झाली. त्या वेळीं तारापूर लुटीत असतां पादशहाचे लोक लोहाराच्या घरावर हल्ला करण्यास गेले. तेव्हां तेथील लोहार व त्याच्या मुलानें दाराआड लपून आपल्या कुऱ्हाडीनें तीनचारशें लोक मारले. त्या लोहाराची कबर बांधलेली अद्याप तेथें असल्यानें 'लोहाराची कुऱ्हाड' ही म्हण तेथें प्रचारांत आहे. असल्या म्हणीविषयीं विशेष लक्षांत ठेवावयाचें तें हें कीं, कोणत्याही लढाईचें वर्णन देतांना असल्या म्हणींतील हकीगती त्यांत सांगितल्या जातात. सारांश, अशा तऱ्हेचा म्हणींचा मूळ विषय नेहमींच दंतकथेवरून बरोबर समजतो असें नाहीं. परंतु शोधाअंतीं कांहीं तरी नव्या प्रसंगाचा बोध होऊं शकतो. ऐतिहासिक म्हणींचा प्रचारांतील भावार्थ कित्येक वेळां अगदीं विरोधी स्वभावाचाही आढळून येणें शक्य असतें. म्हणून ऐतिहासिक म्हणींचा उपयोग फक्त नवीन प्रसंगाचा छडा लावण्यापुरताच करावा लागतो. जे प्रसंग ज्ञात झाले असतील त्या प्रसंगांचें म्हणींच्या रूढ अर्थावरून अधिक परीक्षण करण्याच्या योग्यतेचें–ऐतिहासिक म्हणी हें ऐतिहासिक साधन महत्त्वाचें नसतें. ऐतिहासिकम्हणींच्या भावार्थातील वस्तुस्थितिन्यास कधींकधीं जाणूनबुजून केला जातो व केव्हांकेव्हां आपोआपही घडून येतो. ऐतिहासिक म्हणींवरून एखाद्या ऐतिहासिक प्रसंगाचा परिणाम कोठपर्यंत झाला होता हें अजमावतां येतें.

कोणत्याही कालांत जें वाङ्मय निर्माण होतें त्या वाङ्मयनिर्मितींत तत्कालीन सामाजिक सर्वांगीण परिस्थितीचा ठसा उमटलेला स्पष्ट दिसून येतो. तत्कालीन राजकीय परिस्थितीकडे सामान्य जनता कोणत्या साक्षेप दृष्टीनें पहात होती याचा त्या वाङ्मयावरून छडा लावतां येतो. तत्कालीन कर्तृत्ववान् व्यक्तींच्या हालचालींकडे स्थानिक सुज्ञ माणसांची कोणती प्रवृत्ति कलत होती याचा या वाङ्मयावरून कयास बांधता येतो. अधिष्ठित राजसत्तेच्या विरुद्ध प्रजेचा बराबाईट झालेला ग्रह याच वाङ्मयावरून समजूं शकतो. जसें धार्मिक जुलूमजबरदस्तीमुळें असहाय झालेल्या प्रजेची हवालदिल स्थिति एखाद्या

देवाच्या घाव्यांत स्पष्टपणें समजून येते; त्याचप्रमाणें असहाय स्थितींतून सोडविणारा वाली मिळतांच शत्रूला निवटून टाकण्यास प्रवृत्त करण्यासाठीं केलेल्या आराध्य-दैवतेच्या आळवणींत देशांतील प्रजेच्या क्रांतिकारक प्रवृत्तीचा अदमास करतां येतो. सारांश, ऐतिहासिक प्रसंगाच्या बऱ्याबाईटपणाचा निर्णय करण्यास जी मुख्य कसोटी म्हणजे जनतेची प्रवृत्ति समजावी लागते ती या सामान्य प्रकारच्या म्हणजे ऐतिहासिक वाङ्मयाव्यतिरिक्त वाङ्मयांतच सांपडूं शकते. या वाङ्मयाचा उपयोग कोणत्याही प्रसंगाच्या तपशिलांत अगर कालनिर्देशांत भर टाकण्याकडे व्हावयाचा नाहीं. कदाचित् एखादा दूरान्वयानें धागा मिळाल्यास मिळतोही. परंतु असलें वाङ्मय म्हणजे ऐतिहासिक प्रसंगांतील कोणत्याही तपशिलाचा अव्वल पुरावा म्हणून मानतां येणार नाहीं. समकालीन वाङ्मयांत प्रत्यक्ष पाहिलेल्या गोष्टी अप्रत्यक्षपणें उतरतात ही जरी गोष्ट खरी असली तरी त्याच वेळीं त्यांत प्रतिपाद्य विषयाच्या अनुरोधानें फेरबदल करण्यांत येत असतो हेंही विसरतां कामा नये. म्हणून सामान्य वाङ्मयाचा उपयोग करणें जरूर पडतें तें फक्त राजकीय अगर इतर तद्विषयक हालचालीं स्थानिक व सामाजिक हिताच्या दृष्टीनें कोठपर्यंत समर्थनीय होत्या हें जाणण्यापुरतें होय. या दृष्टीनें वाङ्मयाचा उपयोग इतिहासरचनेस अत्यंत महत्त्वाचा आहे. ज्याप्रमाणें तत्कालीन वाङ्मयावरून तत्कालीन मनःस्थितीचा बोध होतो त्याचप्रमाणें पश्चात् वाङ्मयावरुन परिणामांचा बोध होऊं शकतो. म्हणून प्रथम स्थानिक वाङ्मयाचा अभ्यास केल्याशिवाय इतिहासकालीन प्रसंगाकडे कोणत्या दृष्टीनें पहावयाचें हें समजणें शक्य नाहीं. या वाङ्मयाच्याच साहाय्यानें ऐतिहासिक प्रसंगाच्या खऱ्या स्वरूपाचा बोध होऊं शकतो.

शिवशाहीकालीन वाङ्मय कांहीं उपलब्ध झालें आहे व होतही आहे. तुकाराम, दासोपंत व प्रसिद्ध रामदासी-वाङ्मयांत प्रत्येक ठिकाणीं तत्कालीन लोकस्थितीची व राजकीय परिणामाची कल्पना करून देणारीं सूत्रें आढळतात. याच सूत्रांच्या आधारानें महाराष्ट्रीयांना अगदीं छातीठोकपणें, निसर्गाच्या नियमाला अनुसरून व परमेश्वराच्या न्यायावर विश्वसून सांगतां येतें कीं, स्थानिक लोकांना केवळ बलाच्या जोरावर लुबाडून अधिष्ठित झालेल्या राजसत्तेनें शिवाजीसारख्या पुण्यपुरुषाला स्वदेशीय बांधवांना गुलामगिरींतून

मुक्त केल्याच्या प्रयत्नामुळें जरी बंडखोर म्हटलें असलें तरी त्याला महाराष्ट्रीय व इतर सर्व निःपक्षपाती जनता व इतिहास लोकहितपालकांच्या अग्रस्थानीं बसविण्यास मागें पाहणार नाहींत. ऐतिहासिक सरकारी साधनांतील प्रत्यक्ष पुरावा तपासण्यासाठीं या सामान्य वाङ्मयांत सूत्रित केलेलीं तत्त्वें व तत्कालीन परिस्थिति या दोहोंचाच मुख्य उपयोग करावयाचा असतो. ज्याला या दोन्हीही गोष्टींचा संसर्ग घडला नाहीं त्याच्या इतिहासरचनेंत कोणते व कसे दोष घडून येतात हें महाराष्ट्राच्या इतिहासग्रंथांतून चांगलेंच दिसून येतें. इंग्रजादि ग्रंथकारांना या दोन्ही बाबींचा जितका उमज पडावा तितका उमज न पडल्यामुळें त्यांच्या ग्रंथांतील प्रसंगांच्या तपशिलांतील बिनचुकता जरी मान्य केली तरी त्यांच्या इतिहासांत जो भावार्थ सांगितला जातो किंवा सुचविला जातो तो कोणाही सहृदय महाराष्ट्रीयाला मुळींच पटणारा नसतो. महाराष्ट्रीय इतिहासलेखनांत जी थोडी-बहुत आपलेपणाची दृष्टि अवलोकनांत येते ती फक्त इतिहासकालीन कांहीं वाङ्मयाबद्दलची परंपरेनें मिळालेल्या माहितीमुळें व त्याचप्रमाणें झालेल्या परिणामांमुळें होय. परंतु हेच महाराष्ट्रीय इतिहासलेखक विशेषतः इतिहासकालीन स्थानिक वाङ्मयाचा प्रथम अभ्यास करतील तर त्यांच्या लिहिण्यांत बराच आपलेपणा व सत्याभिमान दृष्टीस पडेल यांत शंका नाहीं. आपलेपणा व सत्याभिमान नसेल तर कोणत्याही पोकळ विवेचनावरून देशाचें व समाजाचें हित साधलें जाणार नाहीं.

इतिहासकालीन बहुतेक सर्व वाङ्मय कविताबद्धच असलेलें आढळतें. पद्यात्मक रचना करण्याकडेसच विद्वानांचा बराच कल होता. असल्या वाङ्मयास विषयाची निवड करतांनाही बहुधा परमार्थाकडेसच अधिक ओढा दिसतो. पुराणें व भारत-रामायणादि ग्रंथांतील कथाभाग भाषांतरित करण्याकडे बरेंच लक्ष वेधल्याचें आढळून येतें. रामदासी खास वाङ्मय इतकें महत्त्वाचें आहे कीं, रामदासांच्या व त्यांच्या शिष्यांच्या सर्व ग्रंथांतून शिवशाहीकालीन परिस्थितीचा वेळोवेळीं उल्लेख केलेला आहे. हें सर्वच वाङ्मय प्रवर्तक स्वरूपाचें असल्यानें त्यावरून तत्कालीन क्रांतीला कोणते मार्ग स्वीकारणें जरूर होतें, तसेंच त्यापूर्वी जो ऱ्हास झाला तो कोणत्या कारणानें झाला वगैरे सर्व बाजू आपणास समजूं शकतात. महानुभावीय व इतरही वाङ्मयांत तत्कालीन परिस्थितीची द्योतक अशी बरीच माहिती मिळते. परंतु या स्थानिक

वाङ्मयाचा उपयोग करितांना सुद्धां वाङ्मयकार कोणत्या परिस्थितींतून वाङ्मय प्रसवीत आहे, त्याचा त्या वाङ्मय-निर्मितींत कोणता हेतु आहे, तसेंच तो कोणत्या प्रेरणेनें लिहीत आहे, वगैरे गोष्टींचा प्रथम विचार करून त्याचें लेखन तत्कालीन प्रघात, भाषाप्रचार वगैरे लक्षांत घेऊन तपासलें पाहिजे. या वाङ्मयाच्या परीक्षणाबद्दल अधिक विस्तार करण्याची जरूर नाहीं. कोणत्याही लेखाचें अन्तरंग तपासण्याचे जे नियम पुढें देण्यांत येणार आहेत त्यांवरून असल्या वाङ्मयाचें वाचन कसें करावें व त्यांतील तथ्यार्थ कसा शोधून काढावा हें समजणारच आहे.

## ३२ नाणीं, शिलालेख

नाण्यांचा ऐतिहासिक साधन या दृष्टीनें बराच उपयोग होतो. नाणीं हीं एक प्रकारच्या अविनाशी ऐतिहासिक साधनांपैकीं एक आहेत. परंतु या साधनांच्या साहाय्यानें राजाच्या नांवाचा व नाण्यांच्या आणि त्याबरोबरच फक्त राजाच्या कालाचा बोध होऊं शकतो. फार तर जेथें नाणीं सांपडतात त्यावरून राज्याच्या मर्यादेचा किंवा राजाच्या संबंधाचा बोध करून घेतां येतो इतकेंच. त्यामुळें ज्या कालाचा इतिहास अविनाशी साधनांवरूनच काढणें भाग झालें आहे व इतर कोणतेंही प्रत्यक्ष समकालीन साधन हयात नसतें अशाच वेळीं नाण्यांसारखीं साधनें विशेष महत्त्वाचीं असतात. शिवशाही-सारख्या इतिहासांत मात्र त्यांचा शिवकालीन नाण्यांच्या अगर चलनी इतिहासाच्या भागापुरताच उपयोग होतो. परंतु शिवशाहींत मराठ्यांनीं नाणीं पाडण्यासाठीं टांकसाळी स्थापण्याचा वगैरे फारसा प्रयत्न केलेला दिसून येत नाहीं. शिवाजीमहाराजांनीं राज्याभिषेकाच्या सुमारास एक टांकसाळ काढली होती. त्यांत फक्त होन व शिवराईच काढले असावेत. शिवशाहीचीं हीं दोनच प्रकारचीं नाणीं उपलब्ध झालीं आहेत. चांदीचें नाणें पाडल्याचें म्हणतात; परंतु तें उपलब्ध मात्र झालेलें ऐकिवांत नाहीं. महाराष्ट्रांत व इतरत्र बऱ्याच टांकसाळी होत्या. विशेषतः मोगली नाणींच चालत. इतरही आदिलशाही, पोर्तुगीज व इंग्रजी नाणीं वापरण्यांत येत. परंतु नाण्यांची कायद्यानें ठराविक किंमत ठरविलेली नव्हती. त्यांची किंमत मोगली नाण्यांच्या कसाला उतरतील त्याप्रमाणें भाव लागून होत असे. सारांश, अशा

परिस्थितींत शिवशाहीच्या इतिहासाला या नाण्यांच्या साहाय्यानें कांहीं अधिक भर टाकतां येईल असें नाहीं. नाणीं बनावट आहेत किंवा कसें हें ओळखण्याचे मुख्य मार्ग म्हणजे तीं शुद्ध आहेत किंवा नाहींत व त्यावरील उल्लेख इतर ऐतिहासिक उपलब्ध माहितीला धरून आहे किंवा नाहीं हें तपासणें हे होत. शिवशाहीकालीन मराठ्यांच्या नाण्यांना अशा प्रकारची तपासणी लावण्याचें फारसें प्रयोजनच पडणार नाहीं. कारण खोटीं व बनावट नाणीं पाडण्याइतका शिवशाहीचा विस्तार व देशांतील चलनावर अंमल झाला नव्हता. नाणीं, मार्वे, बजनें वगैरे लिहिण्याची रेघी पद्धत अद्यापही चालू असल्यामुळें ती येथें देऊन विस्तार वाढवीत नाहीं.

शिलालेख हेंही एक अविनाशी साधनांतील साधन असून यांच्याच साहाय्यानें बराचसा पुरातन इतिहास उपलब्ध करून घेतां आला आहे. पुरातन शिलालेखांत जी प्रशस्ति दिली जाई ती ऐतिहासिकदृष्ट्या फार महत्त्वाची असे. परंतु इतिहासकालीं लेखनाचीं साधनें बरींच निर्माण झाल्यानें हे शिलालेख फक्त इमारती, किल्ले, कबरी, वृंदावनें वगैरे बांधकामावर लावले जात व त्यांचा बांधणाराचा अगर ज्याच्यासाठीं बांधले त्याचा उल्लेख व शक-संवत्सर वगैरे देण्यापुरताच विशेषतः उपयोग केला जात असे. त्यामुळें या शिलालेखांतून फारशी ऐतिहासिक माहिती उपलब्ध होऊं शकत नाहीं. या शिलालेखांचें पुरावा या दृष्टीनें परीक्षण करावयाचें तेंही इतिहासकालीन पत्रादि साधनांच्या परीक्षणासारखेंच करावयाचें असतें. एखादी गोष्ट जाहीर रीतीनें मांडली गेली म्हणजे ती तत्कालीन समजुतीप्रमाणें सर्वांस मान्य होती असें मानण्यास हरकत नसते. परंतु त्या शिलालेखांतील मजकुराचें परीक्षण करितांना ज्या वेळीं ती बाब लिहिली त्या वेळच्या समजुतीवरून करावयाचें नसतें तर त्यांत उल्लेखलेली बाब समकालीं लिहिली गेली असेल तर ती विश्वासार्ह व समकालीं लिहिली गेली नसेल तर तिची विश्वसनीयता ठराविक नसते असेंच समजून परीक्षण करणें जरूर आहे. त्यामुळें कित्येक अस्सल शिलालेखांतही ते मागाहून तयार करून लावल्यामुळें चुकीचा मजकूर केवळ तत्कालीन म्हणजे लेखनकालाच्या समजुतीप्रमाणें लिहिला गेला आहे. शिलालेखांत नकला व मसुदा असा भेद करण्याचें प्रयोजनच नसतें. शिवशाहीकालीं किल्ले वगैरे इमारती कांहीं कमी

बांधल्या किंवा दुरुस्त केलेल्या नाहींत. या प्रत्येक इमारतीवर एखादा तरी शिलालेख आढळतोच. या शिलालेखाचें वाचन व प्रसिद्धीकरण गॅझेटिअर्स व सिलेक्शन्समध्यें बऱ्याच मोठ्या प्रमाणावर झालेलेंच आहे. परंतु त्यांतील कांहीं वाचन बरेंच सदोष आहे. या सर्व शिलालेखांचें व त्याचप्रमाणें देवळें, विहिरी वगैरेवरील शिलालेखांचें शोधन केलें तर बऱ्याच गोष्टींवर महत्त्वाचा उजेड पाडतां येईल. असा शोध घेतल्यास कोणत्या इमारती कोणीं दुरुस्त केल्या व त्या त्यावेळीं कोणाच्या ताब्यांत होत्या तें समजेल.

## ३३ चित्रें, नकाशे, इमारती वगैरे

चित्रें, नकाशे इमारती, किल्ले वगैरे साधनांचें येथें विवेचन करणें तें त्यांतील कलेच्या अगर कौशल्याच्या दृष्टीनें मुळींच करण्याची जरूर नाहीं. तो स्वतंत्र विषय आहे. या सर्वांचा ऐतिहासिक साधन म्हणून कोठपर्यंत उपयोग होऊं शकतो इतकाच येथें विचार करावयाचा आहे. हिंदुस्थानांत फार पुरातन कालापासून चांगल्या प्रकारची चित्रकला अवगत होती. कोरींव लेणीं, दगडी मूर्ति वगैरे या चित्रकलेची अद्याप साक्ष देत आहेत. कागदांवर चित्रें काढण्याची कला मात्र इतिहासकालीन आहे. या चित्रकलेच्या निरनिराळ्या परंपरा किंवा सांप्रदाय आहेत. त्यांतील जयपुर, दिल्ली, काश्मीर हे सांप्रदायच उपलब्ध झालेल्या चित्रांतून विशेषेंकरून दिसून येतात. चित्रांचा संग्रह निरनिराळ्या प्रदर्शनांतून केलेला दृष्टीस पडतो. कित्येक खासगत संग्रहही फार उत्तम आहेत. भारत-इतिहास-संशोधक-मंडळ-संग्रह, नाना फडणीस संग्रह, विजापुरचा बांगीसंग्रह, पारसनीस व मावजीसंग्रह वगैरे संग्रहांतून दख्खनमधील सरदार व राजेरजवाड्यांचीं चित्रें बरींच आहेत. चित्रें फारच कौशल्यपूर्ण व अगदीं बारीकसारीक केसासारखेही तपशील देऊन काढलेलीं असतात. इराणी किंवा चिनी पद्धतीचीं कांचेवरील चित्रेंही बरींच सांपडतात. कागदांवरील चित्रें काढतांना प्रथम काळ्या शाईनें आकृति अगदीं तपशिलासह काढीत व नंतर त्यांत निरनिराळे रंग भरीत असें दिसतें. या रंगांचें काम फारच मनोहर असतें. चित्रांत यथादर्शनआकृति दिलेली नसते. चित्राकृति रेखीव तयार केलेली असते. मागच्या बाजूचा देखावा, आसन वगैरे ज्या चित्रकाराला जसें रुचतें तसें तो देतो. विशेषतः हा देखावा चित्रकाराच्या अंग-

वळणीं पडलेला असतो, तोच दिला जातो. या देखाव्यावरून चित्रकाराच्या मूळ वसतिस्थानाचा बोध होऊं शकतो. चित्रांतील माणसाच्या राहण्याच्या जागेचा बोध होणार नाहीं. आकाशाचे देखावेही बरेच वेळां अशा प्रकारचे म्हणजे उत्तर हिंदुस्थानांतील असल्याचे दिसून येतात. मनुष्यांच्या चित्रांप्रमाणें इतर देवादिकांचींही चित्रें काढलीं जात. जनावरांचीं चित्रें तर फारच मनोहर असलेलीं आढळून येतात. याशिवाय व्यवहारांतील कांहीं गोष्टींचीं, शृंगारविषयक वगैरेही चित्रें काढलेलीं आढळतात. विचार व विकारदर्शक चित्रेंही बरींच आढळतात. गायनांतील रागदारींचीं, तालांचीं, त्याचप्रमाणें ऋतुमासांचींही चित्रें बरींच सर्वत्र आढळतात. परंतु या चित्रांशीं आपणांस फारसें कर्तव्य नाहीं. म्हणून फक्त ऐतिहासिक पुरुषांच्या चित्रांपुरतेंच विवेचन मर्यादित ठेवणें इष्ट आहे.

शिवशाहीकालीन मोगली, रजपूत वगैरे आदिलशाही व कुत्बशाही बऱ्याच सरदारांचीं चित्रें उपलब्ध झालेलीं आहेत. कांहीं सामान्य माणसांचींही चित्रें सांपडतात. मात्र शहाजी, शिवाजी, संभाजी वगैरे छत्रपति सोडले तर मराठी सरदारांचीं चित्रें उपलब्ध झालेलीं ऐकिवांत नाहींत. मात्र यावरून असें अनुमान करतां येत नाहीं कीं, अशीं चित्रें उपलब्ध होणारच नाहीं. सामान्य माणसाचेंही चित्र काढून देण्याइतके त्या काळीं चित्रकार मिळत असत असें असतांना मराठे सरदारांचीं चित्रें मिळणारच नाहींत असें नाहीं. उपलब्ध होणें आहे एवढाच निष्कर्ष काढतां येईल. परंतु चित्रांचा नाश कागद-पत्रांच्या नाशापेक्षां अधिक जलदीनें व सहज होणें शक्य असल्यामुळें हीं साधनें उपलब्ध होणें जरा जडच आहे म्हटलें तरी चालेल. उपलब्ध चित्रांतही समकालीन किती चित्रें असूं शकतील हें सांगणें फारच कठीण आहे. हल्लीं जीं चित्रें उपलब्ध आहेत तीं बहुतेक नकलाच असून त्या पेशवे-कालीन असाव्यात. फारच थोडीं चित्रें अव्वल असण्याचा संभव आहे. या नकला अगदीं पातळ कागदावर काढल्या जात. काळ्या शाईनें या नकलांतील तपशील भरले कीं मग त्या जाड कागदावर चिकटविल्या जात. त्यांचे भोंवतीं वेलबुट्ट्याही चिकटविल्या जात व नंतर त्यांत रंग भरून चित्रें पुरीं होत. या चित्रांवर कांहीं ठिकाणीं चित्रकाराचें नांव असतें व कांहीं ठिकाणीं चित्राचेंही नांव दिलेलें असतें. परंतु बहुधा चित्रावर नांवगांव न देण्याचाच प्रघात

विशेष दिसतो. संग्रहकारांनीं मात्र अशा चित्रांच्या मागें किंवा खालीं नांवें दिलेलीं असतात. त्यामुळें कित्येक चित्रांच्या नांवांचा बोध होत नाहीं. परंतु हीं चित्रें नकला असतांत. त्यामुळें इतरत्र तशाच प्रकारच्या नकला नांवांसहित मिळाल्यास चित्रांचीं नांवें समजून घ्यावीं लागतात. चित्रांच्या नांवांचा अशा रीतीनें बोध झाला तरी तीं पडताळून पहाण्यास कोणत्याही साधनांत ऐतिहासिक पुरुषांचें रूपवर्णन दिलेलें आढळत नाहीं. असें रूपवर्णन करण्याचा त्या वेळीं रिवाजच नव्हता. रूपवर्णन केलेलेंच आढळलें तर तें अगदीं अतिशयोक्तीचें व भारत-रामायणादि ग्रंथांतील ठराविक वचनांत केलेलें असतें. त्यामुळें चित्रांचा ताळा पाहण्यास फारसें साधन उपलब्ध नसतें. चित्रांचें परीक्षण त्यांत असलेल्या रंगांवरून करणें शक्य असतें. कांहीं रंगांचीं मिश्रणें शिवशाहीकालीं परिचित नव्हतीं व कांहीं रंग तत्पूर्वी ठाऊक नव्हते. परंतु असले बारीकसारीक तपशील देण्याची जरुरी दिसत नाहीं, व ते शब्दांत देणें किंचित् कठीणही आहे. म्हणून चित्र कोणत्या माणसाचें आहे हें ठरविण्यास निरानिराळ्या प्रतींवर संग्रहकारांकडून जीं नांवें दिलीं जातात त्यांवरूनच ठरविणें भाग पडतें. कांचेवरील चित्रकलाही इकडे बरीच प्रसृत झाली असावी. पेशवेकालीन कांचेवरील चित्रें उपलब्ध झालीं आहेत. या व कागदावरील जुनाट पद्धतीच्या चित्रांची प्रतिकृति घेतल्यानें त्यांच्या स्वत्या स्वरूपाचा बोध होऊं शकत नाहीं. कारण प्रतिकृतीला जें यथादर्शन चित्र लागते तशीं हीं चित्रें नसतात. म्हणून रंगीतच नकला करणें इष्ट असतें.

नकाशे काढण्याची कला आजच्याइतकी जरी पूर्णतेप्रत गेली नव्हती तरी जमिनींचे नकाशे काढणें किंवा एखाद्या क्षेत्राचें नकाशाच्या रूपानें विवेचन करण्याची पद्धति शिवकालींही प्रचारांत होती. परंतु हे नकाशे मोठमोठ्या देशाचे अगर प्रांताचे नसत. लिहिणारा आपल्या कार्यक्षेत्रापुरताच विचार करी व त्याप्रमाणें टांचण करी. हिंदुस्थानाबाहेरून येणारे प्रवाशी नकाशे काढीत. परंतु तेही नकाशे काढतांना फक्त दिशेचा उल्लेख करीत. अंतराबद्दल फारसे बिनचूक नसत. अजमासें कांहींतरी बरखालीं दुसरें गांव, नदी दाखवावयाची एवढाच काय तो त्यांचा उद्देश असे. जे क्षेत्राचे नकाशे काढले जात त्यांत काढणाराला बरीच माहिती असण्याचा

संभव असतो. परंतु प्रवाश्यांच्या नकाशांत ऐकीव माहितीवर बराच भर दिलेला असतो. नकाशांत पूर्व, पश्चिम, दक्षिणोत्तर वगैरे दिशा दाखविल्या जातात. परंतु सांप्रत ज्याप्रमाणें आपण आपल्या नकाशांत उत्तर वरचे बाजूस व पूर्व उजवे बाजूस नेहमीं दाखवितों त्याप्रमाणें ते दाखवीत नसत. अशा प्रकारचा ते निर्बंध पाळीत नसत. ज्यास वाटेल त्या बाजूला पूर्व घेत. कांहींत दिशांचे उल्लेख करीत, कांहींत केलेले नसत. हे नकाशे बहुधा प्रसंगवर्णनासाठींच वगैरे काढले जात. त्यामुळें ते फार महत्त्वाचे असतात.

शिवकालीन इमारती, किल्ले वगैरेही इतिहासाच्या दृष्टीनें आपणांस कांहीं गोष्टी पडताळून पहाण्यास साधनीभूत होत आहेत. या इमारतींच्या कलाकुसरीचा विचार करण्याचें आपणांस मुळींच प्रयोजन नाहीं. तो स्वतंत्र विषय आहे. परंतु या इमारतींच्या साहाय्यानें आज कित्येक प्रसंग आपणांला मुक्रर करितां येत आहेत. इतिहासांतील बाबी अप्रत्यक्षपणें परंतु अगदीं बिनचुकतेनें पडताळून पाहण्याचें एवढेंच साधन उपलब्ध असतें. इतिहास-कालीन साधनांत वर्णलेलीं कित्येक गांवें नाश होऊन त्यांचा सुगावा सुद्धां लागत नाहीं, त्यामुळें एखाद्या ऐतिहासिक प्रसंगाची जागा ठरवितां येत नाहीं व जागा ठरवितां न आली म्हणजे प्रसंगही अनिश्चित राहतो. कोणत्याही ऐतिहासिक प्रसंगाला तीन मुख्य गोष्टी कळाव्या लागतात. व्यक्ति, जागा व काल. यांपैकीं दुसरीचा बोध होण्यास इतिहासकालीन या मुख्य मुख्य स्थलविशेषांची माहिती असणें अवश्य असतें. अजूनही कित्येक किल्ल्यांचीं माहिती झाली नसल्यामुळें कित्येक साधनांतील पाठ लावतां येत नाहींत. म्हणून इतिहासरचनेस विशिष्ट स्थलांचीं माहिती मिळाविणें आवश्यकच असतें. विशेषतः त्या स्थलाची पूर्व माहिती वगैरे असेल तर तिचा फारच उपयोग होतो.

## ३४ अलिखित इतर साधनें

ऐतिहासिक साधनांत जशा लिखित व प्रत्यक्ष पुराव्याचा उपयोग होतो त्याचप्रमाणें बिनलिखित व कांहीं अप्रत्यक्ष पुराव्यांचा उपयोग करणें भाग पडतें. परंतु हीं सर्व साधनें उपकारक साधनांत समाविष्ट होतात. अशा साधनांचा विशेष उपयोग असा असतो कीं, ज्या गोष्टी लिहिल्या गेल्या

नाहींत त्या या साधनांवरून उपलब्ध होत असतात. तसेंच या साधनांचा उपयोग उपलब्ध झालेली माहिती पडताळण्याकडे होतो. यांत चार प्रकारच्या पुराव्यांचा समावेश होतो: [१] भौगोलिक माहिती, [२] अलिखित सामान्य वाङ्मय, [३] पुराणवस्तु व [४] दंतकथा. पहिल्या प्रकारच्या साधनांवरून शक्याशक्यता ओळखण्याचा मार्ग उपलब्ध असतो. दुसऱ्या प्रकारचीं साधनें इतिहासांतील प्रसंगवर्णनांत उपयोग करण्याइतकीं मुळींच विश्वसनीय नसतात. त्यांवरून इतिहासकाराला तत्कालीन परिस्थितीचें चित्र मात्र समजूं शकतें. तिसऱ्या प्रकारच्या साधनांवरून कांहीं तार्किक स्वरूप बसवितां येतें. परंतु यांत सर्व तर्काचाच भाग असतो. दंतकथेचा इतिहासांत फारसा उपयोग करितां येत नाहीं. परंतु यावरून इतिहासरचनेसाठीं रूपरेषा समजूं शकते.

[१] भौगोलिक परिस्थितींत दोनतीनशें वर्षांत फारसा फरक होत नाहीं, ही जरी गोष्ट खरी असली तरी गांवाची वस्ती वगैरे बदलणें शक्य असतें. अशा बारीकसारीक फेरबदलीबद्दल काळजी घेतल्यास भौगोलिक माहितीवरून कित्येक ऐतिहासिक प्रसंगविवेचनांतील सत्यता शोधणें फारसें कठीण जाणार नाहीं. उदाहरणार्थ, शिवाजी पन्हाळ्यावरून रांगण्यास गेला कीं विशाळगडास गेला, रांगण्यास गेला तर वर्णनाप्रमाणें इतर बाबी जुळतात कां? जर रांगण्यास न जातां विशाळगडास गेला म्हणावें तर अंतर व कालवेळ यांचा जम बसत आहे का? वगैरे शोधना करणें या भौगोलिक परिस्थितीवरूनच विशेष बिनचूक करितां येते. सारांश; जाण्याचे मार्ग, नद्यानाल्यांमुळें पाण्याची सोय, डोंगरांची गर्दी, त्यामुळें लढाईच्या प्रगतींत येणारे व्यत्यय वगैरे गोष्टींचा उलगडा या भौगोलिक परिस्थितीवरून करून घेतां येतो. परंतु एवढें मात्र लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, या भौगोलिक परिस्थितीप्रमाणें एखादा प्रसंग बरोबर ठरला म्हणजे तो बिनचुक असतोच असें नाहीं. या अप्रत्यक्ष भौगोलिक पुराव्यावरून मजकुरांतील चूक सांपडते. त्याच्या खरेपणाची ग्वाही देतां येत नाहीं.

[२] अशीं कित्येक गाणीं वगैरे रूढ झालेलीं असतात व त्यांचा परंपरेनें परिपोष झालेला असतो कीं, तीं कित्येक शतकेंच्या शतकें जिवंत राहूं शकतात. या वाङ्मयावरून आपल्याला तत्कालीन परिस्थिति समजूं शकते. लिखित वाङ्मयाचा जो आपणांस इतिहासांतील दृष्टि समजून घेण्यास फायदा होतो

तोच या वाङ्मयापासूनही होतो. परंतु या अलिखित वाङ्मयांत अडचण अशी असते कीं, असल्या वाङ्मयाचा नक्की रचनाकाल समजत नाहीं व त्यांत बरेच फेरबदल होण्याचा संभव असल्यानें त्या वाङ्मयांत ग्रंथित केलेली परिस्थिति नक्की कोणत्या कालाची तें ठरविणेंच अवघड असतें. त्यामुळें या वाङ्मयाचा फक्त इतिहासकालीन अजमासानें परिस्थिति समजून घेण्यापुरताच उपयोग करावा लागतो. ज्या कालाचा इतिहास सांगणारीं लिखितसाधनें उपलब्ध नसतात त्या कालांतील इतिहासाला अशा अप्रत्यक्ष पुराव्यांवरच अवलंबून रहावें लागतें. परंतु जेथें साधनें उपलब्ध असतील तेथें अशा पुराव्यांचा फारसा उपयोग करून घेतां येत नाहीं. परंतु ज्या वेळीं लोकांच्या चालीरीति वगैरेंचाच इतिहास लिहावयाचा प्रसंग असतो त्या वेळीं इतर उपयुक्त व आधारभूत साधनांच्या अभावीं ह्या साधनांचाच मुख्यतः उपयोग करणें भाग पडतें.

[३] पुराण-वस्तुसंशोधनानें अगदीं पुराणकालच्या इतिहासासच फायदा होऊं शकतो. ज्या वेळीं इतर साधनें उपलब्ध नसतात तेव्हां त्या वेळच्या इतिहासाबद्दल तर्क करण्यास या वस्तूंचा प्रत्यक्ष पुरावा असतो. परंतु ज्या काळचा इतिहास आपणांस प्रत्यक्ष पुराव्यांनीं उपलब्ध होत असतो त्या वेळीं ह्या साधनांना फारसें महत्त्व रहात नाहीं. फक्त कला वगैरेंच्या दृष्टीनें किती प्रगति झाली तें ठरविण्यास तीं साधनें उपयुक्त असतात.

[४] परंपरेची माहिती प्रथम कितीही युक्त व खरी असली तरी ती कालांतरानें बरीच बदलते व असें झालें म्हणजे तिला दंतकथेचें स्वरूप येतें. कांहीं वेळां या दंतकथांतील मुख्य व्यक्तींचीं नांवेंही बदलतात व दुसऱ्याच कोणाच्यातरी नांवानें त्या चालू राहातात. केव्हां केव्हां तर या दंतकथांचें स्वरूप अगदीं यक्षिणीच्या गोष्टींच्या स्वरूपांत जाऊन दाखल होतें. म्हणून जोंपर्यंत एखाद्या घराण्यांतील परंपरेच्या माहितींत विकृतावस्था प्राप्त झालेली नसते तोंपर्यंत तिचा उपयोग निदान इतिहासाची रूपरेषा अजमावण्याकडे तरी करतां येतो. परंतु या परंपरा दंतकथा होऊन त्याही विकृतावस्थेप्रत जातात तेव्हां त्यांचा उपयोग करणें अनिष्ट असतें. सारांश, अप्रत्यक्ष पुराव्यांचा उपयोग फक्त उपकारक साधनांसारखा करतां येतो; त्यावरून शिवकालीन इतिहासरचनेस प्रत्यक्ष मदत होऊं शकत नाहीं.

येथपर्यंत साधनांचें सामान्य स्वरूप व त्यांचा उपयोग यांचा विचार झाला. साधनांचें सकृद्दर्शनीं परीक्षण केलें म्हणजे त्यांतील मजकूर उपयोगांत आणण्याइतका बिनचुक अगर उपयुक्त ठरतोच असें नाहीं. साधनांच्या योग्यतेनें आपणांस फक्त विश्वसनीयतेचें प्रमाण ठरवितां येतें. मजकुरांतील विश्वसनीयता शोधून काढण्यासाठीं मजकुराचें परीक्षण स्वतंत्रपणेंच करणें जरूर असतें. हें परीक्षण करतांना लेखकाचें व लेखाचें अंतरंग तपासावयाचें असतें. आणि ही तपासणी करण्याचे मार्ग मनुष्याच्या कमीअधिक निर्णायक बुद्धीवरच विशेष अवलंबून असतात. यास सामान्य नियमांचें बंधन फारसें घालतां येत नाहीं. कोणत्याही निर्बंधानें तपासणीचें कार्य करणेंही शक्य नसतें. तथापि निर्णायक बुद्धीला चालना व नियंत्रण करणारे कांहीं सामान्य मुद्दे सांगतां येण्यासारखे असतातच. त्यांचाच पुढील भागांत विचार करूं.

## २५ ऐतिहासिक पुरावे

ऐतिहासिक पुरावे विविध असून त्यांचें इतिहासरचनेंतील महत्त्वही विविध प्रकारचें आहे. ऐतिहासिक पुराव्यांचे मुख्यतः दोन भाग पडतातः [१] प्रत्यक्ष पुरावे व [२] अप्रत्यक्ष पुरावे. प्रत्यक्ष पुराव्यांत सर्व लेख-संग्रहांचा समावेश होतो. ज्या लेखांत लिहिणारा कांहींतरी ऐतिहासिक कालाविषयीं सांगतो असे सर्वच लेख इतिहासाचे पुरावे म्हणून ठरतात. मग अशा लेखांत सत्यता असो वा नसो, त्यांत सांगणारा जाणूनबुजून खोटें सांगत असो अगर अज्ञानानें लिहीत असो, परंतु तो कांहींतरी सांगत असतो व त्यावर इच्छित वाचकांनीं विश्वासावें अशी त्याची इच्छा असते. म्हणून या प्रत्यक्ष पुराव्यांखालीं सरकारी खास पत्रांपासून तों थेट खासगी सर्व प्रकारच्या कागदपत्रांचा समावेश होतो. अप्रत्यक्ष पुराव्यांत इतिहास सांगण्याचा आशय नसतो. परंतु अशा पुराव्यांवरून इतिहासांतील प्रत्यक्ष पुरावे पडताळून पाहतां येतात. यांत किल्ले, शहरें, गांवागांवांतील अंतर, डोंगर, नद्या वगैरेंचा समावेश होतो. तसेंच यांत दंतकथा, गोष्टी वगैरेंचाही समावेश करणें रास्त होतें.

प्रत्यक्ष पुरावा देणारे साक्षीदार पुरावा देतांना त्यांचेवर आपण विश्वासावें अशीच इच्छा धरतात. परंतु मानवी कृत्यांवर कितपत विश्वासावयाचें हा

व्यवहारांतही हरघडीं आपणांपुढें प्रश्न उभा राहात असतो. मनुष्याच्या हातून अज्ञानानें अगर कांहीं उद्दिष्ट साधण्याच्या हेतूनें चुका होणें साहजिक असतें. त्यामुळें ऐतिहासिक पुराव्यांतही खरेखोटेपणाबद्दल विशेष चौकशी करून घेणें भाग पडतें. कोणत्याही पुराव्यांचें परीक्षण करतांना मुख्य सहा प्रश्न आपणांपुढें उभे राहतातः [१] आपला साक्षीदार ज्या विषयाबद्दल पुरावा सांगतो त्या विषयांतील सत्य किंवा खरी वस्तुस्थिति माहिती असण्याची संधि किंवा साधनें त्याला प्राप्त होतीं किंवा कसें ? [२] जर त्यानेंच ती माहिती प्रत्यक्ष पाहून दिली असेल तर ती त्यानें बिनचूक व पूर्णपणें पाहिली आहे काय ? [३] माहिती देतांना जी गोष्ट पाहिली अगर ऐकिली ती त्याला पूर्णपणें व बिनचूक समजली आहे काय ? [४] साक्षीदार खरें सांगणारा आहे काय ? [५] साक्षीदार मुद्दाम खोटें सांगण्याचा संभव आहे काय ? [६] साक्षीदाराचा त्यांत बराबाईट हितसंबंध आहे काय ? अशाच तऱ्हेची आणखीही प्रश्नावली उभी राहून तिचें समाधानकारक उत्तर मिळालें कीं मग आपला त्या साक्षीदाराचे सांगण्यावर विश्वास बसतो. न्यायासनासमोर येणाऱ्या साक्षीदाराला आणखी कांहीं प्रश्न विचारून साक्षीदाराचा खरेखोटेपणा सिद्ध करण्यास मार्ग असतो. ऐतिहासिक पुराव्यांत जें कांहीं प्रश्न करावयाचे ते आपले आपणच करून त्यांचीं उत्तरेंही त्याच लेखांतून आपलीं आपणांलाच घ्यावीं लागतात. तसेंच साक्षीदार प्रत्यक्ष येऊन सांगत नाहीं. तो लेखरूपानें आपला पुरावा मागें ठेवीत असतो. त्यामुळें लेखही प्रत्यक्ष साक्षीदाराचाच आहे किंवा नाहीं हेंही तपासणें जरूर पडतें. जर लेख अस्सल किंवा मूळ नसेल तर त्या लेखांत नंतरही चुकीचा मजकूर शिरणें शक्य असतें. त्यामुळें मूळ साधनांचें परीक्षण करणें जरूर होतें. परंतु असें परीक्षण करण्याच्या पद्धतीचें सर्वांनाच ज्ञान असण्याची जरूर असतेच असें नाहीं. मूळ साधनें संशोधन करून ज्याला कार्य करावयाचें असतें त्याची गोष्ट वेगळी. सर्वांनाच मूळ साधनांच्या परीक्षणाला अवसर मिळत नाहीं. त्याला नेहमींच उपलब्ध व प्रकाशित साधनांच्या अभ्यासावरच निर्वाह करावयाचा असतो. त्यामुळें प्रकाशित झालेल्या साधनांचेंच अंतरंगपरीक्षण करावयाचा एकच मार्ग आक्रमावयाचा असतो. परंतु असल्या परीक्षणास साधनांची भाषा, तत्कालीन प्रघात, शब्दांचे प्रयोग वगैरे जाणणें जरूर

असतें. केवळ वर्तमानकालीन भाषेच्या प्रचाराबरून इतिहासकालीन साधनें वाचणें बरेंच धोक्याचें होतें.

ऐतिहासिक प्रत्यक्ष पुरावा देणाऱ्या साधनांतही दोन विभाग पडतातः [१] प्रत्यक्ष पाहून अगर अनुभवून लिहिलेलीं साधनें, व [२] ऐकून अगर माहिती मिळवून प्रसंगांचा तपशील देणारीं साधनें. पहिल्या प्रकारच्या साधनांचें परीक्षण फारसें कठीण जात नाहीं. परंतु दुसऱ्या प्रकारच्या साधनांच्या परीक्षणांत बरीच खबरदारी घेणें जरूर पडतें. कोणतेंही साधन परीक्षणासाठीं आपल्यासमोर येतांच मुख्य प्रश्न समोर उभा राहतो कीं, जें साधन आपल्या समोर आहे तें मूळ लेखकांनीं जें लिहिलें तेंच आहे काय ? तेंच असेल तर त्यांतील लेखन-पद्धति, भाषा, जुनेपणा, सांपडण्याचें ठिकाण, त्या ठिकाणीं कां आलें वगैरे प्रश्नांचीं आपणांस आपोआपच समाधानकारक उत्तरें मिळूं शकतात. एकदां कां तें साधन मूळच ठरलें म्हणजे मग लेखाच्या अंतरंगाकडे लक्ष वेधतें. अंतरंग तपासूं लागलों म्हणजे पुन्हा एक प्रश्नावलि समोर येते कीं, [१] लेखक सांगतो काय किंवा लेखकाचा सांगण्याचा झोंक अगर हेतु कोणता आहे ? [२] तो जें सांगतो त्याचेवर त्याचा विश्वास आहे काय ? व [३] विश्वास असल्यास तो त्याबर सकारण विश्वास ठेवीत आहे काय ? हे व अशा तऱ्हेचे आपण शोधक प्रश्न केले म्हणजे आपण अगदीं लिहिणाराच्या मनःस्थितीपासून तों थेट आपल्या हातांत साधन येऊन पडेपर्यंतचा सर्व इतिहास आपल्या डोळ्यांसमोर आणीत असतों. आपल्या शोधक प्रश्नांना जितकीं समाधानकारक उत्तरें मिळतील त्या मानानें त्या साधनांतील प्रामाण्य कमीअधिक ठरत असतें. परीक्षणास घेतलेला लेख जर मूळ लेख नसेल तर तो मूळ लेखाची बिनचुक नकल असूं शकेल काय ? तो मुळानंतर किती कालानें नकल केला गेला ? हा दरम्यानचा काल जितका अधिक तितका नकलेंत दोष येण्याचा संभव अधिक असतो. म्हणून जर नकल कालावधीनें केली गेली असेल तर त्यांत कोणते दोष शिरले आहेत ? नकलेंत मूळ भाग राहिला आहे किंवा नाहीं ? वगैरे अनेक तऱ्हेचे प्रश्न उपस्थित करून नकल तावून सुलाखून घेतली म्हणजे मग अंतरंग-परीक्षणाला सुरुवात करितां येते. या अंतरंग-परीक्षणांत वर दिलेली साक्षीदाराची पात्रता, इमान, बिनचुकता, खरें सांगण्याचा उद्देश वगैरे गोष्टी येतात.

ऐतिहासिक प्रसंगाचें निवेदन करणारा पुरावा जरी एखादाच मिळत असला तरी इतिहासांत अगदीं क्वचितच असे प्रसंग असूं शकतील कीं, त्याला एकापेक्षां अधिक साक्षीदार असूंच शकत नाहींत. परंतु जेथें एकापेक्षां अधिक साक्षीदार असतात त्याच्या प्रसंगनिवेदनांत तीन तऱ्हा दृष्टीस पडणें शक्य असतें: [१] सर्वांची प्रत्येक तपशिलांत अगदीं एकवाक्यता असते, [२] सर्वांची प्रत्येक तपशिलांत मतैक्यता नसते, किंवा [३] सामान्यतः जरी एकवाक्यता असली तरी कोठें कोठें मतभेद व तपशिलांत भिन्नत्व असूं शकतें. ज्या ठिकाणीं सर्वच साक्षीदार बिनचूक सारखाच तपशील देतात त्या वेळीं ते सर्व साक्षीदार निरानिराळे आहेत, कां एकाचेच अनुवादक आहेत हें तपासावें. बहुधा ते सर्व एकाचेच अनुवादक असल्याचें आढळून येईल. जेथें प्रत्येक तपशिलांत मतैक्यता नसते तेथें कोण खरा व कोण खोटा हें शोधणें शोधकाच्या माहितीवर व निर्णायक शक्तीवर अवलंबून राहतें. अशा वेळीं ज्या कारणाकरितां एक तपशील मान्य होतो त्याच कारणांकरितां दुसरा नेहमींच अमान्य करण्यांत येत असतो. कित्येक वेळां तसें करण्यास आणखी प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष पुरावाही मिळतो. जेथें प्रसंगांत सामान्यतः एकवाक्यता असून बारीकसारीक तपशिलांत भिन्नता असते तेथें फारशी अडचण येत नसते. नेहमींच कोणीही दोन प्रत्यक्ष साक्षीदार एकच प्रकारानें प्रसंग सांगतांना क्वचितच आढळूं शकतात. प्रसंगांतील एखादी बारीकसारीक बाब एक काळजीपूर्वक न्याहाळून पाहील तर दुसरा त्याकडे दुर्लक्ष्य करील. एखाद्याला एखाद्या बाबींत विशेष महत्त्व वाटेल तर दुसऱ्याला त्यांत वाटणार नाहीं. परंतु अशा भिन्नत्वामुळें पुराव्यांत कोणत्याही तऱ्हेनें कमीपणा येत नाहीं. ज्या गोष्टींत भिन्नत्व असेल त्यांतील परीक्षण करून निर्णय करणें परीक्षकाचें काम असतें. ज्या वेळीं असा निर्णय देणें शक्य असेल तेथेंच फक्त निर्णय द्यावा. नाहींतर ते तपशील तसेच आणखी पुराव्यांचा आधार मिळवीपर्यंत विचारांत ठेवावेत.

परंतु कोणतेंही ऐतिहासिक साधन मिळालें म्हणजे तें मान्य करण्याकडेसच विशेष कल असतो. याला कदाचित् आळस हें एक मुख्य कारण असूं शकेल. परंतु विशेषतः एखाद्या साधनाची चिकित्सा करण्यापेक्षां त्यावर विश्वास ठेवणें फार सोपें असतें. त्या साधनावर टीका करण्यापेक्षां तें मान्य

करणें योग्या त्रासाचें असतें. साधनांची निवडानिवड करण्यापेक्षां तीं संकलित करणें अधिक बरें जातें. एकतर असली निवडानिवड करून जवळील साधनांची संख्या कमी करण्यापेक्षां त्यांच्या संख्यांकावर समाधान मानण्याकडे मनुष्याची किंवा संग्राहकाची प्रवृत्ति असणें साहजिक असतें. व्यवहारांतील अनुभव पहा. दररोज सांगितल्या जाणाऱ्या कितीतरी गोष्टी अगदीं असत्य ठरत असतात. मात्र सामान्य प्रवृत्ति अशीच दिसून येईल कीं, सांगितल्या जाणाऱ्या प्रत्येक गोष्टीवर फारशी चिकित्सा न करितां विश्वास ठेवावयाचा. अगदीं महत्त्वाच्या गोष्टींत चांगलीं नेणतीं माणसेंही कसे विश्वास ठेवतात याचा प्रत्यंतर पुरावा कित्येक सभांतील ठरावांवरून व वर्तमानपत्रांतील मोठ्या कळकळीच्या लेखांवरून स्पष्ट होतो. हा जसा मनुष्यस्वभाव आज आढळून येत आहे, त्याचप्रमाणें तो पूर्वीही होता हें विसरून चालणार नाहीं. अर्थात् अशा तऱ्हेनें जीं साधनें लिहिलीं जातात त्यांचा उपयोग इतिहासांत करितांना तो मात्र तितक्या बेफिकिरीनें करतां येत नाहीं. कारण व्यवहारांत ज्या गोष्टींचा उपयोग होत असतो त्या आपणांस तपासून घेतां येतात. इतिहासकालाचा पुरावा एकदां मान्य करून घेतल्यास तो पुन्हा तपासून घेण्यास सर्वांनाच साधनें सांपडतात अशांतला भाग नाहीं. परंतु आतांपर्यंत साधन-छपाईत सर्वच संग्राहकांनीं ही चिकित्सक दृष्टि ठेवलेली नाहीं. जें साधन प्रथम हातीं आलें तें छापून काढलें आहे. इतकेंच नव्हे, तर जें साधन विशेष स्पष्ट व सुबोध होतें, तेंच छापण्याकडे आपला कल ठेविला होता. कोणतेंही साधन छापतांना होतांहोईतों प्रमाणभूत असाच लेख वाचकांच्या हातीं देणें योग्य आहे आणि अशा तऱ्हेच्या प्रयत्नास सुरुवात झालीही आहे. परंतु असें करण्यास लेखपरीक्षण कसें करावें हें प्रथम अभ्यासावें लागतें.

## ३६ लेखांचें सामान्य परीक्षण

जो लेख साधनरूपानें आपणांसमोर आला तो अस्सल अगर मूळ लेखकानें लिहिलेलाच आहे किंवा नाहीं, किंवा तो त्याची नक्कल किंवा नकलेवरून नकल केलेला आहे हें तपासलें म्हणजे मग त्याप्रमाणें लेखकाच्या मनोगताबद्दल विचार करणें सोपें जातें. लेख अस्सल अगर मूळ लेखकाचाच असेल तर लेखनांतरंग तपासण्यास तत्काळ सुरुवात करतां येते. परंतु

तो नकल असेल तर प्रथम त्या लेखांतील मूळ मजकूर शोधून काढावा लागतो. ऐतिहासिक लेखांचे यासाठीं तीन प्रकार करूः [१] अस्सल किंवा मूळ साधनें किंवा लेख, यांत लेखकाचा मूळ आशय कायम असतो. [२] मूळ गहाळ झालेलें असून ज्याची एकच नकल उपलब्ध आहे अशीं साधनें किंवा लेख. नकल म्हटली कीं त्यांत चुका असण्याचा संभव फार. अशा चुका होण्याचीं अनेक कारणें असतात. कित्येक वेळां नकलकार परंपरेच्या माहितीवर विश्वसून मुळांत चुकीनें अगर जाणूनबुजून सुधारणा करतो. मुळांतील मजकुराची गफलत अगर सुधारणा हेतुपुरःसर केली जाते. हस्तदोषाच्या, वाचनाच्या, वगैरे स्वाभाविक चुका नकलकाराच्याकडून होत असतात. मजकूर न लागल्यास तो सुधारून लिहिला जातो. एकच नकल उपलब्ध असेल तर फक्त कांहीं वाचनाच्या अगर लेखनदोषाच्या बारीक-सारीक चुका सुधारतां येणें शक्य असतें. इतर दोष शोधून काढतां येत नाहींत. वाचनाचे अगर लेखनाचे दोष शोधून काढण्यास [अ] तत्कालीन भाषेचा व भाषेंतील विवक्षित प्रचारांचा चांगला अभ्यास झालेला असावा लागतो, [आ] तत्कालीन लिपीचें व वळणाचें चांगलें ज्ञान झालें असावें लागतें, व [इ] साधनांच्या नकला करितांना कोणते हस्तदोष व वाचन-दोष होऊं शकतात व कोणती वाक्यरचना नकलकारांना घोंटाळ्यांत टाकते यांचे आडाखे अवगत करून घ्यावे लागतात. नकलांचें वाचन सुधारून बसविलें म्हणजे त्या छापतांना सुधारलेल्या स्थितींत छापणें योग्य नसतें. कारण कित्येक स्थळीं आपलें अनुमानही चुकीचें असण्याचा संभव असतो. म्हणून मूळ नकल जशी उपलब्ध झाली असेल तशीच देऊन नंतर शेवटीं आपल्या सुधारणा द्याव्यात. [३] ज्या लेखाचें मूळ हरवलें आहे परंतु नकला मात्र विविध आहेत असे लेख. या लेखांचें मूळ शोधून काढण्याची बरीच आशा धरतां येते. परंतु अशा वेळीं जी नकल प्रथम हातीं येते, तीच खरी मानण्याचा एक स्वाभाविक ओढा असतो. जर निरनिराळ्या कालच्या नकला असतील तर त्यांत जी कालानें जुनी तीच मान्य धरण्याचा कधीं कधीं कल असतो, किंवा सर्व नकला एकत्र करून त्यांतील जो पाठ बऱ्याच नकलांत आढळतो तो पाठ ग्राह्य मानला जातो. प्रथम हातीं आली म्हणून ती नकल खरी मानणें हें तर संशोधनाच्या उद्देशालाच सोडून आहे. काल-

मर्यादेनें एखादी नकल जुनी ठरली म्हणजे ती खरी किंवा मुळाला अधिक धरून आहे असेंही मानणें कांहीं प्रसंगीं चुकीचें ठरतें. जी नकल जुनी ती मुळाला धरून अधिक असावयाची हा सामान्य नियम आहे खरा; परंतु एखादी उशिरां केलेली नकल खास मुळावरूनच केली जाऊन अधिक शुद्ध व प्रमाणभूत असणेंही शक्य असतें. बहुमतांवर निर्णय देणें तर अगदींच चुकीचें असतें. कारण हें बहुमत बहुधा एकाच मताची नकल असते. अर्थात् असलें बहुमत जमेला न धरितां तें एकच मत जमेला धरून दुसऱ्या मतांशीं त्याची तुलना करावी व नंतर त्यांतील त्याज्यात्याज्य कोणतें हें त्यांतील मजकुरावरून ठरवावें. हीच खरी पद्धति होय. ज्या वेळीं विविध नकला उपलब्ध असतील त्या वेळीं त्या नकलांचें परीक्षण करतांना प्रथम एकाच जातीच्या नकला निरनिराळ्या कराव्यात. नंतर नकलांतील माहितीच्या परंपरेवरून व मजकुराच्या लेखनशैलीवरून या निरनिराळ्या जाती कोणा-कोणापासून उत्पन्न झाल्या तें तपासावें. अशा प्रकारें छाननी झाली व मुळापासून या सर्व नकला जमेस धरून त्यांचा एक वंशवृक्ष तयार केला म्हणजे मूळ भावंडांची तुलना करून अधिक सप्रमाण व शुद्ध वाटेल तिला वडिलकीचा मान द्यावा. एकाच साधनाच्या पुष्कळ नकला मिळाल्यानें, त्यांची तुलना करितां येते व त्यांतील हस्तदोष, शब्द व वाक्यलोप, व विशेषतः घुसडून दिलेले पाठभेद वगैरे चुका सहज सुधारतां येतात. परंतु नकलांचें परीक्षण न करितां एखादीच नकल चांगली म्हणून छापली जाते तेव्हां मात्र अभ्यासास फार जड जातें. नकलांतील मुख्य पाठ देऊन इतर सर्व दुरुस्त्या टिपेंत दाखविल्यास त्या साधनांचा अभ्यास करणें फार सोईचें होतें.

कोणत्याही लेखाच्या सामान्य परीक्षणानें लेखकाचा हेतु कोणता हें समजतें. मूळ शोधून काढण्याच्या दृष्टीनें लेख जितका शुद्ध होईल तितका शुद्ध करण्याची खटपट करावयाची असते. त्यांत नवीन मजकूर घालावयाचा नसतो, किंवा मूळ लेखनाची पूर्तता किंवा शुद्धीही करावयाची नसते. परंतु कोणत्याही साधनाची नकल शुद्ध करण्याचा कितीही प्रयत्न केला तरी तिला मूळ साधनाची जागा भरून काढतां येत नाहीं. अशा शुद्धीकरणांतही कांहीं दोष शिरणें शक्य असतें. शिवाय नकलांची तपासणी कितीही केली व मूळ

पाठ शोधून काढण्याची कितीही खटपट केली तरी त्या तपासणीनें अगर खटपटीनें मूळ पाठ निश्चितपणें समजणें अगदीं अशक्यच असतें.

कित्येक वेळां असें आढळण्यांत येतें कीं, एखाद्या साधनांतील जितका जुळता मजकूर मिळतो तितक्याचाच स्वीकार केला जातो, व न जुळता मजकूर किंवा आपल्या प्रतिपाद्य विषयाच्या विरुद्ध असलेला मजकूर गाळून टाकला जातो. विरुद्ध भासणाऱ्या मजकुराची छाननी करतां आली नाहीं किंवा त्याची इतिहासांतील जागा सांपडली नाहीं म्हणून मजकूर सोडल्यानें सर्वांचीच फसवणूक केली जाते व अभ्यासूंचें कामही अधिक कठीण होतें. क्वचित्-प्रसंगीं ज्या मजकुराची जुळणी करणें कठीण वाटतें तोच मजकूर दुसऱ्या एखाद्या अभ्यासूला लावतां येऊन त्याचा इतिहासांत फारच चांगल्या रीतीनें उपयोग करितां येणें शक्य असतें. म्हणून कोणत्याही साधनांत अशा तऱ्हेचा मजकूर आढळल्यास तो गाळणें केव्हांही योग्य नसतें. कोणतेंही साधन इतिहासास उपयुक्त मानावयाचें तर त्यांतील सर्वच मजकुराचा परिपोष घेतला पाहिजे.

## ३७ लेखकांची पात्रापात्रता

कोणत्याही साधनाच्या सामान्य परीक्षणानंतर अंतरंग-परीक्षणास सुरुवात करितांना जें साधन तपासावयाचें तें जर पूर्ण असेल तर त्याचें खरें अंतरंग शोधतां येतें. अंतरंगाची तपासणी करण्याच्या सुरुवातीस लेखाचें लेखन जो कोणी करितो त्याचें अंतरंग प्रथम ओळखतां आलें पाहिजे. म्हणजे लेखकाची पात्रापात्रता समजल्याशिवाय त्याच्या लेखाचें प्रामाण्याप्रामाण्य ठरवितां येत नाहीं. लेखकाच्या पात्रापात्रतेवरच लेखाचें प्रामाण्याप्रामाण्य अवलंबून असतें. एखादें साधन अस्सल असलें परंतु लेखक माहिती सांगण्याच्या दृष्टीनें अपात्र किंवा गैरमाहितगार असला तर त्या साधनाला मुळींच किंमत राहणार नाहीं. ज्याला एखादा प्रसंग माहीत नाहीं किंवा माहीत असण्याचा संभव नाहीं अशा माणसानें लिहिलेल्या माहितीवर विश्वास ठेवणें बेडेपणाचेंच ठरतें. म्हणून कोणतेंही साधन हातीं आलें म्हणजे तें कोठें उपलब्ध झालें ? त्याचा लेखक कोण ? त्याचा लेखनकाल कोणता ? लेखकानें जी माहिती लिहिली ती त्याला समजण्याइतका त्याचा संबंध आहे काय ? तो ती माहिती बिन-

चूक समजण्या व लिहिण्याइतका सुबुद्ध आहे काय ? वगैरे गोष्टींचा आपण तपास लावून घेतला पाहिजे. लेखाचा लेखक कोण हें न समजेल तर त्या साधनाला पुरावा म्हणून तेवढी किंमत देतां येत नाहीं. फार तर त्याचा उपयोग उपकारक साधनांसारखा करितां येईल. सरकारी पत्रांतूनही जो अधिकारी पत्र लिहितो त्याचें नांव व पत्ता जर समजेल तर त्या लेखांत लिहिलेली माहिती मिळण्याचे त्याला मार्ग कोणते व ते मार्ग तितके अव्वल होते किंवा नाहीं हें त्याच्यावरून समजूं शकतें. लेखकाचें नांव समजण्याचा मुख्य हेतु असा असतो कीं, त्याच्यावरून आपणांस माहिती मिळविण्याच्या मार्गाचा बोध व्हावा व त्यायोगें माहिती किती अव्वल दर्जाची मानावी हें समजून यावें. लेखकाचा पत्ता न लागेल तर तें साधन जी माहिती देतें त्यांत सत्यार्थ किती आहे हें समजण्याचा मार्ग नसतो. विशेषतः बखरीसारख्या चरित्रग्रंथांचें प्रामाण्य तर केवळ लेखकाच्या पात्रतेवर व माहितीच्या साधनांवर अवलंबून असतें. लेखकाचा संबंध जसजसा अधिकाधिक शाबीत होत जाईल तसतसें त्याच्या लेखाला प्रामाण्य वाढत जाईल. लेखकाचा पत्ता नच लागला, पण निदान साधन-लेख कोणाला किंवा कोणासाठीं लिहिला आहे हें जरी समजलें तरी त्यावरून म्हणजे ज्याच्यासाठीं माहिती लिहिली त्याच्या दर्जावरून तरी लेखकाचा थोडाबहुत हेतु अजमावितां येतो. माणसाच्या व्यक्तिविषयक नांवापेक्षां जर त्याचा हुद्दा समजूं शकेल तर तें अधिक श्रेयस्कर असतें. हा हुद्दा कित्येक वेळां साधनांच्या प्रकाराबरून ओळखतां येतो. लेखकाची पात्रापात्रता जशी त्याला माहिती मिळण्याच्या मार्गावरून ठरवितां येते त्याचप्रमाणें ती तो ज्या मनःस्थितींत ती माहिती लिहितो अगर मिळवितो त्यावरूनही कमीअधिक ठरते. नोकर भीतीमुळें स्वतःचा अपजय धन्याला लिहिणार नाहीं किंवा अपमानाचा प्रसंग कळविण्याचें धाष्टर्य एखाद्याला होणार नाहीं. अर्थात् जरी या बाबतींत त्याला पूर्ण माहिती असली तरी तो ती बातमी देण्यास पुरावा या दृष्टीनें अपात्र होय. स्वार्थपरायणतेवरूनही लेखकाला पात्रापात्रतेंत कमीअधिक दर्जा प्राप्त होतो. म्हणून लेखकाची पात्रापात्रता ठरवितांना जसा त्याचा सामान्य दर्जा व संबंध पाहण्यांत येतो त्याचप्रमाणें त्याचे हितसंबंधही विचारांत घ्यावे लागतात. लेखकाची पात्रता ठरली, कीं लेखाच्या प्रामाण्या-

पेक्षां लेखकाचा खरा लेखनहेतु ओळखतां येतो व लेखकाचें मनोगत समजलें कीं, लेखाच्या पुढील अंतरंगतपासणीस सुलभ जातें.

## ३८ लेखकांचे सामान्य दोष

कोणी कसाही लेखक असो, त्याच्या लिहिण्यांत कांहीं स्वभावदोष व तसेच समजुतीचे दोष शिरणें अगदीं स्वाभाविक असतें. लेखक एखादी गोष्ट प्रत्यक्ष पाहून लिहिणारा असो किंवा ऐकून लिहिणारा असो त्यांत त्याचा स्वतःचा अभिप्राय म्हणा किंवा स्वतःची सुधारणा म्हणा तो घालीतच असतो. लेखक प्रत्यक्ष साक्षीदार असला तरी तो बिनचूक पाहून लिहिणारा आहे किंवा नाहीं हाही एक प्रश्न असतो. कोणतीही गोष्ट बिनचुक व अगदीं तपशिलवार पहाण्यास एक प्रकारची संयम लावून घ्यावी लागते. नुसती दृष्टि उत्तम असल्यानें भागत नाहीं. जें पाहिलें तें सर्व स्मरणांत ठेवतां आलें पाहिजे. याला अभ्यास लागतो. नेहमींच्या अनुभवावरून असें अनुमान करण्यास हरकत दिसत नाहीं कीं, कोणाही मनुष्याचें मुद्दाम लक्ष वेधल्याशिवाय तो भोंवतालील अनेक हालचालींकडे दुर्लक्षच करीत असतो. म्हणून एखाद्यानें एक गोष्ट पाहून नमूद केली व दुसऱ्यानें ती न केली तर तिच्याबद्दल अविश्वास धरण्याचें कारण नसतें. परंतु एखादी गोष्ट न पाहिली जाण्यांत दोष उत्पन्न होतो तो मात्र जेव्हां लेखक जाणूनबुजून कांहीं गोष्टींकडे दुर्लक्ष करितो तेव्हां. कागद-संग्रह चाळतांना लेखकाची नेहमींच अशी दृष्टि राहाते कीं, त्यांतील त्याच्या मर्यादित विषयापुरता व त्याला ज्या बाबीचें महत्त्व वाटतें तितक्याच बाबी-पुरतें पुराव्यांचें परीक्षण करावयाचें. आपल्या विषयांतील वादांतील मुद्दयांच्या प्रत्यक्ष विरुद्ध अगर बाजूचे पुरावे असतील तितक्यांचाच तो विचार करितो. त्यावर प्रकाश पाडणाऱ्या इतर उपसाधनांच्या अप्रत्यक्ष पुराव्यांचा तो विचारच करीत नाहीं. कदाचित् अशा पुराव्यांवरून त्याला निश्चित कांहींतरी निर्णया-त्मक समजूंही झकलें असतें; परंतु तो दुर्लक्ष करीत असतो हें मात्र खरें. असें करितांना तो तें बुद्धिपुरःसर खोटें करण्याच्या उद्देशानें करीत नसतो हेंही तितकेंच खरें असतें. परंतु हा बौद्धिक दोष मनुष्यांत आढळतोच.

लेखक पुरावा देतांना कांहीं वेळां सत्य लपविण्याचा अगर त्यावर कांहीं तरी मल्लिनाथी करून विपरीत भासविण्याचा प्रयत्न करितो. अशा वेळीं तो

एखाद्या तत्त्वाविरुद्ध असतो अगर एखाद्या मनुष्याशीं त्याचा बेबनाव असतो, अगर त्याचा त्यांत कांहींतरी हितसंबंध असतो. लेखकाच्या आपलेपणाच्या वगैरे अभिप्रायाव्यतिरिक्त तत्त्वसिद्ध निःपक्षपाती लेख सांपडणें अगदीं विरळाच शक्य असतें. कोणत्याही प्रसंगनिवेदनांत स्वभाववर्णन किंवा कारण अगर फलनिष्पत्तीचें विवेचन केलें जातेंच. विशेषतः मोठ्या महत्त्वाच्या कालांनीं मर्यादित अशा इतिहासांत जर असें विवेचन केलें गेलें नाहीं तर त्या इतिहासांत जिवंतपणाही राहणार नाहीं. मुख्यतः असें करण्यांत लेखक कोणती तरी बाजू आपलेपणानें मांडीतच असतो. जोंपर्यंत लेखक सर्व प्रसंगांचा तपशील पूर्णपणें व निःपक्षपातानें देत असतो तोंपर्यंत त्यानें त्यावरून काढलेल्या आपलेपणाच्या विधानांवरून त्याचेवर खोटेपणाचा आरोप येऊं शकत नाहीं. खरें म्हटलें तर इतिहासांत ही बाब उपकारच असते. परंतु तो जर तसें करितांना तपशिलाकडे दुर्लक्ष करील किंवा कोणावर कांहीं मुळांत नसलेले उद्देश लादील तर तो पक्षपात ठरेल. अशा वेळीं दोन गोष्टी शक्य असतात. एखाद्या गोष्टींतच पक्षपात दिसून येतो किंवा सर्वत्र पक्षपात आढळतो. जर एखाद्या गोष्टींतच पक्षपातीपणाचें विवेचन आढळून आलें तर त्यामुळें सर्व तपशील अविश्वासाई ठरणार नाहीं. परंतु सर्वच तपशिलांत असा पक्षपातीपणा दिसून आला तर तो साधनलेखक सामान्यतः विश्वासाई नाहीं असेंच ठरवावें लागतें.

लेखकाला बरेच वेळां तपशिलांत फरक न करितां त्यांतील महत्त्व कमीजास्त करितां येतें. लेखक कित्येक वेळां आपल्या उपयोगी पडतील असेच पुरावे देतो व विरुद्ध असतील ते अजिबात सोडून देतो. एखाद्या घडलेल्या बाईटही गोष्टीच्या समर्थनार्थ आंगचेच उद्देश ठोकून देतात किंवा कोणताही स्वभावदोष दाखवून सर्व नाशाला तोच दोष कारण झाला म्हणून सांगण्यांत येतें. परंतु अशा तऱ्हेची एकपक्षीय अतिशयोक्ति केली गेली म्हणजे ती ओळखणेंही बरेंच कठीण जातें.

ऐतिहासिक साधनांच्या लेखकाचा लिखित बाबींत प्रत्यक्ष हितसंबंध नसेल तर तो तपशिलांत असत्य प्रकार घालण्याइतकी स्वार्थी प्रवृत्ति ठेवण्याचा उद्देश घरीत नसतो. परंतु कित्येक प्रसंगांचीं वर्णनें देतांना त्यांत भागमात्र असणारीं माणसें त्या प्रसंगांच्या वर्णनांत त्या प्रसंगांतील सर्व कर्तृत्व आपल्या-

कडेच ओढून घेतांना दिसून येतात. अशा वेळीं या एका प्रवृत्तीखेरीज लेखक जरी अविश्वसनीय माहिती देणारा नसला तरी तो विश्वास घालवतो यांत शंका नाहीं. खरें म्हटलें तर मुख्य प्रसंगाचें वर्णन हेंच इतिहासकाराला महत्त्वाचें असतें व तें त्यांत उत्तम मिळतें. म्हणून प्रथम समर्थनपर भाग सोडून देऊन तपशील कोणते तें समजून घ्यावें व नंतर त्या प्रसंगांची मांडणी कशी करावयाची तें ठरवावें. अशा वेळीं आपल्यातर्फेचें जें समर्थन केलें जातें त्याला आपण किती महत्त्व अगर ग्राह्य ठरवावयाचें हा प्रश्न अलाहिदा सोडवावा.

क्वचित्प्रसंगीं असेंही आढळून येतें कीं, लेखकाला खरी वस्तुस्थिति माहीत असली तरी तो ती न सांगतां दुसरीच एखादी बनावट आवृत्ति सांगत असतो. यांत त्याचा मुख्य उद्देश मूळ पुरावा नाहींसा करण्याचा असतो. अशा वेळीं प्रत्येक प्रसंग निरनिराळ्या इतर उपकारक पुराव्यांच्या साहाय्यानें तपासावे लागतात.

बिनचुकपणाचा अभाव व हेतुपुरःसर केलेल्या पक्षपाताखेरीज लेखकांच्या लिहिण्याला इतिहासाच्या पुराव्यांत कमीपणा आणणारें आणखी एक मनदौर्बल्य म्हणजे श्रद्धालुत्व होय. बहुधा लोक श्रद्धाळूच अधिक असतात. परंतु जे श्रद्धाळू नसतात ते संशयी व संदिग्ध असतात. ह्या दोन्हीही स्वभावांमुळें ऐतिहासिक पुरावा या दृष्टीनें त्यांच्या माहितीची तपासणी करतांना त्यांतील विश्वसनीयतेंत कमीपणा येत असतो. असे थोडेच लेखक आपल्या पाहण्यांत येतील कीं, त्यांच्यासमोर येणाऱ्या माहितीचा त्यांनीं प्रथम तुलनात्मक अभ्यास करून नंतर तिचा उपयोग केला आहे. बहुतेक सर्व लेखकांचा मिळणाऱ्या माहितीवर विश्वास ठेवण्याकडेच भर असतो. त्यामुळें त्यांच्या लिहिण्यांत अविश्वसनीय माहितीवरून किती तरी वरकरणी संभाव्य दिसणारे तपशील येऊं शकतात. अशा वेळीं इतर पुरावा मिळेल तरच ते काढून टाकतां येतात. म्हणून जेथें लेखक फाजील श्रद्धाळू दिसेल तेथें त्याच्या लिहिण्याला कमी विश्वसनीय लेखण्यापलीकडे मार्ग राहात नाहीं. परंतु दिव्यें, भुताटकी, वगैरेवर विश्वास ठेवणारा इतिहासकालीन लेखक असला तर तो मात्र या सदराखालीं येणार नाहीं. कारण आज जरी आपला असल्या गोष्टींवर विश्वास नसला तरी इतिहासकालीं सामान्यतः असल्या गोष्टींवर सर्वांचाच

विश्वास असे. तसेंच शास्त्रीय माहितीच्या अभावामुळें व शोधांची तितकी प्रगति न झाल्याभुळेंही कित्येक गोष्टी सांप्रत अगदीं चुकीच्या वाटतील, परंतु त्या तत्कालीं खऱ्या मानल्या जात होत्या. ही जोंपर्यंत वस्तुस्थिति आहे तोंपर्यंत आपणांला असल्या गोष्टी नमूद झाल्यामुळें त्या लेखकांच्या लेखाला कमीपणा मानण्याचें कारण रहात नाहीं. श्रद्धेनें किंवा सहजासहजीं निर्णय देणें यासारखा स्वभावदोष जर एखाद्या लेखकाच्या इतर लेखांवरून पडताळून पहाण्याइतके पुरावे सांपडले तरच तो दोष शोधून काढतां येतो आणि त्यावरून लेखकावर कोठपर्यंत विश्वास ठेवावयाचा तें ठरवितां येतें. परंतु हा जो स्वभावदोष आढळतो तो सामान्य असतो. तो एखाद्या बाबींत असून दुसरींत नाहीं असें होणार नाहीं. त्यामुळें जी गोष्ट पडताळून पाहतां येत नाहीं तीच फक्त अशा स्वभावदोषाखालीं घालून त्याज्य ठरवितां येत नाहीं.

साधनांच्या बहिरंगावरून जर लेखकाचे दोष सांपडत नसतील तर ते क्वचितच अंतरंग-परीक्षणानें मिळूं शकतात व त्यायोगें लिहिणाराचा आपणांस दर्जा ठरवितां येतो. प्रसंगांतील एखादाच तपशील चुकीनें वर्णन केला असेल तर ती चूक ठरते. अगदीं चांगल्या लेखकाकडूनही अशा चुका घडतात. तसेंच जर एखादा तपशील परस्परविरोधी असेल तर तेवढाच भाग चुकीचा ठरेल. त्यावरून त्या लेखकाचा स्वभावदोष ठरूं शकणार नाहीं. परंतु जर अशा चुका प्रत्येक प्रसंगांत सांपडतील तर तो लेखक निष्काळजी आहे असें ठरून त्याचा तो स्वभावदोष होईल. क्वचित्प्रसंगीं तत्कालीन समजूतही तो इमानेंइतबारें देत असण्याचा संभव असतो व ती देतांना आपणांस आजच्याएवढा पडताळून पहाण्याइतका पुरावाही नसणें साहजिक असतें. म्हणून अशा चुकांवरून लेखकाच्या माथीं स्वभावदोष घालून त्याला टाकाऊ ठरविणें योग्य नसतें.

लेखकाच्या दोषांवरून लेखाची प्रवृत्ति समजते आणि अन्तरंगपरीक्षणास जी मनःस्थिति समजावी लागते तिचाही कयास बांधतां येतो. लेखकाची प्रवृत्ति व मनःस्थिति या दोहींचा बोध झाला म्हणजे लेखांतील मजकुराच्या ग्राह्याग्राह्यतेबद्दलचा विचार करणें सोपें जातें. नंतर तपशिलांतील अधिकउणेपणाचा छडा लावण्यास ठीक पडतें. लेखकाचे विवक्षित दोष प्रथम शोधून न काढले तर पुराव्यांची खरी कसोटी त्या लेखाला लागणार नाहीं व त्या लेखांत जो कांहीं ग्राह्यांश असूं शकतो त्याचा इतिहासांत उपयोग

करणें कठीण पडेल. मात्र लेखकाची प्रवृत्ति शोधून काढतांना ती त्याची त्या लेखांत सरसहा प्रवृत्ति आहे अशी प्रथम खात्री करून घेतली पाहिजे. विशिष्ट प्रसंगांतील एखाद्या बाबीच्याच तपशिलावरून अशी सामान्य प्रवृत्ति ठरविणें धोक्याचें व अयोग्य असतें.

## ३९ काल-निर्णय

कोणत्याही लेखाची ऐतिहासिक पुराव्याच्या दृष्टीनें किंमत ठरविणारें मुख्य साधन म्हणजे लेखन-काल होय. साधन जितकें समकालीन असेल तितका त्याचा पुरावा अधिक मान्य ठरतो. एखादा लेख जर तत्कालींच लिहिला गेला असेल तर त्यांतील माहितींत सत्यता व पूर्णत्व सहज साधत असतें. त्यामुळें त्यांत गफलत होण्याचा फार कमी संभव असतो. त्यामुळें साधन हातीं येतांच त्याचा लेखनकाल शोधावा लागतो. तो जर साधनांतच दिला असेल तर सर्व खटपट मिटते. परंतु बरेच वेळां त्यांत लेखन-काल दिलेला नसतो. विशेषतः याद्या, तकरीरा, वगैरेंत व बखरींच्या नकलांत मूळ प्रतीचा लेखन-काल दिलेला असतोच असें नाहीं. अशा वेळीं साधनांचा काल-निर्णय करणें तो [१] कागदाचा जुनेपणा, [२] शाईचा जुनेपणा, [३] लिपीच्या मोडींतील वैशिष्ट्याचा काल, [४] भाषा-प्रघात, [५] लेखकाचा काल, [६] मजकुरांतील निरनिराळ्या प्रसंगांचा इतर साधनांवरून ठरलेला काल, [७] मजकुरांतील विशिष्टपरंपरेचा काल, वगैरे आणखीही कांहीं बारीकसारीक गोष्टींचें परीक्षण करून करावा लागतो. पहिले तीन प्रकार म्हणजे कागदाचा व शाईचा जुनेपणा व लिपीची मोड व तींतील वैशिष्ट्य वगैरे हीं फक्त ज्याला मूळ साधन पहावयास मिळतें त्यालाच परीक्षतां येतात. परंतु हे तीन ताळे लावतांना संग्राहकाची दृष्टि सापेक्ष असल्यानें त्याच्यांत तेवढी चिकित्सक बुद्धि रहात नाहीं. संग्राहकाची अनुमानें बरींचशीं ममत्वपूर्ण असल्यानें तीं सर्वच जमेस धरणें तितकें बिनचूक ठरत नाहीं. भाषा-प्रघातांवरून नक्की काल म्हणजे वर्ष महिना वगैरे सांगतां येत नाहीं. यांत एक-दोन पिढ्यांची तरी कमींतकमी कालमर्यादा असते. भाषेचे प्रघात कांहीं थोड्या कालांत बदलणारे नसतात. त्यामुळें असल्या प्रघातांवरून फारतर तें कोणत्या शतकांतील आहेत हें सांगतां येईल. जास्तच परीक्षण केलें

तर अधिकाधिक त्या शतकाचा पूर्वार्ध किंवा उत्तरार्ध सांगतां येईल. लेखकानें आपलें नांव दिलें असलें व त्या नांवावरून जर नक्की काल इतर साधनांवरून ठरत असला तर मात्र एक कालनिर्णयाचा मार्ग मोकळा असतो. परंतु इतिहासकालीं व अद्यापही आज्याचेंच नांव नातबाला किंवा अशाच तऱ्हेनें घराण्यांत नांवें पुनःपुन्हा देण्याचा परिपाठ असल्यानें नुसत्या लेखकाच्या नांवावरूनही तितका निर्णायक बोध होऊं शकत नाहीं. नांवाच्या जोडीला जर आणखी कांहीं त्या लेखकाचा हुद्दा, संबंध वगैरे दिला असल्यास त्या कुलांतील तो लेखक कितवा पुरुष व कोण हें समजूं शकतें व त्यानंतर त्यावरून लेखनाचा काल ठरवितां येतो. एकाच नांवाचे दुसऱ्याही कुटुंबांतील पुरुष आढळूं शकतात. विशेषेंकरून जेव्हां अधिकारपरत्वें मिळालेलें आडनांवच देण्यांत येतें त्यावेळीं तर ही अडचण येतेच येते. शिवाय लेखकानें आपल्या लेखा-खालीं नांव दिलेंच पाहिजे असा निर्बंध नव्हता. उलट नांव न देण्याचाच प्रघात असावासें दिसतें. आणि नांव दिलेंच गेलें तर तें प्रथम अगर शेवटीं दिलें जाई आणि बहुधा ऐतिहासिक साधनांचा हा भाग फाटून वगैरे गेलेलाच असावयाचा. यानंतर मजकुराच्या कालावरून लेखन-कालाचा निर्णय कांहींसा करितां येतो. साधनांत जर अनेक प्रसंगांचा उल्लेख केला असेल व त्यांतील कांहीं प्रसंगांचा काल इतर साधनांवरून ठरला गेला असेल तर त्यांतील जो जो प्रसंग अगदीं शेवटीं घडलेला असतो त्या कालाच्या मागेंतरी लेखनकाल जात नाहीं असें गृहीत धरणें भाग पडतें. परंतु जेथें प्रसंग अनेक नसून त्यांची कालमर्यादाही नक्की ठरलेली नसते तेव्हां कालनिर्णय करणें कठीण पडतें. मजकुरांतील विशिष्ट प्रकारच्या परंपरेवरून तो लेख कोणत्या कालाच्या पूर्वीचा असावा हें अदमासें समजतें. परंतु या व यासारख्या परीक्षणानें कदाचित् नक्की व निश्चित काल-निर्णय न करितां आला तरी काल-मर्यादा मात्र बरीचशी मर्यादित करितां येते.

अस्सल कागदांचा कोणत्याना कोणत्या तरी तऱ्हेनें कालनिर्णय करितां येतो व कालनिर्णयावरून जर प्रसंगाचा काल व लेखनकाल समकाल ठरला तर त्या साधनांना महत्त्व व पुरावा या दृष्टीनें प्रामाण्य प्राप्त होतें. परंतु नकलांचा काल ठरविणें तितकेंच अवघड जाऊन शिवाय त्या नकलेचा

उपयोगही अगदीं मर्यादित असतो. नकल जितकी जितकी उशिरां झाली असेल तितकें तितकें तिला मूळ साधनापेक्षां अधिकाधिक हीनत्व प्राप्त होत असतें.

बखरी, याद्या, यांसारख्या साधनांत ठराविक कालांतील प्रसंगांचाच तपशील दिलेला असतो. असा तपशील केव्हां लिहिला गेला हें समजणें अगदीं जरूरीचें असतें. अशा साधनांत जर कालनिर्णयाला वरील कोणत्याही साधनांतील साधन बाकी नसेल तर या कालनिर्णयाला मजकुरांचा तपशील साधनीभूत होऊं शकतो. कोणत्याही प्रसंगवर्णनांत जर अधिक बारकाईचे परंतु स्थलसूचक व व्यक्तिदर्शक तपशील दिलेले असतील तर तें साधन समकालाकडे अधिक झुकणारें आहे असें समजावें. परंतु जेथें प्रसंगाचा तपशील कमी व पाल्हाळ जास्त तेथें तें साधन माहितीच्या अभावीं म्हणजे बहुधा कालांतरानें रचलें गेलें असावें असें समजण्यास हरकत नाहीं. प्रसंगांतील तपशिलांच्या वर्णनानें साधनांतील माहिती सरस-नीरस ठरते व परिणाम-निदर्शनानें कार्याची परंपरा ठरते. उदाहरणार्थ, सभासदी व शिवदिग्विजय या दोन बखरीच घ्या. सभासदींत प्रसंगाचा तपशील मोठा आहे. त्यावरून त्याला मूळ कारकीर्दीची माहिती मिळाल्याचें दिसून येतें आणि माहिती मिळणें ती समकालीं जितकी अधिक मिळूं शकते तितकी ती कालांतरानें मिळणें कठीण असतें. कारण ती कालांतरानें लोकांच्या स्मरणांतून नाहींशी होते. उलट शिवदिग्विजयकाराला अगदीं सामान्य परंपरेंत असलेल्याच गोष्टी कळल्या असल्याचें दिसतें. मुख्य प्रसंग तेवढेच त्यानें घेतलेले आहेत. त्यांत बारकाईनें कालनिर्देश केलेले वगैरे प्रसंग नाहींत. अनुमानानें मात्र कांहीं प्रसंग पाल्हाळ लावून बरेच सजविले आहेत. त्यानें आपल्या ग्रंथाचा विस्तार करण्याकरितां इतका बेसुमार काल्पनिक पत्रांचा व भाषणांचा पाल्हाळ लाविला आहे कीं, ते मजकूर परीक्षणांतीं कोणाला समजूं शकतील याची शक्यताच पटणार नाहीं. त्यांतील असल्या मजकुराला दूर करूं म्हटलें तर त्यांत फारच थोडा मजकूर राहतो. सारांश, समकालीन किंवा समकालीन आधारांवरून लिहिलेल्या माहितींत बारीकसारीक तपशिल अधिक, व कालांतरानें किंवा परंपरेच्या आधारांवर लिहिलेल्या माहितींत पाल्हाळ व परिणामवाचक मजकूर विशेष असतो, हा भेद लक्षांत घेतला म्हणजे उलट गणितानें साधनांचा कालनिर्णय करितां येतो.

कोणत्याही साधनाचा लेखनकाल ठरला म्हणजे त्यापासून इतिहास-रचनेस प्रत्यक्ष फायदा होत नसतो. साधनाच्या लेखनकालावरून त्यांत वर्णिलेल्या प्रसंगाचा काल ठरवावयाचा असतो. जितकें साधन समकालीं लिहिलें जातें तितकें तें खरी वस्तुस्थितिनिदर्शक असतें. आणि वस्तुस्थिति ज्याला माहीत असते तो नेहमींच दुसऱ्याला समजावून सांगतांना प्रसंगांचे परस्परसंबंध व क्रम हीं दोन्हीही बिनचूक सांगण्याचा प्रयत्न करीत असतो. म्हणून एखाद्या साधनाचा लेखनकाल ठरला म्हणजे त्यांतील प्रसंग कोणत्या कालाला मर्यादित आहेत तें समजतें व तें समजलें म्हणजे साधनांत दिलेला प्रसंगांचा संबंध व क्रम यांवरून विवक्षित प्रसंगाचा काल कोणता असावा याचाही निर्णय करितां येतो. प्रसंगाचा काल ठरवितांना ज्या कांहीं गोष्टी लक्षांत ठेवाव्या लागतात त्याः—

[१] एखाद्या साधनांत प्रसंगाचा काल दिलेला असेल तर तो काल-निर्देश त्याच साधनांतील इतर तपशिलांवरून बरोबर आहे किंवा नाहीं हें तपासावें व तो त्यांतील इतर लिहिण्याशीं विसंगत नसेल तर त्या साधन-लेखकाच्या पुराव्यापुरता त्या प्रसंगाचा काल-निर्णय स्वीकारावा.

[२] एकाद्या साधनावरूनःकलम पहिलें याप्रमाणें काल ठरला असल्यास तो इतर साधनांतील पुराव्याशीं ताडून पहावा. त्यांत जर फरक दिसून आल्यास त्यांतील अधिक समकालीन व बिनचूक पुरावा कोणता हें तपासून नंतर कालनिर्णय करावा.

[३] कालनिर्णय करितांना तिथि, वार, मिति वगैरे सर्व तपशील दिला असल्यास ज्या कालनिर्देशांत असा अधिक तपशील असून गणितानें बिनचूक ठरेल तोच विशेषतः ग्राह्य धरण्यास हरकत नसते. अव्वल माहितीच्या अभावीं तिथि-मितीचा नक्की व बिनचूक तपशील देणें सहज साध्य नसतें.

[४] एखाद्या साधनांत प्रसंगाचा कालनिर्देश दिलेला नसेल परंतु त्या प्रसंगाबरोबर इतरही प्रसंग सांगितलेले असतील व त्यांतील कांहीं प्रसंगांचा इतर साधनांवरून काल ठरला गेला असेल, तर त्या प्रसंगांतील परस्पर संबंधावरून व क्रमावरून कालनिर्णय करावा. अशा वेळीं अमुक एक प्रसंग अमुक एका कालापासून अमुक एका कालापर्यंत घडला इतकाच कालनिर्णय

करतां येतो. दुसऱ्या साधनांवरूनही याचप्रमाणें काल मर्यादित करितां करितां नक्की काल ठरवितां येतो.

[५] ज्या वेळीं प्रसंगाच्या उल्लेखांवरून कालमर्यादा ठरवावयाची असते त्या वेळीं लेखक आपलें लेखन विषयवारीनें करीत आहे किंवा कालानुक्रमानें करीत आहे तें तपासावें. विषयवारीनें करीत असल्यास दुसऱ्या विषयाच्या सुरुवातीवरून पहिल्या विषयाच्या शेवटच्या बाबींची कालमर्यादा ठरवितां येणार नाहीं. म्हणून कालनिर्णयासाठीं प्रत्येक विषय स्वतंत्रपणें विचारांत घ्यावा.

[६] एकाद्या कालाचा मजकूर सांगतांना त्यांत जसा पूर्वेतिहास म्हणून तत्पूर्वी घडलेला मजकूर अनुसंधानानें निवेदन केला जातो त्याचप्रमाणें अनुषंगानें परिणामात्मक मजकूरही सांगण्याचा प्रघात आहे. अशा वेळीं अनुषंगानें आलेल्या मजकुराची कालमर्यादा मुख्य तपशिलाच्या कालानंतरची आहे असें समजून ती लेखनकालापर्यंतही जाऊं शकते.

[७] कोणताही कालनिर्णय बहुमतानें न करितां त्यांतील बिनचुकतेवरून करावा.

[८] एखाद्या प्रसंगांत ज्या माणसांनीं कार्य केल्याचे उल्लेख असतात त्यांच्या उल्लेखांवरून त्या माणसांच्या हालचालींचा काल ठरला असल्यास त्या प्रसंगाची कालमर्यादा ठरवितां येते.

[९] प्रसंगांत वर्णन केलेल्या विशिष्ट प्रकारच्या कालदर्शक व कालसूचक तपशिलांवरून कालमर्यादा ठरवितां येते.

[१०] असमकालीन साधनांतील किंवा कालांतरानें लिहिलेल्या मजकुरांतील विषयवारी अगर कालक्रम इतर समकालीन व विश्वसनीय पुराव्यांच्या आधारानें बरोबर ठरल्याशिवाय त्याचा कालनिर्णयास उपयोग करितां येत नाहीं. कालावधीनें विषयवारीच्या व कालक्रमाच्या पुष्कळच चुका होत असतात.

[११] अनुमानानें बसविलेल्या प्रसंगांतील क्रमावरून त्यांतील कोणत्याही प्रसंगांचा निश्चित कालनिर्णय करतां येत नाहीं.

[१२] अक्षय्यतृतीया, रामनवमी वगैरेसारख्या शुभतिथीनें शुभप्रसंगाचा कालनिर्देश केलेला असल्यास त्यांत पुराणमताभिमान व श्रद्धा दृष्टीस पडते. परंतु खरी वस्तुस्थिति नसण्याचाच अधिक संभव असतो. म्हणून अशा नुसत्याच शुभतिथि दिल्या असल्यास इतर अव्वल आधाराशिवाय त्या मान्य धरूं नयेत.

[१३] एखाद्या प्रसंगाच्या अगर कारकीर्दीच्या आरंभ व अंताच्या काल-निर्देशावरून मधल्या लहानसहान बाबींचें अनुमानानें जे एखाद्या साधनांत कालनिर्देश केलेले असतात ते इतर आधारांशिवाय खरे मानूं नयेत.

[१४] एखाद्या अनिश्चित अगर चुकीच्या कालनिर्देशावरून काढलेले अगर बसविलेले सर्व कालनिर्देश ग्राह्य धरूं नयेत.

[१५] सर्व अनिश्चित किंवा निर्णायक न ठरलेल्या कालनिर्देशांचा इतिहास-रचनेंत उपयोग करितांना ते अनिश्चित असल्याचें स्पष्टपणें सांगावें.

प्रसंगांचे व त्यांतील तपशिलांचे कालनिर्णय हाच इतिहासाचा पाया असतो. आणि हा जितका शुद्ध व भक्कम असतो तितकी त्याबर उभारली जाणारी इतिहासाची इमारत भक्कम व चिरायु होऊं शकते. कालनिर्णया-च्या बाबतींत केवळ परंपरेचे अगर लोकांच्या समजुतीचे हितसंबंध जोडणें अशास्त्रीय आहे. तसेंच नक्की कालनिर्णय पटला नाहीं म्हणून चुकीचा ठरला गेलेला कालही मान्य करणें अगदींच अन्यायाचें व अशास्त्रीयतेचें लक्षण ठरतें.

## ४० अर्थबोध-चिकित्सा

एखाद्या साधनांतील माहिती लेखकानें कोणत्या पुराव्यावरून लिहिली किंवा कोणत्या पद्धतीनें तयार केली हें समजलें म्हणजे त्यांतील कोणती व किती माहिती ग्राह्य व कोणती अग्राह्य हें समजूं शकतें. परंतु लेखकाचे पुरावे व पद्धति हीं कांहीं त्या साधनांत नमूद झालेलीं नसतात व कांहीं वेळां तें शोधून काढणेंही शक्य नसतें. म्हणून साधनांतील मजकुराचें अंतरंग-परीक्षण करणें जरूर असतें हें मागें सांगितलेंच आहे. तसेंच हें परीक्षण करितांना लेखकानें आपलें लेखन करण्याचें योजल्यापासून तों येट तो लेख पूर्ण होईपर्यंतच्या लेखकाच्या मनःस्थितीचें व हालचालींचें चित्र समोर कल्पावें लागतें याबद्दलही विचार बर आलाच आहे. परंतु इतक्यानें कांहीं भागत नाहीं. लेखकाचें अंतरंग तपासलें म्हणजे प्रवृत्ति समजते. परंतु लेखाचें अंतरंग तपासल्याशिवाय लेखकाचा आशय व मजकूर समजणार नाहीं. अर्थात् त्या साधनाचा उपयोगही करतां येणार नाहीं. म्हणून लेखाचें अंतरंग-परीक्षण करणें ही एक अगदीं आवश्यक अशी बाब होऊन बसली आहे. हें परीक्षण

करितांना जितकी बारकाई ठेवली पाहिजे तितकी ती नेहमींच ठेवली जाते असेंही नाहीं. कांहीं ठोकळ मानानेंच असें परीक्षण करून कार्य भागविण्याकडेसच अधिक प्रवृत्ति रहाते. लेखांचें अंतरंग-परीक्षण दोन प्रकारें करण्यांत येतें. [१] लेखांतील तपशिलांचें वर्गीकरण करून लेखकाचा सांगण्याचा आशय कोणता आहे हें शोधून काढावयाचें; व [२] लेखकानें कोणत्या स्थितींत व मनोभूमिकेंत तो लेख लिहिला आहें हें ओळखून नंतर त्या लेखकानें केलेल्या विधानांतील किंवा तपशिलांतील सहेतुक किंवा संस्कारप्रणित चुकीच्या मजकुराला दूर करावयाचा किंवा त्यांतील असत्य मजकूर असण्याचा जो संभव त्या संभवावरून दिलेल्या मजकुराची फेरतपासणी करावयाची. सामान्य प्रवृत्ति मात्र अशी असते कीं, लेखकाच्या सांगण्याचा भावार्थ ओळखला कीं कार्य संपतें. ही सामान्य प्रवृत्ति कदाचित् गेल्या एका शतकाच्या इतिहासास फारशी जाचक होणार नाहीं. कारण, रीतिभाती, भाषा व भाषेचे विशिष्ट प्रघात, व्यवहारपद्धति वगैरेंत फारसा फरक झालेला नसतो. परंतु जर लेखकाच्या चालीरीति, भाषा, लेखनपद्धति वगैरे सर्वच निराळ्या किंवा विशिष्ट प्रकारच्या असतील व तत्कालीन परिस्थिति अगदींच अज्ञात असेल तर त्यावेळीं मात्र ही सामान्य प्रवृत्ति घातुक ठरल्याशिवाय राहणार नाहीं. अशा वेळीं वाचणाराला लेखकाचें खरें हृद्गत समजत नसतें व त्याचा लेखही नीटसा लागत नसतो. पूर्णपणें अर्थबोध झाला नाहीं म्हणजे त्या लेखांतील कांहीं वाक्यें वगैरे जीं वाचणाराच्या कल्पनेला व समजुतीला जुळतात तींच तो उचलतो व त्यांवरच आपला कोटिक्रम रचून मूळ लिहिणाराच्या उद्देशाला व केव्हां केव्हां मूळ लेखालाही बाजूला ठेवतो. यामुळें पुष्कळ वेळां असें आढळून येतें कीं, साधनांचें परीक्षण न झाल्यामुळें व मजकुराच्या संगतीचाही विचार न केला गेल्यामुळें मधलाच एखाद्या शब्दानें जुळता भाग घेऊन त्याचा अगदीं मूळ लेखकाच्या उद्देशाविरुद्ध उपयोग केला जातो. परंतु असें करणें म्हणजे फसगत करणें असल्यानें हा मार्ग त्याज्य आहे.

कोणत्याही साधनाचा अर्थबोध करून घेतांना एक गोष्ट प्रथम लक्षांत ठेविली पाहिजे कीं, वाचतांक्षणींच जे आपणाबर परिणाम होतात त्यांतील कित्येक आपल्याच कल्पनेंतील असून भ्रामक असतात. प्रथम आपणाला

त्यांतील सर्व वर्णन अगदीं पूर्ण व खरें असल्याचें वाटतें. कारण त्या वेळीं आपली दृष्टिही सापेक्ष व हेतुपूर्ण असते. म्हणून पहिल्या कुतूहलपूर्वक होणाऱ्या वाचनावर मुळींच विश्वास न ठेवतां पुन्हा त्याच साधनाचें चिकित्सापूर्ण वाचन करण्यास सुरुवात करावी. या वाचनांत लेखकानें जी आपली स्वतःची माहिती व कल्पना—मग ती खऱ्या वस्तुस्थितीला धरून असो किंवा नसो—ती तशीच समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. असें केलें म्हणजे लेखकाचा आशय जाणण्याच्या मुख्य नियमांचें आपोआपच अवलंबन केलें जाऊन लेखकाचा आशय समजेल. लेखकाच्या आशयांत किंवा लेखकाच्या सांगण्याच्या भावार्थांत वाचकांनीं आपलीं कल्पनाचित्रें शिरूं न देण्याची काळजी घेतली पाहिजे. सारांश, कोणत्याही साधनाचा अगर त्यांतील भागाचा उपयोग करण्यापूर्वी लेखक काय सांगतो हें शोधून काढण्याकरितांच प्रथम साधन वाचावें. असें चिकित्सापूर्ण वाचन करणें म्हणजेच लेखकांनीं स्पष्ट केलेल्या किंवा अस्पष्ट अथवा ध्वनित केलेल्या कल्पनांचें किंवा उद्देशांचें आकलन करणें होय. असें करतांना त्या लेखाचा अगदीं शब्दशः अर्थ समजून घेणें आवश्यक असतें. नुसता भावार्थ जाणल्यानें लेखकाचा खरा अर्थ किंवा लेखाचें मर्म समजूं शकेलच असें नाहीं. कित्येक वेळां विशिष्ट शब्दयोजना व्यंग्यार्थी अगर कांहीं गर्भितार्थानें केली जाते. केव्हां केव्हां भावार्थ जाणण्यास जितकी मेहनत लागते तितक्या मेहनतींत शब्दाचे विशिष्ट प्रचार उकलणारे नसतात. तेव्हां प्रत्येक शब्दाचें महत्त्व समजून घेणेंच अगदीं इष्ट असतें.

कोणत्याही साधनाचा शब्दशः अर्थ लावावयाचा म्हणजे ज्या भाषेंत तें साधन लिहिलें गेलें असेल त्या भाषेचें चांगलें ज्ञान असलेंच पाहिजे. भावार्थ जाणण्याइतक्या भाषाज्ञानावर ऐतिहासिक साधनें वाचणें जड आहे. इतकेंच नव्हे तर भाषेच्या सामान्य ज्ञानानेंही ऐतिहासिक साधनें इतिहासांत उपयोगीं आणण्यासाठीं तपासतां यावयाचीं नाहींत. तसें करूं म्हटल्यास तपासणींत घुष्कळच दोष राहतील. जशी भाषाज्ञानाची जरुरी असते त्याप्रमाणें भाषेच्या निरनिराळ्या कालाच्या व स्थलाच्या प्रचारांचीही माहिती असावी लागते. बरेच वेळां असा समज झालेला दिसतो कीं, कोणत्याही ऐतिहासिक साधनाचा अर्थ भाषेच्या प्रचलित सांप्रदायांच्या साहाय्यानें लावणें शक्य असतें. जसें काय भाषा अगदीं ठराविक खुणांत बसविली जाऊन त्यांत

फरक घडून येणें मुळीं शक्यच नसतें, किंवा ज्याप्रमाणें शास्त्रीय भाषेंतील पाठ फारसे बदलत नाहींत त्याप्रमाणें रोजच्या भाषेंतीलही पाठ बदलत नाहीं. परंतु सामान्यतः व्यवहारांतील भाषेंत सारखे पाठभेद होत गेलेले आपणांस दृष्टीस पडत असतात; इतकेंच नाहीं तर शब्दांचे विविध अर्थ व विविध उपयोगही केलेले पहावयास मिळतात. कालविशेषानें व स्थलविशेषानें असे शब्दार्थ व शब्दयोजना बदललेली स्पष्ट दिसून येते. मनुष्य आपल्या प्रकृत्यनुरूपही कित्येक शब्दांचे प्रयोग विवक्षित अर्थानें करीत असतो. सारांश, प्रचलित व इतिहासकालीन भाषेचीं स्वरूपें भिन्न असल्यानें ऐतिहासिक शब्दांचे व भाषा प्रघातांचे अर्थ लावणें तें इतिहास-कालीन व्याकरणाच्या नियमानुरूप व ऐतिहासिक कालांतील पाठभेद व विशिष्ट शब्दयोजनेप्रमाणेंच लावणें भाग पडतें. तेव्हां साधनांचा अर्थ लावतांना व विशेषतः विवक्षित शब्दांचे वगैरे अर्थ लावण्यासाठीं कांहीं गोष्टी लक्षांत ठेवणें जरूर असतें. त्या येणेंप्रमाणें:—

[१] जर मूळ साधन वाचावयाचें असेल तर तत्कालीन लिपीचें ज्ञान करून घेतल्यास मूळ शब्दांचें बिनचूक स्वरूप समजून घेतां येतें.

[२] कालांतरानें भाषेच्या प्रचारांत फरक होत असतात. म्हणून तत्कालीन शब्दांचे अर्थ व योजनेचें स्वरूप शोधून काढलें पाहिजे. तत्कालीन वाङ्मयांत निरनिराळ्या ठिकाणीं केलेल्या शब्दांच्या उपयोगांवरून तत्कालीन शब्दांचे सामान्य अर्थ व योजनेचें स्वरूप जाणतां येतें.

[३] स्थलांतरानें व्यवहारपद्धतीप्रमाणें वगैरे भाषेंतील प्रचारांत फरक पडतात. ते त्या स्थलाच्या भाषेच्या अभ्यासानें माहिती करून घेतले पाहिजेत.

[४] निरनिराळ्या वेळीं परकीय अगर परभाषेचा संबंध आल्यानें भाषेंत नवीन अपभ्रष्ट वगैरे शब्द येतात व जातात. अशा अपभ्रष्ट शब्दांचा अर्थ मूळ परभाषीय शब्दाला धरून असतोच असें नाहीं. तर अशा शब्दांचें चांगलें ज्ञान करून घेतलें पाहिजे.

[५] लेखक बरेच वेळां विवक्षित शब्द विवक्षित अर्थानें योजीत असतो. अशा वेळीं त्या लेखकाच्या लेखांचा अभ्यास करावा लागतो.

[६] कित्येक वेळां शब्दांचा अर्थ संदर्भावरून घ्यावा लागतो. वाक्यांतील शब्दांच्या विवक्षित योजनेनें शब्दांचा सामान्य अर्थ लागूं पडत नाहीं.

एखादा शब्द सरळ वाक्यांत जो अर्थबोध करील तोच अर्थबोध त्याच शब्दाचा उपयोग एखाद्या म्हणींत वगैरे केल्यास होणार नाहीं.

[७] क्वचित्प्रसंगीं शब्दाची योजना भ्रामक अर्थ कल्पून केली जाते. बहुधा असे प्रयोग लेखक लिहिण्याच्या भरांत करून जातो. अशा वेळीं त्या शब्दांचे सूचित अर्थ व्यापकतेनें घ्यावे लागतात.

[८] शब्दाबडंबरानें मूळ अर्थबोध घालविलेला असतो. अशा प्रसंगीं आशयच ओळखून अर्थबोध करून घ्यावा लागतो.

[९] शब्दांची योजना ह्यर्थी अगर गूढार्थानें केली जाते. अशा वेळीं अधिक सावध रहावें लागतें.

[१०] व्यंग्यार्थानें भाषाप्रयोग केले जातात. तेथें प्रथम लेखकाची मनःस्थितिच जाणणें जरूर असतें.

या सर्व परीक्षणाच्या नियमांचें विवेचन जरी लांबलचक असलें तरी हे सर्व निर्बंध फारच झटकन् घालून पाहतां येतात. अभ्यास झाला कीं या ताळ्यांना फारसा वेळ लागत नाहीं. वर सांगितलेली व्यंग्यार्थी शब्दयोजना किंवा उपरोधी भाषा वगैरे, लेखक प्रत्येक साधनांत वापरतोच असें नाहीं. जर आपण प्रत्येक वाक्य अशा दृष्टीनें तपासूं लागलों तर तें चुकीचेंच होईल. जितका आपण ह्या अर्थबोधचिकित्सेंत परिश्रम करूं तितका आपल्या ला ऐतिहासिक साधनांचा उपयोग सयुक्तिक व साधार करतां येईल. त्याचप्रमाणें मूळ पाठही चांगल्या प्रकारें तपासतां येऊन लेखकाच्या आशयाप्रमाणें सुधारतां येईल किंवा बिनचूक मांडतां येईल. याकरितां तत्कालीन भाषेचे शब्दकोश वगैरे तयार करणें अगदीं अवश्य असतें.

## ४१ अंतरंगपरीक्षण

अर्थबोधानें लेखकाचा मूळ आशय समजूं शकतो. परंतु त्यानें जें लिहिलें तें लेखकानें जसें पाहिलें तसेंच नमूद केलें किंवा कसें, किंवा त्याला जें वाटलें किंवा मनाला पटलें तसेंच लिहिलें किंवा खोटें बनावून लिहिलें याचा बोध होणार नाहीं. ऐतिहासिक साधनें लावतांना प्रथम प्रवृत्ति अशी असते कीं, कोणताही लेखक खोटें किंवा मनाला न पटेल असें कधींच लिहिणार नाहीं. परंतु अनुभव असा आहे कीं, एकच प्रसंग निवेदन करणारीं दोन साधनें

उपलब्ध झालीं कीं, त्यांच्यांतील तपशिलांत विरोध हा असावयाचाच. अर्थात् त्यांतील कोणत्यातरी एका साधनांतील तपशिलाबद्दल संशय घेणें क्रमप्राप्तच होतें. म्हणून प्रत्येक साधन खरेपणानेंच लिहिलें गेलेलें असतें, हा भाबच प्रथम मनांतून दूर केला पाहिजे. दुसऱ्या एखाद्या साधननिष्पत्तीनें पहिल्या साधनांतील तपशिलाबद्दल शंका घेण्यापूर्वीच आपण प्रत्येक साधनांतील तपशिलाची सक्त तपासणी करून त्यांत एखादा शंकित तपशील असेल तर त्याबद्दलची शंका प्रथम निरसन करून घेतली पाहिजे. ही शंका निरसन करून घेण्याची सामान्य पद्धति अशी असते कीं, त्या साधनांच्या लेखकाच्या विश्वसनीयतेबद्दल चौकशी करावी. ही चौकशी करितांना पुढील गोष्टी तपासाव्यात: [१] लेखक वर्णिलेल्या प्रसंगाच्या कालाशीं समकालीन किंवा निदान जवळजवळ समकालीन आहे कीं नाहीं. [२] तो त्या प्रसंगाला प्रत्यक्ष साक्षीदार आहे किंवा नाहीं. [३] तो जें लिहितो तें श्रद्धेनें लिहितो किंवा कसें. [४] त्याला त्या प्रसंगाची तपशिलवार व क्रमवार माहिती आहे कां नाहीं. [५] त्याला त्यांतील सत्य माहीत आहे का? असल्यास तसेंच तें सांगत आहे का? किंवा सांगण्याची त्याची प्रवृत्ति आहे का? अथवा एकाच प्रश्नांत तपासणी करावयाची तर [६] तो विश्वसनीय आहे किंवा नाहीं. परंतु एवढी परीक्षा झाली म्हणजे संपतें असें नाहीं. कारण सशास्त्र शुद्धता जाणण्याइतकी परीक्षणाची ही चाळण बिनचूक नाहीं. जोंपर्यंत एखाद्या प्रसंगाच्या तपशिलाची सत्यता किंवा संभाव्यता आपल्या चिकित्सक बुद्धीला पटली नाहीं किंवा इतर पुराव्यांच्या साहाय्यानें शाबित करून घेतां आली नाहीं तोंपर्यंत कितीही समकालीन लेखक असला तरी त्यानें लिहिलेला मजकूर निर्णयात्मक न मानतां तपासणीसाठीं विचारांत ठेवणें अगदीं सशास्त्र व युक्त असतें. प्रत्येक साधनाची व त्यांतील तपशिलाची बारकाईनें तपासणी केल्याशिवाय मजकुराची सत्यता निदान आपल्या मनाला तरी पटवून घेतां येत नाहीं.

लेखक नेहमींच शास्त्रशुद्ध सत्य लिहीत नाहीं हीच कल्पना करून जर प्रत्येक साधनांतील मजकूर शंकांच्या चक्म्यांतून पडताळण्याचें ठरविलें कीं, मग या परीक्षणाच्या कचाट्यांतून सुटण्यासाठीं आपण बहुधा थोडेंसें परीक्षण करून एका बाजूस विश्वसनीय व चांगलीं साधनें निवडून ठेवतों व दुसरीकडे अविश्वसनीय व टाकाऊ साधनें ठरवून बाजूला काढून टाकतों. असें

केलें, कीं मग पहिल्या प्रकारच्या साधनांतील सर्वच तपशील बिनबोभाट वापरण्या-योग्य समजतों व कोणीं त्याबद्दल शंका घेतलीच तर त्याला उत्तर देतों कीं, हा खरा साक्षीदार आहे. साक्षीदार खरा कशावरून, तर आपण तो लेखक समकालीन असल्याची खात्री करून घेतली आहे व तें सबंध साधन परीक्षणानें विश्वसनीय ठरून प्रथम दर्जात येतें म्हणून. सामान्यतः एखादा लेखक समकालीन म्हणून विश्वसनीय वाटला तरी तो खरें सांगणारा असतोच असा कांहीं नेम नसतो. कदाचित् त्यांतील कांहीं मजकूर खरा ठरला, तरी सर्व मजकूर खरा ठरतोच किंवा असेलच असें मुळींच नाहीं. तेव्हां तो साक्षीदार समकालीन किंवा विश्वसनीय म्हणून सत्य सांगणारा आहे हें समजण्याला आणखी परीक्षण करणें जरूर असतेंच. साक्षीदार खरा अगर खोटा म्हणून जी भाषा वापरली जाते त्यांतील साक्षीदाराची भाषा न्यायकचेरींतील असून त्या भाषेचा अर्थ प्रचलित प्रचारानें समजला जातो. खरें म्हटलें तर आपणांसमोर साक्षीदार नसतोच. त्यानें मरमुराद दिलेली जबानी आपणां-समोर येत असते. त्याची फेरतपासणीही आपणांला करतां येणें शक्य नसतें. सारांश, 'खरा साक्षीदार' वगैरे शब्दांचा अर्थ बराच गौणत्वानें घ्यावा लागतो, हें विसरून चालणार नाहीं.

ऐतिहासिक साधनांच्या परीक्षणांतील सामान्य सोडवणुकीचे प्रकार सोडले तर मात्र पुराव्यांचें परीक्षण करितांना नुसत्या साधनांचें परीक्षण करून चालत नाहीं. हरएक साधनांतील प्रत्येक बाबीचा किंवा तपशिलाचा स्वतंत्रपणें विचार करणें जरूर असतें. एखाद्या माणसानें इमानपुरःसर कितीही सत्य व पूर्ण मजकूर सांगण्याचा प्रयत्न केला तरी त्याच्या लेखनांत नजरचुकीनें, गैरसमजुतीनें, सहेतुक अगर निर्हेतुक एखाद्या तरी तपशिलांत गोंधळ राहण्याचा संभव असतोच. या विचारसरणीनें आपणांस साधारणतः दोन नियम बसवितां येतातः [१] ऐतिहासिक साधनांतील प्रत्येक उल्लेखावरून कोणत्या-ही प्रसंगांत अगर प्रसंगाच्या तपशिलांत शास्त्रशुद्ध सत्य मिळूं शकतेंच असें नाहीं; म्हणून [२] साधनाचें अंतरंगपरीक्षण करतांना तें त्या साधनांत दिलेल्या बाबीचे निरनिराळे भाग पाडून त्या भागांचे क्रमशः परीक्षण करणें भाग असतें. ज्याप्रमाणें मुख्य प्रसंगाचा व त्यांतील तपशिला-च्या मोठ्या भागाचा विचार करणें क्रमप्राप्त होतें, त्याचप्रमाणें तपशिलांतील

पोटविभागही पाडून त्यांचें परीक्षण करणेंही जरुरीचें होत असतें. उदाहरणार्थ, एखाद्या प्रसंगवर्णनांत सामान्य मजकूर बरोबर असूं शकतो व त्यांतील तपशिलाच्या मुख्य मुख्य बाबी किंवा उपप्रसंगही जुळतात. परंतु त्या प्रसंगांत उल्लेखिलेली नामावलि किंवा व्यक्तिशः केलेलीं कार्यें चुकीचीं दिलेलीं असण्याचा संभव असतो किंवा त्यांतील तारखा अथवा वेळ चुकीची दिलेली असणें संभवनीय असतें. म्हणून कोणतेंही साधन असो त्याचें परीक्षण अगदीं बारकाईनें व बारीकसारीक तपशिलांतील मजकुराचेंही करणें अत्यंत इष्ट असतें.

कोणत्याही साधनाचें परीक्षण करण्यास लेखकाची मनःस्थिति जाणणें अवश्य असतें. परंतु लेखकानें कोणत्या मनःस्थितींत आपला लेख लिहिला हें ओळखण्याला आपल्यासमोर त्याच्या मनःस्थितीचें प्रत्यक्ष कल्पनाचित्र नसतें. उलट कोणत्या मनःस्थितींत तपशील लिहिला हें समजल्याशिवाय तपशिलाचें परीक्षण करतां येणें शक्य नसतें. त्यामुळे आपण अशा परीक्षणांत जें अप्रत्यक्षपणें लेखकाच्या मनःस्थितीचें कल्पनाचित्र कल्पितों व त्यावरून जें परीक्षण करितों त्या परीक्षणानें निर्णयात्मक कांहींच ठरणें शक्य नसतें. संभाव्य कल्पनाचित्रांतून संभाव्यतात्मक उत्तर निघणेंच शक्य असतें. परंतु आपला उद्देश मुख्यतः लिहिणाराची प्रवृत्ति ओळखण्याचा असतो. आणि ही प्रवृत्ति समजण्यास लेखकांतील कळकळ व त्याचा हितसंबंध जाणला म्हणजे त्याच्या सत्यकथनाच्या वगैरे प्रवृत्तीचा बऱ्याच अंशानें बोध होऊं शकतो. परंतु हीही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी असते कीं, एखादा वक्ता, नाटकी, बिलंदर, खोटारडा अगर लुच्चा माणूस आपल्या प्रसंगवर्णनांत जितकी कळकळ आणूं शकतो किंवा निवेदनांत छाप बसवूं शकतो तितकी ती कितीही कळकळीच्या व संबंधी माणसास आणतां येईलच असें नाहीं. हा फक्त संभवीचा भाग असतो. सारांश, तपशिलाच्या खरेपणाबद्दल दाखविलेली कळवळ किंवा भाषाकौशल्य हें कांहीं नेहमींच सत्य निर्णयास पुरावा म्हणून मानतां येतेंच असें नाहीं. तसेंच, सामान्य वाचकांना दंग करणाऱ्या प्रसंगांच्या बारीकसारीक तपशिलांचे अवडंबर रचून देणें किंवा प्रसंग बहारीनें वर्णन करणें हेही कांहीं खऱ्या वस्तुस्थितीला धरून असतें असें नाहीं. अशा लेखनानें फक्त लेखकाच्या कल्पनाशक्तीचा व मनोभावनांचा बोध होऊं शकतो इतकेंच. त्यांत ऐतिहासिक सत्य बहुधा थोडेंच असूं शकतें. हाच दोष उत्तरकालीन बखरकारांत स्पष्टा-

स्पष्ट दृष्टीस पडतो. अशा लेखनांत प्रसंगांच्या व प्रसंगांतील बाबींच्या संख्येपेक्षां प्रसंगांचे वगैरे भावनापूरित वर्णनाचे तपशीलच अधिक आढळतात. कित्येक वेळां बुद्धिपुरःसर किंवा चुकीनें एखादा प्रसंग दुसऱ्याच्याच नांवावर, गांवावर अगर कालमर्यादेवर ढकलण्यांत येतो. सारांश, अशा परीक्षणांत नेहमीं एकच प्रश्न समोर येत राहतो कीं, लेखकानें जें लिहिलें तें बरोबर आहे कां चूक आहे हा होय. ह्या प्रश्नाचें उत्तर देणेंही कठीण जातें. कारण, लेखक तें खरें म्हणून सांगतांना त्याप्रमाणेंच जुळणी करीत असतो. अशा वेळीं लेखक कोणत्या परिस्थितींत म्हणजे सामाजिक वगैरे परिस्थितींत वाढला व त्या वेळीं कोणते सांप्रदाय व रीतिरिवाज रूढ होते हें समजल्याशिवाय लेखकाची प्रवृत्ति समजून येत नाहीं.

**अर्थबोध**–चिकित्सेनें दोन गोष्टी विशेषतः समजूं शकतात. त्या अशाः– [१] लेखकाचा कोणत्या बाबींवर विश्वास बसला होता. मग त्या बाबींबद्दलची त्याला कळकळ असो वा नसो. [२] त्याला कोणती माहिती मिळाली होती. ही मिळालेली अगर मिळविलेली माहिती चुकीचीही असण्याचा संभव असेल. लेखक कोणत्या विशिष्ट गोष्टींवर विश्वसतो व तो कां विश्वसतो वगैरे कारणांची मीमांसा करीत बसण्याची आपणांस फारशी जरूर नसते. कारण तो त्याच्या स्वभावाचा प्रश्न असतो. आपणांस फक्त जें लेखक सांगतो तें त्यावर विश्वसून सांगतो कीं नाहीं इतकेंच पहावयाचें असतें. आपल्या या शोधाचा मुख्य उद्देश असा असतो कीं, लेखकानें जी गोष्ट सांगितली तिचेवर जर त्याचा विश्वास नसेल तर तिची विश्वसनीयता आपणास त्या साधनावरून ठरवितां येणार नाहीं. इतकेंच नव्हे तर ती अधिक परीक्षण करून घेतल्याशिवाय उपयोगांतही आणतां येणार नाहीं. म्हणून परीक्षणांत प्रथम ही कसोटी लावावी लागते. अशा तऱ्हेनें लेखकाच्याच दृष्टीनें लेखांतील प्रसंगांची विश्वसनीयता तपासली व त्या लेखांत बाकी राहिलेला मजकूर लेखक विश्वसनीय म्हणून सांगत आहे किंवा आपण त्याच्यावर विश्वास ठेवावा म्हणून सांगत आहे असें ठरलें, कीं मग पुढील परीक्षणास सुरुवात करावी लागते. प्रथम लेखक सहेतुक लिहीत आहे किंवा कसें आणि सहेतुक लिहीत असल्यास त्यांत निवेदन करीत असलेल्या प्रसंगांत किंवा तपशिलांत खोटा अगर अप्रस्तुत मजकूर घुसडून देत आहे किंवा कसें हेंही

तपासावें. हें शोधण्याकरितां जर आपण एखादी प्रश्नावली तयार करून मजकूर तपासूं लागलों तर लेखकानें बुद्धिपुरःसर कोणता मजकूर घुसडून दिला आहे तें समजतें व शेवटीं तो दूरही करितां येतो. प्रश्नावली तयार करतांना पुढील मुद्दे लक्षांत ठेवावेतः—

[अ] लेखक आपल्या लेखनानें इच्छित वाचणाराची मुद्दाम दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत असून त्यापासून तो स्वतःचा कांहीं फायदा करून घेऊं इच्छित आहे काय? विशेषतः तकरीरा, करीने, वगैरेसारख्या साधनांतून असा मजकूर आढळणें शक्य असते. सरकारी अहवालांत किंवा बातमी-पत्रांतून असा मजकूर आढळतो. बग्वरींतही घन्याच्या स्तुतीसाठीं अशा प्रकारचा मजकूर लिहिला जातो. अशा वेळीं लेखक कोणत्या फायद्याच्या इच्छेनें लेख लिहितो हें जाणावें लागतें. लेखांतील लेखकाचा कल ओळखावा लागतो. कधीं कधीं लेखक केवळ व्यक्तीच्या फायद्याकरितांच असा मजकूर घालीत नसतो तर समाज, धर्म, देश यांच्याही तर्फेनें अशा प्रकारचा मजकूर लिहीत असतो. अशा वेळीं तो कोणाच्या तर्फेनें बतावणी करीत आहे तें प्रथम लक्षांत घेतलें पाहिजे.

[आ] ज्या वेळीं एखादी गोष्ट रीतिरिवाजाला सोडून अगर एखाद्याच्या चारित्र्याला कलंकित करणारी असते त्या वेळीं ती लेखक आपल्या लेखांत गाळतो किंवा तिला दुसराच वेश देऊन समर्थन करण्याचा प्रयत्न करतो. तसेंच लेखकाला सर्व माणसांचीं नांवें किंवा त्यांची एकंदर तपशिलवार मोजदाद देणें शक्य नसतें. नक्की काल-वेळही सांगतां येतेच असें नाहीं. अशा वेळीं तो कांहींतरी तपशील केवळ संभाव्यतेवरून देत असतो हे लक्षांत ठेवलें पाहिजे.

[इ] लेखक कित्येक वेळां आपल्या लेखांत स्पष्टपणें पक्षपात दाखवीत नसला तरी त्याचें लिहिणें पक्षपातीपणाचें असण्याचा बराच संभव असतो. उदाहरणार्थ, मुसलमान लेखक हिंदूंबद्दल लिहितांना कित्येक खऱ्या प्रसंगांची अगदीं विरोधी किंवा विपर्यस्त मांडणी करील. त्याचप्रमाणें हिंदु मुसलमानां-विरुद्ध लिहूं शकेल. सारांश, ज्याच्या लिहिण्यांत स्वपक्ष आणि प्रतिपक्ष असा भाव जागृत असलेला दिसतो त्याच्या लिहिण्यांतील मजकूर प्रतिपक्षाच्या बाजूचें मंडन व स्वपक्षाचें खंडन कोठपर्यंत करितां येईल हें पाहूनच परीक्षावा.

हा पक्षपात धर्माबाबत, परंपरेबाबत, देशाबाबत अगर गांवकी वगैरेंच्या बाबतींतही असूं शकतो.

[ई] लेखक जेव्हां आपल्या लेखांत कांहीं गर्वोक्तीनें मजकूर सांगतो तेव्हां त्या गर्वोक्तीला दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ह्या गर्वोक्तीला अनेक प्रकारचीं बारीकमोठीं कारणें होतात. त्यांत कार्यकर्तृत्व, मत्सर-ग्रस्तता, मोठेपणा किंवा अहंभाव, सर्वज्ञत्व हींच विशेषतः आढळून येतात.

[उ] लेखक नेहमीं जनतेला, समाजाला अगर इच्छित वाचकाला आवडेल असेंच लिहितो. ज्या लिहिण्यानें लोकांना अगर दुसऱ्याला वाईट वाटेल असें लिहिण्याचें टाळतो. पहिल्या प्रकारच्या लिहिण्यांत समाजांतील नीति व समजुतीप्रमाणें जी विवेचनपद्धति रूढ झालेली असते तिचा अवलंब केला जातो. उदाहरणार्थ, 'अफझलखानरूपी बत्तीस दातांचा बोकड भवानीस दिला' या लिहिण्याचा अर्थबोध तत्कालीन समजुतीप्रमाणें व विवेचनपद्धती-प्रमाणें न केला तर खरा सत्यांश किंवा मथितार्थ समजणार नाहीं. या लेखनांत ग्रथित केलेली खुनाची व बलीची कल्पना सांप्रत कोणाही धर्मीयांना पटणारी नाहीं. तसेच हिंदूंतील अवताराची कल्पना व मुसलमानांतील काफराची कल्पना ह्याच त्या त्या समाजाला कोणतेंही लिखाण पटविणाऱ्या गुरुकिल्ल्या होत्या. दुसऱ्या प्रकारच्या लिहिण्यांत अत्याचार, व्यभिचारादि बीभत्स प्रसंग येतात. अशा वेळीं लेखक असल्या बाबी स्पष्ट करून समाजाचीं मनें किंवा नीति भ्रष्ट करूं इच्छीत नसतो. अशा बाबींचें विवेचन करतांना सूचित शब्दप्रयोग करून त्यावरून वाचकांनीं ते प्रसंग जाणावे अशीच लेखकाची इच्छा असते.

[ऊ] लेखक प्रसंगांतील वर्णनास काल्पनिक मजकुरानें विशेष रहस्य आणण्याचा प्रयत्न करतो. असा मजकूर अर्थातच नवीन घुसडला जातो. म्हणून भाषाकौशल्य दाखविण्यासाठीं घातलेला बराच मजकूर दूर करावा लागतो. इतिहासकालीन इतिहास-लेखकांत हा दोष फार आहे.

वरील सर्व मुद्दे लक्षांत घेऊन एक प्रश्नावलि तयार केली व तिचेवरून जर साधनांचें परीक्षण केलें तर तपशिलांत शिरलेला किंवा सहेतुक घातलेला अवास्तव व गफलतीचा मजकूर काढून टाकतां येईल व बाकी राहिलेला मजकूर इतिहास-रचनेंत उपयोगास आणण्याच्या पायरीवर नेतां येईल. परंतु

बरील प्रश्नावलीनें म्हणजे दुसऱ्या परीक्षणानें लेखक जो विश्वसनीय मजकूर म्हणून सांगतो त्यांतील सहेतुक वगैरे केलेल्या चुका दूर करतां येतील. परंतु साधनांत चुका होण्याचा दुसरा प्रकार म्हणजे चुकीच्या माहितीमुळें होय. या वेळीं आपणांला प्रत्येक तपशिलाची तपासणी करितांना लेखकाला त्या त्या तपशिलाबद्दलची माहिती बरोबर अथवा चुकीची मिळाली हें शोधावें लागतें. कोणतीही माहिती मिळण्यास ती प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्षपणें दृष्टिपथावरून जावी लागते. आणि हें दृष्टिनिरीक्षण जसें बरोबर अगर चुकीनें केलें असेल तसें त्या निरीक्षणांत बिनचुकता अगर दोष शिरतात. आणि त्याबरोबर जी माहिती लेखकानें आकलन केली ती बिनचुक अगर दोषपूर्ण ठरते. तेव्हां हें निरीक्षण करण्यांत कांहीं चुका झाल्या आहेत किंवा नाहींत, तसेंच निरीक्षणाची निष्पत्ति बरोबर करून घेतली किंवा नाहीं हें तपासावें लागतें. असें करण्यास जर आपण आणखी एक प्रश्नावलि तयार करण्याचें ठरविलें तर त्यांत पुढील मुद्दे अवश्य विचारांत घ्यावे लागतील. अशा प्रश्नावलीचे साहाय्यानें तपशिलांचें परीक्षण केलें तर आपणांस त्यांतील लेखकानें चुकीनें मिळविलेला अगर लेखकाला चुकीचा समजलेला बराच भाग काढून टाकतां येईल.

[अ] लेखकानें एखादा प्रसंग पहाण्यास हजर राहून तो पाहिला, परंतु तो जेव्हां घडला तेव्हां त्या लेखकाला भीति अगर जयोत्सुकतेमुळे, मत्सर अगर प्रेमातिरेकामुळें, किंवा याच सारख्या इतर मनोविकारांच्या परिणामांमुळें तो प्रसंग तपशिलवार पाहणें लेखकाच्यानें उरकलें नाहीं. अशा वेळीं मजकुरांतील माहिती जरी प्रत्यक्ष पाहिलेली असली तरी तींत अर्धवटपणा किंवा अपुरेपणा राहतोच व संभाव्य मजकूर दिला असल्याची शक्यता असते.

[आ] लेखक जो प्रसंग वर्णन करतो तो प्रत्यक्ष पाहण्यायोग्य अगर ऐकण्यायोग्य स्थितींत व जागीं होता किंवा नाहीं; तसेंच लेखकानें जें लिहिलें तें पाहिल्या अगर ऐकिल्याबरोबर लिहिलें कीं कांहीं काल लोटल्यानंतर लिहिलें. कालांतरानें लिहिलें असल्यास प्रसंगाचा विस्मर पडणें शक्य आहे काय, तसेंच लिहिण्यांत लेखकाचीं मतें व इतर गोष्टी त्यांत घुसडल्या जाण्याचा संभव आहे काय, हें शोधावें. कालांतरानें लिहिलेल्या 'आठवणी'तील

मजकुरांत नेहमींच चुका व गफलती आढळतात. अशा आठवणींचा दुस प्रकारच्या साधनांतच समावेश होतो.

[इ] लेखकाला एखादी गोष्ट प्रत्यक्ष पाहण्याची शक्यता असते. प तो तसें न करितां केवळ सांगीवांगीच्या माहितीवर विश्वसतो किंवा कल्प लिहून कळवितो. असले प्रसंग केवळ आळस व कुचराई यांमुळेंच घ येत असतात. विशेषतः सरकारी अहवालांत किंवा नोकरांनीं लिहिलेल्य बातमीपत्रांत अशा प्रकारचा मजकूर नेहमीं आढळण्यांत येतो. नेहमं उदाहरण घ्या. सभेला हजर न राहातां केवळ कार्यक्रमावरून कांहीं क बातम्या दिल्या जात नाहींत. अशा वेळीं तपशील जर ठराविक पद्धतीनें शब्दांत दिला असेल तर त्यांतील माहितीवर फारसा विश्वास धरण्य कारण नसतें.

[ई] एखादी गुप्त गोष्ट देणें, सैन्याची मोजदाद देणें, सैन्याच्या हालचाली व त्यांचे उद्देश देणें, ऐवजाचा आढावा देणें, लढाईतील मृत्यूं अगर जखमी लोकांची मोजदाद सांगणें यासारख्या गोष्टी प्रत्यक्ष पा सांगतां येत नाहींत. त्या देण्यास अजमासें हिशेबच करावे लागतात. अ तपशिलाची परीक्षा करतांना लेखक अजमास काढण्याइतका योग्य व अ भवी आहे काय व असा अजमास देण्यायोग्य त्यानें सर्व बाबींची पाह अगर तपासणी केली आहे किंवा काय, हें अवश्य शोधावें. सैन्याची मोजद नेहमींच सरदारांच्या एकंदर दर्जावरून देण्याचा प्रघात आहे.

सारांश वर दिलेल्या दोन्हीही प्रकारच्या प्रश्नावलींच्या साहाय्यानें लेखक लिहिलेल्या मजकुराची तपासणी करितां येते. परंतु या सर्व तपासणींत प गोष्ट प्रथम मान्य केली होती कीं, लेखक जें लिहीत आहे तें सर्व प्रत्य पाहून किंवा अनुभवून लिहीत आहे. परंतु ऐतिहासिक साधनांत प्रत्यक्ष पा लिहिलेली माहिती अगदींच विरळ असते. बहुतेक सर्व अप्रत्यक्ष अगर परं चीच माहिती उपलब्ध असते. म्हणून इतिहासरचनेस अशा दुय्यम दर्जा माहितीचाही उपयोग करणें भाग पडतें. इतर कोणत्याही शास्त्रांत अशी दुस प्रकारची माहिती विचारांत घेतली जात नाहीं. अर्थात् अशा दुय्यम प्रक ख्या साधनांची चिकित्सा करितांना लिहिणाराच्या मनोवृत्तीची वगैरे तपास करण्यापेक्षां लिहिणाराला ज्यानें माहिती दिली अशा माहिती देणाराच्याच म

स्थितीची छाननी करणें जरूर पडतें. कारण लिहिणारा माहितीला फारसा जबाबदार नसतो. तो फक्त एक मध्यस्ती म्हणून मध्यें येत असतो. परंतु लिहिणाराला जो माहिती देतो त्याचें नांव गांव समजूं शकतेंच असें नाहीं. अशा वेळीं ती माहिती कोणातरी अज्ञात माणसाकडून मिळाली, इतकेंच समजून त्या माहितीची छाननी करणें भाग पडतें. इतकेंच नव्हे तर निरनिराळा प्रसंग निरनिराळ्या एका अगर अधिक साक्षीदारांकडून घेतला असण्याचाही संभव असतो. अशा वेळीं साधनांच्या सामान्य स्थितीवरून प्रसंगांचें परीक्षण करावें लागतें. अशा परीक्षणांत पहिला प्रश्न असा उद्भवतो कीं, साधनांत दिलेल्या प्रसंगांत ठराविक परंपरा दृष्टीस पडत आहे किंवा कसें ? अशा परंपरेच्या माहितींत सहेतुक किंवा इतर कांहीं कारणांनी फेरफार करण्यांत आला आहे किंवा काय ? अशा फेरफारांत व्यक्तिविषयक, समाजविषयक, देश अगर धर्मविषयक स्वभावदोष आढळतात किंवा कसें ? अशा तऱ्हेच्या परीक्षणानें मूळ परंपरेच्या माहितीवर चढलेलीं आवरणें दूर करतां येतात. जर ही परंपरा लेखनद्वारें मर्यादित केली गेली असेल तर तिच्यामध्यें अफरातफर होण्याचें प्रमाण फारच लहान असूं शकतें. परंतु जेव्हां परंपरा दंतकथेचें स्वरूप घेते तेव्हां मात्र त्यांतील मूळ पाठ शोधून काढणें जवळजवळ अशक्यच होऊन बसतें. कारण दंतकथेंत फक्त परंपरेच्या माहितीचे परिणामच कायम राहतात. मूळ तपशील स्मरणांतून नाहींसा झालेला असतो. अशा दंतकथांचा इतिहासांतून होतांहोईतों उपयोग करूंच नये. कोणत्याही इतर शास्त्रांत तो केला जात नाहीं. परंतु बहुधा इतिहासकार अशा दंतकथांचा आपल्या लिखाणांत उपयोग केला असल्याचें स्पष्ट सांगत नसतो. बरेच वेळां त्यांच्या दंतकथांतील माहिती त्यानें प्रत्यक्ष पुराव्यांवरून लिहिली असें भासविण्याचा सामान्य कल असल्याचें दिसतें. अशा वेळीं खरी वस्तुस्थिति समजून घेण्याचा एक मार्ग मात्र मोकळा असतो. तो म्हणजे ज्या कालचा प्रसंग वर्णिला असेल त्या कालीं प्रसंगवर्णनांतील सर्वच गोष्टी लिहून ठेवण्याचा परिपाठ होता किंवा नाहीं हें तपासणें हा होय. जर तसा परिपाठ नसेल तर लेखकाला ती माहिती दंतकथांवरूनच मिळाली असें मानण्यास बरीच जागा होते. तपशील लिहून न ठेवण्याचा काल म्हणजे अगदीं प्राचीन काल असाच कित्येकांचा समज होणें साहजिक आहे. परंतु असे कित्येक वर्णनाचे भाग सांगतां येतील

कीं, त्यांचीं वर्णनें लिहून ठेवण्याचा मुळीं परिपाठच नसे. लिहिण्याची सोय तितकी सोपी नव्हती हें विसरतां कामा नये. व्यवहारास अत्यावश्यक अशाच गोष्टी लिहिल्या जात. कोणत्या राजाचीं अगर सरदाराचीं स्वरूपवर्णनें वगैरे लिहून ठेवलेलीं आढळतात? अगदीं अजूनपर्यंतही हिंदुस्थानांतील परिस्थिति पहा. कोणत्या खेड्यांत तेथील लोक आपलें वर्तमान लिहून ठेवीत आहेत. इतिहासकालापासून तों येट आतांपर्यंतचीं मोठमोठ्या सरदारांचीं उदाहरणें घ्या. किती सरदारांच्या घराण्यांचे इतिहास लिहून ठेवले गेले आहेत? अगदीं चारपांचच असे संस्थानिक सांपडतील कीं, त्यांनीं आपला इतिहास तयार करण्याची खटपट केली आहे. सारांश, हिंदुस्थानच्या इतिहासांतील बऱ्याच प्रसंगांची जोपासना दंतकथांतूनच होत आली आहे हेंही तितकेंच सत्य आहे. शेतकरी, सैनिक व अशाच तऱ्हेच्या कित्येक समाजांतील माणसांना आपला इतिहास परंपरेनेंच दंतकथांच्या स्वरूपांतच अद्यापही जोपासावा लागत आहे. जोंपर्यंत देशाचा इतिहास तयार होण्याच्या मार्गांत आहे व जे प्रसंग अशा तयार झालेल्या इतिहासांत ग्रथित झालेले नाहीत तोंपर्यंत अशा प्रसंगांची जोपासना आणि विशेषतः घराण्यांच्या इतिहासाची जोपासना दंतकथांतूनच होणें साहजिक आहे. तसेंच कोणीही व्यक्ति आपली कामगिरी लिहून ठेवतोच असेंही नाहीं. असा इतिहास केवळ 'आठवणी'वरूनच तयार होतो. परंतु अशा तऱ्हेच्या सर्व मजकुरावर आठवणीचा घोंटाळा, चुकीचा भावार्थ-बोध, काल्पनिक चित्रें, निंदाजन्य कुटिल मजकूर वगैरे संस्कार घडतच असतात. आठवणी किंवा दंतकथा म्हणजे ऐतिहासिक पुरुषाबद्दलचे बरे-वाईट लोकसमज होत. अशा लोकसमजांतून इतिहासास मान्य व उपयुक्त अशी फारच थोडी माहिती मिळूं शकते. अशा माहितीची सत्यता पटविणेंही फार कठीण असतें. बरेच वेळां दंतकथांतील माहिती अशक्य, आश्चर्यजनक, परस्परविरोधी, व अर्थहीनही असते. ती वर्ज करावी लागते. राहिलेली इतिहासांत उपयोगांत आणावी लागते. अशी माहिती फक्त इतर साधनाभावींच उपयोगांत आणावयाची असते. जेव्हां इतिहासकालीन इतर साधनें उपलब्ध असतात तेव्हां ज्या माहितीचा उगम दंतकथेंत झालेला असतो ती त्याज्य समजून सोडून देणें हा खरा शास्त्रशुद्ध नियम आहे. अशा

'आठवणी' जर एकाच पिढींतल्या माणसांनीं आपल्या समसामयिक माणसांबद्दल लिहिल्या असतील तर त्या दंतकथेच्या सदरांत येणार नाहींत.

ज्या माहितीची परंपरा लेखी असते त्या माहितीची तपासणी करतांना लेखकानें ती परंपरा जशीच्या तशीच पुढें चालविली आहे किंवा त्यांत फेरबदल केला आहे, तसेंच लेखकानें ज्या दुसऱ्या एखाद्या जुन्या लेखावरून माहिती घेतलेली असते ती तरी शुद्ध आहे किंवा कसें हें तपाशीत तपाशीत थेट परंपरेच्या मुळाशीं जावें लागतें. निरनिराळ्या प्रती ताडून पाहून मुळाची जितकी कल्पना करवेल तितकी झाली म्हणजे मग मात्र त्या साधनांतील परंपरेच्या माहितीचें अंतरंग परीक्षण करावयाचें असतें. असें करतांना आपला लेखक मुळांत कोणता फेरबदल करूं शकेल व कोणत्या पद्धतीनें करूं शकेल हें अजमावून त्याप्रमाणें साधनांची परीक्षा करावी. नंतर राहिलेल्यांतील कोणत्या भागाची लेखनपद्धति बगैरे मूळ संबंध लिखाणांतील पद्धतीपेक्षां निराळी आहे तें तपासून ती वर्ज करावी. परंतु अशा परंपरेच्या माहितीचा उपयोग फारच अल्प प्रमाणांत करावा. कारण असली माहिती पुरावा या दृष्टीनें अगदीं कमी दर्जाची ठरते. केवळ नाइलाजास्तवच असल्या माहितीचा इतिहासांत उपयोग करावा. आपण कितीही परीक्षण करूं म्हटलें तरी मूळ प्रसंग ज्याच्या दृष्टिक्षेपांत आला त्याचा पत्ता लागणें अगदीं अशक्य असतें. परंतु अशा तऱ्हेनें साधनांतील बराचसा भाग कोणी व कसा पाहिला आणि कोणीं व कोणाला सांगितला हें समजणेंच शक्य नसल्यामुळें तो सोडून द्यावा तर त्याशिवाय इतिहासरचनाही होऊं शकत नाहीं. म्हणून अशा साधनांतूनच साधेल किंवा गाळून घेतां येईल तो सर्व मजकूर घेणें अगदीं आश्यक होतें. साधनांतील सर्वच मजकूर खऱ्या वस्तुस्थितीचा द्योतक नसतो व असा मजकूर इतिहासांत वापरणें धोक्याचेंही असतें व त्यांत हटकून चुका व खोटेपणा शिरण्याचा संभव आहे अशी भीतिही वाटत असते. तरीही आपणाला अशा साधनांतूनही आणखी एका परीक्षणानें कांहीं तपशील घेतां येणें शक्य असतें. कारण इतिहासांत अशा कांहीं बाबी असतात कीं, त्या खोटेपणानें सांगणें किंवा त्यांत चुका राहणें तितकें शक्य नसतें. आणि अशा बाबी कोणत्या असूं शकतील त्याही आपणांस अभ्यासानें समजूं शकतात. अभ्यासाकरितां कांहीं बाबी पुढें देतों:—

[अ] ज्या बाबींत एकाद्याला आपलें मत अगर मनोविकार सहज दुसऱ्याच्या पचनीं पाडतां येतात अशाच बाबतींत चुकीचा किंवा खोटा मजकूर येत असतो. परंतु ज्या बाबतींत मिथ्याकथन किंवा मनोविकार-प्रदर्शन वाचकाला पटणार नाहीं—नव्हे, त्यावर त्याचा विश्वास बसणार नाहीं व असें झालें म्हणजे ज्या वर्णनाचा यत्किंचितही उपयोग होणार नाहीं असा लेखकाला भरंवसा वाटत असतो, त्या बाबींत खोटा किंवा बनावट मजकूर किंवा त्या मजकुराची मिथ्या सजावट करण्याचा लेखक प्रयत्न करीत नाहीं. लेखक अशा प्रकारच्या पेंचांत केव्हां सांपडला आहे व त्यामुळें त्याचें विवेचन कितपत व कोणतें खरें असूं शकेल हें शोधण्याकरितां पुन्हा एक प्रश्नावलि तयार करावी. अशा प्रश्नावलीच्या रचनेस पुढील मुद्दे लक्षांत घ्यावे.

[१] जी गोष्ट लेखकानें लिहिली ती त्याच्या मर्जीविरुद्ध असण्याचा संभव आहे काय? किंवा ती त्याच्या फायद्याच्या, अभिमानाच्या, संस्कारांच्या किंवा त्याच्या अगर समाजाच्या आवडीविरुद्ध आहे काय? असें मर्जीविरुद्ध वर्णन करणें लेखकाला भाग पडलें असलें तर त्यांत थोडेंसें तरी तथ्य असावयाचेंच.

[२] जी बाब लिहिली ती इतकी प्रसिद्ध आहे कीं, जर लेखकानें तींत खोटा मजकूर घालण्याचें मनांत आणलें असतें तर त्याबरून तो खोटें बोलणारा म्हणून सहज अब्रूनुकसानीस कारणीभूत होईल अशी त्याला भीति वाटत असते. अशा गोष्टी समकालीन व सर्वश्रुत अशा असतात व त्यांचा प्रसार बराच दूरवर झालेला असतो. परंतु हा नियम ज्या वेळीं आपणांला लेखक व वाचक यांचा परस्पर संबंध पूर्णपणें निगडित असल्याचें समजतें तेव्हांच उपयोगांत आणतां येतो. कारण आपणच काय ते सर्वज्ञ अशी त्याला स्वतःची खात्री वाटत असल्यास तो इतरेजनांची फारशी तमा व भीड धरीत नसतो.

[३] जी बाब लेखकानें वर्णिली तिच्याशीं त्याचा बराबाईट कांहीं संबंध आहे काय? नसल्यास त्यांत गफलत होण्याची भीति कमी. अशा प्रकारच्या माहितींत विशेषतः सहज संदर्भानें जे उल्लेख येतात त्यांचा समावेश होतो. कोणताही मजकूर केवळ सर्वच खोटेपणानें बनावट

करून लिहितां येत नाहीं. कोणत्याही मजकुराची जागा, काल वगैरे आवश्यक गोष्टी जमाव्या लागतातच. अशा तपशिलांत तर लेखकाचा फारसा संबंध नसतो. उलट लोकांची मात्र त्यावर तपासणी असते. त्यामुळें अगदींच खोटा मजकूर केव्हांच लिहिला जात नाहीं. थोडासा तरी सत्य मजकूर आधाराला असावा लागतोच. अशा आधारास घेतलेल्या मजकुरांतूनही बरीच उपयुक्त माहिती घेतां येते.

[आ] कोणताही तपशील असा असला कीं, त्यांत चूक शिरण्याचा फारच थोडा संभव असतो. अशा तपाशिलाचीही निवड आपणांला इतिहासासाठीं करून घेतां येऊन तो उपयोगांत आणतां येतो. असे कित्येक प्रसिद्ध प्रसंग असतात कीं, त्यांची माहिती सर्वत्रांचे कानापर्यंत जाऊन पोहोंचणें अगदीं सहज व शक्य असतें आणि त्यांत चूकही राहण्याचा फारसा संभव नसतो. अशा वेळीं फक्त इतकेंच शोधावयाचें असतें कीं, जी बाब वर्णिली गेली ती सर्वांना व लेखकाला समजणें तितकें सोपें होतें कां ? हें शोधण्यास पुढील मुद्दे लक्षांत ठेवणें इष्ट आहे.

[१] तो प्रसंग घडण्याला बराच काल लागला किंवा तो बरेच वेळां पाहिला गेला म्हणून तो सर्वत्रांच्या श्रुतिस्मृतीवर येऊं शकला. जसें, एखादा मनोरा, गड, दरबार, वगैरे.

[२] ती गोष्ट सर्वांच्या पाहण्यांत येण्याइतकी व्यापक म्हणजे बराच मोठा भाग व्यापणारी होती कीं काय ? जसें, लढाई वगैरे.

[३] ती गोष्ट इतक्या सामान्य शब्दांत वर्णिलेली आहे कीं, सहजदृष्टि गेल्यानें समजणारी होती. जसें, पोषाख वगैरे.

[इ] ती बाब अशा प्रकारची असली पाहिजे कीं, जर ती खरी नसती तर लिहिलीच गेली नसती. कांहीं हेतु नसतांना एखादी गोष्ट न पाहतां पाहिली म्हणून लेखकाकडून सहजपणें लिहिली जाण्याचा फारसा संभव नसतो.

वरील सर्व प्रभावलींचा व परीक्षणपद्धतीचा वरवर विचार केला तर ही पद्धति फारच व्यापक वाटेल. परंतु वस्तुतः तसें नाहीं. कोणत्याही पद्धतीचा अभ्यास अंगवळणीं पडल्यावर तिचा उपयोग करणें अगदीं सोपें व सहज असतें. अभ्यासानंतर मात्र असें पटेल कीं कोणत्याही पद्धतीचा ऊहापोह करणें फार कठीण असतें पण ती सविस्तर उपयोगांत आणणें कितीतरी पटीनें सुलभ जातें.

सारांश, एखाद्या साधनांतील मजकूर वादविषयक असेल तर त्याचें परीक्षण प्रथम शब्दशः अर्थ करून व नंतर त्यांतील प्रसंगांची क्रमवार चिकित्सा करून करावें. साधन सुबोध असेल तर प्रथम वाचन करावयाचें तें वादग्रस्त प्रसंग सोडून वाचावें व नंतर वादग्रस्त मुद्दयांचें परीक्षण करावें. अशा तऱ्हेनें परीक्षण करूं लागलों म्हणजे हे वर दिलेले परीक्षणाचे सर्व मुद्दे वाचतां वाचतांच लक्षांत येऊं लागतील व आपोआपच सविस्तर परीक्षण होईल. संवयीनें अशा प्रकारची परीक्षकदृष्टि प्राप्त झाली म्हणजे मग वर दिलेल्या अनेक प्रश्नावलि वगैरेंची भीति बाळगण्याचें मुळींच कारण पडणार नाहीं. साधनांतील मजकुराची निवड करतां येणें म्हणजे इतिहासरचनेंतील अर्धा पल्ला गांठणें होय.

## ४२ संभाव्यासंभाव्यता

मानवी कृत्यांचा कोणताही पुरावा जर तो खास कृत्यांतच दृष्टिगोचर होत नसेल तर नेहमींच तो संभवनीय कोटींतील आहे किंवा नाहीं असा आपोआपच प्रश्न उभा राहतो. वर्तमानकालीन मानवी कृत्यांचे सर्व पुरावे साक्षभूत उभे असल्यानें आपला त्यांचेवर विश्वास बसतो व जर तो प्रथम असंभवनीय कोटींतिल वाटत असल्यास त्याला चमत्कृति किंवा असाधारण कृत्य म्हणून जमेस धरलें जातें. परंतु असे कित्येक प्रसंग सांगितले जातात कीं, ते असंभवनीय आहेत म्हणून तात्काळ त्यावर निर्णय देतां येतो व त्या निर्णयाप्रमाणें ते खोटे ठरतातही. यावरून असा सामान्य नियम किंवा प्रवृत्ति सांगतां येईल कीं, कोणत्याही कालीं सहेतुक अगर गैरमाहितीनें अगदीं असंभवनीय कोटींतीलही मजकूर लोकांत फैलावणें शक्य असतें. जाणता माणूस त्यांतील असंभवनीयता जाणून तो चुकीचा म्हणतो. श्रद्धाळू त्यावर विश्वसतो इतकेंच. ऐतिहासिक साधनांत तर असे प्रसंग नेहमींच आढळतात. वर्तमानकालीं इतर बऱ्याच गोष्टींच्या साह्याच्यानें खरेखोटें तपासतां येत असल्यानें असंभवनीय मजकुराची सत्यता पटवून घेतां येते. परंतु इतिहास कालच्या मजकुराची अशी प्रत्यक्ष अनुभवाची छाननी करणें शक्य नसतें. जेथें वर्तमान परिस्थितींतही असंभवनीय मजकुराचा उगम कोठून झाला हें समजूं शकत नाहीं तेथें इतिहासकालीं तें समजणें तर अगदींच क्वचित् घडून येणें शक्य असतें. अर्थात् मजकूर कां व कसा आला याचीं कारणें समजत नाहींत.

म्हणून अशा मजकुराच्या तपासणीचा किंवा चौकशीचा एकच मार्ग शिल्लक राहतो. तो म्हणजे जो असंभवनीय दिसणारा मजकूर किंवा प्रसंग सांगितला गेला तो प्रत्यक्ष घडला आहे किंवा नाहीं, हें शोधून काढणें होय. या वेळींही त्या प्रसंगाचा पुरावा वर्तमानकालांतील प्रसंगासारखा प्रत्यक्ष पाहून तपासतां येत नाहीं. अर्थात् अशा वेळीं इतर अधिक विश्वसनीय पुराव्यावरच अवलंबून रहावें लागतें. इतकेंच नव्हे, तर वर्तमानकालीं जी समोंवतालच्या परिस्थितीची बरीच माहिती असूं शकते व तिचे साहाय्यानें संभाव्य दिसणाऱ्या कित्येक गोष्टीही असंभाव्य म्हणून सांगतां येतात तोही सहजमार्ग इतिहासकालच्या पुराव्यांत अगर माहितींत उपलब्ध असतोच असें नाहीं. त्यामुळें असंभवनीय कोटींतील व त्याचप्रमाणें असंभाव्य गोष्टींची ऐतिहासिक पुराव्यांतून निवड करणें बरेंच जड जातें. परंतु अशी निवडानिवड करणें अपरिहार्य असल्यानें साधनांच्या परीक्षणांत आणखी एक तपासणीची दृष्टि बाळगणें अत्यावश्यक होतें.

इतिहासांतील असे कितीतरी प्रसंग दाखवितां येतील कीं, ते अनपेक्षित रीतीनें घडून आलेले असतात. इतकेंच नव्हे, तर त्यांतील असेही प्रसंग दाखवितां येतील कीं, ते कार्यकारणभावाच्या नियमांतही बसवितां आले नसते. परंतु अशा प्रकारचे प्रसंग घडून आले आहेत हीही गोष्ट तितकीच खरी आहे. कोणीं त्यांचीं कारणें शोधून काढण्याचा कितीही प्रयत्न केला आणि असले प्रयत्न जरी आपणांला थोडेबहुत नीतिदर्शक अगर मार्गदर्शक होणार असल्यानें फायद्याचे असले तरी त्यांत एक प्रकारची अनिश्चितता कायम राहतेच. म्हणून अशा प्रकारचे कार्यकारणभावानें न जमणारे परंतु विश्वसनीय पुराव्यांवरून सिद्ध असणारे प्रसंग असंभवनीय म्हणून त्याज्य ठरवितां येत नाहींत. कारण ती गोष्ट घडलेलीच असते. एखादा प्रसंग खरोखरच घडला आहे काय ? व घडला असल्यास तो कां किंवा कोणत्या कारणानें घडून आला ? वगैरेसाठीं पुरावा कोणता हे वस्तुतः अगदीं दोन स्वतंत्र प्रश्न असतात. परंतु नेहमींच ते एकच विचारांत घेतले जातात व विनाकारण वाद माजविला जातो. ह्या दोन्हीही प्रश्नांत मुख्यतः एकच संबंध येऊं शकतो. तो संबंध म्हणजे इतक्याचसाठीच कीं, जर प्रसंगनिर्णया-चा पुरावा निश्चित नसेल तर प्रसंगाच्या कारणमीमांसेच्या अभावीं तो प्रसंगनिर्णय अधिकच अनिश्चित होतो. परंतु प्रसंगनिर्णयाचा पुरावा निश्चित

म्हणून मानला म्हणजे असंभवतेचा प्रश्नच उरत नाहीं. मग त्या प्रसंगाचं स्पष्टीकरण अगर उलगडा करतां येवो अगर न येवो. त्यावरून कोणत्याही तऱ्हेचा परिणाम घडूं शकत नाहीं. एखादा पुरावा विश्वसनीय मानला म्हणजे त्याला संभाव्यतेची तपासणी लागत नाहीं. कारण तो त्या वेळीं संभाव्यतेच्या मोठ्या चाळणींतून विश्वसनीयतेच्या बारीक चाळणींत आलेला असतो. उदाहरणार्थ, एका माणसाच्या जन्माच्या दोन तिथि असणें शक्य नाहींत. तेव्हां एक कोणती तरी असंभवनीय असते. यांतील जन्म ही गोष्ट निश्चित असते. परंतु तो एका पूर्वीच्या शकांत झाला कीं नंतरच्या शकांत झाला हेंही अनिश्चित आहे. पहिल्या तिथीला विश्वसनीय पुरावा नाहीं. कारण त्याबद्दल समसामयिक कोणताच प्रत्यक्ष पुरावा नाहीं. पुरावा विश्वसनीय नसेल तर संभवनीयता शोधावी लागते. परंतु जेव्हां या तिथीला इतरही पुराव्यांवरून संभाव्य ठरवितां येत नाहीं, तेव्हां अशा वेळीं त्या तिथीला जन्म होणें हें अधिक असंभवनीय ठरण्याला जन्माच्या दोन तिथि संभवत नाहींत हा मोठा व महत्त्वाचा मुद्दा होतो. उलट दुसरी तिथि समसामयिक पुराव्यांवरून अधिक विश्वसनीय ठरते; परंतु निर्णायक नसते, व तिला इतर पुराव्यांची जोड मिळते, म्हणून ही दुसऱ्या एखाद्या अधिक विश्वसनीय व संभवनीय तिथीशीं तुलना करण्याचा प्रसंग येईपर्यंत संभाव्य मानावी लागते. अर्थात् या तिथीला असंभवतेचा मुद्दा लागूच पडत नाहीं. ज्या वेळीं असंभवतेचा मुद्दा लागूं शकतो त्या वेळीं तो मजकूर त्याज्य ठरतो. तो कां आला व कसा आला वगैरे स्पष्टीकरणाचा मुद्दा या निर्णयास शास्त्रीयदृष्ट्या बाधक नसून त्याचा विचार करणें झाल्यास स्वतंत्र विचार करावयाचा असतो. सारांश असा कीं, एखादी गोष्ट घडलीच नाहीं असें म्हणण्याला केवळ असंभवनीयता हें पुरेसें कारण नसलें तरी तें जेव्हां अशक्यतेच्या स्वरूपांत जातें त्या वेळीं निर्णायक नकारार्थी पुरावा देतें. संभवनीयतेच्या पुराव्याचा प्रश्न ज्या वेळीं अगदीं विश्वसनीय समसामयिक पुरावा उपलब्ध असतो तेव्हां उत्पन्नच होत नाहीं. अशा प्रसंगांत कदाचित् संशय वाटल्यास त्याचें परीक्षण अधिक विश्वसनीय पुरावा गोळा करूनच करणें शक्य असतें. त्याला संभाव्यासंभाव्यता ओळखण्याचें परीक्षण उपयोगी पडत नाहीं.

ज्याबेळीं एखाद्या विवेचनांत मतविरोध दृष्टीस पडतो त्या वेळीं प्रत्येकाच्या

विवेचनांत कोणते मुद्दे व कोणत्या विश्वासाबर ते लिहिले गेले यार्चे प्रथम परीक्षण करावें लागतें. आणि अशा परीक्षणानें जें विवेचन विश्वासार्ह वाटतें तेंच मान्य केलें जातें, असाच नियम आहे. परंतु अशा रीतीनें तपासणी करितांनाही क्वचित्प्रसंगीं संभाव्यासंभाव्यता विचारांत घेतली जाते. कोणीही लेखक असंभाव्य गोष्ट सहजपणें लिहूं शकत नाहीं. तो आपल्यापुरती तरी खात्री करून घेतोच. फार तर लेखक एखादी गोष्ट न पटल्यास ती त्याला पटणाऱ्या अशा निराळ्या स्वरूपांत सांगेल. परंतु एखादी नवीनच असंभवनीय गोष्ट रचण्याचें तो सहसा धाडस करणार नाहीं. सारांश, निरनिराळ्या मत-विरोधी विवेचनांचे तपशील तपासतांना केवळ संभवनीय किंवा असंभवनीय या एकाच मुद्द्यावर परीक्षण करणें शास्त्रशुद्ध होणार नाहीं.

असंभवनीयता व अशक्यता यांतीलही भेद चांगलाच लक्षांत घेतला पाहिजे. एखादी गोष्ट असंभवनीय वाटत असली म्हणजे ती अशक्य असतेच असा नेम नाहीं. एखादा मनुष्य कत्तलींतून एकटाच वांचून येणें असंभवनीय नाहीं. परंतु एखादा मनुष्य एकाच वेळीं दोन दूरच्या ठिकाणांवर स्वतंत्रपणें कारभार करणें मात्र अशक्य आहे. सारांश, ज्या गोष्टी अशक्य कोटींतील असतात त्यांच्या परीक्षणास व त्या अशक्य ठरविण्यास आणखी पुरावा जुळविण्याची मुळींच जरूर नसते. उलट असंभवनीय वाटणाऱ्या गोष्टी इतर साधनांच्या अभावीं खरोखरच असत्य आहेत हें ठरवितां न आल्यास त्या त्याज्य मानतां येत नाहींत.

अद्भुत प्रसंगांबद्दल बरीच असंभवनीयता वाटते व तिचें अशक्यतेंतही केव्हां केव्हां पर्यावसान केलें जातें. शेवटीं ती त्याज्य ठरविली जाते. पुष्कळ वेळां असा निर्णय बरोबरही ठरतो. परंतु अशा तऱ्हेचा निर्णय देतांना एक गोष्ट पूर्णपणें लक्षांत ठेवावी कीं, निसर्गाचें अथवा मानवी शक्तीचें अद्यापिही कोणालाच पूर्णपणें ज्ञान झालेलें नाहीं. ज्या कांहीं गोष्टी आज अशक्य वाटतात त्याच नंतर अगदीं शक्य झाल्याचें प्रत्यक्ष दृष्टोत्पत्तीस येत असतें.

एखादी गोष्ट घडली असल्याचा उल्लेख मिळाल्यानंतर त्याची संभवनीयता शोधण्याचा प्रयत्न करीत असतांना, जें परीक्षणार्थ शोधन करण्यांत येतें तें फक्त ती गोष्ट घडली असल्याची खात्री करून घेण्यापुरतें असतें. परंतु अनुमानानें अगर भविष्य म्हणून वर्तविलेले असंभवनीय उल्लेख जेव्हां

एखाद्या साधनांत आढळतात त्या वेळीं ते खरोखरीच असंभवनीय आहेत का? अथवा ते संभवनीयही होणें शक्य आहेत का? याची छाननी करावी लागते. उदाहरणार्थ, कोणीं एकानें असें विधान केलें कीं, आतां जी लढाई होईल तींत फक्त ठराविक तीन माणसें मारलीं जाणें असंभवनीय आहे. बाकीचीं मात्र मरून जातील. कदाचित् या माणसांची शक्ति वगैरे गोष्टींवरूनही हें विधान केलें गेलें असेल व त्या विधानाच्या शक्यतेबद्दल त्यांना खात्रीही वाटत असेल. परंतु हें विधान नंतर बरोबर ठुळलेंच असेल असें नाहीं. कदाचित् हींही माणसें मारलीं गेलीं असतील. तेव्हां नुसत्या असंभवनीयतेच्या अनुमानाच्या उल्लेखांवरून तीं माणसें मारलीं गेलीं नाहींत असें मानणें चुकीचें असतें. तेव्हां जो असंभवनीयतेचा प्रकार कार्य घडण्यापूर्वी मानला गेला त्यावरून ती असंभवनीयता सिद्ध होतेच असें नाहीं. तेव्हां अशा अनुमानांना किंवा भविष्यांना प्रसंग घडल्याचा पुरावा मानतां येत नाहीं.

पुष्कळ वेळां ज्या पुराव्यांचा व्यक्तिशः प्रसंगनिर्णयास उपयोग मुळींच होऊं शकत नाहीं. त्या पुराव्यांची संभवनीयता ठरविण्यास उपयोग होतो. म्हणून ज्या गोष्टीला प्रत्यक्ष पुरावा नसेल तिची संभवनीयता अशा उपपुराव्यांनीं सिद्ध झाली तर ते प्रसंग संभाव्य म्हणून इतिहासांत उपयोगास आणण्यास हरकत नसते.

इतिहासांत कोणतीही गोष्ट निश्चितपणें किंवा निर्णायक म्हणून ठरण्याइतका प्रत्यक्ष व बिनचूक पुरावा क्वचितच आढळतो. नेहमीं संभाव्यतेवरच विसंबावें लागतें. कोणतीही गोष्ट असंभाव्य नसली म्हणजे एखादी गोष्ट ऐतिहासिक पुराव्यांनीं घडून आल्याचें सांगितलें व असा ऐतिहासिक पुरावा थोडासा तरी विश्वसनीय असल्याचें पटलें कीं ती असंभवनीयतेंतून निघते व संभाव्य ठरते. जोंपर्यंत तिचें मिथ्यात्व इतर पुराव्यांनीं सिद्ध झालें नाहीं तोंपर्यंत ती संभाव्यच राहते. ती निर्णायक मात्र नसते हें लक्षांत ठेवावें. सारांश, या संभाव्यासंभाव्यतेवरच इतिहास सजला जातो म्हणून संभाव्यासंभाव्यतेचे कांहीं सामान्य मुद्दे परीक्षणासाठीं पुढें देत आहें:—

[१] कोणतीही बाब अगदीं निश्चित व पूर्ण निर्णायक पुराव्यांच्या साहाय्यानें संशयातीत ठरत असेल तरच ती निर्णायक समजावी.

[२] एखादी बाब अविश्वसनीय पुराव्यांवरून घडल्याचें समजून येत असेल तर ती असंभवनीय आहे कीं काय याबद्दल तपासणी करावी.

[३] अशक्यता व असंभाव्यता, त्याचप्रमाणें शक्यता व संभाव्यता, ह्या दोन्ही स्वतंत्र बाबींतील भेद पूर्णपणें लक्षांत घ्यावेत.

[४] असंभाव्य वाटणारी गोष्ट खरोखरच असंभाव्य ठरते असें नाहीं. घडूनही येते.

[५] असंभाव्य म्हणून वर्तवलेली कोणतीही गोष्ट त्या वर्तवण्याच्या पुराव्यावरून घडून आलीच नाहीं असें मानतां येत नाहीं.

[६] कारणमीमांसेवरून असंभवनीय वाटणारी गोष्ट अनपेक्षित कारणांनीं घडून येऊं शकते.

[७] अद्भुत वाटणाऱ्या गोष्टी नेहमींच असंभवनीय असतात असा नियम नाहीं.

[८] समसामयिक पुराव्यांतील अनुल्लेख प्रसंगांची असंभवनीयता सिद्ध करीत नाहींत.

[९] प्रसंग निवेदन करणारा पुरावा विश्वसनीय वाटतांच त्या प्रसंगाबद्दलची असंभवनीयतेच्या प्रश्नाची मोठी कक्षा सुटून विश्वसनीयतेच्या मर्यादित कक्षेंत तिची तपासणी करावयाची असते.

[१०] कोणतीही संभाव्य गोष्ट निर्णायक असलीच पाहिजे असा आग्रह धरतां येत नाहीं.

[११] इतिहासांतील प्रत्येक तपशील तपासतांना जो निर्णय येतो त्यावरून त्या तपशिलांतील अधिक संभाव्य कोणता हेंच ठरत असतें.

[१२] प्रसंगाप्रमाणें त्यांतील प्रत्येक तपशिलांतील अधिक संभाव्य मजकूर शोधण्याची खटपट करावी लागते. प्रसंग संभाव्य ठरला म्हणजे त्यांतील सर्वच तपशील संभाव्य असतीलच असें नाहीं.

[१३] एकाच प्रसंगाचे कोणतेही दोन अगर अधिक तपशील संभाव्य असूं शकत नाहींत. अशा वेळीं दोन प्रकारच्या विवेचनांतील अधिक संभाव्य कोणता हें शोधून दुसरा असंभाव्य मानावा. निर्णय करितां न आल्यास निर्णयापुरता पुरावा मिळेपर्यंत निर्णय देऊं नये.

[१४] ज्या प्रसंगाच्या संभाव्यतेबद्दलचा प्रत्यक्ष पुरावा नसेल व तो प्रसंग

इतर असंबंधीं पुराव्यांवरून घडल्याचें सूचित होत असेल तर तो प्रसंग संभाव्य ठरतो.

[१५] इतिहासांत पुराव्यांचें परीक्षण अधिक संभाव्य कोणता यावरून करावयाचें नसून अधिक विश्वसनीय कोणता यावरून करावयाचें असतें. त्यामुळें परीक्षणास पटणारी संभाव्यतेची कसोटी लावून अधिक संभाव्य कोणता हें न ठरवितां अधिक विश्वासार्ह पुरावा कोणता हे ठरवून त्यावरून अधिक संभाव्य मजकूर कोणता हें ठरवावें लागतें.

[१६] कोणत्याही पुराव्यांनीं सूचित न केलेला प्रसंग, परंतु परीक्षकाला कारणपरंपरा वगैरे कारणांनीं वाटणारा संभाव्य मजकूर असंभवनीयही ठरूं शकेल. म्हणून परीक्षकास असा मजकूर संभाव्य म्हणून देतां येत नाहीं.

[१७] शक्य असलेला प्रसंग संभाव्य असतोच असें नाहीं. म्हणून सर्व शक्य प्रसंगांना घडल्याचा पुरावा मिळेपर्यंत ते संभाव्य मानतां येत नाहींत.

## ४३ प्रसंग-निर्णय

निरनिराळ्या तऱ्हेनें केलेल्या परीक्षणानें ऐतिहासिक साधनांतून अनेक प्रकारच्या कल्पना व प्रसंगांचे तपशील प्राप्त करून घेतां येऊन त्याबरोबरच त्यांच्या खरेखोटेपणाबद्दलचा विचार करितां आला. आतां या प्राप्त करून घेतलेल्या सामुग्रींतून इतिहासाची रचना ज्या प्रसंगवर्णनावरून करावयाची त्या प्रसंगांचा निर्णय कसा करावयाचा व तसें करण्यास आपली सामुग्री कशी तपासावयाची याचा विचार करणें भाग आहे. साधनांतून दोन प्रकारची सामुग्री मिळावितां आली. एक कल्पनाचित्रें व दुसरा तपशील. प्रसंगनिर्णयास या दोहोंचेंही परीक्षण निरनिराळ्या तऱ्हेनें करावें लागतें.

कोणतीही कल्पना असो, तिचा उगम कोणाच्या तरी मनांत प्रथम व्हावा लागतो. मग ज्या साधनाच्याद्वारें ती कल्पना प्रथम समजली त्या साधनलेखकाची ती असो किंवा ती त्यानें इतरांकडून घेतलेली असो. कल्पनांच्या उगमाला कांहींतरी सुचविणारी गोष्ट प्रथम घडावी लागते. कारण, या कल्पनांचें आणि विशेषतः भावनामय कल्पनांचें वर्णन फक्त ज्या प्रसंगांवरून त्या प्रथम लेखकाच्या मनांत प्रादुर्भूत झाल्या असतील त्या प्रसंगावरच अवलंबून रहातें. म्हणून प्रसंगवर्णनावरून एखादी भावना

कोणत्या कालाला, देशाला, समाजाला किंवा लेखकाला मर्यादित आहे हें ठरवितां येण्यासारखें असतें. असें करण्यास पुढील मुद्दे लक्षांत घ्यावे लागतात.

[१] सामाजिक चालीरीतीबद्दल किंवा सामान्य नीतीबद्दलचीं जीं कल्पनाचित्रें साधनांत आढळतात त्यांत लेखकाच्याच कल्पना अगर मनोविकार प्रामुख्यानें उमटलेले असतात. अशा प्रकारच्या एकाच माणसाच्या कल्पना-चित्रांवरून त्या कालाच्या चालीरीतीचा अगर सामान्य नीतिमत्तेचा पूर्णपणें बोध होऊं शकणार नाहीं. इतर तत्कालीन बऱ्याच साधनांतून अशाच प्रकारच्या कल्पना वर्णन केलेल्या आढळल्या तर त्या सर्व कल्पनासमुच्चया-वरून तत्कालीन खऱ्या किंवा सामान्य सामाजिक चालीरीतींचा अगर नीतीचा बोध होऊं शकतो.

[२] कित्येक वेळां वर्णन करितांना लेखक कल्पकतेच्या जोरावर वर्णन करीत असतो. उदाहरणार्थ, एखाद्या लग्नाचें वर्णन करणें झालें म्हणजे वऱ्हाडी जमले, सर्व मानपान झाले वगैरे जो तपशील देण्यांत येतो त्यांत तो लेखक स्वतः सर्वच पाहून लिहितो असें नाहीं. त्यांत तो बऱ्याच संभाव्य कल्पनाचित्रांचा समावेश करीत असतो. असें करितांना ज्या चालीरीति वगैरे रूढ असल्याचें लेखकाला माहीत असतें त्यांच्या आधारेंच सर्व वर्णन केलें जातें.

[३] कधीं कधीं लेखक आपल्या लेखांत नवलाची अगर जी गोष्ट नेहमीं आढळून येत नाहीं किंवा सहसा घडणें शक्य नसतें अशी गोष्ट कल्पनेनें संभाव्यता ओळखून घालतो. ती आपल्या लेखांत बरोबर बसविण्याची लेखक काळजी घेत असतो. त्यामुळें त्यावरून असें वाटूं लागतें कीं, ती जणुं काय खरोखरच घडून आली होती. परंतु ती खरी वस्तुस्थितिनिदर्शक नसते. उदाहरणार्थ, शिवजन्माचे वेळीं जिजाबाईस शंकराचें अथवा भवानीचें दर्शन, मालोजीस शंकराचा किंवा भवानीचा प्रसाद किंवा शहाशरिफचा आशीर्वाद वगैरे तपशील कल्पना आहेत. परंतु त्या फारच सफाईनें वर्णन केल्या गेल्या-मुळें मति भ्रमित करतात.

[४] कांहीं वेळां लेखकाचीं कल्पनाचित्रें त्याच्या देशाला, कालाला, वगैरे मर्यादित नसतात. तीं कोणत्याना कोणत्या तरी दूर देशच्या अगर लोकां-च्या अथवा जुन्या पुराणकालच्या कल्पनाचित्रांवरून अनुवादलेलीं असतात.

आणखीही अशाच तऱ्हेचे कल्पनाचित्रांचे प्रकार साधनांतून आढळ शक्य आहे. परंतु ते खरी वस्तुस्थिति सांगणारे नसल्यानें त्यांना बाद दे जरूर असतें. नंतर बाकी राहिलेल्या कल्पनाचित्रांचा उपयोग करावया हरकत नसते. कारण, त्यांत फारशी चूक असण्याचा संभव नसतो. परं अशा कल्पनाचित्रांचीही तपासणी करणें योग्य असतें. अशी तपासणी त्य साधनांतील तपशिलाचीच कसोटी लावून करतां येते. कोणत्याही बाबी अगदीं कसून परीक्षण केलें तरी तिचें निर्णायक सत्यत्व सिद्ध होतेंच अ नाहीं. तिची फक्त प्रमाणबद्ध संभवनीयता ठरते इतकेंच. परीक्षणाचा मुख हेतु इतकाच असतो कीं, तपशिलांच्या ग्राह्याग्राह्यतेच्या दर्जाचा क्रम लावणं कांहीं साधनें अगर तपशील अगदीं टाकाऊ, कांहीं संशयित, कांहीं संभाव्य कांहीं निर्णायक सत्य स्वरूपाचीं वगैरे असूं शकतात व त्याप्रमाणें त्यांच कमीअधिक दर्जा लावतां येतो. सामान्य नियम मात्र असा बसवितां येतो कं जो तपशील लेखकानें खास माहितीच्या अभावीं लिहिला तो टाकाऊ अथव त्याज्य असावयाचा. परंतु अशा तपशिलांतीलही चुकीचा कोणता व संभव नीय कोणता हेंही परीक्षणानें ठरवून घेतां येण्यासारखें असतें. जो भाग आप मान्य करतों तो संभवनीय म्हणूनच मान्य करीत असतों. कारण आपल्यात निश्चयात्मक सांगणारा प्रत्यक्ष साक्षीदार मिळणें दुरापास्त असतें. तेव्हां ज साधनें संशयित म्हणून आपण दूर करूं पाहतों, त्यांत कदाचित् कांहीं मजकू खराही ठरण्याचा संभव असतो व जीं खरीं असण्याचा संभव आहे म्हणू समजतों तीं खोटींही ठरणें शक्य असतें, असें इतिहासांत नेहमींच घडूं शकतं परंतु अशा परिस्थितीतूनही निर्णायक परीक्षा करण्याचा आणखी एक मा उरतो. तो म्हणजे प्रसंगनिर्णयाच्या वेळीं. साधनांच्या परीक्षणानें तपशी कोणता व किती संभवनीय आहे तें कळतें. परंतु कोणतीही बाब शास्त्रशुः सत्य केव्हां मानावयाची तर ती जेव्हां निर्विवाद होईल तेव्हां. असा निर्वि वादपणा जेव्हां एखादी बाब वेगवेगळ्या म्हणजे स्वतंत्र पुराव्यांनीं शाबी होईल तेव्हांच ठरूं शकतो. इतिहासांत या निर्विवादपणाला स्वतंत्र पुराव्यांच शाबिती असण्याचा नियम अगदीं आवश्यकच असतो. कारण, लेखक पाहतो व ऐकतो तें केवळ लिहून ठेवण्याच्या उद्देशानें काळजीपूर्व ऐकत किंवा पहात नसतो तर तें त्याचें सहजकार्य घडत असतें. त्यामु

त्याच्या दृष्टिक्षेपांतून कित्येक तपशील सुटून जाणें व त्यामुळें त्यांत गैरसमज उत्पन्न होणें साहजिक असतें. म्हणून दुसऱ्या माणसानें त्याच्या म्हणण्याला प्रत्यक्ष पाहून शाबिती दिल्याशिवाय त्याचें म्हणणें प्रमाण मानतां येत नाहीं व त्याचा इतिहासांत उपयोग करणेंही इष्ट नसतें. परंतु साधनाभावीं पुष्कळ वेळां अशा तपशिलांचा, इतकेंच नव्हे तर दंतकथांचाही इतिहासांत उपयोग केला जातो; आणि जोंपर्यंत त्या दंतकथा असत्य आहेत असा पुरावा मिळाला नाहीं तोंपर्यंत त्यांचा उपयोग इतिहासांत करण्यास हरकत नाहीं असेंही क्वचित्प्रसंगीं जोरानें प्रतिपादिलें जातें. जेथें एखादी बाब घडली किंवा नाहीं हें सांगणाऱ्या पुराव्यांचीच वानवा असते तेथें एखादी मागाहून बनविलेली अगर तत्कालीं गैरसमजुतीनें थोडीबहुत प्रचारांत आलेली बाब असत्य आहे हें प्रतिपादणारा पुरावा सांपडणें बहुतेक अशक्यच असतें. परंतु अशा प्रकारच्या आग्रहामुळें कित्येक दंतकथांतील असत्य मजकूर इतिहासांत येऊन बसतो व त्यामुळें इतिहासरचनेंतील कित्येक निश्चित स्थळें अनिश्चित राहतात आणि इतिहासाचें शास्त्रीय स्वरूप बरेंच नष्ट होतें. प्रसंगाच्या कोंदणांत जेव्हां तपशिलांना बसविण्याची पाळी येते तेव्हां ते व्यवस्थितपणें बसत नाहींत व इतर सत्य तपशिलांनाही बसूं देत नाहींत. म्हणून प्रत्येक साधनांतील विवक्षित एका तपशिलाच्या विश्वसनीयतेबद्दल जरी परीक्षण केलें तरी त्या तपशिलाची परीक्षा पुन्हा तपशिलांच्या एकीकरणांत म्हणजे प्रसंगनिर्णयांत व्हावीच लागते.

निरनिराळ्या साधनांच्या साहाय्यानें प्राप्त करून घेतलेल्या विश्वसनीय तपशिलांचें किंवा माहितीचें एकीकरण करून एक प्रसंग तयार होतो. अशी तपशिलांची जुळणी करूं लागलों म्हणजे विश्वसनीय मानलेले तपशील इष्ट प्रसंगांत साहचर्यानें व स्वतंत्रपणें आपापली जागा धरून बसूं शकतात का एकमेकांत विरोधीभाव उत्पन्न होऊन प्रसंगाचे कोंदणांतून ते बाहेर पडतात हें प्रथम पाहिलें पाहिजे. जर ते आपापल्या जागीं ठाकठीक बसत असतील तर ते तपशील बरोबर आहेत असें मानण्यास हरकत नसते. परंतु तसें का बेबनाव दिसला, कीं त्यांत कांहींतरी असंबद्ध मजकूर आहे असें समजून परीक्षणास सुरवात करावी. एकाच प्रसंगाच्या तीन साक्षीदारांनीं आपापल्या माहितीप्रमाणें तीन निरनिराळे उप-प्रसंग किंवा सूक्ष्म भागांची माहिती दिली.

त्यांतील दोन स्वतंत्र साक्षीदारांची माहिती एकमेकांस सुसंगत आहे. परंतु तिसऱ्याची माहिती दोघांच्याही माहितीप्रमाणें विसंगत भासते. अशा वेळीं तिसरा साक्षीदार खरें सांगत आहे काय हा प्रश्न उपस्थित होतो व आपण या दोन स्वतंत्र साक्षीदारांच्या स्वतंत्र तपशिलांच्या आधारानें होणाऱ्या प्रसंगाच्या जुळणीची कसोटी लावून तो तपासूं लागतों. ज्याप्रमाणें दोन स्वतंत्र साक्षीदारांचा तिसऱ्याशीं एखाद्या तपशिलांत अगर मजकुरांत विरोध आला म्हणजे तिसऱ्याला असंभवनीय म्हणून सोडून देतों, त्याचप्रमाणें एखाद्या प्रसंगांत अशा प्रकारच्या तपशिलांचे जुळणींत विरोधीभाव आला तर तो स्वतंत्र तपशील असंभाव्य ठरतो. या प्रकारानें सर्व तपशिलांची तपासणी केली म्हणजे प्रसंगनिर्णय होतो. प्रसंगनिर्णयासाठीं तपशिलांच्या तपासणींत पुढील मुद्दे लक्षांत घ्यावे लागतातः—

[१] एखाद्या प्रसंगांतील निरनिराळे तपशील पडताळतां येण्याइतके अन्य पुरावे नसतात व ते प्रसंगाच्या जुळणीच्या कसोटीलाही उतरतात. अशा वेळीं ते जुळतात म्हणून सत्य असतातच असें म्हणतां येणार नाहीं. जुळणीच्या कसोटीनें तपशिलांतील सत्यता सिद्ध होणार नाहीं. तो तपशील जर अन्य साधनें उपलब्ध होऊन असत्य ठरला तर तो असत्यच ठरतो. कारण प्रसंगाच्या जुळणीच्या सिध्यर्थच तपशिलांची रचना केलेली असण्याचा संभव असतो. पुराणांतील कित्येक तपशील चुकीचे असल्याचें पुराव्यांवरून सिद्ध झालेलें नाहीं व प्रसंगाच्या जुळणींतही ते ठाकठीक बसलेले आढळतात. परंतु ही दुसरी कसोटी लागते म्हणून पुराणें खरीं असें म्हणतां येणार नाहीं.

[२] एखाद्या प्रसंगाचे म्हणून अनेक तऱ्हेनें तपशील सांगितलेले उपलब्ध असतात. त्यांतील विवेचनांत विसंगतपणा स्पष्ट दिसून येतो. केव्हां केव्हां आपण त्याला मतविरोधही समजतों. परंतु असे तपशील खरोखरच एकाच प्रसंगाचे आहेत किंवा काय याची बारकाईनें तपासणी करावी. दोन परस्परविरोधी तपशील एकाच प्रसंगाचे असावेत असें सकृद्दर्शनीं वाटतें; परंतु ते बहुधा तसे नसतात. ते ज्या प्रकारचा प्रसंग वर्णितात त्या प्रकारचे प्रसंग निरनिराळ्या काळीं, निरनिराळ्या जागीं, किंवा निरनिराळ्या माणसांत वगैरे घडलेले असण्याचा संभव असतो. उदाहरणार्थ, शिवाजीनें पन्हाळा दोनदां घेतला. परंतु बखरकारांनीं पन्हाळा एकदांच घेण्याचें प्रयोजन होतें असें

समजून कांहींनीं दुसऱ्या छाप्याचा मजकूर पहिल्या छाप्याच्या वेळीं दिला आहे, कांहींनीं पहिल्या वेळच्या छाप्याचें वर्णन दुसऱ्या छाप्याच्या तपशिलांत दिलें आहे व कांहींनीं दोहोंतील मजकूर एकत्र करून दिला आहे. सारांश, उपलब्ध झालेले परस्परविरोधी तपशील दोन स्वतंत्र लढायांचे आहेत हें त्यांना न समजल्यामुळें त्यांनीं जुळती रचना केली. म्हणून अशा प्रसंगीं अधिक बारकाईनें तपासणी करणें जरूर असतें.

[३] एकदां का परस्परविरोधी तपशील एकाच प्रसंगाचे आहेत अशी खात्री पटली, मग त्यांतील कोणता चुकीचा व कोणता बरोबर हें ठरविणें भाग पडतें. दोहोंतील थोडाथोडा भाग घेऊन प्रसंग ठरविणें अशास्त्र आहे. कारण अशा परस्परविरोधी तपशील देणाऱ्या साक्षीदारांतील एक संशयित असावयाचाच. जो संशयित वाटेल त्याचा त्याग करून दुसरा गृहीत धरावा. परंतु दोन्हीही संशयातीतही नाहींत व असंभवनीयही ठरत नाहींत तेव्हां त्यांतील तपशिलाचा निर्णय लागूं शकत नाहीं. म्हणून ते दोन्हीही तपशील अधिक पुराव्यांसाठीं व परीक्षणासाठीं तसेच मांडावेत. परंतु त्यांतील एखादा संशयित वाटला तर तो तपशील उपलब्ध झाला आहे म्हणून वापरलाच पाहिजे अशी भूमिका ठेवणें अशास्त्रीय आहे. उदाहरणार्थ, एक मृत्युतिथि दोन तऱ्हांनीं दिलेली आहे. पहिलींत कार्तिक मासीं शके १५९८ नलसंवत् व दुसऱ्यांत शके १५८३ इतकेंच दिलें आहे. दुसरी खरी असल्याचें इतर पुराव्यांवरून सिद्ध होत आहे. अशा वेळीं मृत्यूचा नक्की मास माहीत नाहीं म्हणून कार्तिक मासीं शके १५८३ असा निर्णय देणें चुकीचें होईल. पहिली नोंद चुकीची ठरली म्हणजे ती त्या बरोबरच्या सर्व तपशिलांसह चूक म्हणून सोडून द्यावी लागते. कारण जसा या नोंदींतील फक्त शक संवत्च चुकीचा लिहिण्याचा संभव आहे तसाच त्या नोंदींत कदाचित् ज्या माणसाच्या मृत्यूचें नांव दिलें गेलेलें असतें तेंच चुकीनें दिलें गेलेलें असण्याचाही संभव असतो.

[४] एखाद्या प्रसंगाचे सर्वही तपशील एकमेकांशीं जुळले म्हणजे त्या तपशिलांच्या बाबी निर्णायक ठरल्या असें केव्हांही म्हणतां येणार नाहीं. प्रथम हे सर्व उपलब्ध तपशील स्वतंत्र असतातच अशांतला प्रकार नसतो. बहुधा ते एकाचीच नक्कल असावयाचे. रोजचेंच उदाहरण घ्या. एकच बातमी

कोणत्यातरी वर्तमानपत्रावरून सर्व छापतात. परंतु ती कशावरून घेतली हें सांगण्याचें टाळलेलें असावयाचें. मात्र प्रत्येकजण थोडथोडा फरक करून ती देत असतात. त्यांतील मुख्य बाबींची सांखळी कायम ठेवण्याचा प्रयत्न मात्र प्रत्येकजण आपापल्यापरीनें करीत असतो. परंतु सामान्य वाचक मात्र असें समजतो कीं, जी बातमी प्रसिद्ध झाली ती निरनिराळ्या वर्तमानपत्रांतून आल्यानें पुरावासिद्ध आहे. म्हणून ती अगदीं निर्णायक सत्यस्वरूपाची आहे. परंतु ती बरेच वेळां असत्य असल्याचेंही नंतर समजून येत असतें. सारांश, निरनिराळ्या दृश्य पुराव्यांनीं जी सिद्ध असते ती बहुधा एकाच पुराव्यावरून आलेली असल्याचा जरी नेहमीं संभव असतो तरी सामान्य प्रवृत्ति मात्र असले पुरावे स्वतंत्र मानण्याकडेसच असते. ती प्रवृत्ति शास्त्रशुद्ध नसते. एखाद्या बाबीचे मूळ साक्षीदार जर निरनिराळे असतील म्हणजे प्रत्यक्ष दृष्टिक्षेपांतून ती बाब घालविणारीं माणसें जर वेगवेगळीं असतील तरच त्यांच्या माहितींतील सशास्त्र शुद्धता ग्राह्य धरण्यास हरकत नसते. एकाच साक्षीदाराची निरनिराळ्या माणसांनीं व निरनिराळ्या भाषाप्रयोगांत सांगितलेली माहिती अशा परीक्षणास उपयोगी पडत नसते. तेव्हां मूळ साक्षीदार एकच आहे किंवा वेगवेगळे आहेत हें ओळखण्याचे दोन मुख्य मार्ग आहेतः—

[ अ ] प्रसंगनिर्णयांत अस्सल व नकल साधनांतील कोणता मजकूर लेखकाचा अव्वल व कोणता सांगीवांगीचा पुरावा हें शोधावें लागतें. मागच्या प्रकरणांत कोणतें साधन अस्सल व कोणतें नकल एवढेच परीक्षण केलें होतें. कोणता भाग कोणापासून घेतला व कोणता स्वतंत्रपणें लिहिला हें बारकाईनें शोधण्याचें प्रयोजनच पडलें नव्हतें. परंतु तें शोधणें आतां प्राप्त झालें आहे. असें करण्यास एकाच प्रसंगाचे निरनिराळ्या साधनांतील मजकूर एकत्र करून ताडून पहावेत. ज्या साधनांतील माहिती एकच म्हणजे सारखीच दिसून येईल त्या साधनांतील मजकूर एकाच माहितगारापासूनचा असला पाहिजे असें समजण्यास हरकत नाहीं. परंतु मजा अशी असते कीं, माहितगार जरी एक असला तरी त्या माहितगाराची माहिती लिहिणारे लेखक त्या माहितगाराचा थांग सुद्धां लागूं देत नाहींत व त्या माहितीवर इतकें आवरण चढवितात, कीं त्या माहितीचें स्वरूप बदललेलें दिसावें. अशा वेळीं स्वरूप जरी बदललें तरी क्रम व तपशिलाचा गोषवारा : कायमच

राहतो. म्हणून क्रम व गोषवारा जर सारखाच असेल तर त्या मजकुराचा माहितगार एकच आहे असें मानण्यास हरकत नसते. जर माहितगार एकच नसेल तर त्या माहितींतील क्रमांत व आवडीनावडीप्रमाणें मूळ प्रसंगाच्या बाबींच्या वर्णनांत पुष्कळच भिन्नत्व दृष्टीस पडतें. कारण पहाणारांची पाहण्याची दृष्टिच अगदीं भिन्न असते. ज्या वेळीं एखादी बाब एकाच माणसास पाहणें किंवा ऐकणें शक्य असतें त्या वेळीं ती एकच माहितगारापासून प्राप्त झाली असली पाहिजे हें सिद्धच असतें. परंतु कित्येक स्थलें संशयितच राहतात. सामान्य प्रवृत्ति मात्र अशी दिसून येते कीं, अशा सर्व संशयित स्थलांना स्वतंत्र मानावें. परंतु ही प्रवृत्ति तेवढी शास्त्रशुद्ध नाहीं. जोंपर्यंत माहितगार स्वतंत्र आहेत असें मानण्यास आधार प्राप्त झाला नाहीं तोंपर्यंत त्यांचा स्वतंत्रपणा सिद्ध झाला नाहीं हें मानणेंच सयुक्तिक आहे. असो. पुरावे स्वतंत्र ठरले व ते प्रसंगवर्णनांत ठाकठीक बसले म्हणजे ते अगदीं निर्भेळ सत्याला धरून असतातच असें नाहीं. क्वचित्प्रसंगीं स्वतंत्रपणें लिहिणारे लेखकही एकाच प्रवृत्तीचे असूं शकतील. परंतु सामान्यपणें ज्या तपशिलांतील वर्णनप्रवृत्ति भिन्न असते परंतु प्रसंगाची वस्तुस्थितीची रूपरेषा सामान्यतः एकाच आकारांत बसते ते तपशील एकमेकांच्या सत्यत्वाची साक्ष देतात असें म्हणणें बरोबर होते.

[आ] स्वतंत्र साक्षीदारांतसुद्धां बरेच वेळां परस्परांचे परस्परांवर परिणाम झालेले स्पष्ट दिसून येतात. अशा वेळीं हे साक्षीदार आपले पुरावे देतात ते स्वतंत्र असतातच असें नाहीं. म्हणून पुढील मुद्दे लक्षांत घ्यावेः—

[१] एकाच गोष्टीबद्दल अगर स्वभावाबद्दल एकाच अगर निरनिराळ्या साधनांत लेखक केव्हां केव्हां वेगवेगळ्या प्रकारानें उल्लेख करतो. अशा वेळीं तो जसें निरनिराळ्या वेळीं पाहतो तसें लिहितो किंवा उगाच तीच तीच गोष्ट पुनरावृत्ति करून लिहितांना कांहीं फेरबदलीनें लिहितो हें तपासलें पाहिजे. बहुधा अशा प्रकारच्या तपशिलांतील श्लेषाधिक मजकुरावरून त्या दोन स्वतंत्र बाबी समजण्यापेक्षां तीं दोन स्वतंत्र शब्दचित्रेंच असतात असें मानणें अधिक बरोबर ठरतें.

[२] कित्येक वेळां पहाणारे पुष्कळ लोक असतात. परंतु एकाच्याच करवीं बातमी पोहोंचविली जाते. अशा वेळीं लेखक जो मजकूर लिहितो

तो एकट्या लेखकावर सोंपविल्यानंतर त्यानेंच आपल्या मर्जीप्रमाणें लिहिला आहे कीं तो सर्वांनीं सामान्यपणें पसंतीनें लिहिला आहे तें शोधावें लागतें.

[३] पुष्कळांनीं एखादी गोष्ट प्रत्यक्ष पाहून आपापल्यापरी निरनिराळ्या साधनांतून नमूद करून ठेवलेली असते. तेव्हां हे सर्व लिहिणारे एकाच दृष्टीनें लिहिणारे आहेत कीं काय, तसेंच ते सर्व एकाच गटांतील, पक्षांतील वगैरे आहेत किंवा कसें हें शोधावें.

सर्वांत अधिक प्रमाणभूत साधनें म्हटलीं म्हणजे ज्यांचे लेखक निरनिराळे, स्वतंत्र विचाराचे, भिन्न पक्षाचे व वेगवेगळ्या परिस्थितींतले असतात तीं. परंतु अशा प्रकारचीं साधनें क्वचितच उपलब्ध असतात. जितका जितका म्हणून ऐतिहासिक साधनांचा आपण विचार करूं लागतों तितका तितका अधिक संशयित व चुकींचा मजकूर आढळून येऊं लागतो. परंतु सामान्यतः लोकांचा समज मात्र असा झालेला दिसतो कीं, भूतकालचा इतिहास अगदीं सरळपणें ऐतिहासिक साधनांत लिहिलेला असतो. वर्तमानकालीं मात्र लेखक व लेख प्रामाणिक व सरळ नसतात, त्यामुळें वर्तमानकालांतील गोष्टींच्या खरेखोटेपणाबद्दल रणें माजतात; परंतु ऐतिहासिक साधनांची तपासणी करूं म्हटलें तर तें मात्र पटत नाहीं.

कांहीं वेळां अशक्य कोटींतल्या किंवा अद्भुत-चमत्काराच्या अथवा आश्चर्योत्पादक गोष्टी साधनांच्या व प्रसंगांच्या परीक्षणांतूनही उतरूं शकतात. अशा प्रकारच्या कित्येक गोष्टी आपल्या इतिहासांत नमूदही केल्या गेल्या आहेत. शिवाजीच्या भवानीचें उदाहरण घ्या. अंगांत येणें वगैरे गोष्टींवर अजूनही लोकांचा विश्वास आहे. म्हणून अशा वेळीं निर्णय देणें फार कठीण असतें. असा निर्णय देतांना तत्कालीन समजुतींची शास्त्रीय पद्धतीनें चिकित्सा करून त्यांचा उलगडा करून देण्याचा प्रयत्न करणें जरुर होतें.

प्रसंग-निर्णय करितांना जी पद्धति स्वीकारावयाची तिचें थोडक्यांत पुन्हा सारांशानें विवेचन असें देतां येईल कीं,

[१] प्रत्येक प्रसंगांतील किंवा प्रसंगासंबंधाचे सर्व तपशील निवडून एकत्र करावेत.

[२] जे तपशील प्रसंगांत उपयोगाला आणावयाचे ते तपशील देणाऱ्या साधनांचें प्रथम परीक्षण करून ते प्रमाण असल्याची खात्री करून घेतली पाहिजे.

[३] जे तपशील अगदीं सारखे असतील ते एकत्रित करून ते एकमेकांचे नकल आहेत का कसें तें तपासावें. नकल असतील तर त्यांतील मुळाला धरून अगर मुळाबरहुकुम जो असेल तो घेऊन बाकीचे सोडून द्यावेत.

[४] जे तपशील सारखे नसतील त्यांतील भेदाभेद शोधून काढून त्यांचें परीक्षण करून कमीअधिक मजकुराची ग्राह्याग्राह्यता ठरवून ग्राह्य तेवढाच तपशील उपयोगाकरितां बाजूस काढावा.

[५] संशयित मजकूर असेल तर तोही घेऊन त्याचा उपयोग करितांना तो संशयित मजकूर म्हणून स्पष्ट नमूद करावा.

[६] वर दर्शविल्याप्रमाणें जे निरनिराळ्या बाबींचे तपशील शोधून घेतले ते क्रमवार एकापुढें एक ठेवावेत.

[७] निरनिराळ्या बाबींचा क्रम लावतांना ते सर्व तपशील एकापुढें एक आपापल्या जागीं व्यवस्थितपणें बसूं शकले व त्यांत काल, स्थल व व्यक्ति या दृष्टीनें असंबद्धता न वाटूं लागली म्हणजे ते सर्व मान्य करावेत.

[८] परंतु ते जर आपापल्या जागीं बसत नसले तर त्यांतील कोणता असंबद्ध असेल तो निराळा काढून त्याची परीक्षा करावी. त्यांतील परीक्षणानें चुकीचा मजकूर काढून टाकावा व कांहीं बाकी राहिल्यास तो मजकूर प्रसंगवर्णनासाठीं उपयोगांत आणावा.

[९] असा सर्व ग्राह्य मजकूर नंतर भाषेनें जोडून घेऊन प्रसंग पुरा करावा.

[१०] अशा तऱ्हेनें जो प्रसंग वर्णन करतां आला तोच प्रसंग-निर्णय होय.

[११] अशा प्रसंग निर्णयानें त्या प्रसंगांतील सर्वच बाबींचा व आनुषंगिक मजकुरांचा निर्णय झाला असें होत नसते. कित्येक बाबी अज्ञात व कित्येक चुकीच्याही राहूं शकतात याची जाणीव ठेवावी.

बहुधा संशोधकाला काल-निर्णयाच्या कामापलीकडे जाण्याला सवडच नसते. संग्राहकानें साधनांची व साधनक्षेत्रांची व्याप्ति जाणून साधनें शोधून आणलीं व तीं संशोधनाच्या कार्यासाठीं संग्रहित किंवा प्रसिद्ध केलीं म्हणजे संग्राहक आपल्यापुरतें काम उरकलें असें समजतो. संग्रहाच्या पलीकडे

संशोधन करण्यास त्यास फारशी फुरसतच मिळत नाहीं. संग्राहकानंतर संशोधक इतिहासाचें काम अंगावर घेऊन प्रसंगनिर्णयापर्यंत आणून पोहोंचवितो. नंतर इतिहासरचनेचें काम शिल्लक राहतें. तें काम संशोधकीय इतिहासकाराला अंगावर घेऊन तडीस न्यावें लागतें. महाराष्ट्राचीं साधनें इतकीं अपूर्ण व त्यांच्या साहाय्यानें होत असलेले प्रसंग-निर्णय इतके अधुरे आहेत कीं, अद्यापपावेतों इतिहासरचनेच्या कामास प्रारंभ करणें शक्यच वाटत नाहीं. अजूनही बराच भाग उपलब्ध झाला पाहिजे व त्यावर संशोधनही झालें पाहिजे. तोंपर्यंत संशोधकीय इतिहासरचनेला सुरुवातच करतां यावयाची नाहीं.

## ४४ इतिहास-रचनेचें साहित्य

इतिहास-रचनेस लागणारें साहित्य निरनिराळ्या साधनांतून कसें शोधून काढावयाचें याचा विचार केला. साधनांतून उपलब्ध झालेल्या भागांतील कित्येक भाग अविश्वसनीय, असंभाव्य, किंवा अशक्य म्हणून सोडून दिले. बाकी राहिलेल्या भागांच्या साहाय्यानें इतिहासरचना करावयाची म्हणून त्यावरून प्रसंग-निर्णयापर्यंत तपासणी करून तयारी केली. परंतु हे सर्व साहित्य इतिहासाच्या रचनेला क्रमवारीनें वगैरे उपयोगीं पडेल अशा रीतीनें मांडले गेलेलें नसतें. कांहीं वेळां एकापेक्षां अधिक प्रसंग विषयवारी, स्थलवारी, अगर व्यक्तिवैशिष्ट्यामुळें एकत्रित विचारांत घेतलेले असतील, तर कांहीं वेळां एखाद्या वाक्यांतच दोनतीन प्रसंगांचा बोध केलेला आढळेल. सारांश, ऐतिहासिक माहिती मिश्रित असते. तिची निवडानिवड करून नंतर तिचा उपयोग इतिहासरचनेंत करावा लागतो. ही ऐतिहासिक साधनांतील सामुग्री चार प्रकारची असतेः—

[१] ऐतिहासिक साधनांत निरनिराळ्या विषयांचे परंतु तत्कालीन परिस्थितीचे द्योतक असे एकत्र उल्लेख आढळतात. अशी माहिती विषयवारीनें लावून नंतर तिचा उपयोग करणें भाग पडतें.

[२] ऐतिहासिक साधनांतील माहिती मर्यादित कालाला किंवा स्थलाला अथवा ठराविक व्यक्तींना अगर समाजांना धरून दिलेली असते असें नाहीं. कित्येक वेळां सर्व जगाची अगर कित्येक शतकांचीही माहिती दिली जाते, अशा वेळीं इतिहास-रचनेच्या कार्याप्रमाणें त्यांतील माहिती निवडून घ्यावी लागते.

[३] ऐतिहासिक साधनांतील माहिती ठराविक देशाला अगर कालालाच संबद्ध असते. त्यांतील प्रत्येक प्रसंग ठराविक कालाला व देशालाच मर्यादित असतो. परंतु त्यांत काल अगर स्थल यांचा निर्देश नसतो. अशा माहितीचा इतिहासांत उपयोग करतांना जर स्थल कालाचा निर्देश न केला गेला तर त्यांतील ऐतिहासिक महत्त्व निघून जातें. म्हणून कोणत्याही साधनांतील माहितीचा उपयोग करतांना ती ज्या देशाला अगर कालाला संबद्ध असेल त्या देशाचा अगर कालाचा निर्देश करून उपयोग करणें भाग असतें.

[४] साधनांतून संशोधन करून काढलेली सामुग्री बरेच वेळां संभवनीय अशीच असते. अशा माहितीचा उपयोग संभवनीय म्हणून उल्लेख करून करावा. असा मजकूर शास्त्रशुद्ध नाहीं म्हणून इतर शास्त्रांप्रमाणें सोडून चालत नाहीं.

अशा विविध प्रकारच्या माहितीची कालक्रमानें व विषयवारीनें इतिहास-रचनेसाठीं जुळणी करणें जड जातें.

कित्येक वेळां असें सुचविण्यांत येतें कीं, कोणतीही ऐतिहासिक माहिती मिळो, तिला इतिहासांत ठराविक कांहींतरी स्थान असतेंच. एखाद्या माणसाच्या हाडांचे सांधे सोडविले, हाडें निरनिराळीं केलीं, स्नायु निरनिराळे केले, मांस वगैरे प्रत्येक भाग वेगवेगळे सोडवून नंतर त्या सर्व भागांचा एका ठिकाणीं काला केला व त्यांचा पुन्हा मनुष्याचा सांपळा रचण्यास सांगितलें म्हणजे कोणता भाग कोठें पाहिजे हें समजून जसा पुन्हां माणसाचा सांपळा उभा करतां येतो तसेंच इतिहासाचें आहे. हा ऐतिहासिक पुरुष निरनिराळ्या साधनांच्या रूपानें खंडशः आपणांसमोर आहे. त्याची जुळणी करणें म्हणजे फक्त या साधनांतील माहितीची रचना करणें होय. परंतु ही विचारसरणी मुळांतच चुकीची आहे. वेगवेगळे खंड एकत्र करून पुन्हा माणसाचा अगर जनावराचा सांपळा रचतां येतो, याचें मुख्य कारण असें असतें कीं, माणसाचें किंवा जनावराचें सामान्य परंतु पूर्ण चित्र आपल्या डोळ्यांसमोर आणतां येतें. तसेंच माणसाच्या अगर जनावराच्या रचनेकरितां जे खंड निरनिराळे असलेले एकत्र केलेले असतात ते जनावराचे अगर मनुष्याचे नसतील अगर त्यांत मिश्रण किंवा उणीव असेल तर ती ओळखण्याचें साधन आपणास उपलब्ध असतें. परंतु इतिहास-रचनेंतील साधननिर्मित

खंड तितके संपूर्ण व निर्भेळ असूंच शकत नाहींत. त्यांचे आकारावरून मूळ व्यापक आकाराचा बोध होऊं शकत नाहीं. त्यांत किती तरी बनावट, अनुषयुक्त खंडांची भर पडलेली असते. कित्येक भाग सडून नाहींसे झालेले असतात, तर कांहीं मुळांतच गहाळ असतात. त्यामुळें मूळ ऐतिहासिक कालपुरुषाच्या चित्राचीही कल्पना करतां येत नाहीं व ती करून देणारें एखादें साधन अगर इतर मार्गही हयात नसतात. सारांश, अपुऱ्या साहित्यावर व कल्पनेंत उठवलेल्या कांहीं तरी अस्पष्ट आकृतीवरून जर हे खंड बसवून रचना करूं लागलों तर ते खंड एकत्र बसणार नाहींत व बसलेच तरी फार दिवस निभाव काढणार नाहींत. म्हणून इतिहासांतील प्रसंगांची ठेवण प्राप्त झालेल्या माहितीवरच बसवावी लागते व कित्येक अज्ञात माहितीमुळें त्यांत बराच बेढबपणाही राहूं शकतो. कांहीं भाग रचतां येतो व कांहीं अज्ञात म्हणून सोडून द्यावा लागतो. मागेंपुढें संधि करणारा भाग उपलब्ध न झाल्यानें एखाद्या प्रसंगाचा तुकडा तसाच लटकत ठेवावा लागतो. सारांश, प्रत्येक प्रसंग ऐतिहासिक कालांत वगैरे परस्परांना जागा देऊन व्यवस्थित बसत असेल तर ठीक होतें. नाहीं तर जो अधिक 'संभवनीय' अतएव बलिष्ठ तो दुसऱ्याला बाजूला सारून आपण ती जागा पटकावितो. अशा तऱ्हेनें इतिहासांतील कित्येक जागा अगदीं रिकाम्या राहतील व कित्येक ठिकाणीं गचडी होऊन बलिष्ठ निर्बलांचा ऱ्हास करितील. सारांश, इतिहासांत ठराविक भावचित्रांच्या अनुरोधानें ऐतिहासिक बाबींची रचना करण्याचा प्रयत्न करणें चुकीचें ठरतें. प्रत्येक बाबीच्या युक्त रचनेवरून ऐतिहासिक वस्तुस्थितिविषयक भावचित्रांचा बोध करून घ्यावयाचा असतो. म्हणून ऐतिहासिक साहित्याचा उपयोग करितांना कोणतेंच ठराविक ऐतिहासिक भावचित्र आपणासमोर ठेवतां येत नाहीं. साधनांच्या साहाय्यानें जो कांहीं ऐतिहासिक कालचित्राचा बोध होईल तेवढाच करून घ्यावयाचा असतो. हें ऐतिहासिक साहित्य सामान्यतः तीन प्रकारचें असतें:—

[१] जिवंत अगर निर्जीव वस्तु. ह्या लेखकानें प्रत्यक्ष पाहून नंतर त्यांचा उल्लेख केलेला असतो. यांत आपणांला त्या वस्तूंची कल्पनेनें रूपरेषा दृष्टीसमोर आणतां येते.

[२] माणसांच्या हालचाली. या हालचालींचें शब्दचित्र लेखक

जें देतो तें पाहून अगर ऐकून देत असतो. या शब्दचित्रांवरून आपणांला त्या हालचाली कल्पनाचित्रांत पाहतां येतात.

[३] हेतु व भावना. या तीन प्रकारच्या असतातः–(अ) लेखकाच्या स्वतःच्या, (आ) लेखकानें ऐतिहासिक पुरुषांच्या असाव्यात म्हणून मानलेल्या व (इ) वाचतांना आपण ऐतिहासिक पुरुषांच्या माथीं मारीत असलेल्या.

उपरिनिर्दिष्ट तीन प्रकारच्या साहित्याचा विचार केला म्हणजे असेंच म्हणावें लागतें कीं, इतिहासकार या साहित्यावरून जें कल्पनाचित्र करून घेतो तेंच आपणांसमोर तो मांडतो. अशीं कल्पनाचित्रें करून घेण्यासही जो तपशील इतिहासकारासमोर असतो तोही साहित्य-लेखकाच्या कल्पना-चित्रांतीलच असतो. म्हणजे याचा अर्थ असा होतो कीं, मूळ साधन-लेखकानें एखादें प्रसंगचित्र पाहून जे कल्पनाचित्र बांधलें तें त्यानें त्याला जुळलें त्या शब्दचित्रांत व्यक्त केलें व अशा शब्दचित्रावरून इतिहासकारानें भाषा इत्यादींच्या आधारें साधन-लेखकाचें कल्पनाचित्र ओळखून व त्या कल्पनाचित्रावरून मूळ प्रसंगचित्राचा अदमास लावून इतिहासाचा एवढा व्याप करावयाचा असतो. मूळ साधनलेखकाच्या शब्दचित्राचें परीक्षण करून तें विश्वसनीय आहे एवढें फक्त आतांपर्यंतच्या परीक्षणावरून ठरलें. तसेंच त्यांनीं मूळ प्रसंगचित्र आपल्या शब्दचित्रांत कितपत उठविलें आहे व तसें करतांना त्याच्या कल्पनाचित्रांत प्रसंगचित्राव्यतिरिक्त इतर मनोभावना जागृत झाल्यानें त्यांत कांहीं संमिश्रण झालें होतें किंवा काय याचेंही परीक्षण करतां आलें. आतां त्याच्या शब्दचित्रावरून मूळ प्रसंगचित्राचा बोध करून घेतांना आणखी कांहीं अडचणी येतात काय याचा विचार करावयाचा आहे. यांत मुख्यतः अडचणी येतात त्या मूळ शब्दचित्रांतील अपूर्णावस्थेतील होत. त्यांतील कांहीं अशा देतां येतील कीं:—

[१] मूळ प्रसंगचित्र साधन-लेखकाच्या स्मृतीवर फार काल टिकत नसतें. त्यामुळें त्याच्या लेखनकालच्या कल्पनाचित्रांत बराच भाग सुटलेला असतो.

[२] लेखक जें कल्पनाचित्र मनांत रेखाटतो तें केव्हां भडक व केव्हां अगदीं मूळापेक्षां सौम्यही असूं शकतें.

[३] लेखक आपलें कल्पनाचित्र आपल्या शब्दचित्रानें बरोबर उठवूं शकत नाहीं.

[४] व्यापकता न जाणतां आल्यास तिचे स्वरूप व्यापक अर्थबोध करणाऱ्या शब्दांत सांगितलें जातें. त्यामुळें खऱ्या व्यापकतेचा कयास बांधतां येत नाहीं.

[५] लेखकाच्या भावना व निर्णय बरोबर असतातच असें नाहीं.

या व अशाच तऱ्हेच्या अनेक कारणांमुळें प्रसंगचित्राची यथादर्शन प्रतिकृति लेखकाच्या स्मृतिपटलावर बिनचूक उमटतेच असें नाहीं. आणि उमटलीच तर ती त्याच्या कल्पनाचित्रांत स्पष्टपणें उठून चिरकाल टिकेलच असेंही फारसें संभवत नाहीं. याचा परिणाम मात्र असा होतो कीं, त्याच्या शब्द-चित्रांत जी प्रतिकृति आपणांस दिसावयाची ती बरीच पुसट व अपूर्ण अशीच उठलेली दिसते अशा प्रतिकृतीवरून मूळ आकृतीचा इतिहास-कारास बोध करून घ्यावयाचा असतो. अशा प्रतिकृतीवरून मूळ प्रसंगा-कृतीचा बोध करून घेतांनाही कांहीं कमी अडचणी येतात असें नाहीं. मूळ इतिहासकालीन ऐतिहासिक परिस्थितीच्या सबंध चित्राची कल्पना सामान्य-पणेंही जाणण्याइतकी सामुग्री नसल्याने त्यांतील बारीकसारीक गोष्टींच्या अस्पष्ट शब्दचित्रांची कल्पना नीटशी होत नाहीं. परंतु ही कल्पना करून घेण्याचा इतिहासकार जेव्हां प्रयत्न करूं लागतो त्या वेळीं मात्र अजाणते-पणें सहज चुका घडून येतात. ऐतिहासिक साहित्यांत जेव्हां शब्दचित्रें प्रसंगांचीं कल्पनाचित्रें स्पष्टपणें यथादर्शन दाखविण्यास समर्थ असतात त्यावेळीं फारशी अडचण येणार नाहीं. परंतु यांत जेव्हां अस्पष्टपणा असतो त्या वेळीं त्यांतील बराचसा भाग इतिहासकाराला कल्पनेनेंच भरून काढावा लागतो. असें करितांना मुख्यतः अडचणी येतात त्याः—

[१] ऐतिहासिक साहित्यांत जीं अनेक मूलतत्त्वें आढळतात त्यांच्या साह्या-न्यानें आपण आपलीं मूळ प्रसंगाबद्दलचीं कल्पनाचित्रें बसवूं लागतों व त्यांवरून मूळ प्रसंगासंबंधाची समजूत करून घेतों. परंतु अशा कित्येक गोष्टी असतात कीं, त्यांची कल्पनाच करतां येत नाहीं. कदाचित् कल्पना केलीच तर ती बहुधा चुकीचीच ठरण्याचा संभव असतो.

[२] कोणतेंही शब्दचित्र वाचतांना जें कल्पनाचित्र मनांत येतें तें बरेंच

भडक असतें. तें सत्याला सोडून असतें. त्यांत वाचणाराच्या इतर कल्पनांचा किंवा पूर्वग्रहाचा समावेश झालेला असतो. अशा वेळीं त्या प्रसंगाच्या सर्व बाबींचा तात्त्विक दृष्टीनें विचार केला व आपल्या अनुभवावरूनही त्याचें परीक्षण केलें तर योग्य असेंच कल्पनाचित्र बाकी राहूं शकतें.

[३] बहुधा वर्तमानकालच्या अनुभवावरून वगैरे भूतकालाचें चित्र ठरविलें जातें. असा प्रयत्न कित्येक बाबतींत सफल होतो. कारण, बऱ्याच गोष्टी सर्व कालास सारख्याच लागूं असतात. परंतु कित्येक गोष्टी काल-मानपरत्वें, देशमानपरत्वें किंवा व्यक्तिमानपरत्वें बदलूं शकतात. आणि हा जो बदल होत असतो तो शोधून काढण्यांतच इतिहासाचे खरे महत्त्व असतें. अशा वेळींच चूक होत असते. म्हणून अधिक सावधगिरी बाळगणें जरूर होतें.

[४] कित्येक वेळां भ्रामक कल्पनांच्या जोरावर शब्दचित्रांवरून व्यक्त होणाऱ्या अस्पष्ट कल्पनाचित्रांना भलतेंच आवरण चढविलें जातें.

[५] प्रसंगांतील व्यापक व अनिश्चित तपशिलांचा बोध करणारीं मुग्ध किंवा द्व्यर्थी शब्दचित्रांचें कल्पनाचित्र चुकीचें ठरण्याचा संभव असतो.

[६] कांहीं चुकीच्या माहितीवरून तयार झालेल्या इतिहासकाराच्या मनोभूमिकेमुळें खऱ्या वस्तुस्थितिप्रदर्शक शब्दचित्रांचेंही कल्पनाचित्र चुकीनें रेखाटलें जातें.

या व अशाच तऱ्हेच्या अनेक कारणांमुळें शब्दचित्रांच्या मध्यस्थीकडून मूळ प्रसंगचित्राचा बिनचूक बोध होणें शक्य असतेच असें नाहीं. या एकाच कारणामुळें इतिहासांत दराच मतभेद माजतो. इतिहासरचनेत जर मोठी अडचणीची जागा असेल तर हीच असते. परंतु या अडचणींच्याकडे बहुधा दुर्लक्ष केलें जातें व खरी जबाबदारी न ओळखून विशेषशी तपासणी न करतां उपलब्ध ऐतिहासिक साहित्य कसें तरी उपयोगांत घेऊन इतिहासरचना केली जाते. जर जबाबदारी ओळखून शास्त्रशुद्ध इतिहासरचना करावयाची असेल व त्याकरितां कोणत्याही शब्दचित्रांचे साहाय्यानें मूळ प्रसंगचित्र शोधावयाचें असेल तर वरील सर्व अडचणींचे मुद्दे लक्षांत घेऊन एक प्रश्नावली तयार करावी व तिचे साहाय्यानें परीक्षण करावें. याशिवाय इतिहासरचनेसाठीं मूळ ऐतिहासिक साहित्याचा कसा उपयोग करावा, या-

बद्दल कांहींतरी ठोकळ मानानें योजनाही ठरवितां येण्यासारखी आहे. अशा योजनेंतील मुख्य मुद्दे असे कीं:—

[१] साधनांच्या परीक्षणानें आपणांस इतिहासाला उपयुक्त असे साहित्य जमा करितां येतें. परंतु ते इतस्ततःच असतें. अशा साहित्याच्या साह्यानें वर्तमानकालीन परिस्थितीवरून आपण भूतकालाची कल्पना करूं लागतों. नंतर तीं प्रसंगचित्रें आपल्यासमोर आणतों व तीं जणुं काय आपण हजर राहून पहात आहों असें कल्पून आपलीं निरनिराळ्या प्रसंगांचीं कल्पनाचित्रें मनाशीं रेखाटून घेतों. ही पहिली कृति आपण साधनांचें वाचन करतांनाच करूं शकतों.

[२] नंतर वर्तमानकालीं आपण जशा गोष्टी पहातों व अनुभवतों त्याच धर्तीवर कल्पनेंत आणलेल्या आपल्या चित्रांचें आपण एकीकरण किंवा समुच्चय करितों. हा समुच्चय आपण ठरवून घेतलेल्या योजनेबरहुकूम व क्रमप्राप्त करितों. यालाच आपण मोठमोठ्या प्रसंगांतील तपशिलांचें एकीकरण म्हणतों. अशा रीतीनें आपल्या दुसऱ्या कृतीची समाप्ति होऊन प्रसंगांची जुळणी होते.

[३] आपण तपशिलांचें एकीकरण केलें व प्रसंगांची विषयवारी करून इतिहासाच्या योजनेंत ते बरोबर बसविले म्हणजे भागत नाहीं. त्यांत बऱ्याच भागांची उणीव असते. उपलब्ध झालेल्या भागांपेक्षां उणिवेचा भागच नेहमीं मोठा असतो. जसजशी साधनसामुग्री मिळते तसतशी ही उणीव भरून निघावयाची असते. परंतु कांहीं वेळां अनुमानानेंही बराच भाग भरून काढणें भाग असतें. या कृतीला तर्कशास्त्राचाच आधार घ्यावा लागतो. या तिसऱ्या कृतीनेंच ऐतिहासिक ज्ञानांत अधिक भर टाकण्यांत येते.

[४] जो ऐतिहासिक मजकूर याप्रमाणें उपलब्ध झाला त्याची पद्धतशीर मांडणी करून त्यांतील सामान्य व विशेष भाग शोधून व त्यांचे परस्पर संबंध ओळखून ऐतिहासिक विवेचन करणें ही चवथी किंवा शेवटची कृति होय.

ऐतिहासिक ज्ञान स्वाभाविकपणें गुंतागुंतीचें व अफाट असल्यामुळें तें पद्धतशीर घेणें व देणें हें काम फार कठीण जातें. या ज्ञानदानाच्या कांहीं ठराविक पद्धति आहेत. त्या अनुसरल्यास कार्य बरेंच सुलभ होतें.

इतिहास-रचनेच्या साहित्यांतील विविधतेमुळें आणि विशेषतः साधन-लेखकाच्या स्वभाव व प्रकृतिदोषांमुळें, त्याचप्रमाणें लेखनांत शिरलेल्या निर-

निराळ्या स्वार्थद्वेषादि कल्पनांमुळें या साहित्याचा उपयोग करण्याचीं ठराविक तत्त्वें किंवा सामान्य नियम सांगणें कठीण आहे. प्रत्येक साधनांत कोणता तरी गुणदोष वैशिष्ट्यानें आढळेल व त्या साधनांचा उपयोग तदनुरोधें तपासणी करून करावा लागेल. अर्थात् अशा परिस्थितींत तपासणी बिनचूक होणें हे केवळ इतिहासकाराच्या निर्णायक शक्तीच्या कमीअधिक प्रमाणावर अवलंबून राहतें. मानसशास्त्राचा अभ्यास व तर्कशास्त्राची जोड या दोहोंच्याच साहाय्यानें ही तपासणी अधिक सुलभ जाईल यांत शंका नाहीं. परंतु अशा तपासणीसाठीं अनेकविध माहिती असणेंही किती जरूरीचें होतें हें अशी तपासणी करितांना सहज लक्षांत येतें.

## ४५ प्रसंगांची विषयवारी

कोणाही इतिहासकाराला आपण कोणता इतिहास लिहावयाचा हें ठरवून घ्यावें लागतें. इतिहासाचे भाग कसे पाडले जातात याचा मागें विचार झालाच आहे. त्याप्रमाणें एकदां कां इतिहास-रचनेचा भाग ठरला. कीं त्याप्रमाणें त्या कालाला, स्थलाला व व्यक्तींना मर्यादित किंवा सबद्ध अशा सर्व प्रसंगांचें शोधन करावें लागतें. नंतर अशा मर्यादित केलेल्या कालाच्या अगर देशाच्या इतिहासासाठीं कोणतें प्रसंग घ्यावयाचे व कोणती विषयवारी लावावयाची तें ठरवावें लागतें. शेवटीं उपलब्ध झालेला तपशील त्या विषयवारीनें एकत्रित करावा लागतो. सामान्यतः बाह्यांगपरिस्थितीवरूनच विषयवारी ठरविण्यांत येते. प्रत्येक प्रसंग कोणत्या तरी विवक्षित कालाला व देशाला मर्यादित असून कोणत्या तरी मनुष्याशीं अगर समाजाशीं त्याचा संबंध असतोच. तेव्हां यावरून आपला ऐतिहासिक भाग जो योजून घ्यावयाचा तो कालमानानें, देशभागानें किंवा राष्ट्रविभागानें अथवा व्यक्ति-निर्देशानें मर्यादित करून घेतां येतो. या मुख्य योजनेंत विषयवारी लावावयाची असते. नंतर त्या विषयवारींतील तपशील कालमानानें, भौगोलिक-दृष्ट्या किंवा व्यक्तीशीं अगर समाजाशीं संबंध असतील त्या प्रमाणें रचावे लागतात. अजूनपर्यंतही विषयवारीनें जरी इतिहास-रचना करण्यांत येत असे तरी त्यांत कालमान वगैरे क्रम साधला जात नसे. परंतु ती पद्धति तितकी युक्त नव्हती. सर्व ऐतिहासिक माहिती तीन तऱ्हांनीं जुळवून इतिहास-रचना

करितां येते. [१] कालमानानें, [२] देशमानानें किंवा भौगोलिक-दृष्टया, व [३] प्रसंगक्रमाप्रमाणें. यांपैकीं एकीचाच उपयोग करतां येणें शक्य नसतें. कालमानानें रचना करूं म्हटलें तरी भौगोलिक परिस्थितीचा व प्रसंगानुक्रमाप्रमाणें एक तपशील संपल्याशिवाय दुसरा तपशील सांगून समजतच नाहीं. इतिहास-रचनेंत मुख्यत्वेंकरून कालमान अनुरोधावयाचें किंवा देशभागानुसार रचना करावयाची एवढें मात्र प्रथम ठरवावें लागतें. परंतु हें ठरविणें कोणती विवेचनपद्धति अधिक उपकारक होईल या विचारावर अवलंबून रहातें.

आपल्या इकडे समाजाचा अगर देशाचा म्हणून इतिहास लिहिण्याची चाल नाहीं. याला मुख्य कारण म्हणजे इतिहास निखालसपणें एकाच देशविभागाला किंवा समाजाला अगदीं मर्यादित नाहीं. म्हणून राजाच्या अगर नेत्यांच्या इतिहासांतूनच देशाचा इतिहास पहावा लागतो. एकतर तशा प्रकारचा इतिहास लिहिण्याइतकी सामुग्री उपलब्ध नाही व सामान्य मनोवृत्ति राजा व प्रजा या दोन संबंधांत इतकी समरस होऊन गेली आहे कीं, त्या दोघांत फारसा भेद पाहिलाच जात नाहीं. त्यामुळें हिंदुस्थानांतील इतिहास-रचना अनेक कारणांमुळें देशविभागाने फारशी करितां येत नाहीं. ही रचना व्यक्ति-विषयक राहते. त्यामुळें अशा रचनेंत कालमानाला प्राधान्य देण्यापेक्षां प्रसंगांना प्राधान्य द्यावें लागतें. नंतर या प्रसंगांत कालमान साधावयाचें असतें. जेथें राजसूत्र देशांतील श्रिष्ट-मंडळाकडे जातें तेथें कोणाही एका व्यक्तीला जबाबदार न धरतां आल्यानें देशाचा अगर देशविभागाचा म्हणून इतिहास रचावा लागतो. सारांश, इतिहास-रचनेंत विषयवारी लावतांना पुढील मुद्दे लक्षांत घेऊन युक्त अशा विषयवारीचा अवलंब करावाः—

[१] देश, काल किंवा व्यक्ति याप्रमाणें प्रथम विभाग पाडून घ्यावा.

[२] देशविभागाप्रमाणें इतिहास-रचना करावयाची असल्यास त्यांतील निरनिराळ्या राजसत्तेप्रमाणें विभाग पाडावेत व नंतर प्रसंगानुक्रमाप्रमाणें रचना करितांना कालानुक्रमही साधावा.

[३] जर देशांत एकापेक्षां अधिक राजसत्ता एकाच वेळीं अधिष्ठित असतील तर प्रत्येक राजसत्तेच्या भागांवर स्वतंत्र रचना करावी.

[४] राजसत्तात्मक भागाचा इतिहास राजांच्या कारकीर्दीप्रमाणें रचावा. प्रजासत्तात्मक देशभागाचा इतिहास कालमानानें रचावा. कालमानानंतर प्रसंग-क्रमाचा अवलंब करावा.

[५] व्यक्तिविषयक चरित्ररूपी इतिहास रचतांना प्रसंगवर्णनांत प्रसंग-क्रम व काल-क्रम एकाच वेळीं साधला जातो.

[६] समाजाचा इतिहास लिहितांना मुख्य व्यक्तींच्या अनुरोधानें मुख्यतः उपभाग पाडावे लागतात. समाजाचा म्हणून थोडाच इतिहास असूं शकतो.

[७] धार्मिक इतिहासांत व्यक्तिविषयक चरित्रासारखाच प्रसंगाचा व कालाचा क्रम आपोआपच साधला जातो.

[८] एखाद्या देशांत जर एकच सत्ता असेल तर कालमानानें व त्या सत्तेच्या कर्त्या माणसांच्या कारकीर्दीप्रमाणें विभाग पाडून नंतर प्रसंगक्रम कालानुरोधें साधावयाचा असतो.

हे सामान्य मुद्दे झाले. आणखीही पुष्कळ बारीकसारीक भेद लक्षांत घ्यावे लागतात.

## ४६ विशिष्ट चुकांचीं कारणें

इतिहास-रचनेंत व प्रसंग-निर्णयांत मुख्यतः दोन प्रकारें चुका झालेल्या दृष्टीस पडतातः–[१] साधनलेखक अगदीं बिनचूक व पूर्ण माहितीनें लिहितात असें निश्चित समजून ज्या वेळीं इतिहास-रचना केली जाते तेव्हां, व [२] इतिहासकालाच्या प्रसंगांची व परिस्थितीची कल्पना उत्तर कालांतील रूढ कल्पनांनीं केली जाते तेव्हां.

आधुनिक इतिहासकारांची शास्त्रशुद्ध इतिहास-रचना करण्याकडे प्रवृत्ति असते आणि त्यांना इतिहासाच्या रचनेला साधनेंही बरींच उपलब्ध झालेलीं असतात. त्यांतूनही चुकीचा मजकूर इतिहासांत शिरणें शक्य असतें. परंतु कोणालाही आपल्या इतिहास-रचनेंत बिनचुकता व पूर्णत्व ठेवण्याचा मुख्य उद्देश ठेवावाच लागतो. मात्र ते जें लिहितात तें अगदीं सर्वस्वीं निःपक्षपातपूर्वक लिहितातच असें नाही. त्यांच्या लेखनाची तपासणी इतरांकडून केली जाणें सहज घडत असतें म्हणून त्यांना लेखनांत मूळ तपशील खोटा देऊन चालत नाहीं. अशा तपशिलाबद्दलचे दोषादोषविवेचन

हा अगदीं स्वतंत्र भाग असून त्यांत मतबिरोध असणेंही साहजिक असतें. परंतु आजच्यासारख्या सर्व सोयी व पूर्ण माहिती मिळणें इतिहासकालीन लेखकांना जवळ जवळ अशक्य होतें असें म्हटलें तरी चालेल. वर्तमानपत्राच्या सुरुवातीच्या पूर्वी कोणत्याही प्रसंगाची माहिती जरी लोकांच्या कानापर्यंत बिनचूक जाऊन पोहोंचूं शकली तरी ती पूर्ण मिळणें अगदीं दुरापास्त होतें असें म्हणणें भाग आहे. ज्यांचा त्या त्या प्रसंगाशीं संबंध आला त्यांनाही आपापल्या पुरतीच बाजू समजणें शक्य होतें. विरुद्ध बाजू समजण्याला त्यांना फारसा मार्ग मोकळा नव्हता. शिवाय लेखक तरी केवळ इत्थंभूत माहिती द्यावी म्हणून थोडकेंच लिहीत असत. बखरकार माहिती देत. परंतु बखरी लिहिणे हा एक त्यांचा आवडीचा विषय असे इतकेंच. प्रत्येक प्रसंगाची बिनचुकता तपासण्याची त्यांना फारशी निकड नव्हती. नव्हे, तसें करण्यास त्यांना फारशीं साधनें व मार्गही मोकळे नव्हते. अशा स्थितींत साधनांतील माहिती अगदीं अपूर्ण असणेंच साहजिक आहे. अर्थात् अशा अर्धवट माहितीवरून आपण कांहीं परिणामात्मक विवेचन करूं लागलों तर तें बरेंच चुकीचें ठरण्याचा संभव असतो. माहितीचा अभाव हें एकच कारण तपशिलांतील अपूर्णतेला कारण नसतें, तर कधीं कधीं युक्त शब्दांचें अज्ञान हेंही एक कारण होऊं शकतें. परंतु अपूर्ण माहिती असतांना ती पूर्ण व बिनचूक आहे असें समजून ज्या वेळीं इतिहास-रचना केली जाते तेव्हां कित्येक वेळां अयोग्य तपशील अगर बाबी अनुमानानें भरतांना चुकीनें भरल्या जातात, कित्येक वेळां फाजील विश्वासानें अगदीं चुकीचे तपशीलही इतिहासांत येऊन बसतात व गुणदोष-विवेचनांत अक्षम्य चुका वगैरे राहतात.

वर्तमानकालीन अनुभवानें भूतकालीन परिस्थिति परीक्षण्याच्या दोषामुळें ज्या चुका घडून येतात त्या मात्र अनेकविध असून इतिहासास फार जाचक अशा होऊन बसतात. ज्या गोष्टी सर्व कालाला सारख्याच लागू पडतात त्यांतील भूतकालीन चित्र वर्तमानकालीन चष्म्यांतून पाहिल्यास त्यांत विशेषसा फरक पडत नाहीं. परंतु असें करितांना ज्या गोष्टी लक्षांत घेणें विशेषत: जरूर असतें त्यांपैकीं कांहीं पुढें देतों:—

[१] कोणत्याही गोष्टीविषयीं बराबाईट निर्णय देतांना तत्कालीन वस्तुस्थितीच्या कसोटीनेंच निर्णय देणें जरूर असतें. एखादी गोष्ट आचरणें

जरी वाईट असलें तरी ती कोणत्या परिस्थितींत आचरली गेली हें तपासणें जरूर असतें. उदाहरणार्थ, कत्तल वगैरे सारखे प्रसंग.

[२] कधीं कधीं भूतकालाकडे वर्तमानकालीन अनुभवावरून पहातांना उद्देश व स्वभाव यांबद्दल विपरीत निदान काढलें जाण्याचा संभव असतो. आपण ही गोष्ट विसरतां कामा नये, कीं जग हें प्रगतींत आहे. या प्रगती-बरोबर संस्कृति वाढत असते आणि या संस्कृतीबरोबरच लोकांच्या नीती-च्या कल्पना उन्नत होत असतात. तेव्हां कोणत्याही भूतकालीन प्रसंगाची आपण जर आजच्या संस्कृतीवरून तपासणी करूं लागलों तर तें चुकीचें ठरते. मराठ्यांची मुलुखगिरी, धर्माबाबत झालेल्या कत्तली, लढाया वगैरे गोष्टींचें विवेचन आपणास आजच्या संस्कृतीच्या ताजव्यांत तोलून करतां यावयाचें नाहीं. तसें करणें न्याय्य होणार नाहीं.

[३] मानवी किंवा राजांच्या हक्कांबद्दल व नीतीबद्दल बराच विपरीत समज केला जातो. औरंगजेबाचा सिंहासनावर येण्याचा प्रकार, संभाजीला हालहाल करण्याचा प्रकार वगैरेंतील क्रूरता विसाव्या शतकाच्या संस्कृती-वरून ठरवितां येत नाहीं. तसें करूं म्हटल्यास इतिहासकालीन परिस्थितीचें खरें चित्र दिसणार नाहीं. इतिहासकालीन मनःस्थिति फार निराळी असल्यानें आज असले अनन्वित वाटणारे प्रकार अगदीं मोठमोठाले विभूती कडूनही सहज होऊं शकले.

[४] गत-कालीन रीतिरिवाजांबद्दल आजच्या परिस्थितीवरून बरेवाईट ठरविणें.

[५] बरेच वेळां सांप्रतच्या लेखकांप्रमाणेंच इतिहासकालीन लेखक त्यांच्या भूतकालीन इतिहासाकडे तत्कालीन समजुतीप्रमाणें बघून विवेचन करितात. हें लक्षांत घेऊन त्यांच्या ग्राह्याग्राह्यतेबद्दलच्या निर्णयाची तपासणी करणें; इत्यादि.

बरेच वेळां असें मानण्यांत येतें कीं, इतिहासकाराला आपापल्या समजुती-प्रमाणें इतिहासकालीन बऱ्यावाईट गोष्टींविषयीं बरेवाईट तात्त्विक निर्णय देण्याचा हक्क आहे. कार्याविषयीं अगर प्रसंगाविषयीं निर्णय देणें वेगळें व त्यांतील तत्त्वांबद्दल बरावाईट निर्णय देणें वेगळें असतें. तात्त्विकदृष्ट्या निर्णय केव्हांच देतां यावयाचा नाहीं व तसा कोणीं दिल्यास तो सामान्यपणें मान्य

होईल असा भरंवसा मुळींच देतां येणार नाहीं. नीतीचीं तत्त्वें कालमानानें व अनुभवानें बदलणारीं असतात. निरनिराळ्या समाजांत तीं अगदीं भिन्न भिन्न आहेत व तीं तशींच राहतील. भूतदयेच्या कल्पनाही निरनिराळ्या समाजांत व देशांत निरनिराळ्या कालीं अगदीं वेगवेगळ्या असल्याचें स्पष्ट आहे. त्यामुळें इतिहासकाराला निश्चयात्मक तत्त्वच प्रतिपादन करतां यावयाचें नाहीं. आज जें तत्त्व भूतदयेनें मान्य वाटतें तेंच उद्यां अमान्य वाटणें साहजिक आहे. सारांश, इतिहास-रचनेंत एकच दृष्टि ठेवणें भाग पडतें. ती दृष्टि म्हणजे भूतकालीन इतिहास तत्कालीन परिस्थित्यनुरूप व नीतीच्या व तत्त्वांच्या अनुरोधें लिहावयाचा. त्यांत आजच्या मनःस्थिति वगैरेची कसोटी लावणें तितकें इतिहासशास्त्राला धरून होत नाहीं. इतिहासकालीन तत्त्वज्ञानाची छाननी करणें हा तत्त्ववेत्त्यांचा विषय असून त्यानें तो खुशाल स्वतंत्रच विचारांत घ्यावा. तत्त्ववेत्त्यांच्या मूळ तत्त्वांच्या कमीअधिक सरसनिरसतेवर जनता अशा तत्त्वज्ञानाचें गुणग्रहण करील. निरनिराळ्या बाबींचें संशोधन व त्यांचा तुलनात्मक इतिहास हाही स्वतंत्र विषय आहे हेंही विसरतां कामा नये.

## ४७ विधायक अनुमानपद्धति

कोणत्याही इतर शास्त्रांत एखाद्या विवेचनांतील भाग गळून गेला असल्यास तो प्रयोग करून वगैरे प्रयत्नानें भरून काढतां येतो. इतिहासाचें मात्र तसें नाहीं. गळून गेलेला भाग मात्र विपुल व तो शोधून काढण्याचे मार्ग मात्र अत्यंत अपुरे व परावलंबी. मूळ प्रसंगच जर श्रुतिस्मृतींतून गळून गेलेले असतील किंवा अज्ञात राहिलेले असतील तर ते कोणालाही भरून काढतां यावयाचे नाहींत. परंतु जेथें प्रसंगांचे तपशील अपुरे असतात व कारणादि विवेचनांचा अभाव असतो तेथें मात्र ज्या कांहीं गोष्टी उपलब्ध झाल्या असतील त्यांच्या साहाय्यानें व अनुरोधानें थोडाबहुत भाग भरून काढतां येतो. प्रसंगवर्णनांतील कांहीं भाग उपलब्ध तपशिलांवरून अनुमानानें बसवितां येतो. परंतु हें करितांना जी अनुमानपद्धति स्वीकारावयाची ती बिनचूक असेल तर नवीन माहिती मिळविण्याची तऱ्हा व माहिती सशास्त्र ठरते. अनुभव मात्र असा आहे कीं, इतिहासशास्त्रांतील इतर अभ्यासापेक्षां अनुमानपद्धतीचा अभ्यास अधिक अवघड असूनही बहुधा तो

तसा न मानतां प्रत्येकजण इतिहासांत अनुमानें काढण्यांत मात्र बराच आतुर असलेला दिसून येतो. एखादी कल्पना करावयाची तिचा सशास्त्रीय विचार न करितां ती प्रमाण समजावयाची, नंतर ती लोकांना सांगतांना तशी कल्पना करण्याचा हक्क असल्याचें प्रस्थापित करावयाचें, व ज्या बाबीवरून कल्पना रचली ती असत्य असली तरी त्याबद्दल विशेष विचार करावयाचा नाहीं. सारांश, कोणतेंही अनुमान काढतांना ज्या गोष्टींवरून अनुमान काढावयाचें त्या गोष्टी सशास्त्र, विश्वसनीय व निर्णायक ठरल्या किंवा नाहीं हे तपासणें अत्यंत जरुरीचें असतें. अनुमानांचा पाया दृढ आहे किंवा नाहीं हे न परीक्षल्यामुळें त्यावर चढविलेला अनुमानांचा डोल्हाराही तितकाच कच्चा राहतो. इतिहासांत तर अशी बिकट स्थिति उपस्थित झालेली हरघडी आढळते. त्यामुळें अनुमानें काढतांना अनेक अडचणी येतात. कोणतीही अनुमान-पद्धति स्वीकारली तरी तींत बिनचुकता साधणें जड जातें. परंतु ज्या चुका घडून येतात त्या चुकांना मताविरोधाचें स्वरूप देऊन त्यांचें मंडन करण्याचा जेव्हां प्रयत्न करण्यांत येतो, त्या वेळीं मात्र इतिहासरचनेंत बिनाकारण वाद माजतात. अनुमानांत एखादी चूक येणें हें नेहमीं ज्या बाबींवर तें अनुमान बसविलें जातें त्यांतील अपुरेपणामुळें घडत असतें. त्यामुळे अशा चुकांचें खंडण करणेंही तितकेंच कठीण होतें. सारांश, इतिहासांत वादग्रस्त स्थळें उत्पन्न होण्याचें हें एक मुख्य व मोठें कारण आहे. म्हणून इतिहास-रचनेत या अनुमानपद्धतीनें काढलेल्या मजकुराचा उपयोग करितांना फार सावधगिरी बाळगावी. असें करितांना ज्या कांहीं गोष्टी लक्षांत ठेवावयाच्या असतात त्यांतील कांहीं मुख्य मुख्य पुढें देतोः—

[१] साधनांच्या तपासणींत अनुमानांची मिसळ करूं नये. असें केल्यास लेखकाच्या माथीं भलताच मजकूर लादला जाईल.

[२] जे तपशील साधनांतून परीक्षण करून काढलेले असतील त्या तपशिलांत अनुमानांचा गोंधळ करूं नये. जीं कांहीं अनुमानें काढलेलीं असतील तीं आपलीं अनुमानें म्हणून स्पष्टपणें मांडावींत.

[३] सहजगत्या निघालेलीं अनुमानें इतिहासरचनेंत त्यांची तर्कशास्त्राच्या साहाय्यानें छाननी केल्याशिवाय उपयोगांत आणूं नयेत.

[४] आपल्या अनुमानांत किंवा अनुमानानें काढलेल्या निर्णयांत शंका-

स्थलें रहात असतील तर तेथें निर्णयात्मक लिहूं नये. कोणताही मजकूर निर्णयात्मक ठरेपर्यंत तो संशयित असल्याचा उल्लेख करणें उचित असतें.

[५] एखादी गोष्ट अनुमानानें 'शक्य' वाटली म्हणून ती खात्रीलायक अगर निर्णायक आहे असें समजूं नये. एखादी गोष्ट 'शक्य' वाटते म्हणून तिचा विचार करूं लागलों म्हणजे ती 'शक्यता' निर्णायक स्वरूपांत दिसूं लागते. परंतु येथें चूक होण्याचा बराच संभव असतो.

[६] ज्या गोष्टी मूळांतच संशयित असतात त्यांवरून काढलेलीं अनुमानें बहुधा चुकीचींच ठरतात.

[७] अनुमानाने इतिहासाची सांखळी जुळत नसेल तर त्या अनुमानांत चूक असल्याचें समजावें.

सावधानता राखण्यासाठीं अशाच तऱ्हेचे आणखीही मुद्दे लक्षांत घेऊन अनुमानें काढावींत. परंतु तीं सर्व ताळेबंद आहेत किंवा नाहींत हें प्रथम तपासून नंतर त्यांचा उपयोग करावा.

अनुमानें काढावयाचीं तीं नेहमींच [१] काय घडलें नाहीं किंवा कशाचें अस्तित्व नव्हतें हें शोधण्यासाठीं व [२] काय घडलें असलें पाहिजे किंवा कशाचें अस्तित्व असलें पाहिजे हें समजून घेण्यासाठीं काढावयाचीं असतात. परंतु असें करितांना [१] काय घडलें नाहीं किंवा कशाचें अस्तित्व नाहीं हें शाबित करण्यास अनुल्लेख हें एक मुख्य साधन असतें. सामान्य नियम असा कीं, ज्याचा उल्लेख अगर माहिती प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीतीनें कोठेंच मिळत नाहीं ती गोष्ट घडलीच नाहीं असें अनुमान बांधावयाचें. परंतु एखाद्या साधनांत उल्लेख नसेल पण इतरत्र असेल तर पहिल्यांतील अनुल्लेखावरून अस्तित्व नाहींसें होत नाहीं. इतिहासकालीं घडलेल्या सर्वच गोष्टी सर्वांनाच माहिती असल्या पाहिजेत असा कांहीं नियम नाहीं. तसेच कित्येक गोष्टी नमूद करणारीं साधनें आज हयात राहिलेलीं असतील असाही नियम नाहीं. म्हणून इतिहासांत अनुल्लेखांवरून एखाद्या बाबींचें अस्तित्व जरी एकदम नाहींसें करतां येत नाहीं, तरी अनुल्लेखांवरून अस्तित्व नसल्याचें शाबित करण्याचा नियम मात्र कांहीं मर्यादित स्वरूपांत उपयोजितां येतो. ज्या वेळीं एखादी गोष्ट घडल्याचा प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष उल्लेख कोठेंच नसतो त्या वेळीं ती घडल्याबद्दलचें

अनुमान करण्याचें इतिहासकाराला मुळींच प्रयोजन नसतें. परंतु जी अनुमानाची कसोटी लावण्याची वेळ येते ती जेव्हां उल्लेख बराच संशयित असतो तेव्हां. अशा वेळीं अधिक विश्वसनीय साधनांतील अनुल्लेखांवरून संशयित उल्लेखांच्या पुराव्यानें ध्वनित झालेलें अस्तित्व नाहींसें करणाऱ्या साधनाचा अवलंब करावा लागतो. अशा वेळीं विश्वसनीय लेखांचें परीक्षण करतांना पुढील मुद्दा लक्षांत ठेवावा. एखाद्या लेखकानें एखाद्या प्रसंगाचें वर्णन अगदीं क्रमशः व सविस्तर केलें आहे, लेखक विश्वसनीय असल्याचीही आपली खात्री पटली आहे, परंतु त्यानें त्या वर्णनांत एखाद्या दुय्यम किंवा कनिष्ठ दर्जाच्या साधनांत उल्लेखिलेली एखादी बाब दिलेली नाहीं. ती बाब खरोखरीच महत्त्वाची आहे व पहिल्या विश्वसनीय (अ) लेखकाच्या दृष्टिक्षेपांत ठळकपणें येण्यासारखी होती, किंवा (आ) लेखकानें लिहिलीच पाहिजे होती. अशा वेळीं विश्वसनीय साधनांतील अनुल्लेख संशयित साधनांतील एखाद्या गोष्टीचें अस्तित्व नाहींसें करतें असें अनुमान करणे सयुक्तिक ठरतें. [२] काय घडलें असलें पाहिजे हें शोधण्यासाठींही अनुमान करावें लागतें. एका गोष्टीच्या अस्तित्वावरून दुसरीचें अस्तित्व सिद्ध होत असतें. कार्यकारणपद्धतीनें दिलेल्या गोष्टीवरून त्यांतील कारण किंवा कार्य अनुमानानें शोधून काढतां येतें. तसें करण्यास थोडासा अनुभव मात्र असावा लागतो. म्हणून जीं अनुमानें काढावयाचीं तीं (अ) सामान्य अनुभवावरून किंवा (आ) विवक्षित कारणांवरून काढतां येतात. मात्र अशा अनुमानांत चूक राहूं न देण्यासाठीं आपण ज्या गोष्टींवरून अगर पुराव्यांवरून आपलीं अनुमानें बसवूं पाहतों ती गोष्ट अगर पुरावा शाबीत व सत्यस्वरूपाचा असला पाहिजे. ज्या गोष्टीबद्दल आपण अनुमान बांधतों तिचें आपणाला पूर्ण ज्ञान असलेंच पाहिजे व मूळ बाब व तीवरून ठरविलेली बाब अन्योन्यसंबंधी असली पाहिजे. ज्या वेळीं आपण अनुमान करितों त्या वेळीं आपण असेंच समजत असतों कीं, एक बाब घडली असल्यास दुसरी जी आपण अनुमानानें ठरवितों ती परस्परजीवि असल्यानें निसर्गतःच घडली असली पाहिजे. सारांश, अनुमानाला (१) मुख्य बाबींची बिनचूक माहिती, (२) इतिहासकालीन इतर प्रसंगांची व परिस्थितीची पूर्ण व तपशिलवार माहिती असावी लागते. पुष्कळवेळां वर्तमान रीतिरिवाजांवरून किंवा व्यवहारपद्धतीवरून गतकालाची

परिस्थिति अजमाविली जाते. परंतु त्यामुळें चूक होण्याचा संभव असतो. सामाजिक, राजकीय व व्यावहारिक पद्धतींत कालानें बराच फरक पडत असतो. त्यामुळें आपण काढलेलीं अनुमानें चुकीचीं ठरतात. तसेंच एखाद्या गोष्टीवरून अनुमान काढलें म्हणजे तें तत्कालीन परिस्थितीला म्हणजे इतिहासकालीन इतर प्रसंगांना जुळत आहे किंवा जुळत नाही हे तपासलें पाहिजे. तें जर जुळत नसेल तर अनुमानांत कांहींतरी चूक झाल्याचें निश्चित समजावे. इतिहासाच्या माहितींतील खंडभेद अनुमानानें भरून काढतांना ते इतर प्रसंगांच्या व तपशिलांच्या कोंदणांत गुणदोषानें व आकारानें यथोचित बसले पाहिजेत. परंतु अनुमानें कितीही यथोचित ठरली तरी तीं ऐतिहासिक सत्य असतातच असें मानूं नये. क्वचित्प्रसंगी नवीन उपलब्ध होणाऱ्या माहितीवरून तीं चुकीचींही ठरण्याचा संभव असतो.

## ४८ इतिहास-रचना व प्रसंगांचें एकीकरण

साधनांच्या वर्गीकरणानें संभवनीय व समकालीन ऐतिहासिक माहिती मिळविली, तिची विषयवारीनें जुळणी करण्यापूर्वी तपासणी केली व शेवटीं प्रसंगनिर्णय करतांना त्यांतील कांहीं खंडभेद अनुमानानें भरून काढले म्हणजे इतिहास-रचनेचें कार्य संपलें का, असा सहजच प्रश्न उभा राहतो. हा कांहीं बाबतींत थोडा वादग्रस्तही मुद्दा आहे. ऐतिहासिक कोणत्याही तपशिलाला इतिहासांत त्याची ठराविक जागा असलीच पाहिजे, अमुक एक गोष्ट ऐतिहासिक महत्त्वाची म्हणून तिला इतिहासांत स्थान द्या व दुसरी कमी महत्त्वाची किंवा आवडीची म्हणून गाळून टाका असें म्हणतां येत नाही. असें म्हटल्यास त्यांत लिहिणाराचा पक्षपातीपणा किंवा हीनत्व अगर मत्सरभाव व्यक्त होतो. ही विचारसरणी अगदीं चूक आहे असें नाहीं. जी माहिती उपलब्ध झाली तोच इतिहास, हें बव्हंशीं खरें आहे. परंतु इतिहासरचनेंत हा नियम अक्षरशः पाळणें तितकेंच कठीण आहे. कोणत्याही शास्त्राचें अगदीं समग्र म्हणजे बारीकसारीक तपशिलांसह ज्ञान करून देणें अशक्यच असतें. समजा, कीं आपण सर्व ऐतिहासिक उपलब्ध तपशिलांची सुसंगतपणें मांडणी करितांना एकही तपशील न गाळण्याच्या प्रतिज्ञेनें कार्य संपवूं म्हटलें तर विविध प्रसंग, विविध वस्तुवर्णनें, विविध आचार व विचार वगैरे सर्व

लहानसहान बाबी अगदीं अथपासून इतिपर्यंत द्याव्या लागतील. परंतु असें करूं म्हटलें, तर कित्येक शतकांच्या इतिहासाची व्याप्ति एवढी मोठी होईल कीं, तो नुसता वाचूं म्हटलें तरी सात जन्म पुरणार नाहींत. कोणत्याही शास्त्राचा उद्देश असा असतो कीं, अभ्यासकाला थोड्या वेळांत व मेहनतींत जरूर ती माहिती पूर्णत्वानें मिळावी. आणि हा उद्देश साधावयाचा तर इतिहासांत मोठी अडचण उत्पन्न होते. ऐतिहासिक माहितीचे तपशील बरेच मोठे व विपुल असल्यामुळें त्यांचें ज्ञान अभ्यासकांना दोन तऱ्हांनीं देतां येतें: [१] उपलब्ध असेल तितकी माहिती समग्र देणें. असें करतांना तिचा मग बोध सहज न होऊं शकला तरी चालेल, किंवा [२] माहिती संक्षिप्त, परंतु सहज बोध करण्यासारखी देणें. या दोन मार्गांतील कोणत्या मार्गाचा अवलंब करावा हें ठरविण्यांत मतैक्यता नसते. ज्या कालाच्या अगर देशाच्या ऐतिहासिक साधनांची निष्पत्ति अगदींच त्रोटक व लहान आहे अशा इतिहास रचनेंत लेखकाला हा पेंच पडत नाहीं. परंतु जेव्हां ऐतिहासिक साधने भरपूर असतात व आणखीही उपलब्ध होण्याचा संभव असतो तेव्हां मात्र हा पेंच पडत असतो. अशा वेळीं माहितीची विस्तृतता व महत्त्व न घालवितां संक्षेप साधणेंच आवश्यक असते. असा संक्षेप साधण्यासाठीं कांहीं सामान्य नियम बसवितां येण्यासारखे आहेत.

इतर शास्त्रांप्रमाणेंच इतिहासांतही ऐतिहासिक साहित्यांतून मिळेल त्या तपशिलाचें गुणदोषविवेचनानें परीक्षण करावें लागतें. अशा रीतीनें जी माहिती ग्राह्य ठरते ती देतांना जी भाषा वापरावयाची ती दुसऱ्यास समजेल अशा तऱ्हेनें द्यावी लागते. आणि अशा रीतीनें माहितीचें संकलन करितांना कित्येक तपशिलांना सामान्य छेद देतां येतात, व स्पष्टता आणि सुलभता साधण्यास ते द्यावेही लागतात. परंतु असें करतांना इतर शास्त्रांप्रमाणें कोणत्याही हालचालींचा अगर स्वभावधर्मांचा एक नमुना देऊन चालणार नाहीं इतर शास्त्रांत सामान्य सिद्धान्त द्यावयाचे असतात त्यामुळें सामान्य गुणदोषानुरूप एक नमुना दिला म्हणजे काम भागतें. परंतु इतिहासांत तसें करून चालत नाहीं. प्रत्येक हालचालींतील व स्वभावधर्मांतील भेदाभेद शोधून काढणें हाच इतिहासांतील मुख्य उद्देश असतो. त्यामुळें सामान्य गुणधर्म सांगून व्यक्तिविशिष्ट गुणकार्यें सोडून चालत नाहीं. परंतु उपलब्ध तपशील अगदीं विस्तारपूर्वक पुनरावृत्ति वगैरे करून लिहिलेला असल्यास त्यांतील गुणदोष, माहिती

वगैरेंचें संक्षिप्त चित्र पूर्णत्वानें देणें योग्य असतें. अशा वेळीं तत्कालीन परिस्थिति दर्शविण्यास व मूळ अर्थ कायम राखण्यास तत्कालीन शब्द व वाक्यें जशींच्या तशींच ठेवणें भाग पडतें. परंतु सर्व साधनांतून अर्थबोधानें बराच भाग गाळतां येऊन पुष्कळशा तपशिलांना सामान्य छेद देतां येतो. असें करितांना तत्कालीन चालीरीति, क्रांति व उत्क्रांतीचीं तत्त्वें आणि विवक्षित किंवा विशिष्ट प्रसंगांची बारकाईची माहिती हीं तिन्हीही सारखीं नजरेसमोर ठेवणें जरूर असतें.

प्रत्येक साधनांतून चालीरीति, उत्क्रांतिवाद, वगैरेंचें वर्णन येत असतें. असें वर्णन एखाद्या व्यक्तीलाच लागूं असतें असें नाहीं. तें सर्व समाजाला किंवा संघाला लागूं असतें. म्हणून तें जरी स्वतंत्र साधनांत स्वतंत्र व्यक्तींच्या कार्यनिर्देशांत ग्रथित केलेलें असलें तरी इतिहासांत प्रत्येक व्यक्तीच्या बरोबर तें पुनःपुन्हा देण्याची गरज नसते. एकदांच आचारविचारांचा सामान्य विशेषधर्म, सीमा व काल ठरवून घ्यावा. एखाद्या समाजाचा अगर पक्षाचा विशेषधर्म ओळखला म्हणजे त्याचें त्याप्रमाणें सविस्तर सामान्यपणें वर्णन द्यावें म्हणजे त्या समाजाच्या किंवा पक्षाच्या नांवाबरोबर त्याच्या विशेषधर्माचा बोध होऊं शकतो. मग त्या समाजांतील अगर पक्षांतील प्रत्येक माणसाच्या माहितीच्या वर्णनाबरोबर असल्या विशेषधर्माची पुनरावृत्ति करण्याची जरूर राहणार नाहीं. जसें एकदां हिंदूंची प्रवृत्ति सांगितली म्हणजे मग कोणाही हिंदु सरदारांच्या सामान्य प्रवृत्तीबद्दल विवेचन करण्याची जरूरच पडत नाहीं. मुसलमान विरुद्ध मराठा म्हटला, कीं मराठ्यांचा विशेषधर्म ओळखतां येतो. स्वराज्यांतील मराठा म्हटला कीं, त्याबरोबर आणखी एका विशिष्ट सामान्य गुणधर्माची कल्पना करितां येते. सारांश, पक्ष, समाज, जात, गोत, यांसारख्या संस्थांच्या संस्कृतीवरून जे स्वभाव किंवा प्रवृत्तिधर्म त्यांच्यांत दिसून येतात त्यांचा बोध त्या त्या संस्थांच्या नांवानें करितां आल्यानें बरीच पुनरावृत्ति व विस्तार टाळतां येतो. परंतु असें करितांना प्रत्येक माणसाच्या स्वभावविशेषांना संक्षेप देऊन चालणार नाहीं. सर्वच माणसांत सामान्य प्रवृत्तीप्रमाणें चालण्याची संवय असते असें नाहीं. सारांश, संघाचे अगर समाजाचे सामान्य धर्म शोधून काढले म्हणजे ते कोणत्या कालाला मर्यादित असतात हेंही शोधावें लागतें. तसेंच त्या संघाचें केंद्रीकरण कोणत्या स्थलमर्यादेंत होत

आहे हेंही तपासावें लागतें. कारण केंद्रापासून जसजसें दूर अंतर होत जातें तसतसा त्या सामान्य धर्मांत फरक पडत असल्याचेंही दिसून येतें. सारांश, बारीकसारीक भेद लक्षांत घेऊन सामान्य संघाखालीं अगर घटकाखालीं तत्संबंधीय लहानसहान बाबींचें व्यक्तिनिविष्ट वर्णन करितांना पुष्कळ भाग सहज संक्षेपित करतां येतो. उदाहरणार्थ, एकाच प्रसंगांतील अनेक उपप्रसंग सविस्तरपणें साधनांतून उपलब्ध होत आहेत. प्रत्येक उपप्रसंगाचीं कारणें वगैरे स्वतंत्र दिलेलीं आहेत. आतां अशा दहा उपप्रसंगांचें निरनिराळें वर्णन न करितां एकसमुच्चयानें करूं म्हटलें तर कारण व निष्पत्तिवाचक मजकुराची वगैरे किती तरी पुनरावृत्ति टाळतां येईल. याचप्रमाणें मोठमोठ्या घटकांचेंही वर्णन करूं म्हटलें तर लहान घटकांतील पुनरावृत्ति टाळतां येईल. सारांश, प्रत्येक घटकाची कारण व परिणामपरंपरा एकाच पक्षभेदाखालीं येणारी असल्यामुळें सामान्य विशेषधर्माखालीं त्यांचा परिपोष घेतल्यानें कार्य भागतें. प्रत्येकाचा जो व्यक्तिनिविष्ट स्वभावधर्म किंवा कार्य तें मात्र स्वतंत्रपणें द्यावें लागतें. अशा व्यक्तिनिविष्ट कार्यांना सामान्य छेद देतां येत नाहींत. आतांपर्यंतच्या सामान्य छेदानें छेदित होणाऱ्या मजकुरानें कोणत्याही रीतीनें अर्थबोधाच्या स्वरूपाच्या किंवा भावार्थाच्या दृष्टीनें भाग गाळला जात नाहीं. त्यामुळें अशा सामान्य छेदांत वाद माजण्याचें कारण नसतें.

सर्वच व्यक्तिविशिष्ट कार्यें सामान्य स्वरूपांत व ठराविक शब्दांत सांगतां यावयाचीं नाहींत. कारण, त्यांचा तपशील व स्वरूप एकमेकांपासून अगदीं भिन्न असतें. परंतु अशा व्यक्तिगत कार्यांचा पाषड-पसारा कितपर्यंत वाढवावयाचा हाही एक मोठा प्रश्नच असतो. एक-तर विस्तार कायम ठेवणें छपाईच्या म्हणजे आर्थिक व इतर बाबींनेंही सांप्रत अशक्य असतें. शिवाय उपयुक्ततेच्या मानानेंही ह्या विस्ताराची मर्यादा ठरविणें जरूर होतें. सारांश, उपलब्ध विस्तार कायम ठेवणें आणि विशेषतः जेथें साधनांचा भरणा अधिक असतो तेथें तरी विस्तारास मर्यादा न घालणें अव्यवहार्य ठरतें. लेखकाला तो सर्व देणेंही कठीण जातें. त्यामुळें कांहीं कमी महत्त्वाच्या तपशिलांची गाळागाळी करणें अपरिहार्य असतें. ही गाळागाळी कोणत्या पद्धतीनें केली असतां इतिहासाचें नुकसान होणार नाहीं, हाच काय तो खरा मुद्दयाचा प्रश्न आहे.

कोणाही माणसाला सबंध जगाचा सविस्तर इतिहास लिहूं म्हटलें तर तें शक्य नाहीं. म्हणून इतिहासलेखक आपापल्या आवडीप्रमाणें एखादा इतिहासाचा भाग पाडून घेतो. ते भाग कसे पाडले जातात याबद्दल मागें विवेचन झालेंच आहे. इतिहासकारानें एकदां का आपला इतिहासाचा विभाग ठरवून घेतला म्हणजे मग त्याला ऐतिहासिक साहित्याच्या विस्तारावरून कोणकोणत्या बारीकसारीक तपशिलांच्यापर्यंत मजल मारावयाची तें ठरवून घ्यावें लागतें. हें ठरवितांना महत्त्वाकडे विशेष लक्ष द्यावें लागतें. एखाद्या घराण्याचा इतिहास लिहितांना त्या घराण्यांतील लहानथोर सर्वच माणसांबद्दल विचार करणें जरूर पडतें. परंतु एखाद्या समाजाच्या अगर देशाच्या इतिहासांत इतक्या बारकाईचा मजकूर घेण्याची मुळींच आवश्यकता नाहीं. असा बारकाईचा मजकूर घेऊं म्हटलें तर भारूडभरती फार झाल्यानें इतिहासांतील स्वारस्य व उपयुक्तता कमी होईल. म्हणून इतिहासकाराला ऐतिहासिक सामुग्रींतील कोणती सामुग्री महत्त्वाची आहे म्हणून घ्यावी हें ठरविण्याकरितां महत्त्व मापनाचें कोष्टक प्रथमच ठरवून घेणें इष्ट असतें. आणि या कोष्टकावरून जो लहानांत लहान परमाणु ठरवून घेतला जातो त्या परमाणूचे खालीं केव्हांही उतरतां कामा नये. कारण इतिहासांत योजण्यांत येणाऱ्या प्रसंगवर्णनांतील मजकुराचें परस्परांवरून महत्त्वमापन बिनचूक करतां आलें पाहिजे. उदाहरणार्थ, एखाद्या मोठ्या लढाईच्या प्रसंगाच्या वर्णनांत आपणास एखाद्या साधनावरून एका शिपायाचें अस्तित्व वगैरे समजलें म्हणून तें घालण्याचा मोह झाला. परंतु त्या वर्णनांत सेनापतीचेंही नांव न समजल्यामुळें कोणाच्याही नांवाचा उल्लेख नाहीं. अशा वेळीं त्या शिपायाच्या कामगिरीच्या वर्णनानें त्याच्या कामगिरीला नसतें महत्त्व चढतें व त्या उल्लेखांवरून इतरांच्या कार्यांतील महत्त्व मापणें कठीण जातें. जर अशा प्रकारचे उल्लेख करणें जरूरच असेल तर त्यांच्या कार्यांच्या महत्त्वाबद्दल तुलनात्मक स्पष्ट लिहावें हें बरें. कारण, अशा स्पष्टोक्तीच्या अभावीं बरेच गैरसमज उत्पन्न होतात.

ऐतिहासिक साधनांतून कित्येक समकालीन लोकांचा उल्लेख केलेला आढळतो. परंतु केवळ अशा लोकांचे उल्लेख समकालीन साधनांत असतात, म्हणून इतिहासांत घेतलेच पाहिजेत असें नाहीं. इतिहासांत ज्या

माणसांचे उल्लेख करावयाचे ते सामान्यतः असे असावेत कीं, त्यांनीं समाजांत, देशांत, धर्मांत किंवा इतर दुसऱ्या लौकिक बाबतींत उत्क्रांति घडवून आणलेली किंवा त्यांनीं उत्क्रांति घडवून आणण्यांत महत्त्वाचा भाग घेतलेला असावा. उगाच व्यक्तीची आवड किंवा केवळ देशाभिमान अथवा पक्षाभिमान अथवा खासगी भेदाभेद बाळगून लोकांची निवड करणें युक्त नसतें. ज्या माणसांनीं सामाजिक चालरीतींत भर टाकली किंवा सुधारणा केली, ज्यांनीं एखाद्या पक्षाचें, देशाचें, सैन्याचें वगैरे पुढारपण स्वीकारून कर्तृत्व करून दाखविलें, किंवा राज्यांच्या अगर महत्त्वाच्या हालचालींच्या नेतृत्वाचा अंगिकार करून राजकाज अगर लोककाज साधलें अशा सर्व माणसांचा उल्लेख करणें रास्त होईल. प्रसंगांच्या निवडींतही जे प्रसंग सामाजिक, राजकीय वगैरे बाबतींत स्थित्यंतर घडवून आणण्यास कारण होतात अशाच प्रसंगांची निवड केली पाहिजे. एखाद्या ऐतिहासिक माणसाच्या चरित्रांतही अशाच निवडक प्रसंगांचें वर्णन घ्यावें लागतें. ह्या प्रसंगनिवडीच्या योगानें त्या माणसाचें खरें कार्यकर्तृत्व किंवा त्या कर्तृत्वास चालना देणारी अगर कारण असलेली स्वभाव-विशेषता हीच दाखवावयाची असते. त्याच्या चरित्रांतील अगदीं बारीकसारीक रोजचा कार्यक्रम सांगण्याचें प्रयोजन नसतें व तें देण्यापासून चरित्रांत नीरसता मात्र येते. त्या माणसाच्या सामान्य आचारविचारांवरून प्रसंगांच्या कार्यकारण परंपरेचा छडा लावतां येतो. परंतु आचारीविचारांचें विवेचन करतांना व तदनुसार स्वभाववर्णन देतांना दोन गोष्टींपासून सावध रहावें लागतें: [१] कोणाही माणसांनीं स्वतःबद्दल काढलेल्या उद्गारांवरून त्याचा स्वभाव ठरवूं नये व [२] कादंबरी अगर नाटकांत ज्या पद्धतीनें स्वभाव-चित्र रेखाटलें जातें त्या काल्पनिक पद्धतीचा अवलंब करूं नये. मनुष्याचा स्वभाव जाणण्याची ही खरी रीत नव्हे. परंतु नाटकें व कादंबऱ्या यांचा मनावर बराच परिणाम झाला असल्यानें योग्य ती सावधानता बाळगणें तितकें जुळत नाहीं.

अमुक एक प्रसंग महत्त्वाचा म्हणून त्याला इतिहासांत स्थान द्यावें हें ओळखण्याला तरी मार्ग कोणता ? असा साहजिकच प्रश्न उभा राहतो. या प्रश्नाचें उत्तर देणें खरोखरच कठीण आहे. कारण यांत मतभेद असूं शकतो. त्यामुळें त्या वादांत न पडतां जो मजकूर आपल्या इतिहासांत

सामील करतां येणाऱ्या ठराविक परिमाणूइतका किंवा त्याहून अधिक महत्त्वाचा असेल तोच महत्त्वाचा असें समजून इतिहासांत घ्यावा. लहान परमाणूचें माप इतिहासकारानें आपल्या कार्यावरून ठरवावें लागतें. तेव्हां जो कांहीं मजकूर घेण्याचें ठरविलें त्याचा क्रम कसा साधावा व त्याचें एकीकरण कसें करावें याबद्दलचा विचार करणें जरूर आहे.

परिणामांवरून तपशिलांचें एकीकरण करणें सोईचें होतें. अशा वेळीं जो परिणाम दृश्य झालेला असेल तो परिणाम घडवून आणण्यास कोणते प्रसंग व उपप्रसंग व त्याबरोबरच कोणत्या व्यक्ती कारणीभूत झाल्या हें शोधलें म्हणजे त्या व्यक्तींच्या नांवानें तपशिलांचे एकीकरण करण्यास सुरुवात करतां येते. परंतु हा जो परिणामांचा घटक ठरवावयाचा तो परिणाम-सादृश्यतेवरून ठरवितां येणार नाहीं. कारण, परिणामांत जरी सादृश्यता असली तरी ते अगदीं स्वतंत्र असूं शकतात. अशा स्वतंत्र परिणामांचे स्वतंत्रच घटक धरून त्यांचा स्वतंत्रपणेंच विचार करावा. सदृश भासणाऱ्या परिणामांचा स्वतंत्रपणा त्यांतील प्रसंगांच्या वर्णनांतील निरनिराळ्या स्वरूपांवरून व व्याप्तीवरून ओळखतां येतो. इतकेंच नव्हें, तर स्वरूपावरून एका प्रसंगापासून दुसरा सादृश्य असलेला प्रसंगही अलग निवडून काढतां येतो. हें स्वरूप नुसतें कालावरून किंवा जागेवरून निश्चित होतेंच असें नाहीं. परंतु त्या प्रसंगांच्या कारणांवरून व त्या प्रसंगांतील निरनिराळ्या कार्यांवरून किंवा जी क्रिया घडली तिचे क्रमावरून विशेष स्पष्ट होतें. सारांश, कोणत्याही सदृश दिसणाऱ्या परिणामांची अगर प्रसंगांची स्वतंत्रता ओळखण्यास सांपडलेल्या तपशिलांची तपासणी त्यांतील [१] उद्देश किंवा कारणें, [२] जागा अथवा व्याप्ति, [३] काल अथवा कारकीर्द, [४] साहित्य अथवा व्यक्ति वगैरे, [५] हालचाली किंवा घडून आलेल्या गोष्टी, [६] शेवट किंवा परिणाम आणि [७] स्थित्यंतर इतक्या सर्व किंवा यांपैकीं कांहींच्या भिन्नत्वावरून करावी लागते. आणि एकदां स्वतंत्रता सिद्ध झाली, कीं त्या प्रसंगाचें वर्णन करितांनाही वरील सात बाबींचेंच क्रमशः वर्णन करावें लागतें. परंतु असें वर्णन देतांना मुख्यतः तीन गोष्टी लक्षांत ठेवाव्या लागतातः—

[१] कोणत्याही कार्यांतील उद्देश कार्य करणाऱ्या माणसांच्या हेतूवरून

ठरवावयाचे असतात. परंतु असें करण्यास नेहमींच साधन उपलब्ध असतें असें नाहीं. म्हणून केव्हां केव्हां ज्यांनीं तीं कार्यें घडतांना पाहिलीं त्यांच्या पुराव्यांवरून उद्देश ठरवावे लागतात. येथें पक्षपात झाल्याचें केव्हां केव्हां दृष्टीस पडतें. प्रत्येकजण आपापली बाजू न्याय्य असेंच प्रतिपादन करीत असतो आणि दुसऱ्याची म्हणजे प्रतिपक्षाची बाजू चुकीची वगैरे तो कांहीं अंशीं हट्टानेंही सिद्ध करून दाखविण्याचा प्रयत्न करीत असतो. तेव्हां लिहिणाराची या बाबतींत तपासणी करून नंतरच उद्देशांबद्दल आपलें मत करून घ्यावें. कोणताही प्रसंग त्यांतील उद्देश अगर कारणें न देतां दिल्यास त्याचें महत्त्व तितकेंसें पटत नसतें.

[२] प्रसंगाची व्याप्ति स्थल, काल व साहित्य यांवरून ठरवावी लागते. ज्या स्थलीं एखादा प्रसंग घडला त्यांतच त्याची व्याप्ति नसते, तर ज्या भागांत त्या प्रसंगाचे परिणाम भोगावे लागले त्या स्थलांचाही त्या व्याप्तींत समावेश करावा लागतो. त्याचप्रमाणें ज्या काली प्रसंग घडला त्या कालापेक्षां अधिक कालपर्यंत प्रसंग घडण्याची क्रिया कारणरूपाने किंवा परिणामरूपानें होत असते. म्हणून प्रसंगाचा कालही त्याप्रमाणें ठरवावा लागतो. साहित्यांतही एखाद्या पक्षाची किंवा राजाची माहिती देऊन चालत नाहीं. त्या प्रसंगांत उपयोगी आलेले सजीव व निर्जीव साहित्याचा उल्लेख व्याप्तींत द्यावा लागतो. असें वर्णन देतांना नेहमींच साधन लेखकाला साहित्याची बरोबर कल्पना असतेच असें नाहीं. इतकेंच नव्हे तर साहित्याच्या व्यापक स्वरूपाच्या अज्ञानामुळें त्याचें वर्णन गैरसमज उत्पन्न करणारें असतें. साहित्याची सत्यासत्यता स्थलमर्यादेवरून व व्यक्तींच्या सामर्थ्यावरून करितां येते. हालचाली, परिणाम व स्थित्यंतरें वगैरेंचा मजकूर देतांना पहिल्यासाठीं आपल्याला साधन-लेखकांवरच अवलंबून राहावें लागतें. परंतु परिणाम व स्थित्यंतरें लपविण्याकडे अगर त्यांचा विपर्यास करण्याकडे साधन-लेखकाची जी प्रवृत्ति असते ती ओळखूनच विवेचन करणें भाग असतें. मागें याबद्दल विचार झालाच आहे तेव्हां येथें पुनरावृत्ति करण्याची जरूर नाहीं.

[३] स्वभाववर्णन किंवा गुणधर्मविवेचन करितांना एखाद्याच प्रसंगा-

वरून कोणताही स्वभाव किंवा गुणधर्म सर्व देशाला अगर समाजाला लावणें चुकीचें असतें. कोणत्याही सामान्य स्वभावाला अगर गुणधर्माला त्या समाजांत अगर देशांत तशाच प्रकारचे अनेक प्रसंग घडलेले असले पाहिजेत व त्यावरून त्या समाजाची अगर देशाची प्रवृत्तिच त्या स्वभावाकडे किंवा गुणधर्माकडे आहे असें खात्रीपूर्वक दिसून आलें पाहिजे.

परंतु नुसतें प्रसंगांचें एकीकरण करून वर्णनात्मक इतिहास रचला म्हणजे इतिहासाचें कार्य संपत नाहीं. ऐतिहासिक प्रसंग एकत्रित करतांना त्यांच्या परस्परसंबंधांचा विचार करावा लागतो व त्या परस्परसंबंधांवरून स्पष्ट होणाऱ्या परिणामांची विवेचकदृष्टीनें तपासणी करून त्यांतून कांहीं निर्णयात्मक तत्त्वें शोधावीं लागतात. असें करितांना मात्र एक गोष्ट चांगली लक्षांत ठेवली पाहिजे कीं, आपण इतिहासकालीन व्यक्तींना न्याय देण्यासाठीं हीं तत्त्वें शोधीत नसतों. आपणांस तसा न्याय देण्याचा अधिकार नसतो. इतकेंच नव्हे तर नीतीचे निर्बंध व न्यायदानाची जरुरी सामान्य माणसांना असते. जे शास्ते असतात त्यांना न्यायदान जें मिळावयाचें तें त्यांच्या कर्मानुसार तेव्हांच मिळत असतें. तेंच खरें न्यायदान असतें. कित्येक वेळां शास्त्रांची किंवा तत्त्वांची तपासणी व त्यांतील प्रगति यांचा तुलनात्मक विचार राजकीय अगर सामाजिक इतिहासांत घालून बराच गोंधळ केला जातो. शास्त्रीय अगर तात्त्विक शोध व त्यासाठीं त्या शास्त्राचा अगर तत्त्वाचा विकास अगर ऱ्हास यांबद्दल शोधना करितांना त्यांचा तुलनात्मक विचार करणें वेगळें व असा विचार राजकीय इतिहासांत घुसडून आजच्याइतकी प्रगति इतिहास-कालीं केली नाहीं म्हणून दोष देणें वेगळें. इतिहासकालीन जी कांहीं बरी-वाईट प्रगति झाली असेल तिचा तुलनात्मक विचार तत्पूर्वीच्या व त्या-नंतरच्या प्रगति किंवा अधोगतीवरून आणि विशेषतः तत्कालीन इतर शेजारधर्मांनीं वागणाऱ्या देशांतील संस्कृतीच्या कमी अधिक प्रमाणावरून करितां येतो. भविष्यकालीन प्रगति भूतकालीं घडवून आणली नाहीं म्हणून इतिहासकालीन व्यक्तींवर दोषारोप करणें अज्ञानमूलक व अशास्त्रीय असतें.

प्रसंगांचें व तपशिलांचें एकीकरण करितांना सर्व मजकुराचा प्रथम भावार्थ समजून घ्यावा लागतो व नंतर भावार्थावरून त्या मजकुरांची ठेवण ठरवून

त्याप्रमाणें इतिहासरचना करावयाची असते. असें करितांना प्रत्येक इतिहासकाराला (१) विस्तार व (२) महत्त्व ह्या दोन्हीही गोष्टी सारख्या समोर ठेवाव्या लागतात. दिलेली माहिती परिपूर्ण आहे कीं अपूर्णच आहे हें प्रथम तपासलें पाहिजे. आपली माहिती अपूर्ण असेल तर ती कोणत्या बाबतींत अपुरी आहे, प्रसंगांतील किती तपशील, माणसें, स्थलें वगैरे अद्यापि अज्ञात राहिलेलीं असावींत याचा प्रथम विचार केला पाहिजे. उपलब्ध झालेली माहिती हाच काय तो सारा विस्तार असें मानतांच येत नाहीं. अर्थात् या अज्ञात असणाऱ्या माहितीचा विचार न करितां जर आपण उपलब्ध माहितीवरूनच प्रसंगांचें व त्यांतील तपशिलांचें महत्त्व ठरवूं म्हटलें तर त्यांत मुख्य प्रसंगाचें खरें महत्त्व निघून जाईल व त्या प्रसंगांवरून घडणारे परिणाम अगदीं संकुचित स्वरूपांत दिसूं लागतील. प्रयत्नानें पुढें आणखी महत्त्वाचा भाग उपलब्ध झाला तर त्याचें स्थल व महत्त्व हीं दोन्हींही अनिश्चित होतील व शेवटीं कित्येक प्रसंग आधारासाठीं डळमळीत राहिलेले दिसतील. विस्ताराकडे जसें दुर्लक्ष होतें त्याचप्रमाणें आपल्याला अपुऱ्या व संशयित ज्ञानाची आठवण न राहून तपशिलाचें महत्त्व आपण प्राप्त झालेल्या साधनांवरून ठरवून मोकळे होत असतों. असें करितांना उपलब्ध ज्ञानावरून मिळालेल्या तपशिलांचें महत्त्व जितकें वाढवून सांगतां येईल तितकें तें वाढवीत असतों व मिळालेली माहिती एकपक्षीय आहे किंवा नाहीं याचाही फारसा विचार करीत नसतों. त्यामुळेंच इतिहासाचें विशेषतः नुकसान होतें.

प्रसंगांचें एकीकरण करितांना सुद्धां कोणते प्रसंग कोणत्या क्रमानें व कोणत्या मुख्य बाबीखालीं आणावेत हाही एक प्रश्नच असतो. सर्वच प्रसंग एकामागून एक असेच घडलेले असतील तर त्यांची विषयवारी निराळी लावण्याची जरूरच पडत नाहीं. परंतु एकाच कालीं एकापेक्षां अधिक प्रसंग घडण्याच्या क्रियेंत असतात व कित्येक प्रसंग त्यानंतर घडलेल्यांचीं कारणें व पूर्वीच्यांची फलनिष्पत्ति किंवा परिणाम असूं शकतात. त्यामुळें कित्येक प्रसंगांच्या सांखळ्या लागून राहातात आणि त्या प्रसंगांचीं वर्णनें त्या सांखळ्यांप्रमाणेंच देणें भाग पडतें. असें केलें तर प्रसंगांचा समजही लवकर पटूं शकतो व तुलनात्मक रचनाही करतां येते. उदाहरणार्थ, शिवाजीमहाराजांचा इतिहास लिहावयाचा तर 'अफझलवध', 'शाहिस्तेखान' वगैरे प्रसंग

नेरनिराळे केले. अफझलवध झाल्यानंतर शिवाजीच्या विजापुराकडील हाल-चाली व पन्हाळ्याची कैद वगैरे प्रसंग घडत असतांनाच शाहिस्तेखानाची वारी झाली. आतां कालक्रमानें जर आपण हे प्रसंग देऊं लागलों, तर शाहिस्तेखानाची मोहीम विजापुरकरांबरोबर चालू असलेल्या झटापटींत बराच गोंधळ घालील व विस्तार वाढूनही वाचकांचीही समजूत पडणार नाहीं. म्हणून ज्यांत कार्यकारणभावानें परस्पराबलंबी व निबद्ध असे प्रसंग एकत्रित सांगितल्यास ते समजावयास सोपे व विस्तारही कमी करून सांगतां येतात. म्हणून इतिहास लिहितांना प्रथम राजकारणांचे भाग कालानें पाडावेत. हे भाग क्रांतिदर्शक अगर स्थित्यंतर दर्शविणारे असावेत. यानंतर पक्षापक्षांचे व धर्मांचे वगैरे भाग पाडून त्यांतील प्रसंग क्रमानें सांगावेत. शिवचरित्राचे भाग पाडावयाचे तर [१] पूर्वेतिहास, [२] पूर्व चरित्र, [३] शिवाजीच्या देहपर्यंतच्या हालचाली, [४ राज्याभिषेकापर्यंतचा भाग व [५] मृत्यूपर्यंत. हे कालवाचक परंतु स्थित्यंतरदर्शक भाग पाडले कीं, मग पक्षापक्ष-विषयक भाग पाडावे. जसेः [अ] आदिलशाही व शिवाजी, [आ] मोंगल व शिवाजी, [इ] गोवळकोंडेकर आणि शिवाजी, इत्यादि खंड पाडून नंतर या खंडांत परस्परसंबंध वगैरे क्रमवार व कालानुसार सांगितला म्हणजे कारणांची व परिणामांची माहिती आपोआपच देतां येऊन पुनरावृत्ति करावयास हि लागल्यामुळें बराच विस्तार तोडतां येईल.

प्रसंगविवेचनांत कारणमीमांसा येतेच. अशी कारणमीमांसा करितांना मात्र जे भेदाभेद दृष्टीस पडतात तेही लक्षांत घेण्यासारखे आहेत. कारणांची मीमांसा करण्याची विशेषशी खटपट न करितां ईश्वराच्या कृपा-कटाक्षावर भरंवसा ठेवण्याची जुनी परंपरा सांप्रत नष्ट होत चालली आहे, ही गोष्ट बरी आहे. परंतु त्याबरोबरच तरफदारी करण्याकडे मात्र अधिकाधिक प्रवृत्ति वाढत आहे. याचें मुख्य कारण म्हणजे वर्तमानकालीन आपापसांतील अभिमान-जनित भांडणें हें होय. परंतु अशा वर्तमानमत्सरबुद्धीनें वगैरे इतिहासकालीन पुरुषांची नालस्ती करणें किंवा अप्रमाण व खोडसाळपणानें कार्यकारणभाव इतिहासांत घुसडविणें अगदीं शिष्टाचारास सोडून असून तें त्याज्य आहे. इतिहासा-चें लेखन वर्तमानपत्रांप्रमाणें तात्पुरतें परिणाम उत्पन्न करण्याकरितां करावयाचें असतें, ही खूणगांठ इतिहासकारानें प्रथम बांधावी लागते. तसेंच वर्तमान-

कालीन वादांना बळी पडून विकृत अनुमानपद्धति स्वीकारल्यास इतिहासकार आपला दर्जा कमी करून घेत असतो हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे. आपण वर्तमानकालीं आपल्याला जितके शहाणे समजतों तितक्याच शहाणपणानें आपले पूर्वजही तत्कालीं वागत होते ही गोष्ट आपण विसरतां कामा नये. उलट जबाबदार व्यवहाराच्या रगाड्यांत ते आपल्यापेक्षांही अधिक व्यवहारचतुर झालेले होते असेंही म्हटल्यास चुकीचें ठरणार नाहीं. शिवाय आपण जीं आज अनुमानें काढतों तीं परिणामांवरून उत्पन्न होणाऱ्या किंवा झालेल्या परिस्थितीवरून काढीत असतों. हीही पद्धति चुकीचीच आहे. केवळ एका चुकीमुळें नेपोलियन धुळीस मिळाला म्हणजे तो कांहीं इतरांपेक्षां कोणत्याही अंगानें हीणकस होता असें ठरत नाहीं. परंतु सामान्य प्रवृत्ति मात्र अशी असते कीं, ज्याचा जय त्याच्याकडे चांगुलपणा व ज्याचा पराजय तो दोषी. ही पद्धति केव्हांही सशास्त्र नाहीं व ही विचारी माणसाला व कालाला पटणारी नाहीं. विवेकबुद्धीला ही त्याज्य वाटल्याशिवाय राहणार नाहीं. म्हणून अशा पद्धतीचा अवलंब करून इतिहासरचना करणें सशास्त्रीय युगांत तरी चालणार नाहीं.

सारांश, प्रसंगांचे व त्यांतील तपशिलांच्या एकीकरणांच्या पद्धतीवरच इतिहास जगांत प्रबोधन कार्य करूं शकतो व इतिहासांतील व्यक्तींचे गुणावगुण किंवा महत्त्व या पद्धतीनेंच लोकांपुढें चिरकाल टिकवतां येतें. तेव्हां ही पद्धति जितकी सरस तितका तो इतिहासही सरस होत असतो.

## ४९ ऐतिहासिक विवेचन

विसाव्या शतकापूर्वी ऐतिहासिक विवेचन कोणत्या पद्धतीनें केलें गेलें आहे याबद्दल मागें विचार झालाच आहे. ऐतिहासिक विवेचनांत तीन मुख्य भाग पडलेले दिसतात. [१] संशोधकीय, [२] गोष्टीरूप व [३] राजकारणी. या तीनही विभागांतील लेखननिबंधांबद्दल विचार झालाच आहे.

[१] संशोधकीय इतिहासांत आणखी पोटविभाग पडतातः [अ] साधनात्मक, [आ] रचनात्मक, [इ] टीकात्मक व [ई] चर्चात्मक. साधनात्मक इतिहासांत सर्व उपयुक्त साधनें दिलीं जातात. रचनात्मक इतिहासांत मुख्यत्वेंकरून (१) सर्व-साधारण इतिहास (२) चरित्रें व (३) प्रसंगवर्णनांचा समावेश होतो. टीकात्मक विवेचनांत साधनात्मक व रचनात्मक विवेचना-

वर साधकबाधक टीकाच केलेली असते. यायोगें इतिहास-रचनेंत फारशी भर पडत नाहीं. दोष काढून टाकतां येतात. चर्चात्मक लेखांचा उद्देशच मुळीं उपलब्ध माहितीवर चर्चा करून अधिक माहिती काढण्याचा असतो.

[२] गोष्टीरूप इतिहासांतील लेखन दोन प्रकारचें असलेलें दिसून येतें: [अ] ऐतिहासिक मान्य तपशिलांचें एकीकरण करणें. यांत समग्र इतिहास येतो. परंतु जितका म्हणून तपशील लोकमान्य ठरला त्याचेंच विवेचन केलें जातें. [आ] मनुष्याचा, देशाचा, अगर समाजाचा इतिहास सांगण्यासाठीं गोष्टी रचणें. यांत विशेषेंकरून इतिहासाचा तपशीलच गोंवण्याकडे प्रवृत्ति असते. [इ] एखादें नीतितत्त्व वगैरे सांगण्यासाठीं गोष्टींची रचना करणें. यांत ऐतिहासिक तपशिलाला महत्त्व नसून नीतितत्त्वविषयक भागाचेंच प्रामुख्यानें विवेचन केलें जातें. सारांश वर्तमानकालीन प्रचलित समजुतीप्रमाणें या गोष्टीरूप इतिहासाची रचना केली जाते.

[३] राजकारणी इतिहासांत भावानोद्दीपक किंवा उद्बोधक ऐतिहासिक लेखांचा समावेश होतो. हे लेख निंबधरूपांत किंवा उद्बोधक चरित्र अगर प्रसंगवर्णनात्मक ग्रंथरूपांत प्रसिद्ध होतात.

इतिहासलेखनाच्या विभागांप्रमाणें ऐतिहासिक विवेचन ज्या मार्गांनें केलें जातें ते मार्गही अनेक आहेत. त्यांतील मुख्य मुख्य पुढें देतों:—

[१] वर्तमानपत्रें, [२] मासिकें, त्रैमासिकें इ०, [३] ग्रंथ, [४] नाटकें, [५] सभांतील अगर मंडळांतील चर्चा, [६] व्याख्यानें व [७] चित्रपटदर्शन.

या सर्व मार्गांनीं व पद्धतींनीं जें विवेचन केलें जातें त्या सर्वांचा विचार करणें व प्रत्येकाला कोणते कोणते निर्बंध पाळले पाहिजेत व ते कां पाळले पाहिजेत याची येथें चर्चा करणें जरुरीचें आहेसें दिसत नाहीं. कारण प्रत्येक लेखक आपापले सामान्य निर्बंध जाणत नसतो असें नाहीं. परंतु नेहमीं जें अतिक्रमण झालेलें दिसतें त्याचीं कारणें या निर्बंधाच्या अज्ञानांत नसून तीं स्वभावदोषांत असतात. शिवाय इतिहास-लेखनांतील मुख्य मुख्य तत्त्वांचा ऊहापोह झाला असल्यानें तन्निर्मित निर्बंधाचा स्वतंत्र विचार करण्याची आवश्यकताच राहिली नाहीं. इतिहासलेखनांतील कोणताही विभाग लहान मुलांसाठीं असो किंवा थोरामोठ्यांसाठीं असो त्यांत ऐतिहासिक निवेदना-


च्या मुख्य तत्त्वांविरुद्ध आचरण न होऊं देणें, असत्य मजकूर न शिरूं देणें या बाबी मुख्यतः फार दक्षतेनें सांभाळल्या पाहिजेत. केवळ एखाद्या समाजाला, व्यक्तीला अगर धर्माला न आवडणारा मजकूर आहे म्हणून त्यांत असत्यता येऊं देऊं नये व तो गाळूनही टाकूं नये. ज्या वेळीं अशातऱ्हेचा प्रश्न येतो त्या वेळीं इतिहासप्रेमी माणसांनीं जर कांहीं स्वार्थत्याग करावा लागला किंवा नुकसान सोसावयास लागलें तरी तें सोसण्यास आपली नेहमींच तयारी ठेवली पाहिजे. परंतु इतिहासांत कोणत्याही कारणानें गडबड होऊं देऊं नये.


## ५० साधनांचे व अक्षरांचे नमुने

शिवशाहीच्या विविध प्रकारच्या साधनांचे नमुने देऊं म्हटलें तर विस्ताराचा व्याप आवांक्याच्या बाहेरचा आहे. तसेंच अक्षरांचे नमुने देण्याचें ठरविलें तरी ते प्रांतवारीनें व काल-वारीनें देणें आवश्यक होतें. हेंही विविधतेमुळें अशक्य आहे. अक्षरांच्या निरनिराळ्या वळणांचा नकाशा द्यावा म्हणून खटपट करतांनाही कांहीं कांहीं अक्षरांचीं वळणें इतकीं विविध प्रकारचीं आढळलीं कीं त्या सर्वांचाही समाचार घेऊन प्रतिकृतींत सादर करूं म्हटलें तर शंभर सव्वाशें पानांचा व्याप होऊं लागला. शेवटीं उपलब्ध व तयार झालेल्या आयत्याच ठशांचा उपयोग करण्याचें ठरवून त्याप्रमाणें कांहीं मूळ साधनांचे ठसे पुढें देत आहें. अक्षरांच्या वळणांचा नकाशा जरी वाचकांस सादर करणें शक्य नसलें तरी त्या प्रकारचे नकाशे मंडळादि संस्थांतील संग्रहांत ठेवणें अवश्य आहे. अशा नकाशांत निरनिराळ्या अभ्यासूंनीं भर टाकीत राहिल्यास अभ्यासकांची सोय होईल यांत शंका नाहीं. अक्षरांचीं वळणें व साधनांच्या विविध लेखनपद्धति या दाखविणारे नकाशे तयार करितांना त्यांत मुख्यतः प्रांत-वारीचे व काल-मानाचे भाग पाडावेत. असें केल्यास इतिहासाभ्यासांत साधनांचें वाचन सुलभतेनें करितां येऊन अभ्यासूंचा बराच वेळ वाचूं शकेल व त्यांचें वाचनही निर्दोष होईल.

पुढें देण्यांत येणाऱ्या ठशांचीं रूपांतरें देऊन विस्तार वाढविला नाहीं. पुढील ठसे देण्याचा उद्देश वाचकांस त्यांवरून साधनांच्या लेखनाचा थोडासा तरी बोध व्हावा इतकाच आहे. राजवाडे खंड पंधरा यामध्यें व शिवाजी सोव्हीनूरमध्येंही व इतर मासिकांतूनही कांहीं ठसे पहाण्यास मिळतील.


# संभाजीचें दानपत्र [ इ० सन १६८० ]






भा. इ. सं. मंडळाकडून—[ रूपांतर—शिवचरित्र-साहित्य-खंड दुसरा—छापत आहे. ]

# अदिलशाही फर्मान–अफझल-प्रकर्णी [ इ० सन १६५९ ]




भा. इ. सं. मंडळाकडून—[ रूपांतर–शिवचरित्र-साहित्य-खंड दुसरा–छापत आहे.]




वत्रशाळेकडून—१ आदिलशाही, २ शिवशाही, ३ बाजीराव बल्लाळ, ४ नानासाहेब, ५ भाऊसाहेब, ६ गोविंदपंत बुंदले, ७ रघुनाथराव.

## बाबाजीराजे भोंसले यांचे खुर्दखत [२४ डिसेंबर १५९७]




सत्कार्योत्तेजक सभेकडून—[ रूपांतर—राजवाडे खंड १५वा, पृष्ठ ४०१ लेखांक ३६७ ]

## विठोजीराजे यांचें पत्र [ ८ मार्च १६२४ ]




सत्कार्योत्तेजक सभेकडून—[रूपांतर—राजवाडे खंड १५, पृष्ठ ४६७ लेखांक ३९७.]

## रायगडावरील शिलालेख [ इ० सन १६७४ ]




विजय-प्रेसकडून—[रूपांतर—रत्नाकर वर्ष १ लें, अंक ५, पृष्ठ ३५७.]

## शिवाजीमहाराजांचें खुर्दखत [इ० सन १६४९]




औंध संस्थानाधिपतींकडून—[रुपांतर—राजवाडे खंड १५ वा, पृष्ठ ४७०—लेखांक ४३७.]

# शिवकालीन पत्र



औंध संस्थानाधिपतींकडून.

# श्रीनिवासराव पंतप्रतिनिधी यांचें पत्र




औंध संस्थानाधिपतींकडून.

जोधेशकावलींतील एक भाग




चित्रशाळेकडून—[ह्यांतर—भा. इ. सं. मंडळ—चतुर्थ संमेलन—वृत्त—शके १८३८—पृष्ठ १७७.]




विजय प्रेसकडून — [महाराष्ट्र-सारस्वत, ले० वि. ल. भावे—आवृत्ति ३ री, पृष्ठ ११२.]

## मातुःश्री जिजाबाईसाहेबांचें पत्र [इ० सन १६५१]



भा. इ. सं. मंडळाकडून—[रूपांतर–भा. इ. सं. मंडळ–त्रैमासिक–वर्ष १ लें, अंक १-३, पृष्ठ ३७.]

## साधुवर्य तुकारामम्हाराजांचें हस्ताक्षर



विजय प्रेसकडून—[महाराष्ट्र सारस्वत—ले० वि. ल. भावे—आवृत्ति २ री, पृष्ठ १८५]

## ५१ आधारभूत ग्रंथांची यादी-सूचना

ज्ञानसंवर्धनाचे मार्ग व साधनें इतकीं वाढत चालली आहेत कीं त्या सर्वांचें समालोचन करणें जवळ जवळ अशक्यच झालें आहे. म्हणून उपलब्ध ज्ञानसंग्रह अगदीं थोड्याच कालांत व मेहनतींत कसा प्राप्त करून घ्यावयाचा याबद्दल सारखी धडपड चालू असते. या परिस्थितीमुळें कोणत्याही लेखाचें परीक्षण लेखकानें कालाचें व ज्ञानाचें महत्त्व जसें कमीअधिक मानून लेखन केलें असेल त्या महत्त्वाच्या प्रमाणावरून होत असतें. लेखक सर्वच उपलब्ध ज्ञानसंग्रह वाचकांना देऊं शकतो असें नाहीं. परंतु जो ज्ञानसंग्रह साररूपांत वाचकांस सादर केला जातो त्याच्या मूळ साधनांची व्याप्ति किती आहे हें समजले म्हणजे वाचकांना ज्ञानसंवर्धनाचे पुढचे मार्ग चोखाळण्यास सोपें पडतें. म्हणून कोणताही ग्रंथ तयार झाला कीं, त्यांत कोणत्या ग्रंथांचें वगैरे सार आले आहे हें देणें आवश्यक होतें. या ग्रंथांच्या यादीवरून आणखी कोणत्या ज्ञानाची अपेक्षा धरावयाची हें वाचकाला नंतर ठरवितां येतें. परंतु इतिहासग्रंथांत नुसतीच ग्रंथांची यादी दिल्यानें भागत नाहीं. कारण हे ग्रंथही एक प्रकारचे पुरावेच असल्यानें या पुराव्यांच्या ग्राह्याग्राह्यतेची छाननी करणें जरूर असतें. त्यामुळें या आधारभूत ग्रंथांची यादी देतांना पुढील सूचना लक्षांत ठेवणें इष्ट आहेः—

[१] जे ग्रंथ आपल्या प्रतिपाद्य विषयांतील अभ्यासासाठीं खास वाचले असतील तेवढ्यांचाच यादींत समावेश करावा.

[२] प्रत्येक ऐतिहासिक आधारभूत ग्रंथांतील प्रसंगांचा जो काल असेल तो त्या ग्रंथांच्या नांवापुढें द्यावा.

[३] प्रत्येक ऐतिहासिक आधारभूत ग्रंथाच्या मूळ लेखकाचें नांव प्रथम द्यावें. त्यानंतर संपादकांचीं व प्रकाशकांचीं नांवें द्यावींत.

[४] मूळ लेखकांच्या नांवापुढें लेखन-काल, संपादकांपुढें संपादनकाल व प्रकाशकांपुढें प्रकाशनाचा काल द्यावा.

[५] मूळ लेखाचें भाषांतर पहावयास मिळालें असल्यास त्या भाषांतरकाराचें नांव द्यावें व भाषांतर शब्दशः केलें आहे कीं भावार्थानें लिहिलें आहे त्याचा उल्लेख करावा.

[६] आवृत्ति वगैरे जे कांहीं भेदाभेदसूचक निर्देश केलेले असतील ते संपूर्ण द्यावेत.

[७] ग्रंथांची यादी अकारविल्हे लावावी. ती लावतांना ग्रंथनामांतील जो विषयसूचक मुख्य शब्द असेल त्या शब्दाची अकारविल्हे लावावी.

[८] अप्रकाशित साधनें अगर ग्रंथ यांचा यादींत समावेश करितांना त्यांचा कोणत्या सार्वजनिक संग्रहांत संग्रह केलेला आहे त्या संग्रहाचें नांव, क्रमांक वगैरे सर्व माहिती द्यावी.


[९] अप्रकाशित साधनें व्यक्तिसंग्रहांतील असतील व तीं सार्वजनिक उपयोगाला उपलब्ध नसतील तर तीं ज्या मनुष्याच्या संग्रहीं असतील त्याचें नांव व पत्ता द्यावा. परंतु जो भाग उपयोगांत आणला तो समग्र टीपेंत द्यावा.

[१०] जमल्यास प्रत्येक आधारभूत साधनांच्या परीक्षणानें झालेलें आपलें मत द्यावें.

सारांश असा कीं, ग्रंथसूचि देतांना सूचीवरून अभ्यासकाला ग्रंथांची प्रामाण्याप्रामाण्यता समजण्याइतका पुरावा आपल्या आधारभूत ग्रंथांच्या यादींत दिलेला असावा. इतिहासांत अशा विस्तृत पुराव्याची आवश्यकता असते.

शेवटीं या ग्रंथाच्याच चिकित्सेबद्दल चार शब्द लिहून हा शिवशाहीच्या चर्चात्मक इतिहासाचा प्रस्तावनाखंड संपवितों. मराठ्यांच्या विविध प्रकारच्या व भाषेंतील ऐतिहासिक साधनांची समग्रतेनें चिकित्सा करणारा हा पहिलाच ग्रंथ असावा असें मला वाटतें. कोणाचीही कृति समोर पहावयास नसल्यानें विषयांचा क्रम वगैरेंत बिनचुकता राहिलेली नसेल. इतिहासाभ्यासूंच्या अनुभवांवरून त्यांच्या गरजांची जाणीव करून न घेतां आल्यामुळें कित्येक मुद्दे अनुल्लेखित राहिलेले असतील. आपणाला जें समजलें किंवा उमगलें तें सर्वांनाही उमगलेलेंच असेल या भावनेनेंही कित्येक विवेचनांचीं स्थलें अनिर्देशित राहिलेलीं असतील. इतिहासाभ्यासूंच्या मालिकेंतील प्रसिद्ध लेखक का. त्रिं. तेलंग व शिवाजी-मेमोरिअल्च्या मुख्य उत्पादकांपैकीं अग्रणी कै० श्रीमंत सरकार माधवरावजी शिंदे बहादर यांचे उल्लेख जसे नजरचुकीनें र'हून गेले त्याप्रमाणें आणखीही कित्येक उल्लेख करण्याचे राहून गेलेले असतील. सर्वांना समजलेल्या परंतु आपणांस नवीन वाटणाऱ्या गोष्टी आपण नवीन म्हणून सांगतों त्याप्रमाणेंही कित्येक जुन्याच गोष्टींचें पुनर्लेखन केलें गेलें असेल. लिहिण्यांत तितकासा पोहोंच न राहिल्यामुळें कित्येक

ठिकाणीं पुनरावृत्त्याही झालेल्या असतील. लेखनाचा घंदा नसल्यानें भाषेवरील प्रभुत्वाच्या अभावीं व परिभाषेच्या उपयोगांतील कसुरीमुळें कित्येक मुद्दे भाषेनेंही नीटसे समजाविले गेलेले नसतील. खर्चाच्या डोईजड ओझ्यामुळें मजकुराला बेसुमार कातर लावल्यानें व प्रत्येक मुद्द्याच्या स्पष्टीकरणार्थ उदाहरण न दिल्यामुळें कित्येक बाबी दुर्बोध राहिलेल्या असतील. परंतु या व इतर अनेक दोषमूलक सर्व गोष्टींची जाणीव मनांत पूर्णपणें ठेवूनच हा शिवशाहीच्या चर्चात्मक इतिहासाचा प्रस्तावना-खंड वाचकांच्या हवालीं करीत आहें. गेल्या बारा वर्षांत भारत-इतिहास-संशोधक मंडळाच्या मंदिरांत इतिहास-देवतेची फावल्या वेळीं उपासना करितांना जो कांहीं स्वानुभव घेतां आला तो संशोधनक्षेत्रांत शिरूं पहाणाऱ्या इतिहासोपासकांना सादर करीत आहें. त्यांना या माझ्या कृतीपासून आपले थोडे तरी श्रम व ओझें हलकें करून घेतां आलें व शिवाजी महाराजांच्या इतिहासाच्या कार्याची प्रगति त्वरित गतीनें करितां आली तर माझ्या प्रयत्नांस यश आलें असें समजून इतिहास-देवतेच्या पुढील उपासनेंत अधिक उत्साह व जोम वाटेल व आणखीही खर्चाच्या जड ओझ्याला शिर नमलें जाणार नाहीं. परंतु उपासनेची सिद्धता प्राप्त करून देण्याचें श्रेय सर्वथैव महाराष्ट्रीय इतिहासाभ्यासूंबरच असल्यानें त्यांनीं माझ्या या कृतींतील कांहीं भाग ग्राह्य असल्यास तो घेऊन व जो ग्राह्य नसेल तो सोडून देऊन व त्यावर यत्किंचितही कालाचा व्यय न करितां शिवशाहीच्या इतिहासाच्या मूळ कार्यासाठीं साधन-सामुग्री मिळविण्याचा नेटाचा प्रयत्न करण्याबद्दल त्यांना जर विनंति केली तर ते ती विनंति आपलेपणानें मान्य करतील अशी आशा आहे. असें झाल्यास परमेश्वर त्यांत सर्वांनाच यशस्वी करून आपल्या मातृभूमीला पुन्हा स्वतंत्र करण्याचें धैर्य व कर्तृत्व महाराष्ट्रांतच पुनरुज्जीवित करील यांत मुळींच संदेह नाहीं.



# विषय-सूचि

**विषय-प्रवेश, १–५**—ज्ञानसंवर्धनास इतिहासाची आवश्यकता १, –वाङ्मयनिर्मिति व इतिहास १, –वाङ्मयनिर्मितीस निबंधांची आवश्यकता २, –इतिहासाची आवड २, –निबंधांची आवश्यकता ३, –प्रकार-संशोधकीय, गोष्टीरूप व राजकारणी ३, –त्यांची श्रेष्ठाश्रेष्ठता ३, –महत्त्व ४, –महाराष्ट्रीय जुनी लेखनपद्धति ४, –सुधारण्याची आवश्यकता ४-५.

**१ महाराष्ट्राच्या इतिहासाचे विभाग, ५–७**—विभागांची आवश्यकता ५, - स्थल-काल-विषयवारीनें पडतात ५, –महाराष्ट्रीय इतिहासाचे पांच विभाग ५, –विषयवारींतील तीन पोटविभाग ६, –निबंध ६-७.

**२ महाराष्ट्र-इतिहास-लेखनाचे प्रयत्न, ७–११**—प्रयत्न-व्याप्तीच्या मानानें अल्प ७, –इतिहासकालीन ७, –पद्धति ७, –इंग्रजींतील ७, –साधन-संग्रहास प्रारंभ ८, –प्राच्यवस्तुसंरक्षण कायदा ८, –प्राचीन व पौराणिक इतिहास-लेखक ८, –सिलेक्शन्स् व गॅझेटिअर्स ८, –मुसलमानी व मराठी इतिहासाची हेळसांड ९, –कारणें ९, –साधनाभावाचें एक कारण-इनाम कमिशन ९, –इनाम कमिशनचा पूर्व कारभार १०, –मराठी इतिहास-लेखक १०, –संशोधक दृष्टि-प्रारंभ १०, –रचनेस प्रारंभ १०, –कागदसंग्रह-परदेशीं गेले ११, –साधनसंग्रहास कायद्याच्या संरक्षणाची आवश्यकता ११.

**३ शिवशाहीच्या इतिहास-रचनेचें स्वरूप, ११–१४**—शिवशाहीच्या इतिहास-रचनेचे प्रयत्न–शिवकालीन ११, –शिवउत्तरकालीन ११, –इंग्रजींतील १२, –शिवाजीउत्सव-रचनेस अडथळा १२, –शिवाजीवर सरकारी रोष १२, –परंतु जनतेंत वाढतें प्रेम १३, –इंग्रज इतिहासकारांचे दोष-शोध १३, –साधनें जुळविण्याचें प्रयत्न १३, –शिवाजी मेमोरिअल–माधवजीबाबांचें व शाहूमहाराजांचें चातुर्य–सरकारी दिलसफाई १३, –साधनांची आवश्यकता १४, –रचनेंतील शास्त्रीय दृष्टि-प्रारंभ १४, –मर्यादित संशोधक १४, –शास्त्रोक्त अभ्यासाची आवश्यकता १४.

**४ इतिहास-लेखनासाठीं पुराव्यांचा अभ्यास, १५–२३**—साधनें-प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष १५, –विविधता १५, –इतिहासाभ्यासांत ज्ञानसंग्रहाची

मुख्य दृष्टि १५, –सत्यासत्यशोधनाची आवश्यकता १६, –ऐतिहासिक व इतर पुराव्यांचें कार्य-तुलना १६, –कायदा-इतिहास-तुलना १६, –भिन्नता-निर्णय-पद्धतींत १६, –पुराव्यांच्या निर्बंधांत १७, –कायद्यांतील पुराव्यांच्या तत्त्वांची ग्राह्याग्राह्यता १७, –रसायनादि शास्त्रें व इतिहास-पुरावे-तुलना १८, –त्यांच्या उपयोगांतील भिन्नता १८, –स्वरूपांत व सामान्य धर्मांत १९, –कारणमीमांसेत २०, –सिद्धान्तस्थापनेंत २१, –निष्कर्ष काढण्यांत २१, –संशोधनास नियमांची आवश्यकता २३, –संशोधनाचें कार्य २३.

**५ संस्कारांचा इतिहास-रचनेस अडथळा, २४–२६**—संस्कारांचा परिणाम २४, –कावळ्याचिमणीची गोष्ट २४, –आजीबाईंचा पुरस्कार २५, –परंपरेच्या विकृत माहितीचा परिणाम २५, –रचनेस अडथळ्यांचीं कारणें २६.

**६ इतिहास-रचनेंतील सामान्य वाद, २६–३३**—मुख्य वाद २६, –साधनांच्या प्रकाशनाची युक्तायुक्तता २७, –व्यक्तिविशिष्ट प्रयत्नांतील गुणदोष-विवेचन २८, –संग्राहक व लेखक यांचे परस्पर संबंध २९, –ऐतिहासिक वाङ्मयनिर्मितींतील श्रेष्ठाश्रेष्ठतेच्या वगैरे बऱ्या-वाईट समजुती ३०, –कादंबऱ्या व नाटकें यांचे परिणाम ३१–३३.

**७ इतिहास-रचनेंतील दृष्टि, ३३–४०**—इतिहासाची शास्त्रांत गणना ३३, –इतिहासांतील विशेष–ज्ञानसंग्रह, पद्धति व निर्णयसार ३३, –विशेषांचें महत्त्व ३४, –इतिहासलेखन ही कला ३४, –कौशल्य मापन-प्रकार ३४, –भाषा-शैलींतील भिन्नत्व ३५, –कलेंतील परंपरा-विविधता ३५, –विभूतिपूजकांची-दोषादोष ३५, –प्रतिपक्षीयांची-दोषादोष ३६, –जेत्यांची-दोषादोष ३६, –तिन्ही परंपरा राष्ट्रीयत्वास सदोष ३७, –राष्ट्रीय इतिहासाची आवश्यकता ३७, –इतिहासकाराची जबाबदारी ३७, –इतिहासरचनेबद्दल गैरसमज ३७, –साधन-प्रकाशनांत टाचणांची आवश्यकता ३७, –आधुनिक इतिहासांत आपलेपणाचा अभाव ३८, –राष्ट्रीय इतिहासास आपलेपणाची आवश्यकता ३८, –राजवाडी किंवा राष्ट्रीय परंपरा ३९, –साधनांची उणीव ३९, –साधनांच्या शोधाची व अभ्यासाची आवश्यकता ४०.

**८ साधनक्षेत्राची व्याप्ति, ४१-४७**—साधनांची आवश्यकता ४१, –अवशिष्ट साधनांच्या शीघ्र तपासाची आवश्यकता ४१, –संशोधकांचीं

क्षेत्र-निदर्शक टांचणें ४१, –क्षेत्राच्या व्याप्तीचें अज्ञान ४१, –ऐतिहासिक प्रसंगांवरून क्षेत्रव्याप्तीची रूपरेषा ४२, –साधन-सामुग्रीच्या स्थलांतराचीं व नाशाचीं कारणें ४३, –स्थलांतराच्या व नाशाच्या इतिहासाचें अज्ञात स्वरूप ४४, –तें जाणण्याची आवश्यकता ४५, –साधन-संग्रह ४५, –त्यांच्या फेरिस्त्यांची आवश्यकता ४५, –फेरिस्त्यांच्या कामास द्रव्याची मदत ४६, –साधनप्राप्तीसाठीं शोधकांची सचोटी ४७.

९ **साधन-मीमांसा**, ४७–५२—साधन-परीक्षणाची पूर्वतयारी ४७, –साधनांच्या बहिरंग व अंतरंगपरीक्षणाची आवश्यकता ४८, –दर्जा ठरविण्याची आवश्यकता ४९, –दर्जे-दोषादोष-अव्वल साधनें ४९, –दुय्यम साधनें ५०, –तृतीय दर्जाचीं साधनें ५०, –चतुर्थ दर्जाचीं साधनें ५०, –त्यांचे पोटभेद ५०, –प्रामाण्याप्रामाण्येतच्या कसोटीची आवश्यकता ५०, –ती लावण्याचे मार्ग ५१-५२.

१० **साधनें**, ५३–५४—परदेशीय व स्वदेशीय-प्रकार ५३, –भाषा ५४.

११ **परदेशीय साधनें–इंग्रजी**, ५४–७१—इंग्रजांची वसाहत व इंग्रज लेखकांचे मराठ्यांबद्दलचे बरेवाईट ग्रह ५४, –बातमी मिळविणें व देणें ५५, –साधनांचे प्रकार ५५, –इंग्रजी साधन-संग्रह व साधनांचा नाश ५६, –इंडिया ऑफिस संग्रह-भाग-तपशील ५८, –हिंदुस्थानांतील संग्रह ५९, –मुंबई सेक्रेटरिएट-संग्रह–तपशील ५९, –एलिनिएशन दसर ६०, –इंग्रजी साधनांचे प्रकाशन-दोष ६०, –इंग्रजी प्रकाशित साधन-संग्रह-अधिक प्रकाशनाची आवश्यकता ६१, –प्रवास-वृत्तें व दिनचर्या-प्रकाशित व अप्रकाशित ६२, –लेखनांतील विशिष्ट प्रचार ६३, –क्रिस्ती सन-ज्युलिअन पद्धति ६३, –ग्रेगोरिअन-पद्धति ६४, –साधनांच्या तारखेंतील विविधतेमुळें झालेले गैरसमज ६४, –इंग्रजी जुनी जोड-सन-लेखनपद्धति ६५, –ऑल-सेंट्स्-कॅलेंडर किंवा मेरिअन कॅलेंडर-विविधता ६५, –इंग्रज-लेखकांचे अज्ञान-मूलक लेखन-दोष ६६, –प्रवास-वृत्तें, दिनचर्या-लेखन-पद्धति-दोषादोष वगैरे ६७, –इंग्रजी इतिहास-ग्रंथ-दोषादोष ६९-७१.

१२ **डच साधनें**, ७१–७५—डचांची वसाहत ७१, –डच साधनें–प्रकार ७२, –डच-संग्रह ७३, –अप्रकाशित साधनें ७३, –तपासणीची आव-

श्यकता७४, –प्रकाशित साधन-ग्रंथ ७४, –प्रकाशनांतील दोषादोष ७४; –संशोधनाची आवश्यकता७५, –डच लेखनपद्धति ७५.

**१३ पोर्तुगीज साधनें, ७५-८१**—पोर्तुगीज साधनक्षेत्राची व्याप्ति ७५, –त्यांचा मराठ्यांबद्दलचा ग्रह ७६, –साधन-लेखकांतील दोषपूर्ण दृष्टि ७७, –गोवा संग्रह ७७, –लिस्बन व एव्हारो अप्रकाशित संग्रह ७७, –तपशील ७८, –अप्रकाशित संग्रह-इंडिआ ऑफिसांतील७९, –प्रवासवृत्तें वगैरे८०, –प्रकाशित संग्रह८०, –लेखनांतील दोषादोष-परीक्षण ८०-८१.

**१४ फ्रेंच व इतर युरोपीय साधनें, ८१-८२**—व्याप्ति ८१, –प्रवासी ८१, –लेखकांची पात्रापात्रता ८२, –परीक्षण ८२.

**१५ स्वदेशीय साधनें, ८२-८९**—शिवशाहीच्या राजकीय साधनांच्या नाशाचीं कारणें८२, –खासगी पत्रव्यवहार८३, –विदेशांतही गेला ८४, –इनाम-कमिशन-एलिनिएशन दप्तर८४, –फेरिस्त्याची आवश्यकता ८५, –सार्वजनिक संग्रह८५, –खासगत संग्रह–त्याची वाताहत८६, –व्यक्तिगत घराण्यांचे संग्रह–इतिहाससंग्राहक व मालक-बेबनाव ८६, –साधनप्राप्तीस अडथळे ८७, –साधन-निष्पत्ति व प्रकाशन ८८, –व्याप्ति ८९.

**१६ संस्कृत साधनें, ८९-९९**—प्रकार ८९, –काव्यलेखकांचे प्रवृत्तिपर विभाग९०, –उपलब्ध साधनें९०, –दानपत्रें–दोषादोष ९१, –काव्यें-व्याप्ति ९१, –भाट-संस्था९२, –त्यांची लेखनपद्धति ९३, –त्यांच्या काव्यांचें महत्त्व व दोष९४, –लेखन-काल-निर्णय९६, –नकलांतील दोषादोष ९७, –संस्कृत अंकलिपी९७, –महिन्यांचे व दिवसांचे रूढ शब्दप्रचार ९९.

**१७ फारसी साधनें, ९९-११५**—फारसीचा प्रचार ९९, –साधनांचे प्रकार१००, –व्याप्ति१००, –उपलब्ध प्रकाशित व अप्रकाशित साधनें१०१, –लेखन-पद्धति व दोषादोष१०३, –कागदांचे प्रकार १०४, –लेखनांतील विशिष्ट प्रघात १०५, –मुसलमानी विविध सनपद्धति–हुहुर १०६, –फसली १०७, –हिजरी१०७, –इलाही १०८, –जलुस १०८, –मुसलमानी महिने व दिवस १०८, –जुने फारसी महिने व दिवस १०८, –अब्जद-पद्धति १०९, –सन-निर्देशपद्धति ११०, –लेखनांतील दोषादोष १११, –महत्त्व ११५.

**१८ हिंदी व इतर भाषेंतील साधनें, ११५-११७**—हिंदी ११५, —उर्दू ११६, —गुजराथी, कानडी वगैरे ११६, —व्याप्ति ११६, —लेखक व लेखनांतील दोषादोष ११७.

**१९ मराठी साधनें, ११७-१२१**—संशोधनाकडे प्रवृत्ति ११७, —शोधन ११८, —व्याप्ति ११९, —प्रकाशित संग्रह-सूचींची वगैरे आवश्यकता १२०-१२१.

**२० लेखनप्रशस्ति, १२१-१३१**—पत्रांचे मुख्य प्रकार १२१, —मायन्यांतील रेघा-प्रकार व महत्त्व १२१, —मायन्यांतील रेघांचे, रकान्यांचे वगैरे विशिष्ट प्रघात व त्यांचें महत्त्व १२२, -रेघांचीं निरनिराळी नांवे १२३, —त्यांचे व्यवहारांत उपयोग १२५, —कागदपत्रांचीं निरनिराळीं नांवे व प्रकार १२६, - शिवशाहींतील लेखन-प्रशस्तीच्या सात बाबी १३०, -लेखनाचे मायने १३१, -खासगी पत्रव्यवहार १३१.

**२१ सरकारी जाबता, १३२-१४१**—मुख्य प्रधान १३२, —अमात्य १३२, -सचिव १३२, -मंत्री १३२, -सेनापति १३२, -पंडितराव १३२, —न्यायाधीश १३३, —सुमंत १३३, —चिटणीस १३३, -सबनीस, बक्षी १३३, -सेनाधुरंधर १३३, - इतर अधिकारी १३३, —सरदार १३४, —कारभारी, दिवाण १३४, —मुजुमदार १३४, - सबनीस १३५, —जिमेनिस १३५, —फडनीस, चिटणीस १३५, —पोतनीस इ १३५, - चिटणिसी जाबता १३६, —कारखानिशी व सबनिशी जाबता १३९, —कारखानिशी कीर्द १४०, -पत्रलेखक-गुमास्ते, कारकून १४१.

**२२ लेखन-पद्धति, १४१-१४९**—मोडी लिपी १४१, -मराठी साधनांच्या लेखनांतील विशिष्ट प्रघात १४२, - शिक्कापद्धति १४४, —शिक्का-पद्धतीबद्दल अनुमानें १४५, —शिक्के करण्याची रीत १४६, —सरकारी पत्रांची नोंद व शेरेपद्धति १४७, —कागद-त्यांचे आकार १४७, —भाषा-लेखन व लिपींतील दोषादोष १४८-१४९.

**२३ साधनांचा दर्जा व शकपद्धति, १४९-१५८**—कागदपत्रां-च्या प्रकारांवरून दर्जे ठरविणें १४९, -साधनें-प्रथम दर्जाचीं १४९,

–द्वितीय दर्जाचीं १४९, –तृतीय दर्जाचीं १४९, –चतुर्थ दर्जाचीं १४९, –दर्जा ओळखण्यास परीक्षण १५०, –कालाची कसोटी १५०, –प्रसिद्ध साधनांत कालनिर्देशाच्या चुका १५०, –शकपद्धति १५०, –खरे जंत्रीचें वाचन १५१, –पंचागातील भेदाभेद १५१, –अडचणी १५१, –मुसलमानी, हिंदी व इंग्रजी तारखा काढण्याची रीत १५२, –पहिले कोष्टक १५४, –दुसरे व तिसरे कोष्टक १५६, –कोष्टकांतील टीपांचें स्पष्टीकरण १५८.

**२४ सरकारी व खासगी पत्रें, १५८-१६३**— पत्रांचा अव्वल दर्जा १५८, –विभाग–राज्यकारभारविषयक, व्यावहारिक, खासगी १५८, –त्यांचें ऐतिहासिक महत्त्व १५९, –पत्रांतील माहितीची वर्गवारी–ती ठरविण्याची तपासणी १६०, –डौलाचीं पत्रें १६१, –लेखन दोष–त्यांची प्रामाण्याप्रामाण्यता १६१, –मसुदे व नकला–त्यांची प्रामाण्याप्रामाण्यता १६२, –तालिकांचे प्रकार व त्यांची प्रामाण्याप्रामाण्यता १६३.

**२५ जमाखर्च, १६३-१६४**— प्रकार १६३, –ऐतिहासिक महत्त्व १६४, –पद्धति १६४.

**२६ महजर, करीने, पुरशिसी वगैरे, १६५-१६८**—लेखनाचीं कारणें १६५, –ऐतिहासिक माहिती व तिचा दर्जा १६५, –लेखनदोष इ. १६६, –नांवें अगर सह्या घालण्याचे विशिष्ट प्रचार १६७, –निशाण्या घालण्याचे प्रकार १६८.

**२७ शकावल्या, १६८-१८०**—महत्त्व १६८, –लेखनकालावरून विभाग १६८, –सामान्य स्वरूप १६९, –शिवशाहीच्या शकावल्या व त्यांचें स्वरूप १७०, –त्यांचा इतिहासकालीन उपयोग १७०, –मूळ रचना १७०, –शकावल्या व याद्या-भेदाभेद १७१, –रचनाकाल १७१, –शकावली म्हणजे राजकीय हालचालींची कीर्द–मूळ राजघराण्यांतील १७१, –लेखनपद्धति १७२, –मूळ शकावलीचा लेखनकाल व हेतु १७२, –शकावलीचा प्रसार १७४, –लेखनांतील दोषादोष–त्यांची तपासणी-सुधारण्याचे मार्ग १७६, –भाषाप्रघात १७८, –प्रकाशित शकावल्या १७९, –सटीप शकावलीच्या प्रसिद्धीची आवश्यकता व प्रयत्न १८०.

**२८ कुळकटी, वंशवेल, बाडें इत्यादि, १८०-१८२**—वंशवृक्ष-रचना व लेखनपद्धति १८०, –दोषादोष १८१, –कुळकटी–लेखनपद्धति १८१, –प्रामाण्याप्रामाण्यतेचा दर्जा १८१, –दोषादोष १८१, –टिपणें किंवा बाडें १८२, –त्यांचे ऐतिहासिक महत्त्व १८२.

**२९ बखरी, १८२-१८९**—बखरींबद्दल चर्चा १८२, –लेखन-काल १८३, –लेखनपद्धति १८३, –शिवशाहीच्या बखरी व त्यांचे रचनाकाल १८४, उपलब्ध नकला १८५, –प्रामाण्याप्रामाण्यता १८६, –कालानुक्रमांत वगैरे बखरनिविसांचीं गडबड उडण्याची कारणें १८६, –प्रकाशनांतील दोष १८८, –बखरींचें महत्त्व १८८, –परीक्षणाचे मुद्दे १८९.

**३० पोवाडे व काव्यें १८९-१९१**—उपलब्ध पोवाडे व टीका १८९, भाट, ठाकूर, त्यांचीं कवनें व गोंधळी-शाहीर त्यांचे पोवाडे १९०, –पाठभेद वगैरे १९०-१९१.

**३१ ऐतिहासिक म्हणी व वाङ्मय १९१-१९५**—म्हणींची उपपत्ति १९१, –महत्त्व १९२, –वाङ्मयाचा इतिहासास उपयोग १९२, –स्थानिक परिस्थिति तीच इतिहास-रचनेची दृष्टि १९३, –शिवकालीन वाङ्मय व त्याचें महत्त्व १९४, –वाङ्मय परीक्षण १९४-१९५.

**३२ नाणीं, शिलालेख, १९५-१९७**—शिवशाहीचीं नाणीं १९५, उपयुक्तता १९५, –शिलालेख-उपयोग १९६, –वाचन १९६, –महत्त्व १९६, –प्रकाशन १९७.

**३३ चित्रें, नकाशे, इमारती वगैरे, १९७-२००**—चित्रकलेच्या परंपरा १९७, –चित्रलेखनपद्धति १९७, –चित्रांतील दोषादोष १९७, –चित्रांचे प्रकार १९८, –चित्रांची व्याप्ति १९८, –चित्रांच्या नकला १९८, –चित्रबोध-परीक्षण १९९, –नकाशे-लेखनपद्धति १९९, –त्यांचें महत्त्व २००, –इमारती-उपयोग २००, –त्यांचें महत्त्व २००.

**३४ अलिखित इतर साधनें, २००-२०३**—उपकारक असतात २००, –प्रकार व ऐतिहासिक महत्त्व २०१, –भौगोलिक माहिती २०१, –सामान्य वाङ्मय २०१, –पुराणवस्तु २०२, –दंतकथा-गोष्टी २०२-२०३.

३५ **ऐतिहासिक पुरावे, २०३-२०७**—दोन विभाग २०३, –खरेखोटेपणा शोधण्याची प्रभावलि २०४, –प्रत्यक्ष पुरावे–विभाग-लेखकाची तपासणी २०५, –प्रसंगनिवेदनांतील प्रकार २०६, –साधनमान्यतेकडे सामान्य कल२०६, –साधनछपाईतील चुकांमुळें परीक्षणास अडथळे २०७.

३६ **लेखांचें सामान्य परीक्षण, २०७-२१०**—अस्सल-नकल २०७, –लेखपरीक्षणासाठीं विभाग२०८, –नकलांतील दोष२०८, –नकलेची तपासणी-आवश्यक ज्ञान २०८, –नकलांची तौलनिक तपासणी-ग्राह्याग्राह्यता २०८, –मूळ पाठाचें महत्त्व–२०९, –पाठभेदांच्या स्पष्टीकरणाची आवश्यकता२०९, –परीक्षणाचा मुख्य उद्देश-हेतु-ज्ञान२०९, –नकलांवरून मूळ पाठ सांपडत नाहीं २०९, –जुळता मजकूर घेणें व न जुळता सोडणे-अशास्त्रीय २१०.

३७ **लेखकांची पात्रापात्रता, २१०-२१२**—पात्रापात्रतेवर प्रामाण्याप्रामाण्य ठरतें२१०, –तपासणीचे प्रश्न२१०, –मुख्य हेतु-माहितीच्या मार्गांचे ज्ञान २११, –लेखकाचा दर्जा ठरविण्याचे इतर मार्ग २११, –मनःस्थितीवरून पात्रापात्रता ठरवणें २११–२१२.

३८ **लेखकांचे सामान्य दोष, २१२-२१६**—स्वभावदोषपरीक्षण–दुर्लक्षत्व२१२, –सत्य लपविणें २१२, –पक्षपात२१३, –महत्त्व-कमी अधिक करणें२१३, –स्वार्थांधता२१३, –पुरावा नाहींसा करणें२१४, –श्रद्धालुत्व व संदिग्धपणा २१४, –एखादी चूक म्हणजे स्वभावदोष नाहीं २१५ –दोषांवरून प्रवृत्तीचें ज्ञान–तपासणी २१५–२१६.

३९ **काल-निर्णय, २१६-२२१**—लेखन-काल-निर्णयाचे मार्ग २१६, –परीक्षण व अडचणी२१६, –नकलांचा कालनिर्णय करण्याचे मार्ग व अनुमानें २१७, –ऐतिहासिक टिपणें व ग्रंथांचे कालनिर्णयाचे मार्ग २१८, –प्रसंगांचा कालनिर्णय २१९, –निर्णयाचे पंधरा मुद्दे २१९-२२१.

४० **अर्थबोध-चिकित्सा, २२१-२२५**—आवश्यकता २२१, –दोन मार्ग २२२, –सामान्य प्रवृत्ति-दोषादोष २२२, –पहिलें वाचन २२२, –चिकित्सक वाचन २२३, –वाचनास विशिष्ट ज्ञान २२३, –मुख्य बाबी २२४, –सावधानता २२५.

**४१ अंतरंगपरीक्षण, २२५-२३९**—आवश्यकता २२५, –पहिली तपासणी-लेखकाची विश्वसनीयता २२६, –तपासणींतील ढिलाई २२६, –प्रत्येक बाबीची स्वतंत्र तपासणी२२७, –मार्ग २२७, –लेखकाची मनःस्थिति २२८, –विश्वसनीय माहितीचें परीक्षण २२९, –प्रश्नावली २३०, –चुकीच्या माहितीचें परीक्षण-प्रश्नावली२३२, –ऐकीव माहितीचे परीक्षण-अडचणी २३३, –माहिती मिळविण्याचे मार्ग २३४, –दंतकथा-अनिष्ट परिणाम २३४, –आठवणी, दंतकथा-महत्त्व २३५ ,–ऐकीव माहितीच्या मार्गांची तपासणी २३६, –माहितीची तपासणी २३६, –असत्य मजकूर शिरण्याचे मार्ग २३७, –तपासणी २३७, –परीक्षण-पद्धति-व्याप्ति, सुलभता २३८-२३९.

**४२ संभाव्यासंभाव्यता,२३९-२४५**—कसोटीची आवश्यकता२३९, –अडचणी २४०, –असंभाव्य प्रसंग घडण्याची शक्यता २४०, –विश्वसनीय पुराव्याची संभाव्यता २४१, –अविश्वसनीय-असंभाव्यही ठरतो २४१, –असंभाव्यतेची कारणें-अज्ञात २४१, –मतविरोधी मजकुराची तपासणी २४१, –असंभवनीयता व अशक्यता २४२, –अद्भुत प्रसंग २४२, –असंभवनीयतेच्या अनुमानांची संभाव्यता २४३. –उपपुराव्यांचा उपयोग २४३, –संभाव्यासंभाव्यतेचे मुद्दे २४३-२४५.

**४३ प्रसंग-निर्णय, २४५-२५५**—सामुग्रीचे प्रकार २४५, –कल्पनांचा उगम-स्वरूप-मुद्दे २४६, –आवश्यकता २४७, –पुराव्यास शाबिती २४८, –प्रसंग-निर्णयास तपशिलांचें एकीकरण २४८, –त्याच्या फेर-तपासणींतील मुख्य बाबी २४९, –अव्वल व सांगीवांगीच्या पुराव्यांची परीक्षा २५१, –स्वतंत्र साक्षीदारांची मतैक्यता २५२, –साधनांची स्वतंत्रता २५३, –अद्भुत गोष्टींची तपासणी २५३, –प्रसंग-निर्णयाचे मुद्दे २५३, –कामाची वांटणी २५४-२५५.

**४४ इतिहासरचनेचें साहित्य, २५५-२६२**—स्वरूप २५५, –साधन-खंड अल्प, भाव किंवा कल्पनाचित्रें कल्पनातीत–म्हणून बिनचूक रचनेची अशक्यता २५७, –साहित्य–तीन प्रकार २५७, –कल्पनाचित्रे-लेखकाचे दोषादोष २५८, –परीक्षण २५८, –यथादर्शन प्रतिकृतीची

अशक्यता २५९, –त्याकडे सामान्य दुर्लक्ष २६०, –साहित्योपयोग-पद्धति २६१, –त्याची मानसशास्त्र व तर्कशास्त्रावरून तपासणी २६२.

**४५ प्रसंगांची विषयवारी**, २६२–२६४—विभागांची व विषयवारीची आवश्यकता २६२, –रचनेचे तीन क्रम २६३, –विशिष्ट परिस्थित्यनुरूप इतिहासरचना २६३, –विषयवारीचे मुख्य मुद्दे २६३–२६४.

**४६ विशिष्ट चुकांचीं कारणें**, २६४-२६७—दोन मुख्य मार्ग २६४, –विश्वसल्यानें चुकीचीं अनुमानें २६५, –पूर्ण माहिती मिळण्याची अशक्यता २६५, –चीवस्तर न लिहिण्याचा उद्देश २६५, –युक्त शब्दांचें अज्ञान २६५, –वर्तमान-कालावरून निर्णय-दोषादोष २६५, –कांहीं सूचना २६५, –वर्तमान-संस्कृतीवरून बऱ्याबाईट न्यायदानाची अनधिकारी आकांक्षा २६६, –तिचें निष्फलत्व वगैरे २६७.

**४७ विधायक अनुमानपद्धति**, २६७–२७१—अनुपलब्ध भागांसाठीं अनुमानांची आवश्यकता २६७, –अडचणी २६७, –आतुरता व हेकटपणा २६८, –अनुमानपद्धति-मुद्दे २६८, –अनुमानांचीं कारणें २६९, –अनास्तित्वाचे पुरावे २६९, –तपासणी २७०, –अस्तिवाचे पुरावे-तपासणी व मार्ग –२७०, अनुमानांच्या बिनचुकतेचा ताळा २७१.

**४८ इतिहास-रचना व प्रसंगांचें एकीकरण**, २७१–२८२—विस्तार-संक्षेप-एकीकरणाची आवश्यकता २७१, –ज्ञानदानाचे दोन मार्ग २७२, –मतविरोध २७२, –संक्षेपाची आवश्यकता २७२, –सामान्य छेद २७२, –व्यक्तिविशिष्ट वर्णनें–आवश्यकता २७२, –सामान्य वर्णनें-स्वरूप-दिग्दर्शन २७३, –व्यक्तिकार्यें-स्वरूप-महत्त्व २७४, –संक्षेपास प्रसंगांचें महत्त्व-मापन २७५, –निवडानिवड २७६, –मार्ग २७६, –परिणामांवरून तपशिलांचें एकीकरण २७७, –स्वतंत्रता-ओळखण्याचीं साधनें २७७, –परीक्षण २७८, –तपशिलांच्या परस्परसंबंधांवरून परिणामांची तपासणी २७९, –विस्तार व महत्त्व-सांगड २८०, –एकीकरणाचा क्रम २८०, –कारणमीमांसा २८१, –दोषादोषारोप २८१–२८२.


४९ **ऐतिहासिक विवेचन**, २८२–२८४—पद्धति-विभाग २८२, —संशोधकीय-पोट-विभाग २८२, —गोष्टीरूप, राजकारणी-पोट-विभाग २८३, —विवेचनाचे मार्ग २८३, - निर्बंध २८३- २८४.

५० **साधनांचे व अक्षरांचे नमुने**, २८४-३००—प्रांतवारीनें व कालवारीनें साधनांच्या व अक्षरांच्या वळणांच्या नकाशांची आवश्यकता २८४, —नकाशांचा विस्तार-ते देण्याची खर्चाभावीं अशक्यता २८४, --अभ्यासूंनीं नकाशे तयार करून सार्वजनिक संग्रहांत ठेवावेत २८४, —नमुन्यांचीं रूपांतरें २८४, —दानपत्र २८५, —फर्मान २८७, - अक्षरांचे नमुने २८९, —बाबाजी राजे भोंसले-खुर्दखत २९०, —विठोजी राजे-पत्र २९१, —अगाड-शिलालेख २९१, --शिवाजी महाराजांचें खुर्दखत २९२, - शिवकालीन-पत्र २९३, —श्रीनिवासराव प्रतिनिधि-पत्र २९४, —शकावली २९५, —महानुभावीय लिपी २९६, —जिजाबाई-पत्र २९७, - तुकारामबोवांचें हस्ताक्षर २९९-३००.

५१ **आधारभूत ग्रंथांची यादी-सूचना**, ३०१-३०२—आवश्यकता ३०१, —सूचना ३०२.

**उपसंहार**, ३०२–३०३.

**विषय-सूचि**, ३०४–३१४.




**टीप**—या प्रस्तावनाखंडाच्या आधारभूत ग्रंथांची यादी पुढील खंडास जोडण्यांत येणार आहे.